# दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

सप्रेम नमस्कार,
आपली प्रतिक्रिया जाणण्यास उत्सुक आहोत.

स्नेहांकित

**सुदेश हिंगलासपूरकर** (विश्वस्त)

**आल्हाद गोडबोले** (अभ्यागत संपादक)

**अरुण जोशी** (कार्यकारी संपादक)

**धनंजय गांगल** (साहाय्यक संपादक)

धनश्री धारप, योगिता मोरे,
सुमेधा कुवळेकर, सौमित्र शिंदे,
अर्चित नागवेकर आणि
हरिप्रसाद जयस्वाल



दिवाळी विशेषांक
ऑक्टोबर–नोव्हेंबर २०२१
पृष्ठे १७६
मूल्य २५० रुपये

४६


# शब्द रुची





मन
उडु उडु
झालं
Co-powered by
JSW PAINTS
Think Beautiful
सोम - शनि
संध्या. 7.30 वा.
झी मराठी HD वरही पहा
ZEE मराठी
Co-powered By:
JSW PAINTS
Think Beautiful
Streaming Partner:


PLANET
मराठी
A VISTAS MEDIA CAPITAL COMPANY
'शब्द रुची'च्या
सर्व वाचकांना
'प्लॅनेट मराठी
ओटीटी'कडून
दिवाळीच्या
शुभेच्छा
DOWNLOAD
NOW
मराठी मनोरंजनासाठी...
हक्काचं व्यासपीठ
GET IT ON Google Play
Available on the App Store
WWW.PLANETMARATHI.COM


सुप्रीम परिवारातर्फे आपणा सर्वांना
दीपावली व नूतनवर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!
Since 1942
Supreme®
People who know plastics best
पाईपिंगचे संपूर्ण समाधान
• वॉटर मॅनेजमेन्ट • प्लम्बिंग • ड्रेनेज • सिवरेज
पाईपिंगच्या प्रत्येक गरजांसाठी 'सुप्रीम' ची
१००० पेक्षा अधिक
दर्जेदार, टिकाऊ व पर्यावरण पूरक उत्पादने...
दि सुप्रीम इंडस्ट्रीज लि. मुंबई/जळगाव फोन: 022-4043 000, 0257-3501541, 42, 43, 44, 49
Toll Free No.: 1800-102-4707
www.supreme.co.in
pvc-pipes@supreme.co.in
Download the App
Supreme Pipes
आयुष्यभराची साथ...


शुभ दीपावली
NKGSB Co-operative Bank Ltd.
(Multi-State Scheduled Bank)
SINCE 1917
Trusted over a Century
Customer Care: 022 28602000
www.nkgsb-bank.com


सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
उत्साहाने साजरा करू या,
सुरक्षेचे पालन करून
दिवाळीचा आनंद
द्विगुणित करू या!
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!
मास्क वापरा | हात धुवा | अंतर ठेवा
माझे कुटुंब माझी जबाबदारी
श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे
मा. मुख्यमंत्री
श्री. अजित पवार
मा. उपमुख्यमंत्री
श्री. बाळासाहेब थोरात
मा. मंत्री, महसूल
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

National Award winners for Excellence in Printing

सर्व प्रकारच्या दर्जेदार छपाईसाठी अवश्य भेटावं असं नाव!

९० वर्षांची परंपरा असलेलं


# इंडिया प्रिंटिंग वर्क्स

एक दिवसात
१ ते २०० प्रती
छापून देण्याची
सुविधा

Delivery in 24 Hours

सारे काही एका छत्राखाली

डिझाइन स्टुडिओ | डिजिटल प्रिंटिंग | वेब ऑफसेट | ऑफसेट | बाईंडिंग




एबीपी माझा या लोकप्रिय वृत्तवाहिनीच्या
पहिल्या दिवाळी अंकाचे मुद्रण करण्याचा मान लाभलेले मुद्रक

90 years
IPW
CONCEPT TO COMPLETION
INDIA PRINTING WORKS
EVERYTHING UNDER ONE ROOF

इंडिया प्रिंटिंग वर्क्स
इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, गं. द. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई - ४०० ०३१
फोन: +९१ २२ २४१२२७५५/५६, Email : anand@ipworks.in
Website : www.indiaprintingworks.co.in

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्मक
जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची ४६

दिवाळी अंक
ऑक्टोबर–नोव्हेंबर २०२१, वर्ष नववे
अंक सहावा–सातवा, मूल्य २५० रु.

संपादक : सुदेश हिंगलासपूरकर
कार्यकारी संपादक : अरुण जोशी
अभ्यागत संपादक : आल्हाद गोडबोले
साहाय्यक संपादक : धनंजय गांगल
मुखपृष्ठ व रेखाटने : शिरीष घाटे

कार्यालयीन संपर्क
कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, सहकारी – सुमेधा कुवळेकर
shabdruchee@gmail.com
जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप
granthaliad@gmail.com
वितरण – हरिप्रसाद जयस्वाल, सौमित्र शिंदे

केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.
वार्षिक वर्गणी ३०० रुपये डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को–ऑप.
हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर,
मनोरमा नगरकर मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
फोन : २४२१६०५०
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवर पाठवावी.
shabdruchee@gmail.com

ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६
संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी

अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तींची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.

# अंतरंग



१२ शिष्योत्तम, उत्तम गुरू, रसिकराज
– कस्तुरी पायगुडे



२० सरस्वतीसाठी विणले रेशीमरेघी वस्त्र तिने...
– डॉ. सुजाता शेणई

२८ जगण्याचा लोलक गवसलेली कवयित्री
– सलील कुलकर्णी

३२ मरणात खरोखर जग जगते!
– गणेश कुलकर्णी


३८ मग खुशाल ये हासत ये मरणा...
अनुवाद : अनंत भट

४० मावळतीचे रंग
– संजय गोखले

४५ गरिबी अमर है?
– निळू दामले

४९ रॅट रेस
– असीम कुलकर्णी

५२ लावण्यवती लावणी
– संजीवनी खेर



## तंत्रज्ञानक्रांती आणि उद्याची माध्यमे


५६ माध्यमासुराला माणसाळवणे शक्य आहे!
दिनकर गांगल




६२ ...तरी असेल गीत हे
कौशल इनामदार

६८ नभोवाणी आता व्हावी अक्षयवाणी
नीतीन केळकर



७३ शिवराळ भाषेची राळ
अपर्णा पाटील

७७ क्रांतीच्या उंबरठ्यावर
आभास आनंद




८० मनोरंजनाची बदलती क्षितिजे
अक्षय बर्दापूरकर




८२ मुक्तीची भावना महत्त्वाची
धीरज अकोलकर

८४ नाट्यानुभवाचे नवे ढाचे
योगेश तडवळकर



८८ नव-नवे ते सर्वांनाच हवे
चैतन्य ताम्हाणे

९१ प्रसारमाध्यमे कात टाकतील
प्रसन्न जोशी




९३ यापुढे स्पर्धा 'ओटीटी'शीच!
वासुदेव जोशी

९५ जाहिरातकारी, मजकूर पारखडणूक...
राजेंद्र साठे

९८ कागद, काच, कचरा वेचणारे/वाचणारे
जयदेव डोळे

१०३ कलियुगातून डेटायुगात
श्रीकांत बोजेवार

१०६ एकच आशा उरी
संजीव लाटकर

१०८ ज्यांच्या हाती माध्यमांची दोरी...
रवींद्र आंबेकर

११० भवितव्य वर्तविणे अवघड
विद्याधर दाते

११२ देशच टकमक टोकाच्या दिशेनं...
राम जगताप

११४ बदल स्वीकारा वा बाहेर व्हा!
आशिष जाधव

११५ डोळसपणा हवा
मीनल जगदाळे

११६ काळापाशी असेल उत्तर
मृणाल कुलकर्णी

११७ व्यक्तिकेंद्रित बदल अटळ
विराजस कुलकर्णी

११८ भरतीची लाट!
प्राजक्ता माळी

११९ मूठभर रसिकांसाठी
ज्योत्स्ना केतकर

१२० कवितेचं पान
चंद्रशेखर सानेकर, उषा मेहता, किरण येले, सदानंद डबीर, संजय कृष्णाजी पाटील, प्रा. प्रतिभा सराफ, हर्षदा सुंठणकर, प्रकाश हरी कार्लेकर, अविनाश, धीरज कुलकर्णी

१२५ द प्रिन्स - निकोलो मॅकिव्हेली / (The Prince by Niccolo Machiavelli)
राजीव श्रीखंडे



१२८ महापूर
श्याम मोकाशी

१३८ ...एक होता माल्कम एक्स!
अरुण केळकर

१४७ कला... स्वप्न... आणि पंख...
राज शिंगे

१५० वृषभ आणि वल्लभ
डॉ. प्रकाश लोथे




१५३ नीलतरू तमाल
नीला कोर्डे

१६४ प्रकाशन वृत्तांत

१७१ ग्रंथयाने - चांगदेव काळे


सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था
पुस्तकांचं गाव
भारतातील पहिलं पुस्तकांचं गाव
३० घरे, २८ साहित्यप्रकार,२५ हजाराहून अधिक पुस्तके
मु. पो. भिलार, ता. महाबळेश्वर, जि. सातारा-४१२८०४
संपर्क - ०२१६८-२५०१११
pustakanchgaav.rmvs@gmail.com
* निर्मितीसाहाय्य योजनेचा लाभ घ्या...
उत्तम संदर्भसाधने मराठीत आणा....
* युनिकोड,विकिपीडिया कार्यशाळा
विविध प्रशिक्षणे यांचा लाभ घ्या.
सुरु असलेले
काही महत्त्वाचे प्रकल्प
* मराठीच्या बोलींचे प्रतिमांकन
* बृहन्महाराष्ट्रातील संस्थांना अनुदान
* मराठी संशोधन संस्थांना अनुदान
* मराठी भाषा संस्कृती ज्ञान परीक्षा व निबंध स्पर्धा
* रंगवैखरी-आंतरमहाविद्यालयीन नाट्याविष्कार स्पर्धा
* गीतार्णव शब्दार्थ संदर्भ कोश
* माय मराठी (अमराठी भाषकांना मराठीचे प्रशिक्षण)
* श्राव्य पुस्तके - दुसरा टप्पा - ज्ञानेश्वरी
* वस्त्रनिर्मिती माहिती कोश
* मध्यवर्ती ग्रंथालय, बदलापूर
* देवनागरी टंकविषयक पुस्तक
* भाषाविज्ञान शिष्यवृत्ती
* मराठी ग्रंथसूचिमाला (१९८६ ते २०००)
* वऱ्हाडी शब्दकोश भाग १ ते ४
संस्थेच्या संकेतस्थळावरुन उतरवून घ्या......
* श्राव्य पुस्तके- दासबोध, कृष्णाकाठ, कविता कुसुमाग्रजांची, कविता विंदांची
* अनेक दुर्मीळ पुस्तके, नियतकालिके व संस्थेची निवडक इ-पुस्तके
* युनिकोड आधारित देवनागरी टंक
संस्थेची निवडक प्रकाशने
घराघरात ठेवण्यासाठी, शालेय मुलांसाठी,
उत्तमोत्तम ज्ञानासाठी, वाचनासाठी...
सर्व प्रकाशने सवलतीत उपलब्ध...प्रकाशनसूची मागवा
अधिक माहितीसाठी संकेतस्थळाला भेट द्या...
राज्य मराठी विकास संस्था (नोंदणी क्र. १६०५४ (मुंबई))
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई-४०० ००१
दूरध्वनी:(०२२)२२६३१३२५, संकेतस्थळ: http://rmvs.marathi.gov.in, इ-पत्ता: rmvs_mumbai@yahoo.com














# तरी उरेल गीत हे

*स्वतंत्र भारत देश १९४७ मध्ये अस्तित्वात आला, त्या ऐतिहासिक घटनेस पुढील वर्षी १५ ऑगस्ट रोजी ७५ वर्षे पूर्ण होतील. तर मराठी माणसांसाठी, मराठी माणसांनी चालवलेले, मराठी माणसांचे महाराष्ट्र राज्य अस्तित्वात येऊन गेल्याच वर्षी, १ मे २०२० रोजी साठ वर्षे पूर्ण झाली. देशाचा अमृतमहोत्सव आणि राज्याचा हीरकमहोत्सव अशा दोन सोनेरी वर्षांचा सुवर्णमध्य हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील रत्न पंडित भीमसेन जोशी आणि मराठी सारस्वतातील माणिक म्हणावे अशा कवयित्री शान्ता ज. शेळके या दोघांच्या जन्मशताब्दी वर्षाने आपल्याला साजरा करता यावा, हा एक दुग्धशर्करा योगच मानायला हवा.*

*संगीताच्या क्षेत्रात 'भीमकाय' कामगिरी करून ठेवलेल्या भारतरत्न 'भीमण्णां'ची आठवण या वर्षभरात फक्त भारतातच जागवली गेली, जागवली जात आहे, असे नाही, तर मराठी माणूस या भूतलावर जिथे जिथे आहे, तिथे तिथे, पाचही खंडांत, भीमसेनजींच्या स्वरांबरोबर शताब्दीचे सूर आळवले जात आहेत आणि यापुढेही ते आळवले जातीलच. शतकानुशतके हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत टिकून राहिले, वाढत-बहरतच गेले आहे. अशा या वटवृक्षाची भीमसेन जोशी नावाची एक पारंबी! अनेक भावी पिढ्या त्यावर स्वरांचे हिंदोळे घेत राहतील.*

*शान्ताबाईंचे नाव घेतले की, भावगीतांपासून लावणीपर्यंत आणि हायकूपासून चित्रपटगीतांपर्यंत असंख्य कवितांच्या, गीतांच्या ओळी मराठी माणसाच्या ओठांवर रूळू लागतात, गळ्यातून बाहेर पडून गुणगुणू लागतात. आज प्रत्येकाच्या हातात असलेला मोबाइल नावाचा 'जादूचा दिवा' तर आपल्याला हवे ते, हवे तेव्हा, हवे तिथे, काहीही ऐकवू शकतो!*

*संगणकाने सामान्य माणसाच्या जगण्यात बदल होत गेले, पण एकविसाव्या शतकात लॅपटॉप-टॅब-मोबाइल यांच्या माध्यमातून आणि फोर जी, फाइव्ह जी यासारख्या विलक्षण वेगाने आलेल्या, येऊ घातलेल्या तंत्रज्ञानातील क्रांतिकारक सुधारणांनी यापुढील काळात नेमके काय काय बदल घडून येतील, याचे तर्कवितर्क केले जात आहेत. विशेषत: गृहबंदिवासाच्या काळात चित्रपटगृहे, नाट्यगृहे, मॉल, उद्याने, सभागृहे, शिक्षणसंस्था, पर्यटनस्थळे अशा सर्व सार्वजनिक वावराची ठिकाणे कुलूपबंद होऊन सर्व माणसे घराघरांत अडकून पडली आणि ज्ञान-माहिती-मनोरंजन यासाठी हातातील सहा इंचाच्या 'दिव्या'च्या उजेडात तासन्‌तास शोध घेत राहिली. तेव्हा 'ओटीटी' म्हणजे 'ओव्हर द टॉप'सारख्या माध्यमाने सारीच क्षेत्रे व्यापून टाकणे स्वाभाविक होते. अशा या तंत्रज्ञानातील बदलांमुळे विविध कलाक्षेत्रे आणि चित्रपट, नाटक, संगीत, नभोवाणी, दूरचित्रवाणी तसेच वृत्तपत्रे, नियतकालिके, प्रकाशने, वृत्तवाहिन्या आदी माध्यमांवर नजीकच्या भविष्यकाळात कशा स्वरूपाचे परिणाम होतील, याचा वेध त्या-त्या क्षेत्रातील पंचवीस-तीस जाणकारांकडून जाणून घेण्याचा प्रयत्न शब्द रुचीच्या या अंकात घेतला आहे.*


*कवितेत धृपद असते, गाण्यात सम असते, तसे अनेक पाने आणि असंख्य शब्द आळवल्यावर हाती सार आले ते- 'माध्यमे कितीही बदलोत, भविष्यातही उरणार आहेत ते सूर आणि शब्द!'*

*माध्यमांपेक्षा महत्त्वाचा असतो तो आशय! उद्याही असणारच आहेत, अशा आशयघन सूर आणि शब्दांच्या सागरातील रत्न आणि माणकांना म्हणूनच रसिकांच्या वतीने सलाम!*

*या शब्द-सुरांच्या सहवासात आपणा सर्वांची दिवाळी आणि नूतनवर्ष सुखसमृद्धीचे, भरभराटीचे जावो, हीच प्रार्थना.*

**- आल्हाद गोडबोले**
भ्रमणध्वनी : ९५९४५४४८८८
alhadgodbole@gmail.com

# शिष्योत्तम, उत्तम गुरू, रसिकराज



कस्तुरी पायगुडे




*जगामध्ये दोन प्रकारचे कलाकार असतात. पहिल्या प्रकारचे कलाकार हे उत्तम सादरीकरण करणारे कलाकार असतात. त्यांनी गुरूकडून रीतसर तालीम घेतलेली असते. घराण्याची धुरा ते उत्तम प्रकारे सांभाळत असतात व कलाकार म्हणून भरपूर नाव व प्रसिद्धी मिळवत असतात. तर दुसऱ्या प्रकारचे कलाकार हे मैफल गाजवणारे कलाकार असतातच, शिवाय संगीत पुढे नेण्याची क्षमता त्यांच्यामध्ये असते. पं. भीमसेन दुसऱ्या प्रकारचे कलाकार होते.*

**भा**रतामध्ये ध्वनिमुद्रणाचे तंत्रज्ञान १९०२ मध्ये आले व १९०४ पर्यंत सर्वांना ते परिचित झाले. ध्वनिमुद्रणाच्या वेळेतील व तंत्रातील बदल १९०४ ते १९५५च्या दरम्यान झाले. ई.पी.पासून एल.पी.पर्यंत झालेल्या प्रवासात गाण्याचा वेळ वाढलेला होता. तीन मिनिटांच्या ई.पी.मध्ये केवळ द्रूत बंदिश गाता येत होती. आठ मिनिटांच्या रेकॉर्डमध्ये मध्य लयीतील बंदिशींचे सादरीकरण करणे शक्य झाले व कालांतराने वीस मिनिटांच्या रेकॉर्डमध्ये बडा ख्यालही गाता येऊ लागला.

एल.पी.साठी शास्त्रीय संगीत ध्वनिमुद्रित होऊ लागले तेव्हा काही प्रसंगी कलाकाराला काही मिनिटे फक्त बंदिश मांडायला सांगितली जात असे. ई.पी. व एल.पी. या दोन्ही रेकॉर्ड्सचा कालावधी भिन्न असल्यामुळे सादरीकरण करताना कलाकाराला संपूर्ण विचाराने रागविस्तारातील काही घटकांचा समावेश करावा लागत असे; तर काही घटक सोडून द्यावे लागत. या सर्व पं. भीमसेन जोशी तंतोतंत पाळत व आपल्या शिष्यांनादेखील हीच शिकवण देत. त्यांचे

संगीत - मग ते सात मिनिटांचे असो, वीस मिनिटांचे असो अथवा एक तासाचा दीर्घ ख्याल असो, ते कायमच प्रभावी व परिणामकारक होत असे. त्यासाठी ते निक्षून प्रयत्न करत असत. वेगवेगळ्या स्वरूपामध्ये रागाचे सार कसे मांडता येईल हे त्यांना नेमके उमगले होते. पं. भीमसेन १९५५ मध्ये वीस मिनिटांची रेकॉर्ड ध्वनिमुद्रित करण्यापूर्वी अनेक छोट्या छोट्या रेकॉर्ड्ससाठी गायले होते. त्यांचे आठ मिनिटांचे मियाँ की तोडीचे रेकॉर्डिंग प्रचंड लोकप्रिय झाले होते.

अब्दुल करीम खाँ यांच्यानंतर काही निवडक गायकांपैकी पंडित भीमसेन जोशी होते, ज्यांना संगीताच्या ध्वनिमुद्रणाचे महत्त्व कळले होते व म्हणून त्यांनी आपल्या रेकॉर्ड ध्वनिमुद्रित करून ठेवल्या होत्या. कालांतराने भीमसेनजी हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील सर्वाधिक



ध्वनिमुद्रण केलेले गायक ठरले. पंडित भीमसेन यांना 'भारतरत्न' मिळाल्यानंतर, एच.एम.व्ही. कंपनीने त्यांच्या सीडींजचे आठ संच ध्वनिमुद्रित करून बाजारात आणले होते. या सीडींजमधील संगीत भीमसेनजींनी त्यांच्या अंतिम आजारपणाच्या पूर्वीच रेकॉर्ड केले होते. ती ध्वनिमुद्रणे ऐकल्यावर, गायनातील सौंदर्यस्थळांची व एकूणच संगीतातील सौंदयाविषयीची त्यांची समज, जाण किती नेमकी व योग्य होती हे लक्षात येते. ही लक्षणे अब्दुल करीम खाँ, अल्लादिया खाँ, बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, कुमारगंधर्व यांसारख्या दिग्गज गायकांमध्येही प्रामुख्याने दिसतात. सर्व गायकांच्या गळ्यामध्ये तेच स्वर असतानादेखील पंडित भीमसेन यांची गायकी थोर व स्वप्नवत होती. त्याचे कारण सौंदर्याची जाण, अफाट बुद्धिमत्ता व इतर गायकांकडून व गुरूंकडून संगीतातील उत्तम असे सर्व स्वीकारण्याची क्षमता हे तीनही गुण त्यांच्या अंगी होते.

संगीत हे सुरुवातीपासूनच समूहासाठी एका विचाराने सादर केले जायचे. कालांतराने काहीच जण समूह सादरीकरणाकडून एकल सादरीकरणाकडे वळले. जे संगीत एकल सादरीकरणाकडे वळले त्याच्या गुणांमध्ये खूप मोठी कलात्मक भर पडली. हे भारतीय संगीतात व पाश्चिमात्य संगीतात अशा दोन्ही प्रकारांत घडले. हळूहळू काळानुसार समूहातील एखाद्या कलाकाराने इतरांपेक्षा वेगळा विचार करून नेहमीपेक्षा वेगळे काही व्यक्त केले की त्याची कला व तो कलाकार इतरांपेक्षा वेगळा ठरतो. जो रूढ विचारसरणीच्या पलीकडे जाऊन विचार करतो व नवीन विचारसरणी रुजवतो, त्याचे विद्वान म्हणून नाव होते. पंडित भीमसेन जोशी यांचा प्रवास या विचारांशी मिळताजुळता असा होता. सदोदित स्वरमग्न राहून गाण्याचा व सादरीकरणाचा विचार त्यांनी केला, त्याचाच ध्यास आयुष्यभर घेतला.

**अब्दुल करीम खाँ व भीमसेन जोशी – द्रष्टे कलाकार**

पंडित भीमसेन हे प्रज्ञावंत कलाकार होते. त्यांना कन्नडबरोबर मराठी, हिंदी व उर्दू भाषाही अवगत होत्या. त्यामुळे त्यांची सांगीतिक कारकीर्द बहरत गेली व ते कन्नड संगीताच्या पलीकडे जाऊन विचार करू लागले. सर्व घराण्यांतील अनेक गायकांचे गाणे ते नित्यनियमाने ऐकत राहिले. पुन्हा पुन्हा ऐकत राहिले. त्याचा परिणाम त्यांच्या स्वत:च्या गाण्यावर निश्चितच होत राहिला. त्यांच्या गाण्यात होत असलेले बदल रसिकांनी आनंदाने स्वीकारले व दिवसेंदिवस त्यांना अधिकाधिक प्रसिद्धी मिळत गेली. त्यांचे गाण्याविषयीचे संगीतातील विचार अधिक पक्के होऊ लागले व गाण्याबद्दलचा विचार करण्याची पद्धत अधिक सूक्ष्म होत गेली. निद्रावस्थेतही सुप्त मनामध्ये त्यांचे गाण्याविषयीचे विचारमंथन सुरू राहिले. सतत चिंतन व मनन करत राहिल्यामुळे एक प्रभावी, खात्रीशीर, परिणामकारक व मनाला भिडणारी गायकी उदयास आली.

एक तासाचा ख्याल वीस मिनिटांत सादर करणे आव्हानात्मक होते. त्यासाठी वेगळ्या प्रकारच्या मांडणीची व विचारसरणीची गरज होती. याबाबत अनेक वर्षांपूर्वी पंडित भीमसेन यांना विचारले असता, त्यांनाही एक तासाचा ख्याल वीस मिनिटांमध्ये गाण्यासाठी नेमके काय बदल करावे लागले हे स्पष्टपणे सांगता आले नाही. परंतु पंडित भीमसेन यांचा एक तासाचा ख्याल व वीस मिनिटांचा ख्याल हे दोन्ही तितकेच परिणामकारक होते. त्यांचा सौंदर्यशास्त्राचा गाढा अभ्यास असल्यामुळे त्यांना ही कालमर्यादा सांभाळणे व ते कमी वेळेमध्ये बसवणे शक्य झाले. रागाचा बाज कायम ठेवून त्याला विशिष्ट वेळेच्या मर्यादेत गुंफताना रागाच्या मूळ चौकटीला धक्का लागू दिला नाही. स्वरांचे हिंदोळे, गोडवा व सौंदर्य हे जरासुद्धा फिके वा पुसट होणार नाही याची काळजी त्यांनी घेतली. त्यांच्या या अशा अभूतपूर्व ख्यालमांडणीमुळे भल्याभल्यांना आश्चर्याचा सुखद धक्का बसला.


**अब्दुल करीम खाँ यांच्यानंतर काही निवडक गायकांपैकी पंडित भीमसेन जोशी होते, ज्यांना संगीताच्या ध्वनिमुद्रणाचे महत्त्व कळले होते व म्हणून त्यांनी आपल्या रेकॉर्ड ध्वनिमुद्रित करून ठेवल्या होत्या. कालांतराने भीमसेनजी हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील सर्वाधिक ध्वनिमुद्रण केलेले गायक ठरले. ती ध्वनिमुद्रणे ऐकल्यावर, गायनातील सौंदर्यस्थळांची व एकूणच संगीतातील सौंदयाविषयीची त्यांची समज, जाण किती नेमकी व योग्य होती हे लक्षात येते.**

**प्रेरणास्थाने व प्रभाव**

भीमसेन जोशी यांच्या सांगीतिक कारकिर्दीमध्ये त्यांचे गुरू सवाईगंधर्व यांची भूमिका फार महत्त्वाची होती. मात्र असे असूनही त्यांना गुरूकडून दीर्घकाळ शिक्षणाची संधी लाभली नाही. काही मोजकीच वर्षे ते त्यांच्याकडे शिकले. भीमसेन यांच्यावर केसरबाई केरकर, उस्ताद अमीर खाँ व बालगंधर्व या तीन गायकांच्या गायकीचा प्रभाव होता. उस्ताद अमीर खाँ त्यांचे एक महत्त्वाचे प्रेरणास्थान होते. त्यांच्याकडून भीमसेन यांनी आवाज लावण्याची पद्धत, सुरेल आवाज राखण्यासाठी व आवाजावर प्रभुत्व मिळवण्यासाठीचे शिक्षण घेतले.

भीमसेनजींनी तरुण असताना अनेकवेळा पंजाबमध्ये मैफिली केल्या. त्या भागामध्ये गायल्या जाणाऱ्या ताना त्यांना खूप आकर्षक वाटल्या. परंतु पंजाबमधील तानांचा त्यांनी आपल्या गायनात समावेश केला नाही. कारण त्यांची वचनबद्धता स्वरांना

महत्त्व देण्याची होती, रागविस्तार करताना स्थिरपणे स्वरांचा शोध घेण्याची होती. स्वरांचा शोध घेणे त्यांच्यासाठी अधिक महत्त्वाचे होते. किराणा घराण्याच्या गायकीच्या सांगीतिक तत्त्वाशी त्यांनी कधीही तडजोड केली नाही. त्यांचा सुरेल व परिणामकारक आवाज हे त्यांचे वैशिष्ट्य होते. त्यांचे गाणे इतरांपेक्षा वेगळे वाटत असे. ते कायम म्हणत असत की गायकाचा आवाज चांगला असेल व तो गाण्याचे, घराण्याचे नियम पाळून गात असेल तर गायनाचा परिणाम साधण्यासाठी गायकाला फार काही करावे लागत नाही व आवाजच सर्व काही काम करून जातो. ज्या कलाकारांचा आवाज आयुष्यभर चांगला राहिला, ते कलाकार आपल्या गाण्याद्वारे श्रोत्यांवर अनेक वर्षे परिणाम साधत राहिले. ज्यांनी रागगायनामध्ये सातत्य ठेवले व सोबत श्रवणभक्तीही सुरू ठेवली त्यांना कालांतराने गाण्यातील सूक्ष्म घटक मिळू शकले. पंडित भीमसेन यांचे संगीत संथ होते व ते हळूहळू वाढले. त्यात अचानक झटके नव्हते तर रागाची सतत व स्थिर अभिव्यक्ती होती. त्यांच्या गायकीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी विलंबित ख्यालासाठी किराणा घराण्यामध्ये प्रचलित नसलेले ताल वापरले. त्यांनी कुठेही जाहीरपणे वाच्यता न करता किराणा घराण्याच्या एकताल वापराच्या पद्धतीला छेद देत तीनतालाचा अवलंब केला व अनेक वर्षे तीनतालामध्ये ख्याल गायले.



सवाईगंधर्व

### विद्वत्ता, ज्ञान व समज यांचा दुर्मिळ संगम

गुरू सवाईगंधर्व यांच्या हीरकमहोत्सवी म्हणजे साठाव्या वाढिदवसाचा निमित्ताने १९४६ मध्ये अवघ्या चोविसावा वर्षी भीमसेन जोशी यांनी मैफिलीत गायन सादर केले. संगीतसमीक्षक, अरविंद मंगळूरकर यांनी दैनिक केसरीमध्ये भीमसेन यांचा मैफिलीवर भले मोठे परीक्षण लिहिले होते. त्यामध्ये त्यांनी भीमसेन यांचा उल्लेख 'कोण हा संप्रति नवपुरुषावतार?' असा केला होता.

भीमसेन यांना त्यांच्या घराणेदार गायकीला धक्का न लावता वेगवेगळ्या श्रोत्यांसमोर काय सादर करायचे हे नक्की माहीत होते. त्यांनी कधीही श्रोत्यांच्या आवडीला प्राधान्य देऊन गायकीमध्ये भेसळ केली नाही. किराणा घराण्याच्या गायकीची शुद्धता राखून व त्याचबरोबर श्रोत्यांच्या पसंतीचा विचार करून गाण्याचा समतोल पंडित भीमसेन यांना उत्कृष्टपणे साधता आला. ज्यांनी रागसंगीत कधीही ऐकले नव्हते, त्यांच्यावरही पंडित भीमसेन यांच्या गायनाचा खोलवर परिणाम होई. अशाप्रकारे ते शास्त्रीय संगीताच्या श्रोत्यांची एकच पिढी नाही तर अनेक पिढ्या तयार करू शकले.

पंडित भीमसेन हे असाधारण गायक का होते? याची कारणे शोधली तर अनेक सापडतील. गुरू सवाईगंधर्वाकडून भीमसेनजी काही मोजकेच राग शिकले असले तरीही त्यांना गुरूंकडून जे ज्ञान मिळाले त्यासाठी ते गुरूंचे आयुष्यभर ऋणी राहिले व ते ज्ञान पुढे आयुष्यभर उधळत राहिले. त्यामुळे ते किराणा घराण्याचे यशस्वी गायक म्हणून प्रसिद्धीस पावले, नेतृत्व करू शकले व प्रचंड लोकप्रियता मिळवू शकले. गायकाला स्वतःची ओळख त्याच्या गाण्यातून करून देता आली पाहिजे असे ते कायम म्हणत असत. गुरूंची अथवा घराण्यातील कोणत्याही गायकाची सही सही नक्कल करण्याला त्यांचा पाठिंबा नसे.


भीमसेनजीवर मैफिलीमधून नेहमी तेच ते राग गाण्यावरून टीका केली जात असे. खरे तर प्रत्येक घराण्याचे काही ठरावीक असे आवडते राग असतात. त्यातून वेळ व परिस्थितीनुरूप गायक मैफिलीसाठी रागाची निवड करत असतात, असे सांगून पंडित भीम सेन त्यांचा मैफिलीतील राग निवडीबाबत सम र्थन करत असत. विशेषकरून अतिविलंबित लयीमध्ये आलापीसाठी योग्य अशा रागांची ते काळजीपूर्वक निवड करत असत. त्यामध्ये कार्यक्रमाच्या वेळेनुसार राग ठरवण्यावर त्यांचा कटाक्ष असे.

कोलकात्यामध्ये एका संगीतरसिकाच्या घरी भीमसेन राहायला गेले असताना त्यांच्या मित्रमंडळींनी त्यांना राग बिहाग गाणाची विनंती केली. त्यापूर्वी त्यांनी मैफिलीमध्ये कधीही बिहाग गायला नव्हता. परंतु त्यांनी हे संकट न मानता, ही संधी मानली व ती उपलब्ध झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला. काही वेळ त्यावर विचार करून ते गाण्यासाठी तयार झाले. त्यादिवशी घरगुती मैफिलीत त्यांनी अप्रतिम बिहाग सादर केला. त्यांनी यमनमधील एका बंदिशीचे राग बिहागमध्ये रूपांतर केले व ती सादर केली. यावरूनच त्यांची गायनकलेतील विद्वत्ता लक्षात येते. अगोदर ज्ञात असलेल्या बंदिशीचे नवीन रागामध्ये रूपांतर करून नवा राग स्वरवाक्यांना योग्य न्याय देऊन विश्वासाने गाणे सोपे नाही.

### कलाश्री : भीमसेननिर्मित राग

पंडित भीमसेन यांच्या बाहत्तराव्या वाढदिवसानिमित्त गौरव समितीने 'स्वराधिराज' नावाचे पुस्तक प्रकाशित केले होते. 'स्वराधिराज'चे संपादक डॉ. श्रीरंग संगोराम यांनी पंडित भीमसेनजींनी त्यांच्या कारकिर्दीमध्ये गायलेल्या रागांची यादी त्या पुस्तकामध्ये दिली आहे. या यादीमध्ये प्रचलित, लोकप्रिय तसेच अनवट, अप्रचलित असे दोन्ही प्रकारचे राग आहेत.

पंडित भीमसेन यांची विद्वत्ता केवळ परिणामकारक मैफिली करण्यापुरतीच नव्हती तर ती नवीन रागांची निर्मिती करण्यापर्यंत पोहोचली होती. कलाश्री व ललत-भटियार हे दोन राग पंडित



भीमसेनजींनी निर्माण करून ते अमर केले. कलावती व रागेश्री या दोन्ही रागांच्या आकर्षक स्वरावलींचे एकत्रीकरण करून त्यांनी कलाश्री हा मधुर व सुंदर राग निर्माण केला.

भीमसेनजींच्या कलाश्रीमध्ये पंचम स्वराला महत्त्व होते. त्याचबरोबर सा ग प ध या स्वरांची विविध स्वरवाक्यांमध्ये पुनरावृत्ती होती. कलाश्रीचा आरोह ओडव जातीचा असून त्यात कलावती रागाचे प्राधान्य आहे. रिषभ व मध्यम हे स्वर वर्ज्य असून निषाद कोमल आहे. अवरोहामध्ये मध्यम व रिषभाचा समावेश असून रागेश्री रागाचे प्राधान्य आहे. कलाश्री ही त्यांची आवडती निर्मिती होती व त्यामुळेच त्यांनी आपल्या पुण्यातील घरालाही 'कलाश्री' हे नाव दिले.

देशातील अनेक प्रतिथयश साथीदारांनी पंडित भीमसेन यांना मैफिलीमधून साथ केली आहे. त्यातील अनेकांशी त्यांच्याबरोबर जिव्हाळ्याचे संबंध राहिले. माऊली टाकळकर या चौऱ्याण्णव वर्षांच्या ज्येष्ठ टाळवादकांनी सांगितले की पंडित भीमसेन व त्यांच्या पत्नी वत्सलाबाई यांच्यासोबत ते कायम मैफिलीला जात असत व पंडित भीमसेन त्यांना प्रेमाने पानाचा विडा बनवायला सांगत. टाळ हे वाद्य अभंगाच्या साथीसाठी वापरले जात असल्यामुळे संतवाणीच्या सर्व कार्यक्रमांमध्ये त्याचा समावेश असे. माऊलींनी भीमसेनजींना सर्वाधिक काळ साथसंगत केली. पंडित भीमसेन यांच्या शेवटच्या जाहीर मैफिलीपर्यंत माऊलींनी त्यांना साथ केली. त्यांना सवाईगंधर्व महोत्सवातील व इतर अनेक संगीतमहोत्सवातील श्रोत्यांकडून अपार प्रेम मिळाले.

पंडित भीमसेन यांना अप्पा जळगावकर, पुरुषोत्तम वालावलकर व तुळशीदास बोरकर यांची हार्मोनियमवर साथसंगत तर नाना मुळे व चंद्रकांत कामत यांची तबल्यावर अनेक दशके साथसंगत मिळाली. भरत चंद्रकांत कामत, सुयोग कुंडलकर व सुधीर नायक यांनीही नंतर काळात साथसंगत केली.

**आवाजशास्त्र**

संगीतशास्त्रामध्ये जसजसे अधिकाधिक काम होऊ लागले तसतसे आवाजशास्त्र या संगीताच्या शाखेला फार महत्त्व पाप्त झाले आहे. या विषयामध्ये गायक व विद्वान संगीतशास्त्रकार डॉ. अशोक दा. रानडे यांनी सखोल संशोधन केले आहे. आवाजशास्त्र या संकल्पनेचे दस्तऐवजीकरण होण्याआधी, पंडित भीमसेन जोशी यांनी त्याचा वापर त्यांच्या गायनामध्ये केला होता. भारतामध्ये मायक्रोफोन येण्याअगोदर गायकांना त्यांचा आवाज शेवटच्या श्रोत्यांपर्यंत ऐकू जाण्यासाठी आवाजावर वेगळी मेहनत घ्यावी लागत असे. दरवेळी अशा परिस्थितीमध्ये गायला लागत असल्यामुळे आवाजावर जास्त जोर द्यायला लागत असे. त्यामुळे आवाज बऱ्याचदा खराब होत असे.

पंडित भीमसेन जोशी यांनी मैफिलीमध्ये गायला सुरुवात केली, तेव्हा भारतामध्ये ध्वनितंत्रज्ञान आधीच प्रचलित झाले होते. मायक्रोफोनच्या वापरामुळे स्वर व लयीतील सूक्ष्म तपशील ऐकू येण्याची शक्यता निर्माण झाली. मायक्रोफोनच्या भारतामध्ये

**संगीत शिकत असताना नित्य सरावाने व कठोर मेहनतीने एका शिष्याचे उत्तम शिष्यात कधी परिवर्तन होते हे कळत नाही. हा हळूहळू होणारा बदल फक्त गुरूच्याच लक्षात येतो. तो तयार झालेला उत्तम शिष्य पुढे उत्तम गुरू होतो. पं. भीमसेन शिकवायला लागल्यापासून कायमच तत्पर होते. परंतु त्यांची मैफिलींची बांधिलकी व त्यासाठी कराव्या लागणाऱ्या प्रवासामुळे ते काही थोडेच शिष्य तयार करू शकले.**

येण्याने अनुनाद हा विषय खोलवर अभ्यासला गेला. पंडित भीमसेन जोशी यांनी नादाची उत्पत्ती व त्यामुळे होणाऱ्या स्वयंपूर्ण शारीरिक हालचाली यातील नात्याचा खोलवर अभ्यास केला होता. गाण्यातील आवश्यक तो परिणाम साधण्यासाठी त्यांनी त्यांच्या आवाजात काही बदल जाणीवपूर्वक घडवून आणले होते. तीक्ष्ण, धारदार, जड किंवा हलक्या आवाजाचा योग्य ठिकाणी वापर करून परिणाम साधला होता. हनुवटीचा विशिष्ट पद्धतीने वापर करून ती अधिक खाली ठेवून ते वरचा षड्ज लावत असत. त्यांनी केवळ तंत्रज्ञानाचाच वापर केला असे नाही तर त्यावर सखोल चिंतन करून त्यावर प्रभुत्व मिळवले. त्याचा वापर त्यांनी गायन अधिक परिणामकारक, श्रवणीय व नादमधुर होण्यासाठी केला.

तीन मिनिटांच्या क्लिप, वीस मिनिटांची ध्वनिमुद्रणे, सत्तर मिनिटांच्या सीडी रेकॉर्ड व दीड तासांची कॅसेट रेकॉर्डिंग सौंदर्यपूर्ण पद्धतीने, उल्लेखनीय कल्पनाशक्तीने व दुर्मिळ कलात्मकतेने वर्षानुवर्षे करण्यासाठी चांगल्या दर्जाची विचारपद्धती असावी लागते. भीमसेनजींची ही विचारसरणी जाणीवपूर्वक व दूरदृष्टीने विकसित केली होती. ते नेहमी म्हणत की चांगल्या कलाकाराने उत्तम चोर असावे. दुसऱ्याच्या गाण्यातील चांगल्या गोष्टींचा समावेश गायकाला स्वत:च्या गाण्यामध्ये करता यायला हवा. पंडित भीमसेन, प्रेरणादायी गायकांच्या गाण्यातील चांगल्या गुणांचा स्वत:च्या गाण्यात समावेश करत, हे सर्व किराणा घराण्याच्या गायकीची वीण न बिघडवता करत असत. ते कधीही त्यांच्या आवडत्या गायकांच्या गाण्यातील घटक जसेच्या तसे स्वत:च्या गाण्यात घेत नसत. भीमसेन यांना निरनिराळ्या घराण्यांच्या






**आनंद भाटे यांच्या संग्रहातील भीमसेनजींच्या मैफिलीचा फोटो**

गायकांच्या गाण्यातून प्रेरणा मिळाली असली तरी त्यांच्या गाण्यातून ग्वाल्हेर, जयपूर व आग्रा घराण्याचे घटक वेगळे काढणे कठीण होते. पाण्यामध्ये विरघळलेल्या साखरेप्रमाणे त्यांच्या गायकीमध्ये वेगवेगळ्या घराण्यांच्या गायकीचे घटक एकजीव झाले होते. त्याचा आश्चर्यकारक सुखद परिणाम रसिकांना जाणवत असे. त्यांचे कार्य व योगदान केवळ किराणा घराण्याची बांधणी करण्यापुरते नव्हते तर त्यांनी हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचे नाव व व्याप्ती वाढवली व ते देशाच्या कानाकोपऱ्यात नेले.

पंडित भीमसेन जोशी यांनी कायम स्वत:ला शारीरिक, मानसिक व आध्यात्मिकरित्या भक्कम ठेवले व त्यामुळेच ते त्यांच्या संगीताला न्याय देऊ शकले. त्यांनी त्यांच्या संगीतामध्ये अनेक बदल घडवून आणले ज्यामुळे ते अधिक सूक्ष्म, पारदर्शी व आकर्षक झाले. त्यांनी ख्यालाची लय अती विलंबित केलीच परंतु त्याशिवाय त्यांनी लयीच्या वेगवेगळ्या स्वरूपांचा समावेश ख्यालामध्ये केला. मैफिलीमध्ये तीन ताल व झपतालाचा प्रयोग करून त्यांनी सादरीकरणामध्ये नावीन्य आणले. एकावेळी चार ते पाच तास गाण्याची मैफल सादर करण्याची क्षमता त्यांच्यामध्ये होती. सामाजिक व्यवस्था बदलली व मैफिलीची वेळ दोन ते तीन तास व त्यानंतर एक-दोन तासांवर आली तेव्हा त्यांनी नवीन वेळेच्या बंधनानुसार स्वत:ला तयार केले व मध्यलयीतील झपतालामध्ये अनेक बंदिशी गायल्या.


पंडितजींनी १९५० व १९५५ दरम्यान इंद्रायणीकाठी हा अभंग रेकॉर्ड केला. या अभंगावर बालगंधर्वांचा प्रभाव होता. त्यांच्या तिशीच्या सुरुवातीला बालगंधर्वांच्या गायकीने भीमसेनजी प्रभावित झाले होते. याचमुळे त्यांनी काही नाट्यगीते म्हणून बघितली व प्रयोगही केले. त्यांची नक्कल करण्याऐवजी स्वत:ची ओळखनिर्माण होईल अशी गायकी विकसित करण्यावर त्यांनी भर दिला. भीमसेनजींच्या बंदिशींच्या सादरीकरणातील शब्द समजणे कठीण होते. परंतु त्यामुळे त्यांच्या गाण्याचा श्रोत्यांवर होणारा परिणाम कमी झाला नाही. ते त्यांच्या स्वरांशी प्रामाणिक राहिले. रागातील भाव श्रोत्यांपर्यंत पोहोचवण्यावर त्यांनी भर दिला. त्यासाठी शब्द तितके महत्त्वाचे नव्हते. दीर्घ, लांब, सुरेल स्वर व स्वरांमधील विश्रांतीची स्थाने त्यांच्यासाठी अधिक महत्त्वाची होती. म्हणून बंदिशीतील कोणत्या शब्दावर व त्यातील अक्षरावर स्वरांचा न्यास देऊन ते कानाला मधुर लागतील याचा विचार ते सतत करत असत.

पंडित भीमसेन यांच्याबद्दल अशी दंतकथा प्रचलित आहे, की त्यांनी स्वत:चा पत्ता एकदा मैफिलीमध्ये बंदिशीमार्फत सांगितला होता. श्रोत्यांमधील त्यांच्या निकटवर्तीयांना व त्यांच्या शिष्यांना हा नेहमीपेक्षा वेगळा बदल लक्षात आला, परंतु श्रोत्यांमधील इतरांसाठी ती आणखी एक अत्यंत प्रभावी मैफल होती! त्यांच्या मित्रांना व चाहत्यांना असे सतत वाटे की पंडितजींचे संगीत शिगेला पोहोचले, कारण श्रोत्यांना त्यातले शब्द कळले नाहीत व त्यांची कला अमूर्त राहिली.

**पंडित भीमसेन यांचे मोठेपण**

भारत व पाकिस्तान यांच्यात १९६५ मध्ये युद्ध पेटले होते. त्यावेळचे संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्याकडे पंडित भीमसेन यांनी लडाखला जाण्याची इच्छा व्यक्त केली. सुरक्षिततेसाठी संरक्षणमंत्र्यांनी भीमसेन यांना लडाखला न जाण्याचा सल्ला दिला. परंतु भीमसेन आग्रही राहिले. त्यानंतर संरक्षणखात्याच्या परवानगीने एक संरक्षक बरोबर घेऊन ते लडाखला पोहोचले. लडाखमध्ये पोहोचल्यानंतर एका संध्याकाळी अंधार पडलेला असताना पंडित भीमसेन स्वत:भोवती शाल पांघरून, बरोबर संरक्षकाला घेऊन फिरत फिरत बर्फाच्छादित पर्वत पाहायला निघाले. काही अंतर चालून गेल्यावर त्यांना एक गाणे ऐकू आले व त्यांची पावले त्या बाजूला वळली. पुढे आवारात एका झाडाखाली त्यांना एक माणूस गाणे ऐकत बसलेला दिसला.

पंडित भीमसेन यांनी त्या गृहस्थाला ते काय ऐकत आहेत अशी विचारणा केली. तेव्हा त्या गृहस्थाने तुसडेपणाने उत्तर दिले, 'तुम्हाला ऐकू येत नाही का? भीमसेन जोशी गात आहेत.' तो माणूस पंडित भीमसेन जोशी यांच्या गायनाचा आस्वाद घेत होता. परंतु तो कधीही त्यांना भेटला नव्हता किंवा त्यांच्या मैफिलीही



त्याने प्रत्यक्ष कधी ऐकल्या नव्हत्या. त्याने पूर्वी कधीही पंडित भीमसेन यांना पाहिले नव्हते. पंडित भीमसेनजींचे संगीत देशाच्या कानाकोपऱ्यात शिरलेले, छोट्या छोट्या गावांमध्ये पोहोचलेले होते. विद्वान, रसिक व सामान्यजन हे तीनही प्रकारचे श्रोते त्यांच्या संगीताचे चाहते होते. त्याकाळी रेडिओव्यतिरिक्त अन्य कोणतेही साधन दूरवर संदेश पोहोचवू शकत नव्हते. त्यामुळे आकाशवाणीच्या माध्यमातून पंडित भीमसेन यांचे संगीत दुर्गम भागात पोहोचले होते. त्यांना अमाप प्रसिद्ध मिळाली होती. भीमसेनजींची त्याकाळी भारताच्या कानाकोपऱ्यात चेहऱ्याने ओळख नसली तरी आवाजाच्या व गायनाच्या माध्यमातून त्यांचे जनसामान्यांमध्ये नाव झाले होते.

### सिद्धी प्राप्त झालेला संगीतसूर्य

भीमसेनजींकडे जी सिद्धी किंवा संगीतातील अद्वैत शक्ती होती, ती अभूतपूर्व होती. सिद्धी प्राप्त करणे कुठल्याही कौशल्य, ज्ञान किंवा नैपुण्याच्या पलीकडचे आहे. त्याबद्दल कुमारगंधर्व व किशोरी आमोणकरांसारखे दिग्गज गायकही बोलत असत. ज्या व्यक्तीला सिद्धी प्राप्त आहे त्याला अशक्य असे काही नसते. फक्त ती गोष्ट विघातक नसून समाजोपयोगी असावी. सर्वसामान्य जनांच्या दृष्टीने तो परमेश्वरी अवतार किंवा चमत्कारच असतो. जादुई वाटावी अशीच ती अवस्था असते, भारावून टाकणारी. पंडित भीमसेन स्वत: त्यांची गाडी घेऊन भारताच्या कानाकोपऱ्यातून मैफिलींना जात असत. त्याबरोबरच एकापाठोपाठ एक अशा उत्तम दर्जाच्या मैफिली सादर करत असत. अविश्रांत प्रवासानंतरही मैफल सादर करण्याची त्यांची हातोटी अचंबित करणारी होती. प्रवासात स्वत:ची गाडी चालवत असताना गाडीत मागील सीटवर बसलेल्या विद्यार्थ्यांनाही ते शिकवत असत. दरवर्षी सवाईगंधर्व महोत्सवासारखा मोठा महोत्सवही उत्तमपणे आयोजित करत असत. त्यांची काम करण्याची पद्धत सामान्यांपेक्षा खूपच वरच्या दर्जाची होती, असामान्य होती. त्यांना प्राप्त असलेल्या सिद्धीमुळे व आईवडिलांच्या, गुरूंच्या आशीर्वादामुळे पंडित भीमसेन अशी कठीण कामे जिद्दीने व उत्तम कार्यक्षमतेने करत असत. त्याकाळी भीमसेनजींकडे अनेकदा अपुऱ्या सोयींमुळे स्वत: सर्वत्र जाण्याशिवाय व कधी कधी प्रतिकूल परिस्थितीमध्ये मैफिली सादर करण्याशिवाय पर्याय नसे. आजच्या काळात, तंत्रज्ञानाच्या युगामध्ये ते संगीतक्षेत्रात आणखी अनेक पटींनी काम करू शकले असते.

### संगीताशी वचनबद्ध

पंडित भीमसेन जोशी हे वर्तमान जपणारे कलावंत होते. ते केवळ सांगीतिकरीत्याच वर्तमानाशी जुळवून घेणारे नव्हते तर त्यांच्याकडे उत्तम व्यवहारचातुर्य व उद्योजकताही होती. त्यांच्या आयुष्यातील अनेक किस्से त्यांची संगीताशी असलेली वचनबद्धता व व्यवहारी दृष्टिकोन दर्शवतात.

मुकुंद संगोराम यांच्या आठवणीतला एक मनोरंजक किस्सा सांगण्यासारखा आहे. एकदा पंडित भीमसेन जोशी यांचा कार्यक्रम मुंबईतील षण्मुखानंद हॉल, किंग्ज सर्कल येथे रात्री नऊ वाजता ठरला होता. त्याकाळी पंडित भीमसेन हे मैफिलीचे गवई म्हणून प्रसिद्धीच्या शिखरावर होते. काही अकल्पित कारणांमुळे पंडित भीमसेन कार्यक्रमाच्या ठिकाणी हॉलवर रात्री साडेदहा वाजता पोहोचले. त्यांचे चाहते शांतपणे वाट पाहत होते. भीमसेनजी पोहोचल्यावर ते आनंदून गेले. पंडित भीमसेनजी तेथे पोहोचताक्षणी स्वरमंचावर गेले, त्यांनी तानपुरे जुळवले आणि शेवटची लोकल किती वाजता येते व पहिली लोकल रेल्वे किती वाजता निघते, याबद्दल आयोजकांकडे विचारणा केली. आयोजकांनी सांगितले की शेवटची लोकल रात्री साडेअकरा वाजता येते व पहिली रेल्वे पहाटे अडीच वाजता निघते. तेव्हा त्यांनी तत्काळ पहाटे अडीचपर्यंत आपण गाणार असल्याची घोषणा केली. कार्यक्रमाच्या स्थळी उशिरा पोहोचल्याचे भान त्यांना होते, परंतु श्रोत्यांची गैरसोय व्हावी अशी त्यांची इच्छा नव्हती. श्रोत्यांची तयारी

**भीमसेनजींच्या गाण्याच्या तालमीत अनेक शिष्यगण येऊन गेले पण माधव गुडी, नारायण देशपांडे, श्रीकांत देशपांडे व रामकृष्ण पटवर्धन हे त्यांचे ज्येष्ठ शिष्य होते. श्रीकांत देशपांडे हे सवाई गंधर्व यांचे नातू होते. २०११ मध्ये पं. भीमसेन यांच्या निधनानंतर काहीच दिवसांनी श्रीकांत देशपांडे यांचेही निधन झाले. पं. भीमसेनजींच्या सर्व शिष्यांनी कायमच त्याना पं. भीमसेनजींच्या पद्धतीनुसार शिकायला मिळाल्याचे फायदे होते असे म्हटले आहे.**

असल्यास पहाटे अडीच वाजेपर्यंत गाण्याची तयारी त्यांनी दर्शवली होती. त्यांच्याकडे त्यांच्या श्रोत्यांबद्दलची सहृदयता होतीच, तशीच काळाच्या पुढे पाहण्याची दृष्टी होती.

जागतिकीकरण झाल्याने १९८५च्या सुमारास संगीताचे व्यापारीकरण झाले. त्यामुळे संगीत आधी होते त्यापेक्षा खूप बदलले. मैफिलीसाठी कलाकार मानधन मागू लागले. पंडित भीमसेन जोशीसुद्धा त्यांच्या बिदागीबाबत व्यवहारी होते. त्यांनी काही विवाहसोहळ्यांमध्ये आपले गायन सादर केले, जे त्यांना अपमानास्पद किंवा अप्रतिष्ठेचे वाटले नाही. उलट त्यानिमित्ताने आपल्याला गायनाची आणखी एक संधी प्राप्त होते, आपले गाणे आपल्याला ऐकता येते, त्यामुळे काही चुका झाल्या तरी त्या आपण सुधारू शकतो असे त्यांना वाटत असे. अनेक प्रकारचे संगीत गाणाऱ्या दुर्मिळ गायकांपैकी पंडित भीमसेन होते. त्यांची हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतावर संपूर्ण हुकूमत होती. भक्तिसंगीत, नाट्यसंगीत, भावसंगीत, फिल्मसंगीत हे प्रकारही ते त्याच ताकदीने गात असत. १९८४ मध्ये पंडित भीमसेन यांना 'अनकही' चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट पार्श्वगायनाचा पुरस्कार मिळाला. प्रत्येक संगीतप्रकारावर प्रभुत्व मिळवणे, जोमाने काम करत करत बदल घडवत स्वत:च्या गायनाचा प्रभाव टाकत राहणे, सतत संगीताचा विचार करत राहण्यासाठी प्रचंड मानसिक शक्ती, ऊर्जा, स्रोत निर्माण करणे हे केवळ कौतुकास्पद आहे. त्यांना ते शक्य झाले कारण त्यांनी त्यांची मानसिक शक्ती संगीताशिवाय कशासाठीही वापरली नाही.

एकदा पुण्यातील प्रसिद्ध वृत्तपत्राच्या पत्रकार पंडित भीमसेन यांची मुलाखत घ्यायला त्यांच्या घरी गेल्या होत्या. त्यांनी भीमसेनजींना त्यांचा आवडता राग कोणता असे विचारले असता पंडितजींनी तत्काळ उत्तर दिले, 'खूप आहेत.' यापेक्षा चांगली उत्तरे मिळतील या अपेक्षेने त्यांनी पुन्हा विचारले, 'तुम्ही गायक झाला नसता तर तुम्हाला काय व्हायला आवडले असते?' पंडितजी उत्तरले, 'काहीही चालले असते.' एका वाक्याच्या या उत्तरांमुळे ती मुलाखत पुढे वाढू शकली नाही. शेवटी ती मुलाखत तेथेच थांबली व त्या महिला पत्रकार निराश होऊन परतल्या.

पंडित भीमसेन जोशी यांच्या परिवाराचे निकटवर्ती मुकुंद संगोराम यांनी भीमसेनजींचे निधन झाल्याच्या दिवशीची एक हृदयस्पर्शी आठवण सांगितली. एक महिनाभर मृत्यूशी झगडल्यानंतर पंडित भीमसेनजींचे निधन झाले. त्यांच्या निधनाची अधिकृत बातमी अजून जाहीर व्हायची होती. त्याच दिवशी मध्यरात्री एक भलीथोरली गाडी येऊन त्यांच्या पुण्याच्या निवासस्थानाच्या बाहेर थांबली. साधारण सात-आठ जण एकापाठोपाठ एक गाडीबाहेर आले व त्यांनी रस्त्यावर साष्टांग नमस्कार घातला. त्यानंतर, ते सर्वजण गाडीमध्ये बसले व निघून गेले. ते कोण होते, कुठून आले होते याची कोणालाही कल्पना नव्हती. एक प्रसंग म्हणून हा खूप महत्त्वाचा आहे कारण कलाकार म्हणून सर्वांच्या मनात त्यांना किती आदराचे व श्रद्धेचे स्थान होते, हे यातून दिसते.



**साधी राहणी, उच्च विचारसरणी**

भीमसेनजींनी आयुष्यभर मध्यमवर्गीय राहणीमान व काटकसरीने राहणे स्वीकारले. साधा परंतु सात्त्विक असा संपूर्ण शाकाहारी आहार त्यांना आवडत असे. तिखट व चमचमीत पदार्थ त्यांना विशेष आवडत असत. खासकरून हिरव्या मिरच्या त्यांना खूप प्रिय होत्या. ज्वारीची भाकरी व दही त्यांच्या रोजच्या जेवणात असे. जास्तीत जास्त वर्षे गात राहण्यासाठी, नवीन संगीत तयार करत राहण्यासाठी शारीरिक तंदुरुस्ती असायला हवी असे ते मानत असत. त्यांचे शारीरिक स्वास्थ्य, तंदुरुस्ती, त्यांचे कार्य व हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रातील त्यांचे योगदान पाहता त्यांचे भीमसेन हे नाव पूर्णपणे सार्थ वाटते.

त्यांनी आपल्या घरामध्ये रियाजाची एक स्वतंत्र खोली बनवली होती. गाद्या व तक्क्यांनी सुसज्ज अशी संपूर्ण भारतीय बैठक असलेली संगीताची खोली होती. तानपुरे व तबल्याची जोडी नीट भिंतीलगत लावलेली होती. आपल्या आजोबांच्या तानपुऱ्यावर सात वर्षांच्या भीमसेनजींची नजर पडली होती. तो तानपुरा त्यांनी जिवापाड जपला होता; एखाद्या दागिन्यासारखा सांभाळला होता. अतिशय शांत वातावरणामध्ये भीमसेनजी आपल्या संपूर्ण वास्तूमध्ये वावरत असत. ते कुटुंबातील शांत व धोरणी सदस्य होते. त्यांच्याशी कोणीही संवाद साधल्याशिवाय ते फारसे बोलत नसत किंवा त्यांना विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे ते अगदी साध्या व मोजक्या शब्दांतच देत असत. ते कामात व्यग्र नसत तेव्हा ते घरी दिवसातल्या कुठल्याही वेळेला विश्रांती घेत असत. इतरवेळी शुक्रवार ते सोमवार दरम्यान मैफिलीसाठी ते दौऱ्यावर असत. गाण्यावर संपूर्ण लक्ष केंद्रित करत ते त्यांच्या आरोग्याचीही संपूर्ण काळजी घेत असत. अनेक वर्षे त्यांनी आनंदाने व स्वत:चा आवाज जोमात व शाबूत ठेवून मैफिली कशा केल्या व आपली तब्येत कशी ठणठणीत ठेवली याचा अंदाज यावरून येतो.

**शिकवण्याचे तंत्र**

भीमसेनजींनी आपल्या गुरूंकडून विद्या ग्रहण करताना कष्ट

सोसल्यामुळे त्यांनी आपल्या शिष्यांना शिक्षण देतानाही शिस्तीचा अवलंब केला होता. त्यांच्या शिष्यांवर ओमकारसाधना व खर्जाचे महत्त्व अगदी सुरुवातीपासून बिंबवले होते. योग्य प्रकारे शिकून पहिले दीड वर्ष तरी त्याचा नीट रियाज करण्यावर त्यांनी भर दिला व तसा सल्ला त्यांच्या सर्व शिष्यांना दिला. त्यानंतर त्यांनी किराणा घराण्याच्या गायकीवर लक्ष केंद्रित करून त्यांना विविध रागांची तालीम दिली. एका रागाची तालीम काही महिने किंवा कधी कधी दोन वर्षे चालत असे. सुरुवातीला स्वर लगाव, ख्याल, आलाप, बोलताना आणि तान हे रागविस्ताराचे घटक ते शिकवत असत.

पंडित भीमसेन यांचे शिष्य व आजचे लोकप्रिय कलाकार आनंद भाटे यांनी त्यांचा एक अनुभव सांगितला. एकदा ते लहान वयात पंडित भीमसेन यांच्या घरी गेले होते. पंडित भीमसेन त्यावेळी बालगंधर्वांची गाणी म्हणत व बालगंधर्वांना गुरुस्थानी मानत असत. त्यामुळे भाटेंचे गाणे त्यांनी अतिशय आनंदाने ऐकले. आनंद भाटे यांना नाट्यसंगीताची आवड असल्यामुळे भीमसेनजींनी त्यांना प्रोत्साहन दिले. आवाजाबरोबर तब्येतीचीही योग्य काळजी घेण्याचा सल्ला त्यांनी दिला.

त्यांनी शिष्यांना किराणा घराण्याच्या गायकीतील बारकावे शिकवण्याबरोबरच मैफिलीतील सादरकरणाची कलाही समजावली. रागाची लय कशी निश्चित करावी तसेच श्रोत्यांचा अभ्यास करून मैफिलीची आखणी कशी करावी हेही त्यांनी शिष्यांना शिकवले. गायनातूनच संगीताचे विचार मांडण्यावर ते भर देत असत, क्वचित कधीतरी गाण्याविषयी ते बोलत. दिलेल्या वेळेमध्ये कलाकाराला उत्कृष्ट दर्जाची कला सादर करता आलीच पाहिजे याबद्दल ते आग्रही असत व त्या पद्धतीचे गाणे ते विद्यार्थ्यांना शिकवत असत. त्यांचे असे मत होते की कुठलाही कलाकार त्याच्या रागज्ञानानुसार जी स्वरवाक्ये व जे अलंकार मैफिलीमध्ये वापरतो ती काळानुसार व मैफिलीच्या लांबीप्रमाणे बदलत जातात. स्वरवाक्यांचा खूप चतुराईने व बारकाईने विचार केला पाहिजे असे ते मानत.


प्रत्येक गायक स्वत:चा आवाज जन्मजात घेऊन आलेला असतो. रियाज व तालमीने त्यात काही प्रमाणात बदल करणे शक्य असते. तो पूर्णत: किंवा समूळ बदलत नाही. पंडित भीमसेन जोशी यांनी त्यांच्या आवाजाची नक्कल न करण्याचा सल्ला त्यांच्या शिष्यांना दिला व शिष्यांनी नेहमी स्वत:च्या आवाजात गावे, यासाठी त्यांना प्रोत्साहन दिले. अनेकदा गुरू शिष्याला ज्ञान देतो, तेव्हा गायकीशिवाय, कळत-नकळत, शिष्य गुरूच्या गाण्याच्या पद्धतीची व आवाजाचीसुद्धा नक्कल करतो. यामुळे आवाजाला फायदा व्हायच्या ऐवजी अपायच अधिक होतो. गायकाने कृत्रिम आवाज वापरण्याचा परिणाम काय होतो हे पंडित भीमसेन यांना ठाऊक होते. त्यामुळे कायम नैसर्गिक आवाजात गाण्यावर त्यांनी भर दिला. त्यांच्या शिष्यांना पंडित भीमसेन हे किती सरळमार्गी व अंतर्बाह्य निर्मळ होते याची कल्पना होती. पंडित भीमसेन यांच्याशी बोलताना अनोळखी व्यक्तीलाही अवघड जात नसे. त्यांच्या चाहत्यांना ते कायमच त्यांच्या लोकप्रियतेचे श्रेय देत असत. त्याचे आभार मानत असत व त्यांना कधीही निराश होऊ देत नसत. त्यांच्या गुरूवरची त्यांची अपार श्रद्धा व प्रेम हा त्यांच्या शिष्यांसाठी एक संस्कारच होता.


**(सौजन्य : पं. भीमसेन जोशी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त केंद्र सरकारच्या माहिती नभोवाणी खात्यातर्फे प्रकाशित इंग्लिश पुस्तकातील एका प्रकरणाचा संक्षिप्त आणि परिष्कृत अनुवादित भाग. मूळ रंगीत चित्रे-रेखाटन श्री. सुदर्शन बारपात्रे)**


**- कस्तुरी पायगुडे**

भ्रमणध्वनी : ९८८११३६९४६

paigude.kasturi@gmail.com





# सरस्वतीसाठी विणले रेशीमरेघी वस्त्र तिने...

**डॉ. सुजाता शेणई**

*शान्ताबाईंच्या जन्मशताब्दीवर्षाच्या निमित्तानं त्यांच्या कारकिर्दीचं अवलोकन करताना मनात प्रश्नांचं जाळं निर्माण झालं आहे. शान्ताबाईंनी एवढं वाचन कधी केलं असेल, उदरनिर्वाहासाठी पडेल ते काम करून, प्राध्यापकाची नोकरी सांभाळून एवढी साहित्यसंपदा कशी निर्माण केली असेल, त्यांची स्मरणशक्ती एवढी तल्लख कशी होती, पाठांतर केलेलं त्यांना नेमक्या वेळी कसं आठवलं असेल, एवढं लेखन करण्याची अनुभवसामग्री त्यांनी कुठून गोळा केली असेल, चालीवर आधारित गीतं लिहिताना कोणत्या प्रतिभाशक्तीचा वापर केला असेल, अफाट शब्दसंपत्तीचं धन कोणत्या संगणकात सांभाळून ठेवलं असेल वगैरे वगैरे...*

'महाराष्ट्रातल्या 'देवांग कोष्टी' या विणकामाचा व्यवसाय करणाऱ्या जातीत एक मुलगी जन्माला आली. घरात किंवा जातीत शिक्षण या गोष्टीचा गंधही कुणाला नव्हता, त्या वेळी या मुलीला मात्र तिच्या सुदैवानं कुटुंबात थोडंसं शैक्षणिक वातावरण दोन्हींकडच्या आजोळांपासून मिळालं. यातूनच घरात शिक्षणाची एक परंपरा निर्माण झाली. पुढं शाळा-कॉलेजचं शिक्षण घेण्याची संधी लाभली. आईवडील विशेष साहित्यप्रेमी असल्यामुळं वाचनाचीही तिला गोडी लागली आणि त्यातून एक उत्कट साहित्यप्रेम तिच्या ठायी अंकुरित झालं. ती तेव्हाची मुलगी म्हणजेच आजची मी, शान्ता शेळके. थोडी प्राध्यापिका, थोडी कवी आणि थोडीथोडीशी पण इतर भरपूर...'

'धूळपाटी' या आत्मचरित्रात्मक लेखांच्या पुस्तकातील शान्ताबाईंचं हे मनोगत आहे. महाराष्ट्रासाठी थोडी आणि भरपूर या दोन्ही रूपांत भरून उरलेली ही सिद्धहस्त लेखिका विस्मरणात कधी जाणारच नाही. एकविसावं शतक तंत्रज्ञानानं भारलं खरं, सर्व क्षेत्रांत परिवर्तनाची लाट आली हेही खरं, तरीही विविध संपर्कमाध्यमांतून शान्ताबाईंची मराठी गाणी कानावर पडतात किंवा गणेशोत्सवाची सुरुवात 'गणराज रंगी नाचतो' शिवाय आजही होत नाही तेव्हा शान्ताबाईंच्या शब्दांचं गारुड किती पिढ्यांना आपलंसं करतंय हे जाणवतं. १२ ऑक्टोबरपासून शान्ताबाईंच्या जन्मशताब्दी वर्षाला सुरुवात झाली आहे. अखंड शब्दसाधनेचं व्रत घेतलेल्या शान्ताबाईंनी वयाच्या बाविसाव्या वर्षी कथासंग्रह, तेविसाव्या वर्षी कादंबरी, चोविसाव्या वर्षी बालकथा, पंचविसाव्या वर्षी काव्यसंग्रह आणि अठ्ठाविसाव्या वर्षी चित्रपटगीतं आणि चित्रपटकथा असा लेखनाचा व्यापक सारीपाट मांडून त्यामधील निर्मितीचा आनंद घेत त्या मनसोक्त खेळत राहिल्या. जवळपास साठ वर्षं सातत्यानं लिहीत राहिल्या.





शान्ताबाईंना 'बाई' हे उपपद नेहमीच शोभून दिसलं किंवा या उपपदाचा सन्मानच त्यांच्याकडून केला गेला, असं म्हणावं लागेल. अस्सल मराठमोळ्या रंगाची हातमागाची किंवा रेशमी साडी, डोक्यावर पदर, हातात बांगड्या, अर्धचंद्राकृती कपाळावर ठसठशीत कुंकू आणि हसतमुख चेहरा हे महाराष्ट्राचं प्रातिनिधिक रूप त्यांनी मनापासून जोपासलं. महाराष्ट्राच्या मातीतील कणखरपणा आणि धीटपणा जाणीवपूर्वक स्वीकारला. या मातीतील लोकसंस्कृती विशेषत्वानं समजून घेतली. मराठी भाषेबरोबरच इंग्रजी आणि संस्कृत भाषेवरही प्रभुत्व मिळवलं. साहित्यक्षेत्र हे आपलं क्षेत्र आहे याची पक्की खूणगाठ पटल्यावर त्यावर अथक मेहनत घेण्याची तयारी ठेवली. स्वतःच्या आयुष्याला स्वतः घडवत साहित्याच्या उच्च शिखरावर नेणं सोपं नव्हतं, पण सोपं नव्हतं म्हणून तर शान्ताबाईंसारख्या प्रतिभावंत लेखिकेला ते आव्हान पेलता आलं. आव्हानाचा ध्यास असला, तरी प्रत्येकवेळी परिस्थिती अनुकूल असतेच असं नाही. शान्ताबाईंनाही ती लाभली नव्हती, तरीही त्यावर जिद्दीनं मात करत शान्ताबाईंनी स्वतःची नाममुद्रा कोरली हे विसरता येणं शक्यच नाही. शान्ताबाई स्वतःची सही करतानाही 'शान्ता ज. शेळके' अशी मराठीत करायच्या आणि शान्ता हे नावही कधी अनुस्वार देऊन लिहिलं नाही.

शान्ताबाईंच्या कारकिर्दीचं अवलोकन करताना मनात प्रश्नांचं जाळं निर्माण झालं आहे. शान्ताबाईंनी एवढं वाचन कधी केलं असेल, उदरनिर्वाहासाठी पडेल ते काम करून, प्राध्यापकाची नोकरी सांभाळून एवढी साहित्यसंपदा कशी निर्माण केली असेल, त्यांची स्मरणशक्ती एवढी तल्लख कशी होती, पाठांतर केलेलं त्यांना नेमक्या वेळी कसं आठवलं असेल, एवढं लेखन करण्याची अनुभवसामग्री त्यांनी कुठून गोळा केली असेल, चालीवर आधारित गीतं लिहिताना कोणत्या प्रतिभाशक्तीचा वापर केला असेल, अफाट शब्दसंपत्तीचं धन कोणत्या संगणकात सांभाळून ठेवलं असेल वगैरे वगैरे... आजच्या संगणकीय काळात स्मरणशक्तीचा कमीत कमी वापर करावा लागतो तेव्हा आपलीच आपल्याला शरम वाटल्याशिवाय राहत नाही. या पार्श्वभूमीवर शान्ताबाईंचं मोठेपण ठळकपणानं समोर येतं.

शान्ताबाईंनी नाटक हा साहित्यप्रकार सोडला तर सर्व साहित्यप्रकार हाताळले. वृत्तपत्रीय लेखनापासून सुरू झालेला प्रवास कविता, गीतं, कथा, कादंबरी, ललित लेखन, बालसाहित्य, अनुवाद, सदरलेखन अशा कितीतरी वाटा–वळणांनी पुढं पुढं जात राहिला. त्यांचं साहित्य अंतः प्रेरितही होतं आणि व्यवसायप्रेरितही होतं. आपला प्रत्येक शब्द आपण कुणासाठी लिहितो आहोत याची स्पष्ट जाणीव त्यांना निश्चित असावी. आकाशवाणी, दूरदर्शन, चित्रपट, नाटक या सर्व माध्यमांच्या प्रेक्षकांसाठी त्या लिहीत गेल्या. स्वतःच्या लेखनाचं मूल्यमापन स्वतः करताना 'वर्षा' या त्यांच्या कवितासंग्रहाच्या मनोगतात त्या म्हणतात, 'मी जे काही लिहिलं, ते अगदी मनापासून लिहिलं आहे. त्यात उणिवा असतील, दोष असतील, पण अप्रामाणिकपणा यत्किंचितही नाही.' हे आजच्या काळात फार महत्त्वाचं वाटतं. हा अप्रामाणिकपणा त्यांच्यात का आला नाही याचं उत्तर शोधू गेलो तर, शान्ताबाईंकडे मांडण्यासारखं भरपूर होतं, त्यामुळे इतर कोणाच्या साहित्यबीजावर स्वतःची मखरं उभारायची त्यांना गरज भासली नाही आणि अंतर्बाह्य निर्मळ




व्यक्तिमत्त्वाकडून अप्रामाणिकपणा घडणं शक्यच नव्हतं. लेखनाच्या उमेदीच्या काळात माधव ज्यूलियन, कुसुमाग्रज यांचा प्रभाव मान्य करणाऱ्या, मोरोपंत व अन्य पंडिती काव्याची पारायणं केली व त्यातून वृत्ताचं भान आलं हे कबूल करणाऱ्या आणि आचार्य अत्रे यांनी 'सोपं लिहायला शिका' हा कानमंत्र दिल्याचा वारंवार उल्लेख करणाऱ्या शान्ताबाई स्वतःच्या लेखनाची मूस शोधत होत्या हे खरं. ही मूस त्यांना हळूहळू गवसत गेली.

**शान्ताबाईंकडे विपुल शब्दसंपत्ती होती कारण त्यांना इतर अनेक कवींच्या कविता मुखोद्‌गत होत्या. ज्ञानेश्वरीतल्या ओव्यांपासून रविकिरण मंडळ, आरती प्रभूंपर्यंत, गडकरींच्या नाटकातील उताऱ्यांपासून जेन ऑस्टिनच्या 'प्राईड ॲण्ड प्रिजुडाइज'पर्यंत जे जे भावलं ते ते स्मरणात ठेवलं. ओव्या, अभंग, लोकगीतं याला तर मोजमापच नाही. त्यातल्या शब्दांचा, प्रतिमांचा अभ्यासपूर्वक मागोवा घेतला. त्यातूनच त्यांच्या उत्कट आणि संवेदनक्षम अंतःकरणावर वाचलेल्या व ऐकलेल्या साहित्याचा खोलवर ठसा उमटला.**

### कवितेशी जवळचे नाते

शान्ताबाईंची साहित्यिक वाटचाल बहुविध प्रकारांत होती, परंतु तरीही शान्ताबाई म्हटलं, की शान्ताबाई कवयित्री अधिक होत्या की गीतकार अधिक होत्या हा नेहमी चर्चेत राहिलेला विषय होता. शान्ताबाई मात्र स्वतःचं नातं कवितेशी अधिक होतं, जवळचं होतं हे मान्य करतात, म्हणूनच त्यांच्या काव्यप्रवासाविषयी विचार करू. कवितेला त्या सुंदर आणि चैतन्यमय सखी असं संबोधत. या सखीनं त्यांना सतत सहवास, आनंद आणि वेळपरत्वे सांत्वनही दिलं आहे. कविता आणि कवयित्री यांचं अतूट नातं वर्णन करताना त्या 'माझ्या कविते' या कवितेत लिहितात,

*प्रिय सखये! तव संगतीत मी*
*रंगविले अवघे मम जीवन*
*स्निग्ध जिव्हाळा तुझा लाभता*
*पाझर फुटले पाषाणातुन!*

हा जिव्हाळा स. प. महाविद्यालयात असताना लागला व पुढे वाढतच गेला. बी.ए.च्या पहिल्या वर्षात असताना 'शालापत्रका'त त्यांची पहिली कविता प्रसिद्ध झाली. कविता महाविद्यालयीन जीवनात प्रकाशित झाली असली तरी, शब्दांचं आकर्षण त्यांना अगदी लहानपणापासून होतं. त्यांच्या आजोळी आईनं, आजीनं किंवा मावशीनं गायलेल्या ओव्या, नागपंचमीची किंवा भोंडल्याची गाणी, दारी आलेल्या वासुदेवाची किंवा पिंगळ्याची लोकगीतं किंवा आजोबांनी रात्री जेवण झाल्यावर अंगणात फेऱ्या मारताना गुणगुणत म्हटलेल्या कविता, पदे किंवा श्लोक ही त्यांची शब्दशिदोरी होती. या शब्दांशी खेळ करत राहणं आणि त्यातून ओळीच्या ओळी पाठ होत जाणं कधी घडलं ते त्यांनाही कळलं नाही. सुधीर गाडगीळ यांना दिलेल्या एका मुलाखतीत त्यांनी सांगितलं होतं, की 'मी शब्द चॉकलेटसारखी चघळत असे. एखादा नवीन शब्द म्हणजे 'चटक चांदणं'सारख्या मिळाला तर दिवसभर मी तो म्हणत असे.' या शब्दांचा इतका खोलवर ठसा त्यांच्यावर उमटे, की त्या शब्दांच्या अर्थाबरोबरच त्याची लय, नाद मनात भिनत जात असे. शब्दांच्या परिचयातून संवेदनांचं आणि रंगीबेरंगी चित्रांचं एक अजब रसायन मनात तयार होत असे. शालेय जीवनात त्यांनी पंडिती काव्याचाच अधिक अभ्यास केला, त्यामुळं वृत्तांचं भान आलं आणि त्याचं जबरदस्त आकर्षण निर्माण झालं. मराठी भाषेच्या जोडीला संस्कृत भाषेचा केलेला अभ्यास आणि अभिजात काव्याचे संस्कार हे त्यांच्या कवितेची शब्दकळा घडवण्यासाठी पूरक ठरले. 'वर्षा' या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहातील कविता वृत्तबद्ध आहेत. वृत्तबद्ध रचना

सहजसाध्य नसते. शब्दांच्या वापराचं ज्ञान, तालाचं व लयीचं भान आणि भरपूर शब्दसंग्रह असल्याशिवाय ही रचना करता येत नाही. शान्ताबाईंपाशी ही सारी वैशिष्ट्यं होती, म्हणूनच त्या वृत्तबद्ध कविता लिहू शकल्या. वृत्तबद्धरचनेतलं सौष्ठव त्यांना इतकं भावलं होतं, की 'ललित'च्या अंकात प्रसिद्ध झालेल्या एका मुलाखतीत त्या म्हणतात, 'माझ्या सुरुवातीच्या कविता, कविता म्हणून सामान्य असतीलही; पण त्यात वृत्त-छंदाची चूक आढळणार नाही. तुम्ही कोणत्याही काळात लिहीत असलात तरी, तुम्हाला परंपरा माहीत हवी. मोरोपंतांच्या चार आर्या वाचल्या तरी, तुमच्या मनात ते वृत्त घोळत राहातं. त्यातला नाद, अंतःसंगीत, विविध वर्णांचं अनुकरण हे सोडायचं काही कारण नाही. वृत्तप्रभुत्व, शब्दप्रभुत्व, रचनेचा रेखीवपणा, सौष्ठव, प्रगल्भता यालादेखील सौंदर्य आहे, याची जाणीव हवीच.'

मुक्तछंदात कवितालेखन करणाऱ्यांना शान्ताबाई कवितेची पूर्वपरंपरा समजून घेण्याचा जणू प्रेमळ आग्रह करतात. त्यांची उदाहरणादाखल वृत्तबद्ध 'माझा मार्ग' ही कविता पाहू,

*मी तो वीज नभातली मजवरी घालाल का बन्धने?*
*होता खिन्न उगाच का बघुनिया हे स्वैर माझे जिणे?*
*आहे दारुण योग हा - न समजा निर्विघ्न ही स्वैरता-*

'शार्दूलविक्रीडित' या अक्षरगणवृत्तातील या कवितेतून त्यांनी स्वतःच्या व्यक्तित्वावर विशेष प्रकाश टाकला आहे. संस्कृतप्रचुर रचना असलेल्या या कवितेत स्वतःच्या मार्गावर असलेली वादळं, स्वप्नं, उद्यानं यांचा उल्लेख येतो आणि मी 'वेड्यापरि हिंडणारच सदा या गर्द राईतुनी!-' असा निर्धारही व्यक्त होतो. या निर्धारात वृत्तबद्ध काव्य, मुक्तछंदात्मक काव्य आणि इतरही साहित्याचे रचनाप्रकार लिहिणार असा दृढ विशासही दिसून येतो. काव्य हा जीवनाचा अविभाज्य भाग व सर्वस्व आहे याची जाणीव ठामपणे त्यांनी कवितेतून व्यक्त केली.



शान्ताबाईंकडे विपुल शब्दसंपत्ती होती कारण त्यांना इतर अनेक कवींच्या कविता मुखोद्गत होत्या. ज्ञानेश्वरीतल्या ओव्यांपासून रविकिरण मंडळ, आरती प्रभूंपर्यंत, गडकरींच्या नाटकातील उताऱ्यांपासून जेन ऑस्टिनच्या 'प्राईड ॲण्ड प्रिजुडाइज'पर्यंत जे जे भावलं ते ते स्मरणात ठेवलं. ओव्या, अभंग, लोकगीतं याला तर मोजमापच नाही. त्यातल्या शब्दांचा, प्रतिमांचा अभ्यासपूर्वक मागोवा घेतला. त्यातूनच त्यांच्या उत्कट आणि संवेदनक्षम अंतःकरणावर वाचलेल्या व ऐकलेल्या साहित्याचा खोलवर ठसा उमटला. हे उमटलेले भावठसे पुढे त्यांच्या साहित्यातून डोकावत राहिले. इतरांच्या लेखनातील एखाद्या भावलेल्या पण न समजलेल्या प्रतिमेचाही शान्ताबाई शोध घेत राहायच्या इतकी त्यांची शब्दांबद्दल असोशी होती. गडकऱ्यांच्या 'राजसंन्यास' नाटकात, 'बचनागाच्या बनातून निघालेली गंगा बारा मुलुख जाळत, विखारत जाते', अशी प्रतिमा येते. शान्ताबाईंना 'बचनागाच्या बनातील गंगेचा' संदर्भ काही केल्या सापडेना व समजेना. बऱ्याच वर्षांनी त्यांना य.न. केळकरांच्या 'वाङ्मयचाफा' या पुस्तकात त्याचा संदर्भ मिळाला. तेव्हा संदर्भ मिळाल्याच्या आनंदाबरोबरच गडकऱ्यांनी ही माहिती कुठून मिळवली असेल, याचंही उत्तर त्या शोधत राहिल्या. अस्सल कवी हा शब्दांना असा कवेत घेत जातो. कवी स्वतःचं काव्य रचताना त्याच्यावर अनेकांच्या काव्याचे संस्कार होत असतात. शान्ताबाईंवरही ते झाले, पण सुरुवातीच्या प्रभावपूर्ण काव्यलेखनानंतर मात्र त्यांनी स्वतःची वाट ओळखली.

'वर्षा' या पहिल्या काव्यसंग्रहानंतर 'रूपसी', 'गोंदण', 'अनोळख', 'जन्मजान्हवी', 'पूर्वसंध्या' आणि 'इत्यर्थ' हे कवितासंग्रह प्रकाशित झाले. पाच दशकांहून अधिक काळ सातत्यानं कवितालेखन केलं. कवयित्री म्हणून नावलौकिकही झाला. 'कविता कशी फुलते' यावर भाष्य करण्याचा अधिकारही प्राप्त झाला. या अधिकारात शान्ताबाई लिहितात, 'कविता करताना काही शब्दसंगती मनात कशा जाग्या होतात, शब्दांच्या साखळ्या कशा जुळत जातात, विशिष्ट प्रतिमा कोठून कशी जागी होते, याला खरोखरच उत्तर नाही. कधी कविता मनात जन्म घेते तिथून प्रकटते. काही वेळा ती बाहेरून मनात शिरते. तिथे रुजते, अंकुरते.' या बाहेरून आत शिरणाऱ्या कवितांच्या निर्मितीचं थोडंबहुत स्पष्टीकरण करता येतं. या स्पष्टीकरणाचं सोदाहरण वर्णन त्यांनी एका प्रसंगतून केलं आहे. नाशिकला जाताना रात्रीच्या काळोखात ट्रकच्या प्रकाशझोतात कडुलिंबाचं एक झाड आपदमस्तक उजळून निघालं, आणि या क्षणानं त्यांच्यातील कवित्व सचेत झालं. बालपणी अंगणात असलेला लिंब मनात वस्तीला येऊन राहिला. भावनांची उलथापालथ झाली आणि 'झाड' ही कविता जन्माला आली. ही कविता शान्ताबाईंची आवडती कविता होती.










*मातीचे झाड, झाडांची मी,*
*माझी पुन्हा माती*
*याच्या पानावरच्या रेषा*
*माझ्या तळहाती*
*ढलपी ढलपी सुटून मुळे झाली सैल*
*रुजते आहे झाड*
*माझ्या रक्ताच्या पैल.*

माती, झाड, ढलपी या शब्दांची पुनरावृत्ती अर्थ आणि नादाच्या दृष्टीनं किती विलक्षण ठरते. निसर्गाशी कवयित्रीचं व पर्यायानं मानवाचं असलेलं नातं, निसर्ग आणि मानव यांचा आदिम संबंध यातून सहज उलगडत जातो. शान्ताबाई स्वतःच्या कवितेबद्दल बोलतात तेव्हा म्हणतात, विशिष्ट अनुभूतीची स्मारकं म्हणून आणि विशिष्ट आकांक्षाची चित्रं म्हणून माझ्या कविता मला आवडतात. हे विधान 'झाड' या कवितेबाबत तंतोतंत लागू पडतं व वाचकालाही मनापासून पटतं.

**सहज, प्रसन्न, स्वच्छ!**

शान्ताबाईंची कविता कशी आहे, असं विचारलं तर ती सहज, प्रसन्न आणि कवयित्रीच्या मनातला अर्थ स्वच्छपणे वाचकांच्या मनात प्रतिबिंबित होणारी आहे, असंच उत्तर येतं. ती सहज आणि सोपी झाली, कारण वृत्तपत्रात काम करताना आचार्य अत्रे यांनी 'वाचकाला कळलं पाहिजे' हा धडा गिरवून घेतला होता. समंजसपणा जो त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होता तो कवितेतही उतरला होता. त्यांच्या 'समंजस' शीर्षक असलेल्या कवितेत त्या लिहितात,

*दुःख समंजस माझे*
*नाही फिरविली द्वाही*
*कधी आले आणि गेले*

**कवी कविता लिहितो तेव्हा कवितेच्या कोणत्या प्रकारात लेखन करायचं हे आधी ठरवूच शकत नाही. त्याचा अनुभव त्याची अभिव्यक्ती स्वतःच घेऊन येत असते. शान्ताबाईही याला अपवाद ठरल्या नाहीत. शान्ताबाईंनी कवितालेखन करताना कवितेचे विविध प्रकार हाताळले. प्रेम, निसर्ग, आत्मपर, चिंतनपर, कवी-काव्यविषयक इत्यादी प्रकारात लिहिताना भावगीत, गझल, सुनीत, मुक्तछंद असे काव्यप्रकारही हाताळले. ते हाताळताना शब्दांवरची पकड ढिली होऊ दिली नाही**

*मला कळलेही नाही*
*मला कळलेही नाही*
*उरे पुसटशी खूण*
*....फक्त फिकट चांदणे*
*.... फक्त मंदावले ऊन*

अष्टाक्षरी छंदात बद्ध असलेली आठच ओळींची कविता किती अर्थ सांगून जाते. 'फिकट चांदणे' आणि 'मंदावलेले ऊन' या दोन प्रतिमा आयुष्यातील पूर्वार्ध आणि उत्तरार्ध सूचित करत असाव्यात. 'पुसटशी खूण' यातून मनावर बारीकसा ओरखडा आहे पण जखम नाही, हे सांगायचं असेल. दुःखाला 'समंजस' म्हणणं हा सामान्यांच्या चौकटीबाहेरचा विचार; पण कविता संपेपर्यंत तो विचार सामान्यांच्या चौकटीत यावा हे या कवितेत घडतं. त्यांच्या इतर कवितांतूनही हाच अनुभव येतो म्हणूनच वाचकाला शान्ताबाई आपल्या वाटतात. सुख आणि दुःख हा पाठशिवणीचा खेळ आणि तेच माणसाचं आयुष्य असतं. दुःखाला विसरून पुढे वाटचाल करणं क्रमप्राप्त असतं. हे पटतं पण समजून घ्यायला वेळ लागतो. शान्ताबाई आठ ओळींत ते सांगतात. वाचकाला काहीही मुद्दाम न शिकवता, सरळ, शुद्ध आणि निरागस आत्माविष्कार शेवटपर्यंत ठेवत शान्ताबाई कविता लिहितात, पण वाचकाला बोध व्हायचा तो होतोच. गद्यलेखनात व्यक्तिचित्रलेखन हा शान्ताबाईंचा आवडता लेखनप्रकार होता. शान्ताबाईंनी भरपूर व्यक्तिचित्रं लिहिली. ही व्यक्तिचित्रंही काव्यात्म अंगानं लिहिली जायची. हे लेखन करताना सूक्ष्म निरीक्षणशक्ती आणि वर्णनात्मक भाषाशैली असणं गरजेचं असतं. या दोन प्रमुख वैशिष्ट्यांचा वापर त्यांनी कवितांतूनही केला. गद्यलेखनातला ऐसपैसपणा कवितेत घेता येत नाही, पण काही ओळींतून तो मांडणं हे मोठं कौशल्य असतं जे शान्ताबाईंनी आत्मसात

केलं होतं. 'आजोबा', 'मालण' या प्रातिनिधिक कवितांतून त्याचं प्रत्यंतर येतं.

*जुना कसदार देह*
*बळकट अंगकाठी*
*किती पाहिलें...भोगिलें..*
*सांगे भाळावर आठी. (आजोबा)*

*गोरी मालण*
*उभी राहिली खिडकीपाशीं*
*कठड्यावर टेकून कोपरें*
*ओंजळीत मुख घेऊन अपुलें (मालण)*

व्यक्तिचित्रातली रसरशीत आणि मनमोकळी शैली वापरत, शब्दांची मार्मिक निवड करत, निवेदनाचा सहज, सोपा ओघ कायम ठेवत पण उचित परिणाम साधणारी व्यक्तिचित्रणात्मक कविता शान्ताबाईंच्या प्रत्येक कवितासंग्रहात सापडते. माणसांत रमणं, त्यांचं चौकस बुद्धीनं आकलन करून घेणं आणि त्या व्यक्तीतल्या चांगल्या बाजू पाहात त्यांच्या आठवणीत राहाणं त्यांना आवडायचं आणि जमायचंही. 'पैठणी' या त्यांच्या गाजलेल्या कवितेत, 'पैठणीच्या चौकड्यांनो आजीला माझे कुशल सांगा', असं शान्ताबाईंनी लिहिलं, पण वाटतं सर्वच व्यक्तिचित्रांमधील व्यक्तींना त्या असंच कुशल सांगायला सांगत असतील. त्या व्यक्ती त्यांच्या व्यक्तिमत्त्वाशी इतक्या जोडल्या जात, की ती एकरूपता त्यांच्या कवितेतूनही जाणवते.

**लक्षणीय अनुवाद**

अनुवाद हा साहित्यप्रकारही शान्ताबाईंनी समर्थपणे हाताळला. अनुवादात निर्मितीच्या खालोखाल आनंद त्यांना मिळाला. अनुवादाकडे तुच्छतेनं पाहण्याचं काही कारण नाही असं त्यांना मनापासून वाटे कारण त्यातील सृजनशीलता त्यांना आवडत होती. संस्कृत स्फुट श्लोकांपासून जपानी हायकूपर्यंत आणि चिनी प्रेमकवितांपासून डोंगरा लोकगीतांपर्यंत जे जे आकर्षक, वेधक आणि आशयघन सापडेल त्याचा अनुवाद त्या करत. इतर भाषेतील चांगलं साहित्य मराठीत आलं पाहिजे, हा त्यामागील हेतू होता. महाविद्यालयात असताना कालिदासाचं 'मेघदूत' विद्यार्थी म्हणून अभ्यासलं, त्याच 'मेघदूता'चा काव्यरूप अनुवाद शान्ताबाईंनी संस्कृत न जाणणाऱ्यालाही समजेल अशा सुबोध भाषेत करून दिला. उदाहरणादाखल उत्तरमेघातील 'यक्षिणी'चे वर्णन पाहा,

*अमृतशीतल सुखद चांदणे गवाक्षातुनी येता सदनी*
*अभिमुख होई प्रिया तयाला पूर्वसुरीचे स्मरण होऊनी*
*तोच आसवें भरती डोळां झुके पापणी त्यावर ओली*
*भूकमळाची कळी जणूं कीं अर्ध उमलली, अर्धी मिटली*

'अनुवाद म्हणजे मूळ कलाकृतीचा अधिक उत्कटपणे रसास्वाद घेणे होय.' हा शान्ताबाईंनी पुरेपूर घेतला व वाचकांनाही दिला.

'हायकू' हा खास जपानी संस्कृती आणि परंपरा यांच्यातून तयार झालेला काव्यप्रकार आहे. एखादं निसर्गचित्र, मनाची एखादी लहर, एखादी सूक्ष्म, संदिग्ध व्यथा अगदी मोजक्या शब्दांत यातून व्यक्त होते. शान्ताबाईंना हायकूचं आकर्षण वाटलं. त्यांनी काहींचे अनुवादही केले पण कालांतरानं जपानी हायकूंचं वैशिष्ट्य मराठी वळणाच्या रचनेत राहत नाही असं जाणवलं व त्यांनी स्वतःचे हायकू लिहिले.

*मृत पत्नीची फणी*
*पावलांखाली आली अचानक*
*हृदयात उठली हिमवेदना दाहक*

'फणी' हा खास मराठी ग्रामीण शब्द त्यांनी वापरला आणि आपल्या मातीतला हा हायकू तयार झाला.


कवी कविता लिहितो तेव्हा कवितेच्या कोणत्या प्रकारात लेखन करायचं हे आधी ठरवूच शकत नाही. त्याचा अनुभव त्याची अभिव्यक्ती स्वतःच घेऊन येत असते. शान्ताबाईही याला अपवाद ठरल्या नाहीत. शान्ताबाईंनी कवितालेखन करताना कवितेचे विविध प्रकार हाताळले. प्रेम, निसर्ग, आत्मपर, चिंतनपर, कवी-काव्यविषयक इत्यादी प्रकारात लिहिताना भावगीत, गझल, सुनीत, मुक्तछंद असे काव्यप्रकारही हाताळले. ते हाताळताना शब्दांवरची पकड ढिली होऊ दिली नाही हे महत्त्वाचं ठरतं. अनुभव व वयपरत्वे त्यांची कविता अधिकाधिक भावगंभीर व अंतर्मुख होत गेली. त्यातून औदासीन्य, खिन्नता, एकाकीपण याच्याही खुणा दिसू लागल्या. स्वतः ला लाभलेल्या प्राक्तनाचा आणि जीवनाच्या गतीसह येणाऱ्या अटळ दुःखाचा, पराभवाचा स्वीकारही केलेला दिसला. स्त्रीविषयक विशिष्ट जाणिवांचे कंगोरेही पुन्हा पुन्हा दिसू लागले. मानवी नात्यांची गुंतागुंत आणि त्यातील भावभावनांचे पदर कवितेतून उलगडू लागले. हे सारं येत होतं, पण अतिशय उत्कटतेनं!

**स्वत:ची वेगळी वाट**

शान्ताबाईंचा कवितेचा कालखंड हा अर्धशतकाहून अधिक होता. या पन्नास वर्षांत मराठी कवितेनं कितीतरी वळणं घेतली. बा.सी. मर्ढेकर यांनी नवकाव्य आणलं, नारायण सुर्वे यांनी साठोत्तरी काव्याची नांदी केली, दलित, ग्रामीण काव्य फोफावलं. नवदोत्तरी काव्यही शान्ताबाईंनी वाचलं. त्याचवेळी स्त्रीवादी कवितेचा फार मोठा बोलबाला झाला होता, पण या साऱ्या परिवर्तनात शान्ताबाईंनी स्वतःची मूळ वृत्ती सोडून काव्यलेखन केलं आहे, असं दिसलं नाही. नेणिवेतील कविता किंवा अस्तित्ववादी कविता हा त्यांचा प्रांत नव्हता व त्याकडे त्या वळल्याही नाहीत. स्वतःशी प्रामाणिक राहून मार्गक्रमण करत दिवसेंदिवस अधिक साधी पण प्रगल्भ, आत्ममग्न आणि विशुद्ध कविता त्या लिहीत राहिल्या.

उत्तम बालसाहित्य ही समाजाची फार मोठी गरज असते. मुलांवर संस्कार आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला वळण लावण्याचं सामर्थ्य त्यात असतं. मुलांच्या भावविशात शिरून त्याचं वर्णन त्यांना कळेल त्याच शब्दांत मांडणं ही कसरत आणि कारागिरीही असते.

लहान मुलांचे प्रश्न अनाकलनीय असतात. उत्तर द्यायचं ते कोणतं हा प्रश्न मोठ्यांसमोर निश्चित उभा राहतो. त्यांचं भावविश्व मर्यादित असतं. या भावविश्वात पाऊस, शाळा, प्राणी, पक्षी, खोड्या, खेळ याला स्थान असतं. (आता संगणकावरचे खेळ) याचा विचार करून शान्ताबाईंनी बालकविता लिहिल्या. (त्यांना मांजरी फार आवडायच्या.) शान्ताबाईंचं 'किलबिल किलबिल पक्षी बोलती' हे गीत आजही लोकप्रिय आहे, हे नमूद करायलाच हवं. बालकवितेला लय ही असायलाच हवी. अप्रत्यक्ष संस्कार झाला तर चांगलाच! मुलांनी दूध प्यावं हे सांगताना शान्ताबाई लिहितात,



*बजरंग माझा भाऊ, भीम माझा काका*
*सांगून ठेवतो पुन्हा माझ्या वाटे जाऊ नका*
*दंड माझे पहा कसे रोज दूध पितो*
*अंगामध्ये ताकद आहे मग कोण भितो?*

मुलांचे निरागस प्रश्न, त्यातील भाव आणि शान्ताबाईंनी दिलेली काव्यातून दाद विलक्षण लोभस आहे.

शान्ताबाई स्वतःची कविता स्वतःच्या स्वभावधर्मानुसार लिहीत राहिल्या. ज्येष्ठ समीक्षक प्रभा गणोरकर यांनी त्यांच्या कवितेचं वर्णन फार छान केलं आहे- 'शान्ताबाईंच्या कवितेनं आवाज चढवून स्वतःचं अस्तित्व प्रकट करण्याचा प्रयत्न केला नाही. आत्मपर, पण आत्मरत नव्हे, लोकप्रिय पण लोकानुरंजन करणारी नव्हे, परंपराप्रिय पण नवविमुख, जुनाट नव्हे, अशी सत्त्वशील, प्रसन्न आणि हृदयस्पर्शी, आंतरिक भावबळानं समृद्ध असलेली शान्ताबाईंची कविता अस्तंगत होत चाललेल्या आधुनिक मराठी काव्याच्या परंपरेची शेवटची खूण आहे.' परंपरा मग ती संस्कृतीची असू दे किंवा काव्याची, शान्ताबाईंनी ती मनःपूर्वक जपली असं म्हणावं लागेल. आत्मशोध आणि आत्माविष्कार या गुणांनी त्यांची कविता सतत बहरत राहिली.

**'गीतकार' शान्ताबाई**

शान्ताबाईंनी भरपूर गीतलेखन केलं. गीत या प्रकाराबद्दलचं त्यांचं कुतूहल आणि आवड ही बालपणाच्या वातावरणामुळं चांगली जोपासली गेली होती. त्यामुळं प्रत्यक्ष गीतलेखन करताना त्यांना या साऱ्या संचिताचा खूप उपयोग झाला. गीतलेखनं कसं करायचं हे त्यांना भालजी पेंढारकरांनी शिकवलं. 'स्वराज्याचा शिलेदार' या चित्रपटाची गाणी लिहिण्यासाठी शान्ताबाईंना खास कोल्हापूरला बोलावून घेतलं होतं. स्टुडिओ सुरेख. व्यवस्थाही उत्तम. संगीतकार दत्ता डावजेकर. पण शान्ताबाईंना काही गाणी जमेना. जीव मेटाकुटीस आला. भालजींनाही जमत नाही म्हणून सांगून टाकलं, तेव्हा ते म्हणाले, इतक्या सुरुवातीलाच एवढी निराशा? अहो, काय अवघड आहे या कामात? काहीतरी ललला डडडा गुणगुणत राहा. आपोआप शब्द सुचतील. पण ध्यानात ठेवा सिनेमाची गाणी अगदी सोपी हवीत. तुमचं वाङ्मय, साहित्य विसरा आणि रोजच्या साध्या बोलायच्या भाषेत - जणू आपण एकमेकांशी बोलत आहोत-अशा भाषेत लिहा. गीतं लिहिण्याचा खरा श्रीगणेशा इथं झाला.

शान्ताबाईंनी गीतलेखनास प्रारंभ केला तेव्हा ग.दि. माडगूळकरांसारखे दिग्गज गीतकार त्या प्रांतात अधिराज्य गाजवत होते. त्यांच्याविषयी प्रचंड आदर व स्नेह मनात ठेवून स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करणं अवघड होतं. परंतु शान्ताबाईंनी स्वतःच्या निर्मळ प्रतिभेच्या जोरावर ती सहजसोपी केली. ग.दि.मांच्या गाण्यांचा 'चैत्रबन' कार्यक्रम हा जसा रसिकांना पर्वणी ठरला तसाच शान्ताबाईंच्या 'तोच चंद्रमा'ची आठवणही रसिकांच्या मनात कायम आहे. उत्तम कवित्व, निर्दोष रचना, श्रुतिसुभगता, प्रयोगशीलता आणि प्रासादिकता या गुणांमुळं मागणीनुसार लिहिलेली शान्ताबाईंची गीतंसुद्धा देखण्या कलाकृती ठरल्या आहेत. गीत हे प्रसारमाध्यमासाठी असतं. शान्ताबाईंनी बदलत्या प्रसारमाध्यमांना सामोरं जात गीतं लिहिली हे कौतुकास्पद वाटतं. त्यांच्या काळात दूरदर्शन हे प्रगत प्रसारमाध्यम होतं. या प्रसारमाध्यमात शान्ताबाई आणि सरोजिनी बाबर यांचा 'रानजाई' हा कार्यक्रम खूप गाजला, आजही त्याचं स्मरण होतं. या 'रानजाई'चं

*दऱ्याखोऱ्यात फुलती तू गं रानजाई*
*भोळा शंकर भुलोबा त्याची भुलाबाई*

हे शीर्षकगीत शान्ताबाईंचं होतं.

शान्ताबाईंचं भाग्य असं, की त्यांना खूप मोठमोठ्या संगीतकारांबरोबर काम करायला मिळालं. अर्थातच प्रत्येक गाण्याच्या वेळी त्यांचा कस लागत होता पण मजाही येत होती. सुधीर फडके हे अतिशय चोखंदळ, चिकित्सक, थोडेसे हट्टीही. 'हा माझा मार्ग एकला' हे गाणं त्यांनी शान्ताबाईंना चौदा वेळा बदलायला लावलं आणि त्यांनी ते बदललंही. सुधीर फडके यांना 'हिज मास्टर्स व्हॉइस' या कंपनीसाठी गझल हवी होती. शान्ताबाईंनी 'काव्यप्रकाश'मध्ये वाचलेल्या मूळ संस्कृत श्लोकात थोडा बदल करून 'तोच चंद्रमा नभात' लिहून पाठवलं आणि अपेक्षेपेक्षा अधिक लोकप्रियता मिळाली.

**कोळीगीतांचं पुनरुज्जीवन**

मराठी गीतांत कोळीगीतांना पुनरुज्जीवित करण्याचं आणि तमाम लोकप्रियता मिळवून देण्याचं श्रेय शान्ताबाई आणि हृदयनाथ मंगेशकर यांना जातं. गेयता हा गीतांचा आत्मा तर ताल हे प्रमुख बंधन आहे. शान्ताबाईंनी कोळीगीतं लिहिण्याच्या आधी समुद्रही फक्त एकदा पाहिला होता, मग समुद्रावरचं जीवन, त्यांची भाषा, त्यांची संस्कृती वगैरे वगैरे तर दूरच. हृदयनाथ मंगेशकर गाण्यासाठी मागं लागले आणि गाणी तर मनासारखी होईनात. शेवटी हृदयनाथांचा आवाजाचा स्तर चढला तशा शान्ताबाई अस्वस्थ झाल्या. कोळ्यांची पारंपरिक गीतं वाचली, समुद्राची भरती, स्त्रियांचा साजशृंगार, होळी, नारळीपौर्णिमा हे सारं समजून घेतलं. शान्ताबाईंची स्मरणशक्ती तल्लख असल्यानं कधीतरी वाचलेल्या र.वा. दिघे यांच्या पुस्तकातील डोलकर हा शब्द आठवला आणि मग उधानवारा, चमचम करणारी चांदीची मासोळी

असे अनेक तपशील मनात गोळा होत गेले. कोळीगीतं तयार झाली. अफाट लोकप्रियता मिळालेल्या या कोळीगीतांचा बंगाली अनुवाद सलील चौधरी यांनी केला. तिथेही ती लोकांनी आवडीनं ऐकली. 'मी डोलकर डोलकर' या गीतातील खास कोळी शब्द 'लाराची लेक', 'फुलैला चाफा', 'साजीरवानी', 'झुरते पिरती', 'आबाल झुकतं खाली', 'पुनवेचं चांदनं', 'चांदीची मासली' इत्यादी शब्द त्या गीतात शान्ताबाईंनी असे पेरले, की त्या ऐवजी दुसरा शब्द तिथे बसू शकत नाही.

शान्ताबाईंची अनेक गाणी गाजली. 'जिवलगा राहिले रे दूर घर माझे', 'ही वाट दूर जाते', 'हे श्यामसुंदर, राजसा', 'जाईन विचारीत रानफुला', 'शूर अम्ही सरदार', इत्यादी कितीतरी... ..शान्ताबाईंना कवितेइतकं गीतलेखनही श्रेष्ठ वाटतं. 'हुकुमाबर लिहिताना साऱ्या शक्ती पणाला लावाव्या लागतात. सोपेपणा तर सांभाळावाच लागतो. चांगल्या गीतात चांगली कविता असतेच असते किंबहुना चांगल्या गीताचा कणा ही चांगली कविता असते', असं त्यांचं मत होतं. शान्ताबाईंनी उत्तम गीतं लिहिली, ती गाजली, पण कधीही त्यांनी त्याचं श्रेय फक्त स्वतःकडं घेतलं नाही. संगीतकारआणि गायकांना दिलं. शान्ताबाईंनी लिहिलेली गीतं जशी लताबाई, आशाबाईंनी गायली तशीच जितेंद्र अभिषेकी, अरुण दाते व अरुण सरनाईक यांनीही गायली. एखाद्याच गीतकाराला असं भाग्य लाभतं ते शान्ताबाईंना मिळालं. गीतांवर प्रेम करणाऱ्या शान्ताबाईंना गीत हा वाङ्मयप्रकार अजून खूप असंशोधित राहिला आहे, त्याला विकासाच्या, वाढीच्या अनेक शक्यता आहेत असं वाटत असे. इतर प्रांतिक भाषांतून लोकगीतांचं जे अमाप भांडार आहे ते धुंडाळलं तर आजच्या गीतलेखकांना नवनव्या प्रतिमा, कल्पना मिळतील असं त्यांनी लिहून ठेवलंय. आजच्या गीतलेखकांनी याचा जरूर विचार करावा.

**लावणीला समृद्धीचा बाज**

चित्रपटातील लावणी किंवा लावणीवजा चाली असेलली गीतं सातत्यानं लिहिणाऱ्या शान्ताबाई या एकमेव कवयित्री होत्या. लावणीचा शृंगार हा स्थायिभाव असतो, तो रंगवणं कठीण असतं. निर्मितीक्षमता, बहुश्रुतता आणि अफाट शब्दसंपत्ती या गुणांच्या जोरावर त्यांनी चांगली लावणी लिहिली. शान्ताबाईंना नेहमी विचारलं जायचं, की तुमची आवडती लावणी कोणती? एका क्षणाचाही विचार न करता त्या उत्तर देत, 'रेशमाच्या रेघांनी लाल काळ्या धाग्यांनी', ही माझी आवडती लावणी आहे. या लावणीत वापरलेले शब्द ग्रामीण नाहीत पण 'नगा' हा शब्द किती वेगळा पण चपखल बसला आहे. 'तोरा-होरा', 'आला-गेला', 'लाल-काळ्या' या शब्दांनी लावणीला उंची प्राप्त करून दिली आहे. 'पदराचा शेव', शेव म्हणजे वस्त्राचं टोक किंवा शेवटचा भाग. खरं तर हा शब्द फारसा प्रचलित नाही पण तरीही ते वापरण्याचं आणि रूढ करण्याचं श्रेय शान्ताबाईंना द्यावं लागेल. 'मुरवत राखा दहा डोळ्यांची' यात मूळ शब्द 'मुर्वत' असा आहे. मुर्वत म्हणजे भीड, संकोच. शान्ताबाई 'मुरवत' असा



लिहितात कारण गीतकाराला गीतलेखनात थोडं स्वातंत्र्य घेता येतं. 'हिरव्या रंगाचा छंद राया पुरवा' या लावणीत पंधरा ओळींत 'हिरवा' शब्द वापरला आहे. प्रत्येक वेळी त्या हिरव्याचा संदर्भ मात्र वेगवेगळा आहे. 'हिरवी पालखी', 'हिरवं लुगडं', हिरवं गोंदण', 'हिरवा चुडा', 'हिरवा चौकडा', 'हिरवी झाडं', 'हिरवा साज', 'हिरवी बाग', 'हिरवी राणी', 'हिरवं गुपित' इत्यादी. शब्दप्रभुत्व असल्याशिवाय अशा रचना जमत नाहीत. मराठीतील लावणीचं भांडार शान्ताबाईंनी समृद्ध केलं आणि शाहिरी परंपरेची प्रतिष्ठाही जपली असं म्हणता येतं.

कविता हा स्वतःच्या जिव्हाळयाचा आणि जवळचा साहित्यप्रकार असूनही शान्ताबाईंनी अन्य साहित्यप्रकारही समर्थपणे हाताळले. त्यांच्यासारखे असे लेखक थोडेच असतात जे खडतर आणि कठीण असलेलं लेखनव्रत सांभाळू शकतात. भरभरून लिहूनसुद्धा त्यांच्याजवळ सांगण्यासारखं खूप राहिलेलं असतं. शान्ताबाईंना ते जमलं कारण अखंड वाचन, चौफेर निरीक्षण, विविध जीवनानुभव घेण्याचा उत्साह, परंपरा आणि नवता यांचा समन्वय साधण्याची कला. लेखन हाच आनंद मानण्याची वृत्ती आणि स्वतःच्या वाटेवर अविरत चालण्याची धडपड यामुळं ते शक्य झालं. संपन्न साहित्यदृष्टी व रसिक व्यासंग यांची अभिरुची वाचकांपर्यंत पोहोचवण्याचं कार्य त्यांनी केलं, म्हणूनच वाचकांनीही त्यांना भरभरून प्रेम दिलं.

ज्येष्ठ समीक्षक रा.ग. जाधव यांनी शान्ताबाईंना फार छान उपमा दिली आहे. 'प्रत्येक फूल वेगळं असतं, प्रत्येक फुलाची कहाणी वेगळी असते, तथापि सर्व फुलांतून व सगळ्या कहाण्यांतून असलेली पऱ्यांची राणी एकच असते, असं शान्ताबाईंनी एका कवितेत म्हटलं आहे. गेल्या पन्नास वर्षांतील मराठी साहित्यसृष्टीतील फुलं वेगवेगळी होती, त्यांच्या कहाण्या वेगवेगळ्या होत्या, कालखंड व कालमान हेही वेगवेगळं होतं, वाचकही वेगवेगळे होते आणि खुद्द शान्ताबाई यादेखील वेगवेगळ्या होत्या. पण त्यांच्या अशा वेगळेपणातही असलेली पऱ्यांची राणी एकच होती. ती म्हणजे शान्ताबाई नामक राजस रसिकता!' या रसिकतेला त्रिवार वंदन!

**– डॉ. सुजाता शेणई**
भ्रमणध्वनी : ९०११०१७९१६
sujata.shenai@gmail.com







# जगण्याचा लोलक गवसलेली कवयित्री

**सलील कुलकर्णी**

*शान्ता ज. शेळके कवयित्री आणि गीतकार म्हणून परिचित असल्या तरी त्यांनी मराठीत सर्व प्रकारची साहित्यनिर्मिती केली आहे. त्यांचं नाव निघालं, की एक प्रसन्न, हसतमुख, रसासक्त चेहरा समोर येतो, त्याचं जणू प्रतिबिंबच त्यांच्या लिखाणात उमटलं आहे. माणूस म्हणून त्यांचं व्यक्तिमत्त्व सर्वांनाच लोभस वाटायचं. एक संगीतकार या नात्यान भेटलेल्या सलील कुलकर्णी यांना त्यांच्यात एक छान लहान मुलगी, अत्यंत गंभीर अशी साध्वी स्त्री आणि प्रतिभावंत कवयित्री, अशा तिघी एका वेळी नांदताना दिसल्या!*

शान्ताबाई ज. शेळके हे नाव आपण अगदी लहानपणापासून ऐकतो. अशी फार कमी नावे आपल्याकडे आहेत की जी शालेय अभ्यासक्रमात आपल्या डोळ्यांपुढे येतात, पुढे ती चित्रपटगृहाच्या पडद्यावरही बघतो आणि जी आपल्या भावविश्वातली होतात ती त्यांच्या भावगीतांमुळे. या मोजक्या व्यक्तींमध्ये माडगूळकरांनंतर शान्ताबाईंचे नाव असेल असे मला वाटते.इतक्या संख्येने त्यांची गाणीही आपल्याला पाठ आहेत. आपल्या अभ्यासक्रमात त्यांच्या कविता, त्यांचे उतारे होते. त्यांची भावगीते आपण ऐकत राहतो. काही लोकांचे शब्द कानावर पडणे, त्यांना 'ऐकणे' हे आपण आयुष्यात कधी टाळूच शकत नाही. महाराष्ट्रात राहणाऱ्या किंवा एकूण मराठीची गोडी असणाऱ्यांना शान्ताबाईंच्या गीतलेखनातले वैविध्य अगदी सहज दिसते. उदाहरणार्थ - गणेशोत्सवात 'गणराज रंगी नाचतो' किंवा 'गजानना श्रीगणराया' हमखास ऐकायला मिळते. अलीकडे दुर्मिळ झालेल्या वाद्यवृंदांत 'रेशमाच्या रेघांनी' हे गाणे मस्ट असायचे, 'ही चाल तुरूतुरू' हेही मस्ट असायचे. ही थोडी धमाल गाणी झाली. थोडे गांभीर्याने म्हटल्या-ऐकवल्या जाणाऱ्या गाणी-कवितांच्या कार्यक्रमाला गेलो तर 'मागे उभा मंगेश' या गाण्याने सुरुवात व्हायची. पाठोपाठ असायचे 'ही वाट दूर जाते' त्याच्याही आतला कप्पा उघडला आपल्या संवेदनशीलतेचा तर मग 'मागते मन एक काही दैव दुसरे घडविते' किंवा 'चांदण्या रातीतले ते स्वप्न तू विसरून जा' किंवा 'अजब सोहळा माती भिडली आभाळा' ही गाणी सामोरी येतात. शान्ताबाईंच्या शब्दांची ही रेंज पूर्णपणे आपल्याला जणू वेढून टाकते. इथे 'वेढूनि तव राहसी का दूर दूर आता' ही एक ओळ आठवते (शान्ताबाईंची नाही) आणि समर्पक वाटते. अशा इतक्या बाजूंनी शब्दवैविध्यांतून शान्ताबाई आपल्याला लहानपणापासून




कळत असतात. त्यांच्याविषयी आपण वाचतो, की त्यांनी चालीवर 'जिवलगा राहिले रे दूर घर माझे' लिहिले किंवा 'ऋतू हिरवा' लिहिले.

त्या सुमारास माझी या क्षेत्रातील काही मंडळींशी थोडीथोडी ओळख होत होती आणि या सगळ्यांकडून शान्ताबाईंविषयी भरभरून ऐकायला मिळाले. त्या म्हणजे किती अजब रसायन आहेत वगैरे. त्याच काळात शान्ताबाई आणि दीदी (लता मंगेशकर) असा एक कार्यक्रम दूरदर्शनवर झाला होता. सरोजिनी बाबर आणि शान्ताबाई एक कार्यक्रम दूरदर्शनवर करायच्या. सांगायचा मुद्दा हा, की महाराष्ट्राचे संगीत-साहित्य किंबहुना एकूणातच कलाविशात ज्यांचे मोठे काम आहे, इतके वैविध्यपूर्ण काम आहे अशा व्यक्ती आपल्याला फार वेगवेगळ्या पद्धतीने भेटतात. एकाच पद्धतीने भेटत नाहीत. कधी माणूस तुम्हाला मैफिलीत भेटतो कधी दूरदर्शनवर दिसतो. तसे येथे नाही. या व्यक्ती चौफेर भेटतात. तशा शान्ताबाई मला चौबाजूंनी भेटल्या. कारण पहिल्यापासून शब्दांकडे माझे खूप चटकन लक्ष जाते. आताही आठवते आहे की 'ब्रह्मा धरितो ताल निरंतर, करी शारदा वीणावादन' हे पहिल्यांदा ऐकल्यावर वाटले कुणी लिहिले आहे हे गाणे तर कॅसेटवर नाव होते - 'शांता शेळके'. पुढे कार्यक्रमात 'ही चाल तुरुतुरु'च्या संदर्भात निवेदकाने सांगितले की 'आणि गीत अर्थातच शांता शेळके'. मला हे वाचून, ऐकून, पाहून वाटायला लागले की शान्ताबाईंच्या शब्दांची, साहित्याची रेंज तरी केवढी आहे, हळूहळू माझी कलाजाणिवेची समज काही मंडळींमुळे वाढत गेली. 'अमुक एक कुणी नसतोच. तुम्ही कलाकार असता, एक संवेदनशील कलाकार असता, तुम्ही एक शस्त्र घेऊन उतरता पण त्यासोबत बाकीच्या जादूही तुमच्या पोतडीत असताताच.' हे आपल्या शब्दांतून-कलेतून शिकवणाऱ्या या मंडळींमध्ये शान्ताबाई, सुधीर मोघे, हृदयनाथजी होते.

त्या काळात शान्ताबाई पुण्यात राहायला आल्या आहेत, असे मला कळले. साधारणपणे १९९७-९८ मधली गोष्ट असावी. एमबीबीएसनंतर माझी इंटर्नशिप सुरू होती. मी माझ्या स्वभावानुसार त्यांना थेट भेटायला गेलो. म्हणालो, माझे नाव सलील कुलकर्णी. मी आताच डॉक्टर झालो आहे. सुधीर मोघे यांच्या गाण्यांची कॅसेट आणि मंगेश पाडगावकर व विंदा करंदीकर यांच्या बालगीतांची कॅसेट मी केली आहे. त्या मला तुम्हाला ऐकवायच्या होत्या, तर तुम्ही ऐकाल का? त्या म्हणाल्या हो ऐकवा. तुम्हाला कोणते गाणे ऐकवायचे आहे. मी म्हणालो, तुम्ही कोणतेही गाणे ऐका. हा आमचा पहिला संवाद होता आणि त्या म्हणाल्या की मला हे आवडले की तुम्ही म्हणालात, की कोणतेही गाणे ऐका. त्या क्षणाला मला एक गोष्ट लक्षात आली की फार कमी व्यक्ती अशा असतात की त्या आपला किल्ला उतरून समोरच्याला भेटायला खाली येतात. त्यातल्या शान्ताबाई एक होत्या. त्यांचे वागणे, बोलणे अत्यंत सहज होते. त्यात कुठलाही मुखवटा नव्हता. कसलाही आव नव्हता. एरवी एक आपल्या नात्यातली आजी असते, तशा त्या वाटायच्या. हे इतके साधे होणे वाटते तितके सोपे-साधे नसते. फार कमी लोकांना इतरांशी बोलताना आपली सगळी आभूषणे, मुकुट, धनुष्य-बाण आदी गोष्टी सहज काढून ठेवून बोलता येते. त्या लिहिताना फक्त कवियत्री, गीतकार, साहित्यिक अशा भूमिकांत शिरायच्या. परकायाप्रवेश साधण्याचे शान्ताबाईंइतके दुसरे मोठे उदाहरण मी बघितलेच नाही. एरवी या साध्याशा वाटणाऱ्या आजींमध्ये प्रचंड रसिकत्व भरलेले होते. बोलताबोलता त्या सहजपणे ज्ञानेश्वरांची, बहिणाबाईंच्या ओळी सांगायच्या. माडगूळकरांपासून त्या अनेक कवींचे दाखलेही द्यायच्या. शब्द त्यांच्या मनात सतत असायचेच, पण त्या स्वतःच्या कविता कधी ऐकवायच्या नाहीत. हेही मला त्यांचे वैशिष्ट्य वाटते. त्या म्हणायच्या, की काय सांगू, किती लोकांनी काय काय एकेक लिहिले आहे. मग कधी बालकवी, कधी गडकरी, कधी माडगूळकर किंवा आणखी कुणाच्या ओळी ऐकवायच्या. गप्पा मारतानाही त्यांच्यातली एक भाबडी, रसिक छोटी मुलगी कायमच जिवंत असायची. एकदा त्यांनी फोन करून सांगितले, की तुम्हाला माहिती आहे सलील, की लतादीदींनी माझ्यासाठी अगाथा ख्रिस्तीचे पुस्तक आणले परदेशातून. शान्ताबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचे हे पैलू त्यांच्या लिखाणात जसेच्या तसे उतरलेले दिसतात. म्हणून वयाच्या सत्तरीतही त्यांनी मला अवघ्या १५-२० मिनिटांत बालगीत लिहून दिले. एकदा त्या बोलताना माझ्या बालगीतांच्या कॅसेटचा संदर्भ देत म्हणाल्या, काय गोड आहेत ती गाणी. खूपदा ऐकते मी. मी म्हणालो, पुढच्या अल्बममध्ये मी तुमचीही बालगीते करणार आहे. तुमची पुस्तके घेतली आहेत. त्या म्हणाल्या कशाला? मी आहे

ना समोर. मला वाटते, की शान्ताबाईंसारखी जी मंडळी आहेत, ती म्हातारी झालीच नाहीत. ज्येष्ठ झाली. शान्ताबाईंनी मला कधीही तब्येतीच्या तक्रारी ऐकवल्या नाहीत किंवा उगीच काही आध्यात्मिक बोलत आहेत असे झाले नाही. अत्यंत तरुण, पण मॅच्युअर, पिकत गेलेली तरुण व्यक्ती अशाच मला कायम त्या दिसल्या. त्यामुळे मला त्या म्हणाल्या, करू या गाणे. मी त्याला दुजोरा दिला. त्यांनी विचारले काय विषय आहे? मी म्हणालो असे काही नाही. त्यांच्याकडे मी बटाटेवडे घेऊन गेलो होतो. वडे खाऊ या, त्या म्हणाल्या. मी म्हटले तुम्ही घ्या. मला उद्या कार्यक्रम आहे. तेव्हा मी खूपच जपायचो. मग म्हणाल्या, या विषयावर करूयात गाणे. आणि त्यांनी 'कोकिळ म्हणतो काय करावे, खोकून बसला पार घसा. कुहूकुहूचे सुंदर गाणे सांगा आता गाऊ कसा.' त्या म्हणाल्या, की ज्यासाठी तो तो प्राणी-पक्षी प्रसिद्ध आहे, ते करायला मिळाले नाही तर प्रॉब्लेमच होईल. पुढे कडवे लिहिले की 'म्हणे कोंबडा, टीव्ही बघता रात्री गेला वेळ असा, उशिरा उठलो कुकुच कूची हाक कुणाला देऊ कसा?' मग मी एक लगेच सुचलेली चाल त्यांना ऐकवली. त्या म्हणाल्या किती गोड वाटते आहे हे. फायनल झाले की ऐकवा. हा सगळा प्रसंग जेमतेम अर्ध्या तासाचा असेल. ते गाणे शान्ताबाईंनी मला कागदावर लिहून दिले. तेव्हा मोबाइलवर रेकॉर्डची सोय नव्हती. मी माझी बेसिक सुरावट तेथे लिहून ठेवली आणि गाणे लिहून झाल्यावर पुन्हा त्या गप्पाष्टकांमध्ये रंगल्या. मी अनेक प्रतिभावंत पाहिले पण प्रतिभेचा इतका वरदहस्त असूनही त्या प्रतिभासाधनेनंतर चटकन त्यातून बाहे पडून चारचौघांसारखे वागणाऱ्या अगदी मोजक्याच व्यक्ती पाहिल्या, त्यातल्या शान्ताबाई एक होत्या. त्याचं ा हा गणु कायमच जाणवत राहिला आणि अधोरेखित होत गेला.



शान्ताबाईंचा प्रामाणिकपणा त्यांच्या शेवटच्या लिखाणातून जाणवतो. गद्य लिखाणात त्या लिहितात, की 'शब्द हीच मला आयुष्यभर माझी शक्ती वाटली. आता मला शब्दांच्या पलीकडे जाऊन काहीतरी शोधावेसे वाटते. अलीकडे शब्दांना शब्द भेटतातच असे नाही आणि शब्दांनी शब्द पेटतातच असे नाही.' त्यांचे हे जाणवणे आणि तेही शब्दांत उतरवणे फार सुंदर होते. त्यांनी माझ्या एका अल्बम साठी चाल ऐकवल्यावर पाच मिनिटांत तीन-चार ओळी लिहिल्या. मी म्हणालो थांबा, कडव्याची चाल वेगळी देतो. त्या म्हणाल्या हे मुखड्याचेच ऑप्शन आहेत. मला नेहमी वाटते की शान्ताबाईंना शब्द शोधायला लागले नाहीत, शब्द निवडायला लागले. त्या शब्दश्रीमंत होत्या. केवळ जुन्या किंवा समकालीनांविषयीच त्या बोलायच्या असे नाही तर नवीन लिहिणाऱ्यांविषयीही त्यांना जाणून घ्यायचे असायचे. एकदा म्हणाल्या ते चोली के पीछे क्या हैं हे गाणे काय थॉट आहे. हे गाणे लोकांनी नीट ऐकले नाही. चोली में दिल हैं मेरा या कल्पनेत गीतकाराला काहीतरी छान म्हणायचे आहे. त्यांचे 'ऐकणे' चाकोरीबद्ध नव्हते. काही कलाकारांचा 'उद्या'कडे बघण्याचा उत्साह असतो त्यामुळे इतकी वर्षे त्या कलाकाराची प्रतिभा तितकीच टवटवीत आणि निखळ राहते.

'मधुसंचय' या पुस्तकात शान्ताबाईंनी त्यांच्या लहानपणी ऐकलेल्या आणि त्यांना आवडलेल्या गोष्टी नोंदवून ठेवल्या आहेत. ही रसास्वादाची वृत्ती आहे. म्हणजे या गोष्टींचा आस्वाद मी घेतला आता तो इतरांनीही घ्यायला हवा, ही वृत्ती आधीच्या पिढीची होती आणि शान्ताबाईंची ती अधिक होती. त्यांच्या शेवटच्या काही वर्षांमध्ये मी त्यांना नियमित भेटायला जात असे. खात्रीने सांगतो, की त्यांच्यात प्रचंड छान लहान मुलगी, अत्यंत गंभीर अशी साध्वी स्त्री आणि एक प्रतिभावंत कवियत्री अशा तिघी एका वेळी नांदायच्या. अरुणाताई ढेरे यांच्याशी शान्ताबाईंनी माझी ओळख करून दिली. म्हणाल्या, ही माझी मुलगीच समजा हं. आणि माझीही ओळख करून दिली हे असे असे डॉक्टर आहेत वगैरे. जगण्याच्या या अदम्य उत्साहामुळे या प्रतिभावंताचे काम अधिक सुंदर करतो. उदाहरणार्थ- 'हा माझा मार्ग एकला'मध्ये किती सहजपणे त्या परकायाप्रवेश करतात किंवा 'तोच चंद्रमा नभात' हे गाणे असेल किंवा 'विहीणबाई विहीणबाई उठा आता' किंवा 'मनीमाऊचं बाळ किती गोरंगोरंपान' वगैरे किती उदाहरणे द्यावी! शब्द गुंफणे हा त्यांना इश्यू नव्हताच, त्यात विषयाचे किती वैविध्य होते, याची मला कमाल वाटते. समरसून आणि रसरशीतपणे जगण्याचा फार चांगला वस्तुपाठ होता शान्ताबाई म्हणजे. अशा व्यक्तींचे नाव रोज निघते तेव्हा छान वाटते. शेवटी कलाकारासाठी ही पावती महत्त्वाची वाटते. शान्ताबाईंना जाऊन आता जवळपास वीस वर्षे होतील आता. अजूनही त्यांची गाणी आणि त्यांचा उल्लेख हा सातत्याने येतो. त्यांची गाणी अजरामर आहेत, पण व्यक्ती म्हणूनही उल्लेख होणे, त्यांच्याविषयी भरभरून लिहावेसे, बोलावेसे वाटणे, तरुण पिढीला त्यांच्याविषयी कुतूहल वाटणे, यावरून त्यांच्या शब्दांची आणि व्यक्तिमत्त्वाची जादू (भुरळ) अद्याप कायम असल्याचे दिसते. त्यांची 'लोलक' नावाची एक कविता आहे. 'देवळातल्या झुंबरातून सापडलेला लोलक, हरवला माझ्या हातून. आणि दिसू लागली माणसं पुन्हा माणसांसारखी. गवत पुन्हा हिरवं दिसू लागलं आणि आकाश पुन्हा निळं' या कवितेचा शेवटचा भाग असा आहे, की 'परवा एक चिमुरडी धावत आली माझ्याकडे आणि म्हणाली, आज्जी, आकाश नसतं नुसतंच निळं आणि माणसं असतात इंद्रधनुष्याची बनलेली. माझा लोलक हिला कुठे बरं सापडला त्या देवळातल्या झुंबराला अजून असे किती लोलक आहेत कुणास ठाऊक!' मला असे वाटते, की तो 'लोलक' आयुष्यभर सांभाळून ठेवणारी व्यक्ती म्हणजे शान्ताबाई होत्या.

**- सलील कुलकर्णी**
musicdirectorsaleel@gmail.com

## ऋतुरंग प्रकाशनाची दर्जेदार पुस्तके

**नापास मुलांची गोष्ट : अरुण शेवते**

मूल्य : रु. २५०/-

**हाती ज्यांच्या शून्य होते : अरुण शेवते**

मूल्य : रु. २५०/-

**नापास मुलांचे प्रगतीपुस्तक : अरुण शेवते**

मूल्य : रु. २५०/-

**ऐवज (निवडक ऋतुरंग, १९९३ ते २००९)**

मूल्य : रु. १०००/-

**एकच मुलगी : अरुण शेवते**

मूल्य : रु. २००/-

**माझे गाव माझे जगणे : अरुण शेवते**

मूल्य : रु. ८००/-

**ते दान त्या क्षणांचे : अरुण शेवते**

मूल्य : रु. २००/-

**शर्वरीच्या कविता : अरुण शेवते**

मूल्य : रु. ६०/-

**सगेसारे : गुलज़ार । अनुवाद : किशोर मेढे**

मूल्य : रु. ४९९/-

**सर्व विक्रेत्यांकडे पुस्तके उपलब्ध.**

ऋतुरंग
प्रकाशन

**अरुण शेवते**
बी-१०२, लिंक पॅलेस, साईबाबा कॉम्प्लेक्स
गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०००६३
भ्रमणध्वनी : ९८९२४३८५७४



# मरणात खरोखर जग जगते!


**गणेश कुलकर्णी**

*बाबांच्या नसण्यापेक्षा त्यांच्या असण्याच्या खूप छान आठवणी माझ्याजवळ आहेत. शेवटच्या क्षणी मी त्यांच्याजवळ नव्हतो याची मला फार खंत वाटली नाही कारण ज्याक्षणी ते व्हेंटिलेटरवर गेले त्याचक्षणी मी पोरका झालेलो होतो. नंतरचे निव्वळ उपचारच होते, ते कुणीही केले तरी चालणार होते. खरे तर आपण सारे मृत्यूला खूपच घाबरतो. मृत्यूपेक्षा त्यानंतर घडणाऱ्या सोपस्कार-विधी यांचं खूपच दडपण आपल्यावर असतं. खूपदा लोक काय म्हणतील यापेक्षा लोकांनी काही म्हणू नये यासाठीच सगळा अट्टहास असतो. या पार्श्वभूमीवर भल्याभल्या लोकांनी मृत्यूला कसे स्वीकारलं याचा धांडोळा घेताना बरंच काही हाताशी लागत गेलं आणि मला माझं दु:ख सहन करण्याची ताकद आली.*

**कु**ठलाही माणूस जन्माला येताना अमरपट्टा घेऊन येत नाही. समर्थ रामदासांनी मृत्यूच्या विवेचनासाठी एक अख्खा समासच दासबोधामध्ये रचला आहे. सगळ्या संतांचे हे म्हणणे होतेच की द्वैताने भरलेल्या जगात जन्म आणि मृत्यू एकमेकांना सोडून राहूच शकत नाही. आपल्या अनेक संतांनी अगदी सहजच सम ाधी घेतली आहे. ज्ञानेश्वरांची संजीवन समाधी / एकनाथांची जलसमाधी किंवा मुक्ताईचे आकाशातच विरून जाणे एवढेच ठसवते की जगणे लांब असण्यापेक्षा नेमके असावे. समर्थ म्हणतात, की मृत्यू येणारच आहे. फक्त तो कधीही येईल ही जाणीव ठेवून आपण तयार राहायला हवे. शेक्सपीयर आपल्या एका सुनीतामध्ये म्हणतो, की 'परमेश्वराचा खेळ होतो आणि माणसांचा जीव जातो.' पंधराव्या शतकातील इंग्रजी कवी जॉन डोनदेखील हेच म्हणतो, Death, be not proud! याच कवितेच्या ओळीला शीर्षक बनवून जॉन गुंथरने (अमेरिकन

पत्रकार / लेखक) १९४९ साली स्वत:च्या मुलाच्या मरणाचा प्रवास विलक्षण भाषेत मांडला आहे. त्याचा मुलगा मेंदूत कर्करोगाची गाठ होऊन मरतो. त्याचा जगण्या–मरण्याचा झगडा एका अगतिक बापाच्या नजरेतून जॉन गुंथरने अप्रतिम तऱ्हेने मांडला आहे. आचार्य काका कालेलकरांनी मृत्यूला परम सखा म्हटलेले आहे. प्रसिद्ध कथाकार जीएंच्या मते माणूस जेव्हा मृत्यूला सामोरा जायला तयार होतो तेव्हाच त्याला यथासांग मरण लाभते. सानेगुरुजी म्हणतात, 'मरणामुळेच जगात प्रेम आहे.'

महर्षी कर्वे ९२ वर्षांचे होते. एके दिवशी त्यांना कुणीतरी म्हणाले, की अण्णा, तुमचा रघुनाथ गेला! तर मिश्किल अण्णा म्हणतात जन्माला येणार तो जाणारच, तसेही त्याचे वय झालेले होतेच! स्वत: अण्णा तब्बल १०४ वर्षांचे समृद्ध आयुष्य जगून गेले. त्यांच्या सूनबाई इरावती कर्वे अंथरुणात शेवटचे श्वास मोजत होत्या. सगळेच जमा झालेले. इतक्यात, दिनकररावांनी (इरावतींचे पती) इरावतींच्या नाकाजवळ तिच्या श्वासांचा अंदाज घ्यायला आपले बोट नेले. इरावती त्याही वेळी मिश्किलपणे म्हणाल्या, 'नाही रे दिनू, अजून वेळ आहे!' माझ्या एका मित्राची आई अशीच शेवटच्या घटका मोजत होती. त्याचे वडिल सैनिकी पेशातले, नको तितके ताठर. मुलगा आईच्या जवळ तिच्या शेवटच्या घटका मोजताना जरा अधिकच भावाकुल झालेला, इतक्यात त्याचे पिताजी आतून आले, हातात देवघरातील गंगेचा गडू आणि तुळशीची पानं होती. गंगेच्या पाण्याचे दोनचार थेंब त्यांनी आपल्या पत्नीच्या तोंडात टाकले, मुलगा म्हणतोय, 'नको ना बाबा, जरा थांबा की.' तर त्यांचे उत्तर 'अरे, ती गेल्यावर तिला हे पाणी कसे पाजणार?'



विनोबा भावेंचा असाच भन्नाट किस्सा आहे. त्यांची आई वारली. भाऊ शिवाजीराव आणि आढळराव दोघे बाहेरून आले तर विनोबा त्यांना म्हणतात, बरे झाले तुम्ही आलात, पटकन पिठले–भात टाकतो. मस्तपैकी गरम गरम खाऊन घेऊ. नंतर पुढच्या कार्याला लागू या. स्थितप्रज्ञ विनोबांचे वडीलदेखील त्यावेळी त्यांच्यावर भडकले होते. त्याच विनोबांनी स्वत: प्रायोपवेशन करून मृत्यूला आपलेसे केले होते. विनोबा म्हणायचे, मरणाचा रोज अभ्यास करावा आणि झोपताना जुन्या साऱ्या गोष्टी विसरून टाकाव्यात. गांधीजींना आपल्या जीवनातील पुष्कळसे आठवणीत राहिले असते तर अंतिम क्षणाला मरताना त्यांनी 'हे राम' म्हटले नसते! बुद्धदेखील म्हणतो, की मृत्यूचे सदैव स्मरण करावे. बुद्धाने आयुष्यभर ज्ञानाची लालसा ठेवली, गौतमाचा बुद्ध होण्यासाठी प्रचंड मोठा प्रवासही केला, पण मेल्यावर आपला अंत्यसंस्कार राजाप्रमाणे केला जावा ही इच्छा मात्र त्यांना का बरे वाटली असेल? न.चिं. केळकरांनी केसरीची धुरा लोकमान्य टिळकांच्या जाण्यानंतर खंबीरपणे सांभाळली. ते वारले त्या दिवशी सकाळी त्यांच्या टेबलावर मुलीला या कवितेच्या ओळी सापडल्याची आठवण आहे.

दिसो लागे मृत्यू परि न भिववू तो मज शके,
तयाच्या भेटीचे असता मजला ज्ञानाची निके ।

लोकमान्य टिळकांचा मोठा मुलगा विश्वनाथ १९०३च्या जानेवारी महिन्यात प्लेगच्या साथीत वारला तेव्हा स्वत: टिळक आपल्या परिवारासहित गावाबाहेरच्या झोपडीतच राहत होते. अथक प्रयत्न करूनही मुलगा वारला तेव्हा टिळक म्हणतात, 'माणसाने प्रयत्नापेक्षा जास्त काय करायचे असते?' दोन तीन दिवसांनी सोमवार आला. केसरीच्या अग्रलेखासाठी नेहमीचा लेखनिक दारात हजर झाला त्यावेळी त्यांचा लहान मुलगा तापाने फणफणत होता. भोवतालच्या उदास आणि सुतकी वातावरणातही टिळकांनी 'श्री मह राज होळकरांचा राजीनामा मंजूर' हा अग्रलेख नेहमीच्याच गतीने सांगितला. त्यातल्या नोंदी, दुरुस्त्या तपासल्यानंतरच ते मुलाची चौकशी करायला गेले. टिळकांचा मृत्यू मुंबईत सरदारगृहात झाला. ते मधुमेहाने आजारी होते. शेवटच्या दिवसांत ग्लानीत गेले. त्या ग्लानीतही टिळक स्वराज्याची भाषा बोलत होते. हळूहळू दिवा विझत जावा तसे टिळक शांत होत गेले. बाहेर रात्र झाली होती तरी हजारोंचा जमाव जमलेला होता. इतक्यात जिन्यावरून धावत कुणीतरी खाली आले आणि त्यांच्या तोंडातून 'गेले' इतकेच शब्द बाहेर पडले. जमावात हलकल्लोळ सुरू झाला. लोकांना आपला दु:खाचा आवेग आवरता येईना. दुसऱ्या दिवशी टिळकांच्या अंत्ययात्रेची तयारी सुरू झाली. लोकमान्य स्वत: योगी असल्यामुळे त्यांची अंत्ययात्रा खुर्चीत बसवून काढण्यात आली होती. गांधी स्वत: खांदा द्यायला पुढे झाले तर एका टिळकभक्ताने आडवा हात करून गांधींना अडवले. (कारण गांधी वैश्यवाणी होते!) गांधीही तितक्याच ठामपणे त्याचा हात बाजूला करून म्हणाले, 'देशभक्ताला कुठलीच जात नसते बरं का!' आणि अंत्ययात्रा पुढे सरकली.

प्रसिद्ध लेखक बाळ सामंत बी.ए.ला शिकताना, त्यांना मराठी शिकवायला प्रा. न.र. फाटक यायचे. त्यांचा मराठीचा वर्ग बरोबर अकराला सुरू व्हायचा. एकदा त्यांना यायला वीसएक मिनिटे उशीर झाला. वर्गात येताक्षणी त्यांनी पुस्तक बाजूला ठेवून आपले व्याख्यान सुरू केले आणि बरोबर पावणेबाराला थांबले. व्याख्यान संपताच सामंतांनी त्यांना विचारले, की तुम्हाला उशीर का झाला होता? तर ते शांतपणे म्हणाले, काही नाही सकाळीच आई वारली, तिचे सगळे आटपून यायला उशीर झाला! रामकृष्ण परमहंस मृत्युशय्येवर असताना त्यांची पत्नी शारदा रडू लागली. तेव्हा परमहंस तिला डोळे उघडून

सांगतात, की मी कुठेही जाणार नाही, जिथे आहे तिथेच राहणार आहे. तर शारदा विचारते, की तुम्ही मेल्यानंतर माझ्या बांगड्यांचे काय? परमहंस तिला ओशस्त करत म्हणतात, मी मरणारच नाही, म्हणजे तुझ्या बांगड्या फोडण्याचा प्रश्नच नाही. तू आयुष्यभर सधवा राहशील. त्या काळात बंगालमध्ये नवऱ्याच्या मृत्यूनंतर बांगड्या न फोडणारी एकमेव स्त्री म्हणजे शारदामाता!

खुशवंतसिंग मला त्यांच्या बिनधास्तपणामुळे नेहमीच आवडतात. त्यांची आई अंथरुणात शेवटचे श्वास मोजत होती. ती काहीतरी पुटपुटत होती. ती काय बोलते हे कुणालाच काही कळत नव्हते. मग खुशवंतसिंग तिच्या जवळ गेले तेव्हा त्यांना कळले की ती दारूचा शेवटचा घोट मागते आहे. त्यांनी छानपैकी आईला शेवटचा पेग वगैरे पाजला आणि त्याच्यानंतरच त्यांच्या आईने प्राण सोडला असे खुद्द लेखकानेच लिहून ठेवले आहे. बुंदू खाँ नावाचे प्रसिद्ध सारंगीवादक होते. त्यांचा तरुण मुलगा काविळीने अकालीच वारला. तो शेवटच्या घटका मोजत होता त्यावेळी खाँसाहेब आपला नित्याचा रियाज करत बसले होते. इतक्यात लोक सांगायला आले की मुलाचे प्राणोत्क्रमण झाले आहे, तेव्हा खाँसाहेब म्हणाले, 'जेवढे प्रयत्न करायचे होते ते तर करून झाले, अल्लाच्या मर्जीपुढे आपले काय चालणार? तुम्ही पुढची तयारी करून घ्या. मी हा नव्याने जमलेला पलटा शंभर वेळा वाजवतो आणि खाली उतरतो.'




प्रख्यात लेखक वि.द. घाटे एकदा म्हणाले होते की ज्या क्षणी डोळ्यांमुळे माझे वाचन बंद झाले त्या क्षणीच मी खरे तर मेलो होतो. एकदा ते मित्रांबरोबर कुठूनतरी फिरून येत होते. इतक्यात त्यांना रातराणीचा सुंगध आला. त्यांनी उत्सुकतेने आपण कुठे आहोत हे विचारले. तेव्हा मित्र म्हणाले, स्मशानाच्या वाटेवर. त्यांनी गाडी थांबवायला सांगितली. म्हणाले, चला जरा आतून फेरफटका मारून येऊ. मित्र जरासे अचंबित. तर वि.द. म्हणतात अरे, मी जेथून महाप्रवासाला निघणार आहे ती जागा मला जागेपणी डोळे भरून बघू द्या की. इतका कृतार्थ क्षण प्रत्येकाच्या आयुष्यात असतो की नाही माहीत नाही.

तुकोबाला न्यायला पुष्पक विमान आले होते म्हणतात- तुकारामाच्या मरणाचा सोहळाच झाला होता. 'आपुले मरण पाहिले म्यां डोळा । तो झाला सोहळा अनुपम ।' असे तुकोबा म्हणतात आणि हे बघायला अवघा जनसागर लोटला होता. पण आपण सारी सामान्य माणसे हे आपल्याला अशक्यच. महम्मद पैगंबर म्हणतात, 'मरण्यापूर्वी एकदा मरा.' बुनात नावाचा जर्मन तत्त्वज्ञ म्हणतो, 'while living, be a dead one!' सॉक्रेटिसला त्याच्या शिष्यानेच विषाचा प्याला दिला. सगळ्यांचा नीट निरोप घेऊन त्याने अगदी धीराने विषाचा प्याला जवळ केला. मृत्यूला सामोरे जाताना शेवटच्या क्षणांचे वर्णनही केले. महान शिल्पकार मायकेलअँजेलो म्हणतो, 'माझ्या सर्व विचारांवर मृत्यूची छाया पडलेली आहे.' मृत्यू हे प्रारब्ध मानले तर मृत्यूची भीती वाटण्याचे काहीच कारण नाही, असे जर्मन तत्त्वज्ञ हायडेगर म्हणतो. हायडेगर असेही म्हणतो, की मृत्यूचे भय टाळण्यासाठी माणसे ईश्वरभक्ती करतात. नित्शेने पुकारा केला होता, 'God is dead!' नित्शे असेही म्हणतो, की 'काही व्यक्ती उशिरा मरतात, काही फार लवकर मरतात. योग्य वेळी मरा!' आयुष्यभर परमेश्वराला रिटायर करा म्हणणाऱ्या डॉ. लागूंच्या मुलाचा रेल्वेतून प्रवास करताना बाहेरून कुणीतरी दगड मारल्यामुळे जागीच मृत्यू झाला, तेव्हा डॉ. लागू म्हणतात, की इतका अचूक आणि नेमका दगड केवळ परमेशरच मारू शकतो! ग्रीक लेखक झांतकीस म्हणतो, 'मृत्यू हा मिठासारखा आहे. त्यामुळे आयुष्याला एक वेगळी चव येते.' प्रसिद्ध ग्रीक तत्त्वज्ञ प्लेटो म्हणतो, 'तत्त्वज्ञान म्हणजे मृत्यू व अंतकाल यांचा सूक्ष्म अभ्यासच! आयुष्यभर बायकोने छळलेल्या प्लेटोला काहीतरी विचारण्यासाठी त्याचा एक शिष्य धावत धावत आला. तेव्हा प्लेटो मरणाच्या दारात होता. प्लेटोची अवस्था त्याला बघवेना. तेव्हा प्लेटोच त्याला म्हणाला, 'काय झाले, काही प्रश्न पडला आहे का?' तेव्हा भीत भीत त्याने विचारले, मी लग्न करू का? त्याही अवस्थेत मिश्किल प्लेटो त्याला म्हणाला, 'खुशाल कर. चांगली बायको मिळाली तर छानपैकी संसारी आयुष्य जगशील. माझ्यासारखी मिळाली तर तत्त्वज्ञ होशील, नुकसान काहीच नाही !' एके ठिकाणी एक व्यंगचित्र बघायला मिळाले होते. गोल्फचा नामांकित खेळाडू समोरून मेलेल्या माणसाला घेऊन जाणाऱ्यांची रांग बघून जरासा थबकला. परदेशात अशावेळी काळ्या कार, काळे कपडे असा सगळा जामानिमा असतो. सगळी रांग पुढे सरकल्यावर सोबतचा मित्र त्याला विचारतो, माणसं स्वत:च्या मरणाला घाबरतात पण दुसऱ्याचं मरण मात्र चवीने, आवडीने बघतात. पूर्वी भररस्त्यात फाशी दिली जायची, गुन्हेगारांचा वध केला जायचा, दगडांनी ठेचून मारण्याची शिक्षा दिली जायची, तेव्हा ते बघायला सगळेच सामील व्हायचे. लोकांना खुनाच्या कादंबऱ्या, त्यावर आधारित रहस्यकथा वाचायला नेहमीच आवडते. रहस्यकथा वाचनाने वाचनाचा वेग

वाढला असे सांगणारे बरेच प्रथितयश लेखकही आहेत. मरणाला जसे घाबरणारेही आहेत तसेच धीराने सामोरे जाणारेही आहेत. मृत्यूची चाहूल काही माणसांना आगळेवेगळे धैर्य देते. ती माणसे प्रत्येकवेळी असामान्यच असतात असे नव्हे, तर तुमच्या आमच्यासारखी साधीच असतात. तू खेळताना इतका एकाग्र असतोस की कधीच थांबत नाहीस. मग आज का बरं थबकलास? तो शांतपणे इतकेच उत्तर देतो, की स्वत:च्या बायकोसाठी इतके तरी करायलाच हवे ना!

कॉलेजच्या दिवसांत संध्याकाळी मी एका लायब्ररीत काम करायचो. त्यानिमित्ताने पुस्तकं वाचायला मिळायची. तर समोरच्या कंपाऊंडमध्ये वेळीअवेळी आगीचे लोळ उठताना दिसायचे. मी आश्चर्याने बघायचो, बऱ्याचदा दुर्लक्षही करायचो. कुणाला विचारायची सोय नव्हती. एकदा धीर करून मालकांना मी आगीचे कारण विचारले. ते शांतपणे म्हणाले, 'अरे, समोर स्मशान आहे. प्रेतं जळतात, त्याची आग दिसते.' तेव्हा पहिल्यांदा मला मरणाची भीती वाटली होती. प्रेत जळताना तोपर्यंत कधी प्रत्यक्ष बघितलेले नव्हते. आमचे बाबा अनेकांच्या अंत्यसंस्काराला जायचे, अगदी वेळी-अवेळी जायचे. हे बघतच मोठे झालो. पण प्रत्यक्षात त्याचा अनुभव यायला बराच काळ जावा लागला. आम्ही नुकतीच वाराणसीला भेट दिली होती. तिथे 'मणिकर्णिका' नावाच्या घाटावर दिवसाचे चोवीस तास प्रेते जळत असतात असे कळले. लोक आवर्जून भेट देतात, मी गेलो. तेव्हा गंगेच्या किनाऱ्यावर संध्याकाळी तब्बल १२-१३ चिता भडकलेल्या होत्या. नंतर नोकरीत मृत्यूशी जवळचा संबंध येत गेला. रेल्वेअपघातात जीव गमावणारे, देणारे यांना बघत बघत मृत्यूचे भय कमी होत गेले. एकदा रात्रीची संपर्क क्रांती घेऊन निघालो. गोव्याहून चंदिगडला जाणाऱ्या संपर्क क्रांतीला राज्याप्रमाणे थांबे असतात. वसईहून गाडी सुटली की सरळ वडोदऱ्याला जाऊन थांबते. सुरतला प्लॅटफॉर्मवर माझ्यापुढे गाडी होती म्हणून माझी गाडी बाहेरच्या सिग्नलला थांबली होती. इतक्यात मागच्या डब्यातून दोन तरुण धावत पळत माझ्याकडे आले, म्हणाले लवकर चला. आमच्यातल्या एकाला हृदयविकाराचा झटका आला आहे, रेल्वेतल्या आपत्कालीन व्यवस्थेशी बोलणे झाले आहे. आपली गाडी सुरतला थांबणार आहे. मी वॉकी टॉकीवर स्टेशनमास्तरकडे खात्री केली. यानेही दुजोरा दिला. गाडी सिग्नलला थांबली होती. रात्रभर गाडी चालवत होतो. बारा वाजत आलेले. मागची माणसे चला, चला म्हणून तगादा करायला लागली. लाल सिग्नल ओलांडून मी जाऊ शकत नाही हे त्यांना सांगण्याचा निष्फळ प्रयत्न केला, पण त्यांचा धीर खचला होता, ते सगळे भेदरलेले होते. इतक्यात सिग्नल मिळाला. स्टेशनवर पोचता पोचता मुलांनी चेन पुलिंग केल्यामुळे मी थांबवायच्या अगोदरच गाडी थांबली. गाडीतून मुलाचे प्रेतच बाहेर पडले. सगळे रडायला, भेकायला लागले. रुग्णवाहिका तयारच होती. मुले माझ्याकडे रागाने बघत होती असे मला उगाचच जाणवले, पण मी व्यवस्थेला बांधील होतो. अशावेळी तुमची संवेदनशीलता काही उपयोगाची नसते. त्याहीवेळी पहिला विचार मनात हाच आला की बरे झाले गाडी थांबली. चहा घ्यायला वेळ मिळाला. नंतर या विचाराची लाजही वाटली होती. सुरतच्या पुढे 'उतराण' स्टेशनच्या अलिकडे मी तापी नदी ओलांडतो त्याच्या किनाऱ्यावर डाव्या बाजूला बरीच धुरांडी दिसतात. सुरुवातीला लक्षात नाही आले, नंतर कळले की तिथे स्मशान आहे. मग उगाचच किती धुरांडीतून धूर बाहेर पडतोय म्हणजे किती जण गेले ते मोजण्याचा चाळा लागला होता. या कोरोनाकाळातही स्मशानातून येणारा धूर वाढला आहे. ठाणे, पुणे, मुंबई येथे स्मशानाशेजारी राहणारे तक्रार करताना दिसत आहेत. 'शिंडलर्स लिस्ट' या चित्रपटात नाझी छळछावणीत अनेक माणसे गॅस चेंबरमध्ये मारल्यावर जाळली जायची. त्यातून उठणाऱ्या धूर-राखेने सारे शहर काळवंडलेले बघताना शिंडलरची तडफड आपल्याला करुण करून टाकते. असे काहीतरी उगाचच पुढच्या प्रवासात मग आठवत राहते.

**माणसं स्वत:च्या मरणाला घाबरतात पण दुसऱ्याचं मरण मात्र चवीने, आवडीने बघतात. पूर्वी भररस्त्यात फाशी दिली जायची, गुन्हेगारांचा वध केला जायचा, दगडांनी ठेचून मारण्याची शिक्षा दिली जायची, तेव्हा ते बघायला सगळेच सामील व्हायचे. लोकांना खुनाच्या कादंबऱ्या, त्यावर आधारित रहस्यकथा वाचायला नेहमीच आवडते. रहस्यकथा वाचनाने वाचनाचा वेग वाढला असे सांगणारे बरेच प्रथितयश लेखकही आहेत. मरणाला जसे घाबरणारेही आहेत तसेच धीराने सामोरे जाणारेही आहेत. मृत्यूची चाहूल काही माणसांना आगळेवेगळे धैर्य देते. ती माणसे प्रत्येकवेळी असामान्यच असतात असे नव्हे, तर तुमच्या आमच्यासारखी साधीच असतात.**

विश्वनाथ घोष नावाच्या कोलकात्याच्या लेखकाचे 'एमलेस बनारस' नावाचे पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले आहे. कोरोनाची चर्चा सुरू झाली त्याच्या काही दिवस आधी हे पुस्तक प्रकाशित झाले आहे. यात लेखकाच्या आईचे अंत्यसंस्कार ज्या गंगेच्या घाटावर पार पडले तेथे भटकताना अचानक लेखक वाराणसीतच अडकला आहे. वडील एकटेच दूर कुठेतरी आहेत. त्यांना काही झाले तर त्यांच्याजवळ कुणी जाऊ शकत नाही, त्यांचे अंत्यसंस्कार पार पाडू शकत नाही. ते होतील किंवा नाही? किंबहुना शेजारी कशासाठी ते करतील, याची भीती लेखकाला सतत वाटते आणि तो म्हणतो की 'हे खरे तर मरणाचेही दिवस नाहीत!' आपले कुणीतरी जवळचे सुहृद कोरोनामुळे वारले तर त्याच्या मयताला आपणच हात लावू शकणार नाही, हे फारच करुण आहे. आपण कोरोनामुळे अगतिक झालो आहोत. स्वार्थी झालो आहोत. मी, माझे, मला यापलीकडे आपल्याला जग माहीत नाही!

माणसे स्वत:च्या मरणाला घाबरतात पण दुसऱ्याचं मरण मात्र चवीने, आवडीने बघतात. पूर्वी भररस्त्यात फाशी दिली जायची, गुन्हेगारांचा वध केला जायचा, दगडांनी ठेचून मारण्याची शिक्षा दिली जायची, तेव्हा ते बघायला सगळेच सामील व्हायचे. लोकांना खुनाच्या कादंबऱ्या, त्यावर आधारित रहस्यकथा वाचायला नेहमीच आवडते. रहस्यकथा वाचनाने वाचनाचा वेग वाढला असे सांगणारे बरेच प्रथितयश लेखकही आहेत. मरणाला जसे घाबरणारेही आहेत

तसेच धीराने सामोरे जाणारेही आहेत. मृत्यूची चाहूल काही माणसांना आगळेवेगळे धैर्य देते. ती माणसे प्रत्येकवेळी असामान्यच असतात असे नव्हे, तर तुमच्या आमच्यासारखी साधीच असतात.

आमच्या एका लेखक मित्राची मावशी शेवटच्या दिवसांत कॅन्सरने आजारी होती. तिला कळले होते, आपण जाणार आहोत. तिने ठरवून औषध आणि अन्नत्याग केला व मोठ्या धीराने मृत्यूला सामोरी गेली. हे धैर्य कुठून येते? डोंबिवलीतले प्रख्यात दंतवैद्य डॉ. प्रल्हाद देशपांडेंच्या वडिलांचा इंग्रजीचा व्यासंग जबरदस्तच होता. वयानुसार ते वारले तेव्हा त्यांच्या बंगल्याच्या आवारातील एकाही कणामध्ये दु:खाचा जराही लवलेश दिसत नव्हता. दुसऱ्या दिवशी देखील प्रत्येक जण आपापली कामे बिनबोभाट करताना दिसत होता. असाच अनुभव मी अनेकांचा बघत होतो. आमच्या एका डॉक्टर मित्राला मी माझ्या वडिलांच्या ऑपरेशनबद्दल गंभीर होऊन सांगत होतो. सगळं ऐकून झाल्यावर ते शांतपणे इतकेच म्हणाले, की आताच वडिलांचा दहावा करून घरी परततोय. हे ऐकून मला माझ्याच दु:खाची लाज वाटून गेली.

*या जगाच्या वेदनेचे दाखले देतो कशाला?*
*दु:ख माझे एवढेसे मी तुला सांगू कशाला?*

असे काहीतरी वाटत राहिले.

या पार्श्वभूमीवर काही माणसे, मला बाबा गेल्यावर भेटले, तर त्यांना विटाळ होईल म्हणून भेटण्याचे टाळत होते. काही जरा अधिकच जवळीकही दाखवत होते. माझ्यावर सहानुभूतीचा मारा करत होते. आम्ही शांतपणे सगळ्याला सामोरे जातोय म्हटल्यावर त्यांचे आमच्यातले आकर्षणच संपून जायचं. एका मित्राची आई नुकतीच वारली होती. काही कामानिमित्त फोन केल्यावर मला कळले. नंतर मी माझ्या कामात गढून गेलो. दोन दिवसांनी त्याचा फोन आला. म्हणाला, मला भेटायला नाही आलास? मी न जाण्याचे काही समर्थन करू शकलो नाही. तोच माझे वडील गेल्यावर मला भेटण्यासाठी यायला निघाला, तेव्हा मी माझ्या नोकरीवर दुसऱ्याच दिवसापासून रुजू झालोय, हे कळल्यावर अचंबितही झाला होता!

**आमच्या एका मित्राने एका परदेशी अभ्यागताचे स्वागत चाफ्याच्या माळेने केले, तर भोवतालातले सगळेच चमकले होते. कारण इतक्या सुंदर फुलांची गाठ परंपरेने उगाचच मरणाशी जोडली गेली आहे. परदेशात मात्र चाफ्याच्या फुलांची माळ गळ्यात घालून मिरवणारी मंडळी जागोजाग दिसतात. तेव्हा ज्याने कोणी रसिकपणे त्या स्मशानभूमीत तो चाफा लावला आहे त्याचे मला कौतुक वाटल्याशिवाय राहत नाही. माणूस जाणारा जातोच, पण अशा फुलणाऱ्या फुलाच्या आठवणीने आपले अस्तित्व मागे ठेवून जातो हे फारच विलक्षण आहे!**

दीनानाथ दलाल आणि जयवंत दळवींचे मैत्र फारच जिवाभावाचे. दलालांच्या जाण्याने दळवी मुळापासून हादरले. बरेच दिवस सावरत नव्हते तेव्हा त्यांचे मित्र त्यांना म्हणाले, अरे, दलाल गेलेत कुठे, तुला त्यांच्याशी बोलता येईलच की, फक्त त्यांचा प्रतिसाद नाही मिळणार इतकेच. ते गेलेत म्हणजे निव्वळ या भिंतीच्या पलिकडे दुसऱ्या खोलीत गेलेत असे समज. हा जो विवेक आहे तो प्रत्येकाने आपल्या आत जागा ठेवायला हवा. आपण भारतीय एकंदर दु:खाचे काय, सुखाचे काय. प्रदर्शन करायला नेहमीच सोकावलेलो असतो. बिमल रॉयच्या जुन्या देवदास चित्रपटामध्ये दिलीपकुमारच्या वडिलांचा मृत्यू झाल्यानंतरचा एक अप्रतिम सीन आहे. सगळीकडे दु:खाचे वातावरण आहे. इतक्यात एक दूरचा नातेवाईक बाहेरूनच रडतओरडत आत शिरतो. दिलीपकुमार शांतपणे बसलेला असतो. बाजूला मोठा भाऊ आसवे गाळतोय. हा नातेवाईक रडत रडत दिलीपकुमारजवळ जातो. तेव्हा दिलीपकुमार फक्त हाताच्या इशाऱ्याने त्याला भावाकडे जायला सांगतो. शरत्‌चंद्र चॅटर्जींनी माणसाच्या वृत्तीतला हा प्रदर्शन करण्याचा हव्यास जितक्या अचूकपणे कादंबरीत लिहिला आहे, तितक्याच नेमकेपणाने दिग्दर्शक आणि नटाने तो प्रसंग पडद्यावर साकारला आहे. 'वॉर ॲण्ड पीस' या अमेरिकन यादवी युद्धावरच्या चित्रपटात नायिकेच्या नवऱ्याला युद्धभूमीवर वीरमरण आले आहे. सगळे गाव तिच्या दु:खाने दु:खात लोटले आहे. इतक्यात सैनिकांसाठी, युद्धावर पाठवण्यासाठी निधी गोळा करण्याची टूम निघते. देशासाठी असे काहीतरी करायला मिळते म्हटल्यावर सगळेच पुढे येतात. गावातल्या मुलीबरोबर नृत्य करायला बोली लागते. सर्वात जास्त बोली हीरो लावतो, तीही नायिकेवर! सगळे गाव चमकते. नायिका आता काय उत्तर देणार यावर गावाला देणगी मिळण्याचा मार्ग मोकळा होणार असतो. काळ्या गाऊनमधली दु:खी नायिका म्हणते, देशसेवेसाठी मी माझे स्वत:चे दु:ख बाजूला ठेवायला तयार आहे. हे सांगताना तिच्या डोळ्यांतली नायकाबद्दलची असोशी आपल्याला जितके हळवे करून टाकते, त्यापेक्षा जास्त सगळ्या गावाने टाकलेला नि:श्वास आपल्याला वास्तवाची जाणीव करून देतो. नुकताच आलेल्या 'आयरीश मॅन' या चित्रपटात शेवटी एकाकी झालेला रॉबर्ट डी निरो आपल्या मरणाची तयारी शांतपणे करताना दिसतो. अगदी शवपेटीचा रंग, त्यावर कोरल्या जाणाऱ्या अक्षरांचा फॉंट सगळे तो स्वत: ठरवताना दिसतो. समाजातील अनेक व्यक्तींना आपला मृत्यू वैशिष्ट्यपूर्ण असावा असे वाटते. ख्यातनाम कीर्तनकार निजामपूरकर बुवा एकदा म्हणाले होते, की वीराला युद्धातच मरण यावे तसे कीर्तनकाराला कीर्तन करतानाच मरण यावे. सुदैवाने त्यांना तसेच मरण लाभले होते. बाजीप्रभू देशपांडेला वीरमरण आले होते.

ईश्वराची किंवा मृत्यूची वाट न पाहता आत्महत्या करणाऱ्या स्टीफन झ्वाईग, हेमिंग्वे, रशियन कवी मायकोव्हस्की, कवी हॅरी क्रॉस्बी, थोर चित्रपट दिग्दर्शक गुरुदत्त, सानेगुरुजी या भिन्न भिन्न क्षेत्रातील व्यक्तींची आत्महत्या म्हणजे एक प्रकारचे उदात्त मरणच अशी एक साधारण समाजमान्यता आहे. थोर चित्रकार व्हॅन गॉगनेदेखील आत्महत्याच केली होती. त्या काळातील एका फ्रेंच कथेतला चित्रकार त्याने पाहिलेल्या सुंदर स्त्रीचे पेंटिंग तब्बल दहा वर्षे काढण्याचा प्रयत्न करतोय, पण जे पाहिले ते कागदावर उतरतच नाही, असे म्हणत

एका क्षणी नैराश्याने घेरला जाऊन आत्महत्या करतो! नेपोलियनचा ट्रॅफल्गारच्या लढाईत दारुण पराभव करणाऱ्या ॲडमिरल नेल्सनला युद्धभूमीवर वीरोचित मरण आले पण जग जिंकण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या नेपोलियनला सेंट हेलेना येथील तुरुंगात खितपत पडावे लागले आणि मानहानीचे जिणे जगावे लागून तेथेच त्याचा मृत्यूही झाला. मेल्यावर त्याच्या अंत्ययात्रेला म्हणे तुरुंगातील अधिकारी आणि फुटकळ नोकरवर्ग एवढेच उपस्थित होते. नेपोलियनला हरवणारा नेल्सन खालच्या पदावरून स्वत:च्या कर्तृत्वाने ॲडमिरल पदावर पोचला होता. एकदा भरयुद्धाच्या धामधुमीत नेल्सनला त्याचे सगळे सहकारी डेकवर न जाण्यासाठी सुचवत होते, पण हा आपली सगळी पदके वगैरे लावून युद्धातल्या सैनिकांना धीर देण्यासाठी डेकवर पोचला. अक्षरश: पंधरा फुटांवरून शत्रू सैनिकाने ॲडमिरलच्या छातीवर गोळी झाडली. कोसळलेल्या ॲडमिरल नेल्सनला स्ट्रेचरवरून खाली आणत होते, तेव्हा शेजारी कठडे म्हणून बांधलेल्या दोरांवर त्याची सहज नजर गेली. त्याने त्याही अवस्थेत आपल्या सहकाऱ्यांना सूचना केली, की दोर जरा बदलून घ्यायला हवेत, खराब होत आलेत बरं का! रँडी पॉश नावाच्या अमेरिकन प्राध्यापकाचे 'द लास्ट लेक्चर' नावाचे पुस्तक प्रसिद्धच आहे. त्याला स्वादुपिंडाचा कर्करोग झाला होता. तो म्हणतो, 'प्रत्येकाने आपले काम करताना त्यातनं आनंद मिळवायला हवा. सतत नव्यानं जगायला हवं. कारण ते आपल्यापासून कधी हिरावलं जाईल याचा नेम नाही.' तो पुढे म्हणतो, बरे झाले, मला या कर्करोगाने ग्रासले. जर मी एखाद्या बसने उडवला गेलो असतो आणि मेलो असतो तर मला माझे आयुष्य हवे तसे जगण्याची संधी कशी मिळाली असती आणि मुख्य म्हणजे या सगळ्या प्रवासामुळे माझ्या नातेवाईकांकडूनही मला माझ्या मृत्यूची तयारी करून घेता आली!

आपले माणूस जाते त्याचे दु:ख असतेच पण ते आपण कसे सहन करतो, पचवतो, यावर आपली समृद्धता दिसून येते. माणसे एकवेळ सुखाचा प्रसंग टाळतील, पण दु:खात मात्र नक्की सहभागी होतात. लोकांना याचे खूप अप्रूपदेखील असते. विश्वनाथ नरवणे नावाचे पुण्यातले विख्यात लेखक होते. त्यांनी १६ भाषांचा शब्दकोष तयार केला होता. त्याला राष्ट्रपती पुरस्कारही प्राप्त झालेला होता. त्यांच्या वडिलांनी पु.लं.ना शिकवले होते. त्यामुळे वडील गेल्यावर पुलंनी आपल्याला दोन ओळीचे पत्रदेखील नाही पाठवले, याचा सल त्यांनी कैक वर्षे मनात जपला होता. खरे तर अशावेळी आपण जाऊन नक्की काय करायचे? हा माझा नेहमीच गोंधळ असतो. पण आमचे एक बुजुर्ग मित्र मला नेहमी सुचवतात, की अशावेळी नुसते जाऊन तरी नक्की यायचं. भले त्याच्याशी आपण बोलू किंवा नाही बोलू पण, तेथे नक्की जायला हवे. कोरोनाकाळात हेही अशक्य झालं! परवा पुण्याचे प्रसिद्ध चित्रकार रवी परांजपे यांची सख्खी बहीण वारली तेव्हा त्यांना इच्छा असूनही जाता नाही आले. प्रसिद्ध लेखक रत्नाकर मतकरी वारले तर त्यांची अंत्ययात्रा काढण्यासाठी बरेच सव्यापसव्य करावे लागले होते. आजकाल कुणाला भेटायचे नाही आणि कुणाला भेटायला येऊही द्यायचं नाही, हाच परिपाठ पाळला जातोय. आपल्या सगळ्या संकल्पनांना हादरा बसतोय. आमचे एक मित्र मला सांगत होते की त्यांचे वडील गेल्यावर जी माणसे त्यांना भेटायला नाही आली, त्यांना यांनी ठरवून आपल्या मुलीच्या लग्नाला बोलावले नाही! आज कोरोनामुळे समाजातही याबद्दल बरेच भान आल्यामुळे मेल्यानंतर भेटायला जाणे किंवा त्यानंतरचे विधी यावर नकळतच बंधने आली आहेत. त्यामुळे गरिबांच्या पैशांची बचतही होऊ लागली आहे असेही एक निरीक्षण त्याच मित्राने माझ्याजवळ नोंदवले आहे.

लोकलने मुंबईकडे जाताना भायखळ्यानंतर उजव्या हाताला ख्रिश्चन स्मशानभूमी दिसते. तेथे मधल्या एका थडग्यापाशी भरउन्हात एकाकी 'खूर चाफा' आपल्या संपूर्ण ताकदीनिशी फुललेला दिसतो. खूर चाफयाला 'टेंपल ट्री'देखील म्हणतात. कोकणात या फुलांच्या माळा प्रेतावर घालण्यासाठी सर्रास वापरतात. याला भर उन्हात निष्पर्ण असतानाच फुलोरा येतो. आमच्या एका मित्राने रोटरीचे अध्यक्षपद सांभाळताना एका परदेशी अभ्यागताचे स्वागत या चाफ्याच्या माळेने केले, तर भोवतालातले सगळेच चमकले होते. कारण इतक्या सुंदर फुलांची गाठ परंपरेने उगाचच मरणाशी जोडली गेली आहे. परदेशात मात्र चाफ्याच्या फुलांची माळ गळ्यात घालून मिरवणारी मंडळी जागोजाग दिसतात. तेव्हा ज्याने कोणी रसिकपणे त्या स्मशानभूमीत तो चाफा लावला आहे त्याचे मला कौतुक वाटल्याशिवाय राहत नाही. माणूस जाणारा जातोच, पण अशा फुलणाऱ्या फुलाच्या आठवणीने आपले अस्तित्व मागे ठेवून जातो हे फारच विलक्षण आहे!

गरुडपुराणात माणसाने आपल्या नातेवाईकाचा मृत्यू झाल्यावर काय काय करावे याची मोठी यादी दिलेली आहे. गोदान, अन्नदानापासून अनेक गोष्टी त्यात अंतर्भूत आहेत. पण सर्वात शेवटी असेही म्हटले आहे, की ज्याची हे करण्याची ऐपत नाही त्याने मोकळ्या माळरानावर जाऊन आपल्या सुहृदाच्या नावाने जोरजोरात बोबांटा मारून आले तरी त्याला मोक्ष मिळेल. शेवटी सगळा झगडा आपल्या मनातच असतो. आपण सगळी पुनर्जन्म मानणारी मंडळी. आपण उगाचच घाबरतो की मेलेल्याला मुक्ती नाही मिळाली तर तो आपल्या मानगुटीवर येऊन बसेल वगैरे. प्रत्यक्षात तसे काही नसते. प्रसिद्ध विज्ञानवादी लेखक थोरोला मरणाच्या दारात असताना त्याचा मित्र म्हणाला की, आता तू पैलतीरी निघाला आहेस, त्या अज्ञाताच्या जगाच्या प्रवासाला निघताना तरी तू परमेशराची करुणा भाक. तेव्हा थोरो म्हणाला, 'One world at a time', एका वेळी एकच जग! आपल्याला हे कधी साध्य होईल!

**– गणेश मनोहर कुलकर्णी**
भ्रमणध्वनी : ९८१९९५७८५२
magnakul@rediffmail.com
magna169@gmail.com

# मग खुशाल हासत ये मरणा...

**झो** डॅक्सिन या चिनी लेखकाचे 'द स्काय गेट्स डार्क सून' हे पुस्तक अलीकडेच प्रकाशित झाले आहे. चीनच्या झपाट्याने वृद्धत्वाकडे चाललेल्या लोकसंख्येतील वृद्ध आणि त्यांच्या गुंतागुंतीच्या भावनिक व्यवहारांचा अगदी तरल पातळीवरील धांडोळा या पुस्तकात घेतलेला आहे. तो लिहितो, ...अनेक वृद्ध असे काही बोलत असतात, की जणू त्यांना सगळे काही माहिती आहे. प्रत्यक्षात लहान मुलाला जेवढी माहिती असेल तेवढीच माहिती त्यांना त्यांच्या वृद्धत्वाविषयी असते. वास्तविक पाहता वृद्धत्वाकडे झुकताना पुढे काय वाढून ठेवले आहे याबाबत ते पूर्ण अनभिज्ञ असतात. वयाची साठी ते मृत्यू या काळात आपल्याला कशाला तोंड द्यावे लागणार आहे हे लक्षात घेऊन तयारी केलेली असल्यास कसलेच भय बाळगण्याचे कारण नसते! म्हणून त्याने वृद्धांसाठी काही सूक्ते सांगितली आहेत आणि सोशल मीडियावर ती फैलावत आहेत! झो डॅक्सिन याची ही सूक्ते शब्द रुची दिवाळी अंकाच्या वाचकासाठी अनंत भट यांनी अनुवादित करून पाठवली आहेत. झो डॅक्सिन म्हणतो -

१. तुमच्या निकटवर्तीयांची संख्या फक्त कमीच होत जाईल. माता-पित्यांच्या आणि आजोळच्या पिढीतील बहुतेक लोक जग सोडून गेलेले असतील, अनेक मित्रांना स्वत:कडे लक्ष देणे अवघड होत चालले असेल, आणि तरुण पिढी तिच्या स्वत:च्या आयुष्यात मग्न असेल. कदाचित तुमची पत्नी किंवा पती तुमच्या अपेक्षेपेक्षा आधीच जग सोडून गेले असेल, आणि नंतर आयुष्यात राहील फक्त एक पोकळी. एकट्याने जगायची सवय करून घ्यावी लागेल, एकटेपणालाच साथीदार मानून आनंद मिळवावा लागेल.

२. समाजाला तुमच्याविषयी वाटणारी काळजी कमी कमी होत जाईल. तुमची आधीची कारकीर्द भले कितीही गौरवशाली असो किंवा तुम्ही कितीही प्रसिद्ध असलात तरी वय वाढले की तुम्हीसुद्धा एखाद्या सामान्य वृद्ध माणसाप्रमाणेच होणार आहात. तुमच्यावरचा तो प्रसिद्धीचा झोत आता बाजूला जाऊन तुम्हाला एका कोपऱ्यात शांतपणे उभे राहण्याची सवय करून घ्यावी लागेल. लोक तुमच्याबद्दल काय बोलतात, तुमच्याकडे कसे पाहतात हे समजून घ्यावे लागेल, आणि एखाद्याचा हेवा करण्याची, काहीतरी बडबड करण्याची उबळ दाबून ठेवावी लागेल.

३. पुढचा मार्ग खडतर आणि अनिश्चित असणार आहे. अस्थिभंग, रक्तातील गुठळ्या, पक्षाघात, कर्करोग...असे पाहुणे केव्हाही भेट देऊ शकतात, आणि तुम्ही त्यांना थांबवू शकणार नाही. आजारपणे आणि दुखणी यांच्यासोबत त्यांना मित्र मानून राहावे लागेल. त्यामुळे अगदी त्रासविरहित, स्थिर आणि शांत आयुष्य जगण्याची स्वप्नेसुद्धा पाहू नयेत. नेहमी सकारात्मक दृष्टिकोन मग खुशाल हासत ये मरणा... ठेवणे, योग्य आणि पुरेसा व्यायाम घेणे हे तुमचे कर्तव्य असेल, आणि तुम्हाला त्याबाबत स्वत:ला कायम जागरूक ठेवावे लागेल.

४. पुन्हा एकदा लहान बाळाप्रमाणे अंथरुणातच राहायची तयारी करा. आपल्या मातेने आपल्याला अंथरुणातच जन्म दिला. अनेक वळणावळणांचे आणि संघर्षमय आयुष्य पार करून, जिथे आपल्याकडे दुसऱ्या कोणाला तरी लक्ष द्यावे लागते अशा त्या सुरुवातीच्या बिंदूकडे, म्हणजे पुन्हा शय्येकडेच आपण जात असतो. फरक इतकाच की तेव्हा आपली आई आपल्याकडे लक्ष देत होती आणि आपण हे जग सोडून जाऊ तेव्हा आपल्यासोबत जवळचे कोणी असेलच असे नाही. अगदी जवळचा कोणी असेल तरीही तो आपल्या आईसारखी काळजी घेऊ शकणारच नाही. असेही होऊ शकते की तुमच्याशी काहीही नाते नसलेल्या नर्स त्यांच्या मनातील कंटाळा आणि थकवा बाजूला ठेवून सुहास्य वदनाने तुमची सेवा करतील. त्यांना त्रास न देता शांत राहून त्यांच्याविषयी कृतज्ञ राहा.

५. अनेक धूर्त आणि लबाड लोकांशी तुमची गाठ पडेल. त्यातील अनेकांना, वृद्धांनी खूप बचत करून पैसा साठवलेला आहे हे माहीत असते. असे लोक तुम्हाला फसवणारे फोन, मेसेज, मेल करतील. खाण्यापिण्याच्या प्रकारांचे नमुने पाठवतील. आयुष्य वाढवण्याचे, झटपट ज्ञान मिळवायचे, श्रीमंत होण्याचे मार्ग सांगतील. थोडक्यात, त्यांचे लक्ष मात्र तुमच्या पैशांवरच असेल. अशा वेळेस सावधानता बाळगून तुमचा पैसा काळजीपूर्वक सांभाळून ठेवा. मूर्ख माणूस त्याच्या पैशाला लवकरच पारखा होतो हे लक्षात घेऊन पै न् पै शहाणपणाने खर्च करा.

सगळे अंधारून आल्यावर आयुष्याच्या प्रवासातील शेवटचे टप्पे अधिकाधिक अस्पष्ट होऊ लागतील. साहजिकच पुढचा मार्ग दिसणे आणि पुढचा प्रवास करणे देखील कठीण होऊ लागेल. साठी ओलांडल्यानंतर आयुष्य जसे आहे तसे स्वीकारून त्याचा शक्य तेवढा आनंद घ्यावा. समाजाचे प्रश्न, मुले, नातवंडांची प्रकरणे स्वत:वर ओढवून घेऊ नयेत. वय जास्त आहे म्हणून स्वत:ला श्रेष्ठ न समजता नम्र राहायला शिका, कारण त्याचा त्रास तुम्हाला आणि इतरांनाही होऊ शकतो. जसे वय वाढत जाईल तसे आत्मसन्मान ही काय चीज आहे आणि त्याची किंमत काय असते हे लवकर समजलेले बरे. आयुष्याच्या पडत्या काळात आसक्तीचा त्याग करणे म्हणजे काय हे लक्षात घेऊन त्या दृष्टीने मानसिक तयारी करायला हवी. नैसर्गिक जगणे हेच खरे जगणे आहे. प्रवाहाबरोबर राहून शांतपणे जीवन व्यतीत करावे.


**- संक्षिप्त अनुवाद : अनंत भट**

bhat.anant@hotmail.com

माणूसपणाच्या वाटेवरची

# पुरुष स्पंदनं

दिवाळी २०२१



## स्त्रीपुरुष नातेसंबंधांचा पूर्वग्रहरहित मनाने वेध घेणारा वैशिष्ट्यपूर्ण अंक

संपादक : **हरीश सदानी**

मुखपृष्ठ, रेखाटने व मांडणी : **अनिल दाभाडे** मूल्य : २०० रुपये

**रौप्य महोत्सवी वाटचाल**

**यंदाच्या 'कोविडपश्चात मानवी नातेसंबंध' विशेषांकात सहभागी**

**लेख** – विजय चोरमारे, वंदना भागवत, योगेश पवार, डॉ. सिसिलिया कार्व्हालो, किरण येले, डॉ. साधना नातू, डॉ. विजय पांढरीपांडे, अश्विनी धोंगडे, विजय बावरे व इतर

**ललित** – सुरज कोल्हापूरे, ऐश्वर्य पाटेकर, माधव गवाणकर, प्रमोदकुमार अणेराव, डॉ. नीता पांढरीपांडे, दिनेश मोरे

**विशेष** – दुर्गम आदिवासी भागातील विहानचा लैंगिक ओळख मिळवण्यासाठी केलेला संघर्ष शब्दबद्ध केलाय पत्रकार प्रगती बाणखेले यांनी

**कविता** – प्रशांत असनारे, लोकनाथ यशवंत, संजय कृष्णाजी पाटील, राज चिंचणकर, विनय पाटील, भारती बिर्जे-डिग्गीकर, वर्जेश सोळंकी, बसन्त वाहोकार, आशिष निनगुनकर व इतर

प्रकाशक : **मेन् अगेन्स्ट व्हायलन्स अँड अब्युज (मावा)**
७०५, परिश्रम बिल्डिंग, भंडार गल्ली, ले. ज. रोड, माहीम, मुंबई – ४०० ०१६.
दूरध्वनी : ९८७०३०७७४८ इ-मेल : saharsh267@gmail.com

*With Best Complimenst From*

**Granthali's leading paper supplier**



# Mayur Paper Corporation

**STATIONERS & PAPER MERCHANTS**

***We are paper suppliers of reputed publishers like Granthali***


23-B, Podar Chambers, S.A. Brelvi Road, Fort, Mumbai-400 001.
e-mail : mayurpapercorp@gmail.com





# मावळतीचे रंग

**संजय गोखले**

**म**ला तुझा स्पर्श आवडला! स्वच्छ मोकळ्या स्वरांत, दिलखुलासपणे उच्चारलेले हे शब्द ऐकताच आजूबाजूला क्षणभर सन्नाटा पसरला आणि मग मात्र अभूतपूर्व अशी खळबळ माजली. असे होते तरी काय ह्या शब्दांमध्ये की ज्यामुळे इतकी खळबळ माजावी? ज्या भावनेचा उच्चार खाजगीतच शोभतो त्या भावनेला अशी चारचौघांत वाचा







फोडावी हे काहीसे धाडसाचे तर होतेच, पण अनेकांच्या मते अनुचित व असभ्य वक्तव्य म्हणून गणले जाण्याची शक्यता होती. पण तरीही इतकी खळबळ का बरे माजावी? अहो, समाजात अशी बिनधास्त वागणारी व बोलताना भीडभाड न बाळगणारी माणसे असतात. मग असे असताना ह्या उद्‌गारांचा इतका बाऊ करण्याचं कारणच काय? ह्याचे कारण हे होते की 'मला तुझा स्पर्श आवडला!' हे उद्‌गार कुणा मानवाच्या तोंडून निघाले नव्हते, तर एका झाडावरील एका पानाने दुसऱ्या पानाला उद्देशून काढले होते! काय, दचकलात ना? पण कितीही आश्चर्य वाटले तरी हे असे खरोखरच घडलं होते! आणि पुढे तर याहूनही अजब व चमत्कारिक गोष्टी घडणार होत्या! पण थांबा. हे असं अर्धवट व असंबद्ध काही तरी सांगण्यापेक्षा संपूर्ण गोष्टच ऐकूया.

बरीच वर्षे लोटली ह्या घटनेला. अमेरिकेतील न्यू यॉर्क राज्यात 'फिंगर लेक्स' म्हणून एक परिसर आहे. नकाशावर पाहिले तर हाताची बोटे भासावीत अशी अनेक उभी निमुळती तळी, त्यांच्या काठांवरील टुमदार शहरे व गावे, मोठ-मोठी



उद्याने, अभयारण्ये आणि अनेक छोट्या मोठ्या टेकड्या धबधब्यांमुळे हा अवघा परिसर अतिशय निसर्गरम्य बनला आहे. ह्याच परिसरात एका विस्तीर्ण उद्यानातील एका झाडावर, ते खळबळजनक उद्‌गार निघाले होते. दाटीवाटीने पसरलेल्या अनेक झाडांपैकी एका महाकाय वृक्षाच्या असंख्य फांद्यांमधील एका फांदीवरचे एक इवलेसे पान! आपल्या बोलण्यामुळे संपूर्ण उद्यानात इतकी खळबळ माजली आहे हे त्या पानाच्या गावीच नव्हते. आपल्याच मस्तीत मशगूल होते ते! तिकडे आजूबाजूच्या पानांमध्ये कुजबुज सुरू झाली. एका

पानाकडून दुसऱ्या पानाकडे, एका फांदीकडून दुसऱ्या फांदीकडे व एका झाडाकडून दुसऱ्या झाडाकडे, असं करत सगळ्या उद्यानात त्या पानाच्या विक्षिप्त उद्‌गारांची बातमी पसरली. पाने, फुले, फळे, फांद्या, सर्वांनी जोरजोरात त्यावर आपले मत मांडायला सुरुवात केली. प्रत्येक झाडावर इतक्या मोठ्या संख्येने दाटी करून पाने उगवली असताना एकमेकांचा एकमेकांना स्पर्श होणे अपरिहार्य होते. त्यात आवडण्यासारखे किंवा नावडण्यासारखे असे काय होते? बऱ्याच जणांनी नुसतेच नवल व्यक्त केले, तर काहींना ते बोलणे थोडे आगाऊपणाचे वाटले. काहींना मात्र त्या पानाच्या निडरपणाचे कौतुक वाटले. येणाऱ्याजाणाऱ्यांपैकी कोणी त्या वेळी त्या उद्यानातील झाडांकडे निरखून पाहिले असते तर त्यांना एक विचित्र दृश्य बघायला मिळाले असते. वारे वाहत नसतानाही उद्यानातील सर्वच्या सर्व झाडांवरील पाने जोरजोरात सळसळत होती. अखेरीस बऱ्याच वेळानंतर त्या पानाने माजवलेली खळबळ थांबली.

सारे काही शांत झाल्यावर ते पान ज्या झाडावर होते त्या झाडाच्या खोडातील आजोबांनी आपल्या भीमकाय देहावरील अजस्र डोके खाजवीत टिप्पणी केली, ते पान उगवले तेव्हाच मी म्हटले होते की ह्या बेट्याची लक्षणे काही खरी दिसत नाहीत. आता अजून काय दिवे उजळणार आहे, ते देवच जाणे! एखादी घटना घडून गेल्यावर ती घडणार हे आपल्याला आधीपासूनच कसे माहीत होते, हे पुन्हा पुन्हा सांगत राहण्याची खोडातील आजोबांची जुनी खोड त्या झाडावरील सर्वांच्याच परिचयाची होती. त्यामुळे वरकरणी जरी सर्वांनी माना डोलवून त्यांच्या बोलण्याला रुकार दिला, तरी त्यांच्या पाठीमागे एकमेकांना खुणावत, हसून कुजबुजत, त्यांची मनमुराद थट्टा केली. एक गोष्ट मात्र सगळ्यांना मनोमन पटली होती, आणि ती म्हणजे त्या पानात निश्चितच काहीतरी वेगळेपण होते. हे वेगळेपण सिद्ध व्हायला फारसा अवधी जावा लागला नाही. दुसऱ्याच दिवशी सकाळी त्या पानाने एक ललकारी ठोकली, अहाहा, काय झकास ऊन पडलेय! आजचा दिवस मस्त मजेत जाणार! तुम्हां-आम्हां मानवांच्या विशात आपण अनेकदा असे बोलतो व ऐकतो. पण झाडे, पाने, फुला-फळांच्या विश्वात हे उद्‌गार पूर्वी कोणी काढले नव्हते व म्हणूनच कोणी ऐकलेही नव्हते! असे रोजच घडायला लागले. कधी हवेतल्या बदलासंदर्भात तर कधी नव्याने जन्माला आलेल्या फुलांबद्दल, त्या पानाने आपले मत मांडले नाही असा एकही दिवस गेला नाही. कधी दिवस किती कंटाळवाणा चाललाय म्हणून खेद प्रकट व्हायचा, तर कधी सोसाट्याच्या वाऱ्याबद्दल भीती व्यक्त व्हायची.कधी कधी शेजारचे फळ पक्ष्याने खाल्ले म्हणून अश्रुविमोचन व्हायचे. इतर पानाफुलांना हे सगळे नवीन होते. भावना त्यांनाही होत्या, पण त्या अशा उघडपणे बोलून दाखवणे त्यांना माहीत नव्हते; तशी पद्धतच नव्हती. हळूहळू त्या फांदीवरील इतर पानेही त्या पानाला सामील झाली. मग ते लोण बाकीच्या फांद्यांवरील पानांपर्यंत पोचले व बघता बघता संपूर्ण उद्यानभर पसरले. पानांचे सर्व संभाषण सळसळीद्वारा चाले. पानांच्या त्या त्या वेळच्या 'मूड'नुसार ती कधी जोरजोरात सळसळत, तर कधी अगदी हळुवारपणे कळत-नकळत सळसळ चाले.

त्या पानाने घडवून आणलेला बदल केवळ भावना व्यक्त करण्यापुरता मर्यादित नव्हता. त्याने आजूबाजूच्या पानांना नावे बहाल केली. बहुतांश नावे ही त्या त्या पानांच्या आकार, रंग, रूप, गुणधर्म, स्वभाव ह्यांवर आधारलेली होती. जाडे, चपटे, पातळ, लांबट, तोकडे, बारीक, हिरवे, राखी, नाजूक, रागीट, दांडगे, जुळे, तिळे आणि इतरही अनेक नावे होती. ती पाने कुठच्या फांदीवर आहेत त्यानुसार त्यांत मागचे, पुढचे, वरचे, खालचे, बाहेरचे, आतले अशा उपनावांची भर पडली. दिवस उजाडला की एकमेकांना हाका मारायला सुरुवात व्हायची. दिवसभर गप्पांना नुसता ऊत यायचा. दंगामस्ती करत वेळ मजेत जायचा. संपूर्ण उद्यानाला त्या पानामुळे एक वेगळेच चैतन्य प्राप्त झाले होते. खोडातले आजोबा थक्क होऊन बघत राहायचे. त्यांच्या जवळपास शंभर वर्षांच्या आयुष्यात त्यांनी असे काही अनुभवले नव्हते.

भराभरा दिवस चालले होते. बघता बघता सप्टेंबर महिना अर्ध्याहून अधिक सरला. एके दिवशी सकाळी ते पान विस्मयचकित होऊन भोवतालच्या पानांकडे पाहात म्हणाले, माणसांच्या जगात असतो तर मी म्हटले असते की मला कावीळ झालेली दिसतेय. अरे यार, तुम्ही सगळे चक्क थोडे पिवळसर दिसताय. असे म्हणून ते पान खो खो करत हसत सुटले. त्याच्या हसण्याचा भर थोडा कमी झाल्यावर समोरचे पान त्याला म्हणाले, गड्या, तुझीही स्थिती काही वेगळी नाहीये. पिवळी छटा तुझ्यातही दिसू लागली आहे. हे ऐकल्यावर त्या पानाने स्वतःकडे निरखून पाहिले व काहीशा आश्चर्याने त्याने आजूबाजूला इतरांकडे पाहाण्यास सुरुवात केली. इतरही पाने तेच करत होती. एकदा स्वतःकडे व एकदा दुसऱ्यांकडे पुन्हा पुन्हा बघत होती. उद्यानातील बऱ्याचशा झाडांवरील पानांमध्ये विविध रंगच्छटा दिसू लागल्या होत्या. अचानक त्या सगळया पानांच्या डोक्यांत प्रकाश पडला. इतके महिने हसत, खेळत, मजेत घालवताना त्यांना ऋतुचक्राचा विसर पडला होता. पण निसर्ग ते विसरला नव्हता. शरदऋतूच्या आगमनाबरोबर पानांचे रंग बदलणे स्वाभाविक होते. त्या पानांच्या छोट्याशा आयुष्याचा अंत आता जवळ आला होता. ह्याची जाणीव होताच सर्व पाने एकाएकी मूक झाली. त्यांची सळसळ थांबली. पुढचे काही दिवस खिन्न अवस्थेत गेले.

सप्टेंबरच्या अखेरीस लोकांच्या झुंडीच्या झुंडी उद्यानात येण्यास सुरुवात झाली. फॉल कलर्सच्या शोभेसाठी ते उद्यान प्रसिद्ध होते. त्यामुळे उद्यानाच्या आतील व बाहेरील रस्ते लोकांनी आणि त्यांच्या गाड्यांनी गजबजू लागले. पानांनी आपापल्या झाडांच्या गुणधर्मांनुसार विविध रंग धारण केले होते. पिवळा, लाल, नारिंगी, जांभळा, गुलाबी अशा अनेक रंगांच्या नानाविध छटांची संपूर्ण उद्यानात अक्षरशः उधळण झाली होती. ती अवर्णनीय शोभा बघून आलेले लोक तृप्तीचे उद्‌गार काढत होते व ते पान आणि त्याचे

जोडीदार हे सर्व सुन्न मनाने बघत आणि ऐकत होते. आलेल्या लोकांत दूरदूरहून आलेले अनेक पर्यटक होते. एक दिवस, परदेशातून आपल्या अमेरिकेतील नातलगांकडे आलेली एक महिला अतिशय उत्तेजित स्वरांत उद्‌गारली, काय मस्त रंग आहेत नाही? आपल्याकडे नसते असले काही. असं म्हणतात, की इथेसुद्धा महिन्याभरातच ह्या रंगांचा सगळा खेळ संपतो. खरे तर वर्षाच्या प्रत्येक महिन्यात असे रंग बदलत राहिले तर काय मजा येईल नाही? म्हणजे मग ते बघायला आपल्याला आपल्या सवडीने, अगदी पाहिजे तेव्हा येता येईल. त्या स्त्रीचे ते उद्‌गार झाडावरच्या पानांनीही ऐकले. बहुतेक सर्व पानांनी ते एका कानाने ऐकले व दुसऱ्या कानाने सोडून दिले. पण एक पान जरा नाजूक प्रकृतीचे होते. त्याला ते बोलणे सहन झाले नाही. संतापाने फणकारून ते म्हणाले, बयेला काही अक्कल आहे की नाही? तिला हा सगळा तिच्या करमणुकीसाठी रचलेला खेळ वाटतो? ह्या बदलत्या रंगांमागचे आपल्या आयुष्याचे भीषण वास्तव तिला उमगत कसे नाही? इतर अनेक पानांनी त्या नाजूक पानाच्या बोलण्याला दुजोरा दिला. काही जणांनी 'हे असेच असते' म्हणत त्याची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. सर्वच पानांनी तो उर्वरित दिवस अतिशय उद्विग्न अवस्थेत काढला.

दुसऱ्या दिवशी सकाळी त्या पानाने नेहमीप्रमाणे इतर पानांना हाका मारून लक्ष वेधून घेतले. पण आज ते पान रोजच्या प्रमाणे हसत नव्हते. नित्यासारखी थट्टामस्करीही नव्हती. चेहऱ्यावरगंभीर भाव होते. ते म्हणाले, गड्यांनो, तुम्हाला माहीतच आहेकी आपण सर्व जण आता थोड्या दिवसांचे सोबती आहोत. ह्या अखेरच्या दिवसांत आपल्या रंगांत होणारे बदल पाहायला मानवांच्या ज्या झुंडी रोज येथे लोटत आहेत, त्यामुळे तुम्ही सर्व जण संतापलेले आहात. पण खरं पाहता ह्यात राग येण्यासारखे काही नाही. निसर्गाने आपल्याला जेमतेम सात-आठ महिन्यांचे आयुष्य दिले आहे व त्या छोट्याशा आयुष्यातील शेवटचे काही दिवस आपल्या शरीरात होणारे रंगांचे बदल पाहून जर मानवाला आनंद मिळत असेल तर खुशाल मिळू दे! त्यांनी आपल्याकडे बघितले म्हणून आपले आयुष्य कमी होत नाही की वाढतही नाही. आणि असे जर आहे तर आपण आपल्या मनाचा क्षोभ करून घेण्याचे कारणच काय? त्यापेक्षा ह्या जगातून जाण्यापूर्वी आपण असे काहीतरी अभूतपूर्व करून दाखवूया की आपल्या आयुष्याचे सार्थक होईल. आपल्या मागे आपली कीर्ती अमर राहील. त्या पानाचे बोलणे ऐकून सारेच बुचकळ्यात पडले. ह्याला नक्की म्हणायचेय तरी काय? हाच प्रश्न सगळ्यांच्या मनात होता. शेवटी त्यातल्या एकाने धीर धरून विचारले, बाबा रे, तुझ्या मनात आहे तरी काय? आपण इवलीशी पाने. ह्या विश्वाच्या पसाऱ्यात आपल्याला अत्यंत नगण्य स्थान आहे. असा काय पराक्रम आपण करू शकणार, की ज्या योगे आपली कीर्ती अमर होईल? ते पान किंचित हसले व म्हणाले, तू म्हणतोस ते जरी खरे असले तरी माझ्या डोक्यात एक उत्तम योजना आहे. पण त्यामध्ये ह्या उद्यानातील सर्वांचा सहभाग आवश्यक आहे. ही एकट्या-दुकट्याने करायची गोष्ट नाही. आता मात्र सर्वांचे कुतूहल चाळवले गेले. संपूर्ण उद्यानात शांतता पसरली. सर्वांचे लक्ष आता आपल्याकडे आहे हे पाहून त्या पानाने आपल्या मनातील योजना सांगायला सुरुवात केली.

माझी योजना म्हटली तर सोपी आहे आणि म्हटली तर थोडी अवघड आहे. आपण सर्वांनी एकच गोष्ट करायची आहे व ती म्हणजे थोडेसे अधिक दिवस जगण्याचा अटोकाट प्रयत्न करायचा आहे. आपण निसर्गाने निर्धारित केलेल्या वेळेला मरायचे नाहीये. हे बोलणे ऐकल्यावर सगळीकडे एकच कोलाहल माजला. ह्याला वेड लागलेय की काय, अशी काहींना शंका आली. त्या पानाला ह्या प्रतिक्रियेची अपेक्षा होती. ते सर्वांना शांत करून म्हणाले, मला ठाऊक आहे की जन्म व मरण आपल्या हातात नसते. पण आपले मरण थोड्या दिवसांसाठी लांबवणे कदाचित शक्य होऊ शकेल असे मला वाटतेय. निदान तसा प्रयत्न तरी करून बघायला काय हरकत आहे? काल ती बाई म्हणत होती की आपला हा रंगांचा खेळ महिन्याभरासाठी असतो व ते खरेच आहे. पण हाच रंगांचा खेळ आपण आणखी काही दिवसांसाठी वाढवू शकलो तर? काय बहार येईल नाही? पण या त्याच्या बोलण्याने इतरांचे समाधान झाले नाही. कोणीतरी म्हणाले, अरे, काही दिवसांची तर बातच नको. आपले आयुष्य केवळ एक दिवसाने वाढवायचे म्हटले तरी कठीण आहे. पण त्या पानाने हार मानली नाही. ठीक आहे. काही दिवस नाही, तर फक्त एक दिवस. प्रत्येकाने आपले आयुष्य केवळ एका दिवसाने वाढवायचा प्रयत्न करायचा आहे. ते कठीण असेल पण अशक्य नाही. आणि खरोखर जर एक दिवस आयुष्य वाढवण्यात आपल्याला यश लाभले तर आपण पुन्हा आणखी एका दिवसासाठी प्रयत्न करायचा. त्या पानाचा स्वर आता उत्तेजित झाला होता. ते पुढे म्हणाले, मी हे केवळ बोलायचे म्हणून बोलतोय असे नाही. तर माझ्या मनात ह्या संदर्भात काही निश्चित कल्पना आहेत. आपले शरीर निसर्गाचे गुलाम आहे हे तर खरेच. पण मन तर आपले स्वतःचे आहे. मनाने निर्धार केला तर शरीरावर थोड्या फार प्रमाणात तरी ताबा मिळवणे शक्य होईल. त्या मार्गाने आपण आपली रंग बदलण्याची प्रक्रिया जर मंदावू शकलो तर आपोआप आपल्या आयुष्यात थोडी भर पडू शकेल. आणि एवढ्यावरच विसंबून न राहाता आपण आपापल्या झाडांच्या मुळांना थोडा अधिक जीवनरस पुरवण्याची विनंती करू शकतो. त्या पानाच्या बोलण्याचा, त्याच्या उत्तेजित स्वराचा आणि त्याच्या प्रचंड उत्साहाचा इतरांवर खूप प्रभाव पडला. पुढचा संपूर्ण दिवस उद्यानभर पाने सळसळत होती. त्यांची आपापसात चर्चा चालू होती. अखेर सर्व पानांनी त्या पानाला साथ देण्याचे ठरवले. झाडांच्या मुळांनीही यथाशक्ती मदत करण्याचे मान्य केले. दुसऱ्याच दिवसापासून ह्या आगळ्यावेगळ्या मोहिमेची अंमलबजावणी सुरू झाली.

ह्या सर्व प्रयत्नांचा प्रत्यक्ष परिणाम ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीस दिसू लागला. त्या परिसरातील इतर उद्याने व रस्त्यांच्या

कडेच्या झाडांवरील पाने गळायला सुरुवात झाली होती. पण त्या उद्यानात मात्र सर्वच्या सर्व पाने अनेकविध रंग धारण करून टिच्चून उभी होती. ही गोष्ट लोकांच्या लक्षात येताच तेथे नव्याने पर्यटक येण्यास सुरुवात झाली. बघता बघता बातमी सर्वत्र पोचली आणि नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीला एका प्रमुख टेलिव्हिजन वृत्तवाहिनीचा चमू त्या उद्यानात डेरेदाखल झाला. आता ह्या अघटित घटनेला आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्धी मिळाली. सर्वच वर्तमानपत्रे आणि वृत्तवाहिन्यांची एकच गर्दी उसळली. इतकी अमाप प्रसिद्धी मिळाल्यावर लोकांचे थवेच्या थवे तिथे थडकू लागले. आजूबाजूची सर्वच्या सर्व हॉटेले पूर्णपणे भरून गेली. गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी बाहेरून पोलिसांची कुमक बोलवावी लागली.

उद्यानातील पानांची अवस्था मात्र दिवसेंदिवस बिकट होऊ लागली. मोठ्या शर्थीने त्यांनी आपले जीवनमान वाढवले होते खरे, पण आता त्यांची जीर्ण, जर्जर शरीरे साथ द्यायला कुरकुरू लागली. जसजसा नोव्हेंबर महिना संपत आला तसतशी थोडी थोडी पाने गळायला सुरुवात झाली. त्या पानाने मात्र हिंमत हरली नव्हती. त्याच्या प्रोत्साहनाने इतर पानेही इरेला पेटली. आता लढा एक-एक दिवसावरून तासा-तासांवर आला होता. प्रत्येक सकाळी सर्व पानांची केवळ एकच एक मनीषा असे, आणि ती म्हणजे कसेही करून संध्याकाळपर्यंत आपला जीव टिकवून ठेवणे! संध्याकाळ झाली की रात्रीपर्यंत जगायचे निश्चय केले जात आणि रात्र सरली की दुसऱ्या दिवसाचे वेध लागत. सांघिक भावना तर इतकी पराकोटीला गेली होती की एखादे पान आता गळणार असे वाटू लागले की त्याच्या आजूबाजूची पाने त्याला मानसिक व शारीरिक आधार देऊन वाचवण्याचा प्रयत्न करत व अनेकदा त्यात यशस्वीही होत असत.

येथे पानांची ही स्थिती होती तर बाहेरील जगात अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली होती. ही अजब घटना आता केवळ सामान्य पर्यटकांच्या कुतूहलाचा विषय न राहता, समाजाच्या विविध स्तरांमध्ये त्यावर चर्चा होऊ लागली. सरकारी पातळीवर ह्या घटनेची दखल घेण्यात येऊन अधिकृत संशोधनास सुरुवात झाली होती. देश-विदेशातील अनेक संशोधकांनी त्या उद्यानातील झाडांचे, तेथील मातीचे, पाण्याच्या स्रोतांचे, तसेच गेल्या कित्येक वर्षांतील त्या परिसराच्या हवामानातील बदलांचे संशोधन करण्यास सुरुवात केली.

लोकांमधील त्या उद्यानाचे आकर्षण इतके वाढले होते, की थंडी पडायला सुरुवात झाली तरीही तेथील गर्दी वाढतच राहिली. नोव्हेंबर महिना संपून डिसेंबर सुरू झाला. अनेक पाने अजूनही आपापले रंगवैभव सांभाळत झाडांवर तग धरून होती. एक दिवस सकाळी त्या पानाला काहीतरी वेगळे घडतेय ह्याची जाणीव झाली. त्याला कळून चुकले की त्याची जीवनयात्रा आता समाप्त होणार होती. आपल्या मागे ही मोहीम जमेल तितके दिवस चालू ठेवा असे सांगण्यासाठी त्याने सहकाऱ्यांना हाक दिली. पण त्याला काही बोलायची संधीच मिळाली नाही. वाऱ्याची किंचितशी झुळूक आली आणि ते पान झाडापासून अलग होऊन जमिनीवर कोसळले. आपला नेता गेला हे बघताच इतर पानांचेही अवसान नाहीसे झाले व काही क्षणांत ती सर्व पाने खाली कोसळली. लोक अचंबित होऊन बघत राहिले. नित्याचा मोसम संपल्यावर एक महिन्याहूनही अधिक काळ आपले रंग धारण करून उभे राहिलेले उद्यान हा जसा एक अविश्वसनीय चमत्कार होता, तसेच अवघ्या काही क्षणांत सर्वच्या सर्व पाने गळून जाऊन बोडके झालेले उद्यान हाही एक चमत्कार होता.

लोकांचे कुतूहल इतके जबरदस्त होते की नंतर काही दिवस ते बोडके उद्यान बघायलासुद्धा लोकांनी गर्दी केली! पण हळूहळू गर्दी ओसरू लागली व नंतर फक्त शास्त्रज्ञ आणि संशोधक त्या उद्यानात उरले. गर्दी ओसरली तरी लोकांमधील कहाण्या संपल्या नव्हत्या. उलट दिवसेंदिवस त्या अधिकाधिक अतिरंजित होऊ लागल्या. लोकांनी त्या उद्यानाचे 'Miracle Park' असे नामकरण करून टाकले. पुढल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात सर्वांची उत्सुकता शिगेला पोचली होती. लोकांची इतकी प्रचंड गर्दी उसळली की त्यांना आवरता आवरता सरकारी यंत्रणेच्या नाकीनऊ आले. जसजसा ऑक्टोबर संपायला आला तसे लोक पुन्हा एकदा त्या चमत्काराची प्रतीक्षा करू लागले. पण तसे घडले नाही. इतर सर्व उद्यानांप्रमाणे 'Miracle Park' मध्येही नेहमीच्याच वेळेला पानांचे रंग ओसरून ती गळून पडली. पुढची अनेक वर्षे लोकांनी तेथे गर्दी केली, पण त्या चमत्काराची पुनरावृत्ती झाली नाही.

अशाच एका वर्षी ऑक्टोबर महिन्यात पर्यटकांचा एक मोठा गट तेथे आला. त्यातील एकजण पूर्वी तेथे येऊन गेला होता व त्याने तो चमत्कार प्रत्यक्ष अनुभवला होता. साहजिकच बाकीचे लोक त्याला 'त्या' वर्षीच्या फॉल कलर्सबद्दल खोदून खोदून विचारत होते व तो ही मोठ्या उत्साहाने सर्व हकिकत अगदी मनापासून रंगवून रंगवून सांगत होता. 'असे फॉल कलर्स जगात कोठेही आजतागायत कोणी पाहिले नाहीत', हे त्याचे विधान ऐकणाऱ्या सर्वांनीच सहजपणे मान्य केले. त्याचे ते बोलणे बाजूलाच असलेल्या 'त्या' झाडाच्या खोडातील आजोबांनी ऐकले व एक सुस्कारा सोडत ते स्वतःशीच म्हणाले, ते निव्वळ फॉल कलर्स नव्हते रे बाबांनो. असे म्हणून त्या रंगांचा अपमान करू नका. सूर्य अस्ताला गेल्यावर, संध्येच्या कुशीतून पश्चिमेच्या क्षितिजावर प्रकटणारे अतिशय विलोभनीय असे मावळतीचे रंग होते ते! केवळ एका पानाने आपल्या दोस्तांच्या मदतीने घडवून आणलेला एक अद्‌भुत चमत्कार होता तो! त्यांचा कंठ दाटून आला. एक हलकासा आवंढा गिळून ते आपल्या जीर्ण देहावरील गाठी कुरवाळत त्या अफलातून पानाच्या स्मृतीत रमून गेले!

**– संजय गोखले**
sanjaygokhale@hotmail.com



# गरिबी अमर है?

**निळू दामले**

*भारत स्वतंत्र झाल्यावर सात दशकांत केवढ्यातरी उलथापालथी झाल्या, स्थित्यंतरे झाली, बहुतांश सर्वच क्षेत्रांत बदल झाले.. काही बरे, काही वाईट.. कसे का होईना, झाले! पण आता अमृतमहोत्सवी वर्षात पाऊल ठेवलेल्या या देशातील एक गोष्ट मात्र पूर्वी होती तशीच आहे. गरिबी! पंतप्रधानपदी असलेल्या इंदिरा गांधी यांनी 'गरिबी हटाव'चा नारा देऊन निवडणुका लढवल्या, नंतर त्यांच्याच काँग्रेस पक्षाने नव्हे तर सगळ्याच पक्षांनी वेगवेगळी लेबले लावत दारिद्र्यनिर्मूलनाचे विडे उचलले. त्याचेही रौप्यमहोत्सव, सुवर्णमहोत्सव झाले तरी गरिबीने देशत्याग केला नाही. राजकारण्यांचे सोडा, त्यांच्यासाठी गरिबी ही सत्तासोपानाची एक पायरी असते. ती संपावी, अशी त्यांची मनोमन इच्छाही नसते. पण गरिबी संपवता येतच नाही, असे नाही. जगात अपवादाने का होईना, गरिबी संपल्याची उदाहरणे आहेत. त्या देशांकडे पाहून काही शिकण्याचा निदान संकल्प आपण स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात करूया!*

पंचाहत्तर वर्षं झाली, भारतातली गरिबी काही केल्या जात नाही.

अमुक एक करोड लोकसंख्या आणि तमुक एक करोड गरीब. लोकसंख्या वाढत राहते, गरिबांची संख्याही वाढत राहते. दर दहा वर्षांनी अर्थशास्त्री व्याख्या बदलतात आणि गरिबांची संख्या कमी दाखवतात. त्याचवेळी काही अर्थशास्त्री ती जास्त दाखवतात. गरीब मात्र करोडोंच्याच संख्येत असतात.

एक सरकार येतं. अमुक कोटी गरीब आहेत, त्यांच्यासाठी अमुक इतक्या योजना आणि तमुक करोड रुपये खर्च करणार. बस. गरिबी जाणार. गरिबी जात नाही, सरकार जातं.

पुन्हा एक नवं सरकार. अमुक कोटी गरीब आहेत, गरिबी घालवण्यासाठी अमुक कोटी खर्च करणार आणि गरिबी घालवणार. गरिबी शिल्लक, सरकार जातं.

आता सरकारं आणि पुढारी हुशार झालेले असतात. त्यांना कळलेलं असतं की गरिबी घालवणं वगैरे शब्द अर्थहीन आहेत. मग ते नवे शब्द शोधतात. सर्वांचा विकास, सर्वांना बरोबर घेऊन. त्यासाठी इतक्या योजना आणि तितके पैसे. खुबी अशी, सर्वांचा विकास म्हणजे अर्थातच गरिबांचाही विकास. गरिबी हा शब्दच उच्चारायचा नाही, पण गरिबी जाम चिवट, ती शब्दांना हरवते. शब्द विरघळतात, गरिबी शिल्लक.



गरिबी हुशार आहे. ती गरीब माणसाचं बाह्य रूप बदलते.

स्वातंत्र्य मिळत असताना गरिबाची प्रतिमा म्हणजे खपाटीला गेलेलं पोट आणि हाडांचा सापळा आणि हातात वाडगा. किंवा ढग नसलेल्या आकाशाकडे पाहणारा शेतकरी. तो जमाना होता राज कपूरच्या सिनेमांचा. राज कपूर त्या गरिबाला सांगायचा की वह सुबह कभी तो आएगी, ज्या वेळी सारी दुःखं नष्ट होतील, अन्याय नष्ट होईल.

**१९६१ मधे पार्क चुंग ही सत्ताधारी झाले आणि दक्षिण कोरियातली गरिबी नष्ट व्हायला सुरुवात झाली. २०२० साली दक्षिण कोरियात गरीब शिल्लक नाहीत. दक्षिण कोरियाचं एकूण उत्पादन आज भारताएवढंच आहे, परंतु लोकसंख्या जेमतेम सव्वापाच कोटी असल्यानं भारतीय माणसाच्या सरासरी उत्पन्नाच्या सतरापट दक्षिण कोरियन नागरिकाचं उत्पन्न आहे! म्हणजे गरिबी जाऊ शकते.**

नंतर कधीतरी जमाना आला अमिताभ बच्चनच्या सिनेमांचा. एक हमाल असलेला अमिताभ बच्चनही हीरो असो, अन्यायाविरोधात लढत असे, मेहनत करणाऱ्याला चांगलं जगणं लाभेल असं सांगत असे. अन्याय करणाऱ्यांना तो ठोकून काढत असे. गरीब माणसाची गरिबी काही कमी झाली नाही, पण सिनेमातून तरी त्यानं श्रीमंती उपभोगली. त्याच्या सिनेमातला गरीब माणूस बऱ्यापैकी घरातला असे, थोडासा शिकलेला असे, पँट-शर्ट घालत असे. राज कपूरचा गरीब माणूस उघडा होता, अमिताभच्या गरीब माणसाच्या अंगावर कपडे आले.

आता नव्यानं गरीब झालेला माणूस दोन दोन पदव्या घेतलेला असतो. त्याला थोडंफार इंग्रजीही येत असतं. त्याच्या अंगावर जीन्स असू शकतात आणि हातात सेलफोन असतो.

आताचा गरीब माणूस भीक म्हणून दिलेलं अन्न स्वीकारायला तयार नसतो. तो बेकार असू शकतो, पण त्याला मिळाली तर भरपूर पगाराचीच नोकरी, तीही ऑफिसात वगैरे, हवी असते. ती मिळाली नाही तर तो बेकार राहील, पण कमी पैशांवर काम करणार नाही. त्याच्या मनात सरकारवर राग असतो. त्याच्या मनात त्याची वगळता इतर जातींवर राग असतो. तो कॉलेजात गेलेला असतो, त्याच्या नावावर पदवी असते. आता त्याला गरिबीतून बाहेर पडण्याची एक वाट जास्त जवळची वाटते, राजकारणाची. पुढारी होणं, पुढाऱ्याच्या आसपास राहणं म्हणजे हमखास विकास हे त्याला आता समजलेलं आहे.

गरिबी आहे. बेकारी आहे. हगवण, मलेरिया, डेंग्यू, टीबी इत्यादी रोगांनी फार माणसं मरतात. फार लोकांना पिण्याचं शुद्ध पाणी मिळत नाही. फार लोकांना पुरेसा आहार मिळत नाही. अर्ध्याअधिक स्त्रिया कुपोषित आहेत. एक गोष्ट मात्र बरीचशी उपलब्ध आहे. ती म्हणजे शिक्षण. बऱ्याच लोकांना शिक्षण मात्र मिळतंय. फक्त ते पोकळ आहे, एवढंच. त्या शिक्षणाला दर्जा नाही. दर्जेदार शिक्षण फक्त श्रीमंतानाच मिळू शकतं.

गरिबी गेलेली नाही. गरिबीचं बाहेरचं रूप काहीसं बदललं आहे एवढंच.

हा काय लोच्या आहे?

गरिबी का जात नाही?

चीनमधेही गरिबी होती. जवळपास आपल्याला स्वातंत्र्य मिळालं त्याच काळात. तिथंही शेतीवर आधारलेली अर्थव्यवस्था आणि भरमसाट लोकसंख्या. माओनं गरिबी संपवायचा प्रयत्न केला. पण गरिबी संपली नाही. उलट वाढली. माओच्या अवास्तव कल्पनांमुळं लाखो माणसं उपासमारीनं मेली, देशाची वाटच लागली.

सन १९८० च्या सुमाराला दंग झाओ पिंग नावाच्या पुढाऱ्यानं कम्युनिस्ट पक्ष आणि कम्युनिस्ट राजकीय सांगाडा टिकवला, पण अर्थव्यवस्था बाजाराच्या कलानं विकसित केली. तपशिलात जायला नको, पण त्यानं चीनची अर्थव्यवस्था झपाट्यानं बदलली. १९४७ साली भारत आणि चीन एकाच पातळीवर होते. २०२० साली चीनची अर्थव्यवस्था भारताच्या सुमारे पाचपट मोठी आहे. चीनमधे गरीब आहेत की नाहीत? आहेत. पण अगदीच म्हणजे अगदीच कमी आणि त्यांचीही व्यवस्था लावण्याच्या खटपटीत चीन आहे.

दक्षिण कोरिया हाही आशियातलाच देश. देश म्हणून तो १९४८ साली अस्तित्वात आला, म्हणजे जवळजवळ भारतासोबतच. देश म्हणून तयार झाला आणि लगेच उत्तर कोरियाबरोबर युद्ध झालं, त्यात देश उद्ध्वस्त झाला. देशाची गणना जगातल्या गरीब देशांत केली जात होती. भारतापेक्षाही वाईट स्थिती होती. १९६१ मधे पार्क चुंग ही सत्ताधारी झाले आणि दक्षिण कोरियातली गरिबी नष्ट व्हायला सुरुवात झाली. २०२० साली दक्षिण कोरियात गरीब शिल्लक नाहीत. दक्षिण कोरियाचं एकूण उत्पादन आज भारताएवढंच आहे, परंतु लोकसंख्या जेमतेम सव्वापाच कोटी असल्यानं भारतीय माणसाच्या



सरासरी उत्पन्नाच्या सतरापट द. कोरियन नागरिकाचं उत्पन्न आहे!

म्हणजे गरिबी जाऊ शकते.

चीन, दक्षिण कोरिया या देशांत देवानं सतरावा किंवा अठरावा अवतार घेतलेला नाही. तिथं कोणी नवस बोलले, यज्ञ केले, पुस्तकांची पठणं वगैरे केली असं कानावर नाही. तिथं कोणाच्या जयंत्या किंवा पुण्यतिथ्या साजऱ्या होत नाहीत. तिथं चमत्कारही झालेले नाहीत. तिथं संतही दिसत नाहीत. युगपुरुष दिसत नाहीत. तिथं गल्लोगल्ली रत्नं, भूषणं, सम्राट वगैरे नाहीत. त्यामुळं एकुणात ती माणसं सामान्यच दिसतात.

तिथं माणसांनी मेहनत केल्यासारखं दिसतंय.

तिथं माणसांना श्रीमंत व्हावंसं वाटत असावं, तिथं लोकांना गरिबीबद्दल आकर्षण आणि प्रेम वाटत नसावं. तिथं गरिबीचं उदात्तीकरण केलेलं दिसत नाही. माझं लहानपण गरिबीत गेलं अशी गौरवपूर्ण सुरुवात तिथली माणसं करत नाहीत. तिथं बहुधा मोठ्या पगाराच्या नोकरीवर लाथ मारून माणसं साहित्य, समाज, संगीत, देश इत्यादीची सेवा करायला निघालीत असं दिसत नाही. तिथला सिनेमातला हीरो 'तेरे पास बंगला है, गाडी है...मेरे पास मेरी माँ है' अशी वाक्यं म्हणून टाळ्या घेत नाही.

**अशी माणसं जगात कुठंही नाहीत. यंत्र, तंत्र, उद्योग, बाजार इत्यादी गोष्टीही भारतीय माणूस लिंबूमिरची लावून, गोमूत्राची अंघोळ घालून, यज्ञ करून, मंत्रोच्चार करून स्वीकारणार. संशोधन वगैरेही लिंबूमिरची, यज्ञ, मंत्र, संस्कृत भाषा, गायत्रीमंत्र इत्यादीवर करणार. दुर्दैवानं त्यातून निघत तर काहीच नाही. मग जगातून जे वाहत आलं त्यावर भागवायचं.**

गरिबी ही गोष्ट आध्यात्मिक वगैरे ठरवली तर प्रश्न सुटतो. पण गरिबी ही आध्यात्मिक नाही, लौकिक आहे, ऐहिक आहे असं मानलं तर मात्र अनेक प्रश्न निर्माण होतात.

गरिबी ही गोष्ट अठराव्या शतकापर्यंत जगभर होती, भारतातही होती.

भारतात (आणि जगातही) काही माणसं धनवान असत, बरीच माणसं गरीब असत. फांदीफांदीवर सोन्याच्या चिमण्या चिवचिवाट करत असं कवी लोक लिहीत आणि संगीतकार ते शब्द सुमधुर करत, ऐकायला बरं वाटतं, मनही सुखावतं. पण सोन्याच्या चिमण्या चारदोन घरांतल्या कल्पवृक्षावरच चिवचिवाट करत, बाकी गावात बोंब असे. म्हणजे थेट आजच्यासारखं. संपत्तीची निर्मिती होत होती, पण ती कमी लोकांच्या वाट्याला येत असे. लोकसंख्या भरपूर त्यामुळं दर माणशी कमी संपत्ती वाट्याला येत असे. एकूण उत्पन्न दक्षिण कोरियाएवढं पण लोकसंख्या कितीतरी पट जास्त. काही वर्षांत म्हणे भारताचं उत्पादन अमेरिकेच्या उत्पन्नाला मागं सारणार आहे. तसं घडेलही. पण सामान्य माणसाच्या वाट्याला येणारी संपत्ती कमी.

माणसं जास्त. त्याचं काय करणार? विनोबा म्हणत की जो परमेश्वर तोंड देतो तोच परमेशर दोन हातही देतो. विनोबा भला माणूस होता, विधायक विचार करणारा माणूस होता. आध्यात्मिक वगैरे रूपकं वापरून ते माणसाला समजून घेण्याचा, समजून देण्याचा प्रयत्न करत. परंतु वास्तवाच्या हिशोबात त्यांचं रूपक मनाला समाधान देण्यापुरतंच उपयोगी पडलं. माणसाच्या गरजा वाढत गेल्या, त्या मानानं उत्पादन वाढत गेलं नाही. खाणारं तोंड, तोंडातली जीभ, तोंड ज्या धडावर



होतं ते धड, सर्वांच्याच गरजा वाढत गेल्या, पण दोन हातांना त्या गरजा पूर्ण करता येईनात.

ही अवस्था जगभर सारखीच होती.

शेतीवर आधारलेली व्यवस्था, जनावरं आणि माणसं यांचे स्नायू वापरून होणारं उत्पादन आणि गरजा यांचा मेळ बसत नव्हता. औद्योगिक क्रांती झाली आणि जग एकदम बदललं. वाफेच्या दाबाची शक्ती माणसाला उमजली. या शक्तीचा वापर करण्यासाठी यंत्र वापरण्याचं तंत्रज्ञान माणसाला कळलं. उपकरणाची जागा यंत्रानं घेतली. उत्पादन पटींनी वाढलं, वितरण सुरू झालं, बाजार निर्माण झाला. संपत्तीच्या निर्मितीचा वेग वाढला, मात्रा वाढली, संपत्ती अधिक माणसांकडं पोचू लागली. युरोपनं, अमेरिकेनं औद्योगिक क्रांती आत्मसात केली, संपत्ती वाढवली. संपत्ती वाढवण्यासाठी लागणारं इन्फ्रास्ट्रक्चरही त्यांनी तयार केलं. उदाहरणार्थ, शिक्षण आणि संशोधन. परिणामी त्या देशातलं जीवनमान धडाधड उंचावत गेलं. मुख्य म्हणजे गरिबी आटोक्यात आली.

माणसानं गरजा कमी ठेवायच्या असं ठरवलं तर एक वेगळं चित्र तयार होतं. कोळसा, तेल इत्यादी पुन्हा तयार न करता येण्यासारखी ऊर्जा वापरून संपवली नाही, त्यातून होणारं प्रदूषण टाळलं तर जग अधिक सुखी होऊ शकेल. त्यासाठी आजच्या वापरातल्या ९० टक्के वस्तू वापरता येणार नाहीत. प्रवास नाही, शिक्षण नाही, संशोधन नाही, औषधं नाहीत, अगदीच मर्यादित आणि प्राथमिक रंजन यावर भागवावं लागेल. विनोबा आणि त्यांचे गुरू गांधीजी यांच्या गरजा कमी होत्या, त्यांचं पूर्ण जीवनविषयक तत्त्वज्ञान कमी गरजा आणि यंत्राविना होणारं उत्पादन यावर आधारलेलं होतं. भारतात आपण काहीही केलं तरी सभोवताली जग असतं आणि त्याचा आपल्यावर प्रभाव पडतो याची कल्पना येत नव्हती, अशा परिस्थितीत ते जगत होते. तशाही परिस्थितीत गरिबी, उपासमार या समस्या भारतात होत्या आणि त्यावर विनोबा आणि गांधीजी जरूर विचार करत होते. परंतु जग ज्या वेगानं पुढं सरकत होतं त्या वेगानं त्यांचा विचार पुढं सरकत नव्हता.

परिणामी जगातल्या अनेक देशांनी उद्योग आणि बाजार या

प्रमुख अंगांनी आपल्या अर्थव्यवस्था घडवल्या. भारतात ते घडलं नाही, आजही घडत नाहीये.

अन्न आणि गरजा भागवता येत नाहीत अशी वेळ आली, की राजे शेजारच्या किंवा दूरच्या राज्यांवर हल्ले करत, तिथली संपत्ती लुटत. जगातले सर्व राजे हा उद्योग करत असत. कारण शेतीतून वाढणाऱ्या उत्पन्नावर मर्यादा होत्या आणि यंत्र-तंत्र तयार झालं नव्हतं.

जगभर फरक पडला, भारत मात्र जगाच्या तुलनेत मागं राहिला. गरजा वाढल्या. त्या पूर्ण करायच्या तर शेजारच्या देशांवर हल्ले करून तिथल्या बाजारपेठा लुटायला हव्यात आणि तिथल्या राजांकडून खंडणी उकळायला हवी. पण आता ते शक्य नाही. आक्रमणं करून, स्वारी करून, पराक्रम करून इतरांची संपत्ती हिसकावून घेता येत नाही. पण अडचण तर शिल्लकच राहते.

या पेचात भारत अडकला, आजही अडकून आहे. माणसांच्या गरजा वाढत आहेत आणि त्या पूर्ण करण्यासाठी आवश्यक उत्पादन नाही, उत्पादन व संपत्तीवाढीसाठी इन्फ्रास्ट्रक्चर नाही. स्वातंत्र्य मिळाल्यापासून तीच खटपट सुरू झाली. धरणं, बीबियाणं, पिकांवरचे रोग नाहीसे करणं इत्यादी वाटा चोखाळल्या गेल्या. उत्पादनासाठी यंत्रं हवीत, यंत्रं निर्माण तयार करण्यासाठी पोलाद हवं, वीज हवी, खुद्द यंत्रं निर्माण करण्यासाठी यंत्रं हवीत. पहिल्या योजनेपासून ते सुरू झालं. यंत्रं आणि तंत्रं आत्मसात करण्यासाठी कॉलेजं आणि आयआयट्या काढायला सुरुवात झाली. हे सर्व उद्योग चालवण्यासाठी वित्तव्यवस्था हवी. त्यासाठी बँकिंगचं जाळं उभारण्यात आलं.



थोड्याफार फरकानं पहिली योजना ते २०२० पर्यंत तोच उद्योग चालला आहे. एका वाक्यात बोलायचं तर देशाची लोकसंख्या, गरजा आणि दीर्घ इतिहास पाहता एक प्रचंड इन्फ्रास्ट्रक्चर आवश्यक आहे. ते उभारण्यासाठी लागणारी गुंतवणूक आपल्याकडं नाही. ती गुंतवणूक तयार करण्यासाठी लागणारं मनुष्यबळ आपल्याकडं नाही. परदेशातून तरी कितीसे पैसे येणार? आपल्यालाच ते साधायला हवं.

चीन या भरमसाट लोकसंख्येच्या देशानं ते साधलं. कमी लोकसंख्या असलेल्या दक्षिण कोरिया किंवा सिंगापूरनं ते साधलं.

भारताला ते जमत नाहीये.

चमकदार कल्पना, थरारक घोषणा, ऐतिहासिक आणि पुराणातल्या व्यक्ती इत्यादी गोष्टींचे उच्चार करून माणसांना कामाला लावण्याचा उद्योग पुढारी करतात. पण त्यानं भागत नाही. कर लादतात, जकाती वाढवतात, रुपयाचं अवमूल्यन करतात, चलनसुधारणा करतात, करचुकव्यांना धारेवर धरतात, नवनव्या योजना आखतात, तुटीची अंदाजपत्रकं तयार करतात, पण संपत्ती आवश्यक तेवढी वाढत नाही आणि तिचं वाटप होऊन ती जनतेपर्यंत पोचत नाही.

हा खटाटोप स्वातंत्र्य मिळण्याआधी कित्येक शतकं चालला होता, आजही चालला आहे. गरिबी काही जात नाही.

त्यामुळं लोकांनी गरिबी स्वीकारली. ऐहिकाचं काही खरं नाही, खरं सुख मृत्यूनंतर स्वर्गातच मिळतं असं लोक स्वतःला पटवू लागले. महाकाव्य हे सत्य आहे असं त्यांना वाटू लागलं. महाकाव्यांतल्या आणिधर्मग्रंथांतल्या व्यक्ती त्यांच्या लेखी देव आणि खऱ्या होत गेल्या. तसं झालं तरी जगण्याचे प्रश्न भेडसावत होतेच. आपण स्वप्नरंजन करतोय, कल्पिताला खरं मानतोय हेही त्याला कळत होतं. पण त्याचा इलाजही नव्हता. महाकाव्यं, सिनेमे, स्तोत्रं यातून काही काळ गुंगी येत होती, वास्तवाचे चटके काही काळ विस्मरणात जात होते, सुसह्य होत होते. पृथ्वीवरचे त्रास हे लोखंडांचे चणे आहेत, वाळूचे कण बसूया रगडत, कधीतरी काहीतरी घडेल आणि समजा नाही घडलं तरी ती शेवटी नियतीची-देवाची इच्छा असेल तर काय करणार?

शेवटी तो जगन्नियंताच आपलं भलं करेल. तो जिल्हा परिषद सदस्य होतो, विधानसभा सदस्य होतो, खासदार होतो, कलेक्टर होतो, पंतप्रधान होतो. हे सगळे मिनीजगन्नियंते मिळून सरकार तयार होतं. शेवटी ते मायबाप सरकारच आपलं भलं करू शकतं.

देव. सरकार.

देव आणि सरकार यांच्यामध्ये जात नावाचा एक घटक असतो. जगातल्या इतर देवांनी इतर देशांत जात निर्माण नाही केली. भारतातल्या देवांनी मात्र जात निर्माण केली. देवलोकही भारी आहेत. मुसलमानांच्या देवानं, ख्रिश्चनांच्या देवानं, ज्यूंच्या देवानं जात नावाची भानगड काढलीच नाही. भारतीय देवांची जात नावाची मोनोपॉली.

असा घोळ. अशी ही भारतीय माणसं, एक्स्क्लुझिव्ह. अशी माणसं जगात कुठंही नाहीत. यंत्र, तंत्र, उद्योग, बाजार इत्यादी गोष्टीही भारतीय माणूस लिंबूमिरची लावून, गोमूत्राची अंघोळ घालून, यज्ञ करून, मंत्रोच्चार करून स्वीकारणार. संशोधन वगैरेही लिंबूमिरची, यज्ञ, मंत्र, संस्कृत भाषा, गायत्रीमंत्र इत्यादीवर करणार. दुर्दैवानं त्यातून निघत तर काहीच नाही. मग जगातून जे वाहत आलं त्यावर भागवायचं.

विमानकला आणि क्षेपणास्त्रं हे भारतात कित्येक हजार वर्षांपासून कसं होतं यावर संशोधन करत राहायचं. ते जमत नाही, तोवर विमानं फ्रान्सकडून खरेदी करायची आणि क्षेपणास्त्रं अमेरिकेकडून. सेलफोनचं तंत्र अमेरिकेतून घ्यायचं, यंत्र चीनमधून घ्यायचं. त्यातलं तंत्रज्ञान गायत्रीमंत्राच्या अभ्यासकांकडं सोपवायचं. कॅमेरे बाहेरून आणायचे आणि संजय नावाच्या माणसाला किती दिव्य दृष्टी होती आणि पुण्यातल्या एका माणसाला मंगळावरचं सारं दिसतं यात गुंतून राहायचं.

गरिबी का आहे? कारण भारतात बुद्ध नावाच्या माणसानं गोंधळ घातला आणि नंतर मुसलमान आणि ख्रिश्चनांनी वाट लावली. गरिबी का आहे? तर भारतात पुरेशी मंदिरं नाहीत, भारतीय माणूस पुरेसा हिंदू नाही म्हणून.

असो.

कितीतरी देशांनी गरिबी नाहीशी केली. भारताला ते जमत नाहीये. असू दे. भारतात मनाची श्रीमंती तर आहे. भारतात आध्यात्मिक श्रीमंती तर आहे. ती कुठंय अमेरिकेत, ती कुठंय चीनमधे किंवा दक्षिण कोरियात किंवा सिंगापूरमध्ये?

आम्ही सुखी आहोत.

बस्स.

**– निळू दामले**

भ्रमणध्वनी : ९८२०९७१५६७


माणूस हा प्रयोगशील प्राणी आहे. म्हणजेच प्राण्यांच्या बाबतीत प्रयोग करणारा तो प्राणी आहे. आणि उंदीर, विशेषतः पांढरे उंदीर हे तर अशा प्रयोगांसाठी आदर्श मानले जातात. पण यात उंदरांच्या मनाचा किंवा भावनांचा विचार केलेला असतो का? त्यांच्या जगात जाऊन त्यांच्या भावनांचा आणि आयुष्याचा वेध घेण्याचा हा एक अभिनव प्रयोग.





अभिनंदन !! आपल्या आंदोलनाला सरकारने त्वरित प्रतिसाद दिलाय. त्यानुसार आता सशांवर होणारे प्रयोग तूर्त थांबवले आहेत !

# रॅट रेस

**असीम कुलकर्णी**




असं म्हणतात की हळूहळू सर्व प्रयोग **ह्याच** माउस वर होतील !!



तरी मी तुला सांगत होतो... ऑरगॅनिक पदार्थांची चव बरी नसते।



इतकी औषधं, इंजेक्शन्स, शॉक थेरेपी देऊनसुद्धा त्यांना माझी शेपटी काही नाहीशी करता आली नाही।






शास्त्रज्ञांच्या दृष्टीने आपण महत्वाचे प्राणी असलो, तरी
मांजरीच्या दृष्टीने मात्र आपण फक्त अन्नच ।।



लक्षात ठेवा वंशवाद आहेच..।। कारण तुम्ही रोग पसरवता आणि
आम्ही त्यावर उपाय शोधतो ।।





# लावण्यवती लावणी

**संजीवनी खेर**

*असं आहे तर मग हा विषय आता का? रंजन आणि ज्ञानप्रसारण तर आता व्हॉट्सॲप विद्यापीठ करत आहेच, ओटीटीसारखी माध्यमं देशविदेशातील विविध विषय तुमच्या-आमच्यापर्यंत सहज पोचवत आहेत. चित्रपट-नाटक आपल्याला कलानंद भरभरून देत आहेत. मग तमाशाचं काय एवढं वैशिष्ट्य? कशाला अस्तंगत कलेसाठी -जिची उपयोगिता, ओढ संपलीय- तिच्यासाठी कढ काढायचे? त्याचं साधंसरळ उत्तर आहे, आपल्या ह्या समृद्ध कलेचं वैभव डॉक्युमेंट करून ठेवणं हे ह्या पिढीचं कर्तव्य आहे.*

**आ**पल्या संस्कृतीत शृंगाराला महत्त्वाचे स्थान आहे. कामशास्त्र मुळी शंकरानेच पार्वतीला सांगितले होते. आपल्याकडे त्याला पापभावना कधीच चिकटली नाही. त्यामुळे संस्कृत काव्य नाटके शृंगाररसाने भरलेली आहे. परंतु हे सारे अभिजनांपुरते मर्यादित राहिले. उत्तरेत मुसलमानी अंमलात दरबारी नृत्यगायन होई, इथे नि सर्वत्र बहुजन मात्र करमणुकीपासून वंचित राहत असत. ह्या कमतरतेतून बहुजनांनी अनेक कलाविष्कार निर्माण केले. लोककलांचा उगम असाच झाला असावा. प्रत्येक प्रांतात असे कलाविष्कार दिसतील. आपल्याकडे तमाशा हा कलाप्रकार पूर्वास्पृश्यांनी पुढे आणला. सैनिकी छावण्या ह्या त्यांचे पहिले श्रोते, आश्रयदाते होते. नंतर त्यांच्यातील कला पाहून दरबारी त्यांची वाहवा होऊ लागली. पेशवाईत पेशवे वा इतर सरदार-दरकदारांनी त्यांना आपल्या आश्रयाने उत्तेजन दिले. त्या काळच्या प्रतिभावंतांच्या लावण्या, पोवाडे, वग, गवळणी, कलगी-तुरा आणि इतर अनेक प्रकार आजही वाखाणले जातात. लोककलेला सरकारी प्रोत्साहन मिळाल्याने त्याचे प्रयोग देशविदेशात होऊ लागले, प्रतिष्ठा मिळाली. पण? समाजाची जीवनपद्धतच आमूलाग्र बदलल्याने नव्याने ह्या कलेत प्रयोग होणे कमी कमी होत गेले. लोकाश्रय आटला. नवनवे मनोरंजनाचे प्रकार हाताच्या तळव्यावर येत गेल्याने लावणी, तमाशा ही अस्सल मराठी कला मावळू लागली. समजा ह्या दगडांच्या देशात असे झालेही तरी लावणीच्या काव्याचे तारुण्य ओसरणार नाही. कदाचित त्या समवेत येणारे अनेक नाट्यनृत्याविष्कार, सवाल-जवाबासारखे प्रकार संपतील. कारण त्यातील आध्यात्मिक अंश आता वापरून रसहीन झाल्यागत वाटतोय. पण अगदी अस्सल शृंगारिक



समजल्या जाणाऱ्या लावणीतही आध्यात्मिक अंश असतोच, मग तो राधाकृष्णाचा शृंगाराचे रूप घेऊन येत असेल वा नल-दमयंती, हरिश्चंद्र-तारामतीसारख्या पौराणिक कथांच्या अनुषंगाने येत असेल. जुन्या होनाजी-बाळा, राम जोशी, अनंत फंदी, नरहरी यांच्या लावणीतही स्त्रीच्या तारुण्याने मुसमुसलेल्या देहाची वर्णने वाचली तरी त्यातील साहित्यिक गुणांचा परिपोष नजरेत भरतो.

असे आहे तर मग हा विषय आता का? रंजन आणि ज्ञान प्रसारण तर आता व्हॉट्सअॅप विद्यापीठ करत आहेच, ओटीटीसारखी माध्यमे देशविदेशातील विविध विषय तुमच्या आमच्यापर्यंत सहज पोहचवत आहेत. चित्रपट-नाटक आपल्याला कलानंद भरभरून देत आहेत. मग तमाशाचे काय एवढे वैशिष्ट्य? कशाला अस्तंगत कलेसाठी -जिची उपयोगिता, ओढ संपलीय- तिच्यासाठी कढ काढायचे? त्याचे साधेसरळ उत्तर आहे, आपल्या ह्या समृद्ध कलेचे वैभव डॉक्युमेंट करून ठेवणे हे ह्या पिढीचे कर्तव्य आहे. विद्यापीठ आणि अन्य व्यासपीठांवरून हे काम होत आहे, पण सर्वसामान्यांपर्यंत हे गेल्याखेरीज ते भावी पिढ्यांना कळणार नाही. यास्तव हा प्रयत्न!

मराठी अभिजनांनी ग्राम्य ठरवलेल्या तमाशाला, त्यातील लावण्यांना डोक्यावर घ्यायला सुरुवात केली ती होनाजी-बाळाच्या नि रामजोशीच्या गाण्यांपासून. 'लटपट लटपट तुझं चालणं ग मोठ्या नखऱ्याचं, बोलणं ग मंजुळ मैनेचं' आणि 'सुंदरा मनामधी भरली जरा नाही ठरली मोत्याचा भांग' ह्या गीत बनलेल्या लावण्यांनी.

'छबीदार सुरत देखणी, जणू हिरकणी, नार गुलजार'चे शब्द आणि सूर घुंगरांच्या छनछनाटासह, स्वर ढोलकीच्या तालावर कानावर आले की रसिक खास करून पुरुषवर्ग सावरून बसत असे. ह्या लोकविलक्षण नृत्यनाट्याचे अनेक आविष्कार महाराष्ट्राने मनमुराद पाहिले, ऐकले आहेत. हो, हा लोककलेचा छनछनाट एकेकाळी फक्त मर्दांसाठी असायचा. कुणी गर्तीची स्त्री तिकडे वळायची नाही. उलट तिच्या मनात ह्या कलाविष्काराबद्दल राग असायचा. तेथे नाचणाऱ्या पोरी ह्या आपल्या घरच्या पुरुषांना नादी लावायला टपून बसल्या आहेत ह्याची त्यांना खात्री होती. बऱ्याचदा तसे होतही असे. तारुण्य, देखणेपणा आणि नाचाने भुललेले पैसेवाले गडी बेभान होऊन घरदार, पोरेबाळे विसरून नादी लागत आणि संसाराची वाताहत करत.

एकेकाळी मराठी सिनेमा तमाशापट म्हणूनच गाजत असे. एक तर अगदी सोज्वळ घरगुती विषयांवरचे चित्रपट असत किंवा लीला गांधी, जयश्री गडकर यांचे तमाशापट लेखक दमदार कथा सादर करत, जबरदस्त नृत्यगायन आणि लावण्यवती नायिकांमुळे ते लोकप्रिय होत. दुसरीकडे खानदानी घराणी, सुनालेकींच्या कथा मराठी मनाला भूपाळ्या, तुळशी वृंदावन, पातिव्रत्य यांचे संस्कार चित्रपटातून देत! भालजी पेंढारकर, ग.दि. माडगूळकर, सुधीर फडके, व्ही. शांताराम, ग.रा. कामत इत्यादी प्रतिभावंतांनी नवीन सुशिक्षित मध्यमवर्गाची गरज भागवायला सुरुवात केली होती.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात नवनवे रंजनाचे प्रकार येऊ लागले. जे सर्वांनाच कमी मूल्यात अन् समाजमान्यतेसह उपलब्ध होऊ लागले. सिनेमा, संगीत नाटके लोकरंजनात अग्रेसर होऊ लागली. तरीही रंगमंचावर सादर होणारा तमाशा लोकप्रिय होताच. अनेक शासनप्रणित स्पर्धांमधून, काही मंत्री आणि धनाढ्यांच्या प्रोत्साहनातून ह्या कलेला ऊर्जितावस्था आली असे वाटू लागले. अशा लावणी महोत्सवातून आपली लावणी सातासमुद्रापारदेखील गेली. परंतु पाहता पाहता समाजाची अभिरुची पालटू लागली. मुळात शेतीप्रधान समाज यांत्रिकीकरणाने गावात वा शहरात वेगळ्या रंजनाकडे वळू लागला. पूर्वीची गण, गौळण, कलगी-तुरा, वगनाट्य, लावणी, भैरवी अशा प्रकारात सादर होणारी, डफ-हलगी यांच्या साथीने रंगणारी लावणी हळूहळू रंग हरवू लागली. नऊवारीत ज्यांचे सौंदर्य खुलत असे पण नऊवारी पडद्याआड जाऊन प्रेक्षकाच्या अवतीभवतीची तरुणी पाचवारी वा पंजाबी पोषाखात लुभावू लागला. अशा पोषाखात पारंपरिक लावणी किती दिवस आकर्षित करणार होती? वास्तविक

तमाशाचे फड हे शेतीकामातून उसंतीच्या काळात लागत आणि कला सादर होत असत. आता साऱ्यांच्या वेळेचे गणित शहरात मिलच्या भोंग्याने सुरू होई. गावातील तरुणही धोतर, इरलं नि घोंगडीत शेती करत नव्हता. जसा त्याचा शिपाई वेष बदलला तसेच त्याची वृत्तीही बदलली. सिनेमाने 'कुठं कुठं जायाचं हनिमूनला, राया' ही रेखाची दिलखेचक लावणी सादर करून लोकांची झोप उडवली होती. थोडक्यात काळाबरोबर लावणीही बदलणे गरजेचे झाले!

तमाशा निर्माण झाला तो अभिजनांच्या कलासादरीकरणाहून हटके, लोकाभिमुख रंजनाच्या गरजेतून. तमाशा आणि शाहीर दोन्ही शब्द उर्दू आणि अरबी भाषेतून आले. महिनोन्‌महिने घरच्यांपासून, संसारसुखापासून दूर असलेल्या शिपाईगड्याच्या मनोरंजनाकरता छावणीसमोर आजूबाजूच्या डोंबारी, गोंधळी, कोल्हाटी, कंजारभट समाजाचे लोक मनोरंजनार्थ खेळ करून दाखवत. तमाशात पूर्वास्पृस्यांचे योगदान महत्त्वाचे आहे. तमाशा शब्द 'सुंदर दृश्य' ह्या अर्थी आहे. ह्या रंजन प्रकाराला शिपाई लोक तमाशा म्हणत. शाहीर हा शब्दही शायरपासून आला. मुळात त्यापूर्वी विधीनाट्यप्रकार होत असेच. तसेच गोंधळ होत असे. त्यात संगीत, वाद्यांचा आकर्षक वापर होत असे. त्यापूर्वीही मुसलमानी वस्तीत, फौजांच्या छावण्यांत, चव्हाट्यावर करमणुकीसाठी विविध करमणुकीचे कार्यक्रम होत असत. दौलतजादाही होत असे. मांग, गारुडी समाजातल्या देखण्या बायकाही गातनाचत असत. त्या बायकांचे नाचाचे प्रकार इराणी, अरबी लोककलांतील प्रकारासारखे असत. त्यामुळे ह्या प्रकाराला प्रतिष्ठा नव्हती. कलगी, तुरा हे शब्दही तुर्की भाषेतून आले पण आविष्कार अस्सल मराठी होता. आध्यात्मिक घाट ह्या कला प्रकाराला होता.



**लावणीनं बदलायचं म्हणजे नक्की काय करायचं हे कुणाला स्पष्ट नाही. त्यातील अस्सलपणा त्यात भलेही पुरुषरंजन असेल, स्त्रीला फक्त उपभोगाचे साधन मानणाऱ्या समाजाचा दर्पण असेल, केवळ देहाकर्षणाला साद असेल, पण त्यात अस्सल असोशीही आहे. हे एकेकाळचं वास्तव होतं. आपल्या स्वजनांच्या विरहाची आग शमवण्यासाठी शोधलेला मानसिक नि शारीरिक आधार होता. रंगेल रगेलपणाचा ध्यास होता. त्यात कोण शोषित शोषक होतं त्यांचं तेच जाणे.**

देवतेच्या जागरणात असलेले आराध्याचे स्तुतीस्तवन जागरण, गोंधळ ह्या प्रकारात प्रचलित होते. त्यातूनच सवाल-जवाब, कलगी-तुरा निर्माण झाले. संपूर्ण तमाशाच्या सादरीकरणात गण-गवळण

असो वा कलगी-तुरा साऱ्यात आध्यात्मिक कूट विचारले जाई आणि कलाप्रकाराची रंगत वाढत जाई.

सवाल-

*दगडालाही पोर झाली असं कोणतं कातळ गं*
*त्या दगडाचा नातु कोणता सांग सावरून पातळ गं*

जबाब-

*गौरीहराचा पिता सासरा एक हिमालय होता रं*
*आणि हिमालयाचा नातु गणपति गिरिजा त्याची माता गं*

सवाल-

*थंडगार तो स्पर्श असुनी विस्तव पोटी दडलेला*
*असा कोणता अजब मामला पाण्याखाली दडलेला*

जबाब-

*खळाळणाऱ्या सरितेपोटी लपे तळाला गारगोटी*
*थंडगार तो स्पर्श असुनि विस्तव धरितेच्या पोटी-*

असे प्रेक्षकाला बुचकळ्यात पाडणारे लटके भांडणही रंगत असे.

फक्त नटवी नार येऊन अंगविक्षेप नृत्यादि करून प्रेक्षकांना गुंगवणे नसे. हे क्रमाक्रमाने येई. ढोलकीफडाचा आणि संगीतबारीचा तमाशा असे विविध भागांतील प्रकार ह्यात आहेतच. खानदेशी तमाशा, मराठवाडी तमाशा, वाईदेशी, खडी गंमत असे प्रकार आहेत. पण पेशवाईच्या काळात आणि राजेरजवाड्यांच्या दरबारात नृत्य अदाप्रधान तमाशाला प्राधान्य आले. बैठकीची लावणीही लोकप्रिय झाली सुरुवातीतील ह्या गाण्याचा प्रकार पंत-संत काव्याशी जुळलेला असे. पण हेच शाहीर शृंगारिक लावण्यांनी त्यात अधिक रंग भरू लागले. ह्या शायरांनी शृंगारिक वर्णने, विलासाची चावट वर्णने हेही लावणी सादरीकरणाचा भाग केले. बदलत्या काळात शृंगाराला सिनेमातील द्विअर्थी वक्तव्याने नि काव्याने चहाटळ केले. समाजातील विशिष्ट वर्गाच्या लोकांनी ते डोक्यावर घेतले.

'लटपट लटपट तुझं चालणं, मोठ्या नखऱ्याचं बोलणं ग मंजुळ मैनेचं नारी गं, गगगग' ह्या पंडितराव नगरकरांच्या गाण्याने रसिकांना नादावले होते. 'कुण्या गावाचं आलं पाखरू, बसलंय झोकात नि बघतंय...', 'बुगडी माझी सांडली ग', 'ऐन दुपारी यमुनातीरी खोडी कुणी काढली, बाई माझी करंगळी मोडली' ह्यात कृष्णाच्या खोड्या पण कामुक भाव समोरच्याला उद्देशून असे.

*'कसं काय पाटील बरं हाय का?'*
*'सोळावं वरीस धोक्याचं'*

ह्या सगळ्या गाण्यांचा आवाज सोज्वळपणे लावणी सादर करणाऱ्या सुलोचना चव्हाण ह्यांचा असे. त्यांच्या आवाजात लावणीचा ठसका असे, आर्जव असे, यथोचित खोडसाळपणा असे, कामुक आव्हान असे. सारे चित्र डोळ्यांसमोर उभे करायचे सामर्थ्य असे. त्यांचे 'तुझा ऊस वाढला जोमानं, आवतणं कोल्ह्याला, तुझ्या उसाला लागलं कोल्हा' असो वा 'सवाल माझा ऐका' ह्यातील जयश्री

गडकर नि अरुण सरनाईकचा कलगी-तुरा कोण विसरू शकेल? पण त्यातील अनेक उत्तरे आजच्या स्त्रीवाद्यांना पटणं शक्य नाही.

‘दिवस ठंडीचं असून नार नवतीची घासानं झाली ओली, मला सोसनं इथली हवा. राया घेऊन जाणार कवा?’

जयश्री गडकर, तितक्याच ताकदीने मागे असलेल्या तिच्या साथीदार मुली नाचताना पाहणे हा कुणाही रसिक प्रेक्षकाला नजराणा वाटला तर नवल नाही. ह्या नृत्य नाट्यात नाच्याची नगण्य वाटणारी भूमिका नि नृत्य नक्कीच महत्त्वाचे होते. ह्या संचात तुफान नृत्य, अदा यांनी रसिकांना वेड लावण्याचं काम नक्कीच केलेय.



बदलत्या काळात चित्रपटांनी नाच्याची होणारी कुचंबणा फार प्रभावीपणे ‘नटरंग’मध्ये अतुल कुलकर्णीने दाखवली आहे. ह्या चित्रपटाला आजच्या काळातील महत्त्वाचा तमाशापट म्हणायला हवा. त्यातील लावण्या ह्या आज लावण्यांची पताका उंच फडकावत आहेत. ‘कशी मी जाऊ मथुरेच्या बाजारी’ असो अथवा ‘अप्सरा आली, इंद्रपुरीतून खाली, पसरली लाली’, ‘जाऊ द्या ना घरी आता वाजले की बारा’ ही दिलखेचक लावणी, आज लावणीचो लावण्य हरपले असे वाटताना झळाळून समोर येतं.

*सोन्यात सजले रूपात भिजले चांदणं अंगी ल्याले*
*कोमल काया ही मोहमाया पुनव चांदण ल्याले...*
*नटली थटली जशी उमटली चांदणी रंगमहाली*
*मी यौवन बिजली पाहुनी थिजली इंद्रसभा भवताली*
*अप्सरा आली आली इंद्रपुरीतुन खाली*
*पसरली लाली रत्नप्रभा तनु ल्याली*
*ती हसली गाली चांदणी रंगमहाली*
*...सांगते उमर कंचुकी, बापुडी मुकी, सोसते भार*
*शेलाटी खुणावे कटी तशी हनुवटी नयन तलवार*
*ही रती मद भरली, दाजी ठिणगी शिनगाराची*
*कस्तुरी दरवळली दाजी झूळुक ही वाऱ्याची*
*पसरली लाली, रत्नप्रभा तनु ल्याली*
*ही हसली गाली चांदणी रंगमहाली*
*अप्सरा आली पुनव चांदणं ल्याली...*

मदमस्त करणारे सौंदर्य, तितकीच झपाटलेली नृत्यकला, अफाट संगीत ह्यांमुळे ही गुरू ठाकुरची लावणी आजच्या काळात मूळ लावणीचे संपूर्ण साजसंगीत नेसून आली आहे.

काळ बदलला. तमाशाचे रूप आताच्या तरुण पिढीला भावेनासे झाले असेलही. पण अस्सल लावणीतला शृंगार, तारुण्याला दिलेली कामुक हाक कधीच वाया जाणार नाही. जशी गदिमांची उदास लावणी ‘जोगिया’. ‘कोन्यात झोपली सतार सरला रंग, पसरली पैंजणे सैल टाकूनि अंग... मी देह विकुनिया मागुनि घेते मोल, जगविते प्राण ओपुनिया अनमोल, रक्तात रुजवल्या भांगेच्या मी बागा, ना पवित्र... देही तिळाएवढी जागा. ...हा विडा घडवुनि करिते त्याचे ध्यान, त्या खुळ्या प्रीतीचा खुळाच हा सन्मान; ही तिथी पाळते व्रतस्थ राहुनि अंगे, वर्षात एकदा असा जोगिया रंगे’ ही जरा सोफॅस्टिकेटेड वाटते ना? पण तिची लसलसणारी नाजुक खंतही नेमकी दाखवते. रसिक मनाला स्पर्श करते. ह्या लावण्यामागची वेदना टिपते. आज ह्या लोककलेची अवहेलना बदललेल्या काळामुळे होतेय. नुसते तमाशापट बदलून काय होणार? अध्यात्म आणि काम प्रेरणा ह्यांचे महत्व अनादि काळापासून आहे. त्याचे प्रतिबिंब लावणीत पडलेले आहे. त्याचे डॉक्युमेंटशन व्हायला हवे. पुढच्या पिढ्यांना हे अस्सल रुपात कळायला हवे. पण आज अनेकदा लावणीच्या नावाखाली हिडिस प्रकार, कपडे घालूनही जणू नग्न नृत्य केल्याचा आभास निर्माण करण्याचा प्रकार होताना दिसतो. यमुनाबाई वाईकर म्हणत, ‘‘आम्ही अंगभर कपडे घालून जी शृंगारभावना प्रेक्षकांपर्यंत पोहोचवत होतो; ती आता कपडे उतरवायला लागूनही आजच्या मुली पोहोचवू शकत नाहीत.’’

लावणीने बदलायचे म्हणजे नक्की काय करायचे हे कुणाला स्पष्ट नाही. त्यातील अस्सलपणा त्यात भलेही पुरुषरंजन असेल, स्त्रीला फक्त उपभोगाचे साधन मानणाऱ्या समाजाचा दर्पण असेल, केवळ देहाकर्षणाला साद असेल, पण त्यात अस्सल असोशीही आहे. हे एकेकाळचे वास्तव होते. आपल्या स्वजनांच्या विरहाची आग शमवण्यासाठी शोधलेला मानसिक नि शारीरिक आधार होता. रंगेल रगेलपणाचा ध्यास होता. त्यात कोण शोषित शोषक होते त्यांचें तेच जाणे.

एक मात्र नक्कीच खरेय, की ह्या खडबडीत दगडांच्या देशात हळुवार भावनांचे, रसिकेतेचे झरे वाहत होते. ज्याचा सुगंध आजही आपल्याला शब्दांतून घेता येतो. हे सारे उपलब्ध झालेल्या तुलनेने स्वस्त दृकश्राव्य माध्यमांतून, यूट्यूबसारख्या माध्यमातून जतन करायला हवे असे तीव्रतेने वाटते.

**– संजीवनी खेर**
भ्रमणध्वनी : ९८२१४११४७२, ३५६३९५४४
sanjeevanikher@gmail.com

# माध्यमासुराला माणसाळवणे शक्य आहे!

**दिनकर गांगल**

*टेलिव्हिजननंतर कॉम्प्युटर, मोबाइल ही तंत्रसाधने उपलब्ध झाली आणि गेल्या चार दशकांत, ऑल्विन टॉफलरलासुद्धा बहुधा न जाणवलेली 'चौथी क्रांती' घडून आली; तसे म्हणण्यापेक्षा ती घडत आहे असे म्हटलेले योग्य ठरेल. माणूस उत्क्रांतीने घडला असे सांगितले जाते ना? सध्या माणूस नावाचे यंत्र (तंत्र)क्रांतीतील मुख्यत: मीडिया नावाच्या प्रकाराकडून घडत आहे! त्याच्या भावभावना, संवेदना झपाट्याने हरपत आहेत आणि एक नवी जीवजात – सुपर ह्युमन – जन्माला येत आहे अशीच सुप्त भावना जगभर आहे.*

**मी** एकोणीस वर्षांचा असताना, कॉलेजचा विद्यार्थी म्हणून पुण्याच्या 'सकाळ'मध्ये शिकाऊ पत्रकार अशी नोकरी पत्करली; आणि आता, ब्याऐंशी वर्षांचा असताना, गेली दहा वर्षे मी स्वत:च 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम' या वेबपोर्टलचा पसारा, मोठे उद्दिष्ट मनात ठेवून हौसेने मांडला आहे. माझे मुख्य आयुष्य वाचनव्यवहारात वृत्तपत्रसृष्टी व पुस्तकनिर्मिती म्हणून मुद्रित शब्दांबरोबर गेले. पण मी 'प्रभात चित्र मंडळा'चा कार्यकर्ता म्हणून चित्रपट प्रदर्शनाचा अनुभव घेतला, काही पुस्तकांचे ऑडिओपट प्रयोग म्हणून करून पाहिले, सृजन फीचर्स प्रा. लिमिटेडचा सदस्य निर्माता म्हणून 'दूरदर्शन'साठी लघुपटनिर्मितीच्या कष्टदायक पण सभोवतालचे जग विसरण्यास लावणाऱ्या प्रक्रियेतून गेलो आणि आता 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम' हे वेबपोर्टल... या प्रत्येक ठिकाणी माझा संबंध संयोजन-संपादन म्हणजे 'कण्टेण्ट'ची निर्मिती आणि वाचक-श्रोते-रसिक यांचा प्रतिसाद यांच्याशी जास्त राहिला आहे. त्यांतील तंत्रज्ञानाशी मी निरीक्षणापुरताच संबंधित असे.

दोन न जमलेले प्रयोग लिहितो. पस्तीस-चाळीस वर्षांपूर्वीची गोष्ट. एक साप्ताहिक सुरू करण्याचा घाट घातला होता. 'महाराष्ट्र टाइम्स'च्या नोकरीत उत्तम चालले होते, 'ग्रंथाली'तील लौकिक वाढत होता. साप्ताहिकाचा फायनान्स वांद्र्याच्या श्रीमंत बाई देण्याची शक्यता होती. त्या काळात एकूण खर्चाचे प्रमाण दशहजारांत असे. आम्ही विजय तेंडुलकर यांना संपादक म्हणून मुक्रर केले. त्यांना घेऊन वांद्र्याच्या बाईंकडे गेलो. तेंडुलकर यांनी तेथे एक वेगळाच मुद्दा उपस्थित केला. म्हणाले, मी नाटककार-लेखक म्हणून माझा नावलौकिक आहे. म्हणूनच मला तुम्ही संपादक नेमत आहात. माझ्याच तोडीचे नाव असलेला एक सर्क्युलेशन मॅनेजर

पाहा. तरच साप्ताहिक यशस्वी होईल. मग मी तुमच्या या साहसात सहभागी होतो. तेंडुलकरआमच्या 'ग्रंथाली' या ना नफा उपक्रमाचे अध्यक्ष होते. तेथे त्यांची काही अट नव्हती, पण 'कमर्शियल व्हेंचर' म्हटल्यावर ते तेथे प्रत्येक घटकाबाबत सावध होते.

माधव गडकरी 'लोकसत्ता'चे संपादक झाले. मी तेथे सहसंपादक म्हणून यावे म्हणून मला त्यांनी बोलावून घेतले. 'गाव तेथे ग्रंथालय' आणि 'गाव तेथे पाणी' अशा योजनांसाठी कॅम्पेन करण्याचे त्यांच्या मनात होते. त्यांनी तसे अग्रलेखही लिहिले होते. माझ्याही जिव्हाळ्याचे ते दोन्ही विषय. तेव्हा संभाव्य नेमणुकीची चर्चा करत असताना ते एक अर्थपूर्ण वाक्य बोलले. म्हणाले, मी 'लोकसत्ता'त संपादक म्हणून आलो तेव्हा 'लोकसत्ता'चा अर्धा सर्क्युलेशन मॅनेजर झालो असेच समजतो! कारण मी संपादक म्हणून जो खटाटोप येथे करणार तो जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोचवण्यासाठी श्रम मी घेतले नाहीत तर त्या संपादकपदाच्या कामाचा उपयोग काय?

वाचक-प्रेक्षक-रसिक हा घटक महत्त्वाचा हे त्यावेळीही कळत होते, पण वळत नव्हते हे खरे. स्वत:ची खाज महत्त्वाची वाटे. प्रत्येक संवेदनशील तरुणाला त्याच्या हातून त्याच्या कौशल्याने लोकोपयोगी काम घडावे अशी ती आच असे. तो काळच विविध विचारांनी भारले जाण्याचा होता. राजकीय व सामाजिक क्षेत्रांतील व्यक्तींचे जीवन साधे पण अर्थगर्भ असे. त्याचा परिणाम संवेदनशील तरुणांवर स्वाभाविक होई. एकूण जीवन कमी खर्चाचे व काटकसरीचे होते. त्यामुळे नव्या कोणत्याही उपक्रमाकडे पाहण्याचा विचार त्या धर्तीने होत असे. प्रत्येक गोष्ट जीवन घडवण्यासाठी म्हणून असे. हौस, विरंगुळा असा जीवनात नव्हताच. ते घटक अनुषंगिक येत.

**मला जे समाजदर्शन होते त्यावरून जाणवते, की सर्वत्र अराजक आहे. भौतिक पातळीवर आणि मानसिक पातळीवरही. मीडियाचा गलबला सध्याच्या या अशांततेस व अस्थिरतेस बराच कारणीभूत आहे. त्या उलट, जनतेला एका सरळ मार्गाचा शोध आहे, जेथे शांतता असेल- सुस्थैर्य असेल. मानवी इतिहासात अशा वेळी नवे तत्त्वज्ञान निर्माण झाले. ती ताकद माध्यमातून मिळू शकते, माध्यमे तशी उपयोगात आणली तर! लक्षात घ्या, की रामायण, गीता, ज्ञानेशरी, संविधान ही माध्यमेच आहेत.**

साप्ताहिक वा दैनिक या माध्यमाचा विचार केला तर निर्माता व त्याचा आस्वादक-ग्राहक समुदाय म्हणून दोन वेगवेगळे घटक स्पष्ट दिसत. ते एका मोठ्या काळासाठी निरखता आले. श्री.ग. माजगावकर यांच्या 'माणूस' या साप्ताहिकाच्या बाबतीत ते मी मित्रभावाने जाणू शकलो होतो. वाचकांची संख्या कधी मंदावत असे, कधी एकदम फुगवटा येई व यश सामोरे दिसे. सततचे, दीर्घकालीन यश असे त्या साप्ताहिकास लाभले नाही. परंतु त्या साप्ताहिकाचा व माजगावकर यांचा वाचकांवर प्रभाव मोठा होता. तो चाळीस वर्षे उलटली तरी अजूनही जाणवतो. तीच गोष्ट गोविंद तळवलकर यांची. त्यांचाही प्रभाव विद्वान म्हणून मोठा आहे. पुस्तकनिर्मितीचे दैनिक-साप्ताहिक चालवण्यासारखे नसते. मराठीत तीन-चार प्रकाशक सतत मोठे व यशस्वी होत गेलेले दिसतात. बंगाली लेखक शंकर यांनी भारतीय प्रकाशक संघाच्या अध्यक्षांना एका बैठकीत सुनावले होते, की लेखकाने पंचवीस पुस्तके लिहिली तरी तो गाडी घेऊ शकत नाही, पण तेवढीच पुस्तके निर्माण करणारा प्रकाशक बंगला बांधतो आणि गाडी घेण्याचे स्वप्न पाहतो!

**संवादासाठी माध्यम**

लेखक लिहितो ती कृती त्याची स्वत:ची त्याच्यापुरती असते. ते लेखन समाधानकारक झाल्यावर त्याला ते कोणाला तरी वाचण्यास द्यावेसे वाटते व माध्यम अवतरते; म्हणजे संवाद, संभाषण या क्रिया सुरू होतात. तशातूनच मुद्रण व प्रकाशन व्यवहार मोठा होत गेला आणि लेखक मराठीपुरते गेल्या दोनशे वर्षांत विविध मुद्रित माध्यमांतून व्यक्त होत राहिले- दैनिक, साप्ताहिक, पाक्षिक, मासिक, पुस्तक आणि त्या प्रत्येकाचे किती प्रकार-उपप्रकार! जांभेकर ते आंबेडकर ही सव्वाशे वर्षे तो लेखन-प्रकाशन व्यवहार तसाच चालत आला होता. त्याशिवाय कथन-श्रवण या प्रकारचा संवाद त्या काळात होता. त्यातून कीर्तने-प्रवचने, व्याख्याने -त्यांच्या माला, भाषणे, परिसंवाद-त्यांचे प्रकार, परिषदा घडत राहिल्या. माहिती व ज्ञान यांचे संक्रमण होत राहिले. गेल्या शतकाच्या तिसऱ्या-चौथ्या दशकात आकाशवाणी आली व तेच प्रकार नभातून लहरींवर आरूढ होऊन श्रोत्यांपर्यंत पोचत राहिले. आकाशवाणीवरील श्रुतिका, नभोनाट्ये, रेडिओ सिलोनवरील बिनाका गीतमाला, पुराने फिल्मों के गीत आठवून पाहावे. कॅलिफोर्नियातील मंदार कुलकर्णीने पॉडकॉस्ट टेक्नॉलॉजी वापरून तो प्रयोग सफल रीत्या आधुनिक काळात गेले वर्षभर चालवला आहे. त्या आधी मराठीतील पहिला इंटरनेट रेडिओ कॅलिफोर्नियातूनच अतुल वैद्य यांनी सुरू केला. ते आता तो रेडिओ नाशिकहून चालवतात. बँकर विशास ठाकूर यांनीदेखील रेडिओ नाशिकहून चालवला आहे. त्या दोन्हीचे श्रोते जगभरात आहेत. आकाशवाणीचा आरंभ होण्याआधी, गतशतकाच्या दुसऱ्या दशकारंभी दादासाहेब फाळके यांनी पहिला भारतीय चित्रपट निर्माण केला. त्याला दोन दशकांची, पटवर्धनबंधूंचे मॅजिक लँटर्न वगैरेची, पोर्शभूमी होती. फाळके यांचे चित्रपटनिर्मितीच्या पहिलेपणाचे श्रेय खेचले जाईल असे आणखी काही महत्त्वपूर्ण प्रयोग त्या दोन दशकांत झाले. परंतु माध्यम, माध्यमांतर अशी चर्चा त्यावेळी झाली नाही; नंतर ती सुरू झाली ती कलेच्या अंगाने. त्यात 'बिझनेस अँगल' नव्हता. आता, कलाविचार जाऊन मीडियाविचार आहे आणि मीडिया हा 'बिझनेस'च होऊन गेला आहे.

आकाशवाणी सरकारी होती, तसेच टेलिव्हिजन म्हणजे दूरदर्शनही सरकारपातळीवरच साठच्या दशकात सुरू झाले, मुंबईत ते १९७२ साली पोचले. त्यानंतर जेमतेम पंधरा-वीस वर्षांत त्यात खाजगीपण आले. तेथे माध्यम नावाचा राक्षस प्रथम जाणवला. 'ग्रंथाली'ने तेव्हा 'दूरदर्शनचे आक्रमण' असा विषय घेऊन परिसंवाद योजला होता. त्या शब्दयोजनेवरून त्या काळची लोकभावना लक्षात येईल. आकाशानंदांपासून अशोक रानडे यांच्यापर्यंत मोठे लोक त्यात

सहभागी होते. लेखन-मुद्रण-वाचन किंवा भाषण व श्रवण यांच्या मर्यादित संधी निवडक सुशिक्षितवर्गात गेल्या शतकाच्या पूर्वार्धात होत्या. त्या संधी त्यानंतर, उत्तरार्धात दशकागणीक वाढत गेल्या. गेल्या तीस-पस्तीस वर्षांत कॉम्प्युटर-इंटरनेट-मोबाइल या तंत्रज्ञानाधारे किती विविध तऱ्हांची माध्यमे उपलब्ध झाली आहेत! आज मोबाइल प्रत्येक हाती असण्याच्या काळात लिहिणाऱ्या-सांगणाऱ्यांचा आणि पाहणाऱ्या-ऐकणाऱ्या-वाचणाऱ्यांचा असे दोन मोठे वर्ग तयार झाले आहेत. माझा अंदाज असा आहे, की राज्यातील दहा टक्के लोक म्हणजे सव्वा कोटी लोक प्रत्येक क्षणी त्या सर्व माध्यमव्यवहारात गुंतलेले असतात आणि अशा तऱ्हेने राज्यातील निम्मी प्रजा त्यात प्रत्यक्षात नियमित अडकलेली आहे. बाकी निम्मे लोक त्या माध्यमांचा गरजेनुसार वापर करत असतात. एकूण सर्व प्रजा मोबाइलचा उपयोग करून माध्यम व्यवहारात गुंतलेली असते व तो मोठा उद्योग माध्यम-व्यावसायिकांना वाटतो.

बॉलिवूड चित्रपट, विशेषत: सिनेमांची गाणी यांनी गेल्या शतकातील भारतीय मने पूर्णत: भारून गेली होती. तमीळ-तेलुगू-मल्याळम व काही प्रमाणात बंगाली या भाषांतील सिनेमांनी त्या त्या राज्यांत तीच भावस्थिती तयार केली होती. तमीळनाडू व आंध्र या राज्यांमध्ये तर चित्रपटताऱ्यांनी राजकारणदेखील ग्रासून टाकले. तो प्रभाव माध्यमांचाच होय. परंतु तरीदेखील माध्यम म्हणून त्यांची चर्चा होत नव्हती. 'चित्रपटांनी मराठी नाटके बुडवली', 'दक्षिणेत चित्रपटवेड वेड्यासारखे आहे' अशी वाक्ये पेट होती. जी प्रतिष्ठा रवींद्रनाथ टागोर, सानेगुरुजी, विनोबा भावे यांच्यासारख्यांना गेल्या शतकात लाभली ती अमिताभ बच्चन यास त्या शतकाच्या उत्तरार्धात व या शतकाच्या पहिल्या दोन दशकांत मिळाली, ती केवळ 'इमेज'च्या जोरावर. ती किमया माध्यमांची होय – आधी चित्रपट आणि मग टेलिव्हिजन! रवींद्रनाथांची प्रतिभा, विनोबांचा तत्त्वविचार व सानेगुरुजींची भावुकता हे गुणविशेष लोकांना स्वच्छ जाणवत होते, तशा प्रकारचे वेगळे कोणतेही गुणविशेष अमिताभमध्ये दिसून आलेले नाहीत. अर्थात तशा गुणांचे आरोपण त्याच्यावर होते. रवींद्रनाथ, सानेगुरुजी, विनोबा हे जवळजवळ शतकभर टिकून आहेत. 'अमिताभची इमेज' २०७० साली, ती निर्माण झाल्याला शतक होईल तेव्हा कोठे आणि कशी टिकून असेल? दिलीपकुमार प्रदीर्घ जीवन जगून निधन पावले, परंतु त्यांच्याबद्दलचे, म्हणजे त्यांच्या प्रतिमेबद्दलचे खूळ केव्हाच विरून गेले होते!

**प्रतिमेपेक्षा आशय महत्त्वाचा**

ज्ञानेश्वर-तुकाराम यांची महती त्यांच्या जीवितकाळापेक्षा आज अधिक गायली जाते; किंबहुना ती आणखी मोठ्या प्रमाणावर पसरेल अशीही शक्यता वाटते. त्याचे कारण वारी आणि वारकरी ही माध्यमेच होत. त्यांनी प्रेरित होऊन आजचे तरुण पत्रकारदेखील 'रिंगण'सारखे अभ्यासपूर्ण वार्षिक प्रसिद्ध करतात. पण ज्ञानेशर, तुकाराम, रवींद्रनाथ, सानेगुरुजी, विनोबा हे असे प्रदीर्घ काळ टिकले, कारण त्या प्रत्येकाकडे 'कण्टेण्ट' आहे, आशय आहे. मनुष्यजीवन सुखीसमाधानी करण्यासाठी उपयोगी पडेल असा मंत्र आहे – ती चर्चा पुढे करायचीच आहे.

टेलिव्हिजननंतर कॉम्प्युटर, मोबाइल ही तंत्रसाधने उपलब्ध झाली आणि गेल्या चार दशकांत, ऑल्विन टॉफलरलासुद्धा बहुधा न जाणवलेली 'चौथी क्रांती' घडून आली; तसे म्हणण्यापेक्षा ती घडत आहे असे म्हटलेले योग्य ठरेल. माणूस उत्क्रांतीने घडला असे सांगितले जाते ना? सध्या माणूस नावाचे यंत्र (तंत्र)क्रांतीतील मुख्यत: मीडिया नावाच्या प्रकाराकडून घडत आहे! त्याच्या भावभावना, संवेदना झपाट्याने हरपत आहेत आणि एक नवी जीवजात – सुपर ह्युमन – जन्माला येत आहे अशीच सुप्त भावना जगभर आहे. म्हणजे अन्य क्षेत्रांतदेखील, विशेषत: जीवतंत्रज्ञानात दरक्षणी नवी भर पडत सुविधा निर्माण होत आहेत. त्यामुळे मनुष्यजीवन विलक्षण सुखी होणार आहे, पण मीडियाचे आघात मनावर आहेत. म्हणूनच 'शब्द रुची'च्या संपादकांना सिनेमा, दूरदर्शन, ओटीटी अशा माध्यमांची काळजी वाटत असावी. तसे साहित्य ते जमा करत आहेत. खरे तर, ती तर प्रक्षेपणाची साधने आहेत. त्यांचे निर्माते त्या व्यवसाय-व्यवहाराची काळजी वाहतील. त्यांना नवनवीन साधनेही उपलब्ध होतील. मुद्दा आहे त्यांना ग्राहक कसे आणि किती लाभतील, कारण लोकांची गरज काय असेल याचा अंदाज हजारभर 'सेलिब्रिटी' आणि त्यांच्या बाबतच्या हकिगती जाणण्यास उत्सुक पाच-सात लाख बोलके चहाते यांना निरखून बांधता येईल का? जनमानस त्या पलीकडे असते.

इंग्लंडची राजकन्या डायना हिचा मृत्यू अपघातात झाला. मीडियावाल्यांनी तिचा पाठलाग चालवला होता व तो ससेमिरा चुकवण्यात तो अपघात घडून आला असे एक कारण सांगितले गेले. डायना लहान तरुणी. तिच्या मृत्यूनंतर अवघे जग शोकसागरात ज्या तऱ्हेने डुबून गेले, त्याला मानवी इतिहासात तोड नसावी. तो सारा एपिसोड करुणार्द्र आहे. त्याचे कारण मीडियात आहे का?

हिंदी सिनेमानटांची लोकप्रियता अफाट असते. 'वेड'च म्हणायचे ते. पण 'कहो ना प्यार है'नंतर हृतिक रोशनवर जगभरच्या भारतीयांनी ज्या तऱ्हेने प्रेम केले त्याला तोड नाही. ते मीडियामुळे कितपत घडले? त्या हृतिकला नंतर पहिल्या फळीच्या सिनेनटांतदेखील स्थान राहिले नाही.

'कोलावरीऽ कोलावरीऽऽ' हे तमीळ गाणे किती कोटी लोकांनी एका आठवड्यात उतरवून घेतले, तो विक्रम कोणी मोडल्याचे अजून वाचले नाही. तो चमत्कार मीडियाद्वारा घडला असे सांगितले जाते.

अशा चित्रविचित्र अनेक कहाण्या मीडियाच्या नावाने प्रसृत होत असतात. आधुनिक मीडियाचा प्रभाव अफाट आहे याबद्दल शंका नाही. पण त्या पलीकडे मनुष्यसमुदायात एकत्र म्हणून संवादी-विसंवादी अशी काही प्रक्रिया वेगवेगळ्या कारणांनी चालू असते का? मीडियाचा प्रभाव जाणून घेण्याच्या दृष्टीने जवळचे एक उदाहरण घेऊ. अनंतचतुर्दशीचा गणपती विसर्जनाचा धांगडधिंगा व कर्णकर्कश आवाज, त्यातील आनंदोत्साही सहभागी वगळले तर बहुसंख्य लोकांना नको असतो. त्या दिवशी कित्येक निवासी त्यांचे शिवाजी पार्क चौपाटीवरील घर सोडून विसर्जनगर्दीच्या भयास्तव बाहेरगावी जातात- जाऊ इच्छितात. बाकी लक्षावधी लोक घरी बसून असतात.

तरी त्यांचे टेलिव्हिजनवरील गणेश विसर्जनाच्या कव्हरेजकडे लक्ष असते. त्यांची भावना कव्हरेज चालू राहावे, ते अधिक रोचक व्हावे अशीच असते. कारण गणेशप्रतिमेबद्दल विविध तऱ्हांचे कुतूहल आहे. गणपती ही सद्यकाळातील उभरती, चलनातील देवता आहे. गणेशोत्सवात त्या जनतेचा जीव गुंतलेला असतो. लोकांच्या मनी गणेशाविषयी अपार श्रद्धा आहे. त्याला त्याचे गुणविशेष कदाचित जगाची देवता बनवतील असे निरीक्षण मी एका लेखात नोंदले आहे. त्या विरुद्ध नारायण राणे यांची कोकणातील यात्रा व त्यांची महाड येथील अटक... ती सर्व वाहिन्यांनी सतत दाखवली. ती एक टक्का लोकांनादेखील पसंत पडली नसेल. राज ठाकरे यांचे स्टंटदेखील टेलिव्हिजन वाहिनीवर हास्यास्पद होत असतात. ते लोक सहन करतात. त्याला फावल्या वेळचे मनोरंजन समजतात.

### माहिती आणि ज्ञान

लोकांचे विविध माध्यमांतील माहिती/ज्ञानाचे ग्रहण व आकलन किती व कसे असते याबाबत या दहा वर्षांत निरीक्षण व विचार होऊन गेला. पुस्तक-मासिक हातात घेऊन त्याचे केलेले वाचन वाचकाच्या क्षमतेनुसार त्याच्या मेंदूत शिरते व त्याचा प्रभाव पडतो. तुलनेने 'स्क्रीन'वरील, त्यातही मोबाइलच्या स्क्रीनवरील वाचनाचे ग्रहण जलद होते, परंतु आकलन बऱ्याच कमी प्रमाणात होते. त्यामुळे तरुणवर्ग माहिती चटपटीतपणे देतो, परंतु माहितीचे आकलन झाल्याची, त्याची समजूत वाढत असल्याची चिन्हे कमी दिसतात. त्यामुळे इंटरनेटवरील साधनांमधून झपाट्याने येत असलेल्या माहितीचे आकलन व ज्ञानसंकलन याचा वस्तुनिष्ठ व नीट अभ्यास होण्याची गरज आहे. सध्या असे जे अभ्यास उपलब्ध होतात ते किती 'स्पॉन्सर्ड' आहेत हे आधी तपासून पाहावे लागते. टेलिव्हिजन अवतरला तेव्हा त्याला इडियट बॉक्स म्हणत - द इंस्ट्रुमेंट दॅट मेक्स स्पेक्टॅटर इडियट. असे साधन, की जे पाहणाऱ्याला मूढ बनवते. टेलिव्हिजन वाहिन्यांवरील कार्यक्रम पाहिले, की त्यांच्या चालकांचा समज पन्नास वर्षांत जनता पुरेशी मूढ होऊन गेली आहे असाच झाला आहे असे वाटते.

**वेबतंत्रज्ञानाच्या भाषेत 'कम्युनिटी' तयार करण्याची एक गरज सांगितली जाते. त्यालाच मी सुसंस्कृत, सुबुद्ध लोकांचा समुदाय असे म्हणत आहे. त्यांच्यासमोर बोटाच्या एका क्लिकवर महाराष्ट्र समाजाबद्दलचा विशासार्ह 'डेटा' उपलब्ध झाला तर नवविचाराला किती चालना मिळेल! त्यातूनच महाराष्ट्राला, जगभर पसरलेल्या मराठी समाजाला नवी दिशा मिळेल. त्यात अनेक शक्यता आहेत. तो वेगळा तपशील आहे. येथे एवढेच म्हणतो, की महाराष्ट्राने देशाला नवी दिशा व नवे नेतृत्व नेहमी दिले आहे, कर्तबगारी दाखवली आहे. आधुनिक काळातही ते शक्य आहे - सज्जनशक्तीचे नेटवर्क करता आले तर! तो विधायक, रचनात्मक मार्गही मीडियाचाच आहे!**

### 'ओटीटी' म्हणजे निवडक?

'कण्टेण्ट' हा शब्द सध्या परवलीचा झाला आहे. ओटीटी प्लॅटफॉर्म किंवा नवनवीन तंत्रज्ञान आले तरी तो मुद्दा राहतोच, की 'कण्टेण्ट' काय असणार आहे? टीव्हीवर दाखवतात ते कार्यक्रम ओटीटीवर कोणी पाहतील का? ओटीटीवर अधिक चोखंदळ व चिकित्सक कार्यक्रम पाहण्याकडे कल असेल. ओटीटी म्हणजे 'आविष्कार'च्या छबिलदास रंगमंचासारखे किंवा वामन पंडित यांच्या 'रंगवाचा' मासिकासारखे काही असेल का! ओटीटी म्हणजे निवडक चित्रपटादी कार्यक्रमांची बँक. निवडक या शब्दाशीच कळीचा प्रश्न तयार होतो. मात्र विशेषत: मराठीसारख्या प्रादेशिक भाषांत तरी तशा प्रेक्षकसंख्येस फार मर्यादा असेल. एक काळ असा होता, की मराठी लोकांचे साहित्यिक-सांस्कृतिक जग पुल, वपु आणि सुधीर फडके यांच्यामध्ये संपून जात असे. परदेशांत गेलेल्या मराठी समुदायात ते फार ध्यानी येई. त्या त्रयीचे त्या जगातील योग्य स्थान जाणवल्यानंतरच्या परदेशस्थ मराठी भाषक पिढ्यांनी प्रथम हिंदी सिनेमा व मालिका यांत मन रमवले. परंतु तेथील मातृदेशभावना कारगील युद्धानंतर एकदम जाज्वल्य झाली. त्या ओघात सर्व देशी गोष्टींना चलती आली आणि मराठी सिनेमा-नाटकांतील नव्या प्रवाहांनाही अमेरिकेत दाद मिळू लागली आहे. अमेरिकेत स्थिरावण्यास गेलेला नवा वर्ग नव्या मराठी चित्रपटांबद्दल उत्सुक असतो असे सांगितले जाते. अमेरिकेतील एक सॉफ्टवेअर इंजिनीयर वैभव तत्त्ववादी त्या लाटेत मराठी चित्रपटसृष्टीत येऊन नट बनला आहे. महेश काळेची कथा सर्वश्रुत आहे. त्याच काळात महाराष्ट्रातील नवनव्या पिढ्या मात्र कॉम्प्युटर गेम्समध्ये वा वाहिन्यांवरील मनोरंजनात रमून गेल्या आहेत.

### चिकित्सक विचार लुप्त

माझा मुद्दा सतत राहिला आहे, की मराठी समाजात रसिकतेची जोपासना नीट झालेली नाही. येथील रसिकता भावुकतेच्या पातळीवर राहिली आहे. व.पु. काळे ही प्रमाणपट्टी. त्यापेक्षा वरील पट्टी म्हणजे पुलंचा विनोद - पण त्याहून अधिक भिडणारा जिव्हाळ्याचा हळवा सूर - बालगंधर्वांची व तत्सम गाणी, भीमसेन-वसंतरावांपासूनच्या संगीत मैफिलींच्या आठवणी आणि अनेकोत्तम मूल्यांचा आग्रह वगैरे. साधी राहणी आणि अनेकविध संस्थांना चोखंदळपणे दिलेल्या देणग्या. एका व्यक्तीची ती खूप मोठी अनुकरणीय अशी उदात्त कृती. परंतु त्यामधून अनुकरण काय झाले? प्रथापरंपरा कोणती तयार झाली? कोणत्या विधायक संस्था उभ्या राहिल्या? मी पुलंचे नाव नमूद केले, परंतु सध्या जवळजवळ रोज एका नव्या थोराची जन्मशताब्दी जाहीर होत आहे. गेल्या शतकातील या सर्व मोठ्या माणसांनी आधुनिक महाराष्ट्राचा पाया रचला. त्यांनी रुजवलेल्या कार्याची, विचारांची व मूल्यांची असते ती निव्वळ उजळणी. चिकित्सक विचारांची महाराष्ट्राची परंपरा कोठे बरे लोपली?

'कण्टेण्ट'चा विचार त्या त्या समाजातील सुबुद्ध समाजाला करावाच लागेल. तो मनोरंजनाच्या कंत्राटदारांच्या हाती सुपूर्द असेल तर 'झी मराठी'वरील 'चला हवा येऊ द्या'ची जागा 'सोनी मराठी'वरील हास्यजत्रा' घेते, तसे घडेल. त्याउप्पर वेगळे काही घडणार नाही.

'हास्यजत्रा'वरील विनोदाचा दर्जा चला हवा येऊ द्या'च्या बराच वरचा आहे. त्यांचे आरंभीचे अनेक एपिसोड तर 'ॲब्सर्डिटी'कडे झुकणारे व कलात्मक पातळीवर उच्च दर्जाचे वाटले होते. त्याची त्यांना जाणीव नसावी, ना तसा अभ्यास अन्य कोणी मांडला. टेलिव्हिजन माध्यमाची तात्कालिकता, हास्यास्पदता व मूढता एवढी गृहीत धरली जाते! आता 'हास्यजत्रे'तील तो मूल्यभाव विरळ होऊन अभिनयकौशल्यावर व सरावावर एपिसोड मारून नेले जाताना दिसतात. त्यांना प्रसाद खांडेकर, नम्रता संभेराव, समीर चौघुले, विशाखा सुभेदार व ओंकार वगैरेसारखे अन्य काही कमाल टॅलेंट असलेले मेहनती कलाकार लाभले आहेत. वाहिन्यांतील स्पर्धेतून ते घडले आहे. तसे अपघात घडत राहतील, त्यातून नवनवे उत्तम कलावंत पुढे येतही राहतील. परंतु त्यांच्या काम गिरीमुळे त्या भाषिक समाजातील सांस्कृतिक वातावरण भारले जाईल अशी शक्यता आहे का? समाजाला काही नवी दिशा, नवा कार्यक्रम याची चाहूल तरी लागेल का? त्यामधून त्या त्या भाषिक संस्कृतीत भर पडेल का? तर अशा सर्व प्रश्नांची उत्तरे नकारार्थी येतील. त्याची गरजही आता कोणाला वाटत नसावी. नवनवी माध्यमे शोधली जातात, हाताळली जातात ती लोकांच्या, रसिकांच्या मनाजवळ, बुद्धीजवळ अधिक पोचावे या हेतूने. पण तंत्रज्ञानाधारित माध्यमे जीवनापासून पळण्यासाठी वाटा तयार करून देत आहेत.

'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम' हे इंटरनेटवर आधारित वेबपोर्टल सुरू करताना मी त्याचे वर्णन 'ग्रंथाली'च्या पुढील पाऊल असे करत होतो. ते खरे आहे. मला कळत व जाणवत एवढेच होते, की मुद्रित शब्दाला यापुढे फक्त पुस्तकप्रेमी रसिक वाचक दाद देतील. वर्तमानपत्रे, पुस्तके या मुद्रित वाचण्याच्या वस्तूंना जनमाध्यमे म्हणून यापुढे फार भविष्य नाही. तेव्हा सर्वसामान्य वाचकाची जिज्ञासा जागती ठेवून, ती तहान भागवायची असेल तर इंटरनेटचा स्पीड हवा. माझी ते जाणण्याच्या ओघात गेली दहा वर्षे नवनवे तंत्रज्ञान व बदलते समाजभान समजून घेण्यात व्यतीत झाली आहेत. माझे रोज एकदोन नव्या व्यक्तींशी बोलणे होते, हे पाचसात वर्षे चालू आहे. त्या व्यक्ती कमीजास्त शिकलेल्या, वेगवेगळ्या वयाच्या आणि तशाच नोकरीव्यवसायांत असलेल्या असतात. त्या सुस्थित समाजातील आहेत. त्या पलीकडे माणसे मला टीव्हीवरील वेगवेगळ्या 'रिॲलिटी शो'मध्ये भेटतात. संदीप काळे दर रविवारच्या 'सकाळ'मध्ये तळच्या वर्गातील, जीवन उद्ध्वस्त झालेल्या व्यक्तींबद्दल लिहितो, ते मी वाचतो. तसे वर्तमानपत्रांतील आणखी काही लेख. यामधून मला जे समाजदर्शन होते त्यावरून जाणवते, की सर्वत्र अराजक आहे. भौतिक पातळीवर आणि मानसिक पातळीवरही. मीडियाचा गलबला सध्याच्या या अशांततेस व अस्थिरतेस बराच कारणीभूत आहे. त्या उलट, जनतेला एका सरळ मार्गाचा शोध आहे, जेथे शांतता असेल– सुस्थैर्य असेल. पुराणातील एक दाखला व मग वर्तमानकाळातील टिप्पणी. वाल्मीकीने रामायण लिहिले तेव्हा बहुधा असेच अराजक असणार. रामायणाने जीवनरीत आखून दिली. त्यावर आधारित समाजजीवनाची दोनअडीच हजार वर्षे निघाली. रामायण आधी की महाभारत यावर बराच खल होऊन रामायण आधी असे जवळजवळ निर्विवाद सांगितले गेले आहे. तरीसुद्धा समाजशास्त्रीय दृष्ट्या महाभारतात कुटुंबापासून सामाजिक– सार्वजनिक पातळीपर्यंत सर्वत्र अराजक आहे, त्यावर उत्तर म्हणून रामायणातील रामाची जीवनरीत व नीतिमूल्ये समाजाला स्वीकारार्ह वाटली. परंतु कालौघात त्या 'रामराज्या'त भ्रष्टता व दुष्टता आली. व्यवस्थापनाची प्रत्येक रीत अशी पोखरली जातेच. त्यात आलेल्या विकृती भारताच्या संविधानाने दूर केल्या व जीवन जगण्याचा एक नवा लोकाभिमुख मार्ग सुचवला. भारतीय स्वातंत्र्यास पंचाहत्तर वर्षे पूर्ण होत आहेत, पण त्या संविधानातील सर्व गोष्टी अधुऱ्या, अपुऱ्या राहून गेल्या आहेत. तो रास्त मार्ग मिळण्याच्या आधीच त्या रचनेतही विकृती शिरल्या. भ्रष्टाचार, अत्याचार, आत्महत्या यांमुळे जग भोवंडून गेले आहे. कोरोनाने ती अनिश्चितता भेदक करून टाकली आहे. विविध वादळांनी दिशाच काळोखात बुडून गेल्या आहेत. मानवी इतिहासात अशा वेळी नवे तत्त्वज्ञान निर्माण झाले. ती ताकद माध्यमातून मिळू शकते, माध्यमे तशी उपयोगात आणली तर! लक्षात घ्या, की रामायण, गीता, ज्ञानेश्वरी, संविधान ही माध्यमेच आहेत.

मला जाणवलेल्या अशा मर्यादा टाळल्या जाऊन एक सुसंस्कृत मराठी समुदाय संघटित व्हावा, त्याचे सामर्थ्य प्रकट करावे, त्या समुदायाने मराठी समाजाच्या सुदृढ प्रथापरंपरा संघटित कराव्या, त्यात नवनवीन संकेत जोडत जावे यासाठी प्रथम महाराष्ट्रभरातील सर्व 'डेटा' एकत्र करावा असा हेतू 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम' सुरू करताना मी मनी ठेवला आहे. त्याकरता 'व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन' नावाची संस्था उभी केली आहे. ते एक 'सायबर स्टेट' – सुसंस्कृत समाजाचे राज्य – अभिप्रेत आहे.

**महाराष्ट्र दिशादर्शक व्हावा?**

मार्शल मॅक्लुहान या माध्यमतज्ज्ञाने गेल्या शतकाच्या मध्यावर म्हणून ठेवले, की 'मिडियम इज द मेसेज !' त्यांच्या त्या वाक्याचा अर्थ विविध तऱ्हांनी लावला जातो. त्यामध्ये माध्यम हे उपकारक आहे असे गृहीत होते, कारण माध्यम हे साहाय्यकारी असते. परंतु तंत्रज्ञानातील कम्युनिकेशनक्रांतीमुळे माध्यम हीच भस्मासुराप्रमाणे स्वयंभू शक्ती होऊन गेली आहे. ती काबूत ठेवण्यासाठी विष्णूला अवतार घ्यावा लागेल. तो त्याने लोकशाही शक्तीच्या रूपाने घेऊन ठेवला आहे, फक्त ते लोकांचे सामर्थ्य लोकांना जाणवून देण्याचे काम सुबुद्ध समाजाला करावे लागेल. वेबतंत्रज्ञानाच्या भाषेत 'कम्युनिटी' तयार करण्याची एक गरज सांगितली जाते. त्यालाच मी सुसंस्कृत, सुबुद्ध लोकांचा समुदाय असे म्हणत आहे. त्यांच्या समोर बोटाच्या एका क्लिकवर महाराष्ट्र समाजाबद्दलचा विशासार्ह 'डेटा' उपलब्ध झाला तर नवविचाराला किती चालना मिळेल! त्यातूनच महाराष्ट्राला, जगभर पसरलेल्या मराठी समाजाला नवी दिशा मिळेल. त्यात अनेक शक्यता आहेत. तो वेगळा तपशील आहे. येथे एवढेच म्हणतो, की महाराष्ट्राने देशाला नवी दिशा व नवे नेतृत्व नेहमी दिले आहे, कर्तबगारी दाखवली आहे. आधुनिक काळातही ते शक्य आहे – सज्जनशक्तीचे नेटवर्क करता आले तर! तो विधायक, रचनात्मक मार्गही मीडियाचाच आहे!

**– दिनकर गांगल**
भ्रमणध्वनी : ९८६७११८५१७
dinkargangal39@gmail.com

ग्रंथाली

## आपल्या संग्रही असायलाच हवेत असे
## कवी संजय चौधरी यांचे दोन दर्जेदार कवितासंग्रह...

'माझं इवलं हस्ताक्षर'




राजहंस प्रकाशन, पुणे

**'माझं इवलं हस्ताक्षर'** मधला प्रत्येक आयाम म्हणजे आत्माविष्काराचा एकेक लखलखीत हिरा ठरावा, एवढा अस्सल आहे. अलिकडील काळात एवढी प्रगल्भ, प्रत्ययकारी कविता (नव्या कवीची) वाचली नव्हती... मुख्य म्हणजे तुमची कविता ही अत्यंत सच्ची व खरी कविता आहे. तिने मला वाचक म्हणून आनंद दिला, अस्वस्थताही पुरेपूर दिली. अशी सच्ची कविता तुम्ही मराठीला दिलीत तर पुढील काळात कवी म्हणून तुमचे मोठे नाव होईल व मराठी कविता ही खूप मोठी होईल. शुभेच्छा.

***– मधु मंगेश कर्णिक***


अत्याधुनिक युगातल्या अत्याधुनिक माणसाची द्विधा वेदना **'कविताच... माझी कबर'** मधल्या कवितेतून व्यक्त झाली आहे

*अलिकडे बऱ्याचदा मी बोलतो*
*वेगळंच काहीतरी*
*जे मला बोलायचंच नसतं*

अशा स्थितीत सापडलेल्या अगतिक, असहाय माणसाची स्थिती व्यक्त करणारी ही कविता, समकालीन कवितेत स्वतःची अशी वेगळी मुद्रा उमटवणारी आहे.

***– वसंत आबाजी डहाके***

'कविताच... माझी कबर'




ग्रंथाली प्रकाशन, मुंबई

**ग्रंथाली प्रकाशनातर्फे**
**लवकरच प्रकाशित होत आहे...**
**'माझं इवलं हस्ताक्षर' आणि 'कविताच... माझी कबर'**
**या संग्रहांची तिसरी आवृत्ती आणि**

**कवी संजय चौधरी**
**यांचा नवा कवितासंग्रह...**

# 'आतल्या विस्तवाच्या कविता'

अधिक माहितीसाठी संपर्क

**९३७०१ १६६६५**



# ...तरी असेल गीत हे

**कौशल इनामदार**

*यंत्र आणि तंत्र यांना बोलतं करता आलं तर आपला स्वत:वरचा विश्वास वाढतो. यांच्यावर फार विश्वास टाकला तर ते आपल्याला ताब्यात घेतात. पण आपण त्यांना बिचकून राहिलो तर काळ आपल्याला ताब्यात घेतो. या दोन्ही गोष्टी तितक्याच प्रमाणात धोकादायक आहेत. शेवटी यंत्रावर आपलं नि'यंत्र'ण असणं हाच खरा मंत्र आहे!*

No man steps in the same river twice.

- Heraclitus

**सन** २०१९ सरता सरता चीनच्या वुहान प्रांतात कोरोना व्हायरसची लागण झालेला पहिला रुग्ण आढळला आणि एखादा वणवा पेटावा तसा हा विषाणू जगभरात पेटत गेला. या महामारीने काळाच्या मधोमध पाचर मारली आणि काळाचे दोन तुकडे केले – कोविडपूर्व काळ आणि कोविडोत्तर काळ. एका तऱ्हेने पाहिले तर संपूर्ण जगाला 'फॅक्टरी रिसेट'च या महामारीने लावला! लॉकडाऊनच्या अनेक परिणामांपैकी एक परिणाम म्हणजे आपल्याला स्वतःच्या अस्तित्वाचा, आयुष्याचा फेरविचार करायला या काळाने भाग पाडले. या काळाने ज्ञानी लोकांना ज्ञानाकडे, वैज्ञानिकांना विज्ञानाकडे आणि कलाकारांना कलेकडे पुन्हा नव्याने पाहायला हवे याची जाणीव करून दिली. मुख्य म्हणजे या सगळ्या क्षेत्रांमध्ये तंत्रज्ञानाची कोविडपूर्व काळातली भूमिका आणि कोविडोत्तर काळातले स्थान पूर्णतः वेगळे झाले आहे याची दखल लोकांना घ्यावी लागली.

कोविडचा परिणाम जसा इतर क्षेत्रांवर झाला तसाच तो संगीतक्षेत्रावरही झाला. आणि इतर सर्वांसारखाच एक संगीतकार म्हणून संगीत आणि तंत्रज्ञान यांच्यामधले नाते पुन्हा एकदा बारकाईने तपासून घेण्यास मला प्रवृत्त केले.

**लाखेची गोष्ट**

८ नोव्हेंबर १९०२ रोजी कोलकात्यातल्या 'ग्रेट ईस्टर्न' नावाच्या हॉटेलच्या एका खोलीत फ्रेड्रिक गाइसबर्ग नावाच्या अमेरिकन ध्वनिअभियंत्याने एक तात्पुरता कामचलाऊ स्टुडिओ उभारला. शशिमुखी आणि फणिबाला या दोन गायिकांनी गाइसबर्गसाठी काही बंगाली गीते गायली; पण त्यांचे आवाज काही गाइसबर्गला आवडले

नाहीत. तीन दिवसांनी, ११ नोव्हेंबरला ग्रेट ईस्टर्न हॉटेलच्या त्याच खोलीत कोलकत्याची प्रसिद्ध गायिका गौहरजान आली.

मायक्रोफोनसाठी एक भला मोठा पितळ्याचा कर्णा होता. गाइसबर्गने गौहरजानला जमेल तितक्या मोठ्या आवाजात त्या कर्ण्यात गाण्याची सूचना दिली. कर्ण्याला जोडलेल्या यंत्रावर मेणाचा मुलामा असलेली एक चकती होती, जी स्वतःभोवती मिनिटाला ७८ प्रदक्षिणा घेत होती. त्या चकतीवर एक बारीक सुई ठेवली आणि कर्ण्यामध्ये गायले की आवाजाची कंपने सुईच्या मार्फत मेणात मुद्रित केली जायची आणि त्या लाखेच्या चकतीवर कायमची कोरली जात होती. आणि अमृतानेही न मिळणारे अमरत्व लाखेने गौहरबाईला मिळाले होते.

**चित्रेही लागली बोलू**

बरोबर ३० वर्षांनी, १९३२ साली, जी.एन. जोशींच्या आवाजात ना.घ. देशपांडे यांची 'शीळ' वाजली आणि मराठी संगीत प्रथम रेकॉर्डवर अवतरलं. याच वर्षी, व्ही. शांताराम यांनी तयार केलेला पहिला मराठी बोलपटही प्रकाशित झाला. तंत्रज्ञान आणि मराठी संगीत यांचे नाते जुळले. योगायोग असा की माझे आजोबा, शंकरराव बिनिवाले, यांना 'अयोध्येचा राजा' या चित्रपटात व्हायोलिन वाजवण्याकरता संगीतकार गोविंदराव टेंबे यांनी पाचारण केले.

प्लेबॅकचे तंत्र तेव्हा विकसित झाले नव्हते, त्यामुळे नटांना गाताही आले पाहिजे अशी अटच असायची. वादक इन मीन तीन असायचे. एक तबला, व्हायोलिन आणि पायपेटी! नट अभिनय करताकरताच (संगीत नाटकांसारखे) गाण्यात शिरायचे. संगीत नाटकामधले वादक थिएटरच्या पिटात बसायचे तर येथे वादक नटांच्या मागे किंवा आजूबाजूला, झाडाझुडुपांमध्ये दडलेले असत.

'सावित्री' चित्रपटाची एक गंमत माझे आजोबा अतिशय रंगवून आम्हाला सांगत असत. तांत्रिकदृष्ट्या 'सावित्री'मधल्या स्पेशल इफेक्ट्सची तुलना त्या काळच्या कुठल्याही हॉलिवूड चित्रपटाशी करता येईल. तेव्हाही नटच चित्रपटातली गाणी म्हणायचे. चित्रपटाचे पार्श्वसंगीतसुद्धा चित्रीकरणाबरोबरच ध्वनिमुद्रित व्हायचे. 'सावित्री'मधल्या एका प्रसंगामध्ये यम सत्यवानाला त्याच्याबरोबर मृत्युलोकात घेऊन जातो. आणि माझे आजोबा सांगत,

'आधी यम, यमामागे सत्यवान, सत्यवानामागे सावित्री, सावित्रीमागे, तबला तबल्यामागे ऑर्गन, ऑर्गनमागे व्हायोलिन! अशी ही यात्रा चित्रीकरणाच्या वेळी एकत्रच स्वर्गापर्यंत निघत असे! मग त्याचे टेक्स आणि रिटेक्स!'

**फास्ट फॉर्वर्ड**

आज सुमारे नव्वद वर्षांनंतर कुठल्याही संगीताच्या स्टुडिओमध्ये तुम्ही एक नजर टाकलीत तर पुन्हा एकदा तुम्हाला इन मीन तीन वादकच दिसतील. आणि तीन वादक म्हणजे आजच्या परिभाषेत गर्दीच म्हणायला हवी. पण याचा अर्थ असा नाही की तंत्रविज्ञान एक वर्तुळ पूर्ण करून पुन्हा एकदा तेथेच पोहोचले आहे. कारण २५ वर्षांपूर्वीच्या चित्रपटांमध्ये एखाद्या माथेफिरू वैज्ञानिकाच्या प्रयोगशाळेत जशी अत्याधुनिक यंत्रे दाखवली जायची तशी यंत्रे आता गल्लीबोळातल्या कुठल्याही ध्वनिमुद्रण करणाऱ्या स्टुडिओत आढळतात! तंत्रविज्ञान जितक्या झपाट्याने बदलतेय, तितक्या झपाट्याने पॅरिसमध्ये फॅशन्सही बदलत नाहीत! यंत्रांच्या आणि तंत्रविज्ञानाच्या जंजाळात आपल्यातला माणूस कधी हरवून जाईल सांगता येत नाही अशी परिस्थिती असताना संगीतकार म्हणून मी नेमका या जंजाळात कुठे आहे, असा विचार बऱ्याचदा माझ्या मनात येतो. वर्तमानाकडे येण्यापूर्वी जरा भूतकाळात संगीतामध्ये, विशेषतः चित्रपट आणि सुगमसंगीतामध्ये वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानातली ढोबळ स्थित्यंतरे काय झाली त्यावर एक दृष्टिक्षेप टाकूया.

**पार्श्वगायनाचा टप्पा**

आधी सांगितलेल्या 'लाइव्ह' ध्वनिमुद्रणानंतरचे प्रमुख स्थित्यंतर म्हणजे प्लेबॅकचे युग. पडद्यावरच्या नटाला अथवा नटीला एका दुसऱ्याच गायकाचा आवाज ही कल्पनाच अचाट होती! एका मोठ्या हॉलमध्ये सगळे वादक, संगीतकार आणि गायक-गायिका एकत्र यायचे. त्या गाण्याची बराच काळ तालीम व्हायची आणि एका माइकवर सगळे ध्वनिमुद्रण करण्यात यायचे. ध्वनिमुद्रकाचे काम सगळ्या वाद्यांचा योग्य समन्वय साधून प्रत्येक वाद्याचे ध्वनिमान (व्हॉल्युम) योग्य पातळीला ठेवणे आणि गायकांचा आवाज पृष्ठभागी राहील याची काळजी घेणे हा असायचा. जसजसा चित्रपटसंगीतात वाद्यमेळ वाढत गेला, तसतसे ध्वनिमुद्रकाचे काम अधिक जटिल आणि आव्हानात्मक होत गेले. संगीतकाराचा पसाराही वाढला आणि त्याला संगीत साहाय्यकांची गरज भासू लागली. सुरुवातीच्या काळात गीतांचे ध्वनिमुद्रणही फिल्मवरच होत असे. मग मॅग्नेटिक टेपचा जमाना आला. एका इंचाच्या किंवा दोन इंचांच्या टेपवर गाण्यांचे ध्वनिमुद्रण होऊ लागले. ध्वनिमुद्रणकक्षात यंत्रसामग्री वाढू लागली. वाद्यमेळ वाढला त्यामुळे एका माइकवर होणाऱ्या ध्वनिमुद्रणाला आता जास्त माइकची गरज भासू लागली.

यापुढचे महत्त्वाचे स्थित्यंतर म्हणजे 'ट्रॅक'पद्धती. ही ध्वनिमुद्रण क्षेत्रामधली क्रांती होती. शक्यतांचे एक नवं दालन या पद्धतीने उघडे करून दिले. सोप्या शब्दांत सांगायचे तर ट्रॅक पद्धतीमध्ये एका दोन इंचाच्या टेपवर अर्ध्या-अर्ध्या इंचाच्या चार किंवा पाव-पाव इंचाच्या आठ रांगा आखल्या जायच्या फोर ट्रॅक रेकॉर्डिंग अथवा एट ट्रॅक रेकॉर्डिंग यात एकावेळी एका रांगेत (ट्रॅकवर) ध्वनिमुद्रण करता यायचे. परिणामी एका ट्रॅकमध्ये तालवाद्ये ध्वनिमुद्रित केली की ती तशीच ठेवून त्यावर अन्य वाद्ये रेकॉर्ड करता यायची. अर्थ असा, की एकदा तालवाद्यं रेकॉर्ड करून त्याच टेपवर अन्य वाद्ये रेकॉर्ड केली, तर अगोदर ध्वनिमुद्रित केलेली तालवाद्ये न पुसली जाता त्यावर बाकी वाद्ये ध्वनिमुद्रित होऊ शकायची. लता मंगेशकर, आशा भोसले, किंवा महम्मद रफी आणि किशोर कुमारसारखे गायक जेव्हा खूप व्यग्र असायचे तेव्हा संगीतकार आणि वादक त्यांच्या तारखेसाठी खोळंबून राहत असत. पण या तंत्रज्ञानामुळे आता असे होऊ लागलं, की आधी वाद्यमेळ ध्वनिमुद्रित व्हायचा आणि मग गायक येऊन आपल्या



संगीताचे काही नवीन प्रकार जसे या तंत्रज्ञानामुळे निर्माण झाले तसे काही नैतिक प्रश्नही निर्माण होत गेले. रिमिक्ससारख्या संगीतप्रकारामुळे मूळ कलाकाराच्या हक्कांच्या उल्लंघनापासून रिमिक्सच्या सौंदर्यविषयक दृष्टिकोनासंबंधीसुद्धा प्रश्न उद्‌भवू लागले. गायक बेसूर झाले तरी त्यांना सुरात आणता येण्याच्या तंत्रज्ञानामुळे मुळात सुरेल गायकांची नक्की किंमत काय – फक्त उत्तम आवाजाला महत्त्व आहे संगीतसाधनेलाही काही किंमत आहे, असे प्रश्न निर्माण होऊ लागलेत.

सोयीच्या वेळेत गाणे गाऊन जायचा. ध्वनिमुद्रण संस्कृतीत आता हा फरक दिसू लागला. खूप तालमी, गायक-वादकांनी एकत्र येऊन काम करणे, एकाच वेळी संपूर्ण गाणं ध्वनिमुद्रित होणे असे अनेक प्रकार लोप पावले आणि एक नवीन संस्कृती जन्माला आली. आपल्या सोयीने गायक-वादक ध्वनिमुद्रणाला येऊ लागले. कित्येक वेळा एखाद्या युगुलगीतामध्ये गायक त्याचा भाग आधी गाऊन जाई आणि मग गायिका येऊन तिचा भाग ध्वनिमुद्रित करी. असे सर्रास होऊ लागले. जुन्या संस्कृतीत वाढलेले कलाकार म्हणू लागले, की 'हे म्हणजे नवरा-नवरी हनिमूनसाठी वेगवेगळे जाण्यासारखी परिस्थिती होती!'


याच सुमारास 'हायफाय साऊंड' आणि 'स्टिरिओ' ही दोन तंत्रेसुद्धा रुजू लागली. स्टिरिओमुळे दोन ध्वनिक्षेपकांचा उचित असा वापर होऊ लागला. आता बासरी डावीकडच्या ध्वनिक्षेपकामधून ऐकू येऊ लागली; तर गिटार उजवीकडून ऐकू येऊ लागली. व्हायोलिन, अकॉर्डियनसारखी 'अकुस्टिक' पाश्चात्त्य वाद्ये तर आपल्याकडे आलीच होती, आता हायफाय साऊंडच्या तंत्रज्ञानाबरोबर इलेक्ट्रिक गिटार आणि बेस गिटार यांसारखी इलेक्ट्रिक वाद्येही आता सर्रास वापरात येऊ लागली. संगीत साहाय्यकांचे 'संगीत संयोजक' होऊ लागले आणि संगीत दिग्दर्शन, वाद्यमेळाचे नियोजन आणि ध्वनिमुद्रण हे विशेष तज्ज्ञतेचे स्पेशलायझेशन विषय होत गेले.

**संगीताचं यांत्रिकीकरण**

मागील सत्तर आणि ऐंशीच्या दशकांत या पद्धतीनेच कामं होत गेली. नव्वदचे दशक उजाडले आणि अकुस्टिक वाद्यांचं वर्चस्व हळूहळू लयाला जाऊ लागले. तंत्रज्ञानाचा अंमल वाढला. सिंथेसायझर-सिक्वेन्सर, ऱ्हिदम मशीन, या इलेक्ट्रॉनिक वाद्यांवरची भिस्त वाढली. सोप्या शब्दांत सिक्वेन्सर म्हणजे सिंथेसाइझरमधला एक ८ किंवा १६ ट्रॅक असलेला रेकॉर्डर. ऱ्हिदम मशीनचंही तेच तत्त्व. या दोन इलेक्ट्रॉनिक वाद्यांमध्ये गाण्याचा पहिला मसुदा आता आधी तयार होऊ लागला आणि नंतर स्टुडिओत जाऊन त्यावर अकुस्टिक वाद्ये 'ओव्हरडब' होऊ लागली. या पद्धतीमुळे नव्वदच्या दशकापासून सगळ्या गाण्यांमध्ये







**डिजिटल टेपच्या जागी संगणकांच्या हार्ड-डिस्क आल्या, ८ ट्रॅकचे २५६ ट्रॅक झाले. पूर्वीच्या भल्यामोठ्या, वजनदार, बोजड मॅग्नेटिक टेपची जागा खिशात मावणाऱ्या पेन ड्राइव्हने घेतली हा बदलही बघितला, पण हे सगळे नसतानासुद्धा अप्रतिम संगीत होतेच होते आणि तंत्रज्ञान हे साध्य नसून साधन आहे, याचेही भान केवळ या वळणावर या क्षेत्रात पाऊल ठेवल्यामुळे मला आले, असा मला आतून विश्वास आहे.**

एक मूलभूत बदल झाला. आधी गाणी ध्वनिमुद्रित व्हायची तेव्हा त्या गाण्याची लय वादकांच्या शारीरिक घड्याळावर अर्थात बॉडी क्लॉकवर अवलंबून असायची. त्यामुळे त्यात एक नैसर्गिक इंपरफेक्शन यायचे. उदाहरणार्थ, गाणे उडते असेल तर शेवटाकडे त्याची लय आपोआप थोडी वाढायची.

आता मात्र गाणं यंत्रावर आधी उतरल्यामुळे लयीत perfection आलं. पहिल्यापासून शेवटपर्यंत गाण्याची लय सारखी झाली. '१२० बिट्स पर मिनिट' अशी लय असेल तीच लय संपूर्ण गाणं असायची. याचा फायदा असा की ट्रॅकपद्धतीत वाद्ये ओव्हरडब करणे सोपे झाले. परंतु शिीषशलींळेपच्या नाण्याची दुसरी बाजू म्हणजे अस्वाभाविकता आणि यंत्रवतपणा!

### डिजिटल कालयवन

साधारण याच काळामध्ये मी पहिल्यांदा एका ध्वनिमुद्रण स्टुडिओमध्ये पाय ठेवला आणि तेथल्या वातावरणात खेचला गेलो. झालेल्या बदलांबद्दल जुन्या लोकांमध्ये नाराजीचा सूर आणि नवीन लोकांमध्ये कुतुहल असे वातावरण असतानाच एक असा शब्द वारंवार कानी पडू लागला. ज्या शब्दामुळे गेल्या तीन दशकांमध्ये जितके बदल झाले नव्हते तितके पुढच्या पाच वर्षांत होणार होते. हा शब्द होता - डिजिटल!

या 'डिजिटल'ची त्सुनामी येऊ घातली होती. नेमका त्याच वेळी मी या किनारपट्टीवर उभा होतो. आता 'डिजिटल' हा शब्द मी नेमका कुठे ऐकला हे मलाही आठवत नाहीये, पण माझे पहिले ध्वनिमुद्रण मी ॲनलॉग पद्धतीने मॅग्नेटिक टेपवर केल्याचे मला चांगलेच स्मरतेय. मॅग्नेटिक टेपवर एक 'हिस्स' आवाज यायचा. हा हिस्सचा आवाज घालवण्याकरता डॉल्बी या कंपनीने 'Noise Reduction' तंत्रज्ञानावर पेटंटही घेतलं. पूर्वीच्या कॅसेट तुम्ही लावल्या तर गाणे सुरू होण्याअगोदर हा हिस्सचा आवाज यायचा हे तुम्हाला आठवेल.

'कालयवन' किंवा 'गोदो'प्रमाणे या 'डिजिटल' तंत्रज्ञानाच्या अनेक कथा आमच्या कानावर आल्या होत्या. 'डिजिटल' माध्यमामध्ये ही 'हिस्स' अजिबात ऐकू येत नाही. ध्वनिमुद्रण स्वच्छ आणि स्पष्ट होते. टेप जाऊन आता सीडीचेच राज्य येणार अशा अनेक गोष्टी रोज कानावर यायच्या. पुढच्या पाच वर्षांमध्ये हे कालयवन आणि गोदो घरातलेच एक सदस्य होऊन गेले! ॲनलॉग तंत्रज्ञान जवळजवळ पूर्णतः लोप पावले आणि डिजिटल तंत्रज्ञान स्वत:लाच मागे टाकत भरधाव पुढे जाऊ लागले. पु.लं.चा सच्चा मुंबईकर जसा फोर्टमधल्या ब्रिटिशांनी बांधलेल्या इमारती पाहून हळहळतो आणि 'साहेबा'ची त्याला मनापासून आठवण येते, तसेच काही बुजुर्ग गायक-वादक नवीन तंत्रज्ञानामधल्या 'हिस्स'च्या उणिवेपायी हळहळू लागले. काही कलाकारांनी हा संस्कृतीमधला बदल सहन न होऊन या क्षेत्रातून संन्यास घेतला. काहीजण नव्याला दोष देत तसेच नाके मुरडत काम करत राहिले. तर काहींनी हा बदल हसतमुखाने कबूल करत या नवीन ध्वनिमुद्रण योजनेत आपले बस्तान बसवले.

### 'ॲनलॉग टेपच्या हिस्स'ची डिजिटल कहाणी

लहानपणी एक कथा ऐकली होती. एक ऋषी नदीमध्ये स्नान झाल्यावर सूर्याला अर्घ्य अर्पण करत असताना, अचानक आकाशातून त्यांच्या हातात एक उंदरीण पडली. त्यांनी वर पाहिले तर बहुतेक कुठल्यातरी पक्ष्याच्या तावडीतून ती सुटली असावी आणि थेट त्यांच्या हातात पडली असावी असा त्यांना बोध झाला. ऋषींनी त्या उंदरिणीला आपल्या घरी नेले आणि आपल्या दिव्य शक्तीने तिला एका मुलीत



रूपांतरित केले. वर्षं गेली. मुलगी मोठी झाली तसे ऋषीला तिच्या लग्नाची काळजी वाटू लागली. तो प्रथम तिला घेऊन सूर्याकडे गेला. सूर्याला म्हणाला, हे सूर्यदेवा, माझ्या कन्येशी विवाह कराल? सूर्य म्हणाला, माझी तयारी आहे, पण तुझ्या मुलीला मी पसंत आहे का?

मुलगी म्हणाली, हा नवरा नको. हा खूप तापट आहे आणि याचा ताप मला सहन होणार नाही.

ऋषी तिला घेऊन पवनाकडे गेले. पुन्हा एकदा मुलगी म्हणाली, याचा जोर मला सहन होणार नाही. मी किती नाजूक आणि हा किती आक्रमक!

यानंतर ती दोघे पर्वताकडे गेली. मुलगी म्हणाली, हे पर्वतराजही मला पसंत नाहीत. ते एकाच जागी स्थिर आहेत. यांच्याबरोबर संसार करणे किती कंटाळवाणे होईल मला!

ऋषीला कळेना, आता कुणाकडे हिला घेऊन जावे. तितक्यात पर्वताच्या पायथ्याला असणाऱ्या एका बिळातून उंदरांचा राजा बाहेर आला आणि येथे तेथे स्वैर दुडुदुडु पळू लागला. मुलीला त्याच्याकडे बघून मौज वाटली. तिने वडिलांकडे हट्ट धरला – मी लग्न करेन तर या उंदरांच्या राजाशीच करेन!

ऋषीने एक सुस्कारा टाकला आणि आपल्या दिव्य शक्तीने मुलीचे रूपांतर पुन्हा एकदा उंदरिणीत केले! आता तुम्ही म्हणाल, याचा आपल्या विषयाशी काय संबंध? तर संबंध असा, की जसे सिक्वेन्सरमुळे लयीत परफेक्शन आले, पण स्वाभाविकता हरवली तसंच डिजिटल तंत्रज्ञानामुळे मॅग्नेटिक टेपचा 'हिस्स' गेला आणि ध्वनीत एक स्पष्टता आली. परंतु अनेक भारतीय वाद्यांच्या ध्वनीचा पोत बदलला. उदाहरणार्थ, टेपच्या हिस्समुळे डग्ग्याच्या आवाजाला एक गोलाई मिळायची, तबल्याच्या आवाजाला एक आस मिळायची; ती बंद झाली आणि तबल्याचा आवाज जरा पोकळ भासू लागला. काही वाद्यांमधून प्राणच काढून घेतला आहे असे वाटू लागले. त्यामुळे वादकांना, संगीतकारांना या 'हिस्स'ची उणीव भासू लागली. म्हणून मग तंत्रज्ञ ऋषींनी एका डिजिटल सॉफ्टवेअरची निर्मिती केली आणि डिजिटली या 'हिस्स'ची पुनर्निर्मिती केली! अशा तऱ्हेने या डिजिटल मुलीचे पुन्हा एकदा ॲनलॉग उंदरिणीत रूपांतर झाले.

**संगणक आणि संगीत!**

ॲनलॉग ध्वनिमुद्रणाच्या सर्व मर्यादा डिजिटल ध्वनिमुद्रणाने आणि संगणकाने मोडीत काढल्या आहेत. चार, आठ किंवा सोळा असेच ट्रॅक मिळायचे ते आता अमर्याद मिळू लागलेत. आता फक्त चार आवर्तने तबल्याची घेऊन तीच आवर्तने पुढे 'कॉपी – पेस्ट' करून पूर्ण गाण्याला चिकटवता येऊ लागली आहेत. गायकाच्या आवाजाचा टोन तर बदलता येऊ लागलाच आहे, बेसूर झालेल्या गायकांना सुरातही आणता येऊ लागलेय! हा सगळा बदल जसा अतिशय वेगाने झाला तसा तो अतिशय भयावहही वाटू लागला. संगीताचे काही नवीन प्रकार जसे या तंत्रज्ञानामुळे निर्माण झाले तसे काही नैतिक प्रश्नही निर्माण होत गेले. रिमिक्ससारख्या संगीतप्रकारामुळे मूळ कलाकाराच्या हक्कांच्या उल्लंघनापासून रिमिक्सच्या सौंदर्यविषयक दृष्टिकोनासंबंधीसुद्धा प्रश्न उद्भवू लागले. गायक बेसूर झाले तरी त्यांना सुरात आणता येण्याच्या तंत्रज्ञानामुळे मुळात सुरेल गायकांची नक्की किंमत काय – फक्त उत्तम आवाजाला महत्त्व आहे की संगीतसाधनेलाही काही किंमत आहे, असे प्रश्न निर्माण होऊ लागलेत.

काही वर्षांपूर्वी पार पडलेल्या संगीतकार संमेलनामधल्या एका परिसंवादात संगीतामध्ये वापरल्या जाणाऱ्या यंत्र आणि तंत्र या विषयावर बराच ऊहापोह झाला. संगीतकार अशोक पत्की आणि श्रीधर फडके यांनी पूर्वीची कार्यपद्धती उचलून धरली आणि आताच्या कार्यपद्धतीत एकत्र सहभागाचे वातावरण लयाला गेले याबद्दल खेद व्यक्त केला. आता सगळे वादक वेगवेगळे येऊन आपापले वाद्य वाजवून जातात, एक वादक दुसऱ्या वादकाला भेटत नाही, कित्येक वेळा वादकाकडून संपूर्ण गाणे ऐकलेही जात नाही. तो केवळ त्याच्या तुकड्याचा विचार करतो. श्रीधर फडकेंनी हल्लीच्या ध्वनिमुद्रकांना काही अकुस्टिक वाद्यांचे व्यक्तिमत्त्वही कळत नसल्याबद्दल खंत

व्यक्त केली. नरेंद्र भिडे या संगीतकार आणि संगीत संयोजकाने ट्रॅक पद्धतीमुळे आपल्या संगीताचा 'टोनल लॉस' झाल्याचे मत प्रदर्शित केले होते. तो म्हणाला होता, की एका वेळी अनेक वाद्यं रेकॉर्ड होत असत, तेव्हा एका वाद्याचा माइक थोडा दुसऱ्या वाद्याचा आवाजही उचलत असे. त्यातून एक 'ॲम्बियन्ट' असा नाद (टोन) तयार होत असे जो पूर्वीची ध्वनिमुद्रणे जास्त नादमधुर करण्यात मदत करत असे.

पं. यशवंत देव यांनी याच परिसंवादात व्यक्त केलेले आपले मत फार मार्मिक होते. ते म्हणाले, तंत्रज्ञानाचा अवलंब करणे अजिबात गैर नाही, उलट तो करायलाच हवा. पण यामध्ये माणसाचेच यंत्र होत नाही ना, याकडे लक्ष दिले पाहिजे!

आता मी विचार केला की वाटते, मी अशा एका वळणावर या क्षेत्रात पाऊल ठेवले की मला दोन्हीकडची विश्वे पाहायला, अनुभवायला मिळाली. एका विशाची पूर्ण माहिती झाल्यावर, पण त्यामध्ये रेंगाळण्या-रमण्याआधीच दुसऱ्या विश्वात खेचला गेलो, हे तसे माझ्या पथ्यावरच पडले. कक्षा रुंदावल्या, आभाळ मोकळे झाले, पण मुळे जमिनीत कुठवर रुतलीयेत याचीही कल्पना आली. डिजिटल टेपच्या जागी संगणकांच्या हार्ड-डिस्क आल्या, ८ ट्रॅकचे २५६ ट्रॅक झाले. पूर्वीच्या भल्यामोठ्या, वजनदार, बोजड मॅग्नेटिक टेपची जागा खिशात मावणाऱ्या पेन ड्राइव्हने घेतली हा बदलही बघितला; पण हे सगळे नसतानासुद्धा अप्रतिम संगीत होतेच होते आणि तंत्रज्ञान हे साध्य नसून साधन आहे, याचेही भान केवळ या वळणावर या क्षेत्रात पाऊल ठेवल्यामुळे मला आलं, असा मला आतून विश्वाास आहे.

या स्थित्यंतराचा मी जसा एक साक्षीदार आहे, तसाच या प्रक्रियेचा एक भागही होतो. आता अशी परिस्थिती आहे की रोज एक छोटी क्रांती या तंत्रज्ञानात घडत असते. जागा आता स्क्वेअर फूटमध्ये न मोजता गिगाबाइट आणि टेराबाइटमध्ये मोजली जातेय! मला जसा संगीताबद्दल विचार करावा लागतो तसाच आता रोज नवीन येणाऱ्या तंत्रज्ञानाबद्दलही करणे अनिवार्य झाले आहे.

मला तंत्रज्ञानाची आवड आहे, त्याबद्दल कुतूहलही आहे. पण पं. यशवंत देव म्हणाले होते त्याप्रमाणे मी तंत्रज्ञानावर आरूढ होताना ही काळजी घेतो की तंत्रज्ञान माझ्यावर आरूढ होणार नाही. आज मला माझे संगीत अजिबात यंत्रवत वाटत नाही. त्याचवेळी ते आजच्या काळाचे प्रतिनिधित्व करणारे संगीत असावे आणि आहे, असेही मनापासून वाटते. संगीतामध्ये तंत्राच्या आणि तंत्रज्ञानाच्या मदतीने काही मनातल्या गोष्टी सांगता येतात आणि गाणे यंत्रवत न वाटता अधिक संवेदनशील वाटू शकते असा माझा अनुभव आहे.

'रात्र भिजली' या अल्बमसाठी मी कुसुमाग्रजांचे 'नवलाख तळपती दीप विजेचे येथ' ही कविता ध्वनिमुद्रित करत होतो. या कवितेमध्ये पहिल्या तीन ओळींमध्ये कवी वर्तमानाबद्दल, त्याच्या शहरातल्या अनुभवांबद्दल बोलतो तर चौथ्या ओळीमध्ये त्याच्या भूतकाळाबद्दल, त्याच्या गावातल्या आयुष्याबद्दल बोलतो.

*नवलाख तळपती दीप विजेचे येथ*
*उतरली तारकादळे जणू नगरात*
*परि स्मरते आणिक करते व्याकुळ केव्हा*
*त्या माजघरातील मंद दिव्याची वात*

ध्वनिमुद्रण होत असताना एक कल्पना सुचली, की फक्त चौथ्या ओळीमध्ये 'रिव्हर्ब'चा (प्रतिध्वनीचा) वापर करावा. परिणाम असा साधला गेला की, चौथ्या ओळीला ऐकू येणारा प्रतिध्वनी भूतकाळाचाच प्रतिध्वनी आहे असा भास ऐकणाऱ्याला व्हायचा. आता हे तंत्रज्ञान तसे नवे नाही, केवळ तंत्राच्या साहाय्याने एक परिणाम कसा साधला जाऊ शकतो याचे हे उत्तम उदाहरण आहे.

मी मात्र या सगळ्या स्थित्यंतराबद्दल अजिबात उदासीन नाहीये. जुन्या काळातल्या ध्वनिमुद्रणपद्धतीचे आपले फायदे होते हे मला मान्य आहे. जसे जुन्या एकत्र कुटुंबपद्धतीचेही फायदे मला माहीत आहेत. प्रश्न असा आहे, की भूतकाळ परत वळून येऊ शकतो का आणि तो येऊ शकत असला तरी आपण त्यात रमणे किती आरोग्यकारक आहे?

**कोविडोत्तर काळ आणि संगीत**

कोविडनंतर जसे अनेक क्षेत्रांत बदल घडले तसे संगीतात न घडतील तरच नवल! त्यात सगळ्यात महत्त्वाचा बदल मला असा वाटतो की ज्या लोकांना तंत्रज्ञानाची महती अगाध वाटत होती, त्यांना तंत्रज्ञानावर अती अवलंबून राहिल्यामुळे आपल्यातल्या परावलंबनाची जाणीव झाली आणि त्याचा तोकडेपणाही लक्षात आल्यामुळे तंत्रज्ञानावर आपले पुरेसे भाळून झालेय याचा साक्षात्कार झाला! जे लोक तंत्रज्ञानाकडे कुत्सितपणाने पाहायचे, त्यांना त्याचा उपयोगलक्षात आला. सभागृह बंद असल्यामुळे अनेक कलाकारांनी कार्यक्रम किंवा गाणी सादर करण्यासाठी फेसबुक, यूट्यूबचा वापर केला, गाणं शिकवायला गूगल मीट किंवा झूमची वाट धरली. त्यांच्या ध्यानात आलं की तंत्रज्ञानाने कठीण समयात त्यांची साथ दिली आणि याचीही जाणीव झाली की खरी दाद ही अनलॉगच असण्यात गंमत आहे.

थोडक्यात काय तर यंत्र आणि तंत्र यांना बोलतं करता आलं तर आपला स्वत:वरचा विश्वास वाढतो. यांच्यावर फार विश्वास टाकला तर ते आपल्याला ताब्यात घेतात. पण आपण त्यांना बिचकून राहिलो तर काळ आपल्याला ताब्यात घेतो. या दोन्ही गोष्टी तितक्याच प्रमाणात धोकादायक आहेत. शेवटी यंत्रावर आपले नि'यंत्र'ण असणे हाच खरा मंत्र आहे!

**– कौशल श्री. इनामदार**
भ्रमणध्वनी : ९८२०४५४५०५
ksinamdar@gmail.com





नेहरू

# नभोवाणी आता व्हावी अक्षयवाणी

**नीतीन केळकर**

*ॲप, यूट्यूब, ब्लॉग, फेसबुक, ट्विटर अशा सर्व उपलब्ध प्लॅटफॉर्मचा वापर करून श्रोत्याजवळ जे कोणते गॅझेटअसेल त्यावरून आपल्याला त्याच्यापर्यंत पोहोचले पाहिजे हे नभोवाणीला कळले आहे. नवे तंत्र स्वीकारले जाते आहे, हे स्वागतार्हच आहे. अर्थात हे सर्व करताना पारंपरिक ध्वनिलहरींवरून होणारे प्रसारण अधिकाधिक चांगले कसे होत राहील याकडे लक्ष देणेही गरजेचे आहे. नवमाध्यमांची कास धरायची ती या पारंपरिक प्रसारणाला अधिक समर्थ करण्यासाठी. त्याचे इंटरनेटच्या महाजालात विसर्जन करण्यासाठी नव्हे.*

एकेकाळी वैभवाच्या शिखरावर असलेल्या नभोवाणी माध्यमाच्या, गतवैभवाच्या स्मृतींमध्ये रमणारी मंडळी दरवर्षी आकाशवाणीच्या स्थापनादिनी आपल्या आठवणींना उजाळा देत आकाशवाणी चिरंतन राहील असे छातीठोकपणे सांगत असतात. त्यांच्या भावना मी समजू शकतो. माध्यमांच्या क्षेत्रात फक्त आकाशवाणीचेच अस्तित्व होते तेव्हा या माध्यमाने दिलेले योगदान मोठे होते. Writing for Ears ही संकल्पना नवी होती. आमची संवादासाठीची पारंपरिक माध्यमे उच्चारीतच असली तरी ती मौखिक होती. श्रवणाच्या माध्यमातून ग्रहण करून इतरांना ऐकवणे यात भाषिक गोंधळ अपेक्षितच नव्हता. ऐकवण्यासाठी लिहिणे आणि ऐकवल्यासारखे वाचणे यासाठी आवश्यक भाषिक आणि वाचिक कौशल्ये विकसित करण्याचे काम आकाशवाणीने केले. श्राव्य माध्यमासाठी उपयुक्त असे अस्सल शब्द घडवले आणि रुजवले. ध्वनिलहरींवरून आलेल्या शब्दांनी रेखाटलेल्या चित्रांची लोकांना भुरळ पडली. ती पिढी अजूनही त्या शब्दचित्रांच्या प्रेमात आहे. म्हणून केवळ त्यांच्या प्रेमाखातर आणि सदिच्छांच्या बळावर हे माध्यम टिकून राहील अशी अपेक्षा बाळगणे हे स्वप्नरंजनच ठरेल.

### वैभवाचा काळ

तीस वर्षांपूर्वीची नभोवाणी मलाही आठवते. तोकड्या साधनांच्या आधारे आपल्यापर्यंत खणखणीत संदेश पोहोचवणारी. कामगार सभेतून, वनिता मंडळातून, शेतीविषयक कार्यक्रमांतून, बालविहारातून, गीतमालांतून श्रोत्यांच्या मनात उतरणारी, नेमक्या शब्दांत बातम्या देणारी. शब्दांना चेहरा देणारी. आज अत्याधुनिक साधने हाती आहेत पण हा चेहरा हरवला आहे. कारणे अनेक आहेत. धोरणात्मक दुर्लक्ष हे कारण तर आहेच. १९८२ ला

दूरचित्रवाणी माध्यमाच्या विस्ताराला गती देताना आपण नभोवाणीकडे दुर्लक्ष केले. १९९२मध्ये हे माध्यम विस्तारले ते या विस्ताराला जागतिकीकरणाने गती दिल्यामुळे. १९८२ पर्यंतचा नभोवाणीचा विस्तार या देशाच्या गरजा लक्षात घेऊन नियोजनपूर्वक विकासाचे वाहन म्हणून झाला. त्यामुळेच त्या काळात या माध्यमाने भाषा विकास विषयक जबाबदारीही योग्य रीतीने पार पाडली. १९९२ नंतर झपाट्याने वाढलेला एफ.एम. रेडिओ हे जागतिकीकरणाचेच वाहन होते. या जागतिकीकरणाने आपल्या येथे माध्यमक्रांतीला अशी काही गती दिली की तिच्याशी जुळवून घेणे आम्हाला जमलेच नाही. फरफटत गेलो आपण या वेगवान लाटेत. वेगाची नशाच इतकी होती की ही फरफट कळलीसुद्धा नाही.

**घसरण आणि ऱ्हासपर्व**

सन १९८० नंतरच्या दशकात पक्षाघात झालेली नभोवाणी ९०च्या दशकात खासगी एफएम केंद्र सुरू झाल्यानंतर नव्या ढंगात बोलायला सुरुवात करताना आपल्याच जुन्या भाषेचे नवे भ्रष्ट रूप स्वीकारून मोडतोडीचे काम आणखी पुढे नेत राहिली. इंग्रजी-हिंदीची भेसळ स्वीकारत सपाटीकरणाच्या दिशेने तिची आज जोमाने वाटचाल सुरू आहे. ही भाषिक भेळ नव्या पिढीला चटपटीत वाटली, आपलीही वाटली कारण आकाशवाणी १९५० ते ६०च्या दशकांत तत्कालीन परिस्थिती लक्षात घेऊन काळजीपूर्वक स्वीकारलेली भाषा आणि सादरीकरणाची शैली कवटाळून बसली होती. तेव्हा अधिकांश श्रोते निरक्षर होते, एकदा कार्यक्रम किंवा बातम्या प्रसारित झाल्या की पुन्हा ऐकण्याची सोय नव्हती. ध्वनिमुद्रण, संकलन, संपादनाची साधने आजच्यासारखी अत्याधुनिक नव्हती. एका नभोवाणी संचावर लोक सामूहिकपणे कार्यक्रम बातम्या ऐकत असत. आता परिस्थिती खूपच बदलली आहे. तरीही आपण वर उल्लेखित परिस्थितीला अनुरूप अशी जी भाषा आणि शैली स्वीकारली तिला चिकटून राहायचे का? भाषेचे प्रमाणीकरण नेमक्या संवादासाठी आवश्यक असले तरी भाषा प्रवाही असते. माध्यमही प्रवाही असते. या प्रवाहाला योग्य दिशा देण्याचे कामही आपलेच आहे हे बहुधा ती विसरून गेली होती. आपण जे प्रमाण मानले ते का मानले हेच ठाऊक नसलेल्या माणसांची ही जबाबदारी स्वीकारण्याची कुवतही नव्हती. ज्यांची होती त्यांनीही शब्दसंख्येवर पैसे मोजण्याच्या मूल्यमापन पद्धतीसमोर मान तुकवली. ५-२५ माणसांचा समूह एका नभोवाणी संचावर कार्यक्रम ऐकत असे तेव्हा समूहाला संबोधण्याची भाषा-शैली योग्यच होती, पण आता मोबाइल ॲपवर कानात इअरफोन घालून एकटाच माणूस ऐकत असतो तेव्हा त्याच्याशी एखाद्या समूहाशी बोलत असल्याप्रमाणे बोलायचे का, आता आपल्या बहुसंख्य श्रोत्यांची अक्षरांशी ओळख झालेली आहे हे ठाऊक असतानाही त्यांच्याशी प्रौढ साक्षरतावर्गात बोलल्याप्रमाणे बोलावे का, असे प्रश्न त्यांना पडले नाहीत. नव्या पिढीची भाषा बदलते आहे. त्यातले काय आपण स्वीकारायचे? त्यांना काय स्वीकारू द्यायचे, या प्रवाहासोबत पुढे जाताना काय जपून ठेवायचे, हे जपून ठेवलेले संचित नव्या पिढीकडे कसे सोपवायचे, याचा विचारही त्यांनी केला नाही. असा विचार करण्यासाठी, प्रश्न पडावेत, त्यांची उत्तरे शोधता यावीत यासाठी दिलेला वेळ ही आपल्याला कलावंत म्हणून दिलेली सवलत आहे असे समजून स्वतःसाठी सत्कारणी लावली. यामुळे त्यांचे भले झाले असेल कदाचित, पण माध्यमाचे आणि भाषेचे मोठे नुकसानच झाले आहे.

**रेडिओ प्रसारण अखेरच्या घटका मोजत आहे असे अनेकांचे ठाम मत आहे. यापुढे ध्वनी प्रसारण राहिले तरी ते इंटरनेटवर असेल, पारंपरिक ध्वनीलहरींवर नाही असे मत ही मंडळी मांडतात. नभोवाणी हे माध्यम मागे पडत असले तरी श्राव्य माध्यम नव्या जोमाने पुढे येते आहे याबाबत मात्र कोणाचेही दुमत नाही. नेटीझन्सच्या दुनियेत वाढत असलेली पॉडकास्टची म्हणजेच श्राव्य मजकुराची लोकप्रियता याचीच निदर्शक आहे.**

**नवी सुरुवात**

एवढी पीछेहाट झाल्यानंतर आता कुठे हे माध्यम काळाची पावले ओळखून वाटचाल करू पाहते आहे. या माध्यमाचे रूपडे पालटते आहे. केवळ रेडिओ सेटमध्ये अडकून न राहता समाज-माध्यमांचा उपयोग करत नवीन बदलांना हे माध्यम स्वीकारताना दिसते आहे. फेसबुक, ट्विटर, यूट्यूब, ब्लॉग, वेबसाईट, मोबाइल ॲपच्या माध्यमातून श्रोत्यांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करते आहे. काही कार्यक्रम फेसबुकचा आधार घेऊन प्रसारित करण्यात येत आहेत. News on AIR या ॲपवर आकाशवाणीची २४८ केंद्रे ऐकता येतात. डीआरएम रेडिओच्या माध्यमातून अंकीकरणाचे प्रयत्न होताना दिसतात. या नव्या डिजिटल रेडिओच्या यशात आणि इंटरनेटवरील ध्वनिसंवादात नभोवाणीचे भवितव्य दडलेले आहे. परंतु तंत्रज्ञानाच्या झगमगाटात मूळ संवादच हरवणार असेल तर काय उपयोग? नवमाध्यमांचा उपयोग नभोवाणीला बळ देण्यासाठी करून घ्यायचा असेल तर पुन्हा एकदा या माध्यमांची भाषा, सादरीकरणाची पद्धत समजून घ्यावी लागेल. अन्यथा नभोवाणीची भाषा स्वीकारून आपण टेलिव्हिजनचे रेडिओव्हिजन केलेच आहे. तसेच येथेही होईल. नव्हे तसेच होताना दिसते आहे. आकाशवाणीच्या विविध केंद्रांनी 'मन की बात'संबंधी केलेले ट्वीट बघा, खात्री पटेल. संदेशासाठी योग्य माध्यमाची निवडही महत्त्वाची, ती तरी कुठे दिसते? एकच मसुदा तयार केला आणि सर्व माध्यमांतून भिरकावून दिला असेच होताना दिसते आहे. लोकांना आकर्षित करण्यासाठीही योग्य नव्हे तर सोपे मार्गच स्वीकारले जाताना दिसतात. त्यातूनच विविध भारतीने ३ आक्टोबरपासून दृश्य (व्हिज्युअल) रेडिओची सुरुवात केली आहे. आजपर्यंत आपल्याला केवळ ऐकू येणारे रेडिओप्रसारण, 'दिसणार' आहे, अशी त्याची ते जाहिरात करतात. मला तर ही रेडिओच्या मृत्यूची घोषणा वाटते. अंकीकृत माध्यमांवर स्वार होऊन श्रोत्यांपर्यंत पोहोचताना ध्वनीला शब्द आणि चित्रांची साथ लागणार हे खरे, पण म्हणून




आपल्याला संदेश ऐकवायचा आहे, तो लोकांना श्रवणीय वाटला पाहिजे, बघावासा नाही, हे विसरून कसे चालेल? एकचित्ताने ऐकणे म्हणजे श्रवण. त्यात दृश्याची बाधा होणार नाही, ती पूरकच ठरतील याची काळजी घेणे या थेट दृश्य प्रसारणात कसे शक्य होईल? लाखो माणसांपर्यंत दृश्य पोहोचवण्याची क्षमता दूरचित्रवाणी माध्यमात असेलही, पण लाखो माणसांच्या मनात दृश्य जन्माला घालण्याची क्षमता नभोवाणीतच आहे आणि हेच या माध्यमाचे बलस्थान आहे. दृश्य माध्यमांच्या झगमगाटात हे विसरून चालणार नाही.

**१६५२ मातृभाषा असलेल्या ३२ लाख चौरस किलोमीटर च्या विस्तृत भूभागावर विखुरलेल्या, कोट्यवधी जनतेच्या आवाजाला व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची क्षमता फक्त या श्राव्य माध्यमात आहे. नाव काहीही द्या पण या भाषिक, वांशिक आणि सांस्कृतिक विविधतेने नटलेल्या देशाला एकत्र आणण्याची शहरी ग्रामीण दरी मिटवण्याची क्षमता याच आवाजाच्या माध्यमात आहे. संकटकाळात केवळ हेच माध्यम कामी आले आहे. याचे नामशेष होणे परवडणारे नाही.**

**अंकीकरण (डिजिटायझेशन)**

नभोवाणीची वाटचाल अंकीकरणाच्या दिशेने सुरू झाली आहे. ध्वनिलहरींच्या माध्यमातून प्रसारण करणारी आकाशवाणी ही भारतातली सर्वात मोठी नभोवाणी आपल्या सर्व वाहिन्यांचे प्रसारण अंकीकृत व्हावे यासाठी धडपडते आहे. डिजिटल रेडिओ मोंडल 'डीआरएम' या सध्याच्याच एएम आणि एफएम बँडवरून अंकीकृत म्हणजेच डिजिटल प्रसारण करू शकणाऱ्या तंत्रज्ञानाचा प्रयोग सुरू आहे. 'डिजिटल रेडिओ मोंडल'चा अर्थ आहे विश्वव्यापी अंकीकृत नभोवाणी. सध्या जरी तिने मोजकेच अवकाश व्यापले असले तरी विश्व व्यापण्याची क्षमता सिद्ध केली आहे. सध्या देशभरातले आकाशवाणीचे ३३ मध्यमलहरी प्रक्षेपक अंकीकृत प्रसारण करतात. मात्र हे अंकीकृत प्रक्षेपण स्वीकारणारे नभोवाणी संच अजून सार्वत्रिक झालेले नसल्याने त्यावरून पारंपरिक ॲनालॉग प्रसारणही सुरू आहे. यातले २५ प्रक्षेपक दररोज तासभर केवळ अंकीकृत प्रसारण करतात. यात पुणे आणि मुंबईतील प्रक्षेपकांचाही समावेश आहे. २ लघुलहरी प्रक्षेपकांवरूनही डीआरएम प्रसारण सुरू झाले आहे. नव्याने बाजारात येणाऱ्या कार आता डीआरएम नभोवाणी संचासह येत आहेत. अंकीकृत नभोवाणीच्या प्रसाराच्या दृष्टीने ही आनंदवार्ताच आहे. डीआरएम प्रसारणामुळे एफएम प्रक्षेपकावरून प्रसारित ध्वनिसंकेतांचा दर्जा कॉम्पॅक्ट डिस्कइतका स्वच्छ असेल तर एएम प्रक्षेपकावरून होणारे अंकीकृत प्रक्षेपण आपल्याला एफएम च्या दर्जाचा आवाज ऐकवू शकेल. या तंत्राचा वापर इंग्लंडमध्ये सर्वात आधी १९९५ सालीच सुरू झाला, लवकरच ते युरोपात सर्वदूर पोहोचले. आपल्या येथे अजून ते प्रायोगिक अवस्थेत आहे. पण यशस्वी होईल तेव्हा त्यामुळे आवाजाचा दर्जा सुधारण्याबरोबरच हवामानातल्या अडथळ्यांवर मात करणे शक्य होईल आणि उपलब्ध फ्रिक्वेंसीवर अधिक केंद्रांचे प्रसारणही करता येऊ शकेल. या अंकीकृत रेडिओचे आणखी एक वैशिष्ट्य, तो ऐकता येतो तसाच वाचताही येतो. दूरचित्रवाणी संचावर जसा स्क्रोल असतो तसा येथेही असतो. आकाशवाणी पुणे केंद्राच्या वृत्तविभागाने आपला ब्लॉग डीआरएम संचाला जोडला होता. त्यामुळे गाणी ऐकता ऐकता बातम्या वाचता येत होत्या. प्रयोगापुरते एवढे करणे पुरेसे आहे, मात्र डीआरएमच्या या क्षमतेचा उपयोग तातडीची उद्घोषणा, पुढील कार्यक्रमाची माहिती, श्रोत्यांशी संवाद, जाहिराती अशा अनेक गोष्टींकरता केला जाऊ शकतो. त्यासाठी आवश्यक मजकूर पुरवणारी यंत्रणा उभारायला हवी. त्या यंत्रणेतल्या माध्यमकर्मींनीही हा संदेश वाचला जाणार आहे, ऐकला जाणार नाही हे लक्षात ठेवून लिहायला हवे.

**नवमाध्यमांची स्पर्धा**

अंकीकृत नभोवाणीची काही बलस्थाने असली आणि अंकीकरणाने नभोवाणीला पुन्हा जुने वैभव प्राप्त होईल असे वाटत असले तरी या वाहिन्या कितपत यशस्वी होतील याबाबत अनेक जण साशंक आहेत. रेडिओप्रसारण अखेरच्या घटका मोजत आहे असे अनेकांचे ठाम मत आहे. यापुढे ध्वनिप्रसारण राहिले तरी ते इंटरनेटवर असेल, पारंपरिक ध्वनिलहरींवर नाही, असे मत ही मंडळी मांडतात. नभोवाणी हे माध्यम मागे पडत असले तरी श्राव्य माध्यम नव्या जोमाने पुढे येते आहे याबाबत मात्र कोणाचेही दुमत नाही. नेटीझन्सच्या

दुनियेत वाढत असलेली पॉडकास्टची म्हणजेच श्राव्य मजकुराची लोकप्रियता याचीच निदर्शक आहे. कानसेनांच्या या बदलत्या अभिरुचीची आणि गरजांचीही दखल नभोवाणीने कधीच घ्यायला हवी होती. खरे तर आकाशवाणीच्या खजिन्यात केवढ्यातरी ध्वनीफिती आहेत. गाण्यांच्या ध्वनीफितींचे अंकीकरण करण्यास त्यांनी सुरुवात केली आहे खरी पण गतीही मंद आहे आणि तो श्रोत्यांपर्यंत पोहोचवणारी यंत्रणाही. आकाशवाणीच्या संग्रहातील श्राव्य मजकुरातून कितीतरी पॉडकास्ट जन्माला येऊ शकतात. मात्र तसा विचारही झालेला दिसत नाही. अन्यथा गले या किमान चार-पाच वर्षांपासून नवमाध्यमातून त्याचे प्रतिबिंब उमटले असते. अर्थात त्यासाठी थेट प्रसारणाकरता म्हणून लिहिलेल्या आणि ध्वनिमुद्रित केलेल्या या मजकुरावर सायबर अवकाशात चिरंतन राहणाऱ्या पॉडकास्टसाठी आवश्यक संस्कार करणे गरजेचे आहे. सध्यातरी आकाशवाणीची समूहमाध्यमे प्रसारित मजकूर जसाच्या तसा डकवण्यातच व्यग्र दिसतात. नव्या माध्यमाच्या गरजा लक्षात घेऊन भाषाशैली आणि संवादपद्धतीत अनुरूप बदल घडवून आणण्याची गरज आहे हे अनेकांना कळलेलेच नाही. ज्यांना कळले त्यांना व्यवस्थेच्या उदासीनतेमुळे करता आले नाही किंवा त्यांनी त्यांनाच ज्ञात कारणांमुळे ते करायचे टाळले आहे.




**श्रवणीय मजकुराची गरज**

आकाशवाणी करो ना करो, पण उगवत्या पिढीला श्रवणाचे महत्त्व कळते आहे, उपयोगिता समजते आहे आणि त्याला माहिती आणि मनोरंजनाचे हे साधन सोयीचेही वाटते आहे. पॉडकास्टची वाढती लोकप्रियता याची निदर्शक आहे. श्राव्य मजकूर (पॉडकास्ट) आणि नभोवाणी (रेडिओ प्रसारण) यात साम्य आहे, पण ते समान नाहीत. त्यातला फरक टॉक शोचे पॉडकास्टमध्ये रूपांतर करण्यात फारसा अडचणीचा ठरत नाही. काही टॉक शो तर जसेच्या तसे पॉडकास्टसाठी वापरता येऊ शकतात. दीर्घकाळ चालणारे मॉर्निंग शो आणि संगीताच्या कार्यक्रमांचा जसाच्या तसा पॉडकास्ट होत नसला तरी त्यांच्याशी नाते सांगणारे पॉडकास्ट श्रोत्यांना हे कार्यक्रम रेडिओवर ऐकण्यासाठी प्रेरित करू शकतात. नवमाध्यमावर असा त्या माध्यमाला अनुकूल श्राव्य मजकूर अधिकाधिक प्रसारित करून तेथल्या श्रोत्याला नभोवाणीकडे वळवणे शक्य आहे. मात्र तसे प्रयत्न व्हायला हवेत. सगळे श्रोते रेडिओ एकाच वेळी सुरू करतील असे नाही. सुरू केल्यावर कार्यक्रम जेथवर आला आहे तेथून पुढेच ऐकावा लागेल. मागे जाण्याची सोय नाही. ही मर्यादा लक्षात घेऊन महत्त्वाच्या मुद्यांचे वारंवार स्मरण करून देत, आधी येऊन गेलेल्या मुद्यांचा संदर्भ देत नवा मुद्दा सुरू करणे आवश्यक ठरते. आपल्या सोयीच्या वेळी पॉडकास्ट सलग सुरुवातीपासून ऐकणाऱ्या श्रोत्यासाठी मात्र ही द्विरुक्ती रसभंग करणारी ठरू शकते. त्याला संपूर्ण प्रसारण ऐकण्यास बाध्य करणारी आकर्षक सुरुवात आवश्यक ठरते. नभोवाणीवर कालमर्यादा आहे ती या श्राव्य मजकुराला लागू नाही. अर्थात लोकांच्या सलग श्रवण क्षमतेला मर्यादा आहेत. त्या विचारात घ्याव्याच लागतील. पॉडकास्टच्या विशात आताच शंभराहून अधिक भाषांमधील सात लाखाहून अधिक पॉडकास्ट आणि त्यांचे दोन कोटीहून अधिक भाग उपलब्ध आहेत. या श्राव्य मजकुरात विषयांची विविधताही विपुल आहे. तिथली स्पर्धा अधिक जीवघेणी आणि प्रवेश दुष्कर होण्याआधी नभोवाणीने या क्षेत्रात केवळ पदार्पणच नव्हे तर आपला दबदबा निर्माण करायला हवा. नभोवाणीवरील कार्यक्रम चुकला की चुकला, आकाशवाणी पुन्हा होत नाही. तोच मजकूर योग्य संस्कारांसह पॉडकास्टच्या स्वरूपात उपलब्ध करून दिला तर श्रोत्यांना पर्याय तर उपलब्ध तर होईलच, शिवाय तो ऐकून इतरही अनेक जण नभोवाणीच्या थेट प्रसारणाकडेही आकर्षित होतील.

**समूहमाध्यम धोरण हवे**

ध्वनिलहरींना यापुढे भौगोलिक मर्यादा असणार नाहीत. काळाचीही नाही. लोक आपल्याला हवे ते केंद्र हवे तेथे आणि हवं तेव्हा ऐकू शकतील अशी सोय नव्या तंत्रज्ञानात आहे. आपल्या तंत्रज्ञानाचे नाते या तंत्रज्ञानाशी जोडणार नाहीत त्या नभोवाणी वाहिन्यांचा मृत्यू अटळ आहे. हे टाळायचे असेल तर प्रत्येक नभोवाणी केंद्राचे स्वतःचे असे समूहमाध्यमविषयक धोरण असायला हवे. हे धोरण कर्मचाऱ्यांवर बंधने घालण्यासाठी नाही तर तर त्यांच्या आणि माध्यमाच्या कक्षा रुंदावणारे हवे. समूहमाध्यमावरील संभाव्य चुकांसाठी कोणाला तरी जबाबदार धरणारे धोरण नको, तर चुका होऊच नयेत अशी काळजी घेणारे हवे. या समूहमाध्यमांचा उपयोग श्रोत्यांशी संवाद साधण्यासाठी होऊ शकेल, आपल्या प्रसारणात सहभागी कलावंत, निवेदकांची लोकप्रियता वाढवण्यासाठी होऊ शकेल, नव्या कार्यक्रमांच्या प्रसिद्धीसाठी करता येईल. जाहिरातदारांसाठी आपल्या कार्यक्रमांची उपयोगिता स्पष्ट करणारे दालन सुरू करता येईल, आपल्या चुकांवर, त्रुटींवर चर्चाही करता येईल, सल्ला मागता येईल, स्थानिक कलावंतांशी नाते जोडता येईल, त्यांना आपल्या कार्यक्रमात सहभागी करून घेता

येईल, आपल्या कर्मचाऱ्यांचे जाहीर कौतुक करण्यासाठीही व्यासपीठ मिळेल, नवमाध्यमांवर सक्रिय असलेले लेखक, साहित्यिक, कलावंत, ब्लॉगर आपल्याशी जोडले जाऊ शकतील.

### ऑनलाइन अस्तित्वही महत्त्वाचे

नभोवाणीने यापुढे आपल्या प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमांइतकेच लक्ष ऑनलाइन मजकुराकडे द्यायला हवे. त्याला केंद्राच्या प्रसारणाचं बायप्रॉडक्ट समजून चालणार नाही. दर आठवड्याला अंकीकृत माध्यमांसंदर्भातल्या धोरणाचा आढावा घ्यायला हवा. यातून किती लोकआपल्या संकेतस्थळाला भेट देतात, ते कोणत्या समूहमाध्यमावरून येतात, आपल्याला अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवणारे कळीचे शब्द 'की-वर्ड' कोणते, कोणता मजकूर लोकांना आकर्षित करतो आहे, आपले संकेतस्थळ लोक मोबाइलवर बघताहेत की टॅबवर की डेस्कटॉपवर? संकेतस्थळावर सहज फेरफटका मारून गेले किती आणि तेथे रेंगाळले किती हे कळू शकेल. याचा उपयोग आपल्या प्रसारणातील आणि ऑनलाइन मजकुराबाबत योग्य निर्णय घेण्यासाठी निश्चित होईल. नजिकच्या भविष्यात इंटरनेट रेडिओला हद्दपार करेल, रेडिओचा मृत्यू अटळ आहे अशी व्यक्त होणारी मते अतिरंजित असली तरी रेडिओला जगण्यासाठी भविष्यात इंटरनेटचा आधार लागणार हे नक्की. नवमाध्यमांशी स्पर्धाही करावी लागणार. त्यासाठी आपलं स्वतःचे समूहमाध्यम, ॲप विकसित करावे लागेल. नभोवाणीच्या या नवमाध्यमांना तिच्या पूर्वसंचिताचे बळ आणि पारंपरिक प्रसारणाचे बळ योग्य रीतीने त्या माध्यमांच्या गरजेनुरूप असे मिळाले तर ती निश्चितच इतर समूहमाध्यमांच्या स्पर्धेत सरस ठरतील. नभोवाणीला मदतीचा हात देऊन तिचे अस्तित्वही चिरंतन करतील.

### शतकानंतर नव्या वळणावर

शतकाच्या सेवेनंतर आज हे माध्यम नव्या वळणावर उभे आहे. २ नोव्हेंबर १९२० रोजी जगातले पहिले व्यावसायिक रेडिओप्रसारण सुरू झाले. १९३३ साली एफएम रेडिओचा जन्म झाला. ५०, ६०च्या दशकानंतर एफएमचा प्रसार सुरू झाला. ९० च्या दशकात इंटरनेट रेडिओ आला, खर्च कमी असल्याने असंख्य रेडिओ केंद्रे या माहितीच्या महाजालात उदयाला आली, जगाच्या कानाकोपऱ्यांत पोहोचू लागली,१९९५ ला अंकीकृत नभोवाणी प्रसारणाला सुरुवात झाली, २१ व्या शतकाच्या सुरुवातीला सॅटेलाईट रेडिओ आला, नॉर्वेसारख्या देशाने तर एफएम प्रसारण बंद करून सॅटेलाईट रेडिओसाठी आपले आकाश मोकळे केले. रेडिओ गार्डनवर जगभरातली नभोवाणीकेंद्रे उपलब्ध आहेत. जगभरातल्या विविध नभोवाणी वाहिन्यांनी आपापल्या ॲपवरून लाइव्ह स्ट्रीमिंग सुरू केले आहे. आता केवळ आपला प्रक्षेपक हाच प्रसारणाचा एकमेव प्लॅटफॉर्म नाही. नव्या तंत्रज्ञानाने उपलब्ध करून दिलेले अनेक प्लॅटफॉर्म आहेत. ॲप, युट्यूब, ब्लॉग, फेसबुक, ट्विटर अशा सर्व उपलब्ध प्लॅटफॉर्मचा वापर करून श्रोत्याजवळ जे कोणते गॅझेट असेल त्यावरून आपल्याला त्याच्यापर्यंत पोहोचले पाहिजे हे नभोवाणीला कळले आहे. नवे तंत्र स्वीकारले जाते आहे, हे स्वागतार्हच आहे. अर्थात हे सर्व करताना पारंपरिक ध्वनिलहरींवरून होणारे प्रसारण अधिकाधिक चांगले कसे होत राहील याकडे लक्ष देणेही गरजेचे आहे. नवमाध्यमांची कास धरायची ती या पारंपरिक प्रसारणाला अधिक समर्थ करण्यासाठी. त्याचे इंटरनेटच्या महाजालात विसर्जन करण्यासाठी नव्हे.

### व्हावी अक्षयवाणी

नभोवाणी हे कायमच एक विशासार्ह माध्यम राहिले आहे. मावळत्या पिढीला या माध्यमाबद्दल आपुलकी आहे. ती उगवत्या पिढीमध्ये कशी निर्माण होईल हे पाहायला हवे. १६५२ मातृभाषा असलेल्या ३२ लाख चौरस किलोमीटरच्या विस्तृत भूभागावर विखुरलेल्या, कोट्यवधी जनतेच्या आवाजाला व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची क्षमता फक्त या श्राव्य माध्यमात आहे. कम्युनिटी रेडिओ म्हणा, सहकारी नभोवाणी म्हणा, विकासवाणी म्हणा वा ग्रामवाणी म्हणा, नाव काहीही द्या; पण या भाषिक, वांशिक आणि सांस्कृतिक विविधतेने नटलेल्या देशाला एकत्र आणण्याची, शहरी-ग्रामीण दरी मिटवण्याची क्षमता याच आवाजाच्या माध्यमात आहे. संकटकाळात केवळ हेच माध्यम कामी आले आहे. तमिळनाडूतली त्सुनामी असो की उत्तराखंडातला पूर, किल्लारीचा भूकंप असो वा मुंबईवरचा दहशतवादी हल्ला, लोकांपर्यंत संदेश पोहोचवून धीर देण्याचे काम याच माध्यमाने केले आहे. त्याचे नामशेष होणे परवडणारे नाही. भारतासंदर्भात विचार करता ८०च्या दशकापासून असलेली या माध्यमाबाबतची उदासीनता, झालेल्या धोरणात्मक चुका, माध्यमाची सूत्रे अपात्र व्यक्तींच्या हाती असणे, नवमाध्यमांचा उदय, तरुणाईला असलेले त्यांचे आकर्षण, या तरुण पिढीला आपल्याकडे आकर्षित करण्यात स्थितप्रज्ञ नभोवाणीला आलेले अपयश आणि नवमाध्यमांच्या प्रभावामुळे झाकोळलेल्या नभोवाणीला अजूनही आशा आहे असे कोरोनाकाळातील एका निरीक्षणाने सूचित केले आहे. टाळेबंदीमुळे लोक घराबाहेरच पडले नाहीत. त्यामुळे नभोवाणी हे आता केवळ प्रवासात ऐकण्याचेच माध्यम उरले आहे अशी जी टीका होती ती खरी मानली तर टाळेबंदीत लोकांचे नभोवाणी ऐकणे कमी व्हायला हवे होते. परंतु ते वाढल्याचे हे निरीक्षण सांगते. घरात इंटरनेट असतानाही लोक नभोवाणी ऐकत होते ही दिलासा देणारी बाब आहे. लोकांना ऐकायला आवडते. त्यांना चांगले श्रोते बनवणे आता या माध्यमाचे काम आहे. नवमाध्यमाला आपत्ती न मानता इष्टापत्ती मानली तर ते शक्य होईल. नभोवाणीला यापुढे आपल्या प्रसारणासाठी आवश्यक श्राव्य मजकुराबरोबरच अंकीकरणाने उपलब्ध करून दिलेल्या नव्या संधी आणि नवमाध्यमाच्या गरजेनुरूप असा श्राव्य मजकूरही निर्माण करावा लागेल. तो करताना या आधी आपण बोलण्यासाठी म्हणून जे लिहीत होतो ते प्रसारणानंतर हवेत विरून जाणार होते. आता आपले उच्चारित शब्द सायबर अवकाशात चिरंतन राहणार आहेत हे या माध्यमाने लक्षात घ्यायला हवे. 'आकाशवाणी'ने आता 'अक्षयवाणी' व्हायला हवे.

**– नीतीन केळकर**
भ्रमणध्वनी : ९९६७७६४४६८
nitinkelkar2007@gmail.com

*ओटीटीवर प्रेक्षकाला खेचतो, तो इथे असलेला मुक्त विचारांच्या जवळपास जाणारा कंटेंट. सध्या तरी अधिकृतपणे सेन्सॉर होत नसलेल्या प्रसंग, भाषेच्या स्वातंत्र्यामुळे तरुणांना त्याचं आकर्षण वाटतं. हे आकर्षण किती टोकाला पोहोचलं आहे, त्याचा अंदाज अनेक वेबसीरिज पाहिल्यानंतर येतो. भाषेच्या बाबतीत एक महत्त्वाचा विचार मांडला जातो, तो म्हणजे आपण जे काही लिहितो, तो त्या काळाचा दस्तऐवज असतो. मात्र हिंदी वेबसीरिज पाहणारे जे ऐकतात, तेच वास्तव आहे असे मानायला लागले आहेत.*



# शिवराळ भाषेची राळ

**अपर्णा पाटील**

*'च्युxx है तुम्हारा लडका.'*
*'च्युxx है वो इम्पॉर्टंट नहीं है.'*
*'हमारा लडका है, वो इम्पॉर्टंट है.'*

**'मि**र्जापूर' नावाच्या लोकप्रिय वेबसीरिजमध्ये कालीनभय्या या प्रमुख व्यक्तिरेखेच्या तोंडी हा डायलॉग आाहे. उत्तर भारतातील कायदा आणि सुव्यवस्था नसलेल्या शहरावर कालीनभय्याचं नियंत्रण आहे. कालीनभय्याची सत्ता, दहशत आणि त्याच्या अहंकाराचा वेगळा परिचय देण्याची गरज नसते. त्याची शहरावरील पकड कोणत्या स्तरावरची आहे, हे समजण्यासाठी हे एवढेच शब्द पुरेसे असतात.

कालीनभय्याची भूमिका साकारणारे अभिनेते पंकज त्रिपाठी प्रत्यक्षात अगदीच शालीन आहेत. वेबसीरिजमधील अनावश्यक शिवीगाळ त्यांनाही मान्य नाही. 'माणूस संतापाच्या भरात अक्षम्य अशा शिव्यांचा वापर करतो. जे वैयक्तिक आयुष्यात क्वचित प्रसंगी घडतंही. परंतु विशिष्ट व्यक्तिरेखेसाठी शिवीगाळ हा त्याच्या संवादाचा भाग असतो. त्यामुळे त्याचा वापर होतो', असं ते म्हणतात.

पंकज त्रिपाठी यांचं हे म्हणणं पटेल, असं या वेबसीरिज किंवा शो पाहून म्हणता येत नाही. कारण ओटीटीवरील काही लोकप्रिय वेबसीरिज आणि शोमधील संवाद असेही आहेत,

'कानून की xx अच्छी है, लेकीन उसमे उंगली नहीं करनी चाहिये. सॉरी फॉर लँग्वेज मॅडम. वो मैं यूँ कह रहा था की, कानून की पृष्ठभागसे खिलवाड नहीं करना चाहिए.'

*'अरे चौधरी, यार अरे अपने देश की भाषा कितनी प्यारी है...'*
– तांडव

*'xx फटे तो फटे, नवाबी ना घटे'*
– भौकाल

*'आज एक फकीर नी फकीरी गयी तर xx*
*ने मुसे सेठ पिलो मादर xx'*
– स्कॅम १९९२

ओटीटीवरील कार्यक्रमांची 'लिंगो' वेगळीच असते. मुळात शुद्ध आणि प्रमाणभाषा असण्याचा आग्रह इथे कोणी धरणार नसतोच. तरीही व्याकरणाशी संबंध नसलेले शब्द, वाक्यांची लघुरूपं, इंग्रजी शब्दांचा आणि शिव्यांचा अमर्याद वापर, यामुळेच वेबसीरिजच्या भाषेविषयी प्रचंड आकर्षण आणि नाराजी दोन्ही आहे. वेबसीरिज आणि शो लोकप्रिय होण्याचं कारण ही शिवराळ भाषा हेच आहे, असाही समज होऊ लागला आहे.

यामागचा तर्क असा, की ओटीटी माध्यमाचा सर्वात मोठा प्रेक्षकवर्ग हा तरुण आहे. त्यांना ही भाषा आपली वाटते. वेबसीरिजमध्ये लैंगिकता, हिंसेइतकाच शिव्यांचा वापर केला जातो. ज्याला आजवर सर्वसाधारणपणे अश्लील असं संबोधलं जात होतं, असे संवाद किंवा 'वन लायनर' ट्विटर, फेसबुक, इन्स्टाग्राम यांवर पोस्ट केल्या जाणाऱ्या मीम्समुळे खूपच लोकप्रिय होतात. विशेषतः तरुणांना ही भाषा अनेक अर्थांनी आपलीशी वाटते. एखादं फार मोठं तत्त्वज्ञान दडलंय की काय, असं त्या संवादांना रूप दिलं जातं.



**ओटीटीवरील भाषेबाबत विचार करताना काही मुख्य गोष्टी लक्षात घ्याव्या लागतात. मुंबईचा भाई, उत्तरेतला भय्या, दक्षिणेतला अण्णा अशा व्यक्तिरेखांमधून पुरुषसत्ताक सत्तावर्चस्वाचं चित्रण येतं. त्याचं व्यक्तिमत्त्व अधिक ठसठशीतपणे येण्यासाठी या संवादाचा वापर केला जातो. तो फॉर्म्युला यशस्वीही झालाय. विविध ठिकाणचं आयुष्य, संघर्ष, आर्थिक स्तर, राहणीमान यामध्ये जसा फरक असतो, तसा तो या शोमधल्या गुन्हेगारांच्या भाषेतही आढळतो.**

'स्कॅम १९९२'मध्ये शेअर मार्केट घोटाळ्यामधील हर्षद मेहताची भूमिका साकारणारा प्रतीक गांधी 'इस्क है तो रिस्क है' असं म्हणतो. तर 'वैसे तो शास्त्रों में लिखा है, लेकीन मैंने वाटसअपवर पढा है', असं म्हणणारा हाथीराम 'पाताल लोक'मध्ये भेटतो. 'सुरू मजबुरी मे किये थे अब मजा आ रहा है...' असा संवाद 'मिर्जापूर'मध्ये ऐकवला जातो. इतकंच कशाला, 'सॅक्रेड गेम्स'मध्ये गणेश गायतोंडे या व्यक्तिरेखेच्या तोंडी असलेला, 'अपुन किधर था मालूम नहीं, अपुन को बस ु मारनी थी', हा डायलॉग तरुणांच्या गप्पांमध्ये हमखास असतोच असतो.

ओटीटीवरच्या बहुसंख्य कथा या राजकीय किंवा गुन्हेगारी जगतावरच्या आहेत. राजकारणात किंवा गुन्हेगारीत अमर्याद सत्ता पाहून समाजावर नियंत्रण मिळवू पाहणाऱ्या, महत्त्वाकांक्षी व्यक्ती किंवा कुटुंबाभोवती या कथा बांधल्या गेल्याचं प्रामुख्यानं आढळतं. जातीय, धार्मिक, राजकीय अशा सगळ्याच बाबतीत असलेल्या कट्टरवादी भूमिका त्या-त्या व्यक्तिरेखांच्या माध्यमांतून मांडल्या जातात. आपण करतो ते चुकीचं असलं तरी ते योग्यच आहे, हे सांगण्यासाठी मग अशा संवादांचा आधार घेतला जातो. त्यांचं व्यक्तिमत्त्व अधिक 'ब्लॅक' करण्याच्या नादात संवादांमध्ये चुरचुरीत शब्दांची पेरणी केली जाते आणि तीच भाषा तरुणाईच्या जिभेवर खेळते.

या सगळ्या संवादांना समाजमाध्यमांनी एका वेगळ्याच उंचीवर नेऊन बसवलं आहे. याशिवाय अशा ओटीटीवरील भाषेबाबत विचार करताना काही मुख्य गोष्टी लक्षात घ्याव्या लागतात. मुंबईचा भाई, उत्तरेतला भय्या, दक्षिणेतला अण्णा अशा व्यक्तिरेखांमधून पुरुषसत्ताक सत्तावर्चस्वाचं चित्रण येतं. त्याचं व्यक्तिमत्त्व अधिक ठसठशीतपणे येण्यासाठी या संवादाचा वापर केला जातो. तो फॉर्म्युल यशस्वीही झालाय. विविध ठिकाणचं आयुष्य, संघर्ष, आर्थिक स्तर, राहणीमान यामध्ये जसा फरक असतो, तसा तो या शोमधल्या गुन्हेगारांच्या भाषेतही आढळतो.

कधी काळी हिंदी सिनेमातल्या संवादांनी जसं आपलं जग व्यापून टाकलं होतं, तेच आज ओटीटी करत आहे. सत्तरच्या दशकात हिंदी सिनेमातील व्यक्तिरेखांच्या तोंडी असलेल्या कृत्रिमता कमी झाली.

'शोले'मधील गब्बरसिंग विचारतो, 'कितने आदमी थे कालिया', तेव्हा त्याची जरब आणि त्याची वृत्ती त्याच्या त्या रासवट, रांगड्या भाषेतून व्यक्त झाली होती.

'सुअर के बच्चो, वो दो थे और तुम तीन... फिर भी वापस आ गये... खाली हाथ. क्या समझ कर आये थे? सरदार बहुत खुस होगा, साबासी देगा, क्यों?' असं गब्बर एका प्रसंगात म्हणतो.

प्रादेशिक बोलीभाषेची ओळख सत्तर एमएमच्या पडद्यावर 'शोले'नं करून दिली. त्यानंतर सिनेमांत कमीअधिक प्रमाणात बोलीभाषेचा वापर वाढला. प्रादेशिक भाषेचा लहेजा, व्यक्तिरेखा कुठे वावरते, त्यानुसार तिची भाषा असावी, या गोष्टीला 'शोले'मुळे महत्त्व आलं. वेबसीरिजमधल्या कथा कुठे घडतात, हे लक्षात घेतलं, तर नेमकं हेच लक्षात घेतलेलं दिसतं. हिंदीचाच विचार केला तर उत्तरेकडील प्रादेशिक फरक महाराष्ट्रातील माणसाला कळत नसला तरी वेबसीरिजच्या माध्यमातून त्या त्या बोलीभाषांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केल्याचं लक्षात येतं.

'शोले' ज्या वर्षी रिलीज झाला त्याच वर्षी आलेल्या आणखी एका सिनेमानं व्यक्तिरेखेच्या भाषेचं महत्त्व काय असतं, ते दाखवून दिलं होतं. तो सिनेमा होता 'मौसम'. गुलजार यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटातील कजली (शर्मिला टागोर) हिच्या तोंडी, 'हरामजादे, दस रुपये दे के क्या सारी रात बैठेगा कोठेपर', हा थेट रस्त्यावरचा संवाद रूपेरी पडद्यावर आला होता. हा सिनेमा प्रदर्शित झाला होता, १९७५ या वर्षी. तेव्हापासून आतापर्यंत सिनेमा या माध्यमानं, मनोरंजनक्षेत्रानं अनेक स्थित्यंतरं पाहिली. त्यात अधिक वास्तव येऊ लागलं. ते संवादातून व्यक्त होऊ लागलं. ओटीटीवरून तर वास्तवाहून अतिवास्तव झालं आहे. त्यामुळे 'हरामजादे' ही शिवीही आता अगदीच मिळमिळीत वाटू लागली आहे.

इंग्रजी चित्रपटांत 'एफ लेटर' असलेले शब्द पूर्वी म्युट केले जात, आता तसं केलं जात नाही. मग तीच भाषा वेबसीरिज किंवा शोंमध्ये आली. ती भाषा शिवराळ असते, असा सगळ्यात मोठा आक्षेप आहे.

पण बहुतांश लोकांना ही भाषा वादग्रस्त वाटत नाही. अनेकदा दोन पुरुष गप्पा मारताना विनाकारण भेंxxx अशा शिवीचा उच्चार करतात किंवा आईबहिणीवरून दिल्या जाणाऱ्या शिव्या सहजपणे चारचौघांत हासडल्या जातात. त्यामुळे भारतीय तरुण प्रेक्षकांना अशा मुक्तछंदातल्या शिव्यांची बरसात फारशी आक्षेपार्ह वाटत नाही. हे वेबसीरिजकडे वळण्याचं मुख्य कारण असावं असं म्हटलं जातं.

ओटीटीवर प्रेक्षकाला खेचतो, तो इथे असलेला मुक्त विचारांच्या जवळपास जाणारा कंटेंट. सध्या तरी अधिकृतपणे सेन्सॉर होत नसलेल्या प्रसंग, भाषेच्या स्वातंत्र्यामुळे तरुणांना त्याचं आकर्षण वाटतं. हे आकर्षण किती टोकाला पोहोचलं आहे, त्याचा अंदाज अनेक वेबसीरिज पाहिल्यानंतर येतो. तरीही गेल्या दोन वर्षांत 'मिर्झापूर' आणि 'सॅक्रेड गेम्स' या दोन्ही वेबसीरिज सर्वात जास्त लोकप्रिय ठरल्या. त्यांच्या यशाचं मोजमाप त्यातील लैंगिकता आणि शिवराळ संवादाचा भरणा, या दोन निकषांवर केलं होतं. त्यामुळे त्यानंतर आलेल्या प्रत्येक शो किंवा वेबसीरिजची तुलना या दोन सीरिजशी केली जाते.

एका हिंदी समीक्षकानं तर आपल्या लेखात, जाता जाता एक वाक्य लिहिलं होतं, 'मिर्जापूर जरूर देखिए, क्योंकि भले ही ये हिंदी की गालियों को मुंबईया अंदाज में बोलकर उन्हें अपमानित करती है, लेकिन कायदे का मनोरंजक सिनेमा रचकर दर्शकों का भरपूर सम्मान भी करती है', खरं तर उत्तरतल्या शिव्या मुंबईतल्या स्टाइलनं दिल्यानं त्या 'शिव्यां'चाही अपमान होतो, असं म्हणणं म्हणजे शिव्यांबाबत आपण फारच मागासले आहोत, असं म्हणता येईल.



**वेबसीरिज आणि शोमधील शिवराळ भाषेच्या विरोधात न्यायालयात याचिकाही दाखल झाल्यात. त्यातील एका प्रकरणात, संतापाची अभिव्यक्ती किंवा टीका करण्यावर कोणताही निर्बंध लावता येणार नाही, अशी स्वच्छ टिप्पणी दिल्ली उच्च न्यायालयानं केली होती. हे जितकं स्पष्ट आहे तितकंच त्या अभिव्यक्तीनं मर्यादाही ओलांडू नये, अशाही अपेक्षा या माध्यमाकडून आहेत. अगदी या माध्यमावरील एका संवादाच्या भाषेत सांगायचं झालं तर, 'डर की यही दिक़्क़त है, कभी भी ख़त्म हो सकता है'. असंही या भाषेबाबत म्हणता येईल.**

अर्थात सर्वच वेबसीरिज, शोमधील सगळेच संवाद शिवराळ असतात असं नाही, अनेकदा चटपटीतपणा आणण्यासाठी त्याला तत्त्वज्ञानाचा तडका मारलेला असतो. 'गुरगांव'मध्ये पुरुषार्थ मिरवत असलेल्या व्यक्तिरेखांना प्रादेशिक आणि राजकीय पार्श्वभूमी आहे. यातलं प्रमुख पात्र केहरीसिंग अस्सल हरियानवी भाषेत बोलणारं आहे. तो चकाचक बंगल्यात राहतो, मात्र त्याच्या बोलण्यातला गावरान ढंग कायम राहिलाय. या वेबसीरिजमधील पुरुषपात्रं हिंसा, पितृसत्ताक परंपरांना जपत राहतात. त्यामुळे संवादाची शैलीही तशीच आहे, आणि नेमकं हेच प्रेक्षकांना आकर्षित करत राहतं.

बहुसंख्य शो-मालिकांमधील कथासूत्र हे छोट्याशा शहरात घडतं. शिवाय बहुसंख्य कथा या गुन्हेगारीशी निगडित आहेत. कौटुंबिक कथा असल्या तरी त्यात नात्यांमधल्या गुंतागुंती, पुरुष आणि स्त्रियांचे अनेकांशी असलेले शरीरसंबंध यांना केंद्रस्थानी ठेवण्यात आलेलं असतं. त्यामुळे अनेक संवाद हे थेट स्त्री-पुरुषांच्या शारीरिक संबंधांविषयी उघडपणे व्यक्त होणारे आहेत. महिलाचं 'वस्तुकरण' करणारे आहेत. त्यात कोणाला आता फार आक्षेपार्ह वाटत नाही, हे विशेष. अगदी उदाहरणच द्यायचं ते हा संवाद लक्षात घ्या.

*'औरत हो नीचे ही रहो',*

*'xx तो ठीक से करिए ना.'*

'शिलाजीत दिये थे न आपको, काहे नहीं लेते हैं आज फिर से जल्दी ढह गए. एक तो मुश्किल से महीने में एक-दो बार कर पाते हैं। ऊपर से गरम करके ठंडा ही छोड़ देते हैं हमको।'

'बहुत गर्मी है? चकला पे बिठा दें। अरे त्रिपाठी खानदान की बहू हो, ये वेश्याओं जैसे बरताव नहीं किया करो।'

'इत्ता देर तो कभी नहीं कर पाते तुम्हारे कालीन भइया।'

– मिर्जापूर

हे असे संवाद थेट लैंगिकता, त्याची गरज व्यक्त करणारे आहेत. अशा असंख्य सीरिज आणि शोंमधील संवादातून भारतीय प्रेक्षकांच्या मानसिकतेची नस ओळखल्याचं लक्षात येतं.

सर्वसाधारणपणे ओटीटीवर स्त्रियाही सहजपणे 'च्यु xx'ची

**दैनंदिन व्यवहाराची भाषा**

**वेबसीरिज किंवा शो हिंदीसह भारतातल्या बहुतांश भाषांमध्ये वेगवेगळ्या ओटीटींवर उपलब्ध आहे. या माध्यमांवर असलेल्या हिंदी किंवा कोणत्याही प्रादेशिक भाषांमध्ये त्या-त्या प्रांतातल्या, जिल्हा, तालुका, गावखेड्यात बोलल्या जाणाऱ्या भाषांचा अघळपघळपणा असतो. त्यात अनावश्यक वाटू शकेल इतक्या प्रमाणात शिवीगाळ असतेच. दैनंदिन व्यवहाराचा दाखला त्यासाठी दिला जातो. दैनंदिन भाषेत वीस-बावीस वर्षांपूर्वी 'आयला.. मायला' असं म्हटलं जात होतं. पण जाहीरपणे म्हणणं निषिद्ध होतं महाराष्ट्रात विशेषतः कोकणात, पश्चिम महाराष्ट्रात, उत्तर महाराष्ट्रात ग्रामीण ठसक्याच्या शिव्या घालणं, रोजच्या व्यवहारात कधीच आक्षेपार्ह नसतं. कोकणात माय xx, पश्चिम महाराष्ट्रात रां xx असे शब्द सहज वापरले जात. फक्त हे शब्द कधी पडद्यावर किंवा मालिकांमध्ये ऐकायला मिळाले नव्हते, इतकंच. मात्र मालवणी वस्त्रहरणात अशा शुद्ध भाषेचं 'वस्त्रहरण' केल्याने अख्ख्या महाराष्ट्राने ते नाटक डोक्यावर घेतल्याचंही पाहिलं होतं.**

भाषा बोलतात. पुरुषांप्रमाणे शिव्या घालतात. आपल्या लैंगिक भावना व्यक्त करण्यासाठी त्या आडपडदे ठेवत नाहीत. मोकळेपणाने पुरुष, लैंगिकता याविषयी त्या बोलतात. महिलांच्या हक्कांच्या गोष्टी करताना लैंगिक समानता या विषयाला वेगळ्या अर्थानं मान्यता दिल्याचं दिसतं. म्हणजे एकीकडे त्या स्त्रियाआहेत, त्यांनी कुटुंब, परंपरा सांभाळाव्यात, त्यांच्या हक्कांचं दमन एकवेळ चालेल, मात्र लैंगिकतेचं दमन होऊ देऊ नये, अशा प्रकारचं कथानक बहुसंख्य शोंमधून दिसतं.

अर्थात नुसतीच लैंगिकता किंवा शिवीगाळ या संवादांमध्ये नसते, तर राजकीय-सामाजिक भानही त्यात आलेलं असतं. जे सहजपणे हिंदी सिनेमांत किंवा मालिकेत मांडता येणार नाही. राजकीय मत मांडण्याचं स्वातंत्र या माध्यमावर आहे. त्यामुळे 'सॅक्रेड गेम्स'मध्ये देशातील राजकीय स्थितीवर भाष्य केलं जातं. 'सॅक्रेड गेम्स' वेबसीरिजमध्ये १९८० च्या दशकाच्या पोर्शभूमीवर साकारली कथा आहे. ज्यात प्रमुख व्यक्तिरेखा असलेला गणेश गायतोंडे हा मुंबईचा डॉन बनण्याच्या महत्त्वाकांक्षा बाळगून आहे. तो आणि अन्य व्यक्तिरेखा त्या काळातल्या घटनांविषयी बोलतात. एक प्रसंगात नवाजुद्दीन राजीव गांधी यांना फट्टूही म्हणतो.

'माँ मरी तो बेटा पीएम बन गया, बनते ही बोफोर्स का घोटाला किया। अपुन सोचा जब देश के पीएम का ही कोई ईमान नहीं तो अपुन सीधे रास्ते जा के क्या करेगा?'

वेबसीरिजमध्ये असल्याकारणानं फारशा वादाविना हे संदर्भ संवादातून मांडले जातात.

आणखी एक प्रसंग ताज्या परिस्थितीवर भाष्य करणारा आहे. 'द फॅमिली मॅन'मध्ये एक प्रसंग आहे. दहशतवाद्यांची माहिती देणाऱ्या व्यक्तीला दहा लाख रुपयांचं बक्षीस जाहीर करण्यात आलं आहे. एक व्यक्ती माहिती घेऊन येते आणि अधिकाऱ्याला विचारते, की तुम्ही दहा लाख देणार का? त्यावर उत्तर दिलं जातं, 'हो मिळतील'. ती माहिती घेऊन आलेली व्यक्ती म्हणते, 'पंधरा लाख देण्याचं ओशासनही होतं, त्यासाठी तर मी बँकेत खातंही उघडलं. पण ते पैसे काही मिळाले नाहीत.'

ओटीटीवरची भाषा ही अशी थेट आहे. तिला उगाच जडजंबाल बनवलं जातं नाही. शाब्दिक क्लृप्त्या टाळून व्यक्त होण्याचं स्वातंत्र्य इथल्या भाषेला आहे. गुन्हेगारी जगतातील अनुभवानं कटू झालेल्या गणेश गायतोंडेला, मुंबईसारख्या शहरावर राज्य करण्याची इच्छा आहे. एका प्रसंगात तो म्हणतो, 'दुनिया कैसे शुरू हुआ अपुन को नहीं पता, पर कैसे खत्म होगा मालूम है' किंवा हाच गायतोंडे, 'कभी कभी लगता है कि अपुन ही भगवान है। अपुन की कहानी है, सब उसमें अपना हिस्सा लेकर आए हैं। अपना काम है सबको आपस में जोडना।' अशाप्रकारचे संवाद थेट शेक्सपीयरशी नाळ जोडण्याचा प्रयत्न करतात. शेक्सपीयरनं म्हटलंय, जग हा रंगमंच आहे. पण काळ जसा बदलला, तशी भाषाही बदलली. ती अधिक थेट आणि संवेदनशील बनली. त्यावरचं अलंकारिक वजन गळून पडलेलं आहे.

भाषेच्या बाबतीत एक महत्त्वाचा विचार मांडला जातो, तो म्हणजे आपण जे काही लिहितो, तो त्या काळाचा दस्तऐवज असतो. स्वातंत्र्यपूर्व काळातील देश समजून घ्यायचा असेल तर प्रेमचंद वाचला पाहिजे, असं हिंदी भाषिक पट्ट्यात म्हटलं जातं. कारण त्यांनी कल्पित कथा लिहिल्या असल्या तरी त्याच्या भाषेत, व्यक्तिरेखांमध्ये त्या काळातल्या विचारांचं प्रतिबिंब पडलेलं होतं. आता मात्र हिंदी वेबसीरिज पाहणारे जे ऐकतात, तेच वास्तव असं मानायला लागले आहेत.

अर्थात सगळंच इतकं 'शिवराळ' आहे, असंही नाही. संवादलेखक किती बारीकसारिक गोष्टींचा अभ्यास करतात याची अनेक उदाहरणं आहेत. 'स्कॅम १९९२ : हर्षद मेहता स्टोरी' या वेबसीरिजसाठी तीनशेहून अधिक व्यक्तिरेखांसाठी संवाद लिहिलेले आहेत. विशेष म्हणजे यातल्या प्रत्येक व्यक्तिरेखेच्या भाषेचा लहेजा वेगवेगळा होता. एक नाट्यमय कथा सादर करण्यासाठी प्रत्येक संवाद अधिकाधिक धारदार असणं गरजेचं असतं, हे लक्षात घेऊन संवादांची भाषा, शैली यात वैविध्य राखण्याचा प्रयत्न केला. जर इतकी मेहनत संवादांवर घेतली जात असेल तर मग वेबसीरिजमधली भाषा अश्लाघ्यच असते, असं म्हणण्यात काहीच तथ्य नाही.

वेबसीरिज आणि शोमधील शिवराळ भाषेच्या विरोधात न्यायालयात याचिकाही दाखल झाल्यात. त्यातील एका प्रकरणात, संतापाची अभिव्यक्ती किंवा टीका करण्यावर कोणताही निर्बंध लावता येणार नाही, अशी स्वच्छ टिप्पणी दिल्ली उच्च न्यायालयानं केली होती. हे जितकं स्पष्ट आहे तितकंच त्या अभिव्यक्तीनं मर्यादाही ओलांडू नये, अशाही अपेक्षा या माध्यमाकडून आहेत. अगदी या माध्यमावरील एका संवादाच्या भाषेत सांगायचं झालं तर, 'डर की यही दिक्क़त है, कभी भी ख़त्म हो सकता है' असंही या भाषेबाबत म्हणता येईल.

**खरंच इतक्या शिव्या दिल्या जातात का?**

**मध्यंतरी ओटीटीवरील शिवीगाळ या विषयावर बराच कल्लोळ झाला. हे प्रकरण वेगवेगळ्या प्रकारानं न्यायालयापर्यंत पोहोचलं आहे. त्यामुळे या माध्यमावरच नियंत्रण आणण्याच्या हालचाली आहेत. पण तोवर या शिव्यांवर कोणाचं नियंत्रण नसणार आहे. याबाबत दोन-तीन निरीक्षणं सांगता येतील. एक म्हणजे बीबीसी या वृत्तसंस्थेनं शिव्यांच्या इतिहासाविषयी एक वृत्त दिलं होतं. त्यात किमान शंभर वर्षांचा इतिहास तरी या शिव्यांना आहे, असं सांगत बरीच रंजक माहिती दिली होती. तसंच दोन स्त्रियांनी पुरुष आईबहिणींवरून कोणत्या शिव्या देतात, त्याविषयी एक ऑनलाइन व्यासपीठ उभं करून किती शिव्या आहेत, त्याचे अर्थ काय, त्यांचा वापर याविषयीची माहिती घेतली आहे. अर्थात त्यात महिलांविषयीच्या दृष्टिकोनाचा अभ्यास हा महत्त्वाचा उद्देश होता, हे लक्षात घ्यायला हवं. तर अनेकांना शिव्या जर वास्तवात दिल्या जातात तर त्या संवादात का नसाव्यात असं मत समाजमाध्यमांतून व्यक्त केलंय. 'समांतर २'मध्ये कुमार महाजन दर वाक्यागणीक शिवीगाळ करतो. महाजन नावाचा आणि उच्च मध्यमवर्गीय महाराष्ट्रीय कुटुंबातील व्यक्ती इतकी शिवीगाळ करेल का, असा प्रश्न एकानं विचारल्यानंतर खरंच इतक्या शिव्या दिल्या जातात का, असा प्रश्न पडलाच.**

**- अपर्णा पाटील**

भ्रमणध्वनी : ८९८३८२०२०२

aparna.patil1@gmail.com



# क्रांतीच्या उंबरठ्यावर

*कोरोनाच्या बंधनांमुळे प्रेक्षकाच्या करमणूक आणि माध्यमे पाहण्याच्या पद्धतीत एक मोठा आणि अपरिवर्तनीय बदल झालेला आहे. तो विचारात घ्यायलाच हवा. ठरावीक वेळेत/ रोज प्रक्षेपित होणारे प्राइम प्रोग्राम्स कालबाह्य झाले आहेत. ओटीटीवरील, संशोधित, नेमक्या रचनेच्या आणि आपल्या सोयीने पाहता येतील अशा मालिकांना ते पर्याय ठरू शकत नाहीत. ओटीटींनी केलेला महत्त्वाचा बदल म्हणजे, त्यांनी व्हिडिओ पायरसी, ही कल्पना बाद केली आहे. प्रेक्षकाला सहज, नाममात्र दरात उपलब्ध असलेला उत्तम क्वालिटी कंटेंट तो चोरून का पाहील? उत्तरकोरोना, चित्रपट निर्मात्यांना, ग्रँड प्रीमियर आणि तीन दिवसांचे कलेक्शन हा पॅटर्न विसरावा लागणार आहे.*

**आभास आनंद**

**भार**तीय दृश्य माध्यमाच्या प्रसारणाचा सुरुवातीचा काळ, म्हणजे एकोणीसशे सत्तरी-ऐंशीची दशके. हे प्रसारण तेव्हा पूर्णपणे सरकारच्या ताब्यात होते. दृश्य माध्यमातील एकाधिकारशाहीचा काळ म्हणता येईल. या काळात, कार्यक्रमाच्या दर्जाबाबतही काळजी घेतली जात होती. हा कदाचित दृश्य माध्यमाचा सुवर्णकाळ म्हणता येईल. अनेक उत्तम कार्यक्रम किंवा मालिका या काळात घडल्या.

पुढे आर्थिक उदारीकरणाच्या काळात, नव्वदच्या दशकात माध्यमक्षेत्रात खाजगी वाहिन्यांचा प्रवेश झाला. खाजगी माध्यमावर सेन्सॉरसारखे कोणतेही नियंत्रण नसल्याने, सेल्फ सेन्सॉर पद्धतीने त्यांचे काम चाले. या क्षेत्रात जागतिक आस्थापनांनी प्रवेश केला. पुढची जवळजवळ तीन दशके ही स्पर्धा दोन-तीन मुख्य वाहिन्यांमध्येच टीआरपी (टार्गेट रेटिंग पॉईंट्स) स्वरूपात उभी आहे. अतिशय तकलादू पायावर उभी असलेली ही प्रणाली, परवलीचा क्रमांक म्हणून स्वीकारल्यामुळे, कार्यक्रमाच्या उत्तमतेचे निर्देशक म्हणजे, फक्त जाहिरातींचे उत्पन्न आणि त्या ज्यावर आधारित आहेत तो टीआरपी, असे केवळ संख्या स्वरूप उरले. कार्यक्रमाचा आशय आणि त्यातील

विधान हे दुय्यम ठरू लागले. प्रेक्षकाच्या बुद्धीचे रंजन हे केवळ एकाच कॉर्पोरेट पॅटर्नमधून आलेली उत्पादने करू लागली. हे पॅटर्नदेखील ठरलेले होते. ओपन थ्रेडेड दैनंदिन मालिका, क्राइम, हॉरर, थ्रिलर, विनोद आणि यातून ब्रेक म्हणून- नृत्य-गायन वगैरे रीअलिटी शोज. आजचा कंटेंट हा उद्याचा इ-कचरा आहे, हे वृत्तवाहिन्यांचे तत्त्व, मनोरंजनातही वापरले गेले. आज तीन दशके हा पॅटर्न तसाच्या तसा सुरू आहे. त्यात बदल करण्याची कुणाचीही प्रज्ञा किंवा प्राज्ञा नाही.

दर दशकाला एक पिढी बदलते, या गृहितकावर, आकडेवारीने सिद्ध झालेले पॅटर्न बदलायची गरज खाजगी वाहिन्यांना भासली नाही. पुढची पिढी तेच पॅटर्न जसेच्या तसे स्वीकारेल, हे गृहीत धरले गेले. दिवस-रात्र, चोवीस तास सुरू असलेल्या माध्यमस्पर्धेत मुख्य प्रश्न, वेळेचा होता. हे मॉडेल बदलायचे झाले, तर त्यासाठी कुणापाशी वेळच नव्हता, शिवाय बदललेले स्वरूप फेल झाले तर? ही भीतीही होतीच. या पॅटर्नमध्ये काम करताना जो काळ-काम-वेगाचा साचा बनला, त्याने कलाकारांना उत्तम उत्पन्न मिळते, त्यांना स्थैर्य येते, याकडे सतत बोट दाखवले गेले. या वेगामुळे त्यांच्या सृजनक्षमतेचे काय होते किंवा काळाला धाब्यावर बसवून काम करणाऱ्या कलाकार-तंत्रज्ञांच्या शरीराचे काय होते, हे दिसूनही न दिसल्यासारखे केले गेले. यामुळे या चक्रातून अकाली एक्झिट घेणाऱ्या कलाकाराच्या बाजूने उभी राहील, अशी यंत्रणा खाजगी व्यवस्थेमध्ये उभीच राहू शकली नाही. सगळे काही ऐच्छिक, परफॉर्म ऑर पेरिश या तत्त्वावर चाललेले.

असे हे मॉडेल यशस्वी आहे म्हणून दर्शवले गेले.

प्रेक्षकाच्या घरात, थेट दिवाणखान्यापर्यंत मार्केट पेनिट्रेशन असल्यामुळे, आपण दिला नाही, तर पर्याय नाही, या भरवशावर कंटेन्ट क्रिएशनमधली ही मोनोटोनी अबाधित राहिली. आपली स्पर्धा तसाच कंटेंट देणाऱ्या इतरांशी आहे, हाच फोकस होता. प्रेक्षकांची भूक काय आहे, यावर कुणीही विचार केला नाही.

हे यश कितपत खरे होते? कदाचित टीआरपी इतकेच तथ्य यातही असावे. कारण याच काळात अनेक दुय्यम वाहिन्या एकापाठोपाठ एक बंद होत गेल्या किंवा टेकओव्हर होत गेल्या. सब टीव्ही-सोनी कॉर्पोरेशनने, ई टीव्ही- नेटवर्क एटीन- व्हायकॉमने टेकओव्हर केले. माध्यमक्षेत्रातील पहिली मोठी भारतीय कंपनी झी-आज बिग थ्रीपैकी एकाच्या ताब्यात जाण्याच्या बेतात आहे.

भारतीय माध्यमक्षेत्रात ओव्हर द टॉप कंटेंटची सुरुवात २००८ साली झाली असली तरी तिचे स्वरूप, मुख्यत्वे प्राइम चॅनल्सचे कार्यक्रम नेटवरून पाहता येणे, इतकेच मर्यादित होते. सेट मॉडेलमध्ये अजूनही कुणी बदल करू इच्छित नव्हते. मार्केट पेनिट्रेशनमध्ये मोठा बदल झाला २०१३-१४ साली, स्मार्ट फोन आल्यावर आणि यूट्यूबसारखा प्रतिस्पर्धी, थेट लोकांच्या हाती पोहोचल्यावर. घरात पोहोचणाऱ्या माध्यमांना, थेट वैयक्तिक हातात पोहोचेल, अशा पर्यायाने स्पर्धा उभी केली. आपलेही ओटीटी प्लॅटफॉर्म असायला हवेत, हे सर्वच प्रमुख वाहिन्यांतील व्यवस्थापनाच्या लक्षात आले. पण व्यवसायाचा मुख्य खांब म्हणून या सर्वांकडे, त्यांची स्वत:ची, चोवीस तास सुरू असलेली, तीस वर्षे यशस्वी असलेली प्राइम चॅनल होती. या मॉडेलला धक्का लावण्यात धोका होता. अनेक दशके या कॉर्पोरेट हाऊसनी, स्वत:च्या प्रमुख वाहिनीला धोका निर्माण करेल, असे काही उभेच केले नव्हते.

**प्रत्येक प्रेक्षक त्याचे नाटक, अगदी सी रांगेतील, मधल्या खुर्चीतून, त्याच पर्स्पेक्टिव्हमध्ये पाहू शकेल किंवा टेलि-प्लेपद्धतीने, अनेक दृष्टिकोनांतूनही पाहू शकेल. मल्टिपल चॉइस कथानक हे चित्रपटाप्रमाणेच इथेही लागू होईल. चॉइस पुन्हा प्रेक्षकाचाच राहील. याने लेखक-दिग्दर्शकातील क्रिएटिव्ह डिफरन्सचा वादच मिटेल. दोघांची व्हर्जन एकाच वेळी स्ट्रीम होऊ शकतील, त्यातले उत्तम ते स्वीकारले जाईल. कल्पना करू तितक्या थोड्या आहेत. कदाचित उद्याची करमणूक, याही पलीकडे जाऊन काही वेगळेच, काही इंटरॲक्टिव्ह सादर होत असेल. जे हे बदल स्वीकारतील, ते तरतील, तगतील. बाकीचे कालबाह्य होतील.**

### दर्जेदार आशयाची वानवा

आपल्या ओटीटी प्लॅटफॉर्मवरून, आपल्याच प्रमुख वाहिनीशी स्पर्धा करेल, असे काही दाखवणे, ही आत्महत्या ठरली असती. त्यामुळे आधी जशी प्रमुख वाहिन्यांची चित्रपट चॅनल, दुय्यम वाहिन्या या टार्गेटेड प्रेक्षकांसाठी डमी चॉइसेस उभे करून, डेली कंटेंटचा प्रेक्षक लॉयल राहील, यासाठी वापरली गेली. DTH कंटेंटमध्ये मोनोपॉली असल्याने, दोन-तीन दशके ही प्राइम मॉडेल्स यशस्वी ठरली, असे दिसले. मात्र या काळात, क्वालिटी कंटेंटच्या नावाने बोंबच होती आणि आहे.

प्राइम चॅनेलने, आपले स्वत:चे ओटीटी प्लॅटफॉर्म, भविष्याची चाहूल लागल्याने उभे केले असले तरी, तेव्हा त्यांना म्हणावी तशी स्पर्धा उभी राहिलीच नव्हती. त्यामुळे तेव्हादेखील बिझनेस अप्रोच हाच होता. प्रमुख वाहिनीशी पॉप्युलॅरिटीत स्पर्धा करेल, असे काहीही अव्हॉइड करणे. यासाठी- ओटीटी कंटेंटवर सेन्सॉरशिप नाही, या गोष्टीला ब्लो केले गेले. ओटीटी म्हणजे सॉफ्ट पॉर्न, सेन्सॉर नसल्याने इथे लिबर्टी घेऊ शकतो, शिवराळ भाषा वापरू शकतो ही संकल्पना तिथून जन्माला आली. ती खरी नव्हती, रचलेली होती. ओव्हरऑल बिझनेस मॉडेलला सपोर्टिव्ह होती. कंटेंट डिलिव्हरीवरील मोनोपोली हा तिचा आधार होता. हे असे तहहयात सुरू राहिले असते. मात्र याने, क्वालिटी कंटेंट डिलिव्हरीमध्ये एक वाइड ओपन गॅप निर्माण झाली. तीच संधी होती, पण ही संधी दिसत असून, त्यात उडी घेणे, प्राइम चॅनलच्या ओव्हरऑल बिझनेस मॉडेलमध्ये शक्य नव्हते.

वरील सर्व कारणांमुळे भारतीय मनारे जं न क्षत्रे , सर्वस्वी स्वतत्रं अशा ओव्हर द टॉप कंटेंट प्रोव्हायडरसाठी मोकळे कुरण ठरले.

### नव्या बाटलीत जुनी दारू!

भारतीय माध्यमक्षेत्रात क्वालिटी कंटेंटची वानवा कधीच नव्हती.

भारतीय चित्रपटनिर्मिती बाराशेवर नवे चित्रपट दरसाल बनवते, ही साधारण दहा वर्षांपूर्वीची स्थिती होती. नंतर आलेल्या अमेझॉन, सोनी आणि स्टारच्या ओटीटीजकडे जगभरच्या कार्यक्रमाची बँक होती. पण तरीही, इथल्या प्रेक्षकाची नस म्हणून पुन्हा आकड्यांचा लेखाजोखा मांडून, इथेही ठरलेला किंवा ठरवलेला कंटेंटच दाखवला गेला. म्हणजे ओटीटी येऊन वर्षे-दोन वर्षे, या प्लॅटफॉर्मवरून जुनेच कार्यक्रम दाखवले गेले किंवा आधी रीलीज झालेले आणि हक्क घेतलेले चित्रपट, प्राइमवरून आधी ब्रॉडकास्ट झालेला कंटेंटच तिथे दाखवला गेला. अजूनही हाऊसेस स्वत:च्या प्रमुख वाहिनीला स्पर्धा येऊ नये, यासाठी सजग होती. आपण आपला, इंग्रजी शिक्षित मेट्रो तरुणवर्ग कधीच गमावला आहे, हे त्यांच्या लक्षात आले असेल, पण त्या साठी घडले काही नाही.

अशा या कुरणात, नेटफ्लिक्स आले. अगदी आदर्श फोरग्राऊंड होते. नो कॉम्पिटिशन. त्यामुळे त्यांचे दर भारतीय DTH च्या तुलनेत प्रीमियम होते, आजही आहेत. कोणत्याही व्यवसायाला एक लॉंचिंग कर्व्ह असते, तीमध्ये, नेटफ्लिक्सचे दर कमी करणे, लम्पसम- एक्स्टेंडेड मेम्बरशीपवरदेखील विचार झाला, जी स्ट्रॅटेजी नेटफ्लिक्सची बाहेर कुठेही नाही. भारतात विचार झाला कारण आज जागतिक व्यापारात भारत आणि चीन ही दोन एशियन जायंट सेंटर आहेत. तीत उभा नसेल, तो व्यवसाय ग्रॉसली फेल होईल. भारतात मात्र नेटफ्लिक्सला यातील काही करावे लागले नाही. ती एक स्टॅण्ड अलोन एंटिटी म्हणूनच उभी राहिली. तिचे हाय रेटही इथे ॲक्सेप्ट झाले, कारण इथला प्रेक्षक, स्टार्विंग होता. भारतीय मनोरंजन क्षेत्रात नटेफ्लिक्स, हे गेम चेंजर ठरले. त्याने प्राइम चॅनलच्या ओटीटींना धर्मसंकटात टाकले.

इथल्या युथने नेटफ्लिक्स आधी स्वीकारले, पुढे आलेल्या

कोरोनासंकटाने जगाचे बदललेले संपर्क नियम, त्यांच्या पथ्यावर पडले. नेटफ्लिक्सचे पेनिट्रेशन वाढत गेले. अमेझॉन, यूट्यूबसारखे प्लॅटफॉर्म, प्राइम चॅनलच्या ओटीटींना पर्याय म्हणून आले. इंडिपेंडंट कंटेंट क्रिएट आणि डिलिव्हर करू लागले. सोनी, स्टारसारख्या बिग हाऊसेसकडे कंटेंट बँक होतीच. त्यांनी चटकन नेटफ्लिक्स/ ॲमेझॉन मॉडेल स्वीकारले. गडबड झाली, झी आणि इतर छोट्या प्लॅटफॉर्मची. त्यांच्याकडे मुकाबला करायला कंटेंटच नव्हता.

**मनोरंजनाचे नवे नियम**

यामुळे भारतीय मनोरंजन क्षेत्रातील, मोजक्या ग्रुपची, क्रिएटिव्ह कंटेंटवर असलेली, स्वामित्वाची मोनोपोली नष्ट झाली. अखेर प्राइम चॅनेलनी ओटीटींसोबत स्पर्धा करण्याऐवजी आपला कंटेंट जास्त रिजनल करत नेला. आपले ओटीटी प्लॅटफॉर्मही कंटेंट रिच करायला सुरुवात केली. आज प्रमुख वाहिन्यांवरील हिट शोदेखील आपण ओटीटीवर बघतो. कित्येक घरांत केबल कनेक्शनच नाही. स्मार्ट टीव्ही घरोघरी झाले आहेत. ही बदललेल्या माध्यमक्षेत्राची नांदी आहे. नेटफ्लिक्सने दिलेली कंटेंट रिच आणि मुबलक व्हरायटी, या सर्वांच्या मुळाशी आहे. आपल्या वाहिन्या गोइंग मोअर रिजनल, हे कॉम्पिटिशनला उत्तर समजत होत्या तेव्हा, गोइंग ग्लोबल ही संकल्पना घेऊन नेटफ्लिक्स आले. त्याने मनोरंजन क्षेत्राचे नियम नुसते बदलले नाहीत तर सेट केले. आज क्वालिटी कंटेंट बनत नाही, उपलब्ध नाही, ही तक्रार इतिहासजमा होते आहे.

हे युद्ध आता कुठे सुरू झाले आहे. आज भारतात हा व्यवसाय दीडशे कोटींचा आहे आणि पुढील चार वर्षांत सव्वाचारशे कोटींचा असेल, असा अंदाज आहे. आज पंचवीस कोटींच्या आसपास असलेला युजर बेस, सेहेचाळीस करोडच्या पुढे असेल. पुढच्या टप्प्यावर, 5G वेगवान बँड विड्थ आणि तिचे वहन करण्यासाठी अतिवेगवान ऑप्टिकल फायबर DTH सेवा सुरू होतेय. पाचव्या जनरेशनचे इंटरनेट, आधीपेक्षा दहापट वेगवान असणार आहे. अल्ट्रा हाय फ्रिक्वेन्सीवर होणारे हे प्रक्षेपण मॅसिव्ह मिमो स्वरूपात, (मल्टिपल इनपुट/मल्टिपल आऊटपुट) लॉसलेस ऑप्टिकल केबलमधून घरोघरी पोहोचणारी अतिवेगवान सेवा, संपूर्ण नवे नियम सेट करणार आहे. फोन, इंटरनेट, केबल आणि थिएटर या चारही गोष्टी, एकाच माध्यमातून थेट प्रेक्षकाच्या घरात पोहोचणार आहेत.

यांचा विचार करून आपण या बदलांसाठी नुसते तयारच नाही तर अपडेट असायला हवे. कोरोनाबंधनांमुळे प्रेक्षकाच्या करमणूक आणि माध्यमे पाहण्याच्या पद्धतीत एक मोठा आणि अपरिवर्तनीय बदल झालेला आहे. तो विचारात घ्यायलाच हवा. ठरावीक वेळेत/ रोज प्रक्षेपित होणारे प्राइम प्रोग्राम कालबाह्य झाले आहेत. ओटीटीवरील, संशोधित, नेमक्या रचनेच्या आणि आपल्या सोयीने पाहता येतील अशा मालिकांना ते पर्याय ठरू शकत नाहीत. जुन्या पद्धतीला आजही हुक असलेली पिढी हळूहळू नष्ट होते आहे. क्रिएटिव्ह कंटेंटवर वाहिनीचा स्वामित्वहक्क, ही कल्पना, सोयीची असली तरी नव्या इंटेलिजन्ट प्रॉपर्टी राइट्स कायद्याशी विसंगत आहे. ओटीटींनी नवा कायदा स्वीकारला आहे. त्यामुळे एकच कंटेंट, अनेक ओटीटीवर पाहता येतो आणि त्याचे स्वामित्वहक्क, निर्मात्याकडेच राहतात. ओटीटींनी केलेला महत्त्वाचा बदल म्हणजे, त्यांनी व्हिडिओ पायरसी ही कल्पना बाद केली आहे. प्रेक्षकाला सहज, नाममात्र दरात उपलब्ध असलेला उत्तम क्वालिटी कंटेंट तो चोरून का पाहील?

उत्तर कोरोना, चित्रपट निर्मात्यांना, ग्रँड प्रीमियर आणि तीन दिवसांचे कलेक्शन हा पॅटर्न विसरावा लागणार आहे. त्यामुळे डिस्ट्रिब्युटरशिप ही संकल्पना बाद होऊ शकते. ओटीटी प्लॅटफॉर्मवर रिलीज चित्रपट- हाय स्पीड नेटवर्कद्वारा थिएटरमध्ये दाखवता येत असताना, हा द्राविडी प्राणायाम कोण, कशासाठी करेल? मुदलात, टॅब आणि सेलफोनवर पाहिला जाणारा कंटेंट, सुपर स्टारडम आणि सुपर बजेटचा असू शकत नाही. त्यांनाही क्वालिटी कंटेंटशी स्पर्धा करूनच स्वत:ला सिद्ध करावे लागणार आहे. एकुणात त्यांना आपला उद्याचा माध्यमदृष्टिकोनच बदलावा लागणार आहे.

नाटक करणारे अजूनही, थिएटर सुरू करा, या आंदोलनातच अडकले आहेत. बदलत्या करमणूकक्षेत्राचा त्यामागे विचारच नाही. उद्याचे नाटकही नाट्यगृहधार्जिणे असता उपयोगी नाही. ते लवचीक, कुठेही सादर होऊ शकेल असे, त्याचवेळी ग्रँडही करता येईल, असे दुहेरी हवे. एकाच वेळी त्याचे अस्तित्व, थिएटर किंवा टेलि-प्ले स्वरूपात, ओटीटीवर उपलब्ध हवे. हाच नियम चित्रपटांही लागू असेल.

मॅसिव्ह मिमो प्रक्षेपणातील उद्याची मालिका, चित्रपट, नाटक कसे असू शकेल, याच्या काही कल्पना आपण करू शकतो. बँड विड्थ हा इश्यू नसल्याने, एकाच वेळी, अनेक दृष्टिकोनातून (पॉइंट ऑफ व्ह्यू) प्रेक्षकाला आपला आवडता कार्यक्रम पाहता येईल. हे साधारण कोणत्याही व्हिडिओ गेमच्या मल्टिपल व्ह्युइंगसारखेच असू शकेल. कदाचित ते आणखी इंटरॲक्टिव्हही करता येईल. त्यात कथानकातील अनेक शक्यता आधीच रेकॉर्डेड असतील आणि प्रेक्षक आपल्या पसंतीनुसार, आपल्या चॉइसने ते पाहू शकतील. दिग्दर्शकाचा दृष्टिकोन ही संकल्पना तेव्हा बाद झालेली असेल. प्रत्येक प्रेक्षकाचा दृष्टिकोन हा मुद्दा तेव्हा महत्त्वाचा राहील.

प्रत्येक प्रेक्षक त्याचे नाटक, अगदी सी रांगेतील, मधल्या खुर्चीतून, त्याच पर्स्पेक्टिव्हमध्ये पाहू शकेल किंवा टेलि-प्लेपद्धतीने, अनेक दृष्टिकोनांतूनही पाहू शकेल. मल्टिपल चॉइस कथानक हे चित्रपटाप्रमाणेच इथेही लागू होईल. चॉइस पुन्हा प्रेक्षकाचाच राहील. याने लेखक-दिग्दर्शकातील क्रिएटिव्ह डिफरन्सचा वादच मिटेल. दोघांची व्हर्जन एकाच वेळी स्ट्रीम होऊ शकतील, त्यातले उत्तम ते स्वीकारले जाईल. कल्पना करू तितक्या थोड्या आहेत. कदाचित उद्याची करमणूक, याही पलीकडे जाऊन काही वेगळेच, काही इंटरॲक्टिव्ह सादर होत असेल. जे हे बदल स्वीकारतील, ते तरतील, तगतील. बाकीचे कालबाह्य होतील.

या सर्वांतून सर्व्हायव्हल ऑफ द फिटेस्ट हा डार्विनियन सिद्धांत, पुन्हा एकदा सत्य सिद्ध होईल.

**– आभास आनंद**
भ्रमणध्वनी : ९८२१०९१९४६
abhas_n@hotmail.com



# मनोरंजनाची बदलती क्षितिजे

**अक्षय बर्दापूरकर**

*आजच्या युगात ओटीटी (ओव्हर द टॉप) हा निर्मात्यांसाठी नवीन आणि सोयीचा पर्याय ठरतो. त्यामागे अनेक कारणं आहेत. मराठी सिनेमे हवे तसे चालत नाहीत, नाटकांना मर्यादित प्रेक्षकवर्ग आहे, तर यूट्यूब फ्री मॉडिल असल्यामुळे त्यातून फारसा पैसा मिळत नाही. त्यामुळे मराठी कंटेंट मेकरनी करायचं काय? त्यामुळे नवं टॅलेंट, नवे विषय, नव्या कल्पना आणि भरपूर मेहनत करण्याची जिद्द असलेल्या प्रत्येकासाठी ओटीटी हा यशाचा राजमार्ग ठरतोय....*

ओटीटी हा निर्मात्यांसाठी नवीन पर्याय ठरतो, त्यामागे अनेक कारणं आहेत. एक तर मराठी सिनेमे हवे तसे चालत नाही, नाटकांना मर्यादित प्रेक्षकवर्ग आहे, यूट्यूब फ्री मॉडेल आहे. त्यावर फार पैसा नाही. मग मराठी कंटेन्ट मेकरनी करायचे काय? ज्यांच्याकडे टॅलेंट आहे, नवीन विषय-कल्पना आहेत, पॅशन आहे ते स्वत:चं पोटेन्शियल कुठे वापरतील? ओटीटीनं त्यांना तो पर्याय दिला.

या कोरोना महामारीच्या काळात आमचा 'एबीसीडी' हा सिनेमा रिलीज होऊ शकला नाही. त्यावेळी माझ्यापुढे एकच पर्याय होता. सिनेमा ओटीटीला विकणं. सुदैवानं सिनेमात विक्रम गोखले-अमिताभ बच्चन असे दोन तगडे कलाकार होते. त्यामुळे सिनेमा ॲमेझॉनला विकणे मला सोपे गेले. नफा नाही पण निदान सिनेमाचे निर्मितीमूल्य (प्रॉडक्शन कॉस्ट) मला मिळाले. यातून माझ्यासारखे अनेक निर्माते निर्माण होण्याची शक्यता वाढली. आता अशी परिस्थिती आहे की आता ओटीटीमुळे आधी पैसे मिळून मग त्यांच्यासाठी विशिष्ट आशय-विषयाच्या वेबसीरिज वा सिनेमे बनवून घेतले जातात. पूर्वी नाटकांत काय किंवा सिनेमात काय आधी स्वत:चा पैसा ओतावा लागायचा. सिनेमा चालला तर ठीक नाहीतर माणूस अक्षरश: भिकेला लागायचा. मराठीमध्ये हिंदीसारखे 'धर्मा प्रॉडक्शन', 'यशराज प्रॉडक्शन' असे प्रॉडक्शन हाऊस तयार झाली नाहीत. नाटकक्षेत्रात काही प्रमाणात हे घडले. 'सुयोग' वगैरे. मराठी सिनेमात मात्र 'कॉर्पोरेटायझेशन ऑफ मराठी इंडस्ट्री' हा प्रकार झालाच नाही. झी, स्टार, सोनी, कलर्स या वाहिन्यांनी प्रयोग केले तरी त्यांची पालक कंपनी (पेरेंट कंपनी) मात्र हिंदीच आहे. महेश मांजरेकर यांच्याकडे असे कॉर्पोरेट हाऊस उभे करण्याची क्षमता होती. तशी अपेक्षाही होती; पण तसे घडले नाही.

या सगळ्या परिस्थितीचा मी फार बारकाईने विचार केला आणि मराठी नाटक ते ओटीटी अशी एक इकोसिस्टिम तयार करावी, ज्यात नवीन टॅलेंटला वाव मिळायला हवा हा विचार मला सुचला. असा पर्याय मला ओटीटीच्या रूपात दिसला. यात आम्ही आधी स्क्रिप्ट ऐकतो, पटले तर त्याला सर्वार्थाने पाठिंबा देतो. महामारीमुळे इथली गणितेही बदलली. जसे चलननिश्चलीकरणामुळे 'डिजिटल मनी' वापरायची लोकांना सवय झाली किंवा खाद्यान्न आणि मनोरंजन लॉकडाऊनमुळे मोबाइलवर आले. तसेच ओटीटी हे अवतीर्ण झाले आणि फोफावले. लोक पुन्हा थिएटरकडे वळतील आणि ओटीटीची प्रेक्षकसंख्या कमी होईल ही शक्यता आता शून्य आहे. उलट प्रेक्षकसंख्या वाढेल. ज्या कंपन्यांकडे स्वत:चा प्रचंड डेटा आहे. उदाहरणार्थ, झोमॅटो, स्विगी, ओला, उबर या कंपन्यासुद्धा स्वत:चा ओटीटी प्लॅटफॉर्म उघडू शकतात. त्यामुळे चांगला आशयघन विषय घेऊन लोकांना ओटीटीची सवय लावायची हेच आमचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी आम्हालाही दर्जेदार निर्मिती करावी लागेल. आबालवृद्ध सगळ्याच वयोगटांचा विचार करावा लागेल. उद्या ओटीटीवरच्या वेबसीरिज सिनेमा थिएटरमध्ये दाखवण्याचासुद्धा ट्रेंड येऊ शकतो.

ओटीटी प्लॅटफॉर्मवर एक आरोप केला जातो की इथे सेन्सॉरशिप नसल्याने आशय अतिशय भडकपणे, बटबटीतपणे मांडला जातो. नग्नता, सेक्स, हिंसाचार यांचा भडिमार केला जातो. पण यामागचा दृष्टिकोन असा आहे की वास्तवाचे दर्शन वास्तव रूपातच दाखवायला हवे. उदाहरणार्थ, धारावीत राहणारा मुलगा पुण्याची मराठी बोलणार

नाही आणि पुण्यातील सदाशिवपेठेतला माणूस धारावीची भाषा बोलणार नाही. त्यामुळे वरील सर्व गोष्टी कथानकाची गरज असेल तर त्या येणारच. किंवा नवराबायकोच्या संबंधात लैंगिकता हा घटक येणारच. पण नेहमीच्या पारंपरिक वाहिन्यांवर किंवा सिनेमागृहात हे दाखवताना अनेक बंधने असतात. शिवाय निर्मात्यालाही भीती असते की फॅमिली ऑडियन्स दूर जाईल. पण ओटीटीवर ही भीती, हे बंधन नसते, ऑडियन्सची चिंता नसते. पैसे आधीच मिळतात. त्यामुळे वास्तववादी आशय सादर करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य मिळते. अर्थात बोल्डनेस आणि व्हल्गरनेस यांच्यातील सीमारेषा ही निर्मात्यांच्या विचारप्रक्रियेवर अवलंबून आहे.

सध्या आमच्या प्लॅटफॉर्मवर आम्ही 'सोपं नसतं सारं काही' ही 'पोलिमरी'वर आधारित सीरिज दाखवत आहोत. परंतु हा विषय समाजाच्या पचनी पडणे सहजासहजी शक्य नाही. पारंपरिक वाहिन्यांवर हे दाखवणे शक्यच नाही. हा स्कोप ओटीटीमुळे सहज उपलब्ध झाला. कारण तुमचा विचार हव्या त्या स्वरूपात मांडण्याचा पर्याय इथे उपलब्ध आहे. हवा तो विषय कोणतीही तडजोड न करता ताकदीनिशी मांडण्याचे स्वातंत्र्य ओटीटी प्लॅटफॉर्म निर्मात्यांना देतो. अर्थात काय पाहावे किंवा काय पाहू नये हे प्रेक्षकांनी त्यांच्या आवडीनिवडीनुसार ठरवायचे आहे.

साधारणपणे मध्यमवर्गीय घरात एकच टीव्ही असतो. त्यामुळे ह्यात अधिकारपदावर असलेली व्यक्ती जे टीव्हीवर बघते तेच संपूर्ण कुटुंबाला पाहावे लागते. पण ओटीटीमुळे ज्याला जे हवे ते तो मोबाइलवर बघू शकतो. अर्थात व्यक्तींमध्ये आत्ममग्नता येऊन कौटुंबिक नातेसंबंधांवर याचा परिणाम होईल का हा प्रश्न या अनुषंगाने नेहमीच विचारला जातो. पण शेवटी हा व्यक्तीचा निर्णय असतो असं मला वाटते. तत्काळ समाधान (इन्स्टंट ग्रॅटीफिकेशन) ही एक गोष्ट प्रत्येकालाच हवी असते. ती ओटीटीमुळे साध्य होते. आपण गणपतीदर्शनही ऑनलाइन घेतले. हाच ट्रेंड पुढे जाईल. पूर्वीसारखी गर्दी कोणत्याच कार्यक्रमांना, उपक्रमांना मिळणे यापुढे अशक्य होईल. जगातील मोठे मॉल ९० टक्के बंद होतील. खरेदी-विक्री ऑनलाइन केली जाईल. छोटे मॉल फक्त खरेदीचा अनुभव घेण्यापुरते उरतील असे माझे प्रामाणिक मत आहे. जसं दोन-तीन महिन्यांतून कधीतरी आपण पिकनिकला जातो तशीच ही ठिकाणे कदाचित फक्त अनुभव घेण्यासाठीच उरतील. ओटीटी कधीच बंद होणार नाही. नवीन नवीन स्वरूपात ते आणखी फोफावेल यात वाद नाही. उलट थिएटर कायमस्वरूपी बंद होण्याची शक्यता मात्र दाट आहे.

महामारीत आर्थिक फटका ओटीटीलाही बसलाय. लोक घरी बसले होते त्याचा काही फार मोठा आर्थिक फायदा ओटीटीला झाला असे म्हणता येणार नाही. नेटफ्लिक्सकडे सध्या ४५ लाख सबस्क्रायबर आहेत पण भारतीय लोकसंख्येच्या मानाने हे काहीच नाही. नवीन पिढी हळूहळू वयाने वाढेल, प्रेक्षकसंख्येत त्यांची आणखी भर पडेल. त्यामुळे भविष्यात ओटीटीची प्रेक्षकसंख्या ही वाढतच जाणार आहे. तंत्रज्ञानापासून दूर असणाऱ्या लोकांना इथपर्यंत आणण्यासाठी मात्र आम्हाला आणखी युजर फ्रेंडली ॲप आणणे गरजेचे आहे. व्हॉट्सॲप जसे सहज वापरले जाते तशा पद्धतीनचे टूल विकसित करणे आवश्यक आहे. 4G मुळेच एवढी क्रांती झाली आहे की 5G आले तर प्रेक्षकसंख्या वाढेल. मग पार्किंगचा त्रास, ट्रॅफिकची कटकट, पेट्रोल खर्च, मास्क, सॅनिटायझर या सगळ्यांचा त्रास सहन करण्यापेक्षा लोक ओटीटीकडेच वळतील.

नेटफ्लिक्स, ॲमेझॉनवर खूप वेगवेगळे विषय मांडले जात आहेत, तशा विषयांना टेलिव्हिजनवर मांडणे शक्यच नाही. माझ्या मते 'टेलिव्हिजन ॲण्ड सॅडनेस गो टुगेदर'. त्यातून फार काही प्रेरणादायक मिळत नाही. सद्गुरू जग्गी वासुदेव किंवा श्री श्री रविशंकर यांना अनेक अनुयायी आहेत. लाखो लोक त्यांना भक्ती चॅनल्सवर बघतात. हे दूरदर्शनवर झाले नसते. ही माणसेसुद्धा ओटीटी प्लॅटफॉर्म तयार करू शकतात.

जिवंत अनुभवाचा ठसा आपल्या मन:पटलावर कायमसाठी कोरला जातो. तो मोबाइलवर ओटीटी बघून शक्य नाही असा एक आरोप ओटीटीच्या बाबतीत घेतला जातो. माझ्या मते, लताचे गाणे आवडणारा माणूस हनीसिंग पण एंजॉय करू शकतोच. त्यामुळे ही गोष्ट व्यक्तिसापेक्ष आहे. कदाचित पुढे पुढे थिएटरला जाऊन सिनेमा बघणं हेच ॲबनॉर्मल ठरू शकते. आता ट्विटरसारख्या कंपन्यांनी 'लाइफटाइम वर्क फ्रॉम होम' जाहीर केलेय. त्यामुळे कामासाठीही माणसे बाहेर पडायची हळूहळू बंद होतील. मनोरंजनासाठी घराबाहेर पडणे हेही हळूहळू याच धर्तीवर बंद होईल.

ओटीटी ही श्रीमंतांची मक्तेदारी होईल असाही आरडाओरडा केला जातोय, पण महिना २००-३०० रुपये भरण्यासाठी फार श्रीमंत असण्याची गरज नाही असे माझे मत आहे. सॅटेलाईट प्रक्षेपण आले तेव्हाही हाच प्रश्न विचारला गेला होता. आज गावागावात, झोपड्यांतसुद्धा खाजगी पेड वाहिन्या बघितल्या जात आहेत.

समाज भरकटू शकतो असे एक सरसकट विधान ओटीटीच्या संदर्भात केले जाते. पण हे ॲप मोफत नाही. त्यासाठी सदस्यत्व घ्यावे लागते. उलट व्हॉट्सॲप, इन्स्टाग्राम, टिकटॉप, फेसबुक, यूट्यूब या गोष्टी फ्री असल्याने त्या माध्यमातून समाज सहज भरकटत जातो आहे हे म्हणायला संधी आहे. अर्थात काहींनी यातूनही प्रेरणाही घेतली. अनेक नवीन चेहऱ्यांना वाव मिळाला. त्यांचे टॅलेंट बाहेर आले. फक्त मला वाटते ही प्रसिद्धी कशी पचवायची यासाठी समुपदेशन होणे मात्र गरजेचे आहे. आज माणूस टीव्हीपेक्षा मोबाइलवर जास्त असतो. त्यामुळे वृत्तवाहिन्यादेखील 'ओटीटीवर उपलब्ध' अशी तळटीप आवर्जून देतात.

शेवटी प्रत्येक गोष्टीला चांगली आणि वाईट या दोन्ही बाजू असतातच. समाजाने यातून चांगलेच घ्यावे ही अपेक्षा. त्यासाठी आम्ही ओटीटीच्या माध्यमातून प्रयत्न करतच राहणार.

**- अक्षय बर्दापूरकर**
akshay@planetmarathi.com

**शब्दांकन : डॉ. लतिका भानुशाली**
भ्रमणध्वनी : ९३२२२०७८७८
bhanushali.latika@gmail.com



धीरज अकोलकर हा खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय दिग्दर्शक म्हणता येईल. त्यांचे अनेक चित्रपट आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये गाजलेले आहेत. हिंदी चित्रपटसृष्टीमध्ये साहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम केल्यानंतर त्यांनी लंडनला जाऊन चित्रपट दिग्दर्शनाचे तंत्रशिक्षण घेतले. त्यानंतर 'लिव्ह ॲन्ड इंगमार'सारख्या अतिशय वेधक विषयापासून त्यांनी चित्रपट दिग्दर्शनाला सुरुवात केली. भारत, इंग्लंड, फ्रान्स, नॉर्वे, अमेरिका, युगांडा, स्वीडन आणि बोसनिया अशा अनेकविध देशांमधून चित्रपट बनवणाऱ्या धीरज यांनी चित्रपटामधून देश, भाषा, प्रांत, संस्कृती अशा अनेक सीमा ओलांडलेल्या आहेत. त्यांचा एकंदरीत ओटीटी माध्यमाकडे पाहण्याचा दृष्टिकोन त्यामुळेच व्यापक आणि सकारात्मक असा आहे.


# मुक्तीची भावना महत्त्वाची

**धीरज अकोलकर**

**मी** भारतामध्ये साहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम करत असताना सिनेमाचे प्रशिक्षण कधीच घेतले नव्हते, मात्र टिपिकल बॉलीवूड सिनेमासृष्टीमध्ये काम करत असताना मला जाणवले, की सिनेमा याहून अधिक काहीतरी आहे. याकाळामध्ये आपल्याकडे भारतामध्ये अल्टरनेटिव्ह सिनेमा उदयाला आलेला नव्हता. त्याच साच्यामध्ये अडकायचे नसल्यामुळे मी लंडनला जाऊन सिनेमाचे शिक्षण घेतले. येथे मी पहिल्यांदा आंतरराष्ट्रीय आणि जागतिक सिनेमा अनुभवला. मानवी भावभावनांचे सार्वत्रिक दिसणारे सर्व प्रकार मी यामध्ये अनुभवले, आणि मग माझ्या लक्षात आले की, माणसं सगळीकडे सारखीच असतात. अनेकदा मला हा प्रश्न आपसूक विचारला जातो की, मी भारतीय असून युरोपीय कथानकांवर सिनेमा का बनवतो? तर याचे उत्तर हेच, की मुळात भारत हाच एकसंध देश नाही. हा एक खंड आहे, भारतीय संस्कृती इतकी वैविध्यपूर्ण आहे की, आपल्याला पठाणी दिलीपकुमार आणि दाक्षिणात्य वैजयंतीमाला हे बंगाली देवदास आणि चंद्रमुखी म्हणून पाहत असताना अजिबात खटकत नाहीत. आपल्यामध्ये आपण भाषा-प्रांत यांसारखे विषय कधीच ओलांडलेले असतात. सध्या जागतिक स्तरावर आशयाचा जो एक प्रवाह सुरू आहे, तो म्हणूनच आपण भारतीय आत्मसात करू शकतो.

मला आणखी एक जाणवणारी गोष्ट म्हणजे सिनेमा हे अधिकाधिक डेमोक्रॅटिक मीडियम बनत आहे. अगदी पार खेड्यापाड्यात पोचलेले टिकटॉकसारखे माध्यमदेखील तिथल्या लोकांना आपण एखादे चलचित्र बनवू शकतो याचा आत्मविश्वास देत आहे. स्मार्ट फोनच्या या त्सुनामीमुळे आता सिनेमा बनवणे ही केवळ तंत्रज्ञांची मक्तेदारी राहिली नाही. काही सेकंदाचा व्हिडिओ असला तरी त्या लोकांसाठी हा क्रिएटिव्ह प्लॅटफॉर्म आहे, आणि ते त्यांच्या अभिव्यक्तीचे माध्यम बनत आहे. लोकांना मिळत असणारी ही ॲक्सेसेबिलिटी माझ्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. यामधून लोक अधिक प्रयोग करत राहतील. नवीन काहीतरी येत राहील. चलचित्र हे केवळ सिनेमा म्हणूनच नाही तर जनजागृतीचे एक माध्यम म्हणून देखील लोकांपर्यंत पोचत आहे. व्हायरल व्हिडिओ अथवा ओटीटी कंटेंटसारखे प्रयोग आणि सिटिझन जर्नालिस्टसारखे अनेक नवीन प्रकार कशाप्रकारची माध्यमक्रांती आणू शकतात हे आपण अरब स्प्रिंगसारख्या चळवळींमध्ये पाहिलेलेच आहे. जेव्हा सरकारकडून अभिव्यक्तीवर बंधने आणली जातात, पारंपरिक माध्यमांची मुस्कटदाबी केली जाते, तेव्हा हे असे स्मार्ट फोनवर केलेले व्हिडिओ व्हायरल होतात, आणि तिथल्या प्रत्येक लढणाऱ्या मनाला उभारी मिळते. इतके दिवस दडपशाहीच्या जोरावर एखाद्या गटाला अथवा लोकसंख्येला चिरडून टाकणे शक्य होते, पण आज चलचित्राच्या या डिजिटलीकरणाच्या सुलभतेने हे शक्य नाही. मला वाटते की फिल्मच्या बदलत्या तंत्रज्ञानाचा हा एक अतिशय सुरेख उपयोग आहे.

इथे लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे, सिनेमा हे कलेचं माध्य म्हणून असो वा व्यावसायिक माध्यम, हे तुलनेने अत्यंत नवीन माध्यम आहे. अवघ्या शंभर-दीडशे वर्षांची परंपरा सिनेमाला आहे. त्यामुळे अद्याप माध्यमाची उत्क्रांती होत आहे. एक तंत्रज्ञान म्हणून सिनेमा हा रिळाच्या प्रोजेक्टरमधून डिजिटल प्रोजेक्टरपर्यंत आला आहे. तिथून तो स्मार्ट फोनमध्ये आल्यानंतर त्याच्या प्रगतीचा वेग थक्क करणारा आहे. याचमुळे असेल पण आज चित्रपटसृष्टी ही पूर्वीसारखी चेन्नई, मुंबई, कोलकाता अशी मोठ्या शहरांचीच मक्तेदारी राहिली नसून ती, अगदी तालुका, खेड्याच्या पातळीपर्यंत पोचली आहे. ओटीटीवरून अनेक डिजिटल कंटेंट आपल्यापर्यंत आपसूक येत आहे आणि त्यामधील एक मोठा भाग हा अशा एरवी लहान वाटणाऱ्या भागामधून येत आहे. शॉर्ट फिल्म, वेबसीरिज, चित्रपट अशा अनेक माध्यमांमधून एरवी दुर्लक्षित असलेल्या विषयावर फिल्म बनत आहेत. मात्र, त्याचवेळी जरी सिनेमा बनवणे सोपे झाले असले तरीही, माध्यम म्हणून त्यामध्ये असलेली कॉम्प्लेक्सिटी- गुंतागुंत ही आजही तितकीच जटिल आहे. सिनेमा एखादी गोष्ट आपल्यापर्यंत पोचवत असतो, त्यावेळी प्रेक्षकाच्या मनामध्ये त्या सर्व भावना निर्माण करणे ही खचितच सोपी गोष्ट नाही. यामध्ये आजही शोध घेण्यासारख्या खूप गोष्टी आहेत आणि तंत्रज्ञानाने त्या अधिकाधिक करता येणार आहेत. सिनेमा एक तासाचा आहे की एक मि निटाचा याहून अधिक महत्त्वाचे आहे की तो बनवताना दिग्दर्शक किती सिन्सिअर होता. तुमच्या एकंदर दृष्टिकोनामध्ये किती सच्चाई होती. ते तुम्ही जमवू शकलात तर चित्रपट दिग्दर्शक म्हणून तुम्ही जिंकता.




अनेकदा सिनेमाबद्दल गंभीर असणारे लोक असे म्हणतात, की सिनेमा हा कम्युनल अनुभव आहे, तो अस्सल रीतीने खरे तर चित्रपटगृहातच घेता येऊ शकतो. एक सिनेमाप्रेमी म्हणून हे मला थोडेफार मान्य आहे, पण त्याचवेळी मला असे वाटते की हा प्रत्येकाच्या निवडीचा भाग आहे. सिनेमा तुम्ही सार्वजनिक ठिकाणी बसून बघू शकता, अनुभवू शकता. पण तुमच्याकडे ती यंत्रणा नसेल तर तुम्ही पूर्ण सिनेमा या अनुभवाला मुकता. सध्या युगांडामध्ये आमचा एक आऊटरीच प्रोग्राम सुरू आहे. तिथल्या खेड्यापाड्यामधून परिस्थिती अशी आहे, की तासनतास प्रवास केल्याखेरीज तुम्ही सिनेमागृहामध्ये जाऊ शकत नाही. शिवाय गरिबी आहेच. म्हणजे संसाधने आणि पैसे दोन्ही नसल्यामुळे तुम्ही जगभरातील सिनेमापासून वेगळे होत जाता. जिथे थिएटर हीच मुळात लक्झरी असतील तर अशावेळी मला वाटते की ओटीटीमाध्यमे अत्यंत महत्त्वाची ठरतात. एखादा कंटेंट जर फक्त थिएटरमध्येच उपलब्ध असेल तर तो जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचू शकणारच नाही. परंतु इंटरनेटच्या माध्यमाधून सिनेमा छोट्या पडद्यावर, स्मार्टफोनमधून अनेकांपर्यंत जात आहे. आणि म्हणूनच मला नाही वाटत की सिनेमा हा फक्त मोठ्या पडद्यावरच एंजॉय करता येऊ शकतो. तंत्रज्ञान बदलल्याने साहजिक सिनेमाचा अनुभव थोड्याफार प्रमाणात का होईना बदलतो. पण तरीही जो आतपर्यंत भिडतो तो अनुभव सच्चा असतो. लंडनमध्ये 'फिल्ममेकिंग' शिकत असताना मी अनेक फिल्म तिथल्या लायब्ररीमध्ये एकट्याने पाहिल्या. अगदी विशेष आठवणारी फिल्म म्हणजे ऑटम सोनाटा. मी ही फिल्म एकट्याने व्हीसीआरवर पाहिली, आणि ती फिल्म माझ्या मनाला इतकी भिडली की आपण फिल्म मोठ्या स्क्रीनवर पाहत नसून छोट्या टीव्हीवर पाहतो आहे याने मला काहीही फरकच पडला नाही. मला वाटते, की सिनेमा हा असा आतपर्यंत जाऊन भिडला पाहिजे. त्यासाठी माध्यम काहीही असो, पण सिनेमा बघण्याचा अनुभव सच्चा असेल तर ती कलाकृती जिंकते. याचा अर्थ असा होत नाही, की थिएटर नामशेष होतील. थिएटरही लवकरच पुन्हा जुन्या रुबाबात सुरू होणार आहेत, कारण थिएटरमधला सिनेमा हा अनेक अर्थांनी वेगळा अनुभव असतो.

आपल्याकडे भारतामध्ये अनेकदा अजूनही घरच्या स्त्रियांना मनमोकळेपणाने जाऊन थिएटरला हवे ते सिनेमा पाहता येत नाहीत, अशावेळी मोबाइलवर एखादा सिनेमा पाहून त्या घरच्या बाईला दोन क्षण विरंगुळा मिळत असेल तर तेही तितकेच महत्त्वाचे आहे! मोठ्या पडद्यावर सिनेमा दाखवताना दिग्दर्शक म्हणून मी तांत्रिक बाबतीत अधिक वरचढ कामगिरी करू शकतो. त्याचवेळी हाच सिनेमा आता ओटीटी माध्यममधूनही प्रेक्षकांना भेटणार आहे, आणि या अशा प्रेक्षकांची संख्या जास्त असेल यादृष्टीने मला सिनेमा बनवायला हवा. सिनेमा बनवणे हे एक दिग्दर्शक म्हणून माझे काम आहे, तो कशा पद्धतीने कंझ्युम करावा हे प्रेक्षकांचे काम आहे. मी तिथे प्रेक्षकांना अमुक तांत्रिक सोयी असतील अशा ठिकाणीच माझा सिनेमा बघा असे बंधन घालू शकत नाही. सिनेमा बनवतानाचे निर्णय हे माझे स्वातंत्र्य होते, आणि सिनेमा बघताना प्रेक्षकांना निर्णयस्वातंत्र्य असतेच, जेणेकरून प्रत्येक प्रेक्षक कुठल्याही सिनेमाच्या अनुभवाला कसे सामोरे जायचे ते स्वत: ठरवू शकतो.

अखेर सिनेमा हा प्रत्येक प्रेक्षकाला मुक्तीची भावना देतो, आपण सध्या जिथे आहोत तिथून दूर कुठेतरी टाइम आणि स्पेसचा प्रवास करून नेण्याचे सामर्थ्य या माध्यमामध्ये आहे, मग ते मोठ्या पडद्यावर असो, वा ओटीटीसारख्या डिजिटल माध्यमामधून असो. प्रेक्षकासाठी ही मुक्तीची भावनाच सर्वोत्तम!

**– धीरज अकोलकर**
dheerajakolkar@gmail.com

**शब्दांकन : नंदिनी देसाई**
nandini2911@gmail.com



The Attendants, 2020



Look Out, 2020

# नाट्यानुभवाचे नवे ढाचे

**योगेश तडवळकर**

*अतिशय वाखाणण्याजोगी विविधता असली तरी आजवर सादर होणाऱ्या बहुसंख्य मराठी नाटकांचा ढाचा हा One-to-Many असाच राहिला आहे. म्हणजे एका नटसंचानं (One) अनेक प्रेक्षकांसमोर (Many) एखादी संहिता सादर करायची आणि प्रेक्षकांनी तो प्रयोग पाहायचा. नाट्यानुभवाचा हा ढाचा बदलता येईल का? सादरीकरण Many-to-one, One-to-one, Many-to-many, किंवा None-to-many अशा पद्धतीचं का असू शकत नाही? असे नवे ढाचे निर्माण करण्यात काय आव्हानं आणि फायदे आहेत ह्याचा धांडोळा गेल्या दोन वर्षांत झालेल्या काही निवडक प्रयोगांच्या उदाहरणांद्वारे घेण्याचा प्रयत्न करणं हा या लेखाचा उद्देश आहे.*

**ज**गविख्यात दिग्दर्शक पीटर ब्रूक नाटकाची व्याख्या करताना 'The Empty Space' या आपल्या पुस्तकात पुढील दोन प्रमुख सूत्रं सांगतो–

१. प्रेक्षक आणि नटांनी एकमेकांबरोबर एकाच जागी आणि समान काळामध्ये उपस्थित असणं (Shared space and time)

२. सादर केल्या जात असलेल्या अनुभवातून अदृश्याला दृश्य करण्याचा प्रयत्न करणं (Making the invisible visible)

कोविडसाथीच्या सुरुवातीच्या काळात प्रेक्षक आणि नटांनी एकत्र येणं या पीटर ब्रूकच्या पहिल्या निकषाला तडा गेला. याचबरोबर ओटीटी आणि सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावामुळे नाटक पाहायला येणाऱ्या प्रेक्षकांची– मुख्यत्वे तरुण पिढीची – संख्या यापुढे घटत जाईल का ही चिंतासुद्धा नाट्यकर्मींना भेडसावायला लागली. त्यामुळे नजीकच्या भविष्यात पारंपरिक नाटकाची व्याख्या बदलायला लागणार ही जाणीव निर्माण झाली.

पण व्याख्या बदलायची म्हणजे नक्की काय करायचं?

दीडशे वर्षांहून अधिक काळ होत आलेल्या मराठी नाटकांत कमालीचं वैविध्य आहे. स्थानिक लेखकांची किंवा मराठीत भाषांतर केलेली परदेशी नाटकं, नेपथ्यासहित केलेली किंवा नेपथ्यविरहित नाटकं, सरधोपट किंवा चाकोरीबाहेरचे विषय हाताळणारी नाटकं, दिवाणखान्यापासून रेल्वेचा डबा, लिफ्ट, युद्धभूमी इत्यादी निरनिराळी स्थळं दर्शवणारी नाटकं, कमानी रंगमंचावरून किंवा प्रेक्षकांच्या समीप सादर केलेली नाटकं, एकतर्फी किंवा प्रेक्षकांचा सहभाग असलेली नाटकं, शहरी बाजाची किंवा लोकनाट्यं, शब्दबंबाळ किंवा मूकनाट्यं इत्यादी अनेक नाट्याविष्कार आजवर करण्यात आलेले आहेत.

मग आता वेगळं करण्यासारखं काय राहिलं आहे? नेहमीचंच नाटक ऑनलाइन



The Refugee Journey, 2020



Theatre, 2021

सादर करण्याच्या पलीकडील शक्यता काय आहेत?

तटस्थपणे पाहिलं तर मराठी नाटकांबद्दलची एक गोष्ट लक्षात येते. ती म्हणजे अतिशय वाखाणण्याजोगी विविधता असली तरी सादर होणाऱ्या बहुसंख्य नाटकांचा ढाचा हा One-to-Many AgmM राहिला आहे. म्हणजे एका नटसंचानं (One) अनेक प्रेक्षकांसमोर (Many) एखादी संहिता सादर करायची आणि प्रेक्षकांनी तो प्रयोग पाहायचा / ऐकायचा.

**ओटीटी माध्यमापासून नाटकाला धोका आहे असं आपण म्हणतो तेव्हा आजचा मराठी प्रेक्षक – खास करून नवीन पिढी – ओटीटीकडे आकर्षित होण्यामागे त्या माध्यमात उपलब्ध असणारं कलाकृतींतील वैविध्य, धाडसी प्रयोग आणि नावीन्य ही महत्त्वाची कारणं आहेत, हे लक्षात घ्यायला हवं. नाटकाचे नवे ढाचे तयार होतील तशी रसिकांची अभिरुचीसुद्धा बदलेल आणि विस्तारेल. आणि अशा प्रयोगांची मागणी वाढत जाईल.**

नाट्यानुभवाचा हा ढाचा बदलता येईल का? सादरीकरण Many-to-one, One-to-one, Many-to-many, किंवा None-to-many अशा पद्धतीचं का असू शकत नाही? नवे ढाचे निर्माण करण्यात काय आव्हानं आणि फायदे आहेत? ह्या प्रश्नांचा धांडोळा गेल्या दोन वर्षांत झालेल्या काही निवडक प्रयोगांच्या उदाहरणांद्वारे घेण्याचा प्रयत्न करूया.

ढाचा १ : Many-to-One
नाट्यानुभव : The Attendants, 2020
नाट्यसंथा : Nerve Tank, New York, US

या प्रयोगात आठ बाय आठ फूट आकाराच्या एका काचेच्या पेटीमध्ये दोन कलाकार उभे असतात. मॉल, रेल्वेस्थानक, कचेऱ्यांचा परिसर अशा वर्दळीच्या जागी ही पेटी ठेवलेली असते. त्यामुळे जाणाऱ्या–येणाऱ्या माणसांना हे कलाकार सहज नजरेस पडतात. याबरोबरच सादरीकरणाचा लाइव्ह व्हिडिओ हा इंटरनेटच्या माध्यमातून प्रसारित केला जातो.

प्रत्यक्ष उपस्थित असलेला किंवा जगात कुठूनही इंटरनेटच्या द्वारे प्रयोग पाहत असलेला प्रेक्षक एका ठरावीक नंबरद्वारे कलाकारांना टेक्स्ट मेसेज पाठवू शकतो. येणाऱ्या मेसेजेसपैकी काही मेसेज काचेच्या पेटीवर लावलेल्या एका स्क्रीनवर कलाकारांना आणि प्रेक्षकांना वाचता येतील असे झळकवले जातात. मेसेज वाचून कलाकार आपलं शरीर, आणि काही मोजके जिन्नस वापरून मूकाभिनय करत राहतात. सोबतीला थोडं संगीत आणि प्रकाशयोजना असते. ह्या नाट्यानुभवाचं स्वरूप हे नेहमीपेक्षा अगदी विरुद्ध म्हणजे Many-to-One असं आहे. म्हणजे कलाकार काय करणार आहेत हे प्रेक्षक ठरवतात. ह्या खेळात सहभाग घेणाऱ्या प्रत्येक प्रेक्षकाचं कधीही न पाहिलेल्या, भेटलेल्या इतर प्रेक्षकांबरोबर एक तात्पुरतं, अमूर्त नातं निर्माण होत जातं. आधीचे मेसेज वाचून पुढचे मेसेज कल्पकपणे पाठवताना प्रेक्षकांकडून एक उत्स्फूर्त, अनोखी संहिता जन्माला येते; आणि ती प्रत्येक प्रयोगात नवी असते.

मेसेजिंग आणि व्हिडिओ डिस्प्ले अशा साध्या तंत्रज्ञानाचा कल्पक वापर करत साकारलेल्या ह्या प्रयोगातला सजीवपणा, अनिश्चितता आणि कुतूहल नाट्यानुभवाचा एक नवा पायंडा पाडून जातात.

ढाचा २ : One-to-one
नाट्यानुभव : Look Out, 2020
नाट्यसंथा : Capital W, Los Angeles, US

एक कलाकार आणि एक नाट्यरसिक ह्या दोघांनी आपापल्या घराबाहेर फिरायला पडायचं; आपल्याला दिसतं असलेली दृश्यं, माणसं, घटना, आवाज, वास्तू, निसर्ग हे सर्व न्याहाळायचं आणि दुसऱ्याला हे सर्व एका फोन कॉलद्वारे सांगत पुढे जायचं अशी 'लूक आऊट' ह्या अनुभवाची रचना होती.

वर वर साध्या वाटणाऱ्या ह्या संवादात कलाकार पार पाडत असलेली भूमिका मात्र अतिशय विचारानं ठरवलेली होती. एक म्हणजे आपण सांगत असलेलं मनापासून ऐकून घेतलं जात आहे ह्याचं समाधान सहभागी झालेल्या प्रेक्षकाला द्यायचं; आणि त्याबरोबरच कानावर पडत असलेल्या गोष्टींमध्ये नाट्य शोधायला आणि त्याचं कथात्मक वर्णन करायला प्रेक्षकाला हलकेच उद्युक्त करायचं.






आपल्या संवेदना अधिक तीव्र करणं, आयुष्यातल्या लहान-मोठ्या गोष्टींमध्ये लपलेलं नाट्य शोधणं, आणि घेतलेले सुंदर अनुभव इतरांसोबत कथास्वरूपात वाटणं अशा सवयी नाट्यरसिकांमध्ये रुजवू पाहणाऱ्या ह्या प्रयोगाला नक्कीच नावीन्यपूर्ण म्हणता येईल. नाट्य-कलाकार आणि प्रेक्षकाचं नातं वैयक्तिक पातळीवर आणणं ही संकल्पनासुद्धा नवीन आहे. त्यातून केवळ प्रेक्षकालाच नव्हे तर कलाकाराला मिळणारा अनुभव आणि समाधान निराळ्या प्रतीचं असणार हे नक्की.

ढाचा ३ : Many-to-Many
नाट्यानुभव : The Refugee Journey, 2020
नाट्यसंथा : Sandglass Theatre, Vermont, US'

'रेफ्युजी जर्नी' नावाचा नाट्यानुभव साप-शिडीसदृश पटावरच्या खेळाच्या स्वरूपात सादर होतो. उपलब्ध जागेनुसार हा पट एका खोलीमध्ये किंवा एखाद्या इमारतीत निरनिराळ्या मजल्यांवर सुद्धा रचलेला असू शकतो. ह्या खेळात निर्वासितांशी निगडित काही वस्तू (सामानाच्या बॅगा, स्वयंपाकाची भांडी, फोटोफ्रेम, इत्यादी) निर्वासितांचं प्रतीक म्हणून पटावर मांडलेल्या असतात. येणाऱ्या संकटांचा सामना करत प्रत्येक वस्तू सुरक्षितपणे पटाच्या ठरावीक जागी नेऊन पोचवायची हे ह्या खेळाचं स्वरूप.

आधी अभिनेते आणि प्रेक्षक ह्यांचे काही गट तयार केले जातात. त्यांनी सावकार, सीमारक्षक, मानवी तस्कर, वैद्यकीय अधिकारी, नावाडी, भूत, पोलीस, इमिग्रेशन मुलाखतकार इत्यादी भूमिका बजावणं अपेक्षित असतं (प्रत्यक्ष निर्वासिताची भूमिका कोणीही करायची नसते). कधी कधी पपेट / बाहुल्यासुद्धा वापरल्या जातात. एका पेटीत काही कार्डं ठेवलेली असतात, ती वेगवेगळ्यागटांना दिली जातात. प्रत्येक कार्डावर खऱ्या निर्वासितांच्या कथांचे काही भाग अर्धवट लिहिलेले असतात. त्या त्या माणसानं/गटानं हा कथाभाग वाचून पुढे त्याप्रमाणे व्यवहार करायचे असं उपस्थितांना सांगून खेळ सुरू होतो.

कार्डावर वाचलेली घटना/काम सादर करताना प्रेक्षक आणि अभिनेत्यांचे निरनिराळे गट एकमेकांच्या सान्निध्यात येऊ शकतात. त्यांना एकमेकांशी सहकार्य किंवा विरोध करावा लागतो. कधी कधी एकच भूमिका करत असलेले दोन जण एकाच परिस्थितीत वेगळे वागू शकतात (उदाहरणार्थ, काही पोलिस क्रूरपणे तर काही सहृदयपणे). याशिवाय अर्धवट कथेचा माहीत नसलेला भाग संदर्भानं किंवा तर्कानं समजून घेऊन त्याप्रमाणे अनेकदा अत्यंत अवघड आणि कटू निर्णय घ्यावे लागतात. त्यानुसार निर्वासितांशी निगडित वस्तू पटावर पुढे, मागे किंवा कुठेतरी हलवावी लागते. वेळ संपल्यावर किंवा एखादी वस्तू अपेक्षित ठिकाणी - म्हणजेच पुनर्वसनापर्यंत - पोहोचते तेव्हा खेळ संपतो. ह्यानंतर सर्वांमध्ये एक नाट्यचर्चा घडते - आलेल्या अनुभव आणि विचारांबद्दल मोकळेपणे बोललं जातं.

आपलं सर्वस्व पणाला लावून, घरदार सोडून निघालेल्या निर्वासितांपैकी फक्त एक टक्का लोक सुरक्षित स्थळी पोचून नवं आयुष्य सुरू करू शकतात ही दारुण आकडेवारी प्रेक्षकांना जाणवून देणं हा ह्या नाट्यानुभवाचा उद्देश आहे.

प्रेक्षक आणि अभिनेत्यांच्या निरनिराळ्या गटांनी स्वतंत्रपणे किंवा एकमेकांबरोबर, एकाच वेळी वेगवेगळे अनुभव घ्यावेत अशी केलेली संरचना हे ह्या सादरीकरणाचं वैशिष्ट्य म्हणावं लागेल. म्हणजे एका अर्थानं अनेक छोटी पण संलग्न नाटकं एकाचवेळी रंगमंचावर चालू असतात. प्रेक्षक आणि अभिनेत्यांचे निरनिराळे गट एकाच किंवा वेगवेगळ्या जागी असू शकतात. घडत असलेल्या प्रसंगात ते वाटल्यास प्रेक्षक आणि वाटल्यास अभिनेते होऊ शकतात. कधी बाजूला जाऊन त्रयस्थपणे सगळं पाहू शकतात. उपलब्ध जागेत कुठेही फिरू शकतात. कधी कधी हे सगळं गोंधळाचं भासू शकतं. आणि असतंसुद्धा. विस्कळितपणा हाही अनुभवाचाच एक भाग असलेला हा प्रयोग नेहमीपेक्षा खूपच वेगळा म्हणता येईल.

ढाचा ४ : None-to-Many
नाट्यानुभव : Theatre, 2021
नाट्यसंथा : Index, Singapore

कथानक नाही पण गोष्ट आहे. कलाकार नाहीत पण पात्रं आहेत. संवाद नाहीत पण अर्थ आहे, नेपथ्य नाही पण आकार आहेत! असं एक अनोखं सादरीकरण सिंगापूरमध्ये जानेवारी २०२१ मध्ये एस्प्लनेड

ह्या भव्य रंगमंचावर सादर करण्यात आलं. प्रयोग सुरू होण्याआधी मोजून तीस प्रेक्षकांना नाट्यगृहातल्या खुर्च्यांवर नव्हे तर पडदा बंद असलेल्या स्टेजवर बसण्यासाठी आमंत्रित केलं जातं. हळूहळू दिवे जातात. मन स्थिर करणाऱ्या आल्हाददायक गारव्यात मिट्ट काळोखाची दोन मिनिटं गेल्यावर केशरी प्रकाशाची एक तिरीप येते आणि मागच्या कोपऱ्यातील कंट्रोल रूमकडे जाणारा लोखंडी जिना अर्धवट उजळतो. पुन्हा अंधार. मग आणखी एक प्रकाशझोत...

निःशब्द अंतराळात अंधार आणि प्रकाशाचा हा खेळ पुढची चाळीस मिनिटं सुरू राहतो, आणि रंगमंचाच्या मागचे, वरचे आणि आजूबाजूचे पूर्वी कधीही न पाहिलेले कोनाडे हळूहळू दृगोच्चर होतात. प्रचंड मोठे लाकडी बॉक्सेस, काळा रंग लावलेले भव्य दरवाजे, असंख्य बटणं असलेली विद्युत उपकरणांची पॅनल, सापांसारखे लोंबणारे ध्वनिक्षेपक, कमीअधिक व्यासाचे लांबट लाईट, भिंतींवर वेलींसारख्या चढत गेलेल्या अजस्र केबल, 'डेंजर' आणि तशीच काही अगम्य चिन्हं, असं रंगमंचाच्या तिन्ही बाजूंचं बरंच काही दृश्यमान होत राहतं.

मग अचानक स्टेजच्या सत्तर फूट वर असलेल्या छताकडून एकेक करत जवळजवळ शंभर फ्रेम पॅनेल्स खाली येतात. आणि मांडी घालून बसलेल्या प्रेक्षकांच्या डोक्यावर अगदी हातभर अंतरावर येऊन थांबतात. स्टेज आणि पॅनेल्स ह्यांच्यामध्ये तयार झालेल्या ह्या पोकळीत अजिबात हालचाल न करता प्रेक्षक शांत बसून राहतात. एकेक करत पॅनेल पुन्हा वर गडप होतात आणि शेवटी पडदा उघडतो. समोरच्या शेकडो रिकाम्या खुर्च्यांपैकी बाल्कनीतल्या एकाच लाल खुर्चीवर प्रकाश पडलेला असतो. ह्या क्षणाला एकांड्या व्हायोलिनचं संगीत हलकेच उमलतं आणि प्रयोग संपतो.

हा अनुभव अनेक दृष्टींनी दुर्मिळ म्हणता येईल. मानवी कलाकारांच्या अनुपस्तिथीत रंगमंच हाच नायक म्हणून प्रेक्षकांच्या समोर आणला जातो. थिएटरच्या वास्तुकलेतली भव्यता, इतिहास आणि ऊर्जा हे तर जाणवतंच, याशिवाय इमारतीचं स्वतंत्र व्यक्तिमत्त्व, चित्रविचित्र जिन्नसांमधून जिवंत होत जाणारे ह्या व्यक्तिमत्त्वाचे कंगोरे आणि कधीही माहीत नसलेली त्याची रहस्यंसुद्धा हळूहळू प्रेक्षकांना उमगत जातात. वर्षानुवर्षं अंधारात लपलेली उपकरणं सजीव होऊन आपली कथा सांगताहेत असं भासतं. आणि त्याच वेळी रंगमंचावर पाहिलेल्या अनेक उत्तम कलाकृती, दर्जेदार अभिनय, निखळ आनंदाच्या रंगीबेरंगी आठवणी प्रेक्षकांच्या मनात जाग्या होतात.

या सर्व उदाहरणांतील संहिता गुणात्मकदृष्ट्या बऱ्यावाईट म्हणता येतील. परंतु ह्या चर्चेऐवजी सादरीकरणाच्या ढाच्यांवर लक्ष केंद्रित केलं तर ह्या सर्व नाट्यानुभवांत पुढील समान गुणधर्म आढळतात–

१. 'नाट्य' ह्या संकल्पनेचा अत्यंत लवचीकपणे केलेला पुनर्विचार.
२. मोठ्या समुदायाऐवजी प्रेक्षकांच्या मर्यादित संचाचा सहभाग.
३. प्रेक्षक आणि कलाकारांना जोडण्यासाठी केलेला तंत्रज्ञानाचा कलात्मक वापर.

असे नवे ढाचे भविष्यातल्या मराठी नाटकांत आणता येतील का?

नाट्यव्यवसायाचं अर्थकारण, वर्षानुवर्षं चालत आलेल्या पद्धतींचा आणि विचारांचा लेखक–दिग्दर्शकांवर असलेला पगडा, सांघिक पद्धतीनं घेतल्यानं निर्णयांमध्ये येणारी बोथटता, अपयशाची भीती, कल्पनाशक्तीच्या मर्यादा अशी वेगवेगळी कारणं One-to-Many ह्या पारंपरिक सादरीकरणापेक्षा काही वेगळं करून पाहण्यात अडसर ठरू शकतात.

One-to-Many सोडून इतर कुठल्याही ढाच्यामध्ये जास्त मेहनत आणि कमी नफा आहे असं नाट्यव्यावसायिकांना वाटणं स्वाभाविक आहे. पन्नास माणसांसाठी दहा प्रयोग करणं हे पाचशे प्रेक्षकांसाठी एक प्रयोग करण्याइतकं सुकर आणि आर्थिक फायद्याचं नक्कीच असू शकत नाही. परंतु प्रेक्षकांच्या संख्येवर असणारी बंधनं, नाट्यगृहांची उपलब्धता आणि घटणारे प्रेक्षक हे सर्व नजीकच्या भविष्यकाळात सुरूच राहणार असेल, तर नव्या ढाच्याच्या नाट्यानुभवांचा विचार पारंपरिक पद्धतीचे प्रयोग सुरू होईपर्यंत पर्याय म्हणून किंवा घटत चाललेल्या नाटकाच्या उत्पन्नाला जोड म्हणून करायला काय हरकत आहे?

अशा वेगळ्या धाटणीच्या काही प्रयोगांत खूपच नावीन्य असेल तर ते इंटरटनेट, ओटीटी किंवा रेकॉर्डिंगद्वारे शुल्क देऊन बघण्यास जगभरातले अनेक प्रेक्षक नक्कीच उत्सुक असतील. निर्मात्यांसाठी आणि कलाकारांसाठी उत्पन्नाचं हे आणखी एक साधनसुद्धा बनू शकेल.

अशा नवीन अनुभवांची सवय नसल्यानं सर्वसामान्य मराठी प्रेक्षक ते स्वीकारणार नाहीत असाही युक्तिवाद केला जाऊ शकतो. खरं तर काहीही नावीन्यपूर्ण करताना जोखीम ही घ्यावीच लागते. ओटीटी माध्यमापासून नाटकाला धोका आहे असं आपण म्हणतो तेव्हा आजचा मराठी प्रेक्षक – खास करून नवीन पिढी – ओटीटीकडे आकर्षित होण्यामागे त्या माध्यमात उपलब्ध असणारं कलाकृतींतील वैविध्य, धाडसी प्रयोग आणि नवेपणा ही महत्त्वाची कारणं आहेत, हे लक्षात घ्यायला हवं. नाटकाचे नवे ढाचे तयार होतील तशी रसिकांची अभिरुचीसुद्धा बदलेल आणि विस्तारेल. आणि अशा प्रयोगांची मागणी वाढत जाईल.

ह्या लेखात दिलेल्या उदाहरणांच्या धर्तीवर आजचे गुणी आणि मेहनती मराठी नाट्यकर्मी सादरीकरणाच्या नव्या ढाच्यांचा विचार करतील आणि त्यांतून कोविडनंतरच्या काळात काही आगळेवेगळे नाट्यानुभव जन्माला येतील अशी आशा वाटते.

**– योगेश तडवळकर**
भ्रमणध्वनी : +६५ ९८४७५६५२
yogesh@synergo.com.sg




# नव-नवे ते सर्वांनाच हवे

**चैतन्य ताम्हाणे**

*कोरोनाने जगात ज्या काही उलथापालथी झाल्या, त्यातील एक म्हणजे मनोरंजनाच्या, करमणुकीच्या माध्यमांमधील बदल. वास्तविक इंटरनेटवर आधारित सर्वच माध्यमांत हे बदल कालानुरूप होणारच होते. परंतु कोरोनाने ते लाटेच्या वेगाने झाले! त्याचे काय परिणाम पुढील काळात दिसतील, त्याचा मागोवा घेणारी चित्रपटनिर्माते* **चैतन्य ताम्हाणे** *यांची ही मुलाखत... शब्दांकित केली आहे* **राजीव जोशी** *यांनी.*

**आज जागतिक स्तरावर कन्टेन्ट स्वरूपात बदल घडत आहेत, आपणही त्याचा भाग बनतो आहोत का? जगभरात जशी करमणुकीची व्याख्या बदलते आहे, आपणही त्याला सामोरे जातो आहोत का?**

खरे सांगायचे तर कन्टेन्ट (आशय) हा अलीकडच्या दशकात जागतिक पातळीवर लोकप्रिय झालेला नवीन शब्द आहे. टीव्ही, ओटीटी अशा माध्यमांना सतत नवीन कन्टेन्ट पुरवावा लागतो. मग काही वेळा रोज द्यावा लागतो किंवा ठरावीक दिवशी द्यावा लागतो. कन्टेन्टपुरवठा ही आवश्यक गरज निर्माण झालेली आहे. तसे पूर्वीपासून सर्वत्र गोष्टी,कहाण्या,सिनेमे व मालिका ह्यातून आशय मांडला जातो आहे. त्यात काही फरक पडलेला नाही. इंटरनेटचा उगम हे जागतिक पातळीवर झालेले मोठे क्रांतिकारक असे स्थित्यंतर आहे. त्यामुळे आपल्या जीवनात काही बदल झाले. उदाहरणार्थ, शॉपिंग करण्याची प्रवृत्ती वाढली, कारण ऑनलाइन शॉपिंग हे सहजसोपे झाले आहे. पँडेमिकमुळे आपण अनुभवले आहे. फिल्म-सीरियल्स पाहणे ह्यात बदल असा झाला की आपण मोबाइलवरही पाहू लागलो. कॅनडातील संपर्क-माध्यमतज्ज्ञ मार्शल मॅकलॅन ह्यांनी असे म्हटले आहे की 'मीडियम इज द मेसेज' - माध्यमे म्हणजेच संदेशवाहक. आपण फेसबुक, ट्विटर, व्हॉट्सॲप, टीव्ही, फिल्म अशा माध्यमांतून जे पाहत असतो त्यातून माहिती मिळत असते. सांगण्याची पद्धत व माध्यमे बदलतात. काहीतरी सांगणे वा माहिती पुरवणे ही प्रक्रिया चालूच असते. सातत्याने माध्यमांना कन्टेन्ट पुरवणे चालूच आहे, त्यात विशेष बदल झालेला नाही. कोविड महामारी आली म्हणून या गोष्टी घडल्या असे नाही. तर ही प्रोसेस अव्याहतपणे अदृश्यरूपात संथ स्वरूपात चालूच असते. रेडिओ, न्यूजपेपर व प्रिंटिंग क्षेत्रात असे बदल घडत आलेले आपण किंवा आधीच्या पिढीने बघितलेले आहेत. रेडिओ-पेपर ही तेव्हाची समाजमाध्यमे होती. रेडिओ आला तेव्हा सिनेमा संपेल अशी भीती व्यक्त झाली होती. प्रिंटिंग प्रेसचा शोध लागला तेव्हा असे बोलले गेले, की यापुढे तुमची मेमरी - लक्षात ठेवण्याचे कौशल्य संपेल! न्यूजपेपर आले आणि लोक त्यात डोके खुपसू लागले, तेव्हा टीका झाली की तुम्ही बाहेरच्या जगात डोकावा, तर तुम्हाला काय चालले आहे ते कळेल! पँडेमिक नसते आले तरी हा तंत्रज्ञानाचा बदल आलाच असता, पँडेमिकने या साऱ्या प्रक्रियेला गती मिळाली असे म्हणता येईल. पँडेमिकने इंटरनेट संबंधित करमणुकीला वेग आला. आपली मानसिकता बदलली. प्रेक्षक हा ग्राहक आहे, त्याला परवडेल, सोयीचे वाटेल असे सुटसुटीत बदल होत राहतात. आता आर्टिफिशियल इंटेलिजन्स (ए.आय.) म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे काय कन्टेन्ट बनवायचा हे ठरवले जाते आहे. कोणत्या भौगोलिक भागात काय काय आवडते अशी तुलनात्मक माहिती चटदिशी मिळते आहे, त्यानुसार कन्टेन्ट तयार होत आहेत.

**ओटीटी या माध्यमामुळे आपण आजवर ज्या पद्धतीने सिनेमा-मालिका बघत होतो त्यात काही बदल होतील का?**

बदल होत राहणारच! जे नवीन येते ते स्वीकारले जाते. पुन्हा मागे जाण्याचा प्रश्नच येत नाही. नवीन साधन आल्यावर मुद्दाम कोणी जुने साधन वापरेल का? उदाहरणार्थ, मोबाइल आल्याने जुने टेलिफोनचे यंत्र मागेच पडले आहे ना? ज्यांना सोयीचे वाटते आहे, ते ऑनलाइन शॉपिंग करणारच ना? तसेच ओटीटीबाबत बोलता येईल. थिएटरविरुद्ध ओटीटी अशी अनेकदा चर्चा होते. इंटरनेट टेलिव्हिजन म्हणजे आता अशा रीतीने पाहायची सोय आहे, हे लक्षात घेतले की करमणुकीचे स्वरूप बदलले आहे हे कळेल. आता सिनेमे-बातम्या-मालिका ऑनलाइन पाहायला मिळत आहेत. व्हॉट्सॲपसारखी अनेक सोशल मीडिया आज लोकप्रिय आहेत. नवनवे तंत्रज्ञान व जोशींकडून हा लेख वाढत असल्यास कमी करून घेणे. त्याबरोबरीने

येणारी अत्याधुनिक साधने येत राहतात, ती वापरण्याची प्रवृत्ती वाढती आहे. नवनवे ते सर्वांनाच हवेहवेसे वाटते आहे. मग जुन्या तंत्रज्ञानाला, साधनांना कोण जवळ करेल? ते सर्व आता अँटिक होत आहेत. पूर्वी पैसे भरून केबल घेतली होती, आता मोबाइलवर पैसे भरून जगातील ओटीटी बघण्याची फॅसिलिटी मिळते आहे. मात्र करमणुकीसाठी माझे पालक अजूनही टेलिव्हिजनच पाहतात, त्यांना ओटीटी बघायला नाही आवडत. माझी पिढी किंवा आजची तरुण पिढी ही फक्त ओटीटी बघते. व्हॉट्सॲपचे ॲडिक्ट झालेली आहे. हा फरक आहे. मात्र हा बदल हळूहळू स्वीकारला जात आहे. महानगरातच नव्हे तर छोट्या छोट्या शहरांत असे बदल घडू लागलेले आहेत. आज सर्वच करमणूक ही इंटरनेटशी जोडली गेलेली आहे. म्हणूनच ओटीटी हे सिनेमा-टीव्ही पाहण्यासाठी स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्म हे सोयीचे वाटतात. तंत्रज्ञान बदलते आहे, ते आपल्या जगण्याचा भाग बनले आहे.

**आपली बातम्या पाहण्याची सवयदेखील बदलते आहे असे वाटते का? की फक्त उच्चभ्रूंसाठी हे बदल झालेले आहेत?**

खरे तर या विषयावर मत व्यक्त करण्याइतका अनुभवी नाही. एक संबंधित म्हणून मला काय वाटते हे सांगू शकतो. आधी म्हटले तसे- मीडियम इज द मेसेज! बातम्या म्हणा किंवा करमणूक म्हणा, काही ठरावीक मंडळी ही आपलीच मक्तेदारी असल्याप्रमाणे काम करत होती. जणू तेच माहिती व बातम्यांचे मालक. आम्हीच अमुक माहिती तुम्हाला देऊ शकतो असा त्यांचा आविर्भाव-आवेश असायचा. आता तसे राहिलेले नाही. इंटरनेटने लोकशाही निर्माण केलेली आहे. पूर्वी रेडिओ-टीव्ही श्रीमंतांकडेच होते, आता मोबाइल व इंटरनेटचे जाळे जलदगतीने विस्तारत चालले आहे. जगभरातली माहिती अनेक प्रकारांतून उपलब्ध होते आहे. चोहोबाजूंनी विविध गोष्टी-बातम्या आपल्यापर्यंत येतच आहेत. बिग एको चेंबर निर्माण झाल्यागत वाटते. ए.आय.प्रणाली ठरवते की, तुम्हाला काय द्यायचे, काय दाखवायचे. दुसरा लाभ असा, की आज तुम्ही ब्लॉग लिहू शकता, जे व्यक्त करायचे आहे ते सोशल मीडियात मांडू शकता. तसेच आज कोणीही नागरिक पत्रकार बनून आपल्या बिल्डिंग-मोहल्ला-एरियातील माहिती/बातमी जगापुढे मांडू शकतो, पोस्ट करू शकतो. अर्थात चांगली बाजू आहे तसे काही विघातक मुद्देही आहेत. चुकीची माहिती मिळणे, लोकांना टार्गेट करणे, छळ करणे, बनावट व्हिडिओ तयार करणे, लोकांची दिशाभूल करणे असे अनेक गैरप्रकार घडत आहेत. विस्तार-उलाढालही मोठ्या प्रमाणावर झालेली आहे, दुर्दैवाने त्यालाच प्रगती मानले जात आहे. म्हणजे कळते खूप काही, पण त्यातली डेप्थ मात्र नाही. कोणत्याही प्रकारची माहिती आपल्या मेंदूवर अक्षरशः आदळली जाते आहे. विकसित झालेले तंत्रज्ञान आपल्या मेंदूला घडवते आहे, ज्याला रि-वायरिंग ऑफ ब्रेन असे म्हटले जाते. आर्टिफिशियल इंटेलिजन्स हा तुम्हाला माहिती-डेटा पुरवत राहणार आहे. आपण ह्या तंत्रज्ञानाकडे कसे पाहतो, त्याचा वापर कसा करतो त्यावर सारे अवलंबून आहे.

**आज ओटीटीचा ग्राहक असलेला प्रेक्षकवर्ग हा समाजमाध्यमांवर अधिक प्रमाणावर व्यक्त होताना, प्रतिक्रिया नोंदवताना दिसतो. आणि याउलट पारंपरिक करमणूकसाधने पाहणारा म्हणजे टीव्ही मात्र तितक्या प्रमाणात व्यक्त होत नाही, हे चित्र काय सांगते? ह्यातून प्रेक्षकांच्या मतांचे, आवडीनिवडींचे एकाच बाजूला झुकलेले चित्र आपल्याला पाहायला मिळते आहे असे नाही का वाटत?**

एकाच बाजूला झुकलेले, पण नेमके कोणाच्या नजरेतून? तेही महत्त्वाचे आहे. तसे पाहिले तर दोन वेगळीच विश्वे आहेत. एक ओटीटी पाहणारे जग आणि दुसरा घटक हा ओटीटी अजिबात न पाहणारा! हा न पाहणारा वर्ग हा ग्राउंड लेव्हलला आहे. सिनेमाच्या बाबतीत नेमका किती लोकांनी एखादा सिनेमा बघितला त्याची आकडेवारी कोणीच शेअर करत नाहीत. अमुक शो फुल्ल झाले! असे काही गणित नसते. भरपूर आठवडे सिनेमा चालला, असेही नसते. कारण सर्व खेळ हा कमी वेळातला असतो. आज-उद्या आहे, पण परवा त्याची जागा दुसरा शो घेईल! इतके सारे अल्पकालीन असते. ओटीटीची कार्यशैलीच वेगळ्या धर्तीची आहे. तो एक वेगळा गेम आहे असे म्हटले तरी चालेल. त्यामुळे दोन्ही विश्वाची पद्धत ही वेगळीच असेल.

**ज्यांना केबल परवडत नाही, त्यांना ओटीटी कसे परवडणार? म्हणून हे आता मेट्रो प्रेक्षकांचे जणू अर्बन-बबल असल्यासारखे आहे. पुढेमागे सबस्क्रिप्शन कमी झाले तर प्रेक्षकवर्ग नव्याने वाढू शकेल. एकूणच आपले भारतीय उपखंड हे विविधतेने नटलेले आहे, हीच बाब करमणुकीबाबतदेखील सांगता येईल. आपल्या संस्कृतीच्या जवळचे काही तयार झाले तर लोकांना ते आवडेल. पण ते आता नाही, पुढील चार-पाच वर्षांनी कळेल.**

**यापुढे सिनेमा पाहणे, नाटक पाहणे ह्याबाबत काही मोठा फरक होईल का? नेमके काय वाटते?**

सिनेमाच्या बाबतीत सांगायचे तर त्याच्याशी कनेक्टेड अनेक घटक आहेत, त्यामुळे तसे काही अनुमान काढणे शक्य नाही. सिनेमागृहात जाऊन सिनेमा पाहणे ही सवय आहे. पँडेमिक काळात ते शक्य झाले नाही. जे इतके महिने मिस केले आहे, ते मिळवण्यासाठी लोक उत्साहाने बाहेर पडतील. हॉटेलिंग करणे, सिनेमा पाहणे ही आपली सार्वजनिक ॲक्टिव्हिटी आहे. कॉलेजची मुले, फॅमिली मेम्बर हे एकत्रितपणे सिनेमा बघणे पसंत करतात. तो एक प्रकारचा इव्हेंट असतो, सोशल गॅदरिंग असते. तरी येत्या काळात आपली इकॉनॉमी कशी प्रगती करेल, आजची परिस्थिती बदलली तर, सर्व त्रासापासून मुक्ती मिळाली तर! असे जरतरचे मुद्दे आहेत. लोकांकडे ह्याकरता पैसे असतील का? सिनेमांचे रि-ब्रॅण्डिंग करावे लागेल. तिकीटदर स्वस्त ठेवावे लागतील. तरच लोक घरातून बाहेर पडतील. सर्वच काही नाटके, स्टँडअप कॉमेडी बघायला जातील असे नाही. सिनेमा पाहणे ही आपल्याकडील लोकांसाठी जवळची बाब आहे. सिनेमा हे मासेसचे माध्यम राहील, पुढील अनेक वर्षे ते तसे अबाधित राहील असे वाटते. भारताच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आपण सिनेमा थिएटरचे प्रमाण पाहिले तर ते तितके पुरेसे नाही. आज टीव्ही-मोबाइल स्क्रीनवर सिनेमे पाहण्याची सुविधा असली तरी मोठा प्रेक्षकवर्ग आहे त्याला थिएटरमध्ये जाऊनच पाहायला आवडते. कारण ती एक मित्र,

कुटुंब अशी सर्वांच्या बरोबर पाहण्याची करमणूक आहे. मी परदेशात पाहिले आहे की लोक विरंगुळा म्हणून करतात, हाँटेड प्लेसेस पाहायला निघतात, श्रीमंत लोक पबमध्ये जातात. तसे आपल्याकडे नाही. आपण फार फार तर एखाद्या हिलस्टेशनला जातो. पण सिनेमा हे आवडीचे -जवळचे वाटते.

मात्र आजच्या तरुण प्रेक्षकांची गोष्ट वेगळी आहे. नवीन पिढीला पूर्वीचे सुपरस्टार कोण? त्यांचे सिनेमे बघायचे, असे काही नाही. त्यांना नवीन तंत्र, चांगले सादरीकरण, वेगळेपणा असलेले जे जे ओटीटीवर मिळते ते पाहण्यात इंटरेस्ट आहे. तसे पाहिले तर ओटीटीचे प्रेक्षक आणि टीव्हीचे प्रेक्षक ह्यांची तुलना केली तर टीव्ही पाहणारा वर्ग हा मोठ्या प्रमाणावर आहे. खास वर्गणी भरून ओटीटीची करमणूक पाहणे हे आर्थिक दृष्टीने परवडले पाहिजे. इंटरनेट व ओटीटीची सबस्क्रिप्शन भरणे व आपल्याला आवडते ते पाहणे हे शहारामध्ये अधिक आहे. ओटीटी हे एंटरटेनमेंटचे सुपरमार्केट आहे. इथे मागणी तसा पुरवठा केला जाणार. तेव्हा कोणी आदर्श, मूल्य सांगणारी आशयबद्ध, अस्थेटिकचा सेन्स असलेली कलाकृती तयार करण्याचा विचारही नाही करणार. विकले जाईल ते देत राहणारे माध्यम आहे. त्यासाठी भांडवल टाकणारी यंत्रणाही असणार आहेच. ज्यांना केबल परवडत नाही, त्यांना ओटीटी कसे परवडणार? म्हणून हे आता मेट्रो प्रेक्षकांचे जणू अर्बन-बबल असल्यासारखे आहे. पुढेमागे सबस्क्रिप्शन कमी झाले तर प्रेक्षकवर्ग नव्याने वाढू शकेल. एकूणच आपले भारतीय उपखंड हे विविधतेने नटलेले आहे, हीच बाब करमणुकीबाबतदेखील सांगता येईल. आपल्या संस्कृतीच्या जवळचे काही तयार झाले तर लोकांना ते आवडेल. पण ते आता नाही, पुढील चार-पाच वर्षांनी कळेल. तोवर तरी ओटीटीचे जग वेगळे आणि टीव्ही पाहणाऱ्यांचे वेगळे. टीव्ही-प्रेक्षक हा संख्येने मोठाच वर्ग राहणार. ओटीटी व सिनेमा अशी चर्चादेखील नको करूया. सिनेमाघरात जाऊन एकत्रितपणे भव्य-दिव्य पाहण्याचा आनंद जोवर मिळतो, तोवर आपला सिने-प्रेक्षक हा राहणारच.

**भारतातील 'फिल्ममेकिंग' प्रोसेसबद्दल काय सांगशील? परदेशांत कशा प्रकारे सिनेमे तयार केले जातात? काय सांगशील?**

पुन्हा सांगतो, की मी इथेही कमी सिनेमे केले आहेत आणि परदेशातील तर अनुभवच नाही. पण माझ्या माहितीद्वारे सांगतो, की इंटरनॅशनल पातळीवर पाहिले तर १८८ देश आहेत, तेथील प्रेक्षक आणि सिनेमा हे भिन्न प्रकारचे आहेत. आपल्याकडे सिनेमाला चिप्सच्या पॅकेटप्रमाणे शेल्फ लाइफ असते. सिनेमा तयार करताना कमिटमेंट व अ‍ॅप्रोच काय असतो त्यावर सर्व काही अवलंबून असते. प्रत्येक दशकाकडे आपण नीटपणे पाहिले तर सिनेमा मेकिंग हे निर्मात्यांवर अवलंबून राहिलेले आहे. सिनेमाचे जे काही प्रकार निर्माण झाले ते त्या-त्या काळातील निर्मात्यांच्या विचारधारेवर, बांधिलकी व इच्छेवर. उदाहरणार्थ- आधी श्रीमंत जमीनदार मंडळी सिनेमे प्रोड्युस करायची तेव्हा सामाजिक सिनेमे तयार झाले. पुढे व्यापारी मंडळी सिनेमा निर्मितीच्या क्षेत्रात उतरली, त्यांच्या अपेक्षांचे चित्र हे त्यांनी प्रोड्युस केलेल्या सिनेमांतून दिसले. अलीकडे मोठमोठे कॉर्पोरेट सिनेमे काढण्यात अग्रेसर आहेत. त्यांचे धोरण असे की सर्व पॅकेज स्वरूपात झाले पाहिजे. मोठे स्टार घेणे, जोरदार मार्केटिंग करणे. असे आपल्याकडील फिल्म-मेकिंगमध्ये होत गेलेले बदल आहेत.

**जे काही बदल घडत आहे ते कायमस्वरूपी असतील का? की अजून काही बदल घडतील? एक तरुण फिल्ममेकर म्हणून काय वाटते?**

बदल हा माणसाच्या जगण्याचा स्थायीभाव आहे. इतिहासात डोकावून पाहिले तर ज्याप्रकारे जुनी नाटके, ग्रीक नाटके सादर व्हायची ती पद्धत आता राहिलेली नाही. तशी आपल्याकडेही पाच अंकी संगीत नाटके सादर व्हायची की, आजची नाटके कशी आहेत? तसेच सिनेमांच्याबाबतही म्हणता येईल. इतर अनेक गोष्टींकडे पाहिले तर लक्षात येईल की, पूर्वी डिस्को होते, पब होते. प्रथम ट्रेन सुरू झाली, टेलिफोन अस्तित्वात आला , तेव्हा आपली कशी प्रतिक्रिया होती? कसे बोलणे झाले असेल? वेगवेगळ्या काळात माणसांची परस्परांशी वागण्या-बोलण्याची पद्धत बदलतीच राहिलेली आहे. मानवी संबंध हे त्यानुसार बदलतात. टाइपरायटर ते लॅपटॉप अशी स्थत्यंतरे ही बदलाचे द्योतक आहेत. विचारवंत नित्शे आधी पेनने लिखाण करायचा, मग टाइपरायटरवर लिहू लागला. टाइपरायटर ते लॅपटॉप, मोबाइलचा कीबोर्ड अशी स्थित्यंतरे ही बदलाची द्योतक आहेत. मानवी जीवनात तंत्रज्ञानामुळे होणारे बदल हे स्वाभाविक आहेत असे मला वाटते आणि त्याच्याशी आपण काळाच्या ओघात जुळवूनही घेतो. एकूण बदल आपण स्वीकारतो हे आपल्याला अनेक क्षेत्रांतही जाणवते.

**इंटरनेट, फाइव्ह-जी अशी माध्यमक्रांती होते आहे, ह्याच नेमका कोणता परिणाम होईल? ग्राहकांशी असलेले नाते कसे बदलत आहे, बदलेल?**

इंटरनेटची बूम आली, मग यूट्यूब, सोशल मीडियाची लाट आली. हळूहळू नेट स्वस्त होत आहे, तसतसे ते ग्रामीण, निमशहरी भागात अधिक प्रमाणात पसरेल. शिवाय फाइव्ह-जी आल्याने स्वस्त होईल, त्यामुळे बिगर-शहरी-ग्रामीण ग्राहकवर्ग वाढेल. कोणतेही तंत्रज्ञान स्वस्त होणे ही चांगली बाब आहे. एकेकाळी ज्ञान हे मोजक्या लोकांच्या हाती होते. ते गुप्त ठेवण्याचे, कोणाला न देण्याचा काळ होता. त्यामुळे ते सत्तेचे साधन म्हणून वापरले जायचे. इतरांचे शोषण करण्यासाठी ती शक्ती वापरली जायची. पण इंटरनेट आणि अन्य माध्यमांमुळे ज्ञान व माहिती मिळवण्याची सार्वत्रिक सुविधा निर्माण झालेली आहे. कोणालाही हवे ते शिक्षण मिळवण्याची, माहिती घेण्याची सोय झाली. अनेक प्रशिक्षितांची पिढी तयार होते आहे.पण ज्ञान व माहिती म्हणजे शहाणपण नव्हे. अती माहिती मिळाल्याने काही तोटेही होत आहेत. परंतु जमा बाजू ही अधिक असल्याने इंटरनेट आणि वाढत जाणारे तंत्रज्ञान हे आवश्यकच आहे. ज्ञान मिळवण्याची आस निर्माण झाली तर तंत्रज्ञान विकसित होते. ह्याचा खऱ्या अर्थाने लाभ होईल. ग्राहकाला येणारे तंत्रज्ञान सोयीचे वाटू लागले तर त्यानुसार बदल घडतील.

**शब्दांकन : राजीव माधव जोशी**
भ्रमणध्वनी : ९३२२२४१३१३
rmjoshi52@yahoo.co.in



*संपूर्ण देशभरात एकच दूरदर्शन ही स्थिती नाहीशी होऊन गेल्या पंचवीस वर्षांत डझनांनी वाहिन्या आल्या आणि आता तर 'गाव तिथे एसटी' या धर्तीवर माध्यमांचा स्फोट नजरेच्या टप्प्यात यावा, अशी शक्यता तंत्रज्ञानाने निर्माण केली आहे. या बदलाच्या अनुषंगाने 'साम टीव्ही'चे संपादक प्रसन्न जोशी यांची डॉ. लतिका भानुशाली यांनी घेतलेली मुलाखत.*

# प्रसारमाध्यमे कात टाकतील

**प्रसन्न जोशी**

**माध्यमक्रांती होण्याआधी, पारंपरिक प्रसारमाध्यमे म्हणजे मूठभर वृत्तपत्रे आणि सरकारी दूरदर्शन वाहिनी एवढेच पर्याय उपलब्ध होते. यात बदल होत होत आज विविध भाषांतील वेगवेगळ्या वृत्तवाहिन्या आणि आधुनिक सामाजिक संपर्कस्थाने अस्तित्वात आली आहेत. या सगळ्याकडे आपण कसे बघता?**

या कालखंडाचे मी दोन भाग करेन. एक नव्वदीच्या दशकाच्या आधी आणि दुसरा कालखंड नव्वदीच्या दशकानंतरचा. नव्वदीच्या दशकामध्ये भारतामध्ये केबलच्या माध्यमातून काही चॅनेल यायला लागले. तरीसुद्धा दूरदर्शनचा वरचष्मा होताच. मला आठवताहेत ते दिवस जेव्हा आजतक, एनडी टीव्ही, स्टार न्यूज हे दूरदर्शनवर एकेक तासाचे किंवा अर्ध्या तासाचे सेगमेंट करून विकत घ्यायचे आणि त्यावर ते त्या कालावधीत त्यांचे बुलेटिन दाखवायचे. एनडीटीव्हीचे प्रणय रॉय यांचा 'वर्ल्ड न्यूज ऑफ धिस वीक' नावाचा शो होता. 'आजतक'चे तर आजतक नावाचे बुलेटिनच होते. त्या कार्यक्रमाचे नाव 'आजतक'च होते. आजतकचे खूप मोठे तेव्हाचे पत्रकार सिंग जे आत हयात नाहीत, त्यांनी पूर्ण नवीन स्टाईल आणली. जैन टीव्ही, एशिया नेट नावाचा चॅनेल होता. मराठीत नव्वदीचे दशक संपत असताना प्रभात, तारा या नावाचे चॅनेल होते. अल्फा वाहिनी होती ज्याचे रूपांतर नंतर झी वाहिनी झाले. त्यानंतर ईटीव्ही आला. त्याने दूरदर्शनची मक्तेदारी मोडीत काढली. ही खूप महत्त्वाची बाब त्या काळात घडली. दूरदर्शनच्या बातम्या म्हणजे बऱ्यापैकी शहरी तोंडवळा असायचा, पण ईटीव्हीने ग्रामीण महाराष्ट्राला खूप मोठ्या प्रमाणात अग्रस्थान दिले होते. त्याचवेळी खरे तर माध्यमक्रांतीची चाहूल लागली होती. काहीतरी बदलतेय हे जाणवत होते. हा तो काळ होता जेव्हा वर्तमानपत्रात छापून येत होते की आज वाहिन्यांवर काय बघायला-ऐकायला मिळणार आहे. नव्वदीच्या दशकात जी मुले त्यांच्या तिशी-पस्तिशीत होती त्यांना या सगळ्याची गंमत वाटायची. कारण आधी डीडी १, डीडी २ याशिवाय पर्यायच उपलब्ध नव्हते. या बदलामुळे चार चॅनेल बघायला मिळायचे. मात्र या बदलामुळे एक झाले की त्यामुळे नव्वदीच्या दशकात दूरदर्शनने कात टाकायला सुरुवात केली. स्फोटच झाला. भरपूर वाहिन्या अस्तित्वात यायला लागल्या. 'व्हिडिओ ऑन डिमांड' नावाची सर्व्हिस उपलब्ध झाली. केबलवाले तुम्ही म्हणाल तो चित्रपट दाखवायला लागले. मग सॅटेलाईट चॅनेल आले. यात ई टीव्ही, अल्फाबरोबर सोनी, स्टार, झी आले. न्यूज चॅनेलसाठी मात्र २००७ हे वर्ष अविस्मरणीय ठरले. कारण २००७-२००८ या कालावधीत स्टार माझा, झी २४ तास, आयबीएन लोकमत, साम टीव्ही अशा अनेक वृत्तवाहिन्या एकापाठोपाठ एक अवतीर्ण झाल्या.

मी या सगळ्याकडे सकारात्मक दृष्टिकोनातून बघतो. कारण यामुळे माहिती आणि मनोरंजन यावरचा सरकारी वरचष्मा, अधिकार, मोनोपोली ही मोडून निघाली. ही पहिली गोष्ट घडली. म्हणजे लोकांच्या हातात पर्याय आले. दुसरी गोष्ट म्हणजे मनोरंजन आणि बातम्या यांचे स्रोत मर्यादित होते. त्यात बदल झाले. खूप संधी उपलब्ध झाल्या. हातातील रिमोट कंट्रोलच्या बटणांना खऱ्या अर्थाने अर्थ प्राप्त झाला. पूर्वी बटणे असून उपयोग नव्हता. प्रेक्षकांच्या हाती पर्याय निवडीची वेगळी सत्ता तयार झाली, ज्याची दखल घेणे हे क्रमप्राप्त ठरले.

पर्याय उपलब्ध झाल्याने लोक जाणीवपूर्वक चॅनेल निवडू लागले. बातम्यांमध्येही विविधता अनुभवायास मिळू लागली. बातम्या पूर्वी सपक होत्या. ठरावीक साचेबद्ध पद्धतीने त्या दिल्या जात. खाजगी

वाहिन्यांनी बातम्यांमध्येसुद्धा नाट्यामयता आणली. या प्रक्रियेत नवीन दमाचे, आवाजाचे निवेदक आले. ग्रामीण भागातील लोकांसाठीही संधीचे दार उघडले गेले. म्हणून मी या सगळ्या बदलाकडे फार सकारात्मक पद्धतीने बघतो. त्याचे परिणाम-दुष्परिणाम निश्चितच झाले. काही प्रमाणात समाजात भांबावलेपण आले. माहितीचा इतका धबधबा आदळायला लागला की एक गोंधळ त्यातून तयार होत गेला. लोक किती बघणार? देशातील एकूण न्यूज चॅनेलचा विचार केला तर यात सर्वसाधारण प्रेक्षक सहा ते सात मिनिटे बातम्यांचे चॅनल बघतो. महाराष्ट्रात हे प्रमाण आणखी कमी. कारण महाराष्ट्रात अर्धा डझन न्यूज चॅनेल आहेत. कधी बघणार हे सगळं. पण काहीच नसण्यापेक्षा पर्याय विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत हे कधीही चांगले असते. लोकांचे माहिती सक्षमीकरण (इन्फर्मेशन लिटरसी) करणे आणि त्यांना पर्याय मिळवून देणे ही मोठी क्रांती या मधल्या काळात झाली आणि मी त्याचे स्वागत करतो.

**ओटीटी प्लॅटफॉर्मवर मनोरंजनासाठी चोवीस तास जाहिरातविरहित सिनेमे, वेबसीरिज सुरू आहेत. यामुळे स्क्रीनटाइम विभागला गेलाय. याचा तुमच्या प्रेक्षकसंख्येवर कसा परिणाम होतो? या आव्हानाला तुम्ही कसे सामोरे जाणार?**

न्यूज चॅनेलची तुलना मनोरंजनात्मक वाहिन्यांशी केली जाते म्हणजेच न्यूज चॅनेलसुद्धा मनोरंजनासाठी वापरले जातात हे त्यातून अधोरेखित होते आहे. वस्तुत: अशी तुलना करणे योग्य ठरणार नाही. कारण ओटीटी हे मनोरंजनाचे साधन आहे, पण प्रेक्षकांचा 'स्क्रीन वॉच टाइम' हा तिकडे गेल्याने आम्हाला फरक पडतो यात तथ्य आहे. आम्हालाही याचा फटका बसणार आहे. मराठी प्रेक्षक हा असा आहे की तो हिंदी, मराठी, इंग्रजी सगळ्याच भाषा जाणतो. त्यामुळे तो असाही पूर्णपणे आमच्या वाट्याला येत नाही. त्यात न्यूज चॅनेलसुद्धा हिंदी, इंग्रजी, मराठी तिन्ही भाषांमध्ये विपुल आहेत. त्याच्या जोडीला मनोरंजनविश्व आहेच. या अशा परिस्थितीत या सगळ्या पर्यायांतून लोक आमच्याकडे येतील. अशा बातम्या देण्याचे आव्हान आमच्यापुढे असते. किंबहुना न्यूज इंडस्ट्रीमध्ये अशी चर्चा सुरू आहे की आज चॅनल्स जसे काम करताहेत तसे कामाचे स्वरूप भविष्यात राहणार नाही. कारण सगळा पसारा उभा करून त्यासाठी जे मूळ भांडवल लागते तिचा विचार करता सगळ्याच गोष्टींचे डिजिटलायझेशन करावे आणि इतर खर्चाला कात्री लावणे हेच योग्य धोरण ठरेल. एबीपीचे वाहिनीचे उदाहरण लक्षात घेऊया. त्यांनी अनेक चॅनेल आणले. बंगाली, पंजाबी, मराठी, गुजराती इत्यादी. त्यानंतर मात्र तेलुगू भाषेत चॅनल आणले, पण तो वेब प्लॅटफॉर्म आहे. 'एबीपी कर्नाटका' हे पण त्यांनी वेब प्लॅटफॉर्म सुरू केले. 'बीबीसी मराठी' हा पूर्णपणे डिजिटल प्लॅटफॉर्म आहे. त्यामुळे पारंपरिक टीव्ही स्क्रीन चॅनेल तयार करणे, त्यासाठी सॅटेलाईट लायसन्स घ्या, डिस्ट्रिब्युशन कॉस्ट हे सगळे व्याप कशासाठी करायचे हा प्रश्न आहेच. म्हणून आता मीडिया न्यूज चॅनेलपुढे फार मोठे आव्हान असेल. कदाचित माझी शेवटची पिढी असेल की जी वृत्तवाहिन्या या पारंपरिक स्वरूपात बघत असतील. पण पुढे त्याची गरजच पडणार नाही.

**4G, 5G यामुळे ग्राहकसंख्या वाढण्यास मदत झाली का? याचा वाहिन्यांना फायदा झाला की तोटा ? या बदलाला अनुसरून माध्यमांची उद्याची परिस्थिती काय असेल?**

4G, 5G याचा आम्हाला प्रचंड फायदा झाला. कारण मोबाइलमध्येच बातम्या, सिनेमे, क्रीडा सगळे हवे ते दिसू लागले. प्रवासातसुद्धा हे सहज दिसू लागले. प्रेक्षक सतत आमच्याशी जोडला जाऊ लागला. त्याला घरात टीव्हीपुढे बसून राहण्याची आवश्यकताच उरली नाही. त्यातून आणखी एक गोष्ट शक्य झाली की व्यक्तीची 'प्ले लिस्ट' समजू लागली. त्यातून कोणत्या प्रकारच्या बातम्या-व्हिडिओ डाऊनलोड केले जातात, काय पाहिले जाते ही माहिती व्यक्तिगत पातळीवर उपलब्ध होऊ लागली. त्यामुळे व्यक्तीच्या आवडीनुसार त्याचा कल लक्षात घेऊन कस्टमाइझ्ड बातम्या त्याला पाठवणे शक्य झाले. त्यासंदर्भातील बुलेटिन उपलब्ध असतील तर त्याचे नोटिफिकेशन देता येतात. याचा खूप फायदा आहे. 5Gमुळे लोक डिजिटली उपलब्ध झाले तर आम्हालाही किंमत कमी करणे शक्य होणार आहे. ती किंमत कमी झाली तर आम्ही चांगल्या माणसांमध्ये ते पैसे गुंतवू शकतो. एक चॅनेल चालवायचे म्हटले तर महिन्याचा खर्च हा जवळजवळ दीडएक कोटीच्या घरात होतो. ही किंमत 5Gमुळे कमी होईल. आम्हाला फक्त कंटेन्ट तयार करून तो अपलोड करायचा एवढाच खर्च होईल. 5G आणि मोबाइलचा खर्च तर ग्राहक स्वत:च करणार आहेत. तंत्रज्ञान विकसित झाल्याने आता चर्चेचे कार्यक्रमसुद्धा डिजिटली शक्य झाले आहेत. हे केवळ 4G मुळेच शक्य झालेय. पूर्वी माणूस पाठवा किंवा माणसांना स्टुडिओत बोलवा यात बराच पैसा खर्च करावा लागत होता. घरी बसून तंत्रज्ञानाच्या आधारे हव्या त्या गोष्टी, प्रोजेक्ट करू शकतो. चेहऱ्यावर प्रकाश टाकण्यासाठी रिंग लाइट मिळतो. झूम उपलब्ध झाले. सामान्य माणसांनाही हे सगळं करता येऊ लागले. त्यामुळे स्टुडिओत माणसांनी यावेच कशाला हा प्रश्न निर्माण होतो. मोबाइलला लेन्स लावून घेतली, 5G नेटवर्क असेल तर उत्तम दर्जाचे ब्रॉडकॉस्ट लेव्हलचे प्रक्षेपण टीव्हीवर किंवा मोबाइलवर कोणीही दाखवू शकतो. लेटेस्ट आयफोनच्या आधारे तीन कॅमेऱ्यांद्वारे क्लोज, मिडक्लोज आणि वाईड अँगलने तुम्ही शूट करू शकता; तेही हाय डेफिनेशनचे. मग असा मोबाइल सर्रास वापरता आला. 5G उपलब्ध झाले तर पूर्ण दिशाच बदलणार आहे. हे आव्हान नाही. उलट आम्हाला पूरक आहे. आम्हाला पारंपरिक रूप बदलून कात टाकता येणार आहे. यामुळे प्रसारमाध्यमे अधिक ॲक्टिव्ह, अधिक इंटरेस्टिंग होणार आहेत.

**– प्रसन्न जोशी**

prasann.joshi@gmail.com

**शब्दांकन : डॉ. लतिका भानुशाली**

भ्रमणध्वनी : ९३२२२०७८७८

bhanushali.latika@gmail.com



*भारत हा जगातील सर्वात मोठा युवा देश असून त्याचे वेगाने शहरीकरण होत आहे ही वस्तुस्थिती ओटीटीच्या भविष्यकालीन वाढीस पोषक आहे. स्थलकाल सुलभता (हवे तेथे, हवे तेव्हा), 'निवडीचे स्वातंत्र्य (हवा तो कार्यक्रम), वैविध्य यामुळे भविष्यात भारतीय शहरे व गावे स्थित ग्राहकांच्या मागणीतील ओटीटीचा वाटा जोमाने वाढत राहणार आहे.*

# यापुढे स्पर्धा 'ओटीटी'शीच!

**वासुदेव जोशी**

ओटीटी (Over the top-OTT) हा व्हिडिओ ऑन डिमांड (Video on Demand - VOD) म्हणजे 'मागणीनुसार दृक्‌श्राव्य कलापुंज' याचा उपभाग आहे. त्रयस्थाने वा स्वतः निर्मिलेला दृक्‌श्राव्य कलापुंज म्हणजे कंटेंट (Content) ग्राहकाच्या मागणीनुसार महाजालाच्या माध्यमातून केबलसहित वा केबलविरहित पुरवणारा अवकाशीय मंच किंवा प्लॅटफॉर्म म्हणजे ओटीटी.

प्रादेशिक भाषांतील ओटीटी वाहिन्यांमुळे ओटीटीचा उच्चभ्रूपणा कमी होत त्याचे सर्वसामान्य भारतीयांचे टीव्हीनंतरचे माध्यम म्हणून स्वीकार होण्याचा दर वेग पकडत आहे. भारतामध्ये बंगाली, मराठी, हिंदी, असामी, तेलगू, तामीळ, मल्याळी, कानडी अशा १४ प्रादेशिक भाषांतील ओटीटी मंच सध्या प्रचलित आहेत. 'प्लॅनेट मराठी' या २०१७ मध्ये सुरू झालेल्या मराठी ओटीटी वहिनीवर वेबमालिका, चित्रपट, दृक्‌श्राव्य संगीत आणि मराठी सांस्कृतिकतेशी निगडित कार्यक्रम प्रस्तुत करण्यात येत आहेत.

कोविडकाळात देशभरातील सिनेमागृहे बंद असल्याने ओटीटी प्लॅटफॉर्मवरती अनेक भारतीय भाषांतील चित्रपट प्रदर्शित झाले. त्याचे २०२० मधील उत्पन्न रुपये ३,५४० कोटी होते. याची सुरुवात अमिताभ बच्चन यांचा 'गुलाबो सिताबो' हा चित्रपट प्रदर्शित होऊन झाली. अनेक बहुचर्चित चित्रपट डिजिटलवर प्रथम प्रदर्शित झाल्याने दर्शकांच्या संख्येत तुलनेने अधिक वाढ झाली. (संदर्भ : फिकी व अर्न्स्ट ॲण्ड यंग, 'प्लेयिंग बाय न्यू रूल्स', इंडियाज मीडिया ॲण्ड एंटरटेनमेंट सेक्टर रिबूटस् इन २०२०).

ओटीटीवर थेट प्रदर्शित केले जाणारे चित्रपट व बॉक्स ऑफिसवरील पारंपरिक चित्रपट प्रदर्शन यात मूलभूत फरक आहे. बॉक्स ऑफिसवर थेट प्रदर्शित होणाऱ्या चित्रपटांना किमान उत्पन्नाची कोणतीही हमी नसते. संपूर्ण धोका निर्माते उचलत असतात. याउलट ओटीटी मंच त्यांच्या माध्यमातून थेट प्रदर्शित होणाऱ्या चित्रपटांना किमान उत्पन्नाची वा रकमेची खात्री देतात. कारण ओटीटीचे हक्क ठरलेल्या रकमेला विकले जातात. त्यामुळे निर्मात्याचा धोका कमी होतो. मध्यम, छोट्या बजेटच्या व चाकोरीबाहेरील चित्रपटांना थेट प्रदर्शनासाठी ओटीटी हे एक उत्तम माध्यम आहे. मध्यम वा छोट्या बजेटच्या चित्रपटांबाबत ओटीटी मंचाला विकले जाणारे हक्क हे त्या चित्रपटाच्या उत्पन्नाच्या जवळजवळ ८०% ही असू शकतात. उरलेले २०% सॅटेलाइट हक्क असतात. कोविडनंतर चित्रपटगृहे उघडली तरी निर्माते प्रदर्शनासाठी थांबणार नाहीत. कारण त्यांना गुतंवलेल्या भांडवलावर लगेच परतावा हवा असेल जेणेकरून त्यांचे भांडवल लवकर मोकळे होईल. स्वतःचे भांडवल व घेतलेले कर्ज यांच्या गुणोत्तरावरही निर्मात्याची लगबग ठरेल. ओटीटी मंचांना नवनवीन कलाकृती हव्यात व निर्मात्यांना भांडवलाची लवकर सोडवणूक हवी. यामुळे मध्यम, छोट्या व चाकोरीबाहेरील चित्रपटांचा ओटीटीकडील ओढा कोविडनंतरही कायम राहील. मोठे स्टार व मोठे बजेट चित्रपटांच्या बाबतीत मात्र थेट ओटीटीवरील प्रदर्शनाने सॅटेलाईटवरील प्रदर्शनाच्या हक्कांना मोठा धक्का संभवतो. त्यामुळे ते ओटीटीवरील थेट प्रदर्शन टाळण्याचीच शक्यता अधिक. चित्रपट यशस्वी झाला तर ओटीटीला नंतर विकल्या जाणाऱ्या हक्कांची तुलना सॅटेलाईट हक्कांबरोबर केली जाईल व हक्कभाव वधारेल. एकुणात पाहायचे झाले तरथेट चित्रपटगृहे की थेट ओटीटी हा निर्णय निर्मात्याच्या स्वतःच्या चित्रपटाच्या यशस्वितेच्या अनुमानावर अवलंबून असेल. पण हा चित्रपटगृहे उघडून परिस्थिती सुरळीत झाल्यानंतरचा प्रश्न आहे. तोपर्यंत मोठ्या बजेटच्या चित्रपटांनादेखील थेट प्रदर्शनासाठी

ओटीटीचा विचार करावाच लागेल.

वेगळया अंगाने पाहायचे झाल्यास ओटीटी मंचांचे आर्थिक समीकरण हे सदस्यता, जाहिराती व प्रति व्हिडिओ दर्शनातून निर्माण होणाऱ्या उत्पन्नावर आधारित असते. सद्यःपरिस्थितीत एक ओटीटी सदस्यत्व कुटुंबातील तीन ते चार व्यक्तींना वापरता येते. अशा आर्थिक समीकरणामुळे प्रत्येक मोठ्या चित्रपटासाठी १०० कोटी रुपयांवर भांडवल दरवेळी गुंतवणे ओटीटी मंचांना परवडणारे नाही. मात्र प्रमुख ओटीटी मंचांच्या मालककंपन्या या आर्थिकदृष्ट्या बलाढ्य जागतिक कंपन्या आहेत व कलाकृती प्रदर्शन करण्यासाठी त्यांची जगातील १९०हून अधिक देशात उपस्थिती आहे हेही लक्षात घ्यावयास हवे.



मोठ्या पडद्यावर कुटंबासोबत वा मित्रांसोबत पॉपकॉर्न, बटाटेवडे वा सामोसे खात चित्रपट पाहण्यातील थरार वा गंमत मोबाइलवर स्ट्रीमिंग व्हिडिओ पाहण्यात नाही. दोन्ही माध्यमांच्या अनुभव देण्याच्या पद्धतीत फरक आहे. एकाच टीव्ही पडद्यावर कुटंबातील सर्वांनी एकच करमणूक कार्यक्रम पाहणे ही प्रथा आता मागे पडत आहे. घराघरातील तरुण मुलेमुली त्यांना हवा असलेला कार्यक्रम मोबाइल स्ट्रीमिंग व्हिडिओवर एकांतात पाहणेच पसंत करू लागले आहेत. घराघरातील प्रौढ महिलांचीही पसंती तिकडेच वळत आहे. त्यामुळे कोविडोत्तर काळात चित्रपटगृहे व ओटीटीवरील प्रवाही दृक्श्राव्य कलाकृती एकमेकास पूरक म्हणून राहतील.

सर्व विवेचनातून हे लक्षात येते की वायरलेस माध्यमातून माहिती व मनोरंजनाचा अनुभव ही समाजातीलउच्चभ्रू वर्गाची मक्तेदारी राहिलेली नसून भारतीयांच्या दैनंदिन जगण्याचे ते अविभाज्य अंग आहे. पाहिजे तेव्हा व पाहिजे तेथे मागणीनुसार माहिती व मनोरंजन उपलब्धतेची ही क्रांती आहे.

भारतातले 4G ग्राहक सन २०२२ मध्ये ८२ कोटीपर्यंत पोचण्याचे अनुमान आहे. भारतात ज्यावर स्ट्रिमिंग व्हिडिओ पाहता येतील असे मोबाइल वापरणारी ग्राहकसंख्या २०२१पर्यंत ७२ कोटींपर्यंत पोचण्याचे अनुमान आहे. हे प्रमाण जगातील स्मार्ट मोबाइलधारकांच्या संख्येच्या १९% असेल.

5G तंत्रज्ञान भारतात जसे लवकरच उपलब्ध होईल तसा ओटीटीकडील कल वाढणार आहे. 5G चा वेग हा 4Gपेक्षा जवळजवळ १०० पट अधिक असणार आहे. त्याची लेटन्सी म्हणजे उपयोजकाने विचारलेला प्रश्न आणि त्याला इंटरनेटमधून मिळालेले उत्तर यातील विलंब हा साधारणपणे 4Gच्या एक पंचमांश असणार आहे. तसेच, 5G मुळे आपण अधिक उपकरणे जोडू शकणार आहोत. त्यामुळे आंतरनिगडिकतेत वाढ होणार आहे.

टीव्हीवर अनेक वाहिन्या गुच्छ स्वरूपात स्वीकाराव्या लागत असल्याने निवडीचे स्वातंत्र्य उरत नाही. जे पाहिले जाते तेवढ्यासाठीच पैसे दिले गेले असे होत नाही. भारतीय ग्राहकांचा कल टीव्हीशिवाय ज्या ठिकाणी मोफत ओटीटी उपलब्ध असेल ते स्वीकारण्याकडे असतो; जसे यूट्यूबवर उपलब्ध असलेले जुने चित्रपट वा माहितीपट वा जाहिरातीतून उत्पन्न मिळवून कंटेंट उपलब्ध करून देणारी यूट्यूब चॅनेल. त्यामुळे ओटीटीचे फायदे अंतिम ग्राहकापर्यंत पोचवून त्यांची जागरूकता वाढवण्यासाठी आणि त्यांचे मासिक वा वार्षिक सदस्यांत परिवर्तन करण्यासाठी ओटीटी प्लॅटफॉर्म मार्केटिंगवर जोर देत राहतील. स्वतःच्या गुणवत्तापूर्ण व ग्राहकपसंत कलाकृती निर्मितीवरील भर आणखी वाढवतील.

ओटीटीवापराचे प्रमाण वाढत असले तरी टीव्ही हा माहिती–महाजाल क्षेत्रातील सर्वात मोठा विभाग आहे आणि त्याच्या तुलनात्मक स्वस्तपणामुळे काही काळापर्यंत त्याचा मााहितीमहाजाल क्षेत्राच्या एकूण उत्पन्नातील वाटा कमी होत गेला तरी तो मोठा विभाग राहणार आहे. परंतु त्याच्या वाढीचा दर हा अगदी छोट्या एकांकामधेच राहणार असून ओटीटीची वाढ मात्र त्याच्या कित्येक पटीत असणार आहे आणि ती युवावर्गाच्या कलामुळे व पसंतीमुळे असणार आहे. भारताची ५०% लोकसंख्या २५ वर्षांखालील असून ६५% लोकसंख्या ३५ वर्षे वयाखालील आहे. भारत हा जगातील सर्वात मोठा युवा देश असून त्याचे वेगाने शहरीकरण होत आहे ही वस्तुस्थिती ओटीटीच्या भविष्यकालीन वाढीस पोषक आहे. स्थलकाल सुलभता (हवे तेथे, हवे तेव्हा), निवडीचे स्वातंत्र्य (हवा तो कार्यक्रम), वैविध्य (भारतीय प्रादेशिक व जागतिक भाषांतील दृक्श्राव्य कलाकृतींची उपलब्धता), अनुषंगिक तंत्रज्ञानातील प्रगती (5Gच्या प्रसारामुळे सेवेची गुणवत्ता सुधारेलव VODच्या किंमती आणखी कमी होतील), वाजवी दरातील स्मार्ट फोनची उपलब्धता व वापर आणि सुधारणारा मनोरंजन परतावा (खर्चलेल्या प्रती रुपयात मिळणारे मनोरंजन किंवा मनोरंजन प्रती रुपया) यामुळे भविष्यात भारतीय शहरे व गावे स्थित ग्राहकांच्या मागणीतील ओटीटीचा वाटा जोमाने वाढत राहणार आहे. भारतीय प्रादेशिक भाषांतील ओटीटी वाहिन्यांना त्यांचा बाजारपेठीय वाटा वाढवण्यासाठी भारतात कार्यरत असलेल्या बलाढ्य जागतिक ओटीटी वाहिन्यांच्या स्पर्धेस तोंड द्यावे लागेल.

**– वासुदेव जोशी**

sudeo100@gmail.com

**चित्र – एक**

साबणाच्या पावडरीची जाहिरात होती. तिच्यातल्या बाईचा पदर उंच उडाला होता. तो बातम्यांमध्ये घुसला होता. बातम्यांचा मजकूर पदराच्या आजूबाजूनं लावावा असंच अपेक्षित होतं.

बहुतांश प्रमुख वृत्तपत्रांनी पहिल्या पानावर जाहिरात छापली. काही अपवाद होते. पुण्याच्या सकाळनं छापली नाही.

प्रतापराव पवार यांनी नुकताच सकाळ विकत घेतला होता. संपादक होते विजय कुवळेकर. त्यांच्या या भूमिकेमुळे झालेलं नुकसान बहुधा लाखाच्या जवळ जाणारं असावं.

ही पस्तीस वर्षांपूर्वीची गोष्ट आहे.




*पत्रकारितेच्या धंद्याचं नेतृत्व आता छापील वृत्तपत्रांकडे नाही. गेली काही वर्षं ते टीव्ही म्हणजे वृत्तवाहिन्यांकडे होतं. आता ते वेब फलाटांकडे जाऊ लागलं आहे. त्यानुसार पत्रकारितेच्या धारणाही बदलत आहेत.*

तोवर, जाहिराती आणि बातम्या यांच्यात कुंपण होतं. बातम्यांच्या जागेतला मजकूर विकण्यासाठी असता कामा नये अशी अंधुकशी धारणा होती. तेव्हा पत्रकारितेत नव्यानं येणाऱ्यांना तरी निदान तेच सांगितलं जात असे. खूप जुन्या काळात, दूध हे विकण्यासाठी नसतं असं मानणारे होते असं म्हणतात. तसाच काहीसा प्रकार.

या गोष्टी आता इतिहासजमा आहेत.

पत्रकारितेच्या धंद्याचं नेतृत्व आता छापील वृत्तपत्रांकडे नाही. पत्रकारितेच्या धंद्याचं नेतृत्व आता छापील वृत्तपत्रांकडे नाही. गेली काही वर्षं ते टीव्ही म्हणजे वृत्तवाहिन्यांकडे होतं. आता ते वेब फलाटांकडे जाऊ लागलं आहे. त्यानुसार पत्रकारितेच्या धारणाही बदलत आहेत. गेली काही वर्षं ते टीव्ही म्हणजे वृत्तवाहिन्यांकडे होतं. आता ते वेब फलाटांकडे जाऊ लागलं आहे. त्यानुसार पत्रकारितेच्या धारणाही बदलत आहेत.

आज तरुण पत्रकारांना पहिला धडा शिकावा लागतो तो बाजाराकडे लक्ष ठेवण्याचा. मजकूर असा लिहा की जो विकला जाईल, हे पहिले सूत्र आहे. असाच मजकूर लिहा जो विकला जाईल हा या सूत्रातला गर्भितार्थ आहे. लाइक्स, व्ह्यूज, हिट्स इत्यादी विक्री मोजण्याची मापे आहेत. एखाद्या बातमीची किती मापे विक्री झाली याची हर क्षणी चाचपणी होते. बातमी देणाऱ्याचा आणि लिहिणाऱ्याचा भाव त्यानुसार वरखाली होतो. सगळ्यांच्या एकूण मजकुराला मिळून किती मापे पदरात पडली यावरून वृत्तपत्र, वृत्तवाहिनी किंवा वृत्तस्थळ यांची किंमत केली जाते.

पूर्वी मिळे व अजूनही ऑडिट ब्यूरोचं खपाचं प्रमाणपत्र मिळतं. ते जाहिरातींची जागा विकण्यासाठी उपयोगी होतं व आहे. पण, संपादकीय जागेतील मजकुराची विक्रीयोग्यता किती कमी वा अधिक हा सध्याचा कळीचा मुद्दा झाला आहे.

यातल्या विक्रीयोग्यतेच्या कसोट्या थेटपणे पारंपरिक

# जाहिरातकारी, मजकूर पाखडणूक की आणखी काही

## राजेंद्र साठे

जाहिरातकारीतल्या कसोट्यांवर आधारलेल्या आहेत. उदाहरणार्थ, मजकुरावर वाचक किती काळ रेंगाळला, त्याने तो कोठवर वाचला वा पाहिला, त्यामुळे ब्रँड रिकॉल व्हॅल्यू किती तयार झाली, मजकूर–वाचनाचं वर्गणीदार होण्यात किती रूपांतरण झालं अशा रीतीनं मजकुराचं मूल्यमापन होत असतं.

विपणनाचं स्थलांतर निव्वळ जाहिरातीच्या जागेतून बातम्यांच्या जागेत नव्हे, तर संपादकीय डोक्यांमध्ये होणं बऱ्याच काळापासून चालू होतंच. बाँबे टाइम्स, टीव्हीचे टीआरपी ते आजची नेत्रमणिकेंद्रितता (आयबॉल्स) हे सलग पट्टीवरचेच टप्पे आहेत.

याचाच आणखी एक उपप्रकार आहे. पूर्वीच्या काळी मालक पैसे घाली. वृत्तपत्र चालवी. आता तुमच्या नोकऱ्या टिकवायच्या असतील तर तुम्हीच पैसे आणा असं मालक सांगतो. निर्भीड पत्रकारितेसाठी प्रसिद्ध असलेल्या एका वृत्तसमूहाचा मालक याबाबतही प्रसिद्ध आहे. नव्यानं घालायला आता माझ्यापाशी भांडवल नाही, तुमचं तुम्ही पाहा असं त्यानं आपल्या समूहातील वृत्तपत्रांना सांगितलं आहे असं म्हणतात. त्यामुळे या समूहात सारखे इव्हेंट चाललेले असतात. त्यातून पैसे उभे केले जातात. वार्ताहरांना बातम्या आणण्याखेरीज हे इव्हेंट आयोजित आणि यशस्वी करणं हे एक महत्त्वाचं काम असतं. त्यांच्या केआरएमध्ये त्यावरून त्यांचं मोजमाप होतं, असं म्हणतात.

कोणतंही जुनं–नवं भांडवल (बनिया ते व्हेंचर कॅपिटालिस्टांचं फंड) आता पत्रकारिता चालवण्याचा पत्कर घ्यायला तयार नाही. तो संपादकीय विभागाला स्वतःच घ्यावा लागेल. मजकूर वाचणाऱ्या वा

पाहणाऱ्याला कायम गिऱ्हाईक बनवावं लागेल.

ॲमेझॉनचा संस्थापक जेफ बेझॉसचे उद्‌गार फार प्रसिद्ध आहेत. (जरी की तो पत्रकारी मजकुराविषयी बोलत नव्हता.) ॲमेझॉन प्राइम व्हिडिओ हा टीव्हीचे कार्यक्रम व सिनेमे विकणारा ठेला आहे. या क्षेत्रातील गोल्डन ग्लोब हे ऑस्करइतकेच प्रसिद्ध पुरस्कार आहेत. बेझॉस (अशा आशयाचे) म्हणाला की, ॲमेझॉन प्राइमच्या एखाद्या कार्यक्रमाला गोल्डन ग्लोब पुरस्कार मिळतो तेव्हा त्या निमित्तानं ॲमेझॉनचे वर्गणीदार वाढून आमच्या ऑनलाईन बुटांच्या विक्रीत वाढ व्हायला मदत होते (हाच खरा फायदा). म्हणजे प्रेक्षक भले ॲमेझॉनवर पॅरासाईट किंवा मिनारीसारखे सिनेमे बघून विचारात पडत असतील. पण त्यांचा खरा उपयोग ॲमेझॉनवरची खरेदी वाढवण्यासाठी (आणि वाढली तरच) असतो.

पत्रकारी मजकुराबाबत वेगळ्या रीतीनं पण असंच काहीसं घडू शकतं. देवी शेट्टी हे बंगलोरचे प्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ आरोग्यविषयक लिखाण करत असतात. उद्या एखादं वृत्तस्थळ असं म्हणू शकतं, की देवी शेट्टी यांचं आमच्याकडील स्तंभलेखन लाइक वा सबस्क्राईब करणाऱ्याला अपोलो इस्पितळात पाच टक्के सूट.

ही अर्थातच एक कल्पना आहे. हरेक प्रकारचा मजकूर या रीतीनं धनमिळावू होऊ शकणार नाही हे उघड आहे. पण मजकूरकर्त्यांच्या डोक्यात सतत हा किडा राहील.

करणारे व पाहणारे-वाचणारे यांच्या भूमिका बदलतील. मुळात मजकुराचीच भूमिका बदलेल. पूर्वी मजकूर वास्तवाचा शोध घेत फिरत असे. आता जास्तीत जास्तांना बांधून ठेवण्याचा उद्देश असेल. त्यांना वाईट वाटेल, पटणार नाही असा मजकूर टाळला जाईल.

शक्यता अशी आहे, की बराच मीडिया बराच काळ या दिशेनं जात राहील. राजकारणच नव्हे; सर्वच क्षेत्रांत.

**छापीलचं मरण सर्वांनी गृहीत धरलं आहे. उत्तरायणाची प्रतीक्षा आहे. परंतु इथं थोडी गडबड आहे. छापील जाणार म्हणजे त्याच्यासोबत पारंपरिक मजकूर-विद्याही संपणार असा अनेकांचा समज आहे. इंटरनेटनं सर्वस्वी नवी कोरी मजकूर-विद्या जन्माला घातली आहे असे खूप लोकांना वाटतं. पण ते खरं नाही.**

**चित्र -दोन**

वृत्तमाध्यमांमधला मजकूर, मजकूर म्हणजे नेमकं काय असतं?

तर त्यात लोकांच्या उपयोगाची वा घटना-घडामोडींची माहिती असते. जसं की, महागाईभत्ता जाहीर, अमुक रस्ता होणार, अभ्यासक्रमात बदल, सोयाबिनवर रोग, अमुक ठिकाणी अपघात इत्यादी. लोकांच्या प्रश्नांची मांडणी असते. रस्ते, पाणी, भ्रष्टाचार, पोलिसांची टर्रेबाजी इत्यादी. आपल्या समाजाबद्दल एकत्रित चित्र देण्याचा प्रयत्न असतो. जसं की, मराठवाड्यात ओला तर उत्तर महाराष्ट्रात कोरडा दुष्काळ. किंवा महाराष्ट्रातील बहुसंख्य तालुक्यांच्या गावांमधून शेअर बाजारात मोठी गुंतवणूक इत्यादी. याखेरीज विविध विषयांवर मते व चर्चा असतात.

आधी बराच काळ हा मजकूर लेखी आणि अचल होता. अलीकडे त्यात हलती-बोलती चित्रे आली.

टीव्हीचा वरचष्मा वाढल्यावर छापीलांनी आपलं स्वरूप बदललं. फोटोंची संख्या व दर्जा वाढला. रंग वाढले. चौकट ऊर्फ फ्रेम देखणी करण्यावर भर सुरू झाला. लिखाण छोटं झालं. हेडलाईनमधल्या अदा वाढल्या.

छाप्यातून (टीव्हीच्या) खोक्यात येताना मजकुराला दृश्य व ध्वनीची मिती लाभली. शरद पवार कसे हसले, काय बोलले किंवा एसटी कशी नदीत पडली हे दिसू-ऐकू येऊ लागले. शिवाय काळाची चौकट संपली.

मोठे बदल झाले. तरीही एक मूलभूत गोष्ट तशीच राहिली.

पुरवठादार मोजके व केंद्रीय पद्धतीनं काम करणारे आणि मागणीवाले सर्वदूर ही स्थिती कायम राहिली. मागणीवाल्यांचा एक सरासरी गट कल्पून पुरवठा करण्याचे तत्त्व टीव्हीमध्येही कायम राहिले.

यातून मजकूर-विद्या ही वृत्तपत्रं वा वाहिन्या अशांसारख्या जातींची मक्तेदारी असल्याचा समज तयार झाला.

त्याविरुद्ध बंड घडवून आणले ते तंत्रज्ञानानं. त्यातून पुरवठा आणि मागणी या दोन्हीकडच्या व्यवस्थेत बदल झाला. कॅरमच्या स्ट्रायकरनं पहिल्या खेळीत पूर्ण बोर्डावर सोंगट्या विखरून टाकाव्यात तशी स्थिती झाली.

आता कोणीही कुठेही मोबाइलवर माहिती लिहू शकतो, फोटो-व्हिडिओ काढू-एडिट करू शकतो. व्हॉट्सॲप किंवा फेसबुक-इन्स्टावरून हा मजकूर तत्काळ प्रसारित करता येऊ शकतो. लोकांचे प्रश्न मांडणं, एकत्रित चित्र देणं वा मतं मांडणं हे इतर उद्योगही करू शकतो.

याला आपण डिजिटल मजकूरकारिता म्हणू.

याखेरीज सोशल मीडियावरची बाकीची जाळी वेगळीच. एकेक गाव, शहर वा प्रदेश, एकेक जात, एकेक पीक, एकेक व्यवसाय, एकेक संघटना, एकेक विचारसरणी, एकेक छंद, एकेक कला, किंवा गेला बाजार, स्वतःला प्रसिद्ध मानणारी एकेक व्यक्ती ही अशा जाळ्यांचा केंद्रबिंदू असतात. त्यातून बातम्या, माहिती, सल्ले, मते, चर्चा, टीका-प्रतिटीका यांचं अखंड पाणी उलटसुलट खेळत असतं. हाही एका परीनं पारंपरिक मजकूरव्यवस्थेला असलेला शह आहे.

यातून काय झाले?

एकीकडे पुरवठ्याची एककेंद्री अवस्था संपली. तर दुसरीकडे मागणीवाल्यांना स्वतःच्या इच्छेनं हवा तो मजकूर, हवा तेव्हा वाचण्याचं वा पाहण्याचं स्वातंत्र्य उपलब्ध झालं. यातला बहुतांश मजकूर फुकट व लोकभाषांमध्ये होता. त्यामुळेच त्याचा जबर प्रसार झाला.

याबाबतची भारतातली सध्याची आकडेवारी अशी- वृत्तपत्रं दर महिन्याला ४२ कोटी लोकांपर्यंत पोचतात. वृत्तवाहिन्या साठ कोटी लोकांपर्यंत तर डिजिटल न्यूज ४५ कोटी लोकांपर्यंत पोचते. म्हणजे डिजिटलवाले आताच छापीलांच्या पुढे निघून गेले आहेत. शिवाय, ही ४५ कोटी ही संघटित व मान्यताप्राप्त फलाटांवरची गिनती आहे. म्हणजे टाइम्स, लोकसत्ता, प्रिंट, क्विंट, लल्लनटॉप इत्यादी. या पलीकडच्या

डिजिटल मजकूरकारितेची पोहोच कितीतरी अधिक असेल.

अमेरिका-युरोपमध्ये तर ही आकडेवारी छापीलला आणखीच मागे टाकणारी आहे. छापीलचं मरण सर्वांनी गृहीत धरलं आहे. उत्तरायणाची प्रतीक्षा आहे.

परंतु इथं थोडी गडबड आहे. छापील जाणार म्हणजे त्याच्यासोबत पारंपरिक मजकूर-विद्याही संपणार असा अनेकांचा समज आहे. इंटरनेटनं सर्वस्वी नवी कोरी मजकूरविद्या जन्माला घातली आहे असे खूप लोकांना वाटतं. पण ते खरं नाही.

छापीलचा इतिहास शंभर-दीडशे वर्षांचा आहे. साहजिकच इतक्या काळात पारंपरिक मजकूर-विद्येमध्ये उत्क्रांती होत गेली आहे. तिचे स्वतःचे नीतिनियम तयार झाले. उदाहरणार्थ, कोणत्याही प्रश्नाच्या सर्व बाजू देणं, न्यायालयीन प्रक्रियेत ढवळाढवळ न करणं, थिल्लरपणा, चावटपणा, अश्लीलपणा यांना शिरजोर होऊ न देणं इत्यादी. यामुळे तिला समाजात आजवर मोठी विश्वासार्हता व प्रतिष्ठा लाभली.

छापीलमध्ये मुख्यतः दोन गोष्टी सतत होत असतात. निदान तसं अपेक्षित असतं. एक म्हणजे, घटना-घडामोडीमध्ये योग्य तरतम करणं आणि दर चोवीस तासांनी त्यांचा पट लोकांपुढे मांडणं. ऑक्टोबर २००८ मधील गोष्ट आहे. राज ठाकरे यांना अटक करून मुंबईच्या कोर्टात हजर करण्यात आलं. वृत्तवाहिन्यांना दिवसरात्र तो विषय पुरला. दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रांनी मात्र तारतम्य राखलं. त्याच दिवशी भारताचं पहिलं चांद्रयान यशस्वीरीत्या उडालं होतं. त्याला नीट महत्त्व दिलं.

दुसरं म्हणजे, समाजाच्या चलनवलनाची गती आणि दर्जा यावर भाष्य करणं. ज्यातून व्यक्तीला समाजाचं चित्र कळतं.

सध्या डिजिटल माध्यमांमध्ये क्युरेटेड कन्टेंट किंवा पाखडलेला मजकूर अशा संकल्पनेचा फार बोलबाला आहे.

एखाद्या विषयासंबंधी विविध ठिकाणी उपलब्ध तपशील आवश्यक तिथे टिप्पणी जोडून एकत्रित करणं म्हणजे पाखडलेला मजकूर.

नेटवर शोधा. तालिबानचं भवितव्य काय इथपासून ते फेसबुकवर मजकूर प्रसिद्ध करण्याची योग्य वेळ कोणती इथपर्यंत असंख्य विषयांवर पाखडलेला मजकूर हाती लागेल.

छापील माध्यमांचं वैशिष्ट्य हेच आहे की तिथं पूर्ण चोवीस तासातील घटितं पाखडून मिळतात. रोज. पारंपरिक मजकूर-विद्या ती हीच. लोकशाही समाजव्यवहारात तिनं आपली एक भूमिका तयार केली आहे. ती एकाएकी नाहीशी होऊ शकत नाही.

वृत्तपत्राचं पहिलं पान आपण उघडतो. त्यात विविध बातम्या आपापल्या वजनानुसार स्थानापन्न झालेल्या असतात. संपादकांच्या अनुभवी आडाख्यामधून ही रचना रोज सिद्ध होत असते. एका नजरेत त्या पानाकडे पाहून तुम्हाला एका दिवसाचा आवाका येतो. त्यातील बातम्याकथनाची शैली साधी, थेट असते. फसवी नसते.

याउलट सध्याची कोणतीही लोकप्रिय वृत्तस्थळं घ्या. त्यांच्यावर बातम्या सतत वाहत असतात. नवीन घडामोड सतत जुनीला मागे टाकत राहते. ३७० वं कलम रद्द केल्याच्या दिवशी दुपारी समजा क्रिकेट सामना जिंकला तर काश्मीरची बातमी मागे पडते.

ही स्थळं सर्व प्रकारच्या बातम्या देतात. त्यासाठी वेगवेगळे विभागही असतात. पण वाटेत अनेक विचलित करणाऱ्या गोष्टी येत राहतात. काय म्हणाले राहुल गांधी किंवा परमबीरसिंग लंडनहूनही पळाले? अशासारखे भलतीकडेच ओढून घेणारे चकवे येतात. किंवा दीपिकाच्या नव्या सिनेमाचा टीझर येतो. त्यावरून एक रस्ता दीपिकाच्या जुन्या बातम्यांकडे जातो.

यादी कितीही वाढवता येईल. ही वृत्तस्थळं सतत अधिकाधिक आत ओढत नेऊ पाहतात. जास्त काळ गुंतवून ठेवणं हाच त्यांच्या मजकूरमांडणीचा हेतू उरतो. समग्र चित्र देणं साधत नाही.

छापील हा काही काळ थबकून आढावा घेण्याचा प्रकार आहे. या वृत्तस्थळांमध्ये अशा ठहरावाला सध्या तरी जागा नाही. पण छापीलची जागा घ्यायची असेल तर त्याला पर्याय नाही. त्यासाठी पारंपरिक मजकूर विद्येकडूनच काही शिकावं लागेल. हे खरं की वृत्तस्थळं अजून प्राथमिक टप्प्यात आहेत. ती प्रयोग करताहेत. ते या दिशेनं जातील.

शक्यता अशी आहे, की वाचक-प्रेक्षकांनाही ही गरज जाणवेल. ते अशा गंभीर प्रयोगांना पाठिंबा देतील.

**चित्र – तीन**

वरील दोन्ही चित्रं एकाच ठिकाणी एकाच काळात अस्तित्वात राहतील.

याखेरीजही विविध प्रकारची चित्रं असू शकतील. त्यातून विखुरलेले असंख्य छोटे प्रयोग होतील. जे आज होताहेत. पारी, दलित कॅमेरा, दलित दस्तक, इंडी जर्नल ही काही उदाहरणं सांगता येतील. मध्यमवर्गीय गुंतवणूकदारांसाठी सुचेता दलालांच्या मनीलाईफचं काम याच स्वरूपाचं आहे.

पुढे जाऊन या सर्वांचं काय होणार हा कळीचा मुद्दा आहे.

यातल्या बहुसंख्य वृत्तस्थळांना जाहिराती मिळत नाहीत.

न्यूजलॉन्ड्रीसारखी काही वृत्तस्थळं तर आम्ही जाहिराती घेणार नाही, तुम्ही वर्गणी द्या किंवा देणगी द्या असे म्हणतात. इतरांचीही हीच अपेक्षा असते. मजकूर महत्त्वाचा वाटत असेल तर त्यासाठीचा खर्च वाचक-प्रेक्षकांनी उचललाच पाहिजे असं सांगितलं जाते. तत्त्वतः ते रास्त आहे. पण व्यवहारतः ते कितपत शक्य आहे याचाही विचार करायला हवा. अशा प्रकारे प्रत्येक मजकूर खरेदी करायचा किंवा देणग्या द्यायच्या तर महिन्याला हजारो रुपये लागू शकतील. हे बहुतांश लोकांच्या खिशाबाहेरचं ठरू शकेल.

केवळ बडे, भांडवलवाले मजकूरदारच यात टिकाव धरू शकतील, असं सूचित करणारी ही स्थिती आहे. कदाचित देशात एक किंवा दोनच बडे मजकूरदार शिल्लक उरतील असंही घडू शकेल. किंवा, लोकसत्ता किंवा एनडीटीव्ही आपल्याला केवळ ॲमेझॉन किंवा नेटफ्लिक्सवरच पाहता येईल असंही घडेल.

काहीही असो. पंधरा-वीस वर्षांनंतरचा मीडिया गेल्या शंभर वर्षांसारखा नसेल.

**– राजेंद्र साठे**

भ्रमणध्वनी : ७०४५१५४३५४

satherajendra@gmail.com





कोविड १९ काळात हा खर्च आणखी घटवायची नामी संधी लाखो घरांत स्वत: चालत आली. दीड वर्ष लोटले. अजूनही वृत्तपत्रे त्या घरात जात नाहीत. त्याचे मुख्य कारण फुकट मिळणाऱ्या बातम्या! मोबाइलच्या दरमहा खर्चासोबत वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या, स्वतंत्र बातम्यांचे स्रोत आदी बिनखर्चात मिळत असताना कोण कागदावर खर्च करील? रद्दीचे तरी होतील किती? त्यामुळे वाचक मोफतवार्तांचा ग्राहक झाला असून तो या फुकटेपणातच खुश आहे.

# कागद, काच, कचरा वेचणारे / वाचणारे

**जयदेव डोळे**

गेली दोनतीन वर्षे भीती वाटते तरुणतरुणींना पत्रकारितेत या असे सांगण्याची. कोरोनाने पत्रकारितेचे कंबरडे मोडले असेही खोटे सांगायची सोय नाही. कारण त्याआधी बरीच वर्षे पत्रकारिता 'डाएट'वर जगू लागली होती. आपली चरबी एकाएकी वाढल्याचा तिला भासू होऊ लागला. साधारण २००८ पासून अमेरिकेची अर्थव्यवस्था ढासळू लागली. तिची लागण भारतातही झाली. अमेरिकेत हजारो वृत्तपत्रे बंद पडली. तेवढेच पत्रकार बेकार झाले. कित्येक पत्रकार अर्धवेळ अन् अर्धपगारी राबू लागले. स्वेच्छानिवृत्ती, बदलते तंत्रज्ञान आणि तरुण वाचक डोळ्यांपुढे ठेवून भराभरा कपात सुरू झाली. म्हणून गेले दीड वर्षच साऱ्या कपातींच्या मागे आहे हा प्रचार झाला. मालकांचा तो कांगावा होय. मुंबईत तर कोविड येण्याआधीच वृत्तपत्रे बंद करणे आरंभले होते. माझे बरेच विद्यार्थी रस्त्यावर आले. काहींचे फोन आले, काय करू आता पुढे? कसे होणार आमचे, असं सांगून सल्ले मागणारे. काय सांगणार होतो त्यांना? थोडासा अंदाज आला होता म्हणून मीच १९९६ साली मराठी दैनिकाची पत्रकारिता सोडून देऊन अध्यापन पत्करले होते. परंतु तेव्हाचा बदल तंत्रज्ञान, बाजार अन् कामगारकपात यावर उभा होता. कायदेही मालकांना अनुकूल केले जाऊ लागले म्हटल्यावर न्यायाचा संबंधच तुटला. श्रमिक पत्रकार कायदा उपेक्षिला जाऊ लागला. प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाची स्थिती आधीच बिनदातांचा वाघ अशी केली गेलेली. मालक आणि त्यांचे पित्ते संपादक संसदेत बसू लागले. सत्तेत वाटा घेऊ लागले. पत्रकारितेसह खाणी, बांधकाम, टीव्ही, वीज, वाहतूक, चित्रपट, हॉटेल, बँक, संगीत, पर्यटन अशा उद्योगधंद्यांत मालक पैसा खेळवू लागले. जितकी कमाई वाढत चालली तितकी त्यांची पत्रकारिता फिकट पडू लागली. नव्या सहस्रकाचे पहिले दशक असे स्वार्थ अन् सत्ता यांच्या जोडीला शिकारीचे व वास्तवविकृत करण्याचे कौशल्य मालकांनी आत्मसात केले. भ्रष्टाचार, बदनामी, चारित्र्यहनन, असत्य कथन आणि दबाव यांचा यथेच्छ धुरळा उडवून मालकांनी सत्तापरिवर्तनाची नशा केली. त्याच सुमारास दूरच्या काही देशांत राजकीय सत्तापालट करण्यात नव्या, पर्यायी माध्यमांनी मोठीच कामगिरी बजावली होती. ट्विटर, यूट्यूब, फेसबुक, ऑर्कुट यांनी ट्युनिशिया, लिबिया, सीरिया, इराक आदी देशांत अरब स्प्रिंग अर्थात क्रांतीचा वसंतोत्सव घडवला. व्हॉट्सॲप हे क्रांतीचे एक नवे हत्यार म्हणून बाजारात फैलावले. फेसबुकही क्रांतीचा मंच म्हणून प्रसिद्ध पावेल. सोशल मीडिया असे संदिग्ध नाव मिरवत हे मंच लोकांच्या खिशांत मोबाइल फोनमार्फत कायमचे खिळले. कित्येक क्रांत्यांच्या प्रेरणास्थानी राहिलेली वृत्तपत्रे या नव्या चपळ, चतुर अन् चक्षुप्रिय 'माध्यमां'मुळे बावरली. गडबडली. गळाठली.

आता ‘वृत्तपत्रविद्या’ विभागाचे काम काय असा प्रश्न पडला मला. एकेकाळी राजकारण, अर्थकारण व समाजकारण यांच्या केंद्रस्थानी असलेले वृत्तपत्रच आपल्या अस्तित्वाविषयी साशंक होऊ लागले तर काय करायचे? त्यात मालकांचा कागदावरचा विश्वास उडून काचेच्या माध्यमावर जाऊन बसू लागला. कोविडकाळात वृत्तपत्रांचे वितरण मोजकेच दिवस थांबवलेले होते. पण संसर्गाच्या भयाने ते पूर्वपदावर काही येऊ शकले नाही. लाखो मध्यमवर्गीय घरात आता वृत्तपत्र येत–जात नाही. मोबाइल अथवा टॅब, लॅपटॉप, डेस्कटॉप यांवर सारे वृत्तपत्र वाचत आहेत. कागदाचा काहीही संबंध नसलेले वृत्तपत्र मलातरी कसेसेच वाटते. पण तंत्रज्ञानाची प्रगती सारे काही उलटपालट करत असताना वृत्तपत्रे त्यापासून दूर कशी पळणार? आता डॉक्टरमंडळी दूरवरून शस्त्रक्रिया वगैरे करू लागली, माणसांचे दु:ख पळवू लागली तिथे वृत्तपत्रांची काय वाट? पण हे कसे झाले ते सांगायला पाहिजे. प्रदीप्तो सेनगुप्त नामक प्रसिद्ध मेंडोलिन वादक विविध भारतीवर म्हणाले की आजकाल बासरी, सतार, मेंडोलिन, रबाब इत्यादी वाद्ये तरुण पिढी शिकत नाही. उपकरणात सिंथेसायझर या इलेक्ट्रॉनिक उपकरणात ती सारी असतात. की–बोर्डवर बोटे फिरवली की झाले! पण मूळ वाद्याचा आवाज व अनुभव जसा हवा तसा की बोर्डमुळे कसा येईल? तसे हे काचेवरच्या वृत्तपत्रांचे झाले. वेळ भागली ना, बातमी कळली ना.... ती कशी मिळते याच्याशी काही मतलब नाही. चित्रपटगृहे बंद झाली म्हणून चित्रपट थोडेच प्रदर्शन थांबवून बसले? ओटीटी मंचावर ते झळकले. मग तो पडदा सेलफोनचा असो की लॅपटॉपचा. माणूस पर्याय शोधतोच. विज्ञानाची घोडदौड कोण अडवू शकेल? जुन्याला जो कवटाळून बसतो तो मूर्ख, नाहीतर अडाणी!




असेच काहीसे विवेचन करणारे एक पुस्तक कॅनडात प्रकाशित झाले आहे. २०२० सालचे हे पुस्तक आंद्रे मिर या लेखकाचे असून त्याचे नाव ‘पोस्टजर्नालिझम ॲण्ड द डेथ ऑफ न्यूजपेपर्स’ असे आहे. एक उपशीर्षकही त्याला आहे : ‘द मीडिया आफ्टर ट्रम्प : मॅन्युफॅक्चरिंग अँगर ॲण्ड पोलरायझेशन!’ लेखक म्हणतो की जगात सध्या दोन पिढ्या जगतात. एकीचे नाव डिजिटल नेटिव्ह तर दुसरीचे डिजिटलमायग्रंट. साधारण १९९५ नंतर जन्मलेली माणसे डिजिटलचे मूळ निवासी. त्या आधीचे सारे डिजिटल स्थलांतरित. मूलनिवासी मंडळींना सारे ज्ञान, माहिती, मनोरंजन आदी संगणकाद्वारे मिळते. कागदाचा अन् यांचा संबंध थोडकाच. वृत्तपत्र वाचून तर क्वचित. हे लोक वृत्तपत्रांचा अंत पाहणार. २०३५ पर्यंत वृत्तपत्र केवळ चैन म्हणून वा महागडी सवय म्हणून वाचले जाईल. वृत्तपत्रांचा आधार डिजिटल स्थलांतरित आहेत. कारण त्यांचे विश्वच वृत्तपत्रांनी घडवलेले. पण ते लोक जसे संपत जातील तसे वृत्तपत्रही संपून जाईल.

आंद्रे मिर यांचे एक विश्लेषण पुस्तकाच्या उपशीर्षकात आहे. त्यांच्या दाव्यानुसार सोशल असो की जुनी, सारी प्रसारमाध्यमे ध्रुवीकरण करू लागली आहेत. ध्रुवीकरणानेच माध्यमे जायबंदी झालेली आहेत. मुख्य म्हणजे व्यवसायात यश मिळवण्यासाठी ध्रुवीकरण गरजेचे बनले आहे. पर्यायी माध्यमांचा उदय व ध्रुवीकरण एकाच वेळचे. सोशल मीडिया अर्थात समुदाय माध्यमे लोकांना लेखक बनवू लागली. त्यांचे थेट प्रतिनिधित्व त्यामधून होऊ लागल्याने प्रस्थापित माध्यमांचे महत्त्व घटले. दोहोंच्या स्पर्धेत राजकीय ध्रुवीकरण होत गेले. जुनी माध्यमे गेल्या १०–१५ वर्षांत जाहिरातदार व वाचक यांना गमावत गेली. वाचकांच्या वर्गणीपेक्षा अधिक तोटा जाहिराती समुदाय माध्यमांकडे पळाल्याने झाला. आता वेळ अशी आली आहे की वृत्तपत्रे बातम्यांसाठी नव्हे, तर त्यांची खात्री पटवण्यासाठी वाचली जातात. वाचक वृत्तपत्रे विकत घेतात ती आधी त्यांना समजलेले वृत्त योग्य, साधार आहे ना हे पडताळायला. म्हणून आज वृत्तपत्रे परोपकार, दयाबुद्धी यांतून आणि सदस्यत्वांमधून पैसा मिळवतात. एखादा सामाजिक मुद्दा हाती घेऊन वृत्तपत्रे एखाद्या आस्थापनेमार्फत उत्पन्न मिळवू लागली की पत्रकार तोच मुद्दा गिरवत राहून अन्य व्यापक मुद्दे वगळत राहतात. यामुळे वार्ताकक्षाची स्वायत्तता आस्थापनेच्या खाली जाते. सदस्यत्वामधून जो पैसा मिळेल तो वाचकाला वृत्तपत्रापेक्षा त्या सामाजिक मुद्याच्या सोडवणुकीसाठी जणू खर्चायला सुचवले जाते. अशा प्रकारे पैसा देणारे लोक वाचक म्हणून उरत नाहीत. बातम्यांसाठी ते कुठे पैसे देतात? त्या तर त्यांना आधीच कळालेल्या असतात. बातम्या इतरांना सम जाव्यात म्हणून ते पैसे देतात. सदस्यत्वाच्या अशा आधारामुळे वृत्तपत्र ठरावीक विषय हाताळत राहते. परिणामत: वार्ताकक्ष वृत्तमूल्यांवर नव्हे, तर सामाजिक मूल्यांवर चालू लागले. मग पत्रकारिता हळूहळू आपले स्वरूप समूहनिधीवरच्या प्रचारात पालटवते. ते रूप म्हणजे पोस्टजर्नालिझम अर्थात उत्तरपत्रकारिता.

मिर यांचे हे विवेचन आपल्या मराठीत जसेच्या तसे अनुभवाला आले. ग्रंथाली प्रकाशनाच्या ‘शब्द रुची’ मासिकाच्या ऑगस्ट म हिन्याच्या अंकात अशोक पानवलकर यांचा लेख म्हणजे त्यांचा नमुना.

आंद्रे मिर पुढे काय म्हणतात ते पाहू : ‘‘राजकीयीकरणाचा संसर्ग जसजसा वाढत चालला तसा वाचकांपेक्षा एखाद्या विचारांचा सदस्य वा पाठीराखा म्हणून आपला वर्गणीदार वाढवणे वृत्तपत्रांना जमले. आपण एका महान उद्दिष्टाला साथ देत आहोत असा वाचकांचा समज त्यांनी करवून दिला. त्यामुळे वृत्तपत्रे विकत घेणाऱ्यांचे दोन प्रकार पडत चालले. पहिला, त्या त्या माध्यमाची वृत्तसेवा म्हणून नव्हे, तर वृत्ताची पुष्टीसेवा म्हणून पैसे देणारा. दुसरा, अशा प्रकारे देणगी देऊन इतरांचे विचार प्रभावित करण्यासाठी ते माध्यम भाड्याने घेणारा. म्हणून दोन्ही प्रकारचे वाचक बातम्यांसाठी वृत्तपत्रे वाचतच नाहीत. तर त्यांचा प्रभाव पडावा यासाठी वाचतात. त्या माध्यमाचा

प्रभाव वाढावा यासाठी त्यांनी दिलेला तो एक प्रकारचा उत्तेजननिधीच. अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प यांच्या बाजूची व विरोधातली अशी विभागणी (ध्रुवीकरण) माध्यमांनी हेतुत: करताना ट्रम्प यांचे संपूर्ण वस्तुकरण करून टाकले. या 'ट्रम्पबम्प'मुळे न्यू यॉर्क टाइम्स, वॉशिंग्टन पोस्ट यांना फार फायदा झाला. फॉक्स न्यूज, सीएनएन, एमएसएनबीसी यांनाही. ट्रम्पवादाच्या माध्यमांच्या वार्तांकनामुळे माध्यमांचे बहुपदरी असंतुलित असे ध्रुवीकरण झाले. ट्रम्प यांच्यापुरतीच या माध्यमांची वृत्ती विभाजित झाली असे नाही तर युकेमध्ये जॉन्सन व ब्रेक्झिट, ब्राझीलमध्ये जेर बोल्सोनारो, एएफडी जर्मनीत; स्कॉट मॉरीसन ऑस्ट्रेलियात; नरेंद्र मोदी भारतात; व्हिक्टर ओर्बान हंगेरीत; पोलंडचे आंद्रेज इदा अशा अनेकांबाबत ती झाली. माध्यमांमधील ही अशी फाळणी एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात इंटरनेट व समुदाय माध्यमांनी आरंभली.''

उघड आहे, लोकांना असे पक्षपाती वृत्तपत्र नकोच होते, पण निमित्त सापडत नव्हते. कोविड १९चा काळ या बहिष्काराला अथवा नकाराला असा धावून आला. एक तर संसर्गाची अफवा. दोन, राजकीय संसर्ग झाल्याने 'वाचण्यासारखं काही नसतं हो पेपरात' अशी रोजची प्रतिक्रिया. त्यात गेल्या काही वर्षांत वृत्तवाहिन्यासुद्धा मोदींच्या आणि भाजप, संघ यांच्या बटिक बनल्या. त्यामुळे 'काही तरी चुकल्यासारखं वाटतंय' असा त्यांच्या प्रेक्षकांचा अनुभव. वाहिन्यांमध्ये भरपूर कपात झालेली- मनुष्यबळ, आर्थिक, स्थावर जंगम मालमत्ता आणि सहिष्णुता व संयम यांची. त्यामुळे व्हाट्सॲप, ट्विटर अथवा अन्य समुदाय माध्यमांचे ग्राहक त्यांना हवे ते किंवा त्यांना दिले जाईल ते वाचत-पाहत होते. एकेकाळी वृत्तपत्रांच्या जाहिराती टीव्ही देत असे. २०१४ पासून हळूहळू दोन्ही माध्यमे खालावत गेली.

**घटना माहीत झाली एवढ्यावरच समाधान मानणे फार धोक्याचे. कारण संदर्भ, इतिहास, कारणे आदी बाजू चार ओळींच्या नोंदीत मावत नसतात. पण आता कवितांच्या चारोळीनंतर मराठी वाचक बातम्यांच्या चारोळी, चवीने चघळू लागला आहे. लोकशाहीतला मतदार नागरिक असा अर्धवट अन् एकतर्फी माहितीवर जगू लागला तर ती लोकशाही फार काळ जगणार नाही हे ठरलेले.**

मग खरोखर इंटरनेटने त्यांचा धंदा बुडवला काय? नाही. मुद्रित माध्यमाचा बाजार उठण्याची काही ठोस कारणे 'सोशल मीडिया इज बुलशिट' या पुस्तकात दिली आहेत. लेखक बी.जे. मेंडेलसन म्हणतात, की ११ सप्टेंबर २००१चा हल्ला आर्थिक मंदीला कारण ठरला. आणि इराक युद्धाच्या पहिल्या वर्षापर्यंत ती टिकली. २००८ नंतर मोठी मंदी पसरली. माध्यमांच्या मालकांनी एकत्रीकरण, विलीनीकरण सुरू केले. त्यामुळे अनेक पदे काढून टाकण्यात आली. भागधारकांचा नफा अशा प्रकारे वाढवला गेला. या पदांची कपात आणि वार्तांकनात घसरती गुणवत्ता एकाच वेळी झाली. सबब, असम ाधानी वाचक ऑनलाईन माध्यमांकडे वळले. वृत्तपत्रांचा आकार, पाने, आशय यात हास्यास्पद अशी घट आढळू लागली. नव्या गोष्टी शोधणे थांबले. छोट्या जाहिराती अन्यत्र पळाल्या. वाढलेल्या वयाचा वाचक हे एक कारण. शेवटी, जो श्रीमंत वर्ग वृत्तपत्रे वाचत असे आणि त्याच्यासाठी ज्या जाहिराती दिल्या जायच्या त्या साऱ्या नव्या तंत्रज्ञानाच्या माध्यमांनी खेचल्या.

वृत्तपत्रे व राजकारण यांचा अजूनही दाट संबंध आहे, हे आपण पाहिले. पण वृत्तपत्रांच्या मालकांनी अन्य उद्योगधंद्यांत जसा पैसा गुंतवला तसा तो इलेक्ट्रॉनिक माध्यमातही गुंतवला. आपला इ-अवतार त्यांनी वाढवला. रोज फेसबुक, ट्विटर आदी मंचांवर त्यांनीच बातम्या सर्वात आधी देऊ करण्याची स्पर्धा सुरू केली. मालकांची दुसरी-तिसरी पिढी आपल्या वृत्तपत्रांचे स्वरूप बदलण्याची खटपट करत असतानाच तंत्रज्ञानात झालेले बदल त्यांना भावले. खर्चात कपात म्हणून किंवा आता क्षणार्धात जगातली माहिती कुठेही कळते म्हणून त्यांनी परदेशी वार्ताहर, राजधान्यांतले वार्ताहर, प्रवासाचे भत्ते यात प्रचंड कपात केली. शोधवार्ता तर खूप वेळखाऊ व खर्चीक असतात या समजूतीतून त्यांनी त्या बंदच केल्या. त्यानंतर त्यांनी गुंतागुंतीचे विषय सोपे करण्यावर भर दिला. भावनिक व सनसनाटी बाजूच मांडायची सक्ती केली. अग्रलेख इतके आखूड केले की संपादक नामक पद खुजे केल्याचे लक्षात येऊ लागले. झाले! या साऱ्यांचा परिणाम वृत्तपत्राची वाचनीयता घटण्यात झाला तसा वाचकांच्या संख्येतही झाला. वाचकांचीही तपासणी करायला हवी. बव्हंशी मराठी वाचक वाचनसाहित्यावरचा खर्च कमीत कमी कसा होईल याची फार खटपट करतो. अत्यंत सुस्थिर व सुशिक्षित घरात एकच वृत्तपत्र ते घेत असल्याचे मी पाहतो. जणू ते एकमात्र संपूर्ण ज्ञान व माहिती देते. त्यात कोविड १९ काळात हा खर्च आणखी घटवायची नामी संधी लाखो घरांत स्वत: चालत आली. दीड वर्ष लोटले. अजूनही वृत्तपत्रे त्या घरात जात नाहीत. त्याचे मुख्य कारण फुकट मिळणाऱ्या बातम्या! मोबाइलच्या दरमहा खर्चासोबत वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या, स्वतंत्र बातम्यांचे स्रोत आदी बिनखर्चात मिळत असताना कोण कागदावर खर्च करील? रद्दीचे तरी होतील किती? त्यामुळे वाचक मोफतवार्तांचा ग्राहक झाला असून तो या फुकटेपणातच खुश आहे. वेळ असेल तेव्हा बातम्या समोर हजर करण्याची सवय त्याने लावून घेतली. घटना माहीत झाली एवढ्यावरच समाधान मानणे फार धोक्याचे. कारण संदर्भ, इतिहास, कारणे आदी बाजू चार ओळींच्या नोंदीत मावत नसतात. पण आता कवितांच्या चारोळीनंतर मराठी वाचक बातम्यांच्या चारोळी, चवीने चघळू लागला आहे. लोकशाहीतला मतदार नागरिक असा अर्धवट अन् एकतर्फी माहितीवर जगू लागला तर ती लोकशाही फार काळ जगणार नाही हे ठरलेले. एकीकडे आजची माहितीआधारित अर्थव्यवस्था अन् दुसरीकडे असे अर्धकच्चे माहीतगार म्हटल्यावर सारी राजकीय अर्थव्यवस्था कोलमडलीच समजा.

तरुण पिढी तर इतकी बेपर्वा, बेछूट व आत्ममुग्ध की एखादे इलेक्ट्रॉनिक उपकरण हाताळता येणे हाच मोठा ज्ञानसाठा आहे असे समजू लागली आहे. तिच्यापर्यंत जी वार्ता येते ती साभिप्राय येते. मतांसमवेत येते. त्यामुळे या पिढीला स्वत:चे निरीक्षण, विश्लेषण करण्याची गरज भासेनाशी झाली आहे. असा तयार मालमसाला

भारताचे लोकशाही स्वातंत्र्य आपणहून खतम करणार. या तरुण-वयस्क वाचकांना सकाळी सकाळी वाईट वाटेल असे काही न देण्याचा विचारही वृत्तपत्रे करतात. 'दिव्य मराठी' नामक दैनिक दर सोमवारी विधायक वार्ता देते. नंतरच्या दिवशी मृतदेह, जखमी यांची छायाचित्रे देऊन भरपाई करते. मात्र तेच नव्हे, तर जवळपास सर्व दैनिके गरिबी, महागाई, बेकारी, विषमता, शोषण, पिळवणूक, अन्याय यांच्या बातम्या आवर्जून स्वत:हून फार कमी वेळा देतात. येथे पुन्हा ध्रुवीकरणाचा संबंध. मोदीविरोधक असोत की मोदीनिष्ठ सारे माध्यमचालक राजकारणविषयक वृत्ते देऊन आपली बाजू ठळक करीत जातात. मात्र त्याचवेळी महत्त्वाच्या घडामोडी वगळतात. कमी शब्दांत, कमी जागेत, धावत्या शैलीत बातम्या देऊन फक्त घटना महत्त्वाची असे ठसवतात. त्या मागच्या प्रक्रिया, प्रेरणा यांच्याकडे दुर्लक्ष करायला लावतात. चटपटीत, खमंग, चमचमीत रूप देऊन एकंदरीतच बातम्या प्रेक्षणीय व मनोरंजनात्मक करून ठेवतात. त्यामुळे गांभीर्य फक्त बातम्यांपुरतेच नष्ट होत नाही तर अवतीभोवतीच्या साऱ्या घटना गांभीर्यशून्य वाटू लागतात. आजची तरुण पिढी वृत्तपत्रे न वाचण्याचे हे एक मोठे कारण आहे. समज वाढायच्या वयात राजकारण व लोकशाही प्रक्रिया यांची खबर जर गमतीजमतीत त्यांच्यासाठी मांडली जात असेल तर त्यात त्यांचा काय दोष? मग टिंगल, थट्टा, मजा असे त्यांकडे पाहता पाहता ही पिढी बेअक्कल, मूर्ख, भ्रष्ट, राडेबाज, जातीयवादी असे ठरवत सबंध राजकारण फजूल व बिनकामाचे म्हणत राहते. अशा मुलामुलींना मग मोदी, संघ यांची राष्ट्रभक्ती, देशसेवा यांची भंकसही आवडायला लागते. भाजपसुद्धा तितकाच भ्रष्ट, जातीयवादी, लबाड आणि नालायक आहे यावर ते विश्वास ठेवत नाहीत. राजकारण तेच, मात्र दृष्टिकोनात फरक पडला. त्याचे कारण राजकारण सादर करण्याची पद्धत. माध्यमे वापरून प्रभाव निर्माण करण्याची धाटणी बदलली. आज संघ-भाजप यांचा कमालीचा वचक आणि दहशत माध्यमांवर आहे ती यासाठी. नीट बघितल्यास कधीही मोदी, शाह, भागवत, संघ यांच्याविषयी प्रस्थापित वृत्तपत्रांतून टिंगल, मस्करी, विडंबन, विनोद छापून येत नाही, हे आढळेल. ज्यांनी कठोर टिंगल अथवा लागट भाष्य केले त्यांच्यावर थेट राष्ट्रदोहाचा गुन्हा चिकटवण्यात आला. सत्तेविरुद्ध काहीही प्रसिद्ध होऊ नये असा दंडक वर्तमानकाळाचा आहे. तो बहुतांश माध्यमे पाळतात.

पाळण्याचे कारण सत्ताधाऱ्यांनी पत्रकारांचा प्रश्न विचारायचा अधिकारच न जुमानण्याचे ठरवले हे आहे. सरकारी जाहिराती नाकारणे, बंद करणे, मुद्दाम स्पर्धक वृत्तपत्रास देत राहणे असे कावे सत्ताधारी करतात. तेवढेच कशाला, प्रश्न विचारणाऱ्याला, खोदून खोदून माहिती काढणाऱ्याला सर्व सरकारी कार्यक्रम व सेवा यांपासून दूर ठेवणे, त्याला/तिला टाळत राहाणे, एकाकी पाडणे असेही डावपेच सरकार व त्याचे हस्तक करत राहतात. शरण या, अन्यथा भोगा, असा यामागचा संदेश. अशा 'उपद्रवी' व 'त्रासदायक' पत्रकारांना मालकही वगळू लागतात. त्यांचे राजकारण-अर्थकारण बिघडते म्हणून. या सर्वांचा परिणाम पत्रकार अखेर गुमान, मुकाट बातमीदारी करू लागतात. माहितीच्या प्रवाहासह वाहू लागतात.

याचा अत्यंत मोठा दुष्परिणाम वार्तांकनावर होतो आणि त्यामुळेही वाचक रोडावतो. बव्हंशी बातम्या जनसंपर्कासारख्या (पब्लिक रिलेशन्ससम) होत जातात. राजकीय वार्तांच्या पेरण्या व्हायला लागतात. प्रतिवाद, शंका, संशय, चिकित्सा, खातरजमा यांना वावच ठेवला जात नाही. पूर्णपणे एकांगी, एकतर्फी व एकेरी वार्ता छापल्या जातात. वाचक त्या पक्षाचा अथवा सरकारचा समर्थक असेल तर त्याची भूमिका आणखी बळकट करण्याचे कार्य अशी पत्रकारिता पार पाडते. आपण आपल्या पाठीराख्यांसाठीच पत्रकारिता करत असल्याचे त्याचे ग्रह पक्के होतात. पत्रकारिता जनसंपर्क अभियानात पालटते. देश-सरकार-पक्ष यांच्यात आताच्या सत्ताधाऱ्यांनी काही फरकच न ठेवल्याने पक्षाच्या जाहिरातीही आता प्रचंड पैसा देणाऱ्या असतात. त्या आपल्यालाही मिळाव्यात असा प्रत्येक वृत्तपत्राचा प्रयत्न त्याला भाजपापुढे लोटांगण घालायला लावतो. मग काय, पत्रकार पूर्णवेळ प्रचारक होऊन जायला वेळ लागत नाही.

**भारतीय वृत्तपत्रे संविधानातल्या मूल्यांवर उभी व त्यानुसार काम करणारी आहेत. लोकशाही, प्रजासत्ताक, धर्मनिरपेक्षता, समाजवाद समता, बंधुता, स्वातंत्र्य, सामाजिक न्याय ही काय डाव्यांची मालमत्ता आहे? ही तत्त्वे तर आपण सर्वांनी स्वीकारलेल्या संविधानातली आहेत. पण आजचे केंद्र सरकार जाणीवपूर्वक या तत्त्वांचा अधिक्षेप, अप्रतिष्ठा, उपेक्षा, विपर्यास करत असताना पत्रकारिता त्यात आलीच. म्हणून आपल्या समाजात वृत्तपत्रांचे महत्त्व ओसरणे संविधानिक मूल्यांचे समाजातून नाहीसे होत जाणे आहे असे मी मानतो.**

पत्रकारिता व जनसंपर्क यांत मिटत चाललेले अंतर गेल्या दशकापासून दिसू लागले. त्यावर जागरूक पत्रकार, कार्यकर्ते, अभ्यासक यांनी पुस्तके लिहून लक्षही वेधले आहे. ज्युलिया हॉब्जबॉम यांनी 'व्हेअर द ट्रुथ लाईज' अशा नावाचे एक पुस्तक २०१० सालीच इंग्लंडमध्ये प्रकाशित केले. जनसंपर्क व पत्रकारिता यातला विश्वास व नैतिकता हा या पुस्तकाचा गाभा. तसे हे पुस्तक (लेखसंग्रह) २००६ साली बाजारात आले तेव्हा समुदाय मंचांनी घडवलेल्या उलथापालथी व्हायच्या होत्या. वृत्तपत्रेच लोकांच्या हाती असत. परंतु इंटरनेटने जे आभासी जग उभे केले त्यात वस्तुस्थिती व सत्य यांची पुरती वाट लागल्याचा अंदाज या संग्रहाच्या विविध तज्ज्ञांना आलेला होता. कारण थेट लक्ष्यापर्यंत पोचायची ताकद या तंत्रज्ञानापाशी होती. प्रसारकही व्यक्तिगणीक उगवले. असे सार्वभौम प्रसारक आपणच खरे सांगतो असा दावा आणि आविर्भाव दोन्ही करू लागले, की सत्य आणि अफवा यांतला गोंधळ वाढला म्हणून समजाच. ज्याच्या हाती मंच, त्याच्या हाती सत्य अशी नवी म्हणच रूढ व्हायला लागली. वृत्तपत्रांत छापलेली बातमी कशी चूक, खोटी, डावपेचात्मक, अफवा आहे असे खुलासे म्हणा की प्रतिदावे इंटरनेटवर मंचांनी सुरू केले. झाले! वृत्तपत्राच्या पत्रकारांनी मोठ्या मेहनतीने, कैक वेळा

पडताळून आणि जबाबदारीपूर्वक सोडलेली बातमी एका क्षणात बाद होऊ लागली. लोकांचा त्या वृत्तपत्रांवरील विश्वास उडून जावा असे वातावरण सहज तयार करता येऊ लागले. हा मंच व त्यांचे वापरकर्ते स्पष्टीकरण अथवा दुसरी बाजू सांगताना पत्रकारितेचे निकष पाळत होते का? छे! त्यांना कुठले आले नीतीनियम? परंतु त्यांनी सत्ताधाऱ्यांच्या साथीने असा काही धुराळा उडवून दिला की वास्तव दिसेनासे झाले. त्यावर धूळ उडाली. तशा काही चुका दैनिक वृत्तपत्रात नेहमीच घडतात. पण त्याचा खुलासा, दुरुस्ती, दिलगिरी वा अधिक माहिती त्यांनीच द्यावी अशी परंपरा. ती इंटरनेटमुळे पार उद्ध्वस्त झाली. कॉर्पोरेट चेअरमन, कंपन्यांचे मुख्याधिकारी, वकील व जनसंपर्क अधिकारी परस्पर आपली बाजू देऊ लागले. तसा त्यांचा दबाव वृत्तपत्रांवर येऊन त्यांनाही समज दिली जाऊ लागली. त्यामुळे आजचा काळ असा आला की सत्य कोठे आहे ते समजेनासे झाले आहे. अफवा, मिथके, उघडउघड खोटारडेपणा आणि पेरल्या गेलेल्या बतावण्या यांना आताच्या तत्काळ काचेवर उमटणाऱ्या अक्षरांमुळे अमरत्व प्राप्त होत आहे. वाचक शहानिशा न करता घाईने अशा आपल्यापर्यंत पोचणाऱ्या बाजूसच भुलतात आणि पर्सेप्शन अर्थात सत्य व वस्तुस्थिती यांचे भेदकारण यशस्वी होऊ देतात. लक्षात घ्या, बातमी चुकली अथवा एखादी वस्तुस्थिती निसटली तर राजीनाम्यापर्यंतची शिक्षा वृत्तपत्राच्या संपादकांना, बातमीदारांना होते. समुदाय मंचावरून काहीही फेकाफेककरून डोकी बिघडवणाऱ्यांच्या राजीनाम्याच्या बातम्या कधी वाचल्या? किंवा त्यांना काही शिक्षा झाल्याचे कानावर कधी पडले?

वृत्तपत्रांची समाजातली पत नाहीशी व्हावी यासाठी खूप प्रयत्न झाले. प्रतिस्पर्धी वृत्तपत्रे, जाहिरातदार, वाचक संघटना, सरकार अशा अनेकांचे स्वार्थ त्यात असत. त्याबद्दल 'न्यू यॉर्क टाइम्स'चा अनुभव वाचण्यासारखा आहे. डेव्हिड मॅकक्रॉ हे या दैनिकाचे डेप्युटी जनरल कौन्सल आहेत. त्यांनी 'ट्रुथ इन अवर टाइम्स' असे पुस्तक आहे. ते लिहितात, विश्वास गमावलेले वृत्तपत्र साखळदंडात अडकलेल्या वृत्तपत्रापेक्षा वेगळे नसते. स्वातंत्र्य कितीही असो, त्या वृत्तपत्रावर भरवसा नसेल तर सारे केरात. त्या वृत्तपत्राचे जनमत घडवण्याची ताकद त्याने घटते. गैरप्रकार, भ्रष्टाचार अथवा चुकीचे धोरण काहीही असो. सरकारला जबाबदार धरायचा त्याचा आवाज मग घुसमटतो. त्याला कोणी विचारत नाही... आम्हाला आवडो, न आवडो, ट्रम्प यांनी वृत्तपत्रांवर जे हल्ले केले त्यात त्यांनी काही मुद्दे बरोबर हेरले. अमेरिकेत त्यावेळी 'फेक न्यूज'ची समस्या बरीच बोकाळली होती. खरे तर दोन समस्या त्या. एक, खरोखर फेक-बनावट वार्ता. दिशाभूल व फाटाफूट व्हावी म्हणून हेतुत: समुदाय मंचांवरून पसरवून राजकीय विचारविश्व प्रदूषित करणाऱ्या. दोन, फेक फेक न्यूज म्हणजे खोट्या बनावट बातम्या. ट्रम्प सरकारच्या कारभारावर प्रश्न उपस्थित करणाऱ्या माध्यमसंस्थांची अप्रतिष्ठा व अनाधिकार व्हावा यासाठी केला जाणारा फेक न्यूज या विशेषणाचा जागर. राष्ट्राध्यक्षांचे थोडे बरोबर होते. टाइम्स, सीएनएन व अन्य प्रस्थापित माध्यमांकडून चुका जरूर झाल्या... त्याला कारणेही होती. विसरभोळेपणा, भलतेच वार्तास्रोत, गचाळ संपादन, निर्दोष बातमी देण्यातला आळस असे खूप काही जे चांगली बातमी देताना नजरेतून निसटते. मात्र त्यामागे हटकून विपर्यास कधीही नव्हता. मिनिटभर विचार केल्यावर पटले असते की या चुका जाणीवपूर्वक कोणी केल्या नसतात. त्या बातम्या जगजाहीर होत्या. त्यामुळे त्यांची जाहीर चिकित्सा अपरिहार्य होती. अगदी दुरुस्त्यासुद्धा तातडीने अगदी ठळकपणे करण्यात आल्या. मुद्दाम खोटारडेपणा करत पळ काढायला कोणी कसे तयार होईल... त्यामुळे राष्ट्रपतींचा बनावट बातमीचा दावाच एक बनाव होता.

ट्रम्प एका बाबतीत सफल झाले. फाळणीचे त्यांचे राजकारण देशात भिनले. ट्रम्पवादी विरुद्ध ट्रम्पविरोधी असे माध्यमांचे ध्रुवीकरण होऊन गेले. ते अजूनही टिकून आहे. भारतातही भाजप वि. विरोधक अशी वृत्तपत्रांची फाळणी झाली असून विरोधक जेमतेम बोटावर मोजण्याइतके उरले आहेत. पंतप्रधान मोदी सात वर्षांत पत्रकारांशी प्रश्नोत्तरे करत नाहीत याचा अर्थ ते पत्रकारितेला जुमानत नाहीत. भारतीय वृत्तपत्रे व त्यातले पत्रकार डावे असतात असा अजब आरोप संघ परिवार कायम करतो. भांडवलदारांच्या अन् खाजगी राजकीय नेत्यांच्या मालकीच्या वृत्तपत्रांत डावे, समाजवादी पत्रकार कसे असतील? कोणतेही वृत्तपत्र क्रांती करत नसते अन् करूही शकत नाही. परंतु पत्रकारांत फूट पडावी यासाठी असा भेद सतत जाहीर करत गेल्याने झालेही तसेच.

भारतीय वृत्तपत्रे संविधानातल्या मूल्यांवर उभी व त्यानुसार काम करणारी आहेत. लोकशाही, प्रजासत्ताक, धर्मनिरपेक्षता, समाजवाद समता, बंधुता, स्वातंत्र्य, सामाजिक न्याय ही काय डाव्यांची मालमत्ता आहे? ही तत्त्वे तर आपण सर्वांनी स्वीकारलेल्या संविधानातली आहेत. पण आजचे केंद्र सरकार जाणीवपूर्वक या तत्त्वांचा अधिक्षेप, अप्रतिष्ठा, उपेक्षा, विपर्यास करत असताना पत्रकारिता त्यात आलीच. म्हणून आपल्या समाजात वृत्तपत्रांचे महत्त्व ओसरणे संविधानिक मूल्यांचे समाजातून नाहीसे होत जाणे आहे असे मी मानतो. वृत्तपत्रांच्या मालकांना त्याची फिकीर नाही, ना पत्रकारांना. वाचक तर बेभान होऊन बसलेला. त्याला/तिला चेतवेल असे माध्यम म्हणजे हे इंटरनेटवरचे मंच. अत्यंत वैयक्तिक, बेछूट आणि अडाणी. त्यातूनच त्याला मजा आणि मनोरंजन करता येत असताना मेंदूचा अधिक ताण तो कशाला सहन करील?

अशा परिस्थितीत त्याच वृत्तपत्रांकडे ते सुधारतील म्हणून अपेक्षेने बघणे म्हणजे काँग्रेस पक्ष मोदींना हरवण्यात यशस्वी होईल असे मानण्यासारखे झाले. नाही तर पर्यायी मंच आहेतच. ते सुटे सुटे व विखुरलेले आहेत. आपण मात्र आपला वसा टाकायचा नाही.. कचऱ्यामधून काही मजबूत तयार करू!

**– जयदेव डोळे**

भ्रमणध्वनी : ७७५९०८२०९

djaidev1957@gmail.com




*तुम्ही दिवसाला किती जीबी डेटा वापरता आणि त्या डेटाचा वेग किती आहे यावर आता तुमचे अस्तित्वच जणू अवलंबून आहे. भारतातील तांत्रिक बदलांची सामान्य गती पाहता आपण सर्वार्थाने कलियुगातून' डेटा युगात' पोहोचायला आणखी बरीच वर्षे लागली असती, कोविडने तो प्रवास जलद गतीने करणे भाग पाडले.*

# कलियुगातून डेटायुगात

**श्रीकांत बोजेवार**

एका नैसर्गिक गतीने फिरत असलेल्या कालचक्राला कुणीतरी जोराचा धक्का द्यावा, त्या धक्क्याने अचानक त्याची गती वाढावी आणि पुढील काळात घडल्या असत्या अशा अनेक गोष्टी दोन वर्षांत घडून जाव्या असे जगभरात आणि विशेषतः भारतात घडल्याचे आपण पाहतो आहोत. कोविड१९च्या त्या धक्क्याने अनेक बाबतीत आपले जग फास्ट फॉरवर्ड होऊन किमान दशकभराने पुढे गेले आहे. या फास्ट फॉरवर्डचा कदाचित सर्वाधिक प्रभाव वृत्तपत्र, आकाशवाणी, नाटक, सिनेमा, दूरचित्रवाणी, ओटीटी आणि एकूणच माध्यमांवर पडला असावा. गरज ही केवळ शोधाचीच नव्हे तर वेगवान बदलांचीही जननी असते, हे जगाच्या लक्षात आले. ज्या वेगाने आपल्या समाजाने हे तांत्रिक बदल आत्मसात केले त्याला तोड नाही. वीज आल्यावर आपल्या जगण्यात जी मोठी क्रांती झाली त्याच तोडीची, किंबहुना त्याहूनही मोठी क्रांती त्याच विजेच्या खांद्यावर बसून इंटरनेटने आपल्या आयुष्यात घडवून आणली आहे.

'डेटा अर्थात माहिती, आकडेवारी आणि त्याचे विश्लेषण' हा कालच्या जगाचा मंत्र होता, तर 'डेटा' अर्थात 'विदा' अर्थात तुमच्या इंटरनेटची क्षमता हा आजच्या जगाचा मंत्र झालेला आहे. तुम्ही दिवसाला किती जीबी डेटा वापरता आणि त्या डेटाचा वेग किती आहे यावर आता तुमचे अस्तित्वच जणू अवलंबून आहे. भारतातील तांत्रिक बदलांची सामान्य गती पाहता आपण सर्वार्थाने कलियुगातून' डेटा युगात' पोहोचायला आणखी बरीच वर्षे लागली असती, कोविडने तो प्रवास जलद गतीने करणे भाग पाडले.

'घरोघरी मातीच्या चुलीं'वरून 'घरोघरी गॅस'पर्यंत आपण अजूनही शंभर टक्के पोचलेलो नाही, परंतु घरोघरी 'डेटा'पर्यंत मात्र बुलेट ट्रेनच्या गतीने पोचलो. बिचाऱ्या गरिबांघरी आता केवळ मोबाइलचा डेटा असतो तर मध्यमवर्गीयांच्या घरी मात्र वायफायची चैन असते. आणि वायफायची क्षमता किती जीबीची आहे यावरुनही आता तुम्ही निम्न मध्यमवर्गीय की उच्च मध्यमवर्गीय हे जोखले जाऊ शकते. 'हॉट स्पॉट'ची संस्कृती घरोघरी अजूनही पोचलेली नाही परंतु हॉटस्पॉट कसे वापरावे हे मात्र कुडाच्या झोपडीत राहणारांनाही कळते, कारण करोनाकाळात शिक्षणाची गंगाही इंटरनेटमधूनच वाहू लागली आहे. झूमकॉल, गुगलमीट आणि फेसबुक लाइव्हचा जन्म होऊन दशक लोटले असेल, परंतु 'आपण रात्री झूमवर बोलू' किंवा 'आमच्या पल्लूची एंगेजमेंट फेसबुकवर लाइव्ह दाखवणार आहोत, मी लिंक पाठवते तुम्हाला' हे संवाद घरोघरी परिचित झाले ते केवळ करोनाच्या रेट्याने जे तांत्रिक ज्ञान प्राप्त झाले, समाजात अचानक सर्व थरांत तंत्रसाक्षरता आली, त्यामुळेच.

माध्यमातील या क्रांतिकारी बदलांविषयी लिहिताना, मी प्रत्यक्ष, दररोजच्या जगण्यात ज्या माध्यमाशी निगडित आहे तेथूनच, म्हणजे वृत्तपत्रांपासूनच सुरुवात करू या. इंटरनेट नसते तर वृत्तपत्रांचे प्रकाशन किमान मुंबई-पुण्यात तरी आठ-दहा महिने पूर्ण बंदच ठेवावे लागले असते. या दोन वर्षांच्या काळात वृत्तपत्र तयार होण्यात एकही दिवस खंड पडला नाही हा केवळ चमत्कारच आहे. वृत्तपत्र काढणे हे एक सांघिक काम आहे. 'उद्याच्या' अंकाची पाने तयार होता होता वृत्तपत्राच्या कार्यालयात प्रचंड हलचल असते. चर्चा, संवाद, विचारविनिमय, प्रत्यक्ष पानावर बातम्यांची रचना करणाऱ्या

डिझायनरशी संवाद, बातम्या वाचून वार्ताहरांशी होणाऱ्या चर्चा असे सतत काहीतरी घडत असते. कोणीही प्रत्यक्ष एकमेकांच्या समोर नसतानाही ही सगळी प्रक्रिया नीट पार पडून दुसऱ्या दिवशीचा अंक आकाराला येऊ शकतो याची आम्ही कधी कल्पनाच केली नव्हती. कोरोना काळाने ती प्रत्यक्षात आणून दाखवली. मात्र हा केवळ निर्मितीप्रक्रियेचा भाग झाला. कोरोनाच्या काळात छापील माध्यमांच्या, विशेषतः वृत्तपत्रांच्या दृष्टीने काही सकारात्मक तर काही नकारात्मक गोष्टी घडल्या.

कोरोनाच्या काळात काही वाहिन्यांनी फार मोठ्या प्रमाणावर भडक, भीतिदायक चित्र उभे केले. प्रत्येक घटना भिंगातून दाखवावी तशी मोठी करून सांगितली जात होती. सोशल मीडियातून तर 'कोरोनाविषयक तथ्ये', 'कोरोना कसा टाळावा', 'काय औषधे घ्यावी' याविषयीचे एवढे विपुल अज्ञान पसरवले जात होते, की त्या अज्ञानाच्या अंधारात लोक भयभीत होऊन उभे होते. प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक ओळीसाठी उत्तरदायी असलेल्या जबाबदार वृत्तपत्रांनी या काळात अनेक डॉक्टरांना लिहिते करून हे समज-गैरसमज दूर करण्यात मोठी भूमिका बजावली. वृत्तपत्र माध्यमाच्या विश्वासार्हतेवर या काळात पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले. मात्र त्याचवेळी कागदामुळे कोरोना पसरतो या गैरसमजातून अनेकांनी वृत्तपत्रे घेणे बंद केले. वाहतूक समस्येमुळे वृत्तपत्र वितरणात अडथळे आल्याने काही काळ वृत्तपत्रांच्या छपाईचा आकडा मोठ्या प्रमाणावर खाली आला. दैनंदिन गरजेच्या वस्तूशिवाय कोणतीही खरेदी केली जात नव्हती त्यामुळे जाहिराती मिळणे बंद झाले. या सर्वाचा परिणाम होऊन वृत्तपत्र व्यवसायाचे आर्थिक गणित बिघडले. अनेक पत्रकारांच्या नोकऱ्या गेल्या. पगारात कपात झाली. वृत्तपत्रांव्यतिरिक्त अनेक मासिके, साप्ताहिके यांचा आर्थिक डोलारा तसाही अलिकडे फारच मर्यादित झालेला आहे. त्यांनी आपले अस्तित्व कायम रहावे म्हणून पीडीएफ अवतार धारण केले. वृत्तपत्रांनीही वाचकांच्या सोयीसाठी काही काळ मोफत पीडीएफ दिल्या. परिणामी परिस्थिती सुरळीत झाल्यावरही वाचक पीडीएफ मागू लागले. वृत्तपत्रांशिवाय काही दिवस काढल्यावर काहींना 'वृत्तपत्रे वाचली नाही तर काही बिघडत नाही' असा साक्षात्कार झाला. काहींना वृत्तपत्रवाचन बंद करण्यासाठी निमित्त मिळाले. सुदैवाने, कोरोना उताराला लागल्यावर वृत्तपत्रांचा ८०-८५ टक्के वाचक परतला. मात्र उरलेला पंधरा-वीस टक्के वाचक एवढ्यातच परतण्याची शक्यता कमी आहे. कदाचित तो परतणारही नाही.

या सर्व घुसळणीत वृत्तपत्रांच्या स्वरुपात, मजकूर देण्याच्या पद्धतीत दूरगामी असे बदल झालेले नाहीत. रोजच्या घडामोडी देणे ही आता तशीही वृत्तपत्रांची मक्तेदारी/जबाबदारी राहिलेली नाही, त्यामुळे होत असलेल्या बदलांची प्रक्रिया गेली काही वर्षे सुरूच आहे, त्याचा कोरोनाशी काही संबंध नाही.

मनोरंजनक्षेत्रात मात्र गेल्या दोन वर्षांत फार मोठी उलथापालथ झाली आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव संपल्यावर ज्याला आपण 'न्यू नॉर्मल' म्हणतो तशी परिस्थिती येईल तेंव्हा कदाचित, गेली अनेक दशके आपले मनोरंजन करणारी एकपडदा चित्रपटगृहे बहुधा नेहमीसाठी बंद झालेली असतील. मल्टिप्लेक्स हा मनोरंजनाच्या आजच्या काळाचा मंत्र झालेला होता, त्याची पाळेमुळेही कोरोनाकाळात बदललेल्या सवयींमुळे हलली आहेत. घरबसल्या मनोरंजनाची व्याख्या आजवर टीव्ही किंवा डीव्हीडीवर चित्रपट पाहण्यापुरती मर्यादित होती, ओटीटीने त्यात क्रांतिकारी प्रचंड बदल घडवून आणला. करोनाने आरोग्यव्यवस्थेशी संबंधित अनेकांना धनाढ्य बनवले (कोविशील्डची भारतात निर्मिती करण्याचे कंत्राट असलेल्या पुनावाला यांच्या मालमत्तेत १९२०-२१ या काळात ७४ टक्के वाढ होऊन ती १ लाख ६३ हजार ७०० कोटी एवढी झाली) तर करोनामुळेच जगभरात ओटीटीला मोठ्या प्रमाणावर मागणी वाढली आणि मनोरंजन उद्योगाचा चेहरामोहरा बदलून गेला. केवळ एकट्या भारतातच एमएक्स प्लेअर, डिझ्नी हॉटस्टार, ॲमेझॉन प्राइम आणि नेटफ्लिक्सचे मिळून २६ कोटी ग्राहक आहेत. कोरोनापूर्व काळात ही संख्या जेमतेम ५ कोटी होती. याशिवाय प्लॅनेट मराठीसारख्या देशभरातील प्रादेशिक ओटीटीच्या ग्राहकांची एकत्रित संख्या पाचेक कोटी असेल. चित्रपटगृहांत जाऊन चित्रपट पाहण्यापेक्षा घरातील प्रत्येक सदस्य त्याला वेळ मिळेल त्यानुसार अंथरूणावर हातपाय पसरून किंवा सोफ्यावर स्वतःला पाहिजे त्या पोझिशनमध्ये बसून किंवा झोपून चित्रपट पाहू शकतो. मनोरंजनाचे वर्तुळ विस्तारले, आशयाचे वैविध्य आणि दर्जाची रेलचेल झाली. त्यामुळे चित्रपटगृहांत जे बघायला मिळायचे त्यापेक्षा कितीतरी अधिक चॉइस ओटीटीवर उपलब्ध झाला आहे. हाऊस ऑफ कार्डससारखी अमेरिकन राजकारणावर भाष्य करणारी मालिका भारतात फक्त मूठभरांनी पाहिली होती ती आता करोडो लोकांपर्यंत पोहोचली आहे. इस्रायल डिफेन्स फोर्समधील अधिकाऱ्यांवर बेतलेली, अरब-ज्यू संघर्षावरील 'फौदा'सारखी मालिका आपल्याला थेट तिथल्या संघर्षाचे स्वरूप दाखवून देते, 'पाताललोक'मधले माध्यमांमधील लढाईचे, पोलिसांमधील संघर्षाचे चित्र, दहशतवादाचे देशी स्वरूप आपल्याला याच देशात राहूनही एवढे परिचयाचे नव्हते. केवळ अमेरिका, इंग्लंडमधील नव्हेत तर कोरियनपासून तर स्पॅनिशपर्यंत विविध भाषांमधील वेबमालिकांनी एवढे पर्याय ओटीटीवर दिले आहेत की एखाद्याने मी आयुष्यभर चित्रपटगृहांकडे फिरकणार नाही, अशी शपथ घेतली तरी

**ऑक्सिजनपाठोपाठ जगण्यासाठी आता मोबाइलची गरज निर्माण झाली आहे. आपले ऑफिस, आपला व्यवसाय, आपली बातम्यांची गरज, आपले मनोरंजन, आपले नातेवाईक, आपले मित्र, आपली कागदपत्रे, आपला भावनिक व्यवहार, आपला टाइमपास सगळेच या छोट्याशा चौकोनाद्वारे नियंत्रित होत आहे. क्लिक, झूम, फॉरवर्ड, डाऊनलोड, सेंड हे नव्या जगातले परवलीचे शब्द झाले आहेत.**

त्याला काही फरक पडणार नाही. थिएटरमध्ये सहकुटुंब जाऊन २५०० रुपये खर्च करण्याऐवजी तो नव्या, रिलीज झालेल्या चित्रपटाची लिंक ५०० रुपयांत खरेदी करून आरामात घरी चित्रपट पाहील.

अर्थात एक नवे माध्यम आले म्हणून आधीचे सवयीचे झालेले माध्यम संपून जाते असे कधीच होत नाही. कौटुंबिक, घरगुती वातावरणातील, साधीसोपी कथानके आणि वयस्क, मध्यमवयीन अथवा वयोवृद्ध स्त्री-पुरुषांना आवडतील अशा मालिका हाच आपला आधार हे अचूक ओळखून टीव्हीने या काळात तग धरला आहे. त्याच धर्तीवर आता थिएटरमध्येच जाऊन पाहिले पाहिजेत असे भव्य-दिव्य चित्रपट, थ्रीडी, फोर डी अशा तांत्रिक क्लृप्त्या यांची कास चित्रपटांना धरावी लागेल. बजेटच्या सदर्भात हिंदी किंवा कोणत्याही भारतीय भाषेतील चित्रपट हॉलिवूडपुढे टिकू शकणार नाही. अशावेळी भारतीय चित्रपटांसाठी टिकून राहण्याचा आणखी एक मार्ग असू शकेल. गीत-संगीत हा भारतीय चित्रपटांचा नेहमीच आत्मा राहिलेला आहे. आपल्या सुदैवाने जगातील कोणत्याही मोठ्या चित्रपटसृष्टीत गाण्यांना थारा/जागा नाही. ओटीटीवर चित्रपट पाहतानाही गाणी ही अडथळाच ठरतात, हे लक्षात घेऊन हिंदी चित्रपट कदाचित पुन्हा एकदा सुमधुर संगीताच्या वाटेने गेला तर प्रेक्षक गाण्यांसाठी चित्रपटगृह गाठू शकतो. उडत्या चालींची, केवळ ठेक्यामुळे ऐकावीशी वाटणारी गाणी व्हिडीओ अल्बम्समधून आणि भावना व्यक्त करणारी, अर्थपूर्ण गाणी चित्रपटात अशी विभागणी होऊ शकते. तसे झाले तर पुन्हा एकदा आपल्या चित्रपटांत मेलडी आणि म्युझिक परतू शकते. सबटायटलमुळे भाषिक चित्रपटही स्पर्धा करत असताना, 'प्रेक्षकांना घराबाहेर' काढणे हे मोठे अवघड काम असेल. मधल्या काळात झालेले नुकसान भरून काढण्यासाठी हॉटेलवालेही ग्राहकांच्या खिशांकडे आशेने पाहात आहेत. खरेदी, चित्रपट आणि मग बाहेर सहकुटुंब भोजन या समीकरणातून तूर्तास चित्रपट वगळला जाण्याची शक्यताच अधिक दिसते. तरीही उत्तम साउंड इफेक्टसह मोठ्या पडद्यावर चित्रपट पाहणे आणि गडद काळोखात पडद्यावरील एका विश्वात हरवून जाणे, हा अनुभव केवळ चांगल्या थिएटरमध्येच घेता येऊ शकतो. ओटीटी सरावाचे किंवा सवयीचे झाले की प्रेक्षकांची पावले पुन्हा चित्रपटगृहांकडे पडतीलच.

ओटीटीवर वेबमालिकांमध्येही मोठी स्पर्धा असेल. थोडा जरी कंटाळा आला तरी ती मालिका सोडून दुसऱ्या मालिकेकडे वळण्याचा पर्याय प्रेक्षकापुढे असल्याने प्रत्येक सेकंद प्रेक्षकांना धरून ठेवावे लागेल. त्याचवेळी एकच सूत्र असलेल्या तीन किंवा चार छोट्या गोष्टी एकत्र बांधून चित्रपट तयार करण्यासारखे प्रयोग करायला मिळत आहेत, हा ओटीटीचा विशेष आहे. त्यातही 'सुपर डिलक्स'सारखे मल्याळी भाषेतील धाडसी प्रयोग वाखाणण्यासारखे आहेत. मराठीतल्या प्रगल्भ प्रेक्षकांनाही असे प्रयोग नक्कीच आवडतील.

नाटक हे मनोरंजनाचे माध्यम म्हणून मुंबई-पुण्याच्या पलीकडे फार विचारात घेतले जात नाही. एकेकाळी राज्यभर नाटकांचे दौरे होत असंत, अलिकडे कलाकार एकाच वेळी विविध माध्यमांत काम करत असल्याने दौरे जवळपास बंदच पडलेले आहेत. पुण्या-मुंबईत मात्र नाटकांची संस्कृती टिकून आहे. कोरोनाकाळात प्रेक्षकांना घरबसल्या मनोरंजनाची सवय लागली, त्याचा फटका नाटकांनाही बसणारच आहे, परंतु तो तुलनेने फार कमी बसेल असे वाटते. 'लाइव्ह एंटरटेनमेंट'ला कोणतेही ओटीटी माध्यम पर्याय देऊच शकत नाही. कोविडच्या काळात अभिनेता, लेखक, दिग्दर्शक हृषीकेश जोशी याने नाटक ऑनलाइन करण्याचा एक प्रयोग केला. त्या त्या कलाकाराने आपल्या घरुनच ती भूमिका करायची अशी ती कल्पना होती. परंतु तो केवळ प्रयोगच होता, त्याची वहिवाट होऊ शकत नाही. थेट रंगमंचावरचा अभिनय समोर बसून पाहणे, दाद देणे याला पर्याय मिळूच शकत नाही. फार तर प्रेक्षकांच्या आवडनिवडी बदलून नाटकांच्या प्रकृतीवर थोडा फार परिणाम होऊ शकतो. तसेही गेली काही वर्षे प्रेक्षकांचा कल विनोदाकडे अधिक आहे, त्यामुळे हाऊसफुल्लची खात्री केवळ प्रशांत दामले, भरत जाधव हेच देऊ शकतात. कोविडच्या जाचातून बाहेर पडल्यावर प्रेक्षक काही काळ तरी हास्यरसाकडे झुकलेला असेल असे वाटते. 'स्टॅण्डअप कॉमेडी शो' अर्थात एकपात्री विनोदी कार्यक्रमांना शहरी भागात सध्या इंग्रजी, हिंदीत मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. मराठीत संदीप पाठकच्या 'वऱ्हाड निघाले लंडनला'व्यतिरिक्त चांगला कार्यक्रम नाही. भाडिपाचे काही कलावंत असे कार्यक्रम करतात परंतु त्याला अजून बांधीव स्वरूप आलेले नाही. या दिशेने प्रयत्न झाला तर त्याला नक्कीच चांगला प्रतिसाद मिळेल. एकुणात व्यवहार सुरळीत सुरु झाल्यावर नाट्यव्यवसायाला उभारी घ्यायला फार वेळ लागणार नाही, असे वाटते. व्यवहार कधी आणि किती टक्के पूर्ववत होतील, या प्रश्नाचे उत्तर मात्र आता देता येत नाही.

मोबाइलने विश्व व्यापले होतेच, आता त्याने मनोविश्वही व्यापले आहे. 'मोबाइल ॲडिक्शन'ला अधिकृत आर म्हणूनही मान्यता मिळालेली आहे. मोबाइल ही अनेक अर्थांनी 'गले की हड्डी' बनलेले आहे. 'न निगलते बनती है ना उगलते' ऑक्सिजनपाठोपाठ जगण्यासाठी आता मोबाइलची गरज निर्माण झाली आहे. आपले ऑफिस, आपला व्यवसाय, आपली बातम्यांची गरज, आपले मनोरंजन, आपले नातेवाईक, आपले मित्र, आपली कागदपत्रे, आपला भावनिक व्यवहार, आपला टाइमपास सगळेच या छोट्याशा चौकोनाद्वारे नियंत्रित होत आहे. क्लिक, झूम, फॉरवर्ड, डाऊनलोड, सेंड हे नव्या जगातले परवलीचे शब्द झाले आहेत.

काही वर्षांपूर्वी अतिशयोक्त वाटणारे, परदेशी नियतकालिकांतील एक व्यंगचित्र आज शक्यतेच्या कोटीत आले आहे. एक पाच-सहा वर्षांचा मुलगा निरागसपणे त्याच्या आईला विचारतो, 'आई, तू मला कुठल्या साईटवरून डाऊनलोड केले आहे ग?' आपले आयुष्य आर्टिफिशियल इंटेलिजन्स द्वारे नियंत्रित होत असताना ही शक्यता खरी व्हायला असा किती वेळ लागणार आहे? माध्यमे आपल्याला 'उद्याचे जग' कसे असेल ते सांगतात, तशी ती यापुढेही सांगत राहतील. बदल कितीही झाले तरी!

**- श्रीकांत बोजेवार**
९८९२४१९२६७
shrikant.bojewar@gmail.com




# एकच आशा उरी

संजीव लाटकर

*माध्यम चालवणारी माणसंच असतात आणि माध्यमाचा वापर करणारीही माणसंच असतात. या उभयतांमधला संबंध हा कसा बदलत जातो, यावर माध्यमांचं अस्तित्व आणि माध्यमांचा विस्तार अवलंबून असतो. आताच्या काळामध्ये जे गोंधळाचं वातावरण आहे, ते माध्यमांमध्येसुद्धा प्रतिबिंबित झालेलं आहे. आपण नेमकं कुठे चाललो आहोत, आपलं डेस्टिनेशन काय आणि आपली डेस्टिनी काय हे प्रसार माध्यमांनाही अजून नीट उमजलेलं नाही.*

सध्याचा काळ कधी नव्हे एवढ्या प्रचंड स्थित्यंतराचा आहे. हे स्थित्यंतर केवळ कोविड-१९ मुळे झालं असं नाही. तर अनेक गोष्टी एकत्र आल्या आहेत. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या उलथापालथी, धार्मिक आणि सामाजिकदृष्ट्या ढवळून निघालेलं वातावरण आणि अर्थव्यवस्थेच्या आघाडीवर सतत सुरू असणारे चढ-उतार यांचीही पार्श्वभूमी प्रसारमाध्यमांच्या स्थित्यंतराला लाभलेली आहे. सामान्य माणसं ही सध्या जितकी गोंधळून गेलेली आहेत, तितकीच सर्व प्रकारची प्रसारमाध्यमंसुद्धा गोंधळलेल्या अवस्थेत आहेत. शेवटी माध्यम चालवणारी माणसंच असतात आणि माध्यमाचा वापर करणारीही माणसंच असतात. या उभयतांमधला संबंध हा कसा बदलत जातो, यावर माध्यमांचं अस्तित्व आणि माध्यमांचा विस्तार अवलंबून असतो. आताच्या काळामध्ये जे गोंधळाचं वातावरण आहे, ते माध्यमांमध्येसुद्धा प्रतिबिंबित झालेलं आहे. आपण नेमकं कुठे चाललो आहोत, आपलं डेस्टिनेशन काय आणि आपली डेस्टिनी काय हे प्रसारमाध्यमांनाही अजून नीट उमजलेलं नाही. ते प्रवास करत आहेत. पण एकाच आशेवर हा प्रवास सुरू आहे की सर्वसामान्य लोक आपलं माध्यम स्वीकारतील. प्रत्यक्षात काय होईल याची कल्पना माध्यमांनाही नाही. (हा लेख प्रसारमाध्यमापुरता असून त्यात समाजमाध्यमांचा विचार जाणीवपूर्वक केलेला नाही. कारण समाजमाध्यमं हा प्रचंड मोठा विषय आहे. त्याचा ओझरता उल्लेख करून पुढे जाणं शक्य नाही!)

आज आपण प्रसारमाध्यमांचा ज्याप्रकारे वापर करत आहोत, त्याची पंचवीस-तीस वर्षांपूर्वी कल्पनाही केलेली नव्हती. फक्त तीन दशकांमध्ये प्रसारमाध्यमांत झालेला प्रचंड बदल हा केवळ तंत्रज्ञानामुळे झाला आहे, असं मानणं चूक ठरेल. तंत्रज्ञान हा ड्रायव्हिंग फोर्स आहेच. त्याबरोबरच लोकांच्या गरजा, बाजारपेठेचं बदलतं स्वरूप, आशयामधला बदल, समाजाच्या आर्थिक स्तरांमध्ये होत असलेले बदल आणि प्रगती, जागतिकीकरणाचा परिणाम, महत्त्वाचं म्हणजे ज्ञान, माहिती आणि मनोरंजनाची लोकांची भूक... यासारख्या अनेक

गोष्टींचा परिणाम माध्यमांवर होत असतो. माध्यम हे एक व्यासपीठ आहे आणि त्यावर जे निर्माण होतं तो आशय आहे. माध्यम हे आशयाचं वहन करतात. माध्यम हे तंत्रज्ञानावर उभं आहे आणि आशय हा मानवी भावना, विचार यांची निर्मिती आहे! म्हणजे आपण माध्यमाबद्दल बोलत असतो तेव्हा खरं तर आपण आशयाबद्दल बोलत असतो. एकापेक्षा अनेक लोकांना एखादा संदेश सांगण्यासाठी तंत्र हे लागतंच. हे तंत्र म्हणजे पूर्वीसुद्धा एक माध्यम होतं. जसं की दवंडी. दवंडी पिटणं हे तंत्र होतं आणि घोषणा करणं हा आशय होता. स्टेज म्हणजेच व्यासपीठ आणि व्यासपीठावर उभा असलेला वक्ता किंवा अभिनेता. इथे स्टेज हे एक तंत्र आहे, अभिनय हा आशय आहे. छपाई हे तंत्र आहे, त्यात काय छापायचं हे तुमच्यावर अवलंबून आहे. सिनेमा, रेडिओ, टेलिव्हिजन, कॉम्प्युटर, मोबाइल ही सगळी तंत्रं आहेत. तंत्र हे न्यूट्रल असतं तर आशय म्हणजे मत, भावना, विचार यांची अभिव्यक्ती असते. तंत्रामुळे आशय उलगडतो आणि परिणामकारक होतो. आशयाच्या परिणामकारकतेवर माध्यमांचं जग उभं असतं. ते केवळ तंत्रावर उभं राहू शकत नाही. म्हणूनच माध्यम जरी टेक्नॉलॉजी ड्रिव्हन असलं तरी आशय हा मानवी व्यवहारांवर आणि भावभावनांवर उभा राहतो. म्हणूनच माध्यमं ही कायम जिवंत, रसरसलेली, चैतन्यशील अशी वाटतात आणि यापुढेही तशी ती वाटत राहतील. कारण आशयामध्ये तुम्हाला अनुभव देण्याची, आश्चर्यचकित करण्याची, माहिती देण्याची, तुमचं मनोरंजन करण्याची, तुमच्या जीवनाच्या संवेदना जाग्या करण्याची, तुम्हाला जीवनाचा अर्थ सांगण्याची क्षमता असते.

तंत्र तुमची सोय करतात. तुमचं जीवन आरामदायी आणि गतिमान करण्याचा प्रयत्न करतात. उदाहरणार्थ, बँका आज तंत्रज्ञानावर चालतात. त्यामुळे बँकिंगचं स्वरूप आपण बदललेलं बघतो. पण त्यात सोय आणि गती यापलीकडे काही बदललेलं नाही. कारण बँकिंगमध्ये केवळ तंत्र आहे, आशय नाही. तंत्रामुळे खर्च वाढतो. कारण तंत्र हे जास्तीत जास्त लोकांपर्यंत तुम्हाला कमीत कमी वेळेत पोहोचवते. माध्यम हे तंत्रामुळे गतिमान आणि आशयामुळे सशक्त होतं. आशय उत्तम असतो, म्हणूनच प्रसारमाध्यमं ही जगण्याला आकार देतात. (तसा त्यांनी तो द्यावा अशी अपेक्षा असते!) समाजाचे परस्परसंबंध दृढ किंवा कमकुवत करतात. ती समाजमनाचा आणि भावनांचा आरसा होतात. तुमच्या जगण्याला दिशा देतात. ती जगण्याबद्दलचा विचार करायला आपल्याला प्रवृत्त करतात. ती तुम्हाला भूमिका घ्यायला लावतात. ती तुमची मनोभूमिका तयार करतात. ती तुमच्या भावविश्वावर अधिराज्य गाजवतात. ती तुम्हाला स्वप्नं बघायला शिकवतात. ती तुम्हाला स्वप्नांच्या मागे धावायला भागसुद्धा पाडतात. म्हणून आशय हा खूप अर्थपूर्ण, गहन आणि जगण्याचे अनेक पदर उलगडून दाखवणारा असा आपला जीवनभराचा साथीदार आहे.

आशयाच्या इयत्ता असतात. काही आशय हे प्राथमिक स्वरूपाचे असतात. तर काही आशय हे खूप प्रगल्भ आणि समंजसपणे तयार केलेले असतात. काही आशय हे स्वतःला शोधणारे असतात. चित्रकलेप्रमाणेच आशयाचीसुद्धा पातळी असते. प्रत्येकाच्या विकासाप्रमाणे तो तो माणूस आपापली आशयाची इयत्ता पकडतो आणि त्यातूनच तो पुढल्या इयत्ता गाठू लागतो. तर काही जण हे प्राथमिक आशयावरच स्थिर राहतात. त्यांचा पुढचा प्रवास ते स्वत:हून थांबवतात. खूप जणांचा आशय पाहण्याचा वा ऐकण्याचा वा वाचण्याचा उद्देश केवळ टाइमपास किंवा सवय असा असतो. त्यांना माध्यमांमुळे आपला विकास व्हावा किंवा आपल्या संवेदना जाग्या व्हाव्यात असं वाटेलच, याची हमी नाही. केवळ मनोरंजन हीच त्यांची अपेक्षा असते. मनोरंजन हा सुद्धा माध्यमाचा महत्त्वाचा उद्देश असल्यामुळे तुम्हाला ही परिस्थिती समजून घ्यावीच लागते. म्हणूनच माणूस जेवढा वेळ आणि पैसे खर्च करतो, ते वसूल झाले पाहिजेत अशी त्याची अपेक्षा असते. हे वसूल होणे हे मानसिक आनंदामध्ये गणलं जातं. त्याला कोणतेही मोजमाप नाही. जो आशय तुम्ही तयार करता, तो तुम्ही निवडलेल्या सेगमेंटच्या पसंतीला उतरणं हे खूप महत्त्वाचं असतं.

आशयनिर्मितीचा प्रत्येकाचा उद्देश हा निरनिराळा असतो. सध्या प्रसारमाध्यमांसाठी (मास मीडिया) लागणारी प्रचंड गुंतवणूक बघता आशय हा व्यापारी किंवा लोकाभिमुख असणं अगदीच स्वाभाविक आहे. आशयाची निर्मिती केल्यानंतर ती लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी होणारा मार्केटिंगचा खर्च हाही प्रचंड आहे. यामुळेच आता आशयाचा दर्जा आणि आणि त्याची मार्केट क्षमता यांचा मेळ राखण्याचं अवघड काम माध्यमकर्मींना करायचं आहे. जशा लोकांच्या इयत्ता असतात, तशाच त्या माध्यमकर्मींच्याही असतात. काही माध्यमकर्मी हे केवळ आणि केवळ जे खपते, तेच विकण्याच्या मन:स्थितीतले असतात. म्हणजे शंभर टक्के व्यापारी गणित. तर काही माध्यमकर्मी हे लोकांना पसंत पडेल असा आशय देतानाच त्या आशयात जीवनविषयक भाष्य मिसळण्याचे धाडस आणि प्रयोग करतात. प्रत्येकाचं याचं प्रमाण हे निराळं आणि आपापल्या वकुबाप्रमाणे असते. तर काही माध्यमकर्मी हे आपल्या आशयातून पूर्णपणे जीवनविषयक भाष्य करतात. यामध्ये अर्थातच जो धाडस आणि प्रयोग अधिक करतो, तो नावाजला जातो. (परंतु मास मीडियामध्ये असं धाडस अपेक्षित नाही. कारण त्याचा प्रत्येक आशय हा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावा यासाठीच निर्माण होतो. त्यात व्यापारी गणिते गुंतलेली असतात.) परंतु नावाजलं जाणं आणि व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी होणं या दोन्ही भिन्न गोष्टी एकाच वेळी जमणं, हे फार कमी लोकांना शक्य होते. म्हणूनच प्रसारमाध्यमांमध्ये व्यापार आणि क्रिएटिव्हिटी याचा सर्वोत्कृष्ट मेळ हा अत्यंत आवश्यक असतो आणि तो दुर्मिळही असतो. तोच माध्यमांचं महत्त्व आणि गांभीर्य टिकवून ठेवू शकतो...

उत्तम आशय निर्माण करण्याची माध्यमकर्मींची तहान आणि उत्तम आशय बघण्याची-ऐकण्याची-वाचण्याची लोकांची भूक, यावर माध्यमांचं भवितव्य आज उभं आहे!

**- संजीव लाटकर**
भ्रमणध्वनी : ९८२११४०५२८
sanjeevlatkar@h




*समाजमाध्यमांचा ताबा समाजाकडे आहे हा समज खोटा आहे, तो दूर करावा लागणार आहे. या बातम्यांच्या जगात ग्राहक हा एक प्रॉडक्ट असणार आहे. तो काय पाहतोय, काय व्यक्त होतोय याचा डेटा सर्व माध्यमं चोरी करणार आहेत. हा प्रचंड डेटा कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ ठरणार आहे. आपण आपली कबर खणायला सुरुवात केलीय, अशी आजची स्थिती आहे.*

# ज्यांच्या हाती माध्यमांची दोरी...

**रवींद्र आंबेकर**

सकाळी उठायला उशीरच झालाय म्हणत सकाळचं सगळं आवरत राहुल धावतच पोर्चमध्ये आला, तिथे त्याची ड्रायव्हरलेस ऑटोमॅटिक गाडी पटकन येऊन थांबली. राहुल पटकन गाडीत बसला आणि त्यानं कानाच्या मागे एक चीप सरकवली, पटापट दिवसभराच्या बातम्या डोक्यात डाऊनलोड करून घेतल्या. न्यूरोस्टिम्युलेशनमुळे राहुलच्या जीवनात बऱ्याच गोष्टी आता सुकर झाल्यायत, पण गोंधळही वाढलाय, त्यासाठी त्यानं जरा महागातलं रि-फॅक्टचं फिल्टर लावून घेतलंय. हल्ली बाजारात इतक्या फेक न्यूज आहेत की फॅक्टचेक ही फेक होऊ लागलंय, त्यामुळे फॅक्टचेक ही सतत अपडेट करावं लागतंय.

दुसरीकडे नरेंद्रला म्हातारपणी प्रचंड एकांत जाणवतोय. दिवसभर गप्पा मारायला कोणी नसल्यानं नरेंद्रचा दिवस फार बोअरींग जात असतो. त्यामुळे त्यानं जरा आपल्या आवडीच्या कॅरेक्टरला गप्पा मारायचं आणि बातम्या सांगायचं काम सोपवलंय. बाजूला बसलेलं व्हर्च्युअल कॅरेक्टर दिवसभर मनसोक्त गप्पा मारत नरेंद्रला बातम्या आणि आजूबाजूला काय होतंय हे सांगत असतं. ऑगमेंटेड रिॲलिटीच्या पुढचं हे इंटरॲक्टिव्ह व्हर्जन थोडंसं महाग असलं तरी नरेंद्रसाठी वरदानच ठरलंय. या कॅरेक्टरनं नरेंद्रचं म्हातारपण सुसह्य करून टाकलंय. नरेंद्र आता ऐकत असलेली बातमी केवळ पाहूच शकत नाही तर फीलही करू शकतो.

उद्याचा मीडिया कसा असेल याचं साधारणतः असं एक कल्पनाचित्र मी गेल्या दहा वर्षांपासून रंगवत आलो आहे. हे कल्पनाचित्र बऱ्याच अंशी वास्तवात आलंय. येत्या काही काळात माध्यमाच्या क्षेत्रात आणखीही मोठे बदल झालेले दिसतील. माध्यमांचा, आपला माहिती घेण्याचा-रिचवण्याचा स्पीड वाढतोय. दिवसभरातून आपण जितकी माहिती कन्झ्युम करतोय त्या माहितीची खरोखरच आपल्याला गरज आहे का, असा प्रश्न जर आपण आपल्यालाच विचारला तर लक्षात येईल की आपल्याला खरंच या माहितीची गरज नाही. आपण या माहितीला ॲडिक्ट झालोय. या माहितीचं आपल्याला व्यसन लागलंय. मोबाइल हे सर्वांचं पर्सनलाइज्ड डिव्हाइस आहे. या डिव्हाइसवर समाजमाध्यमे, ओटीटी प्लॅटफॉर्म आणि इतर माध्यमांतून आपल्यापर्यंत विविध प्रकारची माहिती येत असते. ही सगळीच माहिती बातम्यांच्या स्वरूपात नसते. यातील काही भाग इन्फोटेनमेंट, एंटरटेनमेंट, क्विज किंवा वेगळ्या फॉर्ममध्ये असतो. मी उद्याच्या मीडियाला बातमीच्या दृष्टिकोनातून बघणार आहे.

टीव्हीमध्ये साधारणतः २००० साली मी प्रवेश केला. या नवीन क्षेत्राचं अबकडही माहीत नव्हतं. फील्डवर काही रिपोर्टरांकडून आणि खास करून काही कॅमेरामनकडून टेक्निक शिकलो होतो. वृत्तमानसचा फायदा टीव्हीमध्ये झाला. फिल्ड रिपोर्टिंग, मॉब हँडलिंगपासून केस स्टडी, बातम्यांची भाषा यात अडचण वाटली नाही. या काळात तंत्रज्ञान झपाट्याने बदलत होतं. मोठमोठे कॅमेरे, डाउनलिंक-अपलिंक, एडिटिंग, लाइट, सॅटेलाइट तंत्रज्ञान सगळंच बदलायला लागलं. बातम्यांची भाषाही बदलायला लागली. टीव्हीला एंगेजमेंट खूप होती, मात्र या एंगेजमेंटमध्ये इंटरॲक्टिव्ह होण्याची गरज निर्माण झाली. त्यानंतर एसएमएस पोल आला, सासू-सुनेचं रडगाणं, त्यात

फोन इन कार्यक्रम, इमोशनल ड्रामा, नाग-बाबा, चमत्कार, पृथ्वी नष्ट होणार अशा स्वरूपाच्या बातम्यांनी टीव्हीचा कब्जा घेतला. सेक्सशी संबंधित स्टिंग ऑपरेशन व्हायला लागलं. सीरियस जर्नालिजम संपतं की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. या काळात अनेक सीरियस जर्नालिस्ट काळाच्या पडद्याआडही गेले. त्यानंतर हळूहळू सोशल मीडिया जोर धरू लागला. लोकांच्या हातात आता त्यांचं माध्यम पडलं होतं. आपणच आपले एडिटर, आपणच रिपोर्टर. आपले प्रश्न, व्यथा, विचार मुक्तपणे मांडायचे. हे माध्यम इतकं प्रभावी झालं की आज जवळपास ९० टक्के बातम्या समाजमाध्यमांवरून उचलल्या जातात. समाज माध्यमांवरील इन्फ्लुअन्सर आज बातम्यांच्या इंडस्ट्रीची दिशा ठरवतात. मला आठवतंय, मी IBN7 मध्ये असताना अमिताभ बच्चन यांनी ब्लॉग सुरू केला होता. कधी कधी ते रात्री बारा-एक किंवा दोनला ही ब्लॉग अपडेट करायचे. ब्लॉग अपडेट झाल्या झाल्या त्यावर बातम्या करायला लागायच्या. त्यानंतर ट्विटरसारखं मायक्रो ब्लॉगिंग आलं. फेसबुकनंही बातम्यांवर बराच प्रभाव टाकला होता.

बातम्यांचं आजचं जग हे खोट्या बातम्यांचं, फेक नॅरेटिव्हचं आहे. त्यामुळे बातमीदारीच्या जगात फॅक्टचेक अस्तित्वात आलं, अनेक मोठमोठ्या संपादकांचे शो-लेख-बातम्या फेक असल्याचं आढळून आलं. खरं काय, खोटं काय, यातला भेद आता नष्टच झालाय. एकाच बातमीचे अनेक पैलू तुम्हाला सोशल मीडियावर दिसतात. जग फार छोटंच होतं, पण आता या फेक न्यूज इंडस्ट्रीनं ते तिळाएवढं करून टाकलंय. आज जगभरात या फेक न्यूज-नॅरेटिव्हमुळे दंगली, उठावही घडताना दिसतायत. लोकशाही मूल्यं धोक्यात आली आहेत, मानवाधिकार धोक्यात आलाय. प्रेमभावना संपुष्टात येऊन द्वेषभावना वाढत चाललीय. जाती-धर्मांमध्ये तेढ निर्माण झालीय. सत्ताधारी या समाजमाध्यमांचा वापर आपल्याला हवं ते नॅरेटिव्ह पसरवण्यासाठी वापरायला लागलेत.

माध्यमांवर समाजमाध्यमांचा कंट्रोल आलाय, भांडवलदार असोत, राजकारणी असोत किंवा गुन्हेगार, या सर्व लोकांनी हे नवीन हत्यार आपल्या ताब्यात घेतलंय. माध्यमांची शक्ती क्षीण होत चाललीय. सगळीकडे माहितीचा पूर आलाय. या माहितीनं माणसाला जनावर बनवून ठेवलंय.

अशा परिस्थितीत 'माध्यमांच्या उद्या'ची चर्चा करणं थोडं धाडसाचं ठरणार आहे. विविध माध्यमांमध्ये काम केल्यानंतर 'मॅक्स' महाराष्ट्रच्या माध्यमातून अल्टरनेट मीडियाच्या प्रयोगाचा भाग झालो. हे एक छोटंसं रोपटं आहे. कदाचित आसपासच्या वातावरणात हे समूळ नष्ट होईल, जळून जाईल. मात्र ही नव्या माध्यमांची सुरुवात आहे.

मुद्रणकला ते डिजिटलयुग या सगळ्या प्रवासात माध्यमं बदलली. जर काही बदललं नसेल तर ते आहे कंटेट. कंटेट सर्व काळात कायम राहिलं. त्याचे फॉर्म बदलले. मात्र आज या कंटेटसोबतही छेडछाड झालीय. समाजमाध्यम म्हणून ज्यांना मानलं गेलंय ती खऱ्या अर्थानं समाजमाध्यमं नाहीत. या माध्यमांवर भांडवलदारांचा कब्जा आहे. ही माध्यमं अल्गोरिदमवर चालतात. त्या माध्यमांचं अल्गोरिदम बडे भांडवलदार-तंत्रज्ञान कंपन्या, राजकीय पक्ष ठरवतात. माणसाचा मेंदू हॅक करण्याचं तंत्र या कंपन्यांना गवसलंय. आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या माध्यमातून मशीन जास्त हुशार आणि माणूस या मशीनचा गुलाम झाला आहे. येत्या काळात AIच्या माध्यमातून तयार होणारा अल्गोरिदम माणसाची वर्तणूक ठरवणार आहे. त्यामुळे यापुढच्या काळात बातम्यांप्रमाणे अल्गोरिदम बनणार नाही तर अल्गोरिदमप्रमाणे बातम्या बनतील.

आज समाजमाध्यमांवर चालणाऱ्या बातम्यांचं पोर्टल हे गूगलट्रेंड, फेसबुक-ट्विटरवर चालणाऱ्या ट्रेंडप्रमाणे आपलं कंटेंट बनवतात. येत्या काळात पोर्टल विविध तंत्रज्ञान वापरून आपल्या बातम्यांना अधिक अल्गोरिदम फ्रेंडली बनवतील.

यापुढे व्हर्च्युअल बातमीदार तुमच्या घरात बसून तुम्हाला बातम्या सांगेल. तो फील तुम्हाला देईल. मात्र त्यातली माहिती खरी असेलच याची शोशती तुम्हाला देता येणार नाही. बातम्यांच्या जगावर ग्रीगेटर कंपन्यांचाही पगडा राहणार आहे. बातम्यांचे विविध चॅनेल-पोर्टल यातून तुमच्या आवडीनिवडीच्या तितक्याच बातम्या बघण्यासाठी आता ग्रिगेटर प्लॅटफॉर्म मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहेत. म्हणजे मोठमोठ्या न्यूज कंपन्यांना आपलं कंटेंट या ग्रिगेटर कंपन्यांच्या मार्फत तुटपुंज्या मोबदल्यात विकावं लागणार आहे. माध्यमांचं अर्थकारण समाजमाध्यम प्लॅटफॉर्म, तंत्रज्ञान पुरवणाऱ्या कंपन्या, इंटरनेट कंपन्या, ग्रिगेटर प्लॅटफॉर्म आणि सत्ताधारी पक्षांच्या मर्जीवर राहणार आहे.

माध्यमांचं भविष्य बघत असताना मला हे भेसूर चित्र सातत्यानं डोळ्यांसमोर दिसत असतं. तुमच्या जगण्या-मरण्याच्या प्रश्नांचं अल्गोरिदम भांडवलदारी कंपन्या ठरवणार आहेत. तुम्ही पीडित असाल तर तुम्हाला आरोपी बनवायचं नॅरेटिव्ह फेक न्यूजच्या फॅक्टरी चालवणारे लिहिणार आहेत. तुमच्या मानवाधिकारांचा फैसला ज्यांच्या हातात समाजमाध्यमांचं अल्गोरिदम आहे ते करणार आहेत. त्यामुळे समाजमाध्यमांचा ताबा समाजाकडे आहे हा समज खोटा आहे, तो दूर करावा लागणार आहे. या बातम्यांच्या जगात ग्राहक हा एक प्रॉडक्ट असणार आहे. तो काय पाहतोय, काय व्यक्त होतोय याचा डेटा सर्व माध्यमं चोरी करणार आहेत. ग्राहकाचं डिजिटल बिहेव्हियरल पॅटर्न अगदी रिअल टाइम माध्यम कंपन्यांना मिळतं. हा प्रचंड डेटा कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ ठरणार आहे. आपण आपली कबर खणायला सुरुवात केलीय, अशी आजची स्थिती आहे.

या परिस्थितीत या सगळ्या तंत्रज्ञानाला नैतिकतेचं कुंपण घालायची चळवळ वाचक-प्रेक्षक-ग्राहकांनी करायला हवी. मी ग्राहक आहे, प्रॉडक्ट नाही हे आपण आपल्या मनाशी ठरवून टाकलं पाहिजे. करण्यासारख्या खूप गोष्टी असणार आहेत, येत्या काळात जनतेला संपादकाच्या भूमिकेत जावं लागणार आहे. नाहीतर अपघात अटळ आहे.

**- रवींद्र आंबेकर**
r_code@me.com




*आज कोविड-१९ ने सायन्स आणि तंत्रज्ञानाच्या मर्यादा दाखवून दिलेल्या आहेत. तरीदेखील तंत्रज्ञान हे अतिशय वेगाने बदलते आहे, म्हणूनच भवितव्याबाबत कोणीच भाकीत करू शकणार नाही, असे वाटते.*

# भवितव्य वर्तवणे अवघड

**विद्याधर दाते**

**१९६८** साली जेव्हा मी टाइम्स ऑफ इंडियात नोकरी पत्करली तेव्हा टाइम्स मुंबईचे मुख्य वार्ताहर होते व्ही. एन. भूषण राव. शिवाय तेव्हा ते आयएफडब्ल्यूजेचे- म्हणजेच नोकरी करणाऱ्या श्रमिक पत्रकारांच्या संघटनेचे अध्यक्ष होते. आपले सभासद असलेल्या श्रमिक पत्रकारांच्या मागण्यांसाठी अन्य बिगर-पत्रकारांच्या संघटनांच्या मदतीने देशव्यापी संप त्यांनी घडवले होते. मी टाइम्समध्ये लागलो, तेव्हा तेथे पत्रकारिता रुजलेली, विकसित अशी होती. सर्वात मोठ्या इंग्रजी दैनिकाच्या मुख्य वार्ताहर या महत्त्वाच्या व संवेदनशील पदावर तेथील युनियनचा नेता असावा ही बाबच वेगळी होती. त्यातूनच मला या क्षेत्रातील मुक्त वातावरणाचा अंदाज आला. एस.वाय. कोल्हटकर ह्यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या कम्युनिस्टांच्या युनियनचा मी सदस्य होतो. पुढे अर्थातच मला याची किंमत मोजावी लागली होती. नंतरच्या काळात सर्वच युनियनचे अस्तित्व संपवून टाइम्स हे वर्तमानपत्र जगतातील अग्रगण्य दैनिक बनले आणि आज पाहिले तर आम्ही पत्रकार हे आजच्या घडीला अक्षरश: अगतिक अवस्थेत काम करतो आहोत. तंत्रज्ञानाचा विचार केला तर असे लक्षात येते, की संगणकाबाबत तर त्याकाळी कोणी ऐकलेही नव्हते मग इंटरनेट तर फार दूरची बाब होती. टाईपरायटर हीच आमच्या हातातली मुख्य यंत्रसामग्री होती.

भविष्याबाबत सांगायचे तर आज कॉर्पोरेट मीडियामुळे जे काही बलशाली प्रवाह निर्माण झाले आहेत, त्यांना आपण सशक्त पर्याय देऊ शकतो, ती क्षमता आणि आवश्यक इच्छाशक्ती आपल्यात आहे. अर्थात आपले हे काम इंटरनेटमुळे सोपे झाले, कारण आता ज्ञान व माहिती मिळवणे हे अधिक सोपे झाले आहे व प्रिंट प्रकाशनापेक्षा खर्चाच्या दृष्टीने अधिक किफायतशीर झालेले आहे.

गेल्या काही वर्षांत टाइम्समधील माझ्या दोन सहकाऱ्यांनी अशा प्रकारे प्रिंट ते इंटरनेट माध्यमांत लक्षवेधक व यशस्वी स्थित्यंतर केल्याचे पाहिलेले आहे. अर्थात ते दोघे सधन कुटुंबातील असल्यानेच हे शक्य होऊ शकले. सिद्धार्थ वरदराजन हे अमेरिकन पदवी असलेले एका परराष्ट्र वकिलाचे सुपुत्र, ज्यांनी मोदी सत्तेवर आल्यावर आपले हिंदू वर्तमानपत्रातील संपादकपद सोडले आणि विविध भाषांसाठी वायर सेवा सुरू केल्याचे उदाहरण माझ्यासमोर आहे. तसेच माझे शेजारी नरेश फर्नांडिस ह्यांनी वॉल स्ट्रीट जर्नल सोडून स्क्रोल कंपनी सुरू केली, ज्याचे सीईओ समीर हे अमेरिकास्थित आहेत. जे लेख प्रिंट माध्यमात येऊ शकत नाहीत असे सुंदर विचारगर्भ लेख या दोन्ही वेबसाइटवर वाचायला मिळतात ही महत्त्वाची बाब आहे. नरेश तक्रार करतात की गुगल आपल्याकडील अल्गोरिदमच्या साहाय्याने चांगल्या वेबसाईटसचे नुकसान करत आहेत.

मीदेखील लोकशाही मूल्ये जपणाऱ्या काउंटर करंट्स ओआरजी या संकेतस्थळासाठी मानधन न घेता लिहीत असतो कारण इथे मुळातच बजेट नसते व स्वतः लेखकच आपल्या लिखाणाचे एडिटिंग करत असतात व आपल्या लेखाला समर्पक शीर्षक लिहितात.

आपले जीवन बदलण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे सहज शक्य आहे. काही वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. छत्तीसगडमधील गावकऱ्यांनी लागोपाठ दोन महिन्यांत दोन गरोदर महिलांचा आकस्मिक मृत्यू झाल्याचे पाहिले. त्यांच्या जमातीतील कोणाला तरी सीजी नेट

स्वराबद्दल कळले. हे एक आवाजाधारित बातम्यांचे पोर्टल आहे. जिथे कोणीही आपली बातमी, स्थानिक पातळीवरील गोष्टी पाठवू शकतो. त्यांच्यापैकी कोणीतरी स्वराच्या नंबरवर फोन करून आपल्याकडील माहिती रेकॉर्ड केली व सांगितली की मी मुकेश बन्सल बोलतो आहे आणि हा माझा नंबर आहे, मी काय सांगतो आहे हे तुम्ही प्लीज कलेक्टरसाहेबांना फोन करून सांगा, आमच्या या समस्येबद्दल कळवा.

सुदैवाने न्यू जर्सीमधील कोणाच्यातरी पाहण्यात सीजी नेट स्वरा या संकेतस्थळावरील हा संदेश आला व त्याने येथील तहसीलदाराशी संपर्क साधला. त्यांनाही जरा आश्चर्यच वाटले की अमेरिकेतील कोणीतरी आपल्याशी संपर्क करतो आणि आपण न ऐकलेल्या गावाबद्दल माहिती देतो. अर्थात नंतर तहसीलदारसाहेब आपली टीम घेऊन त्या गावी पोहोचले. तिथली परिस्थिती पाहिली, त्यांची गरज जाणून घेतली व त्या गावाचा बदल करण्याचे ठरवले. आज त्या ठिकाणी एक शाळा उभारली जात आहे. शिवाय एक रस्ता बांधला जातो आहे. अर्थात हे सारे घडून आले ते केवळ एका फोनमुळे. सीजी नेट स्वरा म्हणजे सेंट्रल गोंडवाना नेटसेवा. २०१० साली ही मोहीम सुरू केली बीबीसीचे पत्रकार शुभ्रांशू चौधरी ह्यांनी आणि आता ती अनेक राज्यांमध्ये कार्यान्वित आहे.

इंडिया जर्नलचे प्रथमेश पाटील ह्यांचे ऑफिस शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालय ज्या इमारतीत आहे त्या ठिकाणीच ऑफिस होते. त्यांच्याकडे सर्वसामान्यांच्या समस्यांसाठी इंटरनेट बातम्या आणि रेडिओ ॲपसुद्धा मोबाइलद्वारे उपलब्ध आहे. कोविडमुळे भारतातील वृत्तपत्रांचे खूप नुकसान झाले पण एकूण बाजारपेठ ही वाढती आहे. मात्र जाहिरातीच्या उत्पन्नाचा अधिक वाटा हा टीव्ही व डिजिटल माध्यमांकडे जातो आहे याचे कारण हे की अधिकतर लोक हे आता छापीलपेक्षा मोबाइलवरच वर्तमानपत्र वाचत आहेत. न्यूज लाँड्री या संकेतस्थळावर तुम्हाला मराठी वृत्तपत्र पत्रकारांची व्यथा समजेल, विशेषतः ग्रामीण भागात कोरोनाकाळात त्यांना नोकऱ्या आहेत पण उत्पन्न नाही. कारण अनेकांना त्यांच्या अधिकृत पगारापेक्षा अधिक उत्पन्न हे जाहिरातीतील कमिशनद्वारे मिळते आणि त्याकाळात जाहिरातीच नसल्याने कमिशन नाही-उत्पन्नही नाही अशी परिस्थिती उद्‌भवली.

येत्या काही दिवसांत ध्येयवादी व निष्ठावान पत्रकारांना आधुनिक तंत्रज्ञान समजून घेऊन बनावट बातम्यांच्या वाढत्या धोक्याला तोंड द्यावे लागेल. प्रतीक सिन्हा नावाचे अहमदाबाद येथे कार्य करणारे जनसंघर्ष समितीचे संस्थापक व अध्यक्ष हे मुकुल सिन्हा ह्यांचे सुपुत्र, सॉफ्टवेअर इंजिनीयर, शिवाय प्रशिक्षित फिजिसिस्ट, कायदेविषयक पदवीधर आणि मानवी हक्कविषयक कार्यकर्ते. प्रतीक सिन्हा ह्यांनी आपल्या सामाजिक कार्यकर्ता असलेल्या माता-पित्यांबरोबर काम करायला सुरुवात केली तेव्हा त्यांना खोट्या बातम्यांचा नायनाट करण्यात स्वारस्य निर्माण झाले. २०१६ मध्ये उना गावातील चार दलित मृत रुग्णांना एका मृत गायीची चामडी काढण्याच्या गुन्ह्याबद्दल चाबकाने फटकावण्यात आल्याची घटना घडली, अशी बनावट बातमी पसरवण्यात आल्याचे जेव्हा कळले तेव्हा त्यांनी स्वतःचे संकेतस्थळ काढले. २०१६ मध्ये त्यांनी आपली सॉफ्टवेअर इंजिनीयर म्हणून काम करत असलेली चांगली नोकरी सोडली आणि पुढच्याच वर्षी अल्ट न्यूजची स्थापना केली, जी आज चांगले काम करणारी म्हणून ओळखली जात आहे.

भविष्यात मोबाइलमध्ये क्रांतिकारक बदल होण्याची मोठी शक्यता असल्याने एखाद्याला प्रकाशक व डॉक्युमेंटरी फिल्ममेकर होण्याची मोठी संधी प्राप्त होणार आहे. भारतातील मोबाइल क्रांतीबाबत रॉबिन जेफ्री या भारतीय माध्यमांबाबत लिहिणाऱ्या लेखकाने अलीकडेच आपल्या देशातील मोबाइल परिस्थितीवर एक पुस्तक लिहिले- 'सेल फोन नेशन' नावाचे. तुमच्या लक्षात येईल की १९८० पासून आपल्याकडे दर पाच-सहा वर्षांनी नवनवीन मीडिया तंत्रज्ञान येत असते आणि ते सर्वांना अचंबित करणारे, करमणूक करणारे, माहिती व चुकीच्या माहितीचा पुरवठा करणारे आणि लाखो-करोडो लोकांपर्यंत ते पोहोचत असते. जी मंडळी राजकीय किंवा धार्मिक हेतूंसाठी मोबाइल वापरणाऱ्या लोकसंख्येचा अभ्यास करत असतात, त्यांच्यासाठी एक खोडकर प्रश्न आहे, की आता कोणते नवीन तंत्रज्ञान येणार? किंवा आता आपण एका टप्प्यावर पोहोचलो आहोत का? की बास! आता प्रत्येकाकडे फोर-जी फोनची सुविधा मिळालेली आहे आणि आता या सातत्याने बदलत राहणाऱ्या तंत्रज्ञानाचा, इंटरनेट संलग्न माहितीचा कंटाळा आलेला आहे!

**आपणस ते जुने चैतन्य-अस्मिता पुन्हा एकदा जागृत करण्याची वेळ आलेली आहे. आपण आपली करिअर घडवण्याच्या नादात आपल्या स्वत: च्या व्यवसायाबद्दल इतके परके झालो आहोत पत्रकारितेबाबत भव्य-दिव्य करायचा आपणस विसर पडलेला आहे. आपण इतर अनेक विषयांत तज्ज्ञ झालेलो आहोत, पण खुद्द आपल्याच व्यवसायाबाबत कुशलता-अव्वलपणा विकसित करण्याचा मात्र आपल्याला विसर पडला आहे.**

भविष्यात काय घडू शकेल ह्याचे उत्तर देणे हे खरोखर कठीण आहे. मी २०१५मध्ये मुंबईच्या म्युझियममध्ये युवल हरारी नावाच्या विचारवंताचे भाषण ऐकले होते, तेव्हा तो काही आजच्यासारखा सेलिब्रिटी नव्हता व गर्दीही तितकीशी नव्हती. मात्र त्याने जे सांगितले ते महत्त्वाचे होते. तो म्हणाला होता, 'बायोटेक्नॉलिजी शास्त्रात होणाऱ्या बदलांमुळे श्रीमंत माणसे ही लवकरच सुपरह्युमन बॉडीज होतील!' परंतु आज कोविड-१९ ने सायन्स आणि तंत्रज्ञानाच्या मर्यादा दाखवून दिलेल्या आहेत. तरीदेखील तंत्रज्ञान हे अतिशय वेगाने बदलते आहे, म्हणूनच भवितव्याबाबत कोणीच भाकीत करू शकणार नाही, असे वाटते.

**- विद्याधर दाते**
भ्रमणध्वनी : ९९६७४०२८५७
datebandra@yahoo.com.




# देशच टकमक टोकाच्या दिशेनं...

**राम जगताप**

> *आज आपल्या देशात सर्वव्यापी, सर्वसंचारी हलकल्लोळ, गदारोळ आणि धुडगूस पाहायला मिळतो. तो केवळ प्रसारमाध्यमांतच पाहायला मिळत नाही. प्राथमिक शिक्षणापासून उच्चशिक्षणापर्यंत आणि तथाकथित एनजीओंपासून सामाजिक चळवळी-आंदोलनांपर्यंत, उद्योगधंद्यांपासून नोकरदारवर्गापर्यंत सर्वत्र पाहायला मिळतो. त्यामुळे केवळ प्रसारमाध्यमांच्या भवितव्याची काळजी करून किंवा त्याविषयी उमाळे-उसासे काढून फारसं काही साध्य होईल असं वाटत नाही.*

'उद्याची माध्यमं कशी असतील?' या प्रश्नाचं एक उत्तर असं देता येईल, की आता देशभरातल्या आणि जगभरातल्या बातम्या आणि त्यांचं विश्लेषण जाणून घेण्यासाठी प्रसारमाध्यमांची गरजच राहिलेली नाही. त्यासाठी फेसबुक, ट्विटर आणि व्हॉट्सॲप पुरतं.

पण हे निदान जरा आततायीपणाचं मानून आपण जरा वेगळ्या दृष्टिकोनातून या प्रश्नाचा विचार करू.

'उद्याची माध्यमं कशी असतील?' या प्रश्नाचं उत्तर तुम्ही माध्यमांकडे कुठल्या दृष्टीकोनातून पाहता, यावर सर्वस्वी अवलंबून आहे, असं मला वाटतं. जुन्याजाणत्या किंवा पाच-पंचवीस वर्षं प्रसारमाध्यमांत काम केलेल्या बुजुर्गांकडून या प्रश्नाचं उत्तर फारसं समाधानकारक येण्याची शक्यता नाही. पण पाच-दहा वर्षांपासून काम करत असलेल्या पत्रकारांचं उत्तर तितकंसं असमाधानकारक नसण्याची शक्यता आहे. जे पत्रकारितेकडे केवळ एक 'करिअर' या दृष्टीतून पाहतात, त्यांच्याकडून या प्रश्नाचं उत्तर बरंचसं समाधानकारक मिळण्याची शक्यता आहे. जे प्रामाणिकपणे पत्रकारिता करतात (भलेही त्यांची संख्या कमी असेल) ते या प्रश्नाचं उत्तर बरंचसं सकारात्मकही देऊ शकतात.

पत्रकारितेबाहेरच्या व्यक्तींकडूनही अशीच विविध उत्तरं संभवू शकतात. कारण पुन्हा तेच, की तुम्ही हा प्रश्न कुणाला विचारता, त्यावर त्याचं उत्तर अवलंबून आहे. ज्यांचा कुठल्या ना कुठल्या निमित्तानं प्रसारमाध्यमांशी संबंध येतो, ते नकारात्मक गोष्टी जास्त सांगतील. ज्यांचा क्वचित संबंध येतो, ते थोडं समाधान, थोडं असमाधान या समेवरून बोलतील.

तुम्ही पत्रकारितेमध्ये काम करणारे असा किंवा नसा, तुमचा दृष्टिकोन सकारात्मक असेल तर तुम्हाला कितीतरी सकारात्मक गोष्टी सांगता येण्यासारख्या आहेत. उदाहरणार्थ, माध्यमांचं कधी नव्हे एवढ्या मोठ्या प्रमाणावर लोकशाहीकरण झालेलं आहे. प्रसार-माध्यमांतली एका विशिष्ट वर्गाची मक्तेदारी आता जवळपास संपुष्टात आली आहे. अगदी महाराष्ट्रापुरता बोलायचं झालं तर वर्तमानपत्रं, नियतकालिकं, टीव्ही आणि ऑनलाइन या तिन्ही माध्यमांत बहुजन तरुणवर्गाचं प्रमाण लक्षणीयरीत्या वाढलं आहे. दलित-आदिवासी यांच्यापासून एलजीबीटी यांच्यापर्यंतच्या प्रश्नांची चर्चा मोठ्या प्रमाणावर होऊ लागली आहे. स्त्रीप्रश्नांची, आरोग्यविषयक प्रश्नांची, शेतीच्या प्रश्नांची, ग्रामीण भागातल्या प्रश्नांची चर्चा मोठ्या प्रमाणावर होऊ लागली आहे. बहुजनांचा प्रसारमाध्यमांतला टक्का मोठ्या प्रमाणावर वाढल्यामुळे प्रसारमाध्यमांची भाषाही बदलू लागली आहे इत्यादी इत्यादी.

याउलट तुमचा दृष्टिकोन नकारात्मक असेल तर तुम्हाला कितीतरी नकारात्मक गोष्टी सांगता येण्यासारख्या आहेत. म्हणजे प्रसारमाध्यमांतलं गांभीर्य लोप पावत चाललं आहे. अभ्यासू पत्रकारांची संख्या दिवसेंदिवस कमी होऊ लागली आहे. सनसनाटीपणा, वाजीकरण (कामुकता), 'सेलिब्रिटी' छापनेस आणि मध्यमवर्गीय इच्छा-आकांक्षा यांना महत्त्व येत चाललं आहे. राजकीय उथळपणाला टीआरपीच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर हवी दिली जात आहे. अहमहमिका, अटीतटीची स्पर्धा आणि आम्हीच सर्वांत पुढे या हव्यासामुळे गांभीर्य, वास्तव आणि सत्य यांना गौणत्व येत चाललं आहे. लफडी, कुलंगडी, भानगडी हेच जणू काही जीवनमरणाचे प्रश्न आहेत, असं प्रसारमाध्यमं सांगू-ठसवू पाहत आहेत.

आज आपल्या देशात सर्वव्यापी, सर्वसंचारी हलकल्लोळ, गदारोळ आणि धुडगूस पाहायला मिळतो. तो केवळ प्रसारमाध्यमांतच पाहायला मिळत नाही. प्राथमिक शिक्षणापासून उच्चशिक्षणापर्यंत आणि तथाकथित एनजीओंपासून सामाजिक चळवळी-आंदोलनांपर्यंत, उद्योगधंद्यांपासून नोकरदारवर्गापर्यंत सर्वत्र पाहायला मिळतो. त्यामुळे केवळ प्रसारमाध्यमांच्या भवितव्याची काळजी करून किंवा त्याविषयी

उमाळे-उसासे काढून फारसं काही साध्य होईल असं वाटत नाही.

केंद्रात २०१४पासून सत्तेत आलेल्या सरकारनं धार्मिक-जातीय द्वेष, कूटनीती, भेदनीती, धाकदपटशा आणि कट-कारस्थानं यांच्या जोरावर 'देशभर फोडा आणि राज्य करा' हे धोरण अवलंबलं आहे. आयटी सेल आणि ट्रोलरांच्या फौजा उभारून प्रसारमाध्यमांपासून न्यायव्यस्थेपर्यंत देशातल्या यच्चयावत लोकशाही संस्था खिळखिळ्या करायला सुरुवात केली आहे. पण या संस्था या एका सरकारच्या दडपशाहीपुढे माना टाकतील, इतक्या लेच्यापेच्या कशा झाल्या? म्हणजे गेल्या ७५ वर्षांत त्यांची नीट पायाभरणी झाली नव्हती का? नसेल तर ते कुणाच्याच लक्षात आलं नाही? आणि आलं नसेल तर मग केवळ प्रसारमाध्यमांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करून कसं चालेल? समजा उद्या हे दमनकारी सरकार सत्तेतून गेलं, तर काय होईल? आयटी सेल आणि ट्रोलर यांचा धुडगूस थांबेल. 'फेक न्यूज'चे -'पेड न्यूज'चे सरकारप्रणीत कारखाने थंडावतील, 'गोदी मीडिया' पिछाडीवर जाईल. पण केवळ त्यामुळे प्रसारमाध्यमंचा दर्जा सुधारेल? प्रसारमाध्यमांची सरकारप्रणीत मुस्कटदाबी बंद झाल्यानं त्यांची गुणवत्ता सुधारेल?

**काळजी करायचीच असेल तर आपल्या देशानं स्वीकारलेल्या लोकशाही शासनव्यवस्थेचीच करायला हवी, आणि त्याप्रती असलेल्या आपल्या उत्तरदायित्वाची. आपण शासनव्यवस्था म्हणून लोकशाही तर स्वीकारलेली आहे, पण प्रत्यक्ष राजकारणात, उद्योगधंद्यांत, शिक्षणव्यवस्थेत, सामाजिक चळवळी-आंदोलनांत, सरकारी ध्येयेधोरणांत आणि प्रसारमाध्यमांच्या दृष्टिकोनात तिचं फारसं प्रतिबिंब दिसत नाही.**

आपली प्रसारमाध्यमं आधीच 'कमोडिटी प्रॉडक्ट' झालेली आहेत आणि ती आपल्या वाचकांना-प्रेक्षकांना 'कंझ्युमर' मानू लागली आहेत. ही तर काही या विद्यमान केंद्र सरकारची देण नाही. जागतिकीकरणानं भारतीयांचं अवघं जीवनच एक बाजारपेठ करून ठेवलंय, तीही या सरकारची पॉलिसी नाही. मोठमोठे शॉपिंग मॉल, नवनव्या वस्तूंनी गजबजलेल्या बाजारपेठा, मल्टिप्लेक्स, स्मार्ट फोन, टू-जी तंत्रज्ञान, सोशल मीडिया या गोष्टीही या सरकारनं जन्माला घातलेल्या नाहीत. वर्तमानपत्राच्या किंवा वृत्तवाहिनीच्या दर्जापेक्षा त्याचा प्रसार, खप आणि प्रसारापेक्षा 'ब्रँड इमेज' महत्त्वाची, ही धारणाही या केंद्र सरकारची निर्मिती नाही.

'We need your head to run our business,' हाच जर आपल्या एकंदर जगण्याचा लसावि-मसावि झालेला असेल तर केवळ उद्याच्या प्रसारमाध्यमांची काळजी करून कसं चालेल? काळजी करायचीच असेल तर आपल्या देशानं स्वीकारलेल्या लोकशाही शासनव्यवस्थेचीच करायला हवी, आणि त्याप्रती असलेल्या आपल्या उत्तरदायित्वाची. आपण शासनव्यवस्था म्हणून लोकशाही तर स्वीकारलेली आहे, पण प्रत्यक्ष राजकारणात, उद्योगधंद्यांत, शिक्षणव्यवस्थेत, सामाजिक चळवळी-आंदोलनांत, सरकारी ध्येयेधोरणांत आणि प्रसारमाध्यमाच्या दृष्टिकोनात तिचं फारसं प्रतिबिंब दिसत नाही. काही सकारात्मक उदाहरणं उचलून आपण आशादायी चित्र रंगवण्याचा प्रयत्न करतो, पण प्रत्यक्षात वस्तुस्थिती नेमकी काय आहे, याचा फारसा विचार करत नाही. आपलं प्रत्यक्षातलं वागणं-जगणं-बोलणं-लिहिणं फारसं लोकशाहीवादी नसतं. आपल्या प्रसारमाध्यमांत स्वातंत्र्य-बंधुता-न्याय-समता यांचा अनुशेष पाहायला मिळतो, न्यायव्यवस्थेत न्यायाचा 'अनुशेष वेटिंग लिस्ट' वाढताना दिसतो, सरकारप्रणीत विकास-कार्यक्रमांत सर्वसमावेशक धोरणांचा दुष्काळी अनुशेष दिसतो. भांडवलदारांच्या आकांक्षांमध्ये देशहिताचा अनुशेष दिसतो, शिक्षणव्यवस्थेत (जातधर्म-गरीब-श्रीमंत अशा चातुर्वण्याचा प्रभाव दिसतो आणि) सर्वसामान्यांविषयीच्या अनुकंपेचा अनुशेष दिसतो.

परवा एका कॉम्रेडने 'मुके बिचारे कुणी हाका असे फॉरवर्डे बनू नका' अशी फेसबुक पोस्ट लिहिली. मोठं आकर्षक पण टाळीखाऊ विधान आहे. त्यांना जे म्हणायचं आहे, त्यात खोटं तर काहीच नाही. सोशल मीडियानं बहुतेक भारतीयांची अवस्था 'कुणीही हाकावं असे फॉरवर्डे' अशी करून ठेवलीच आहे, यात शंका नाही. पण तंत्रज्ञानाबाबतच्या विवेकाचाही आपला अनुशेष आधीपासूनच साचत आलेला नाही का? त्याबाबत कुठलीही ठोस उपाययोजना न शोधता केवळ अशी सुभाषितवजा विधानं करून काय साध्य होईल? तर काही परिचितअपरिचितांच्या लाइक्स, कमेंट आणि शेअरिंग. बस्स!

श्री. म. माटे यांचे शब्द वापरून सांगायचं तर 'गोष्ट सहजासहजीं होणें व तीच योजनेनें होणें यांत फरक आहे. आपल्या जीवितांत योजना-राहित्याचा दोष फार मोठा आहे.' आपल्या देशातल्या विविधतेचा आपण कितीही उच्चरवानं आणि गौरवानं उल्लेख करत असलो तरी, त्यामुळेच आपल्यात एक अराजकसदृश स्थिती सतत टाइमबॉम्बसारखी टिकटिकत आलीय, या वास्तवाकडे काणाडोळा करून चालणार नाही. या टाइमबॉम्बची टिकटिक कधी बाजारपेठेच्या प्रभावानं, कधी हिंदू-मुस्लीम यांच्याविषयीच्या अपप्रचारानं, अलीकडे दलित-शोषितांवरील अन्याय-अत्याचाराच्या निमित्तानं किंवा मराठा-गुज्जर-पटेल-जाट यांच्या आरक्षणाविषयीच्या आक्रमक मागण्यांनी, तर कधी सत्तेत आलेल्या नव्या सरकारच्या अनिष्ट ध्येय-धोरणांमुळे थोडीफार वाढते, तेव्हा अनेकांना 'आपण आता अराजकाच्या उंबरठ्यावर पोहोचलो आहोत', याची जाणीव होते. मग तोच राग पुन्हा पुन्हा आळवला जातो. आणि तो आळवणाऱ्यांचा काही काळ तणावात जातो. नंतर कुणीतरी त्या टाइमबॉम्बची वेळ आपल्या तंत्रकौशल्यानं लांबवतं आणि आपल्याला हायसं वाटतं.


हा अल्पसंतुष्टपणा हाच आपला खरा शत्रू आहे. त्याच्या विरोधात आपण जोवर ठामपणे, 'करो या मरो' या दृढनिश्चयानं उभे राहत नाही, तोवर केवळ आपली उद्याची माध्यमंच नाही, तर आपलं सगळं आयुष्य, आपला देशच टकमक टोकाच्या दिशेनंच ढकलला जात राहील, असंच मला वाटतं.

**– राम जगताप**
भ्रमणध्वनी : ८१०८४ १३७२०
jagtap.ram@gmail.com

# बदल स्वीकारा वा बाहेर व्हा!

**आशिष जाधव**

**लॉ**कडाऊनच्या कठोर निर्बंधांमुळं लोकांना घरात राहावं लागलं. त्यामुळे टीव्हीबरोबरच लॅपटॉप, टॅब, स्मार्ट फोनचा वापर वाढला. मुलांना ऑनलाइन एज्युकेशन सक्तीचं झालं. तसंच ऑनलाइन इन्फोटेन्मेंटचा वापर वाढला. साहजिकच घराघरात इंटरनेटचा जीबी डेटा वापर मोठ्या प्रमाणात वाढला. हा सगळा बदल केवळ शहरी-निमशहरी भागातच झाला असं नाही, ग्रामीण भागातही जीबी डेटा वापर वाढला. सर्व काहीस्मार्ट फोन्सच्या स्क्रीनवर बघायची सवय लोकांना लागलीय. त्याचं कारणही तसंच आहे. कोरोनाकाळात सोशल मीडियासह डिजिटल फ्लॅटफॉर्मच्या माध्यमांनी त्यांच्या कन्टेंटमध्ये खूप झपाट्यानं बदल केला. दिवसागणीक तो अधिकाधिक युजर फ्रेंण्डली केला. म्हणजे ग्राहकांच्या अभिरुचीनुरूप कन्टेंट तयार केला गेला. त्याचाच परिणाम म्हणून यूट्यूबपासून ओटीटी प्लॅटफॉर्म्सपर्यंतच्या डिजिटल मिडियाची सर्रास चलती झाली. ज्याने त्याने हवा तसा




*कोरोनाकाळात इन्फोटेन्मेंट इंडस्ट्रीचा कायापालट झालाय. करमणूक आणि ज्ञानरंजनाचे परिमाण बदलले आहेत. त्यानुरूप संबंधित उद्योगक्षेत्रामध्ये आमूलाग्र बदल झाले. ज्यांनी बदल आत्मसात केला त्यांना आज स्पर्धेत टिकता आलंय. ज्यांना बदल पचनी पडले नाहीत ते स्पर्धेतून बाद झाले.*

आणि मिळेल तसा डिजिटल कंटेंट बनवायला घेतलाय. आता तर डिजिटल कन्टेंट भस्मासुरासारखा प्रचंड फोफावलाय. त्याचे बरे-वाईट परिणाम समाजात बघायला मिळताहेत.

कोरोनाकाळात इन्फोटेन्मेंट इंडस्ट्रीचा कायापालट झालाय. करमणूक आणि ज्ञानरंजनाचे परिमाण बदलले आहेत. त्यानुरूप संबंधित उद्योगक्षेत्रामध्ये आमूलाग्र बदल झाले. ज्यांनी बदल आत्म सात केला त्यांना आज स्पर्धेत टिकता आलंय. ज्यांना बदल पचनी पडले नाहीत ते स्पर्धेत बाद झाले.

कोरोनाकाळात टीव्ही मीडियावर वेगवेगळ्या प्रकारचा परिणाम जाणवायला लागला. करमणुकीचं म्हणजेच एन्टरटेन्मेंट चॅनेलचं अर्थकारण बदललं. ज्यांनी वेळेत स्वत:ला सावरलं ते तग धरून आहेत. ज्यांना कन्टेंट आणि ट्रेण्डशी जुळवून घेता आलं नाही तिथे हलाखाची परिस्थिती निर्माण झालीय. त्यामुळे आता एन्टरटेन्मेंट चॅनेलना प्रेक्षकांना गृहित धरून दैनंदिन भागांच्या लांबच लांब टीव्हीमालिका थोपता येणार नाही. त्यासाठी दर्जेदार कंटेंट बनवताना खूप चोखंदळ राहावं लागणार आहे. एकूणच काय तर ओटीटीचं मोठं आव्हान टीव्ही चॅनेलसमोर आहे.

कोरोनाच्या लॉकडाऊनच्या काळात तर भल्याभल्या न्यूज चॅनेलचं दिवाळं वाजलं. त्याचा परिणाम म्हणून आहेत्या परिस्थितीत तग धरण्यापुरती काम करण्याचं धोरण अवलंबलं गेलं. त्याचाच भाग म्हणून न्यूजचॅनेलांनी व्हिडिओजचा कन्टेंट डिडिटल मीडियावर विकायला काढला. त्यात भरीस भर म्हणूनकोरोनाकाळातच बार्क रेटिंग्जचा घोटाळा पुढे आला. आठवड्याचे रेटिंज चार्ट येणं बंद झालं. त्यामुळं डिजिटल मीडियावरचे व्ह्यूज दाखवून जाहिराती मिळवण्याची स्पर्धा सुरू झाली. कमी खर्चातजास्त नफा म्हणून काहींनी तर न्यूज चॅनेलपेक्षा जास्त भर डिजिटल मीडियावर दिलाय. पण खरा डिजिटल मीडिया हा स्वतंत्रपणे डिजिटल मीडिया हाताळणाऱ्या वेबपोर्टल आणि युट्यूब चॅनेलच्या माध्यमातून चालतोय. निष्पक्ष पत्रकारिता जोपासत विश्लेषणात्मक व्हिडिओजची चलती सुरू झालीय. एकाचवेळी यूट्यूब, फेसबुक, इन्स्टाग्राम आणि ओटीटीवर डिजिटल कंटेंट अपलोड केलाजातोय. त्यातून न्यूज चॅनेलबरोबरच इतर माध्यमसमूहदेखील डिजिटल कंटेंट तयार करताहेत. तसंच सध्या विविध प्रकारच्या व्हिडिओंचा कंटेंट सर्वत्र पाहायला मिळतोय. त्यामुळे खाजगी यूट्यबरचं अक्षरश: पीक आलंय. खरं तर डिजिटल मीडियासाठी अद्याप स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसिजर अर्थात कामाची कुठलीही ठरावीक पद्धती किंवा प्रक्रिया विकसित झालेली नाही. त्यामुळं अर्धकच्चा कंटेंट पाहायला मिळतोय. परंतु आता भारतात लवकरच 5G वायरलेस टेक्नॉलॉजी येतेय. त्यामुळं इन्फोटेन्मेंटच्या डिजिटल मीडियामध्ये गुंतवणूक वाढतेय. तसंच, सेल्स आणि मार्केटिंगवर भर दिला जातोय. त्याचा परिणाम म्हणून कंटेंटचा दर्जा सुधारतोय. त्यामुळं सॅटेलाईट चॅनेल मागे पडून डिजिटल मीडिया फोफावणार आहे. आणि म्हणूनच फ्युचर इज विथ डिजिटल मिडिया म्हणत टीव्ही मीडियातली अनुभवी मंडळीसुद्धा डिजिटल मिडियात स्थिरावतेय.

**- आशिष जाधव**
भ्रमणध्वनी : ९९२०३३८२७१
ashish.jadhao@gmail.com

# डोळसपणा हवा

**मीनल जगदाळे**

**आ**पण सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आणि ओटीटी प्लॅटफॉर्मच्या मानवी जीवनातील अतिक्रमणाबद्दल बोलतो तेव्हा खरे तर या सर्वांचे मूळ म्हणजेच तंत्रज्ञान आणि त्यात दिवसागणीक होणारी नवीन प्रगती कारणीभूत आहे, हे आपण लक्षात घ्यायला हवे.

तरुणाई हा कोणत्याही एका मोठ्या बदलाचा मोठा घटक असतो. आपल्याकडे तरुणांची संख्या एकूण लोकसंख्येच्या ४५ टक्के आहे. १८ ते ४५ वयोगटामध्ये होणाऱ्या घडामोडींचा परिणाम समाजावर अधिकांश होणार आहे. तरुणवर्ग तंत्रज्ञान, समाजमाध्यमे, ओटीटीचा वापर करतो आहे. त्यात सकारात्मक गोष्टीही बऱ्याच आहेत. अनेकांनी या तंत्रज्ञान आणि समाजमाध्यमांच्या साहाय्याने छोटे स्टार्टअप सुरू केले आहेत. उदाहरणार्थ – इन्स्टाग्रामच्या साहाय्याने अनेक जण आपापले छोटे व्यवसाय चांगल्या पद्धतीने चालवत आहेत. स्किल डेव्हलपमेंटसाठी



*माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे. अश्मयुगापासून आताच्या एकविसाव्या शतकापर्यंतचा प्रवास माणसाने बुद्धीच्या जोरावर केला. वेळोवेळी त्यात बदलल घडत गेले. परंतु एक गोष्ट मात्र नेहमी कायम राहिली ती म्हणजे माणसाला माणसाची सोबत आणि गरज वाटणे. तंत्रज्ञानाचा शोध माणसाने स्वतःसाठी लावला आहे. तंत्रज्ञान माणसासाठी आहे, माणूस तंत्रज्ञानासाठी नव्हे.*

अनेक ऑनलाइन कोर्स आहेत. सोशल मीडियासारख्या माध्यमांमध्ये बॅकएण्डला काम करणाऱ्या कंटेंट रायटरपासून फोटो, व्हिडिओग्राफी ते अगदी डिजिटल मार्केटिंगसारख्या असंख्य रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत. दुसरे म्हणजे आज समाजमाध्यमांचा वापर सगळेच राजकीय नेते करत आहेत. फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम यापैकी किमान एकावर अकाऊंट नाही असा एकही नेता नसेल. नेता, प्रसिद्ध व्यक्ती सोडा पण सामान्यांपैकीही यापैकी एकावर अकाऊंट नाही अशी माणसे सापडणे दुर्मिळ असेल. वैयक्तिक वापराव्यतिरिक्त अनेकापर्यंत आपले विचार पोचवण्यासाठी ही समाजमाध्यमे उपयुक्त ठरतात, हे नेत्यांना कळले आहे. २०१४ मध्ये लोकसभा निवडणुकीत समाजमाध्यमांची ताकद दिसून आली. त्यांचा प्रभाव आणि परिणाम कळला. त्यानंतर आता सगळे नेते त्यांच्या त्यांच्या बजेटनुसार समाजमाध्यमांवर खर्च करतात. त्याखेरीज कॉर्पोरेट, विविध संस्था, स्वयंसेवी संस्था आदींनाही त्यांची माहिती पोहचवण्यासाठी समाजमाध्यमांचे व्यासपीठ उपलब्ध झाले. या सगळ्या घडामोडींमुळे या क्षेत्रात रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध झाल्या आणि अजूनही होत आहेत. या क्षेत्रात यायचे तर अपग्रेड आणि अपडेट राहायला हवे.

तिसरा मुद्दा म्हणजे आज काही यूट्यूब किंवा इन्स्टाग्राम इल्फ्लुएन्सरची करिअर उभी राहिली आहेत. आज ही माध्यमे नसती तर हे शक्य झाले असते का? अर्थात ही संधी मिळणे जितके सोपे नव्हते, तितकेच तिचे सोने करणेही सोपे नव्हते. त्यासाठी ते नक्कीच स्ट्रगल केले असेल. मेहनत घेतली असेल. लोकांना आवडेल असा कंटेंट त्यांना तयार करायचा होता. यूट्यूबवर अनेकविध प्रकारच्या विषयांचा समावेश असतो. त्यात कूकिंग हा पहिल्या क्रमांकाचा ट्रेण्ड असतो. उदाहरणार्थ, नगरच्या एका ६५ वर्षांच्या आजींच्या चॅनेलचे सहा–सात लाख सबस्क्रायबर आहेत. आणखी एक नवीन गोष्ट म्हणजे ऑनलाइन डेटिंग ॲप्स आहेत. महाविद्यालयीन किंवा अधिकांश नोकरी करणाऱ्यांना कामामुळे वेळ नसतो. त्यांच्या विचारांशी, आवडी–निवडीशी जुळेल अशी व्यक्ती गप्पा मारायला किंवा पुढे कदाचित जोडीदार म्हणून हवी असते आदी प्रत्येकाचे पर्याय हे या ॲपवर अतिशय स्पष्टपणे विचारलेले आणि मांडलेले असतात. अनेकदा याचा दुरुपयोग होऊ शकतो किंवा होतो. कोविडकाळात केवळ कुणीतरी बोलायला हवे आहे, असे वाटणाऱ्यांनी हे ॲप वापरल्याची उदाहरणे आहेत. थोडक्यात, या डेटिंग ॲपचा वापर हळूहळू वाढत चाललेला दिसतो.

अनेकांचे असे म्हणणे असते, की या सगळ्यामुळे माणूस माणसांपासून तोडला जाईल, अधिक एकटा होईल. त्याविषयी मला असे वाटते, की माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे. अश्मयुगापासून आताच्या एकविसाव्या शतकापर्यंतचा प्रवास माणसाने बुद्धीच्या जोरावर केला. वेळोवेळी त्यात बदलल घडत गेले. त्याचे कारण सतत काहीतरी नवीन शोधण्याची त्याची उर्जा. समाजव्यवस्था, एकत्र कुटुंबव्यवस्था, विभक्त कुटुंबव्यवस्था या कम्युनिटी हॅबिटेशनमुळे बऱ्याच गोष्टी घडल्या आणि ही प्रत्येक गोष्ट त्या काळातील गरजेनुसार घडत होती. परंतु एक गोष्ट मात्र नेहमी कायम राहिली ती म्हणजे माणसाला माणसाची सोबत आणि गरज वाटणे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे हॉलिवूडचा कास्ट अवे हा चित्रपट. यातील कथानकानुसार एक अतिशय सुखवस्तू माणूस एकाटाच एका बेटावर अडकतो. जगापासून तुटलेल्या या माणसाला बेटावरचा सुंदर निसर्ग न भावता फक्त एक गोष्ट हवीशी वाटते, ती म्हणजे एखादा तरी जिवंत माणूस बोलायला आणि सोबतीला असणे. तात्पर्य काय, तर तंत्रज्ञानाचा शोध माणसाने स्वतःसाठी लावला आहे. तंत्रज्ञान माणसासाठी आहे, माणूस तंत्रज्ञानासाठी नव्हे.

(भ्रमणध्वनी : ९९६७११२८०६) meenaljagdale@gmail.com


# काळापाशी असेल उत्तर

**मृणाल कुलकर्णी**

आजच्या माध्यमांची स्थिती अतिशय भांबावलेली आहे. कारण कोविडने माणसांच्या आयुष्यावर परिणाम झाला तसेच परिणाम माध्यमांवरही प्रचंड झाले. सगळ्याच माध्यमांचे प्रेक्षक वाढले. दूरचित्रवाणीचे प्रेक्षक वाढले; कारण करोनाच्या सुरुवातीच्या काही महिन्यांमध्ये वयस्कर माणसांना आपण घराबाहेरच पडू दिले नाही. तरुणवर्ग पूर्णपणे ओटीटीकडे वळला. त्यात शहरी तरुणवर्ग आहेच; पण ग्रामीण भागातल्या तरुणवर्गाचे त्यात मोठे प्रमाण आहे. हातात मोबाइल फोन आणि खिशाला परवडणारे नेटपॅक या मागचे कारण.

लॉकडाऊनच्या काळात मीही हे अनुभवले. मीही सगळ्यांसारखी घरी होते. थोडा वेळ हाताशी असल्याने काही नव्या पाककृती शिकूयात असे वाटल्याने सर्च केले आणि मी थक्क झाले. इतका पसारा वाढला आहे या माध्यमांचा की कोण काय बघेल हे सांगता येत नाही. याचा फार मोठा धोका वाहिन्यांना आहे आणि ओटीटीलासुद्धा आहे. ओटीटीवर सगळे येत आहे, पण त्याची जाहिरात कुठे आणि किती करायची हा प्रश्न आहे. ती वृत्तपत्रात देऊ शकत नाही. होर्डिंग लावून लावून किती लावणार, कारण किती लोक तो चित्रपट किंवा मालिका बघणार आहेत हे माहीत नाही. त्याच्यावर आधारित पूर्वी बजेट असायचे. अमुक चित्रपटगृहांमध्ये चित्रपट झळकणार असेल तर त्याच्या आसपास होर्डिंग लावली जायची. आता ते कसे करणार? आता खूप अटीतटीची स्पर्धा निर्माण झालेली आहे. अनेक पर्याय उपलब्ध झालेले आहेत, त्यामुळे प्रेक्षकांची थोडासा केअरलेस अ‍ॅटिट्युड (बेफिकीर मनोवृत्ती) निर्माण होणार आहे. तो आपण स्वीकारला पाहिजे. कोविडपूर्व काळात मराठी चित्रपटांबाबत माझ्या एक बाब लक्षात आली होती, की प्रीमिअरसाठी स्क्रीन बुक केलेला असायचा. समजा त्याच दिवशी एखादा हिंदी चित्रपट प्रदर्शित होत असेल तर त्याला प्रचंड गर्दी असे आणि तितकाच प्रेक्षक मराठी चित्रपटाला येत नसे. हिंदी बिग बजेट चित्रपटाच्या फर्स्ट डे फर्स्ट शोला मराठी प्रेक्षकही जातो. तेव्हा त्याचा विचार असतो हा मराठी चित्रपट पुढल्या आठवड्यात बघू आणि नंतर विचार केला जातो, की आताच हिंदी चित्रपट पाहिला, आता लगेच चित्रपट पाहायला नको, असे म्हणत मराठी चित्रपट बघायला जातच नाही. याच पार्श्वभूमीवर विचार करायचा झाला तर आता लोकांना मॅक्स प्लेअर वगैरे फ्री मिळत असेल तर येत्या काळात पेड ओटीटी वाहिन्यासुद्धा लोक बघतील की नाही याबद्दल थोडी साशंकता वाटते. पण त्यांनी त्या बघायला पाहिजेत. अलीकडेच मराठीत प्लॅनेट मराठीसारखा छान प्रयोग झाला आहे. टिपिकल मालिका बघायला कंटाळलेली जगभर विखुरलेली माणसे ते नक्कीच सबस्क्राइब करतील. त्यांचा कंटेंटही वेगळा आहे आणि त्यांना तो तसा निर्माण करावा लागेल. नाहीतर लोक म्हणतील की, सगळे बघून संपले. लॉकडाऊननंतर नेटफ्लिक्सबाबतीत काहीसे तसे झाले होते. जवळपास सगळा कंटेंट बघितला गेला होता. शिवाय लोकांची स्वतःची निवडही असते. मराठी, हिंदी, फार तर इंग्रजी, इतर भाषांमधले डब केलेले शोज बघण्याची मराठी लोकांची मानसिकता फारशी नाही. तरुणाई हे शो बघत असली तरी तो टक्का कमी आहे.

सध्या मनोरंजनाचे अनेक पर्याय उपलब्ध झाले आहेत. घराघरात स्मार्ट टीव्ही आले आहेत. वयस्कर लोक नेहमीचा टीव्ही (दूरचित्रवाणी) नावे ठेवत का होईना त्याच त्या मालिका बघणार. मध्यमवयीन पिढी आणि तरुणाई ही ओटीटीकडे वळताना दिसत आहे. ओटीटीवरच्या कंटेंटचा विचार केला तर या कंटेंटवर अनेकदा परकीय मालिकांचा अजूनही प्रभाव आहे. विशेषतः हिंदी मालिकांमध्ये तो अधिक दिसतो. या सगळ्याचे पुढे काय होणार आहे काही माहीत नाही. कलाकार, दिग्दर्शक यांना चांगले दिवस आहेत असे म्हणूयात. आता



*मनोरंजानासाठी अनेक पर्याय उपलब्ध आहेत हे कळल्यावर कदाचित लोकांचा थिएटरकडचा ओढा कमी होऊ शकतो. परंतु त्यांना जेव्हा लक्षात येईल की लाइव्ह ते लाइव्हच आहे. चित्रपट हा थिएटरमध्ये जाऊन घ्यायचाच अनुभव आहे, तेव्हा कदाचित ते पुन्हा थिएटरकडे वळतील, असे चित्र येत्या काही काळात दिसू शकेल.*

पहिल्यासारखी कुणीचीही मक्तेदारी राहिलेली नाही. तीच ती माणसे दिसणे, अमक्या कलाकाराचच चित्रपट चालणार हे सगळे प्रमाण आता कमी झाले आहे. आता काहीही हिट होऊ शकते.

जनजीवन पूर्वपदावर आले तरी माणसांचे ऑनलाइन असणे असणारच आहे. ओटीटी आणि एकूणच ऑनलाइन गोष्टींची ओळख आता झालेली आहे. ऑनलाईन कंटेंट हा आपल्या घरात आलेला आहे. त्यात आपल्याला निवडीचा पर्याय मिळालेला आहे. त्याचा उपयोग केला जाणारच. याचा परिणाम नक्कीच होईल. चित्रपट निर्माते, दिग्दर्शकांसाठी हे खूपच मोठे आव्हान आहे. पण त्यावर ते काही करू शकत नाहीत. नाट्यगृहे आणि चित्रपटगृहे सुरू झाल्यावर प्रेक्षकांची मानसिकता, त्यांची संख्या याबद्दल आता काहीच सांगता येणार नाही. ते लवकरच कळेल. मनोरंजानासाठी अनेक पर्याय उपलब्ध आहेत हे कळल्यावर कदाचित लोकांचा थिएटरकडचा ओढा कमी होऊ शकतो. परंतु त्यांना जेव्हा लक्षात येईल की लाइव्ह ते लाइव्हच आहे. चित्रपट हा थिएटरमध्ये जाऊन घ्यायचाच अनुभव आहे, तेव्हा कदाचित ते पुन्हा थिएटरकडे वळतील, असे चित्र येत्या काही काळात दिसू शकेल.

# व्यक्तिकेंद्रित बदल अटळ

**विराजस कुलकर्णी**

ऑनलाईन प्लॅटफॉर्म, वेबसीरीज या संकल्पना गेली पाच-सहा वर्षांपूर्वी आपल्यापुढे आल्या आहेत. तोपर्यंत यूट्यूबबसारखे फ्री प्लॅटफॉर्म होते आणि त्यावर कंटेंट निर्माण होत होता. त्यावरून पैसा कसा कमावण्यासाठी काहींचे प्रयत्न सुरू होते. केवळ ओटीटीच नव्हे तर सगळ्याच माध्यमांकडे बारकाईने पाहिले तर काही गोष्टी लक्षात येतील. माध्यमे ही किती लोकांपर्यंत पोचू शकतात यासह त्या त्या प्लॅटफॉर्मसाठी लागणारा कंटेंट तयार करण्यासाठी लागणारा पैसा आणि एक प्रेक्षक म्हणून तो कंटेंट विकत घेण्याची मानसिकता यावर अनेक महत्त्वाच्या गोष्टी ठरतात.

ओटीटीचा बोलबाला आता झाला असला तरी आधी साधारण दहा वर्षांत अंदाज बांधला गेलाच होता, की असे काही माध्यम येणार आहे. अर्थात हे स्थिरावले आहे असे म्हणता येणार नाही, अजून दहाएक वर्षे लागतील त्यासाठी, सध्या जशी दूरचित्रवाणी स्थिरावली आहे तशा पद्धतीने ओटीटी प्लॅटफॉर्म स्थिरावायला. मग



*ओटीटीचा बोलबाला आता झाला असला तरी आधी साधारण दहा वर्षांत अंदाज बांधला गेलाच होता, की असे काही माध्यम येणार आहे. अर्थात हे स्थिरावले आहे असे म्हणता येणार नाही, अजून दहाएक वर्षे लागतील त्यासाठी, येत्या वीस वर्षांत त्याहीपलीकडचे एक माध्यम येईल. केवळ माध्यमेच नाही तर एकूणच सगळ्या गोष्टी व्यक्तीकेंद्रित होतील असे मला वाटते.*

आपापल्या परीने आपापल्या पद्धतीच्या गोष्टी करून बघता येतील. मला वाटते, की येत्या वीस वर्षांत त्याहीपलीकडचे एक माध्यम येईल. मनोरंजनक्षेत्रामधला प्रत्येक निर्णय हा प्रेक्षकांना डोक्यात ठेवून घेतला जातो तरी त्यावर अनेकदा प्रश्नचिन्ह उमटलेले असते. त्याला बोल लावला जातो. आपण हे अनेकदा बोलतो किंवा ऐकतो की टीआरपीसाठी हे काहीही करतात. टीआरपी आणि आपण प्रेक्षक जे बघतो याचा संबंध कुठेतरी विसरला जातो. तो असतो आणि त्यावरून प्रेक्षकांना काय आवडते हे चाचपले जाते. एक 'सैराट' लोकप्रिय झाल्यावर त्याच्या आवृत्त्या येऊ शकतात कारण तो आवडल्याचे सिद्ध झालेले असते. हा सगळा आकड्यांचा खेळ आहे असे दिसते.

केवळ माध्यमेच नाही तर एकूणच सगळ्या गोष्टी व्यक्तीकेंद्रित होतील असे मला वाटते. पूर्वी अमुक वाहिनीवर अमुक कार्यक्रम अमुक वाजता लागेल तसा तुमचा दिवस आखा आणि तो बघा, असे असायचे. लोकांच्या कामाचे स्वरूप बदलले त्यात कामाच्या वेळा बदलल्या. ते लक्षात घेऊन वाहिन्या मालिकांचे पुनःप्रसारण करायला लागल्या. नंतर त्याही बघायला वेळ नसेल तर त्या रेकॉर्ड करून नंतर बघायची सोय आली. पुढे हव्या त्या वाहिनीचा पॅक विकत घेता यायला लागला. मग आम्ही मालिका ओटीटीवर दाखवतो त्या तुमच्या सोयीने बघा, ही सोय झाली. नेटफ्लिक्ससारख्या प्लॅटफॉर्मवर आठवड्याला एक भाग प्रदर्शित करण्याऐवजी तेवीस भाग एकाच वेळी प्रदर्शित केले जातात. तुमच्या सोयीने हवे तसे बघा. त्यामुळे माध्यमे व्यक्तीकेंद्रित होण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे, असे दिसते.

ओटीटी हा प्लॅटफॉर्म काही मोजक्या लोकांपुरता मर्यादित आहे. तो समाजमाध्यमांइतका सगळ्यांपर्यंत पोचलेला नाही, असे एक मत मांडले जाते. जवळपास हेच विधान चार्ली चॅप्लिन यांनी बोलपटांबद्दल केले होते. आताची परिस्थिती आपण बघतो आहोतच. दर वेळी माध्यमाच्या कूस बदलण्याच्या वेळी, अर्थात त्यात बदल होतात तेव्हा हे विधान केले जातेच. अजून दहा वर्षांत आपल्याला अंदाज येईल की काय टिकले आणि काय नाही टिकले याचा. प्रेक्षकांना नवीन गोष्टी हव्या असतात. ओटीटी प्लॅटफॉर्मचा विचार केला जातो तेव्हा त्यावरचा वाईट कंटेंट कुणी बघत नाही. काही वेळा मोठ्या बॅनरचे चित्रपटही ढेपाळतात. अयशस्वी ठरतात. येथे प्रेक्षकांना कंटेंटशी देणे-घेणे असते हे लक्षात घेतले पाहिजे. कलाकार, दिग्दर्शक, भाषा आदी गोष्टींमुळे चित्रपट चालला असा विचार असण्याचे दिवस मागे पडले आहेत. नेटफ्लिक्सवरची मनी हाईस्ट ही स्पॅनिश वेबसीरिज प्रचंड चालते, तेव्हा त्यातला कंटेंट चांगला असल्याने ते घडले हे दिसते. आता हे सगळे बघणारी तरुणाई काही वर्षांत मध्यमवयीन होणार आहे. तेव्हा ते डिसिजन मेकर असतील. त्यांच्या खिशात पैसा असेल. तेव्हा काय होते आहे ते दिसेलच.

दूरचित्रवाणी असो किंवा ओटीटी अन्य माध्यमे त्यांचा कुटुंबसंस्थेवर परिणाम होतो किंवा नाही असे मत बऱ्याचदा विचारले जाते. त्यातही दूरचित्रवाणी सगळे एकत्र बसून बघत आणि आता ओटीटी वैयक्तिक पातळीवर बघितले जाते, असा सूर असतो. परंतु मला वाटते खरेच जर केवळ दूरचित्रवाणी बघायला म्हणून कुटुंबातले सदस्य एकत्र येत असतील तर ती उलट चांगली गोष्ट नाही. ओटीटी असो किंवा अन्य काही, ते माध्यम त्यांच्या त्यांच्या मनातल्या हेतूसाठी साध्य होते आहे का आणि त्यातून तो काही शिकतो आहे का हे बघावे.

**मीनल जगदाळे, मृणाल कुलकर्णी आणि विराजस कुलकर्णी**
यांच्या लेखांचे **शब्दांकन राधिका कुंटे**
kunte.radhika@gmail.com



# भरतीची लाट!

**प्राजक्ता माळी**

मला असं वाटतं की ओटीटीचा प्रेक्षकवर्ग हा सध्यातरी तरुणवर्गच आहे. मध्यमवयीन आणि वयाची साठी ओलांडलेली माणसं अजूनही ओटीटीपासून दूर आहेत. ही सगळी मंडळी अजूनही टेलिव्हिजनशीच प्रामाणिक आहेत. हे गणित येत्या काळात निश्‍चितच बदलू शकतं, ओटीटीनं अधिक सशक्त आशय आणला तर! दुर्दैवाने मला असं वाटतंय की ओटीटी हा सध्या फक्त मनोरंजनाचा महास्फोट आहे. शिवाय त्यावर निर्बंध नसल्यानं कोणत्याही प्रकारचा आशय, कोणत्याही स्वरूपात तिथे व्यक्त केला जातोय. कधी कधी तर मला असंही वाटतं की, एक अनावश्यक बोल्डनेस त्यात अधिक प्रमाणात येतोय. त्या बोल्डनेसमध्ये फार काही वैचारिकता वगैरे आहे असं मला अजिबात वाटत नाही. कधी कधी मर्यादेची पातळी गरज नसताना ओलांडली जातेय. अर्थात घरात सगळ्यांसमोर आणि सगळ्यांच्या मोबाइलवर उपलब्ध असलेले माध्यम असल्याने ओटीटी प्लॅटफॉर्म सर्वांच्या सोयीचा आहे, हे तितकंच खरं आहे. परंतु कोरोना महामारीच्या काळात, लॉकडाऊनमुळे दुर्दैवानं अन्य पर्याय उपलब्ध नसल्यानं लोक अपरिहार्यपणे त्याकडे वळलेत याचं भान ठेवलं गेलं आहे असं मला वाटत नाही. पर्याय उपलब्ध नसल्यामुळे प्रेक्षकसंख्या वाढतेय हे लक्षात न घेता, प्रेक्षकांवर अक्षरश: विविध विषयांचा भडिमार सतत केला जातोय. दर्जा टिकवला नाही तर एके दिवशी हा डोलारा कोसळू शकतो हेही लक्षात घेणं आवश्यक आहे. इथे व्यक्त होणार ते 'चांगलंच असतं' हा विश्वास ओटीटीबाबत निर्माण झाला तरच त्याला भवितव्य आहे. मी क्लासिकल नृत्यांगना आहे. अभिजात संस्कृती आणि अभिजात कलांकडे माझी जास्त ओढ असल्यामुळे माझं व्यक्तिगत मत विचाराल तर मी असं म्हणेन की नाटकाचा, नृत्याचा जिवंत अनुभव देणारा जो आनंद असतो तो इतर माध्यमांवर मिळणं कठीण आहे. प्रत्यक्ष रंगमंच, नाट्यगृह यातील अनुभव एकदम वरच्या पातळीवर नेणारे असतात. कारण आपली तिथे प्रत्यक्ष उपस्थिती असते. त्या कलाकृतीचा आपणही एक घटक असतो. याच कलाकृती सिनेमा, थिएटरमधून आपण आस्वादतो तेव्हा या आनंदात निश्‍चितच बदल होतो. तो आनंद काही प्रमाणात उणावतो. हाच आनंद आपण टेलिव्हिजनवर मिळवण्याचा प्रयत्न केला. यात तर आनंदाची पातळी आणखी खाली आली. कारण इथे आपण त्रयस्थ असतो. आणि आता हेच विश्व आपण मोबाइलमध्ये आणलंय. त्यामुळे आनंद, तृप्तता, समाधान यात कुठेतरी उणीव येते. रंगमचीय आविष्कार प्रत्यक्ष घेताना जे समाधान व जी तृप्तता मिळते तीच अनुभूती सिनेमा बघताना मिळत नाही असं माझं प्रामाणिक मत आहे. सुदैवानं म्हणा, दुर्दैवानं म्हणा, परिस्थितीच अशी होती की कोरोना महामारीमुळे प्रत्यक्ष कलाकृतीचा रसानुभव घेणं लॉकडाऊन काळात शक्य नव्हतं. त्यामुळे पर्याय शिल्लक नसल्यामुळे लोकांनी याचा स्वीकार केला आहे. परंतु सिनेमागृह आणि नाट्यगृह उघडतील तेव्हा निम्मी प्रजा पुन्हा जिवंत अनुभव देणाऱ्या माध्यमांकडे परतेल. मीही ओटीटी सोडून जास्त वेळ थिएटर, नाट्यगृहं यांनाच देईन. छोट्या माध्यमात मी माझा आनंद नक्कीच शोधणार नाही. मला समविचारी अनेक मंडळी असू शकतात की जे जिवंत अनुभव देणारी नाट्यगृहे आणि त्याखालोखाल भव्यदिव्यतेचा आस्वाद देणारी सिनेमागृहं यातच खरं समाधान शोधतील.

थिएटर अजिबात बाद होणार नाही एवढं निश्चित आहे, कारण ७० मिमीची जादू काही औरच आहे. एखादी कलाकृती आपण थिएटरला जाऊन बघतो तेव्हा ती मनाला अधिक भिडते. उदाहरणार्थ, 'बाहुबली'सारखी कलाकृती घरी बसून किंवा मोबाइलवर बघितली गेली तर चित्रपटातल्या भव्यदिव्यत्वाचा साक्षात्कार होणारच नाही. सिनेमागृहात ७०मिमीच्या पडद्यावर चित्रपटातले मोठमोठे सेट, त्यातील भव्यदिव्यता हे अधिक परिणामकारक ठरतात. त्यामुळे चित्रपट आपल्यापर्यंत अधिक पोहोचतो, मनात खोलवर रुततो आणि त्याच्या स्मृती कायमस्वरूपी आपल्या मनात राहतात. ही आठवण आपल्याला आयुष्यभर सोबत करते. नाटकांचा प्रत्यक्ष अनुभव घेतानाही, एखादे पात्र जिवंतपणे आपल्यासमोर साकार होते तेव्हा तो अनुभव मन:पटलावर आयुष्यभर कोरला जातो. कारण त्याची स्पंदनं आपण स्वत: प्रत्यक्ष अनुभवत असतो. याउलट टीव्ही आणि मोबाइल स्क्रीनवर पाहिलेल्या कलाकृती मन:पटलावर रेंगाळत राहण्याचा काळ हा हळूहळू कमी कमी होत जातो. तो अनुभव पटकन विरून जातो. त्यामुळे मला असं वाटतं, की नाट्यगृह आणि थिएटरची जागा ओटीटी घेऊच शकणार नाही. हे तात्पुरतं आहे. कारण लोकांची त्यात सोय आहे.

ओटीटीवर उपलब्ध असणारे सिनेमे-वेबसीरिज आपण अगदी जगाच्या पाठीवर कुठेही बसून पाहू शकतो, आपल्या सोयीनुसार त्याचा आस्वाद घेऊ शकतो. त्यामुळे समांतर पातळीवर हा प्लॅटफॉर्म नक्कीच चालू राहील. परंतु म्हणून त्यामुळे नाट्यगृह, थिएटर, दूरचित्रवाणी वाहिन्या यांचं मरण मात्र निश्‍चितच होणार नाही.

**– प्राजक्ता माळी** (prajakttamali@gmail.com)

**शब्दांकन : डॉ. लतिका भानुशाली**
(bhanushali.latika@gmail.com)




# मूठभर रसिकांसाठी

**ज्योत्स्ना केतकर**

> *एक वळण येईल जेव्हा काही मूठभर माणसं तरी पुन्हा मूलभूत आनंद शोधायला लागतील... मग ही मूठ शेतकऱ्यांची असेल, लेखक-कवींची किंवा संगीतरसिकांची असेल. अशा मूठभरांसाठी कम्युनिटी रेडिओ हाही एक चांगला पर्याय असेल.*

बदलाच्या झंझावातानं प्रत्येक क्षेत्र काबीज केलंय. टेलिफोन ते स्मार्ट फोन व्हाया पेजर हा दूरध्वनीचा प्रवास आज पन्नाशीत असलेल्या पिढीनं बघितलाय. दरबारात सादर होऊन राजाश्रय मिळवण्यापासून सुरू झालेला संगीताचा प्रवास तर थक्क करणारा. आकाशवाणीच्या माध्यमातून लोकाश्रय मिळवत पुढे रेकॉर्ड, कॅसेट, सीडी या माध्यमांना मागे सारत आता थेट यूट्यूबवरूनच लोकांपर्यंत पोचतं ते. हा झाला संगीताच्या माध्यमातला बदल. प्रत्यक्ष संगीत या कलेचं अंतरंगसुद्धा किती बदलत गेलं. ऐसपैस मांडणीची शास्त्रीय रागदारी, टप्पा-ठुमरी, कजरी-होरीसारखं आटोपशीर रंजक उपशास्त्रीय संगीत, नाट्यसंगीत ते सिने-भावगीतं जनसामान्यात लोकप्रिय होण्याचा संगीताचा प्रवासही कालसुसंगत म्हणावा असाच. ही यादी अनंत, सर्वव्यापी. यालाच थोडक्यात 'काळ बदलणे' म्हणतात.

बदल हेच एक शाश्वत सत्य हे तर खरंच, पण काळाच्या वेगानुसार आपल्या बदलाचा वेग ज्याला राखता येतो ते टिकतं. बाकीचं कालबाह्य होत जातं. टपालसेवा, वर्तमानपत्र ही त्याची काही ठळक उदाहरणं. आकाशवाणीच्या बाबतीत विचार करायचा तर 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' हे ब्रीद घेऊन नऊ-साडेनऊ दशकांपूर्वी आपली वाटचाल सुरू करणाऱ्या आकाशवाणीचं भविष्य काय असेल? रेडिओ ऐकताना बहुतांश वेळा आपली नेहमीची कामं करता येतात. आता तर इयर फोन लावून खिशातल्या मोबाइलवर कुठेही हलत, फिरत, काम करत रेडिओ ऐकता येतो. हे झालं रेडिओचं प्रमुख बलस्थान. याशिवाय याची विश्वासार्हता हे एक महत्त्वाचं बलस्थान. कोणत्याही विषयाचा सर्वांगीण विचार करून ताल आणि तोल राखत देत असलेल्या माहितीच्या मुद्यांच्या परिणामांचं भान राखत सातत्यानं नवनवीन विषय मांडणारं, प्रसारित करणारं हे एक प्रभावी माध्यम आहे. वार्तांकन, सत्यघटनांचं हुबेहूब चित्र उभं करणं, नृत्य अशा सगळ्यासाठी दृकश्राव्य माध्यम निश्चितच उपयुक्त. पण इतर सृजनात्मक प्रसारण - कथा, नाटक, कविता, ललित साहित्य यासाठी ध्वनिमाध्यम निश्चितच अधिक प्रभावी. कारण ते आशयाला कोणत्याही आकृतीत, चौकटीत बंदिस्त करत नाही. ऐकणाऱ्याच्या अनुभवविश्वासानुसार, कल्पनाशक्तीनुसार, आकलनक्षमतेनुसार आशयाच्या विस्तारासाठी ते पूरक ठरतं. गाण्यांच्या बाबतीत तर आपल्या आवडत्या प्ले लिस्टमध्ये विशिष्ट क्रमानं गाणी लागत राहतात.

आज चाळिशीच्या पुढच्या पिढ्यांमध्ये आकाशवाणी लोकप्रिय आहे. तथापि अधिकाधिक तरुणांना आकर्षित करण्यासाठी तिला विशेष प्रयत्न करावे लागतील.

आकाशवाणीच्या आणि खाजगी एफएम वाहिन्यांमुळे तरुणांचा ओढाही रेडीओकडे वळला. परंतु पुन्हा एक बलाढ्य प्रतिस्पर्धी आला. इंटरनेट, मोबाइल, स्मार्ट फोन आले आणि सोशल मीडिया अर्थात समाजमाध्यम नावाचं अफाट माध्यम अवतीर्ण झालं. यूट्यूब, व्हॉट्सॲप, फेसबुक, ट्विटर, ओटीटी प्लॅटफॉर्म ही त्याची विविध रूपं. या माध्यमामुळे माहितीचा जणू विस्फोटच झाला. मनोरंजनाचा असा विस्फोट आणि माहिती समाज-माध्यमांवरून तत्क्षणी वायरल होणं यामुळे माणसाचं आयुष्य आमूलाग्र बदलून गेलंय.

एक वळण येईल जेव्हा हळूहळू यातली वैय्यर्थता जाणवायला लागणाऱ्यांची संख्या वाढेल, आणि काही मूठभर माणसं तरी पुन्हा मूलभूत आनंद शोधायला लागतील... (आज चमचमीत, चटपटीत तयार पदार्थांच्या अतिरेकी लोकप्रियतेच्या दिवसांत काही मूठभर लोक जसे सेंद्रिय पदार्थांकडे वळताहेत तसं....) मग ही मूठ शेतकऱ्यांची असेल, लेखक-कवींची किंवा संगीतरसिकांची असेल. अशा मूठभरांसाठी कम्युनिटी रेडिओ हाही एक चांगला पर्याय असेल.

या मुठीचा हळूहळू पसा होत हा पसारा वाढत जाईल. आज बदलत्या तंत्रज्ञानाबरोबर आपल्या प्रसारणाच्या माध्यमसंकल्पना विस्तारत आकाशवाणी मोबाइलवर लाइव्ह स्ट्रीमिंग करून आपलं प्रसारण देशाच्याही सीमा पार करून जगभर पोचवते, पूर्वी प्रसारित झालेले कार्यक्रम श्रोत्यांना आपल्या सोयीच्या वेळी ऐकण्यासाठी यूट्यूबवर उपलब्ध करून देत आहे. पॉडकास्ट करण्याबरोबरच या माध्यमातून आर्थिक स्वायत्तता बळकट करण्याचे तिचे प्रयत्न चालू आहेत, माध्यमबदलाच्या लाटेवर स्वार होत ती आपल्या परिघाचा विस्तार करत आहे. भविष्यातल्या या वळणाला कवेत घेण्यासाठीही ती नवे कालसुसंगत मार्ग अवलंबून तयार असेल. अशा रीतीनं ही प्रसारणाची गंगा सक्षमतेनं वाहत राहील, आपल्या कक्षा रुंदावत राहील अशी खात्री वाटते.

**- ज्योत्स्ना केतकर**

jyotsna.ketkar@gmail.com

## गझल

दुनिया तर दुनियेने नासवली होती!
दुनिया इतकी कशास मग दुःखी होती?

आकाशाचे किणकिणणे ऐकत होतो
नक्षत्रांची काल एक पार्टी होती

सर्व पुस्तके होती पुढच्या बाजूला
मागे 'लाफिंग बुद्धाची' मूर्ती होती

तगमग होती ती कोणाच्या तृष्णेची?
लाटच वाळूवर चालत आली होती

तुझ्या नखांना आली त्या वेळी टोके
आणिक माझी जखम खूप ताजी होती

काय पाहिले होते मी डोळ्यात तुझ्या?
(काय पाहण्याची इच्छा झाली होती?)

तुला उडीची कल्पनाच आली नाही
(तुझी दरीची कल्पनाच भलती होती)

तो माझ्या वणव्यात अता मागे वाटा
(एकसारखी दोघांची ठिणगी होती)

प्रश्न हाच छळतोय कटोऱ्याला त्याच्या
माझी झोळी इतकी का भरली होती?


तीच तुझ्या शब्दातुन पडली भसाभसा
जी वाळू नजरेत तुझ्या भरली होती

त्याचे काळावर काही ठसणार कसे?
त्याची शिंतोड्यांपुरती शाई होती

तिला जन्मभर झोप कधी आली नाही
कुठल्या बेचैनीची ती आई होती?

**– चंद्रशेखर सानेकर**
९८२०१६६२४३





## ती

अनेक वर्षांपासून आहेच ती
माझ्या आसपास
हसरी, खेळकर, उमलत्या तारुण्यातली
काल होती
काल सकाळी होती.
दुपारीही होती झऱ्यासारखी खळखळत
निघालेली खेळायला मैदानावर
अशीच असायची ती आसपास
आजतागायत

नाही, आजतागायत नाही...
आत्ता आहे ती समोर,
पडलीये रक्तबंबाळ होऊन
फाटलेल्या-तुटलेल्या शरीरमनाची
जीवन्मृत

**– उषा मेहता**
९८३३०८४२८३

## बाईला कळतं पाहिल्याबरोबर

बाईला कळतं
पाहिल्याबरोबर
की या साडीचा
वा ड्रेसपीसचा
वा परकराचा
वा ब्लाऊजपीसचा
रंग जाणार हळूहळू

किंवा काळी पडणार
साडीची जर
वा निखळणार मोती त्यावरचे

पण बाई
कपड्यावरील रंगाच्या
वा नक्षीच्या
वा कशिदाकारीच्या
इतकी मोहात
की
माहीत असूनही पदरमोड करत
घेतेच ती
आवडलेल्या रंगाचा
वा नक्षीचा
वा कशिद्याचा तो पेहराव
आणि नंतर
चुकचुकत राहते
स्वतःला आवरलं नाही म्हणून

आणि जे
रंगीत नक्षीदार कशिद्याच्या
पेहरावाबाबत
तेच
अगदी तेच
आयुष्याच्या जोडीदाराबाबतही

**– किरण येले**
९८६९२६०७८०



## पाऊल टाकत आहे!

देहामधली, हरेक पेशी, तुला पुकारत आहे,
सैरभैर मन, तुझ्या दिशेने, अखंड धावत आहे!

हे श्वासांचे, येणे जाणे, तुझ्या इशाऱ्यावरती...
तुझ्याचसाठी, हृदय दिवाणे, अविरत स्पंदत आहे!

ही स्पर्शाची, किमया, की, ही जादू सहवासाची?
आजवरी जपलेली गुपिते... तुलाच सांगत आहे!

परमेश्वर वा गुरू मानले, नाही कधी तुला मी
मित्र सखा, जिवलग माझा मी तुझ्यात शोधत आहे

जिथे पाउले, टाकतोस तू, फुले उमलती तेथे...
पदचिन्हांवर तुझ्याच मीही, पाऊल टाकत आहे!

**– सदानंद डबीर**
९८१९१७८४२०

## बांगड्या

१
उलगडून मन कुणीतरी, सांगा मला गोष्ट
तीही उघड आणि स्पष्ट
ही कोणती आहे दादा?
बारमाही पावसाची गोष्ट

२
पानगळीच्या दारात आहे
नवा जळीताचा हंगाम
दलालांच्या घरापाशी तोंड लपवतो घाम

३
तालुक्याच्या बाजाराशी कोण मागतो दाम?
ॲमेझॉनच्या जंगलामध्ये गायब झाला राम

४
चिंदी कुंदी झडून गेलं, कापरासारखं उडून गेलं
पाणी नाही, वारा नाही, मरण सगळं घडून गेलं

५
झाडं बघा पेटली पेटली
नद्या बघा सुटल्या सुटल्या
ऋतुचक्राच्या दगडावरती
किती बांगड्या फुटल्या फुटल्या?

**– संजय कृष्णाजी पाटील**
९८२०२९७३४९





## वॉकिंग ट्रॅक

एक श्रीमंत आजोबा
अतिशय आकर्षक ढकलगाडीतून
आपल्या नातवंडाला घेऊन आलेले!
ती गाडी सगळ्यांनाच आकर्षित करत होती.
एक गरीब आजोबा
आपल्या नातवंडाला
कडेवर घेऊन आलेले!
त्याला कडेवरून उतरताच
ते छोटे नातवंड म्हणाले,
‘आजोबा, मलाही त्या गाडीत बसायचंय!’
मी सहज ऐकलेले हे वाक्य.
आजोबा काळजीत.
मी माझी फेरी पूर्ण करून आले.
दुसऱ्या फेरीत
मला दिसले गाडीतले नातवंड,
खाली उतरून गाडीला धरून,
हळूहळू चालत होते!
मी ऐकलेलं वाक्य,
नेमकं त्या गाडीतल्या नातवंडाने ऐकले
की त्याच्या आजोबांनी ऐकले?
ते नातवंड स्वतःहून गाडीतून उतरले?
की आजोबांनी त्याला उतरवले?
आता या वॉकिंग ट्रॅकवर
दोन आजोबा, दोन नातवंडे चालत आहेत,
एका पातळीवर येऊन!
दोन्ही आजोबा, दोन्ही नातवंडे खूप खुश.
संपूर्ण जग एकाच पातळीवर
आल्यासारखे... मीही खुश!

**– प्रा. प्रतिभा सराफ**
९८९२५३२७९५

## कवीला शोधत पाऊस आला

कवीला शोधत पाऊस आला
दारात थांबून ओलाचिंब झाला...

रिप रिप करत घरात घुसला
कोरडे शब्द पाहून मनात हसला...

रांगत रांगत घरात येऊन बसला
आणि वेडा एका वहीत फसला...

निघताना त्याचा कंठ होता दाटला
चुलीजवळील आईला आपलाच वाटला

घरातील त्याचा मुक्काम संपला
आकाशी ढगांनी थेंबाचा नवस केला

वहीस कळत नाही वेडे पाऊस गाणे
वेळी अवेळी त्याचे असे येणे अन् जाणे

कवीला शोधत पाऊस आला
वहीत गेला नि कवीचा झाला!

**– मोहन काळे**
९८६९२३६०८३




## कोडं

त्या निरक्षर, अशिक्षित,
विचार न करू शकणाऱ्या
नवजात अर्भकाच्या
जीवनोत्सुक डोळ्यांत
नव्हता कोणताच अपराधी भाव
जन्मल्यावर.

घरातली साक्षर, सुशिक्षित,
विचार करू शकणारी
मोठी माणसं मात्र
का बाऊ करत होती
मुलगी जन्माला आल्याचा
हे कोडं सुटता सुटत नाहीये अजून

**– हर्षदा सुंठणकर**
७३४९३१२९४८



## धमकी

हातांची घडी तोंडावर बोट
शिक्षा मोडायची नाही
शिक्षेत वाढ होईल.

अर्थातच
मी गप्प
संधीच्या शोधात.

शिक्षा मोडलीस तर
बोटे छाटली जातील
हातांची (खूप लिहिलेस!)
दंड गळून पडतील
डावे उजवे; उजवे डावे
गालफडं सुजतील.

असेही होऊ शकते की
तुझी जीभच छाटली जाईल
खूप बोललास आत्तापर्यंत
शिक्षा तर होणारच आणि
तुला काही चॉईसही नाही.

मी हातांची घडी मोडली
तोंडावरचे बोट काढले
काहीही झाले नाही.

मला माझे स्वातंत्र्य
पुन्हा परत मिळाले.

**– प्रकाश हरी कार्लेकर**
९८३३३९१३४४

## मान



बाईची मान
खूप महत्त्वाची..

एकदा जरी
तिनी फिरवली
तर परत
कधीच वळत नाही
तुमच्याकडे..

मग काय होते
तुम्ही शोधत राहता..
तिची प्रेमळ नजर
काळजीनी  भरलेली .

तुम्ही शोधता
ते हसू ...
चेहऱ्यावर पसरलेले..


तुम्ही शोधत राहता
त्या खळ्या...
दोन्ही गालांवर...

तुम्ही शोधत राहता...
ती बट...
गालावर रुळणारी...

शोधत राहता तुम्ही...
ते सगळे काही
जे दिसत नाहीये
आता
फिरवलेल्या मानेमुळे...

पण...
पण...
दिसते ती
फक्त फिरवलेली मान...

आणि...
हे जे जे काही आहे
त्यातले तुम्हाला
काही...काहीही
दिसत नाही...




तेव्हा
बाईची मान
महत्त्वाची..

मान...
ती पण
तुमच्याकडे
न फिरवलेली...!

– **अविनाश**
९८२२३२६९१९

## आकाशाचे निळे अर्थ



आकाशाचे निळे अर्थ
जिथे येऊन बिलगतात
समुद्राच्या पुळणीला
तिथे...
सुंदरशी ओॲसिस
होतात तयार

हे असं नेहमीच नसावं होत.

पांढऱ्यावर काळे करणाऱ्या
एखाद्या पुण्यवंताचे हात
आधी पुरावे लागतात तिथं

पांथस्थानी पाणी पिण्याची कृपा करावी

– **डॉ. धीरज कुलकर्णी**
९८२२४५१९२८

# द प्रिन्स - निकोलो मॅकिव्हेली
# (The Prince by Niccolo Machiavelli)

राजीव श्रीखंडे

निकोलो मॅकिव्हेली हा पंधराव्या-सोळाव्या शतकात होऊन गेलेला इटलीतील तत्त्वज्ञ, मुत्सद्दी राजकारणी आणि प्रसिद्ध नेता होता. त्याचा जन्म (Florence) फ्लॉरेन्समध्ये ३ मे १४६९ रोजी झाला. एका प्रतिष्ठित कुटुंबातील आईवडिलांचे हे दोन मुलींच्या पाठीवरचे शेंडेफळ. मॅकिव्हेलीचे वडील वकील होते. त्याच्या पूर्वायुष्याविषयी फार माहिती उपलब्ध नाही.

१४९४ साली फ्लॉरेन्स हे गणसत्ताक राज्य झाले. त्यावर राज्य करणाऱ्या मेडिसी कुटुंबाला देश सोडून परागंदा व्हावे लागले. १४९८ साली मॅकिव्हेलीची office of the second chancery मध्ये नेमणूक झाली. सरकारची अधिकृत पत्रके प्रसिद्ध करणे हे त्याचे काम. काही कालावधीनंतर त्याची Signona च्या स्वीय साहाय्यकपदी नेमणूक झाली.


सोळाव्या शतकाच्या पहिल्या दशकात त्याने राजकीय मुत्सद्दी म्हणून परदेशांत बऱ्याच मोहिमा पार पाडल्या. मुख्यतः रोमच्या कॅथलिक चर्चकडे. फ्लॉरेन्सने त्याला पिस्टोरियामध्ये लढाई करणाऱ्या दोन घटकांमध्ये सामंजस्य प्रस्थापित करण्यासाठी पाठवले. तेथे १५०१ आणि १५०२ मध्ये मोठ्या दंगली झाल्या होत्या. मॅकिव्हेलीच्या सल्ल्यानुसार या दोन्ही घटकांच्या नेत्यांना हद्दपार करण्यात आले आणि त्यामुळे तेथे शांतता प्रस्थापित झाली. १५०२ आणि १५०३ मध्ये पोप अलेक्झांडर सहावा आणि त्याचा पुत्र सिसर बोर्जिया (Cesare Borgia) हे धर्माचे रक्षण करण्याच्या नावाखाली इटलीच्या बऱ्याच भागांवर चर्चची सत्ता स्थापित करण्याच्या प्रयत्नात होते. त्याकाळी इटलीवर सत्ता मिळवण्यासाठी फ्रान्स, स्पेन आणि रोमन चर्च यांच्यामध्ये मोठी स्पर्धा चालू होती. त्यामुळे फ्रान्सच्या आणि स्पेनच्या दरबारांतही मॅकिव्हेलीने अनेकदा हजेरी लावली.


सोळाव्या शतकाच्या प्रारंभीच त्याने फ्लॉरेन्समध्ये नागरिकांतूनच सैन्य उभारण्याची कल्पना मांडली आणि ती अमलातही आणली. त्याकाळी चलती असणाऱ्या भाडोत्री सैनिकांवर मॅकिव्हेलीचा मुळातच विश्वास नव्हता. तो त्यांचा तिटकारा करत असे. १५०६ मध्ये त्याने शस्त्रात्रांनी सज्ज ४०० शेतकऱ्यांची फौज उभारली. १४९४ साली पिसाने शंभर वर्षांची फ्लॉरेन्सची सत्ता उलथवून स्वातंत्र्य मिळवले होते आणि त्याच पिसाला पुन्हा फ्लॉरेन्सच्या अधिपत्याखाली आणण्याचा फ्लॉरेन्सचा प्रयत्न काही वर्षांपासून सुरू होता. मॅकिव्हेलीने उभारलेल्या नागरिकांच्या फौजेला नेहमीच यश मिळत होते. याच फौजेने १५०९ मध्ये पिसा परत मिळवण्यात यश संपादन केले.

मॅकिव्हेलीचे हे यश फार काळ टिकले नाही. १५१२ मध्ये मेडिसीने पोप ज्युलिस दुसरा याचा पाठिंबा मिळवला आणि स्पॅनिश सैन्याच्या साहाय्याने फ्लॉरेन्सच्या लष्कराचा पराभव करत फ्लॉरेन्सवर ताबा मिळवला. मेडिसी गादीवर परत आल्यामुळे फ्लॉरेन्सच्या गणराज्याचा अंत झाला. मॅकिव्हेलीला एका वर्षासाठी हद्दपार करण्यात आले. १५१३ मध्ये मेडिसीने मॅकिव्हेलीवर त्यांच्याविरुद्ध कटकारस्थान केल्याचा आरोप ठेवून त्याला बंदिवान केले. तुरुंगात त्याचा बराच छळ करण्यात आला. तरी मॅकिव्हेली शेवटपर्यंत आपण निर्दोष आहोत असेच सांगत होता. शेवटी काही पुरावा न मिळाल्यामुळे त्याची तीन आठवड्यांनंतर सुटका करण्यात आली.

त्यानंतर मॅकिव्हेली सॅन्ट ॲण्ड्रिया (Sant Andrea) मध्ये असलेल्या त्याच्या शेतावर राहायला गेला. तेथेच तो राजकारणातले सिद्धांत मांडण्यात मग्न झाला. त्याने फ्रान्स, जर्मनी आणि इटलीतील काही भागांना बऱ्याच भेटी दिल्या, जेथे त्याने फ्लॉरेन्स गणराज्याचे प्रतिनिधित्व केले होते. राजकारणात पुन्हा येण्याची शक्यता मावळल्यामुळे त्याने फ्लॉरेन्समधल्या एका बुद्धिजीवी गटात भाग घेण्यास सुरुवात केली. या काळात त्याने अनेक नाटके लिहिली. ती लोकप्रिय ठरली. तरी राजकारण हा त्याचा प्राण होता आणि अनेक राजकारणी मित्रांशी त्याचा पत्रव्यवहार चालूच होता. राजकारणात परत येण्याचा त्याचा प्रयत्नही होता, पण त्यात त्याला यश मिळाले नाही.

मॅकिव्हेलीचा मृत्यू २१ जून १५२७ रोजी झाला. त्याचे दफन फ्लॉरेन्समधील The Church of Santa Croce येथे केले गेले. त्याच्या थडग्यावर So Great a name has no adequate Praise असे लिहिलेले आहे. इटलीच्या राजकारणाच्या एका अत्यंत अस्थिर, वादळी काळात मॅकिव्हेलीचा जन्म झाला आणि याच काळात त्याने पुढे राजकारण केले. त्यावेळी भाडोत्री सैन्यांवर सगळ्याच सत्ताधीशांची मदार असल्यामुळे निष्ठा घटकेघटकेत बदलत असत, राज्यात थोड्या कालावधीत प्रचंड उलथापालथी घडत असत. या सगळ्या राजकारणातला अनुभव गाठीला घेऊनच त्याने The Prince आणि Discourses of Livy ही राजकारणावरची अत्यंत श्रेष्ठ अशी



**निकोलो मॅकिव्हेली**

पुस्तके लिहिली. मॅकिव्हेलीला आधुनिक राजकारणाच्या तत्त्वज्ञानाचा आणि राजकीय शास्त्राचा जनक मानले जाते.

मॅकिअॅव्हेलियन (Machiavelian) हा शब्दही त्याच्या नावावरून अनेक भाषांत रूढ झाला आहे. धूर्त, कावेबाज, नीतिमत्तेचा अभाव असलेला, कपटी, कारस्थानी असा या शब्दाचा अर्थ आहे. हे बिरुद मॅकिव्हेलीला मिळाले ते The Prince या पुस्तकात त्याने मांडलेल्या राजकारणाच्या सिद्धांतांमुळे.

'द प्रिन्स' हे एक छोटेखानी पुस्तक आहे. विषयांनुसार पुस्तकाची वेगवेगळ्या प्रकरणांत विभागणी केलेली आहे. मॅकिव्हेलीने प्रत्येक प्रकरणाला शीर्षक देऊन तो त्या प्रकरणात काय मांडतो आहे हे स्पष्ट केलेले आहे. त्याची वर्गवारी अशी करता येईल :

भाग पहिला - राज्ये

भाग दुसरा - मिश्र राज्ये

भाग तिसरा - पूर्णतः नवीन राज्ये

भाग चौथा - राजाची बलस्थाने

भाग पाचवा - ख्रिश्चन धर्माधिष्ठित राज्ये

भाग सहावा - संरक्षण आणि लष्कर

भाग सातवा - राजाचे गुणावगुण

भाग आठवा - राजाचे दूरदर्शित्व आणि विवेक

पहिले प्रकरण आहे New Princedoms म्हणजेच नवी राज्ये. यामध्ये राजेशाही आणि गणराज्ये या दोहोंचाही समावेश होतो. मॅकिव्हेलीने असे म्हटले आहे की 'द प्रिन्स' या पुस्तकात तो फक्त राजेशाहीवरच बोलणार आहे, कारण गणराज्यांवर त्याने वेगळी टिप्पणी केलेली आहे. हा संदर्भ The Discourses on Livy चा आहे हे तर उघडच आहे. मॅकिव्हेलीने असे म्हटले असले तरी 'द प्रिन्स'मध्ये बऱ्याचदा गणराज्यांचा उल्लेख येतो. मॅकिव्हेलीच्या दृष्टिकोनातून गणराज्येदेखील एक प्रकारची राजेशाहीच होती असे या पुस्तकात बऱ्याच ठिकाणी जाणवते.

नव्या राज्यांची त्याने दोन भागांत विभागणी केलेली आहे. एक, ज्या राज्यात वडिलोपार्जित सत्ता असते ती आणि दुसरी, नवीन स्थापन झालेली राज्ये आणि राजे. त्याच्या मते वडिलोपार्जित सत्ता असलेली राज्ये शासन चालवायला सोपी असतात. राजा अगदीच करंटा निघाला तरच समस्या येतात, नाहीतर नाही. कारण जनता राजाला स्वाभाविकरीत्या अनुकूल असते.

पुढच्या भागात मॅकिव्हेलीने राज्यांची विभागणीही दोन भागांत केलेली आहे. अगदी नवीन राज्य किंवा मिश्र राज्य. थोडक्यात जुन्या राज्याला जोडलेला नवीन भाग.

मॅकिव्हेलीने नवे राज्य संपादन केल्यानंतर ते नियंत्रणात कसे ठेवायचे याचे अनेक मार्ग सांगितलेले आहेत. हे करताना त्याने रोमन गणराज्यातली काही उदाहरणे दिलेली आहेत हे विशेष. पुढे त्याने जिंकलेली राजेशाही असलेली राज्ये कशी शासित करायची याबद्दल विस्तृत लिहिलेले आहे. त्यापुढच्या भागात जिंकलेली स्वतंत्र गणराज्ये कशी आपल्या राज्याचा भाग बनवून एक एकसंध राज्य करायचे यावर मार्गदर्शन आहे.

यापुढच्या भागात राज्ये जिंकण्याच्या वेगवेगळ्या पद्धती वर्णन केलेल्या आहेत. यात पहिली आहे Conquests by Virtue म्हणजे स्वतःच्या गुणांच्या बळावर जिंकलेली राज्ये. दुसरी, नशिबाने जिंकलेली राज्ये, म्हणजे दुसऱ्या कुणाच्या प्रयत्नांमुळे. याबद्दलही त्याने आपले विचार ठळकपणे मांडले आहेत.

मॅकिव्हेली एवढ्यावर थांबलेला नाही. त्याने पुढे कपटाने, गुन्ह्यांद्वारा हस्तगत केलेल्या राज्यांचाही या पुस्तकात समावेश केलेला आहे. या सगळ्यांतच राज्य कसे करावे याबद्दल त्याची मतेही मांडलेली आहेत. त्याच्या पुढच्या भागात त्याने लोकशाही मार्गाने म्हणजेच निवडणुकांद्वारा जो राजा होतो त्यावरही भाष्य केलेले आहे.

यानंतर मॅकिव्हेलीने राज्ये किती बलवान आहेत हे कसे ठरवावे/ओळखावे याबद्दलची मते मांडली आहेत. यात त्याने सैन्य आणि स्वसंरक्षण यावर भर दिलेला आहे. पुढे राजामध्ये काय गुण असावेत याबाबतचे त्याचे विवेचन उद्बोधक आहे.

पुढच्या भागात राजाची लष्करी बाबींबद्दल काय कर्तव्ये असावीत, राजाने आपला लौकिक कसा राखावा, राजाने किती उदार असावे, किंवा त्याने हातचे राखून खर्च कसा करावा, क्रूरता आणि दया या दोहोंचाही वापर त्याने कसा करावा, राजाने आपला दिलेला शब्द कसा पाळावा, नापसंती आणि तिरस्कार कसा टाळावा, राजाने मानसन्मान कसा मिळवावा, आपल्या राज्यातील अमीर-उमरावांशी आणि स्वतःच्या कर्मचारीवर्गाशी कसे वागावे, त्याने खुशमस्कऱ्यांना कसे दूर ठेवावे, या सर्व बाबींचा अत्यंत प्रभावी ऊहापोह केला आहे.

शेवटी, राज्य करण्यात नशिबाचा भाग किती आणि नशिबाचा सामना राजाने कसा करावा याबाबतही लिहिले आहे.

मॅकिव्हेलीने राजे किती आणि कुठल्या प्रकारचे असतात, राज्ये किती प्रकारची असतात, त्यांची वैशिष्ट्ये काय असतात, ती कशी जिंकली जातात आणि ती जिंकल्यावर त्या राज्यांत सत्ता टिकवण्यासाठी राजाने काय आणि कसे केले पाहिजे याचा पाठच 'द प्रिन्स' द्वारा मांडला आहे. अगदी बारीकसारीक बाबीही त्याच्या नजरेतून सुटलेल्या नाहीत.

मॅकिव्हेलीचा राज्यशास्त्राविषयीचा अभ्यास किती विस्तृत आणि सखोल होता याची कल्पना आपल्याला येते. राजा, राज्ये

आणि राज्यकारभार या तिन्हीचे सूक्ष्म पण तेवढेच मार्मिक विवेचन मॅकिव्हेलीने अतिशय सोप्या आणि परिणामकारक रीतीने केलेले आहे. आपला एखादा सिद्धांत मांडताना त्याने तर्कशास्त्राचा उपयोग केलेला आहे, तसाच इतिहासातील योग्य त्या उदाहरणांचाही दाखला देऊन आपला मुद्दा पटवून दिला आहे. हे करताना त्याची निवेदनशैली सुबोध आहे, भाषा प्रवाही आहे. एक-एक विषय घेऊन त्याने त्यावर अतिशय मुद्देसूद, साध्या, सोप्या भाषेत अतिशय रंजक विवेचन केलेले आहे. 'द प्रिन्स' हे मॅकिव्हेलीच्या तत्कालीन राजकारणाच्या गाढ्या अभ्यासाचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे.

'द प्रिन्स' या प्रबंधाचे एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे यात त्याने कूटनीतीचीही तरफदारी केलेली आहे, त्याचे समर्थन केले आहे. फक्त परिणाम महत्त्वाचा, त्यासाठी अवलंबलेले मार्ग नेहमीच महत्त्वाचे नाहीत असे तो छातीठोकपणे सांगतो. मॅकिव्हेलीच्या पूर्वी राज्य करणे धर्माधिष्ठित, परमेश्वराधिष्ठित किंवा मूल्याधिष्ठित असावे हीच धारणा होती. राज्यशास्त्राची मीमांसा याच मोजमापातून केली गेली होती. परंतु पाश्चात्त्य जगात या संकल्पनेला पहिल्यांदा मॅकिव्हेलीने छेद दिला. काही वेळा वेडेवाकडे मार्ग वापरून चांगले परिणाम घडवणे यात फार काही चूक नाही असे सांगणारा हा पहिलाच राजकीय तत्त्वज्ञ. अर्थात आपल्याकडे चाणक्याने कित्येक वर्षांपूर्वी राज्यशास्त्राविषयी उत्कृष्ट मीमांसा केलेली आहेच की!

'द प्रिन्स' या पुस्तकाने त्याकाळी प्रचलित असलेल्या बऱ्याच प्रघातांना छेद दिला. प्रथम म्हणजे हे पुस्तक इटालियन बोलीभाषेत लिहिलेले आहे, लॅटिनमध्ये नाही. Dante lghieriच्या The Divine Comedy पासून सुरू झालेली प्रथा मॅकिव्हेलीने पुढे नेली असे म्हटल्यास वावगे ठरू नये. बऱ्याच तज्ज्ञांच्या मते जगातील राजकीय तत्त्वज्ञानावरच्या अगदी प्रथम पुस्तकांत या पुस्तकाची गणना होते.

मॅकिव्हेलीच्या या पुस्तकाचे त्याकाळातल्या पाश्चिमात्य राजकीय सत्ताधीशांवर फारच मोठा प्रभाव पाडला. छपाईच्या नवीन तंत्रज्ञानामुळे हा प्रभाव वृद्धिंगत होण्यास मदतच झाली. थॉमस क्रॉमवेल हे पुस्तक आपल्याजवळ सतत बाळगत असे. इंग्लंडचा राजा हेन्री आठवा प्रोटेस्टंट पंथाकडे झुकण्याला 'द प्रिन्स'चा मोठा हातभार होता असे मानले जाते. कॅथलिक सम्राट चार्ल्स पाचवादेखील ह्या पुस्तकाची प्रत आपल्याजवळ नेहमीच ठेवत असे. फ्रान्समध्ये कॅथेरीन डे मेडिसीवर या पुस्तकाने प्रभाव पाडला. सोळाव्या शतकात कॅथलिक लेखक मॅकिव्हेलीची गणना प्रोटेस्टंट लेखकांमध्ये करत होते तर प्रोटेस्टंट पंथात मॅकिव्हेलीला इटालियन आणि कॅथलिक मानण्यात आले. थोडक्यात कॅथलिक आणि प्रोटेस्टंट या दोन्ही पंथांच्या राजांवर मॅकिव्हेलीच्या विचारांचा सारखाच पगडा होता, असे दिसून येते.

अर्थातच मॅकिव्हेलीच्या या प्रथेविरुद्धच्या वैचारिक लिखाणावर जोरदार टीकाही झाली. सत्तेसाठी मूल्यविरहित धोरणे खरेच परिणामकारक होतात का याबद्दलही ऊहापोह झाला. सतराव्या शतकातल्या युरोपमधली राजकीय चर्चा या विषयांवरच केंद्रित झाली. यातल्या बऱ्याच टीकाकारांनी मॅकिव्हेलीचे विचार काही अंशी स्वीकारलेदेखील. कारण राजाने काही बाबतीत व्यावहारिक दृष्टिकोन ठेवून त्याप्रमाणे कृती केल्या पाहिजेत हा मॅकिव्हेलीचा विचार त्यांना पटला, पण राजाने फक्त स्वतःच्या नावाचा आणि सत्तेचा विचार करावा हे त्यांना पटले नाही.

मॅकिव्हेलीच्या या राजकीय वास्तववादी तत्त्वज्ञानाच्या प्रभावाची आणि परिणामांची अनेक मान्यवरांनी पुढे दखल घेतली. यात जिम बोडीन, फ्रान्सिस बेकन, जॉन मिल्टन, स्पिनोझा, रोसो, ह्यूम, एडवर्ड गिबन आणि ॲडम स्मिथ यांचा समावेश होता.


पुढे इतिहासातील अनेक घटनांवरही मॅकिव्हेलीचा पडलेला प्रभाव स्पष्ट जाणवतो. इंग्लंडमध्ये सतराव्या शतकात जे यादवी युद्ध झाले, पुढे ग्लोरियस रिव्होल्युशन सारखी जी क्रांती झाली आणि त्यातून जी इंग्लिश घटना निर्माण केली गेली या सर्वांवर मॅकिव्हेलीच्या विचारांची पडलेली छाप अगदी उघड आहे. अमेरिकेच्या राष्ट्रनिर्मात्यांवर (Founding fathers) देखील मॅकिव्हेलीच्या विचारांचा प्रभाव होता. यामध्ये बेंजामिन फ्रँकलिन, जेम्स मॅडिसन, थॉमस जेफरसन, अलेक्झांडर हॅमिल्टन आणि जॉन डॅम्ससारख्या दिग्गजांचा समावेश आहे. नेपोलियनने देखील 'द प्रिन्स'वर अत्यंत उद्‌बोधक चिकित्सा त्याच्या आयुष्यातल्या वेगवेगळ्या पडावांवर केलेली आहे. इटालियन हुकूमशहा मुसोलिनीने तर 'द प्रिन्स'वर एक प्रबंधच लिहिलेला आहे. रशियन नेता जोसेफ स्टालिनचे 'द प्रिन्स' हे सर्वात प्रिय असे पुस्तक होते. इतकेच काय तर विसाव्या शतकातल्या माफियाच्या इटालियन-अमेरिकन मालकांना हे पुस्तक तोंडपाठ होते. ते या पुस्तकाला द माफिया बायबल असे म्हणायचे.

काही विचारवंतांच्या मते 'द प्रिन्स' हे भ्रष्ट, सत्तालोलुप राजांचे विडंबन आहे. प्रसिद्ध फ्रेंच तत्त्वज्ञ ज्याँ जॅक्वेस रोसोने हा विचार प्रामुख्याने मांडला. तर काही विचारवंतांच्या मते हे पुस्तक म्हणजे राजे कसे असतात याची जनतेसमोर मांडलेली कैफियत आहे आणि यामुळे पुढे या राजांशी सामना कसा करायचा याचा जनतेला केलेला उपदेशच आहे. या पुस्तकातून मॅकिव्हेलीला नक्की काय सांगायचे आहे यावर आजही मतभेद कायम आहेत.

हे पुस्तक प्रकाशित होताच पाश्चात्त्य जगात प्रचंड गहजब झाला. मॅकिव्हेलीने या पुस्तकात Evil म्हणजेच अशुभ, सैतानीपणाचा पुरस्कार केला असं म्हटलं गेलं. मॅकिव्हेलीने अवैध मार्गांचा आणि तेसुद्धा काही विशिष्ट परिस्थितीत पुरस्कार केला तो राज्याच्या आणि राजाच्या भल्यासाठीच. त्याचा हा व्यावहारिक दृष्टिकोन बऱ्याच लोकांना त्याकाळी निषेधार्थ वाटला आणि इतक्या काळानंतर या पुस्तकावर पडलेली सैतानीपणाची छाप जरी आता धूसर झाली असली तरीही या पुस्तकाबद्दल आकस बाळगणारे काही लोक आजही आहेत.

राजकीय तत्त्वज्ञानाला एक वेगळीच दिशा देणारे 'द प्रिन्स' हे जागतिक वाङ्मयातले एक विलक्षण पुस्तक आहे हे मात्र आता सर्वमान्य झालेले आहे.

**– राजीव श्रीखंडे**
भ्रमणध्वनी : ९८२१०१७४६२
rshrikhande@yahoo.com



# महापूर

**श्याम जयराम मोकाशी**

*पानशेतच्या पुराला साठ वर्षे झाली तरी त्याच्या आठवणींचा पुणेकरांच्या मनावर पडलेला चरा अद्याप बुजलेला नाही. १२जुलै ही तारीख दिसली, की त्या भयाण आठवणींनी त्यांचे अंग अजूनही शहारते. त्या दिवसाचा जणू एक ट्रेलर मानावा अशी, प्रसिद्ध ज्येष्ठ पत्रकार श्याम मोकाशी यांची कथा सत्यकथा मासिकाच्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झाली होती. आपले चुलते दि. बा. मोकाशी यांच्या लेखनशैलीचा ठसा असलेल्या या कथेने श्याम मोकाशी यांच्या रूपात एका नवकथाकाराची चाहूल दिली होती. पत्रकारितेच्या प्रवाहात त्यांच्यातील कथाकार मागे पडला तरी त्यातील चित्रकथी साठ वर्षांनंतरही महापुराचे नेमके चित्र कसे उभे करतो, हे सिद्ध करणारी ही कथा आम्ही पुनर्मुद्रित करीत आहोत.*


*– संपादक*


**पा**ऊस थोडा कमी झाला होता, पण पडत होता. मधूनमधून वारा येई आणि नदीच्या पाण्यावर पावसाचे सपकारे उठत.

हीच त्या आसमंतातली हालचाल होती. ती सुद्धा नि:शब्दपणे होत होती. एक कावळा एक–दोनदा शिंकला. बाकी प्राण्यांच्या जगात, वनस्पतींच्या जगात शक्य तितकी शांतता होती.

तिथं नेहमीच शांतता असे. तिथं जीवन आकार घेई, विलयही पावे. शांततेतच. क्षणिक कल्लोळ कधी उठे; पण त्याचे पडसाद तिथं कमी उमटत असत. आणि तिथल्या जमिनीवर नेहमी सावली असे; तिथल्या वातावरणात नेहमी गारवा असे.

ती शांतता तशीच एकदीड मिनीट टिकली. मग एकदम तो कावळा उडाला. त्याच्याबरोबरच दुसरेही पक्षी उडाले. वटवाघळंसुद्धा. भांबावल्यासारखे ते पक्षी अस्ताव्यस्तपणे वरवर उडू लागले.





दुसऱ्याच क्षणाला सगळ्या चित्रावरून पाण्याचा हात फिरला. सगळे आधार सुटले. खारींचीसुद्धा चपळाई व्यर्थ ठरली. नदी नदी राहिली नाही. तिचे काठ अस्ताव्यस्तपणे दूरवर फेकले गेले. पृष्ठभाग प्रचंड विस्तारला. खूप उंच झाला. मिळेल त्याला खेळवीत, स्वत:शीही खेळत पाणी पुढे पुढे जाऊ लागलं.

हाहाकाराला सुरुवात झाली.

शिवा अंगणातल्या आंब्याच्या झाडावर चढून बसला होता. आई डेक्कन जिमखान्याला गेली होती. परवापासून घेतलेला, त्या बुळबुळीत झाडावर चढायचा हट्ट आता पुरवायला मिळाला होता.

आजूबाजूला सगळं छान, ताजंताजं दिसत होतं. फक्त थोडंसं मळकट पुणं खालच्या बाजूला दिसत होतं. त्याच्यापेक्षा नदीचा मातकट रंग पण चांगला दिसत होता.

झोपडीतून प्रभा भावली हलवत बाहेर आली. त्यानं उगीच 'हे हे! हे हे!' असं केलं.

समोरच्या झाडांतून तांबूस पाणी आलं. शिवा बघतच राहिला. घळाळ घळाळ पाणी आलं, आलं आणि प्रभा गेली. झोपडी

कोलमडली, थोडी थोडी वाहत गेली. शिवा बघतच राहिला.

पाणी आपलं वाढतच होतं. शिवाचं झाड हललं. शिवाला वाटलं, आता तुटणार. तेवढ्यात पाणीच वर आलं. हातात डहाळ्या पकडून शिवा वाहू लागला. दोनचारदा 'आयेऽ, आयेऽ' असं ओरडला. त्याचवेळी ठसकत गुदमरत गेला. मग त्याचं कलेवर वाहत गेलं.

लकडी पुलावरून श्याम दोन बाळांच्या चौकात आला. त्याला एक मित्र दिसला. इंटरनॅशनल स्टॉलसमोर दोघे असेच बोलत उभे राहिले.

''धरणाचं काही खरं नाही म्हणतात.'' श्याम.

''चालसे.''

''का? पूर नाही येणार?''

''येऊ दे की. पुण्यानं चिकार पूर पाहिलेत.''

''पण यावेळी जास्त पाणी येईल की.''

''एखाद दिवस सगळे पहिल्या मजल्यावर जाऊन बसतील. आणखी काय!''

''आपल्याला काय, तशी काहीच धास्ती नाही. कानडे हॉस्टेलच्या दुसऱ्या मजल्यापर्यंत काही पाणी येत नाही.''

इतकंच. पुढे बोलणं झालंच नाही. कसलातरी सामुदायिक ओरडा झाला. लकडी पुलावर माणसं उडायच्या तयारीनं पळत आली. एका क्षणात लकडी पुलावर पाणी उसळलं. थांबलं न थांबलं करून पुढे गेलं. पुढच्या क्षणाला दोन बाळांच्या चबुतऱ्याभोवती पाणी वाहू लागलं. डोळ्यांदेखत माणसं वाहून गेली. कंबरेइतक्या पाण्यात काही माणसं पळायला धडपडू लागली.

मित्रानं थरथरत सायकल वळवली आणि 'शाम्या चल' म्हणून तो निघाला. श्याम सायकलवर बसेपर्यंत तो गेलादेखील. लकी रेस्टॉरंटच्या पुढच्या चौकात येऊन श्याम थांबला. तिथून आपल्याकडे येणारं पाणी पाहू लागला. सगळी पळापळ पाहू लागला.

पाणी वाहत होतं. रस्त्यावरचं पाणी, घराघरांतलं पाणी जरा शांतपणे वाहत होतं. पण अजाण दृष्टीला तो वेगही फार होता. कंबरेपर्यंत बुडालेल्या शरीरांना तो वेगही असह्य होता. घराच्या भिंतींना कापीत हे पाणी चाललं आहे अशी भीती उत्पन्न करणारा तो वेग होता.

नारायणपेठेत पहिल्या मजल्यावरच्या आपल्या खोलीत मध्यभागी एक तरुणी उभी होती. नवोढा होती, एकटीच होती, अत्यंत घाबरली होती. आईनं दिलेला टेबलक्लॉथ आधारासाठी छातीशी धरून उभी होती. इतकं पाणी आलं तरी कसं; थंड, गार पाणी; वाहतं वाहतं पाणी.. बघण्यापलीकडे विचार करू शकत नव्हती. सारखी तिला बसकण मारावीशी वाटत होती.

शेवटी सोसवेना. पायातलं बळ खरोखरीच जात चाललं. आकांतानं तिनं टेबल गाठलं. छातीशी धरून, भिंतीला चिकटून, गदगदून रडू लागली.

सगळं नवं पुसून गेलं. गुडघ्यात शिरलेल्या डोक्यातून एका क्षणात सगळं नवं नाहीसं झालं. सगळं माहेर भोवती आलं. ओळखीचं वातावरण, ओळखीचा काळोख मनाभोवती तयार झाला.

त्या कुठल्याशा खोलीतलं काहीच डोळे पाहिनात. तोंडातून, जरा उसंत मिळाली की तेच शब्द येऊ लागले, ''आई ग, एवढं मोठं पाणी आलं ग!''

मग हळूहळू ते घर कोसळत गेलं. भयचकितपणे, स्तब्धपणे आणि माहीत असल्याप्रमाणे ती कोसळणं पाहात होती. शुद्ध नाहीशी होताना तिची शेवटची जाणीव होती ती आईबाबांची, आपल्या खोलीची, ते सगळं आपल्याबरोबर नसल्याची!

म.ए.सो. महाविद्यालयाशी श्याम उभा होता. पूर पाहात होता. आपण वाचलो खरे, असं मधूनमधून त्याच्या मनात येत होते.

आता या क्षणी हातातल्या सायकलमुळे त्याची मोठी पंचाईत झाली होती. कुठं नीट शिरताच येत नव्हतं. पलीकडे एकदोन मुलं एका झाडावर चढून पूर पाहात होती. तसंदेखील करता येत नाही याचं त्याला वाईट वाटत होतं.

होता त्या ठिकाणी थांबणं शक्य नव्हतं. पाणी जास्त जास्त जवळून वाहू लागलं होतं. कानडे हॉस्टेल पुरात नक्की सापडणार होतं. त्यामुळे तिकडे सायकल ठेवता येत नव्हती. मागे एरंडवण्यात त्याची कुणाकडेच ओळख नव्हती.

पुरात वाहात चाललेली बहुतेक सगळी झाडंझुडपं नि लाकडंच होती. मधूनमधून पिंप, खोकी असं काहीतरी यायचं.

नदीच्या पात्रात मध्यभागी पाणी जास्त वेगानं चाललं होतं. तिथं पाण्याचे वेडेवाकडे लोट खालीवर होत होते, एकमेकांत मिसळत होते. मधूनमधून एकमेकांवर आपटून पांढरा फेस निर्माण करीत होते. तिथं नजर ठरत नव्हती.

श्यामला त्या पुरात कुठेतरी एखादं प्रेत पाहायचं होतं. पानशेतपासून सुरू झालेल्या या पुरात नक्कीच कितीतरी माणसं सापडली होती. बुडालेली मासणं फुगून वर केव्हा येतात ते त्याला ठाऊक नव्हतं; तेव्हा ती सगळी माणसं पाण्याखालून वाहात असण्याचाही संभव होता.

पण त्यातल्या काहींना तरी तरंगायला काहीतरी सापडलेलं असणारच.

त्याच्या मनात आणखी एक कल्पना येऊन गेली. समजा असा तरंगणारा माणूस या पाणलोटाच्या आघाडीवरच असला तर? तिथं वरचं पाणी आधी खालची जागा घेत जातं. त्यावरून जे पाणी पुढे सरकतं. तेही थोडं आणखी पुढे खाली येतं. या ठिकाणी सापडणारा माणूस वर राहणारच नाही.

त्याला कसंसंच वाटलं. सायकल मागे घेऊन तो एरंडवणा विभागात शिरला. एरंडवणा पार्कच्या बाजूनं तो जिमखान्याकडे जाऊ लागला. पुराच्या दुसऱ्या आघाडीकडे निघाला.

पाणलोट चालला होता. अस्ताव्यस्तपणे पुढे चालला होता. नदीचं पात्र तळाला गेलं होतं. दोन धरणांचं पाणी– एवढा प्रचंड

दाब घेऊन पाणलोट चालला होता. आता त्याच्याकडे पाहताना त्यांच्यातला भरीवपणा मनात ठसत होता. छातीत जड वाटेल असं सगळं झालं होतं.

उंबरठ्यावर शीला उभी होती. आजूबाजूची रिकामी घरं परत एकदा पाहात होती. घाबरून-घाबरून इतक्या वर आलेल्या पाण्याकडे पाहात होती.

कसली आशाच वाटत नव्हती. शहरात घुसलेला नदीकाठ तिच्या घरापासून कितीतरी लांब होता. रस्त्याच्या पलिकडची घरं भरली होती. त्यांच्याही पलीकडे असलेल्या माणसांना तिचं घर दिसणंसुद्धा कठीण होतं. तिनं खिडकीतून पाहिलं, अजून शेजारचं घरच पूर अंगावर घेत होतं.

प्रत्येक वेळी बघितल्यावर पूर वाढल्यासारखा वाटत होता. तिचा चेहरा रडवेला झाला. पोहण्याची सवय वाढवली नाही म्हणून तिला वाईट वाटत होतं. पूर आता वाढणार होता. कुणी मदतीला येणार नव्हतं. पाणी असंच चढेल, घर पडेल आणि ती पाण्यानं वेढली जाईल. नाहीतर घर पडणारच नाही. पाणी वरवर चढेल नि ती वरवर जाईल, खूप पाणी पिईल, तिचं पोट फुगेल...

ईऽ! तिच्या अंगावर भीतीनं शहारे आले. एकूण तिचं भविष्य ठरलं होतं. पाणी पीत पीत ती गुदमरणार होती. तिची छाती हवेशिवाय वरखाली होणार होती. अर्धापाऊण मिनिटात बेशुद्ध! मग कधीच काही दिसणार नव्हतं. काहीच कळणार नव्हतं. सगळे अनुभव इथंच थांबणार होते. कॉलेजचं पहिलं वर्ष अर्धवट, नि एकदम मरण!

प्रभात रोडकडून श्याम सावकाश येत होता नि प्रभात रोडच्या बाजूला जवळजवळ पळत चाललेली बरीच माणसं त्याला भेटत होती. वाहून गेलेल्या किंवा टाकून दिलेल्या संसाराचे अवशेष घेऊन ती चालली होती. एकाच्या खांद्यावर त्याची म्हातारी आईच फक्त...

शेवटी फर्गसन रोडजवळ त्याला रस्त्यावर पाणी भेटलं. ऐटीत त्यानं पुढचं चाक पाण्यात घातलं नि मग धपकन खाली उडी मारली.

आता आसपास कुणीच नव्हतं. पलीकडून कुठूनतरी अस्पष्ट कोलाहल ऐकू येत होता. शेजारच्या गल्लीत तो शिरला. ही गल्ली नेहमीच शांत, निर्जन असे. पण आजची शांतता वेगळीच होती. आपापले पहिले मजले पाण्याने भरून जायची वाट पाहात ते बंगले उभे आहेत असं काहीतरी त्याला वाटलं. त्यानं हलकी शीळ मारायचा प्रयत्न केला. ती किती लांब गेली असावी ते त्याला कळेनाच. गल्ली पार करून तो जरा मोठ्या रस्त्याला आला. पोहण्याच्या चड्ड्या घालून काही मुलं पाण्याशी उभी होती. एकदोन हातांत दोर, भोपळा वगैरे दिसलं. आसपास गर्दी होती. तोपण तिकडे उभा राहिला.

पाण्यातून एक होडी आली. सगळ्यांनी मोठ्या हळुवारपणे एका तरुणीला खाली उतरवलं. श्यामच्या मनात चटकन येऊन गेलं, हीच जर एकटी एखाद्या बंगल्यात कुणाला मिळाली असती तर!

आपल्या झोपडीत म्हातारी बसून राहिली होती. उकिडवी एका कोपऱ्यात कधीपासूनची बसली होती. इकडचं तिकडे व्हायचं म्हणजे त्रास होई. म्हणून सकाळपासन तशीच बसून होती. मधेच हात जमिनीवरनं फिरवायची; इकडचं चिरगूट तिकडे ठेवायची. तोंडातली बडबड कुणाला कळण्यासारखी नव्हतीच. पण आपलं एक सांगायचं म्हणजे जे माणूस आठवेल त्याला शिव्या घालत ती बसली होती.

दारातून कधीतरी बघायची तेव्हा वस्तीतली कुणीतरी भडवी, रांडेची, XXXX दिसायची. नाहीतर चतुरशिंगी दिसायची. आठवलं तर तिकडे नमस्कार करायचा. आणि परत पुटपुट सुरू!

पोरगा कुठंतरी मरायला गेला होता. त्याला काही शेवचिवडा घेऊन यायची बुद्धी झाली तर बरं होणार होतं. पोरावरून त्याच्या बापाची आठवण आली आणि त्याला चार शिव्या गेल्या. त्या मुडद्यानं हिला बिघडवलं. हे असलं झोपडं नशिबात आणलं. पोरगा काढला नि रात्रीचा कुऱ्हाडी घाव खाऊन मेला. पोराचं नाव राहिलं त्याच्याच जातीचं. कटिया. पोरगा म्हणजे आहे खुडम्याचा बाप फार रांगडा होता! मेला कासाविशी होईपर्यंत छळायचा!

म्हातारी अशी गुंगली आणि कटिया आत आला. म्हातारी नीट सावध व्हायच्या आतच त्यानं तिच्या शेजारी एक रेडिओ ठेवला आणि तो बाहेरच्या बाजूला सुटला. म्हातारी चिरकली, ''काय झालं येऽ! आं?''

''पूर आलाय! पानशेत फुटला!'' कटिया दूर जाता जाता ओरडला.

देवळाभोवतालून पाणी चाललं होतं. एकमेकांची अर्धीमुर्धी माहिती घेऊन दोघं कळसावर बसले होते. आता जरा शांतपणे बसले होते. प्रत्येकाची वेगवेगळी तंद्री लागलीशी झाली होती.

बाळशास्त्री केव्हाचे पायाखालच्या पाण्याकडे पाहात बसले होते. विचार असा डोक्यात नव्हताच. सगळ्या जाणिवेत पुराचा आवाज भरून राहिला होता. एकाग्रतेनं पाण्याच्या वाहण्याकडे पाहात असताना मधेमधे त्या तरुणाच्या शेजाराची अर्धवट जाणीव होत होती.

आता तो उठला. बाळशास्त्र्यांनी त्याच्याकडे पाहिलं. ''इकडे येऊ नका हां!'' असं म्हणून तो किंचित हसला नि वळू लागला. बाळशास्त्री पण किंचित हसले. तो एका बाजूला गेला आणि बाळशास्त्री परत पाण्याकडे पाहू लागले.

त्या क्षणी त्यांची तंद्री लागली. चारपाच फुटांवर अडकलेल्या नजरेला आणखी आणखी खालची कल्पना येऊ लागली. तो वाहाता, पाणी भरलेला प्रदेश, आतला, अगदी आतला... ते पाणी, वाकडंतिकडं वाहत नेणारं...; त्यांना वाटलं, हे पाणी घट्ट असायला हवं होतं. इतकं घट्ट की त्यात माणूस बुडणारच नाही; आणि गुदमरणार नाही. नुसता वरच्यावर पुढे जाईल.

असंच काहीतरी थोडा वेळ, आणि मग परत ते थोडेसे भानावर आले. पण दृष्टी होती तिथंच ठेवून विचार करू लागले. खालच्या देवाचा विचार करू लागले. त्या पिंडीच्या सभोवार सगळीकडे हे असं गढूळ पाणी असेल. पिंड काही गुदमरत नाही. पण ती बघायला लागली तर तिला काय दिसेल? सगळं पाणीच पाणी, मधेच चार भिंती, वर कळस, आणि तिथं एक माणूस उभा आहे– दोन माणसं उभी आहेत. वेडीवाकडी. बाळशास्त्री अचानक भानावर आले. त्या तरुणानं त्यांना हाक मारली होती. पाणी वाढलं होतं. त्यांच्या पायाला लागलं होतं.

नव्या पेठेतल्या त्या रस्त्यावरून पोहताना मोहनला मजा वाटत होती. इथं पुराचं पाणी तळ्यासारखं साचून राहिलं होतं. सगळ्या घरांचे दुसरे मजले, विजेच्या खांबांचे शेंडे, पाण्यावर पसरलेली झाडांची पानं, असा एकूण सगळा साज पाण्यातल्या शहरासारखा झाला होता. ज्या गोष्टी वाहत होत्या त्या सावकाश, एक एक ठिकाणी टपली खात चालल्या होत्या. त्याच्यापुढे वाहत जाणारी फुलांची एक टोपली हळूहळू त्याच्याजवळ आली. त्यानं एक फूल काढून घेतलं नि टोपली पाण्याखाली दाबली. ते फूल धरलेला हात वर काढून तो पोहू लागला.

मग पुढे एक इमारत लागली. तिच्या पहिल्या मजल्याचा जिना अर्धा बुडाला होता. सहज म्हणून तो त्या इमारतीत शिरला; नि जिना चढून वर गेला. दुसऱ्या मजल्याची गॅलरी इतकी स्वच्छ नि कोरडी दिसली की तो एकदम खुशच झाला. ऐटबाजपणे त्या रिकाम्या गॅलरीतून तो चालत गेला. त्याची पावलं त्या स्वच्छ, सुंदर फरशीवर उमटत गेली.

शीला स्फुंदून स्फुंदून रडत होती. स्वत:च्या हुंदक्यांशिवाय दुसऱ्या कशाचीही जाणीव तिला राहिली नव्हती. त्यामुळे दाराची कडी अनेकदा वाजली तरी तिला काहीही कळलं नाही. मग केव्हातरी दुरून ऐकल्यासारखे आवाज आले नि लगेच 'अहो अहो!' असे मोठ्या आवाजातले शब्द तिनं ऐकले. एकदम मान वर केली. डोळे पुसून झाल्यावर तिला समोरच एक तरुण दिसला. तो हसत होता. त्याच्या हातात एक फूल होतं.

तो म्हणाला, ''मला कल्पनाच नव्हती. बरं चला! घाई केली पाहिजे.''

इतक्यात त्याचं लक्ष खिडकीतून बाहेर गेलं. एकदम तो गॅलरीत गेला. शीला त्याच्या मागोमाग गेली.

पाणी वाढलं होतं. पहिला मजला संपूर्ण बुडाला होता. आता ते घर पुराच्या मध्याकडे सरकलं होतं. पाण्याचा वेग वाढला होता.

''आता?'' तिनं गंभीर होऊन विचारलं.

तो काहीच बोलला नाही. नुसता त्या पाण्याकडे पाहात राहिला.

ती आत गेली. खिडकीला टेकली. डोळे गच्च मिटून घेतले. दोन थेंब आणखी गळले.

तेवढ्यात काहीतरी कोसळल्याचा आवाज आला. शेजारच्या घराचा बराचसा भाग पुरानं पडला होता. आता तिचं घर सरळसरळ पूर अंगावर घेत होतं.

ती नुसती भयचकित होऊन पाहात राहिली.

शिवाजीच्या पुतळ्याच्या थोडं पलीकडे श्याम उभा होता. पूर इथपर्यंत आला होता नि शिवाजी सावकाश पुराकडे पाठ करून जात होता... त्याच्या समोर पाणी शांतपणे रस्त्यावर पसरलं होतं. पुढे पुढे पाणी वाढत गेलं होतं. त्याचा वेगही वाढत होता. समोरच्या चौकातून डावीकडे वळलं की, ती पाचसहा प्रचंड कोठारं होती. वाहून नाही तरी निदान ती पाण्यानं भरली होतीच. कितीतरी पोत्यांवर पोती; पोत्यांवर पोती अशी जागच्या जागी भिजून, नासून चालली होती. कोट्यवधी गहू, तांदूळ हातचे गेले होते. त्यांना कुणीच खाणार नव्हतं. खतासाठी तरी त्यांचा उपयोग होणार होता का?

समोरचं संथ पाणी पाहताना त्याला लहानपणची आठवण झाली. गच्चीवर ते पाणी अडवून ठेवीत. दोनअडीच फूट पाणी होई. त्याचा मूड या जवळजवळच्या पाण्यासारखाच असे. ते पाणी नितळ असे. पण हे किती विस्तीर्ण आहे!

संथ पाण्याचा पट्टा लांबवर पसरला होता.

शेजारच्या आवारात एक खोपटं पाण्यानं अर्ध भरलं होतं. त्याच्या उघड्या दारातून वरचा अर्धा भाग दिसत होता. रिकामारिकामासा आणि काळोखी. त्यात पाहता पाहता आपल्यालाच आपण पाहिल्यासारखं काहीतरी त्याला झालं. सायकल वळवून चारपाच पावलं गेल्यावर त्याला वाटलं, किती संसारात असं पाणी शिरलं असेल– अंऽ किती घरांत असा चिखल पसरला असेल देव जाणे!

बाळशास्त्री अगदी विकल झाले होते. कळसावर आणखी चढणं शक्य नव्हतं. इकडे पायरी पाण्यात बुडाली होती. पावलं दिसेनात, त्यामुळे आधार आता अगदी सुटला असंच वाटत होतं. मनातल्या मनात ते सारखे 'सोडव, मला सोडव' असं म्हणत होते, पण सर्वप्रकारच्या मूर्ती त्यांच्या डोळ्यांसमोरून नाहीशा झाल्या होत्या. सगळे देव स्मरणातून गेले होते. ते आळवीत होते ते जग व्यापून राहिलेल्या सगळ्या शून्याला. सगळ्या अभावाला.

मोहन सुन्नपणे पाहत होता. आता एकट्यानंसुद्धा परत जाणं अशक्य वाटत होतं. थकल्यासारखं वाटत होतं. आता आणखी फार तर अर्धा तास!

अशा सुन्न अवस्थेत आता पाण्याचं ते विराट स्वरूप कळून येत होतं. पाण्याचा विस्तीर्ण प्रवाह भराभरा हलत होता, बदलत होता. पाणी वेगाने पुढे चाललं होतं. मोहनच्या समोरच पाण्यानं जमिनीपासून वीस फुटांपर्यंत हवेला वर लोटलं होतं. आणि कुठं कुठंतरी चाळीस फूट–पन्नाससुद्धा! आणि तेवढ्या उंचीत मधे कुठे घट्ट धरायला काही नाही. बुडलं तर वाहात जायचं.

हे घर पडलं तर? त्यानं कठडा चाचपला. हे लाकूड तरंगेल का?

तो आत गेला. भिंतीलगतच्या एका गाठोड्यावर बसला.

बसताबसताच एकदम त्याच्या मनानं पुन्हा उशी घेतली. ऐटदारपणे खोलीच्या मधोमध उभा राहून त्यानं खिडकीतून पुराकडे पाहिलं. पुराच्या मध्याकडे पाहिलं. पलीकडच्या इमारती पाहिल्या. परत खोलीकडे येताना त्याच्या नजरेनं त्या मुलीच्या अस्तित्वाची अर्धवट नोंद केली. एका टाचेवर गरर्कन फिरून तो दाराकडे वळला नि दोनतीन झेपांत त्यानं गॅलरी गाठली. गॅलरीत तो उभा राहिला. बाजूच्या, समोरच्या, कुठल्याही गॅलरीत, खिडकीत कुणीच नव्हतं. या टोकापासून त्या टोकापर्यंत फिरून त्यानं आपल्या एकटेपणाची खात्री करून घेतली. मग तो मोठ्यानं ओरडला, ''ठोऽ!''

आवाज बऱ्यापैकी मोठा आला हे पाहिल्यावर त्यानं कुणालातरी हाकारलं, ''एऽऽ!''

क्षणभर थांबून त्यानं दोनतीनदा अशा हाका मारल्या. मग बोटं तोंडात घालून त्यानं जोरात शीळ घातली. उत्तर म्हणून त्यानं एक किंकाळी ऐकली. चमकून त्यानं पाहिलं. गॅलरीत येऊन ती मुलगीच किंचाळली होती.

मग दोघांनीही जवळजवळ दहा मिनिटं आपल्याला कुणीतरी ऐकावं म्हणून प्रयत्न केला.

पण वीस मिनिटांनंतरही ती दोघं एकटीच होती.

मग ती मुलगी आत गेली. मोहन गॅलरीत एकटाच उरला. उरलासुरला उत्साह टिकवून धरायचा प्रयत्न करू लागला.

गेली पंधरावीस मिनिटं मोहनच्या मनावर बराच ताण पडला होता. खालचे वीस फूट पाण्याखाली गेलेले, आणि आसपासच्या सगळ्या घरांत मिळून एकूण ती दोघंच. त्यातला एक तो स्वत:, आणि दुसरी एक मुलगी. ती सुद्धा अनोळखी! तिच्याशी बोलायचं तरी काय? तशी चारदोनदा धीराची वाक्यं बोलून झाली होती. पण त्यातला खोटेपणा त्याला स्वत:लाही इतका जाणवायला लागला की अखेर तो नुसताच पाण्याकडे बघत बसला. कठड्याच्या गजांतून हात बाहेर काढला की पाणी हाताला लागत होतं. एकदोनदा त्यानं हात घातलाही. पण तसं केलं की कुठल्यातरी अज्ञात प्रदेशात तो हात शिरल्याची भावना व्हायची.

आता तर पाण्याकडे बघून डोळे थकले होते. आसपासचं सगळं बघून डोळे थकले होते. ते मिटून तो गजांवर डोकं टेकून बसून राहिला. त्या अवस्थेत स्वत:विषयीचे विचार त्याच्या मनात यायला लागले. शिकायचं, पैसा मिळवायचा वगैरे सगळं आता संपुष्टात येणार होतंच. पण त्याच्या स्वत:विषयी काय? इतका तो वाढला, बावीस वर्षं जगात काढली नि आता जाणार. खरं लाइफ सुरू व्हायच्या वेळेला जाणार. अभ्यास केला–काय झालं शेवटी? व्यायाम केला–काय झालं शेवटी?

वाचलेलं सगळं नुसतं मनात राहिलं.

विमनस्कपणेच त्यानं डोळे उघडले. उंबरठा दिसला. तसंच पुढे पुढे बघत आतल्या भिंतीपर्यंत तो पोचला. तिथे शीला पाठमोरी उभी होती. तिच्या आकृतीवरून खिडकीच्या बाहेर त्याची नजर जाऊ लागली.

जाऊ लागली, आणि तिथेच घोटाळली. एकदा पायापासून डोक्यापर्यंत, मग कंबरेच्या खाली थोडा वेळ, मग पाठीवर, अशी ती घोटाळली. पोलक्यात आवळलेली कमनीयता ती नजर पाहू लागली. पुढच्या फुगीरपणाचा काही अंदाज येतो का ते तिनं पाहिलं.

मग एकदम मोहन उभा राहिला. ती मुलगी एकदम त्याला अगदी कह्यातली वाटली. तो अगदी सहज तिला कवटाळू शकत होता. तिच्या सगळ्या अंगाला तो अगदी सहज व्यापून टाकू शकत होता. असंच पुढे जायचं, नि अगदी तिच्या हातासकट सगळ्या तिला आपल्या मिठीत घ्यायचं!

शीलाच्या केसात फूल खोवायचा प्रयत्न झाला तेव्हा ती चमकून मागे वळली. पण तिची वेणी त्याच्या हातात असल्यानं तिला मागे सरता आलंच नाही. तो तिच्याकडे बघून किंचित हसत होता. पण चर्येवर एक प्रकारचा दबता भाव होता. हे सगळं नि याचा अर्थ नीट कळायच्या आधीच ती ओरडली, ''नाही! सोडा, सोडा आधी!''

तिला त्याच्या हातातून सुटायचं होतं. तो तिला मिठीत घेऊ पाहात होता. त्या धडपडीच्या नादात ती उपडी पडली आणि तो तिच्या अंगावर पसरला. ती किंचाळली, पण परत किंचाळली नाही. कारण त्यात काही अर्थ नव्हता.

त्यानंतर लगेच त्यानं तिच्या वेण्या सोडायला सुरुवात केली. ती ''नाही नाही'' असं त्वेषानं म्हणत आपलं सगळं शरीर जमेल तसं हलवत होती. पण सुटू शकत नव्हती. एक–दोन मिनिटांत तिचे केस मोकळे झाले, विखुरले. त्यानं दोन्ही मुठीत मिळतील तितके धरून ते आवळले. डोकं त्या केसात खुपसून श्वास घेतला. मग ते बाजूला करून तिच्या लालसर, उष्ण झालेल्या गालावर त्यानं आपले ओठ टेकले, दाबले.

मग तो नुसताच तिच्या अंगावर पडून राहिला. काही वेळ त्याचा श्वास तिला जाणवत होता. त्याच्या हृदयाचे ठोके तिला जाणवत होते.

मग त्यानं तिचा पदर खेचला नि तिच्या पातळाची गुंडाळी सोडवायची खटपट तो करू लागला.

शीलाला ब्रह्मांड आठवलं.

श्यामला फारशी भूक नव्हती. पण आता परत कधी खायचा प्रसंग येईल हे नक्की नव्हतं. अनिश्चित परिस्थिती केव्हा जाईल ते त्याला माहीत नव्हतं.

डेक्कन जिमखान्यावरची सगळी उपाहारगृहं पाण्याखाली गेली होती. एकच चान्स होता नि तो म्हणजे फर्गसन कॉलेजचं कँटीन.

तो गेला तेव्हा कँटीन गच्च भरलं होतं. ते सगळे विद्यार्थीच होते. गोष्टी पुराच्याच. थोडा वेळ पूर बघून ते आता कँटीनवर जमले होते; बराच वेळ तिथंच बसून राहणार होते. श्यामनं बटाटेवडे खाल्ले. उठला, गल्ल्यावर गेला. चार आणे दिले. समोरच्या बरणीत चार चार दोन बिस्किटांचे पुडे होते.

''एकाचे किती रे?''

''दोन आणे.''

''म्हणजे? भाव वाढले नाहीत वाटतं?''

''कॉलेज कँटीन आहे ना! आज भाव वाढवून चार पैसे मिळवायचे नि उद्या कॉंट्रॅक्ट रद्द करून घ्यायचं! कुणी सांगितलंय?''

श्यामनं दोन पुडे घेऊन खिशात टाकले. तो बाहेर पडताना नवी तुकडी आली. त्याच माहितीची देवाणघेवाण झाली. मग एक जण म्हणाला, ''अरे, तुमचा तो कानडे आहे ना, तो त्याच्या बिल्डिंगमधून बाहेर यायलाच तयार नाही. त्याचा तळमजला अर्धा बुडलाय. तो म्हणाला की पूर आता वाढणार नाही म्हणून. पहिल्या मजल्यावरनं लोकांकडे हसत बसलाय!''

श्यामनं ठरवलं, तिकडेच जावं. जाताना त्याच्या मनात आलं, आता आपण पलीकडे शहरात असायला हवं होतं. तिकडेच खरी धमाल चालली असेल. तिकडे थोडीतरी धावपळ करता आली असती.

तिची वस्त्रं फेडताना मोहनच्या डोक्यात प्रत्येक गोष्ट अगदी घण मारून बसवल्यासारखी वाटत होती. त्या दोघांनी एकमेकांविरुद्ध केलेल्या हालचालींचा अत्यंत स्पष्ट ठसा त्याच्या मनावर उमटत होता. तिला अनावृत्त करताना त्याला काही काही गोष्टी नवीन कळल्या. एक म्हणजे असं अनावृत्त करणं तितकंसं सोपं नसतं. तसंच ब्लाउज वगैरे फाडणं ही गोष्टही बहुधा अशक्यच असते. शिवाय स्त्रीची कोपरं काही मऊ नसतात.

त्या सगळ्या खटपटीत तो इतका रंगून गेला होता की ती जेव्हा पूर्णपणे अनावृत्त झाली तेव्हा प्रथम तो थोडासा गोंधळलाच. आणखी काय करायचं राहिलं बरं...

आपण छपरावर कसे पोचलो ते अण्णांना कळलंच नव्हतं. डोळे वासून ते पाण्याकडे पाहात होते. पाणी सगळीकडे होतं. त्यांना वाकुल्या दाखवत पाहात होतं. त्यांच्या तिरक्या पत्र्यांवरून पाणी चाललं होतं. ते जवळचं, दोन फुटांवरचं पाणी छोटंसं वाटत होतं. मग लगेच पलीकडे, सगळीकडे अगडबंब पाणी!

खाली खोल, खोल पाणी होतं. त्यांच्या घरात भरलं होतं. त्यांचा संसार भिजवून, वाहून नेत होतं. कपाटात शिरून चांगल्या चांगल्या कपड्यांचा, कागदपत्रांचा नाश करीत होतं. आयुष्यभरची सगळी हौस, सगळे कष्ट क्षणात निष्फळ झाले होते.

असा पाण्यानं दावा साधला होता. कधीच कुणाचा हेवासुद्धा केला नसताना असा दावा साधला होता. अण्णांनी काठीची मूठ कमालीची आवळली. काठी थरथरायला लागली...हे पाणी, शत्रू... वैरी आहे!

''अरे हाट, चल रेऽ, चल रेऽऽ'' असं बडबडत अण्णा जोरजोरात पाण्यावर फटकारे मारू लागले.

मोहननं जरा इकडेतिकडे पाहिलं. त्याचं मन थोडंसं विचलित झाल्याबरोबर पुराच्या अस्तित्वाच्या जाणिवेनं त्याचा कब्जा घेतला. ती दोघं आणि बाकीचं सगळं जग यांच्यामध्ये तो पूर पसरला होता. त्या दोघांविषयीची सगळ्यांची माहिती इथं या क्षणी थांबली होती; आणि बहुधा कुणालाच यापुढे त्यांच्याविषयी जास्त काही कळणार नव्हतं. त्यांची आयुष्यं म्हणजे वावड्या ठरणार होती. इतकंच जगण्यासाठी ती दोघं जन्मली होती. इतकंच जगण्यासाठी-इतकंच अनुभवण्यासाठी-

इतकंच उपभोगण्यासाठी-

किती?

त्यानं तिच्याकडे पाहिलं. ती तेवढ्यात आपला मोहरा बाजूला पडलेल्या कपड्यांकडे वळवून सुटायचा प्रयत्न करीत होती. त्याने तिचा खांदा धरून तिला नीट उताणं केलं. तिनं शक्य होतं तेवढं स्वत:ला झाकलं.

किंचित दूर होऊन तो तिला निरखून पाहू लागला. तो बराच गरम झाल्याचं त्याला जाणवत होतं.

एका नव्या अनुभवासाठी तो तयार होत होता-झाला होता.

पाऊस पडत होता. सायकलवर रेलून श्याम चालत होता. ती छोटी चढण संपली आणि तो सावकाश सायलकवर चढला. शेतकी कॉलेजकडे जाणारा उतार आता सुरू झाला होता. भटकून भटकून आतापर्यंत आलेला शीण आता गेल्यात जमा होता. रक्त जोरात वाहू लागलं होतं. सायकलच्या हँडलवरची पकड मोठी सशक्त वाटत होती.

इथं आसपास पुराचा मागमूसही नव्हता. धावपळ करणारी माणसंही नव्हती. त्याला उगीचच निवृत्त झाल्यासारखं, सगळ्यापासून सुटल्यासारखं वाटलं.

ओठांच्या सभोवार जमा झालेलं पाणी आत ओढून घेत त्यानं आजुबाजूला पाहिलं. डाव्या बाजूला वेताळ टेकडी, चतु:शृंगी, थोडं खालच्या बाजूला विद्यापीठाकडून येणारा रस्ता-

सायकलच्या चाकाखाली जाणारा रस्ता-

चाक-

हँडल चाकाला काटकोनात नव्हतं. त्यानं उतरून चाक पायांच्यामध्ये घातलं नि कोन नीट केला.

बसताबसताच त्याला खिशातल्या बिस्किटांची आठवण झाली. एक पुडा पुरा नि दुसऱ्यातलं एक बिस्कीट उरलं होतं. त्यानं ती पाची बिस्किटं हातात घेतली. खरं म्हणजे ती सगळी त्याला खायची नव्हती. एकदोन जर कुणाला द्यायचा प्रसंग आला असता तर बरं झालं असतं. एक बिस्कीट तोंडात टाकून त्यानं सायकलवर टांग मारली.

तो संगमाकडे निघाला.

कटियाच्या दोन खेपा झाल्या होत्या. चुलीत, आढ्यात असं त्यानं काय काय लपवलं नि बाहेर जाताना ओरडला, ''ते पसार ना त्याच्यावर!''

म्हातारीनं मुद्दाम थोडा वेळ लक्षच दिलं नाही. मग आणखी कुणी कुणी आल्याचे आवाज आले तेव्हा तिनं चिरगूट उचललं नि रेडिओवर पसरलं. आलेली माणसं तशीच पुढे गेली. एक पोरगं म्हातारीच्या झोपडीत शिरलं. तिच्या केसांना धरून थोडं हलवत

म्हणालं, ''एइऽऽ! आलाय पूर!''
''कितका?''
''एउक-एवढाऽ!'' टाचा उंचावून हात वर ताणत ते म्हणालं. मग पटकन बाहेर निघून गेलं.

म्हातारी जरा बाहेर बघत बसली. मग मेटाकुटीनं उठली आणि हळूहळू बाहेर आली. तेवढ्यानंच तिला धापावल्यासारखं झालं. एक हात दारावर टेकवून तिनं दोन्हीकडे पाहिलं. तिच्या नजरेच्या टप्प्यात काही तिला पाणी दिसलं नाही.

बाहेर आल्यासारखं तिनं थुंकून घेतलं आणि ती आपल्या जागेकडे परतली. परतताना तरुण वयात पाहिलेला पूर तिला आठवला. केवढा तो पूर होता! आताच्या पुराहून नक्कीच मोठा.

कित्येक वर्षांपूर्वी दोन टीचभर टेकड्यांमधल्या बारीकशा ओढ्याला आलेला तो पूर आता एवढा मोठा झाला नि तिचं मन व्यापून बसला. तो पूर ओलांडणं जमलं नव्हतं. आणि पुण्याचा पूर दरवर्षी पैजेवर ओलांडला जातो हे तिला ठाऊक होतं.

शीला अत्यंत थकली होती; अत्यंत विस्कळीत झाली होती. स्वत:ला कुठे नि कसं आवरून घ्यावं तेच तिला कळत नव्हतं. आपले डोळे सुजले आहेत की डोळ्यांतून पाणी वाहतंय ते तिला कळत नव्हतं. तिचा प्रत्येक अवयव दुखत होता आणि शरमेनं, भयानं, संतापानं ती पुन्हा पुन्हा तापत होती.

श्याम नि त्याचा इंजिनीयरिंगचा एक मित्र बोलत उभे होते.

''आता बराच गाळ जमिनीवर पसरेल, नाही?'' श्यामनं विचारलं.

''छे! हा पूर आहे ना, तो लोंढ्याच्या स्वरूपाचा आहे. धरणीची माती पाण्याबरोबर जाईल हे खरं; पण पाणी जमिनीवर टिकणारच नाही.''

''अस्सं!'' श्याम उद्गारला. हे आपल्याला कितपत कळलं त्याचा विचार करू लागला.

तितक्यात एक पोलिस गाडी येऊन घुमणारा आवाज काढू लागली. ते पोलिस लोकांना काहीतरी सांगायचा प्रयत्न करीत आहेत म्हणून ती दोघं थोडे पुढे गेली. श्याम आणखी पुढे गेला. पोलिसकडून माहिती कळली की पाणी आणखी वाढेल. किती? तर बारा फूट!

श्यामनं हे मित्राला कळवलं. मित्र हसून म्हणाला, ''यापुढं एक इंचसुद्धा पाणी वाढणार नाही.''

''कसं?''

''दोन्ही धरणं फुटली आहेत. हे सगळं त्यातलं पाणी धावतंय. आता आणखी पाणी वाढायचं म्हणजे आणखी कुठला तरी साठा मोकळा झाला पाहिजे. तो काही कुठे नाही.''

हे श्यामला पटलं. शिवाय आताच जो पाऊस पडून गेला तो तरी काय पाणी वाढवणार?

मित्र पुढे म्हणाला, ''आणखी एक इंच पाणी वाढलं तरी सरफेस किती वाढला? एकूण तेच पाणी हजारो घनफूट होईल!''

म्हणजे पूर वाढत नाही हे नक्कीच झालं. पण श्यामनं उगीचच पुढे विचार केला, इतका पूर तर पुणं सगळंच धुवून निघेल. असं दृश्य काही कधी या आसपासच्या टेकड्यांनी पाहिलं नसेल.

म्हातारी गुरगुटून पडली होती. टकटका समोरच्या कोपऱ्यात पाहात होती.

पोरगा अजून आला नव्हता. पण त्याची फारशी काळजी वाटत नव्हती. कारण त्याच्यावर फारसं प्रेम मनात नव्हतंच आणि त्यालापण आपल्याबद्दल फारसं प्रेम वाटत नाही याची तिला जाणीव होती. तो नेहमी आपल्यापुरतं पाहायचा. यावेळीही त्यानं तेच केलं होतं. इतकं काय आणलन. पण म्हातारीसाठी एखादा चिरगूट कपडा आणला नाहीन.

वहिवाटीपुरता झोपडीत येतो न जातो. ह्याला वाढवायला केवढा त्रास झाला. आन ह्यानं आईला रांड म्हटलं. आता तर वाटेल ते बोलतो. ह्याला काय चांगली गत मिळणार आहे?

असं काहीतरी चक्र चाललेलं असतानाच तिचे डोळे थकून मिटले. पाचच मिनिटांनी दोन पातळं घेऊन कटिया आला तेव्हा तिला गाढ झोप लागली होती.

''हा पूर जाणार तरी केव्हा?'' ह्या तरुणानं म्हटलं नि बाळशास्त्र्यांकडे पाहिलं. त्याच्या वैतागलेल्या चेहऱ्याकडे बघताना बाळशास्त्र्यांना त्याची समजूतच काढावीशी वाटली.

त्यांना स्वत:ला थकल्यासारखं वाटत होतं. कानात आवाज भरून राहिला होता. डोक्यातनं पाण्याची वेगवान हालचाल जात नव्हती. अंग अवघडून गेलं होतं. झक्कपैकी आळस द्यावासा वाटत होता. ''देवा रे'' असं म्हणत त्यांनी जांभई दिली. मग त्यालापण एक जांभई आली. तारवटलेल्या डोळ्यांनी दोघं एकमेकांकडे, इकडेतिकडे पाहात राहिले. बोलायला काहीतरी विषय शोधू लागले.

गार हवेत गरम शरीर उघडं ठेवलं म्हणून मोहनला ताप आल्यासारखं वाटत होतं. एक पांघरूण घेऊन त्यानं तिच्यासह स्वत:ला थोडंसं झाकून घेतलं.

अनोळखीच पांघरूण. ही फक्त ओळखीची. भोवतालचं सगळं अनोळखीच. दोघं अगदी खूप जवळ; एकमेकांच्या उबेत! भोवतालीची ऊब आणि अंधारसा.

हे घर पडलं, वाहात जावं लागलं तरी एकमेकांची ऊब नाहीशी होणार नाही. पाण्यानं ओढलं तरी दोघं जवळच, अगदी जवळच असू.

तिथून त्यानं पुराकडे वळून पाहिलं. अंगणात पाणी वाहावं तसं दुसऱ्या मजल्याच्या गॅलरीखालून पाणी वाहात होतं. त्याचं गांभीर्य मनाला जाणवेनासंच झालं होतं. अगदी त्याच्या खालच्याच घरात पाणी भरलेलं होतं.

त्यानं तिच्याकडे पाहिलं. कुठल्यातरी मापाच्या त्या देहाकडे पाहिलं. थोडी मजा आली होती –आणि अजूनही सगळंच काही

संपलं नव्हतं. अजून ती सुख देऊ शकत होती.  तो ते घेऊ पाहात होता. घेणारच होता!

तो तसाच तिच्यावर कलंडला. तिच्या चेहऱ्यावर कुठंतरी ओढ दाबून तिला शोषून घेण्याचा प्रयत्न करू लागला.

पूर ओसरत होता. पाणी तीनचार फूट खाली गेलं होतं.

पाणी असं इतकं दूर झालं, आणि भीती वाटू लागली. तो वेग धोक्याचा वाटू लागला. कळसावर आता तितकं सुरक्षित वाटेना.

यावेळी देवाची अगदी समूर्त आठवण होऊ लागली. देवा, इतकं निभावलंस. आता थोडंच दे ना! पूर अगदी थोडथोडा कमी झाला तरी चालेल. हा वेग मात्र कमी होऊ दे. किती फेसाळतंय इथं?

नकळतच बाळशास्त्र्यांची हुडहुडी थोडी वाढली.

इतका वेळ तो तरुण गप्प उभा राहून मागच्या बाजूला बघत होता. आता तो म्हणाला, ''हे बघा काय ते!''

एक मोठंसं झाड हळूहळू येत होतं. हळूहळू ते आले नि देवळाला टेकून थांबून राहिलं. सगळी जाणीव एकवटून बाळशास्त्री अंदाज घेऊ लागले. देऊळ हलल्यासारखं वाटलं का, ते आठवू लागले.

पाणी तर थोडं थोडं उतरतच होतं. आणखी थोडं- की दरवाजाची कमान दिसेल.

हे झाड देवळाला त्रास देत देत खाली येणार. पण आता धास्ती नाही फारशी! कोसळलं तरी इथल्या इथेच राहील. वाहून नाही जाणार. आपणपण नाही वाहून जाणार! अंहं- तरी पण हे देऊळ टिकू देच.

त्या तरुणानं थोडी हालचाल केली. दोन्ही हात गुंफून त्यानं मांडीजवळ ताण दिला. शरीर थोडं आकसून तो म्हणाला, ''देवबाप्पाऽ!''

शीला उतरत्या पाण्याकडे पाहात होती.

इतकं झालं, इतका वेळ झाला तरी अजून त्यांचं बोलणं  असं झालंच नव्हतं. तिनं त्याला कठोर, कडवट काहीच बोलून घेतलं नव्हतं.

आता तरी बोलावं का? काय बोलावं? पुढच्या आयुष्यात तोच स्पर्श चालू राहावा म्हणून विनवणी करावी? – आणि ते पुढचं आयुष्य सुरूच नाही झालं तर? अजूनही पुराचं बोट खालच्या एखाद्या भिंतीला रेटा देईल, आणि हे घर कोलमडेल.

हाही अनुभव यायचा होता म्हणून हा पूर आला का? आणि इतकाच चढून परत चालला? हे घर न पाडताच परत चालला?

पुन्हा पुन्हा तिचे डोळे भरून येत होते. 'आई ग!' इतकंच म्हणून तिनं खिडकीच्या चौकटीवर डोकं टेकलं.

तेवढ्यात एक शिटीचा अस्पष्ट आवाज ऐकू आला. तिनं एकदम मागे वळून पाहिलं. शिटी त्यानं वाजवली नव्हती. ती थोडी पुढं गेली.

इतक्यात त्यानं मागे पाहिलं. तो तिच्याजवळ आला. कदाचित त्याला काही बोलायचं होतं. त्याचा चेहरा निर्विकार नक्कीच नव्हता.

तिनं बाहेरच्या बाजूला नजर लावली. नंतर क्षणातच ती वेढली गेली. त्यानं जमेल तेवढं तिला कवटाळलं. जमेल तसा तिच्यावरनं हात फिरवला.

मग तो धावतच बाहेर निघून गेला.

हळूच तिनं बाहेर डोकावलं. त्यानं पाण्यात उडी मारली होती. पलीकडच्या एका घराआड स्वयंसेवक आले होते. तिनं त्याच्याकडे परत पाहिलं. वेगानं तो दूर चालला होता. पाहता पाहता तिचा संताप अनावर झाला. कठड्याशी धावत जात ती ओरडली, ''हलकट!'' मग ती आत गेली नि कॉटवर पडून स्फुंदून स्फुंदून रडू लागली.

बाळशास्त्री नि तो तरुण पिंडीसमोर उभे होते.

सगळीकडे चिखल होता. या दोघांनाही चिखल लागला होता. देवळात पिंडीखेरीज दुसरं काहीच उरलं नव्हतं. शेजारची बाळशास्त्र्यांची खोली तर वाहूनच गेली होती. तिथल्या उघड्या दारातून दिसत होती. बाळशास्त्र्यांनी प्रथम डोळे मिटून नमस्कार केला. मग ते भांबावून तसेच उभे राहिले.

काही वेळ शांत राहून तो तरुण म्हणाला, ''आता काही नाही; पाण्यातनंच जायला हवं.'' काही वेळानं तो हलकेच म्हणाला, ''चलणार ना?''

बाळशास्त्र्यांनी मान हलवली. ती दोघं दारापर्यंत गेली. बाहेर सगळ्यावर चिखल पसरला होता. त्यांना गुडघ्याइतक्या चिखलातून समोरचा रस्ता गाठायचा होता. त्यांनी एकमेकांकडे पाहिलं. परत रस्त्याकडे.

निघण्यापूर्वी ''देवा, काय रे हे?'' असं म्हणून बाळशास्त्री मटकन खाली बसले.

श्यामच्या सायकलला चिखल लागला होता. पण त्याला काही इलाज नव्हता. तासापूर्वीच रस्त्यावर पुराचं पाणी होतं.

या भागात फारशी गडबड नव्हती. पण ते ठीक वाटत नव्हतं. एवढा मोठा पूर येऊन गेला. त्या मानानं गोंधळ केवढा पाहिजे! पलीकडच्या बाजूला नक्कीच अगदी दुर्दशा झाली होती.

आसपास आपापल्या घरांशी लोक काहीतरी करीत होते. पूर गेला आणि आता ते आपापल्या जागी परतले, इतका वेळ पूर पसरला होता; त्यावेळी कुणालाच काही करता येत नव्हतं. कुठंतरी कुठंतरी थांबून पूर पाहात बसावं लागलं होतं. आता सगळे परतले होते. उरलंसुरलं वेचून पुन्हा सुरुवात.

मित्राच्या बंगल्याशी श्याम पोचला तेव्हा उतरायचा प्रसंग आला. फाटकाला टेकून त्यानं चपला काढल्या नि कॅरिअरला लावल्या. मग तो खाली उतरला. सायकल बाहेरच ठेवून अंगणातल्या चिखलातून चालू लागला. मित्र गच्चीवर उभा होता. त्यानं श्यामला बाजूच्या चक्री जिन्यानं वर यायला सांगितलं. गच्चीवरून आसपास श्याम बघत असताना मित्र म्हणाला,

''खालच्या दरवाजाशी खूप फर्निचर आतून गोळा झालंय. दरवाजा उघडतच नाही!''

''मग आता?''

''खिडकीतून घुसायचं. पण बाबा अजून आले नाहीत. आणि आज तर काहीच करणं शक्य नाही.''

मग श्यामनं पुराची सगळी माहिती त्याला सांगितली.

काही वेळानं खालून चाललेला एक मित्र ओरडला, ''शाम्या, चल! नवा पूल खुला केलाय!''

ढगाच्या सावटीतच संध्याकाळची चिन्हं उठत होती. ती संध्याकाळ एखाद्या माळावर पसरावी तशीच पुण्यावर पसरत होती. अगदी जवळ जाऊन पाहिलं असतं तर मिणमिणत्याच प्रकाशाचं अस्तित्व तिथं दिसलं असतं; आणि धास्तीचंही.

पूर ओसरला होता. पण मनाचा थरकाप फारसा ओसरला नव्हता. पुरानं आटोपतं घेतलं होतं. नदीला तिचं पात्र मिळालं होतं. पुरानं आता दरवर्षीचं स्वरूप घेतलं होतं.

सातआठ तास त्या पुरात धरणांचं पाणी वाहिलं होतं. जिकडे उतार मिळाला, जिथं टिकाव झाला नाही त्या बाजूला ते धावलं होतं, आपण कुठे कुठे शिरलो, काय काय वाताहत केली, त्या पाण्याला कळलं नव्हतं. आणि आणखी काही तासांतच आपलं स्वरूप खूप किरकोळ होणार आहे, आपल्या नदीच्या जेमतेम अर्ध्या पात्राचं स्वरूप येणार आहे हेही त्या पाण्याला कळत नव्हतं.

पुरानं उडवलेली दैना हळूहळू अंधारात लपत जात होती. तो पूरही आता परत दिसणार नव्हता. त्या त्या सर्वांच्या आयुष्यातून तो गेला होता.

फार तर स्मृतिशेष बनून राहणार होता.

शीला थकून एका ट्रंकेवर बसली होती. तिच्या मैत्रिणीच्या घरचं सामान पडलं होतं. मागच्या पडक्या अवशेषांत माणसं शोध घेत होती. मैत्रिणीच्या आईचं काय झालं हे अजून कळलंच नव्हतं.

ती स्वत:विषयी विचार करीत होती. पण स्वत:विषयी फारसं प्रेम तिला राहिलं नव्हतं. कुणालाच तिच्या बाबतीतली घटना कळली नव्हती. ती कुणाला कळवायला लागू नये असं तिला वाटत होतं.

रस्त्यावरून जाताजाता एक जण दुसऱ्याला सांगत होता, ''मी तुला सांगतो, कालच्या दिवसात पंचवीस तरी बलात्काराचे प्रकार घडलेले आहेत.''

पंचवीस! आपण स्वत: धरून किती? शीलाला एकदम कससंच झालं. पंचवीस मुली ओळीनं पडल्या आहेत नि त्यांच्यावर बलात्कार चालला आहे अशी काहीतरी विचित्र भावना तिला झाली. आणि ते सगळे चेहरे तिचेच होते! त्या मुलींना काय वाटलं असेल? त्यांतल्या कुणी बेहोष झाल्या असतील का? त्यांतल्या कुणी जिवाच्या आकांतानं धडपडल्या असतील का? बलात्कार होताना त्यांना काय वाटलं असेल?

तिनं रस्त्यावर पाहिलं. या पुरुषांपैकी कुणी कुणी बलात्कार केला? या मुलींपैकी कुणाकुणावर बलात्कार झाला?

तिला आठवलं, तिच्यावर बलात्कार होताना तिनं फारसा प्रतिकार केलाच नव्हता. तिला फारसा त्वेष चढलाच नव्हता. ती खरी संतापली होती ती तो गेल्यावर.

परत तिला आगतिक, असहाय्य झाल्यासारखं वाटलं. तिच्या दुर्बलतेवरच्या त्या ठशाची जाणीव तिला परत परत होऊ लागली. शरमेनं, संतापानं तिचा चेहरा परत फुलू लागला. डोळे जमिनीकडे वळवून अश्रू झाकायचा प्रयत्न ती करू लागली.

श्याम मावशीच्या घरातून निघाला तेव्हा मावशीनं त्याला बजावलं, ''तू कुठे भटकत बसू नकोस. लवकर परत ये. जे काय व्हायचं ते सगळ्यांचं एकदम होऊ दे.''

परत पूर येणार नाही हे तिला पटतच नव्हतं.

ज्या भागातून श्याम चालला होता त्याच्या जवळपास पूर आला नव्हता. तरी एकूण विस्कळीतपणा जाणवत होता. पाणवठ्याच्या आधी काही पावलं जसा वापराचा ओलावा येतो तसा त्या भागात चिखल पसरला होता. वातावरणात एक प्रकारचा उजाडपणा भरून राहिला होता. त्याच्या अगदी तळाशी कुठेतरी आपण आहोत असं श्यामला वाटत होतं.

एखादा नवखा माणूस कात्रजकडून पुण्यात शिरला तर त्याला काय वाटेल? त्याला हा उजाडपणा भासेल का? का असाच तो लकडीपुलापर्यंत जाऊन मग चकित होईल?

सांगणं मोठं कठीण होतं, आणि त्यावेळी तरी यावर जास्त विचार करण्यासारखी त्याच्या मनाची स्थिती नव्हती.

लकडी पुलाच्या आसपास सायकलीसह शिरणं म्हणजे वैताग होता. स्वयंसेवकांचं, पोलिसांचं काम सुरू होत होतं. तो मागे फिरला, एका मित्राकडे सायकल ठेवली नि असाच भटकू लागला.

वाटेत मग एक हॉस्टेलवरचाच मित्र भेटला. दोघंही पुराच्या त्रासापासून वाचलेले, त्यामुळे पुराकडे तिऱ्हाइतासारखे पाहणारे! असंच बोलणं सुरू झालं नि बोलता बोलता ते चालू लागले. मध्येच मित्र म्हणाला, ''अर्ध पुणं गेलं! हे आता कधी भरून यायचं?''

श्याम म्हणाला, ''मी सांगतो तुला, पुणं फार लवकर रिकव्हर होईल. कल्पनेपेक्षाही लवकर!''

मग केव्हातरी तो एकटाच उरला. एकटाच भटकत राहिला. असाच, इकडेतिकडे पाहात भटकत राहिला.

केव्हातरी त्याला एका अंगणात एका ट्रंकेवर बसलेली एक मुलगी दिसली. ती खाली पाहत होती आणि तिचा चेहरा कशानं तरी फुलून आला होता.

त्याला ती आवडली. तिचं दु:खही लोभस होतं. तिच्याशी बोलावं, तिला धीर द्यावा असं त्याला खूप खूप वाटू लागलं.

पण पुढे कसं जावं, ओळख कशी करून घ्यावी, हे त्याला कळेना. तो तसाच, तिच्याकडे पाहात थांबून राहिला...

**– श्याम जयराम मोकाशी**

भ्रमणध्वनी : ७५८८२८१२९४/९२२६२२१४६८



# ...एक होता मालकम एक्स!

**अरुण केळकर**



*अमेरिकेतील कृष्णवर्णीयांसाठी हयात वेचलेल्या नेत्यांची यादी मोठी आहे. मालकम एक्स हे त्यातील एक ठळक नाव. कृष्णवर्णीयांसाठी उभारलेल्या चळवळीने ज्याच्या जीवनाला अर्थ दिला. तिनेच त्याचा घातही केला. त्याच्या खुनाला ५६ वर्षे उलटून गेली तरी त्यामागील रहस्य, गूढता यांची चर्चा थांबलेली नाही. अशा या बंडखोराची ही विलक्षण चरित्रगाथा...*



अमेरिकेतल्या एका बंडखोर कृष्णवर्णीय तरुणाची ही चरित्रगाथा आहे.

तो अमेरिकेतील कृष्णवर्णीय म्हटले की हे वेगळे लिहायला नको की त्याचे पूर्वज गुलाम होते. राहायला झोपडी, दोन वेळचे तुटपुंजे जेवण, वर्षाला कपड्याचा एक जोड. ह्याच्या मोबदल्यात दररोज उजाडल्यापासून अंधार पडेपर्यंत गुलामांना आयुष्यभर शेतावर मजुरी करावी लागत असे. अडीचशे वर्षे टिकलेल्या ह्या अन्यायकारक गुलामगिरीचे समर्थन धार्मिक, सामाजिक, वैज्ञानिक अशा विविध प्रकारे केले गेले. बायबलमधील मालक आणि नोकर ह्यांच्यातील संबंधाबाबतच्या ओळींचा वापर मालकांची सेवा केल्यानेच गुलामांना मरणोपरांत मुक्ती मिळेल हे बिंबवण्यासाठी केला गेला. गुलामांना जमिनीचे मालक होण्यास बंदी घातली होती तर सार्वजनिक निवडणुकांत जमिनीच्या मालकांना फक्त मतदानाचा अधिकार ठेवला होता. चार्ल्स डार्विनच्या 'सर्व्हायव्हल ऑफ द फिटेस्ट' ह्या सिद्धांताच्या आधारे असे म्हटले की आफ्रिकेतील कृष्णवर्णीय कालौघात नष्ट होण्याच्या लायकीचे होते. गुलाम ही एक मौल्यवान मालमत्ता आहे असे मानले गेले म्हणूनच इंग्लंडमध्ये गुलामगिरीवर कायद्याने बंदी घातली तेव्हा तेथील सरकारने बेकार, बेघर झालेल्या गुलामांना वाऱ्यावर सोडून दिले आणि गुलामांच्या मालकांना दरडोई नुकसानभरपाई दिली.




दक्षिणेतील राज्यांशी नागरी युद्ध करून १८६३ साली अध्यक्ष अब्राहम लिंकनने गुलामगिरी नष्ट केली. गुलामांना हयातभर अत्यल्प मासिक अनुदान देणाऱ्या अमेरिकन सरकारने त्यांच्या वारसांना अनुदान तर दिलेच नाही पण उत्पनाची कोणतीही साधने वा कोणतेही कसब शिकण्याची सोयही उपलब्ध करून दिली नाही. साहजिकच कृष्णवर्णीय समाज मागासलेला, अशिक्षित राहिला, मुक्त होऊनसुद्धा पिढ्यान्‌पिढ्या गरीबीतून बाहेर आला नाही, सन्मानाचे जिणे जगू शकला नाही.

गुलामगिरीच्या काळात गुलामांचे मालक आणि व्यापारी (गुलामांची खरेदी-विक्री होत असे) गुलामांसाठी, मानववंशशास्त्रात आधार नसलेला, निग्रो

किंवा निगर हा घृणास्पद शब्द वापरत असत (जसे आपल्याकडे सफाई कर्मचाऱ्याला भंगी, महार म्हटले जात असे.). पुढे तो शब्द गुलामांच्या वंशजांसाठी वापरला जाऊ लागला. कालांतराने त्यांना ब्लॅक म्हणजे काळे असे म्हणू लागले आणि आता त्यांचा उल्लेख आफ्रिकन अमेरिकन असा केला जातो. **एक खुलासा : ह्या लेखाच्या पूर्वार्धात आफ्रिकन अमेरिकन लोकांचा निग्रो आणि उत्तरार्धात काळे असा उल्लेख केला आहे.**

अमेरिकेतल्या न्यू यॉर्क शहराच्या हार्लेम ह्या भागात स्फोटक परिस्थिती निर्माण झाली होती.

वेळ होती २६ एप्रिल १९५७च्या मध्यरात्रीची. रस्ता क्रमांक आठवरील पोलिसचौकीसमोर तीन-चार हजार निग्रोंचा संतप्त जमाव जमला होता. दोन निग्रो तरुणांना पोलिसांनी चौकीत बंद करणे हे ह्याला कारण झाले होते. त्या दोघांचा गुन्हा एवढाच होता की त्यांनी रस्त्यावर गोऱ्या पोलिसांना एका निग्रो तरुणाला मारताना हटकले होते. त्या दोघांपैकी एक होता हिल्टन, जो 'नेशन ऑफ इस्लाम' ह्या निग्रोंच्या संघटनेचा सदस्य होता. पोलिसांनी त्यांना दंडुक्यांनी इतक्या क्रूरपणे मारले होते की हिल्टनच्या डोक्याला खोक पडून तो रक्तबंबाळ झाला होता. अशा अवस्थेत पोलिसांनी त्या दोघांना चौकीत बंद केले होते. जशी जशी वेळ जाऊ लागली, लोकांचा क्षोभ वाढत गेला आणि परिस्थिती हाताबाहेर जाईल असे वाटू लागले होते. त्यावेळी अंगावर काळ्या रंगाचा सूट, डोळ्यांवर चष्मा, सहा फूट तीन इंच उंचीचा, त्वचेचा रंग विटकरी-तपकिरी, केसांचा रंग लाल असलेला एक निग्रो तरुण तेथे हजर झाला आणि तडक चौकीत शिरला. जमावाच्या, ज्यांच्यापैकी अधिकतर नेशन ऑफ इस्लामचे सदस्य होते, तो चांगला परिचयाचा होता.

तो होता माल्कम एक्स. नेशन ऑफ इस्लामच्या हार्लेम येथील मशिदीचा जहाल म्हणून ओळखला जाणारा प्रमुख. पोलिसांनी माल्कम एक्सला जखमींची भेट घेऊ दिली पण त्यांना इस्पितळात नेण्यास वा नेऊ देण्यास नकार दिला. काहीच तोडगा दिसत नाही हे समजून माल्कम एक्स पोलिसचौकीच्या बाहेर आला आणि त्याने जमावाला हाताने निघून जाण्याचा इशारा केला. कोण्या जनरलने आपल्या सैनिकांना आज्ञा केल्याप्रमाणे क्षणार्धात सगळा जमाव काहीही प्रतिक्रिया न दर्शवता चालता झाला. तेथे उपस्थित पोलिस हा प्रकार अचंबित होऊन पाहत राहिले. दुसऱ्या दिवशी सकाळी नेशन ऑफ इस्लामने अडीच हजार डॉलरचा जामीन दिल्यावर त्या दोघांची सुटका झाली आणि हिल्टनला इस्पितळात नेले गेले. जमावावरच्या ह्या प्रभावाने माल्कम एक्सची अमेरिकेला ओळख करून दिली. एका गोऱ्या वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने नंतर न्यू यॉर्कच्या एका वर्तमानपत्राच्या संपादकाशी बोलताना असे उद्‌गार काढले होते की एखाद्या निग्रोचा जमावावर असा प्रभाव असणे चांगले नाही.

अर्ल आणि लुईस लिटिल (लुइस नॉर्टन) ह्या निग्रो दाम्पत्याचा माल्कम हा चौथा मुलगा. माल्कमला तीन सावत्र भावंडे होती. त्याचा जन्म १९ मे १९२५ रोजी अमेरिकेतील नेब्रास्का राज्याच्या ओमाहा शहरात झाला. अर्ल आणि लुईस ह्या दोघांचे पूर्वज गुलाम होते. अर्लच्या पूर्वजांच्या मालकाचे आडनाव लिटिल होते. गुलामगिरीच्या काळात गुलामांना कोणतेही हक्क नसल्याने, आडनाव असायची गरज त्यांना नव्हती, तशीच ती समाजाला नव्हती. म्हणून एक तर त्यांना आडनाव नसायचे किंवा ते कोणाचे गुलाम आहेत हे सगळ्यांना समजावे ह्यासाठी ते त्यांच्या मालकांच्या आडनावाने ओळखले जायचे. म्हणूनच ते अर्ल लिटिल म्हणून ओळखले गेले. जन्मत:च गुलाम असलेल्या लुईसच्या आजीवर स्कॉटिश मालकाने केलेल्या बलात्कारातून एक अपत्य झाले. तिचा वंशज माल्कम हा त्यामुळेच अन्य निग्रोंसारखा काळाकभिन्न नव्हता तर विटकरी-तपकिरी होता आणि त्याचे केस लालसर होते, जे त्याच्या आईला त्याच्याबद्दल वाटणाऱ्या दुस्वासाचे कारण होते. कदाचित त्याच्या त्वचेच्या आणि केसांच्या रंगामुळे आपल्या आजीवर गोऱ्या मालकाने केलेल्या बलात्काराची तिला आठवण येत असावी.

बाप्टिस्ट चर्चचे पास्टर असलेले अर्ल फावल्या वेळात युनिव्हर्सल निग्रो इम्प्रूव्हमेंट असोसिएशन नावाच्या निग्रोंच्या संघटनेचे कार्य करत तर लुईस लिटिल त्या असोसिएशनच्या वर्तमानपत्रात लिहीत असत. स्वावलंबी, स्वत:विषयी अभिमान बाळगणारे अर्ल गोऱ्यांच्या अरेला कारेने उत्तर देणारे होते. लहानपणापासून माल्कम वडिलांबरोबर असोसिएशनच्या सभेला जात असे. अर्लच्या कुटुबीयांना ह्या कार्यामुळे 'ब्लॅक लिजन' आणि 'कु क्लु क्लान' ह्या गोऱ्यांच्या वंशवादी संघटनांच्या दहशतवादाला सामोरे जावे लागत होते. ब्लॅक लिजनच्या गुंडांनी नोव्हेंबर १९२९मध्ये अर्लचे घर पेटवून दिले. सुदैवाने आगीत कोणाचाही मृत्यू झाला नाही पण आग विझवण्याचे प्रयत्न अग्निशमनदलाकडून केले गेले नाहीत आणि घर संपूर्णपणे बेचिराख झाले. ह्या न थांबणाऱ्या दहशतवादामुळे लिटिल दाम्पत्य आपल्या सात मुलांसह ओमाहाहून स्थलांतर करत करत मिशिगन राज्याच्या लान्सिंगला पोहोचले. जेथे त्यांनी १९२८ साली गोऱ्यांच्या वस्तीत एक घर विकत घेतले आणि त्यात राहू लागले. १९२९मध्ये गोऱ्या गुंडांनी आग लावून तेही घर बेचिराख केले. त्यानंतर दोन वर्षांनी- माल्कम सहा वर्षांचा असताना - अर्लचा देह रेल्वेच्या रुळावर दोन तुकडे झालेल्या अवस्थेत सापडला. शवावर अमानुष मारहाण केल्याच्या खुणा दिसत होत्या. ह्याआधीच माल्कमच्या तीन चुलत्यांचा गोऱ्या वंशवाद्यांनी खून केला होता, त्यात चौथ्याची भर पडली. पोलिसांच्या अहवालानुसार तो एक अपघात होता, पण सगळ्यांना असे वाटत होते की ब्लॅक लिजनच्या गुंडांनी अर्लला मारून त्यांचा देह रेल्वे रुळावर टाकला होता. अर्लने आपल्या आयुष्याचा विमा उतरवला होता, पण विमा कंपनीने अर्लने आत्महत्या केली हे कारण देत लुईस लिटिलला विम्याचे लाभ देण्यास नकार दिला.

अर्लच्या अकाली मृत्यूच्या पश्चात लगेचच जगावर महामंदीचे संकट ओढवले आणि जगाबरोबरच अमेरिकची अर्थव्यवस्था कोसळली, लोक देशोधडीला लागले. गोऱ्यांचा दहशतवाद आणि निग्रो आणि गोऱ्यांमधील वांशिक दंगे तर थांबण्याचे नावच घेत नव्हते. अशा परिस्थितीत लुईस गोऱ्यांच्या घरी घरकाम करून

आपल्या अपत्यांचे कसबसे संगोपन करत होत्या. तशातच त्यांनी एका अनौरस अपत्याला जन्म दिला. १९३७च्या सुमारास त्यांना मानसिक आजार झाला असल्याचे लक्षात येऊ लागले. ह्या अपत्याच्या जन्मानंतर त्यांचा मानसिक आजार बळावला आणि वेडाच्या भरात त्या अपत्याला घेऊन, फाटक्या कपड्यात अनवाणी शहरभर फिरू लागल्या. अखेर त्यांना मानसोपचारासाठी इस्पितळात ठेवावे लागले. जेथे त्यांनी २४ वर्षे काढली. माल्कमला आपल्या वेड्या आईची शरम वाटत होती तर त्याच्या आईच्या मनातला त्याचा दुस्वास काही कमी होत नव्हता. इकडे घरी मुलांचे पालनपोषण करणारा कोणीच नसल्याने माल्कम आणि त्याच्या भावंडांना वेगवेगळ्या कुटुंबांत संगोपनार्थ ठेवले गेले.

त्यावेळी कायद्याने निग्रो आणि गोरे ह्यांच्या शाळा मिश्र असणे बंधनकारक होते, पण गोरे असे मानत की निग्रोंनी शिक्षण घेण्याची गरज नाही, वा त्यांची ती कुवत नाही. अनेक ठिकाणी तर निग्रोंच्या मुलांना पोलिसांच्या संरक्षणात शाळेत जावे-यावे लागायचे. माल्कम चे संगोपन करणाऱ्या गोऱ्या दाम्पत्याने त्याला अशाच एका मिश्र शाळेत घातले होते. तेथील सर्व शिक्षक गोरेच होते आणि ते गोऱ्यांच्या वंशवादी, श्रेष्ठत्ववादी विचाराच्या प्रभावापासून दूर नव्हते. बुद्धीने अतिशय हुशार असलेला मॉनिटर माल्कम वर्गात गोऱ्या मुलांहून अधिक गुण मिळवत असे. आठवीत असताना त्याने त्याच्या इंग्रजी शिकवणाऱ्या गोऱ्या शिक्षिकेला आपल्याला वकील व्हायचे आहे असे सांगितल्यावर त्या हृदयशून्य शिक्षिकेने तू एक निग्रो मुलगा कसा काय यशस्वी वकील होणार, त्यापेक्षा तू धडधाकट आहेस, तेव्हा सुतारकाम शीक असा सल्ला दिला. मनोभंग झालेला माल्कम तेव्हापासून शाळेपासून दूर होत गेला आणि वयाच्या पंधराव्या वर्षी अंतिमत: त्याने शाळा सोडली.

शाळा सुटलेला अनाथ माल्कम उनाडपणा करायला लागला. तो कमी व्हावा असा विचार करून त्याच्या एल्ला नावाच्या ज्येष्ठ सावत्रबहिणीने त्याला आपल्याकडे बॉस्टनला राहायला बोलावले, जेथे रोजगार मिळण्याच्या शक्यता जास्त होत्या. माल्कम तयार झाला कारण एक तर एल्ला सुखवस्तू होती आणि दुसरे म्हणजे बॉस्टनसारख्या मोठ्या शहराचे त्याला आकर्षण होते. बॉस्टनमध्ये त्याला हॉटेलमध्ये येणाऱ्या गिऱ्हाईकांचे बूट पॉलिश करण्याचे काम मिळाले. त्याच्या गरजेच्या मानाने हे काम करून काही कमी कमाई होत नव्हती, पण त्याच्या लक्षात आले की ह्याबरोबरच गिऱ्हाईकांना चरस, गांजासारखे मादक पदार्थ विकून आणि भडवेगिरी करून तो कमी वेळात आणि श्रमांत चार पैसे जास्त कमावू शकतो आणि तो ते करू लागला. ह्यातसुद्धा त्याची चलाखी म्हणा, हुशारी म्हणा वा स्ट्रीट स्मार्टनेस म्हणा, तो वेश्यांकडून दलाली तर घेत असेच, त्यांच्या गिऱ्हाईकांकडूनही घेत असे. विना किंवा अल्प कष्ट करून हातात पैसा खेळायला लागला की जे होते ते माल्कमच्या बाबतीतही झाले. जुगार, मादक पदार्थांचे सेवन-विक्री, भडवेगिरी आणि वेश्यागमन हे तर त्याचे रोजचे आयुष्य झाले. तो छोटेमोठे गुन्हेसुद्धा करू लागला. वयाच्या अठराव्या वर्षी तो बॉस्टन सोडून न्यू यॉर्कला स्थलांतरित झाला आणि निग्रोंची मोठ्या संख्येने वस्ती असलेल्या हार्लेम भागात राहू लागला, जेथे त्याच्या व्यसनात कोकेनची भर पडली. ह्या गुन्हेगारी आणि व्यसनाधीन आयुष्यात खंड तेव्हा पडला, जेव्हा १९४६ साली वयाच्या एकविसाव्या वर्षी एका गोऱ्या माणसाच्या घरफोडीच्या गुन्ह्यात तो रंगेहाथ पकडला गेला आणि त्याला दहा वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा झाली. त्याला प्रथम बॉस्टनच्या तुरुंगात आणि दोन वर्षांनंतर एल्लाच्या प्रयत्नाने मॅसॅच्युसेट्सच्या नॉरफोल्क प्रिझन कॉलनीत हलवले गेले. तुरुंगात तो सैतान म्हणून ओळखला जात असे, कारण तो देवाधर्माचा तिरस्कार करायचा. तेथे असताना एकदा त्याचा मोठा भाऊ रेजिनाल्ड त्याला भेटायला आला. भेटीत त्याने नुकतेच आपण आपल्या भावंडांसह इस्लाम स्वीकारल्याचे आणि नेशन ऑफ इस्लाम ह्या काळ्या शिया मुसलमानांच्या छोट्याशा धार्मिक संघटनेचे सदस्यत्व घेतल्याचे सांगितले. या संघटनेच्या उद्दिष्टांविषयी आणि तिचा प्रमुख एलायझा महमदविषयी माहिती दिली.



**नागरी हक्क चळवळ जोमात असण्याचा काळ होता. डॉ. मार्टिन ल्युथर किंगसह नागरी हक्क चळवळीतील अन्य काळे नेते गोरे लोक दुखावले जाणार नाहीत अशी भाषा वापरत असत तर माल्कम एक्स आपले विचार कसलीही भिडमुर्वत न बाळगता काळ्यांच्या रोजच्या वापरल्या जाणाऱ्या शब्दांत मांडत असे. तो असे म्हणत असे, की अहिंसक मार्गाने काळ्या लोकांना समाजात प्रतिष्ठा आणि मान्यता मिळणार असेल तर ते चांगलेच असेल. अमेरिकेने काळ्या लोकांना कधीच अहिंसक वागणूक दिली नाही म्हणूनच अमेरिकन जनतेने तो करत असलेल्या हिंसेच्या समर्थनाविषयी बोलण्यापेक्षा काळ्यांवर केल्या जाणाऱ्या हिंसेविषयी बोलले पाहिजे असे त्याचे म्हणणे होते.**

भावंडांच्या भेटीतून आणि त्यांच्याशी केलेल्या पत्रव्यवहारातून नेशन ऑफ इस्लामबाबत मिळालेल्या माहितीने माल्कमला त्या संघटनेविषयी कुतूहल वाटू लागले आणि त्याने एलायझा महमदशी पत्रव्यवहार करण्यास सुरुवात केली. तुरुंगातील एका कैद्याने त्याची उपजत बुद्धिमत्ता ओळखली आणि त्याला वाचन करण्यास प्रवृत्त केले. त्याला ज्ञान प्राप्त करण्याची मुळात जिज्ञासा होतीच, ती आता जागृत झाली होती आणि ती पुरी करायला वाचनालयदेखील

होते. तो तुरुंगातील वाचनालयात जाऊ लागला. त्याच्या वाचनात विविध विषयांवरची पुस्तके आली. त्यात प्रामुख्याने इतिहास आणि तत्त्वज्ञानाची पुस्तके होती. आपला शब्दसंग्रह वाढावा म्हणून त्याने शब्दकोशाचा अभ्यास केला. तुरुंगात होणाऱ्या वक्तृत्वस्पर्धेमध्ये भाग घेतला. इंग्रजी भाषेचा टपाली अभ्यासक्रम आणि लॅटिनचा अभ्यास सुरू केला. वाचनालयातून पुस्तके आणून तो रात्र रात्र जागून ती वाचत असे. अर्थात त्याच्या कोठडीत वाचन करता येईल एवढा प्रखर दिवा नव्हता म्हणून तो व्हरांड्याच्या लोखंडी गजाला टेकून उभा राहून वा जमिनीवर बसून वाचन करत असे आणि गस्त घालणाऱ्या सुरक्षारक्षकाची चाहूल लागली की पटकन बिछान्यावर उडी मारून झोपला असल्याचे नाटक करत असे. मुळात हुशार, उत्कृष्ट आकलनशक्ती, वाचनाची वृत्ती असलेल्या माल्कमला तुरुंगातील वाचनालय हा एकच पण मोठा आधार होता.

ह्या वाचनातून त्याला आपल्या समाजाच्या वास्तव परिस्थितीचे दर्शन झाले. गुलामगिरीतील क्रूरता, अमानुषपणा, पिळवणूक, गुलामांना दिली गेलेली जनावरांसारखी वागणूक ह्या इतिहासाच्या पुस्तकात न आढळणाऱ्या बाबी त्याच्या लक्षात आल्या. त्याला आठवले की सातवीच्या इतिहासाच्या पुस्तकात अमेरिकेतील दोन-अडीचशे वर्षांच्या गुलामगिरीविषयी आणि तिचे दुष्परिणाम भोगलेल्या निग्रोंविषयी फक्त एक परिच्छेद होता. त्याच्या हेही लक्षात आले की गोऱ्यांनी आफ्रिकेतून गुलाम पकडून आणले हे प्रचारमाध्यमातून केले जाणारे विधान धादांत खोटे होते, तर पकडून आणलेल्या लोकांना गुलाम केले गेले हेच सत्य होते. तोपर्यंत त्याला हेही माहीत नव्हते की आफ्रिकेतील लोकांना इतिहास होता, त्यांची स्वत:ची भाषा आणि विकसित संस्कृती होती आणि पृथ्वीतलावर मानवाचा उगम आफ्रिका खंडातील काळ्या लोकांपासून झाला आहे.

ह्या सर्वाचा परिणाम असा झाला की तो आपल्या आयुष्याचा पुनर्विचार करू लागला ज्यातून त्याच्या आयुष्यातील बदलाला सुरुवात होणार होती. त्याने इलायझा महमद यांना पत्र लिहून त्यांचा सल्ला मागितला. इलायझा महमद यांनी स्वत: लिहिलेल्या उत्तरात असा सल्ला दिला की माल्कमने गुन्हेगारी सोडावी आणि अल्लाला शरण जावे. हीच त्यांच्या दीर्घ मैत्रीची सुरुवात होती. तोपर्यंत कुठल्याही देवाधर्माविषयी आकर्षण नसलेल्या, कसलेही धर्माचरण न करणाऱ्या माल्कमने १९४९ मध्ये तुरुंगात असतानाच इस्लाम स्वीकारून नेशन ऑफ इस्लाम ह्या संघटनेचे सदस्यत्व स्वीकारले.

नेशन ऑफ इस्लामच्या सदस्यांवर काही बंधने होती. त्यापैकी सदस्यांनी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी असावे, कुटुंबवत्सल असावे आणि सर्व प्रकारच्या व्यसनांपासून दूर राहावे ही महत्त्वाची होती. ह्यानुसार  माल्कमने सिगारेट सोडली. इस्लाम स्वीकारल्यामुळे डुकराचे मांस खाणे सोडले. कदाचित त्याच्या आयुष्यात होत असलेल्या आमूलाग्र बदलाची ही बाह्य लक्षणे असावी. नेशन ऑफ इस्लामचे विचार आणि तुरुंगातील वाचन, चिंतन आणि मनन ह्याचा माल्कमवर एवढा दीर्घ परिणाम झाला होता की त्याने कोकेनचे सेवन कायमचे सोडलेच, सुटकेपासून लग्न होईपर्यंतच्या एक तपाच्या कालावधीत स्त्रीसंग टाळला होता.

भरकटलेल्या आयुष्याला दिशा मिळालेला, नव्याने स्वीकारलेल्या धर्माने प्रेरित झालेला आणि त्यात आकंठ बुडालेला माल्कम तुरुंगातून सुटल्यावर कल्पना करता येणार नाही अशा जगात जाणार होता. ऑगस्ट १९५२मध्ये सात वर्षे तुरुंगवास भोगल्यावर चांगल्या वर्तणुकीबद्दल त्याची मुदतपूर्व सुटका केली गेली. तो डेट्रॉइटला राहायला गेला. तेथे त्याला विक्रेत्याची नोकरी मिळाली.

गुलामगिरी संपुष्टात आणल्यानंतर अमेरिकन सरकारने प्रत्येक गुलामाला चाळीस एकर जमीन आणि एक खेचर देण्याचे धोरण अवलंबले. परंतु लवकरच गोऱ्यांच्या दडपणाखाली ह्या धोरणाची अंमलबजावणी सरकारने थांबवली. गुलामगिरीतून मुक्त झालेल्या निग्रोंच्या अपेक्षा वाढत होत्या पण त्या पूर्ण होण्याची शक्यता मात्र दिसत नव्हती. त्यातच मंदीचा कहर झाला होता. गुलामगिरीतून मुक्त झालेल्या निग्रोंना पोटापाण्यासाठी काहीतरी करणे आवश्यक होते म्हणून रोजगाराच्या शोधात ते उत्तरेकडील शहरांकडे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर करू लागले. ह्यापैकी एक होते डेट्रॉइट. मोटारगाड्यांच्या कारखान्यांसाठी एकेकाळी प्रसिद्ध असलेल्या ह्या शहरात मात्र वेगळेच काहीतरी घडत होते. इतर उद्योजक एकाही निग्रोला मजूर म्हणूनसुद्धा नोकरीवर ठेवण्यास तयार नसत, तेव्हा मोटारींचे उत्पादन करणाऱ्या हेन्री फोर्ड नावाच्या एका गोऱ्या उद्योजकाने हजारो निग्रोंना नोकऱ्या दिल्या आणि त्यासुद्धा नेहमीपेक्षा दुप्पट मजुरीवर. हे शक्य झाले होते त्याच्या असेंब्ली लाइन उत्पादन पद्धतीमुळे. म्हणूनच त्यावेळी ह्या शहरात अडीच लाख निग्रो होते तर ग्रेट ब्रिटन अणि युरोपातील विविध देशांमधून आलेले नऊ लाख गोरे होते. निग्रोंचा दुस्वास करणाऱ्या ह्या गोऱ्या वंशाच्या लोकांत आपसांत ऐक्यभाव नव्हताच, त्यांच्या वस्त्या वेगळ्यावेगळ्या होत्या. निग्रोंच्या वस्त्या त्यांच्या वस्त्यांपासून दूर असत, निग्रोंच्या वस्त्यांत गोरे राहू इच्छित नसत आणि गोऱ्यांच्या वस्तीत ते निग्रोंना राहू देत नसत. कोणा निग्रोने त्यांच्या वस्तीत घर घेतलेच तर ते त्याला दहशत घालून हुसकावून लावत. कायद्याने सामाजिक भेदभाव करणे दंडनीय ठरवले होते तसेच सर्वांना समान सुविधा देणे बंधनकारक केले होते, पण ह्याचा अर्थ सामाजिक समता आली असा नव्हता. कारण गोऱ्यांनी ह्याचा अर्थ असा लावला की सर्वांना समान सुविधा म्हणजे सर्वांसाठी एकच सुविधा असा नव्हे, तर समान पण वेगवेगळ्या सुविधा असाव्या. म्हणून सर्व सार्वजनिक सुविधांच्या बाहेर प्रवेशदाराजवळ मोठ्या अक्षरांत गोऱ्यांसाठी, काळ्यांसाठी अशा पाट्या असत आणि बस, रेल्वे, हॉटेलमध्ये गोऱ्यांसाठी राखीव जागा आणि डबे असत.

ह्याच डेट्रॉइट शहरात निग्रोंच्या वस्त्यांत घरोघरी जाऊन छोट्यामोठ्या वस्तू विकणारा वॉलेस डी. फार्ड नावाचा एक निग्रो विक्रेता होता. तो केवळ वस्तू विकत नसे तर तेथील लोकांशी निग्रोंच्या परिस्थितीविषयी आणि गोऱ्यांकडून मिळणाऱ्या अमानुष वागणुकीविषयी संवाद साधत असे. १९३० साली त्याने नेशन ऑफ इस्लाम ह्या संघटनेची स्थापना केली आणि स्वत:ला तो एफ. वार्ड महमद म्हणवून घेऊ लागला.

नावात जरी इस्लाम हा शब्द असला तरी ती इस्लामचा प्रचार करणारी संघटना नव्हती तर तिच्या विचारधारेत इस्लामची प्राथमिक

तत्त्वे आणि निग्रोंचा राष्ट्रवाद ह्यांची सांगड घातली होती. तिची उद्दिष्टे पीडित, असहाय्य निग्रोंना ईश्वराची आणि स्वत:ची ओळख करून देणे, त्यांचे सशक्तीकरण करणे, त्यांना आत्मनिर्भर बनवणे अणि त्यांच्यात स्वाभिमान जागृत करणे ही होती. एफ. वार्ड महमदच्या मते काळ्या वंशाचे लोक हे गोऱ्या वंशाच्या लोकांपेक्षा मूलत: उच्च आहेत. गोऱ्यांचा वंश विनाशाकडे चालला आहे आणि त्यात त्यांचा सर्वनाश होणार आहे. त्याने आपल्या संघटनेच्या सदस्यांना अशा एका जगाचे दर्शन घडवले की ज्यात ते केंद्रस्थानी असतील आणि त्यांचा तिरस्कार करणाऱ्या जगात उच्च स्थानावर असतील. नेशन ऑफ इस्लामने त्यांना जीवन कसे जगावे ह्याचे काटेकोर नियम तर घालून दिलेच, त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी जमिनी विकत घेतल्या, विविध उद्योगधंदे सुरू करून सदस्यांना नोकऱ्या दिल्या आणि काळ्या लोकांचे आपापसांत व्यवहार व्हावे ह्यासाठी उत्तेजन दिले. ज्या समाजाला शिक्षणाची तोंडओळखसुद्धा नव्हती, पिढ्यान्‌पिढ्या केवळ शेतमजुरी करत आलेल्या, व्यवहाराची काहीच माहिती नसलेल्या, कसलेही कसब नसलेल्या, देशोधडीला लागलेल्या लोकांना संघटनेच्या विचारांचे आकर्षण वाटले तर नवल ते काय. एफ. वार्ड महमदच्या मते निग्रोंना गोऱ्यांकडून कधीच न्याय मिळणार नाही आणि म्हणून त्यांनी गोऱ्यांकडून समान हक्क मिळण्याची अपेक्षा न ठेवता शक्य असेल तर अमेरिकेत, अन्यथा आफ्रिकेत स्वदेशी परत जाऊन तेथे आपल्या स्वतंत्र राष्ट्राची स्थापना करावी. रोजच्या जीवनात हरघडी संधीचा अभाव अनुभवणाऱ्या निग्रोंच्या मनावर आपले स्वतंत्र राष्ट्र असावे ह्या विचाराने जबरदस्त परिणाम केला होता.

एफ. वार्ड महमदच्या विचाराने प्रभावित झालेल्या लोकांमध्ये इलायझा पूल नावाचा एक निग्रो माणूस होता. १९३१साली त्याने इस्लाम आणि नेशन ऑफ इस्लामचे सदस्यत्व स्वीकारून संघटनेचे कार्य करणे सुरू केले. पुढे त्याला संघटनेमध्ये वरचे स्थान दिले गेले आणि त्याचे नाव इलायझा महमद असे ठेवले गेले. नेशन ऑफ इस्लामची अशी मान्यता होती की एफ. वार्ड महमद हा ईश्वराचा अवतार असून इलायझा महमद हा त्याचा प्रचार करण्यासाठी पाठवलेला प्रेषित आहे. १९३४ साली एफ. वार्ड महमद कोणालाही उत्तराधिकारी न नेमता गूढ रीत्या नाहीसा झाल्यावर इलायझा महमदने संघटनेवर कब्जा मिळवला आणि तो स्वत:ला अल्लाचा प्रेषित म्हणवून घेऊ लागला.

नेशन ऑफ इस्लामचे सदस्य आपले वंशपरंपरागत नाव गोऱ्यांच्या इतिहासाने पुसून टाकले आहे हे दर्शवण्यासाठी नावापुढे एक्स लावत असत. १९४९मध्ये नेशन ऑफ इस्लाम संघटनेचे सदस्यत्व स्वीकारलेल्या माल्कमने १९५३साली आपले लिटिल हे गुलामगिरीचे लक्षण असलेले आडनाव वापरणे सोडून दिले आणि तो स्वत:ला माल्कम एक्स म्हणवून घेऊ लागला.



**“कोणी तुम्हाला स्वातंत्र्य देऊ शकणार नाही. कोणी तुम्हाला समता किंवा न्याय वा अन्य काही देऊ शकणार नाही, जर तुमच्यात धमक असेल तर ते मिळवा. तुमचे मन तुमचे हत्यार असेल तेव्हा तुम्ही कधीच नि:शस्त्र असणार नाही.”**

नेशन ऑफ इस्लामने मशिदी, ज्याला ते टेम्पल असे म्हणत असत, तर बांधल्याच, त्याचबरोबर सदस्यवाढीसाठी लहान-मोठ्या शहरांत मेळावे भरवले आणि नवीन प्रकारच्या समाजात राहावे कसे ह्याचे प्रशिक्षण देणारी व्यवस्था उपलब्ध करून दिली. माल्कम एक्सचे अंगभूत गुण ओळखून त्याची १९५४मध्ये डेट्रॉइटच्या टेम्पल नंबर १मध्ये असिस्टंट मिनिस्टर या पदावर नेमणूक केली गेली. त्यानंतर बॉस्टन, फिलाडेल्फिया आणि शेवटी हार्लेमच्या टेम्पल नंबर ७च्या प्रमुखपदी नेमणूक करण्यात आली, ज्या पदावर तो दहा वर्षे राहिला. अल्पावधीतच माल्कम एक्स नागरी हक्क चळवळीचा आणि काळ्यांचा एक प्रमुख नेता बनला. १९५० आणि ६०च्या दशकात तो संघटनेचा राष्ट्रीय प्रवक्ता होता. त्याच्या आक्रमक शैलीत मांडलेल्या काळ्यांच्या राष्ट्रवादाला काळ्यांचा चागला प्रतिसाद मिळत होता आणि संघटनेची सदस्यसंख्या वाढत होती. १९५२साली तो तुरुंगातून मुक्त झाला तेव्हा नेशन ऑफ इस्लामची सदस्य संख्या ४०० होती, ती त्याच्या अथक प्रयत्नांमुळे आणि झंझावती दौऱ्यांमुळे १९६०ला ४०००० वर गेली. त्याचबरोबर तो एक विख्यात पत्रकारही झाला, अनेक नियतकालिकांसाठी लिहू लागला आणि त्याने संघटनेचे महमद स्पीक्स हे नियतकालिक सुरू केले.

ह्याच काळात त्याच्या लक्षात आले की बेट्टी एक्स (सँडर्स) नावाची परिचारिकेचे काम करणारी एक काळी तरुणी त्याची भाषणे ऐकायला नियमितपणे येत आहे. बेट्टीने १९५६मध्ये इस्लाम स्वीकारला अणि नेशन ऑफ इस्लामच्या प्रथेप्रमाणे ती बनली होती बेट्टी एक्स. अन्यथा कुठचीही पूर्वओळख नसताना, एकदाही स्वतंत्र भेट न घेता माल्कमने तिला फोनवरून मागणी घातली आणि १९५८च्या जानेवारीत त्यांनी लग्न केले. त्यांना यथावकाश सहा मुली झाल्या ज्यापैकी शेवटच्या जुळ्या मुलींचा जन्म माल्कम एक्सच्या खुनानंतर झाला.

नागरी हक्क चळवळ जोमात असण्याचा काळ होता. डॉ. मार्टिन ल्युथर किंगसह नागरी हक्क चळवळीतील अन्य काळे नेते गोरे लोक दुखावले जाणार नाहीत अशी भाषा वापरत असत तर माल्कम एक्स आपले विचार कसलीही भिडमुर्वत न बाळगता काळ्यांच्या रोजच्या वापरल्या जाणाऱ्या शब्दांत मांडत असे. हे नेते अहिंसा, सामंजस्य आणि समरसता ह्या मार्गाने चळवळ नेऊ पाहत होते, जे वास्तवाला धरून किंवा काळ्यांसाठी उपयुक्त आहे असे त्याला वाटत नव्हते. तो असे म्हणत असे, की अहिंसक मार्गाने काळ्या लोकांना समाजात प्रतिष्ठा आणि मान्यता मिळणार असेल तर ते चांगलेच असेल. प्रत्येकाला आपली उद्दिष्टे अहिंसक मार्गाने साध्य करायला आवडतील पण तो स्वत: वास्तववादी होता. अमेरिकेने काळ्या लोकांना कधीच अहिंसक वागणूक दिली नाही म्हणूनच अमेरिकन जनतेने तो करत असलेल्या हिंसेच्या समर्थनाविषयी बोलण्यापेक्षा काळ्यांवर केल्या

जाणाऱ्या हिंसेविषयी बोलले पाहिजे असे त्याचे म्हणणे होते.

माल्कम एक्सची गोऱ्या लोकांविषयीची मते अती टोकाची होती, तशीच ती काळ्या लोकांच्या अडाणीपणाबाबत, इतिहासाच्या अनभिज्ञतेबाबत, वास्तवाचे भान नसल्याबाबत होती. काळ्या वंशाचा अभिमान बाळगणारा, स्पष्टपणे विचार मांडणारा, उत्कटतेने बोलणारा आणि प्रभावी वक्ता माल्कम एक्स आवाहन करत असे की काळ्यांनी दमनातून मुक्त होण्यासाठी आपले रक्षण स्वत: करावे, आपली स्वतंत्र अर्थव्यवस्था निर्माण करावी, अमेरिकेत आपले स्वतंत्र स्थान, आपली सत्ता प्रस्थापित करावी आणि ह्यासाठी हिंसेसह आवश्यक ते सर्व मार्ग वापरावे. त्याच्या भाषणात श्रोत्यांना जे जाणवत होते पण ओठांतून प्रकट होत नसे ते ऐकायला मिळे.

इसाई धर्माचा धिक्कार करत तो म्हणत असे की ह्या धर्माने काळ्या लोकांना सोनेरी रंगाचे केस आणि निळे डोळे असलेल्या येशूची आराधना करायला लावली. जो त्यांच्यासारखा दिसत नाही तो त्यांचा त्राता आहे हे त्यांच्या मनावर बिंबवले. काळ्यांना दिल्या गेलेल्या अमानुष वागणुकीच्या समर्थनार्थ गोरे इसाई धर्मग्रंथांचा कसा वापर करत हे त्याने विषद केले. इतिहासात गोऱ्यांनी काळ्यांचे जे शोषण, दमन केले त्यामुळे माल्कम एक्स गोऱ्यांचा उल्लेख गोरे सैतान असा करत असे.

संघटनेच्या कार्यामुळे माल्कम एक्सच्या अनुयायांची संख्या खूप मोठी झाली होती. नेशन ऑफ इस्लामचे नाव घेतले म्हणजे लोकांसमोर माल्कम एक्सचा चेहरा येत असे. परंतु तो खरा अमेरिकन जनतेसमोर आला तो दूरदर्शनच्या जादूमुळे, जेव्हा सीबीएस ह्या वाहिनीने नेशन ऑफ इस्लामवरील त्याच्या एका दीर्घ मुलाखतीची चित्रफीत प्रक्षेपित केली. 'नेशन ऑफ इस्लाम : घृणेने निर्माण केलेली घृणा' असे प्रक्षोभक नाव असलेल्या ह्या चित्रफितीच्या प्रक्षेपणामुळे माल्कम एक्स देशभरच्या गोऱ्या लोकांच्या घराघरापर्यंत पोहोचला. तोपर्यंत त्याचे श्रोते काळे असत. आता ते संमिश्र झाले. त्याचे व्यासपीठही अधिक व्यापक झाले. त्याची रेडिओ आणि टीव्हीवर भाषणे होऊ लागली. सामाजिक आणि धार्मिक विषयांवर त्याच्या विद्वानांशी जाहीर वादविवाद आणि चर्चा होऊ लागल्या. हार्वर्ड, प्रिंस्टन आणि ऑक्स्फर्ड यांसारख्या विविध विद्यापीठांत भाषणांसाठी त्याला आमंत्रित केले जाऊ लागले. जून १९६३मध्ये हार्लेम येथे आयोजित केलेल्या युनिटी रॅलीचे नेतृत्व त्याने केले. ज्या रॅलीचे प्रसारमाध्यमांनी नागरी हक्क चळवळीतील एक मोठी घटना असे वर्णन केले होते. न्यू यॉर्क टाइम्सने त्याचा उल्लेख अमेरिकेतला दोन क्रमांकाचा वक्ता असा केला होता.

माल्कम एक्सला लोकप्रियता मिळाली, पण तो सगळ्यांचा चाहता झाला होता असे मात्र नव्हे. काही जणांसाठी तो एक खलनायक होता. गोऱ्यांच्या मनात ही धडकी होती की प्रस्थापितांविरुद्ध जहाल आणि बंडाची भाषा वापरणाऱ्या माल्कम एक्समुळे त्यांच्या विरोधात जागोजागी मोठ्या प्रमाणावर हिंसक घटना घडतील. तर मवाळ निग्रो पुढारी अशासाठी बेचैन होत असत की त्याच्या आक्रमकतेमुळे अहिंसक मार्गाने चाललेल्या नागरी हक्क चळवळीचे नुकसान होईल.

माल्कम एक्सने जहाल, स्फोटक भाषणे देत अमेरिकन काळ्यांचे नेतृत्व केले. काळा वंश उच्च असल्याची आग्रही मांडणी, सामंजस्य नाकारणारा, काळ्यांच्या मुक्तीसाठी हिंसेसह आवश्यक ते सर्व मार्ग अवलंबवण्याचे समर्थन करणारा, आकर्षक व्यक्तिमत्त्व असलेला माल्कम एक्स काळ्यांच्या गळ्यातला ताईत का बनला हे त्याच्या भाषणातील पुढील काही वचनांवरून समजून येईल.

''आमच्यावर अत्याचार होतात कारण आम्ही अमेरिकेतले काळे आहोत. ह्याचा आम्ही प्रतिकार केला नाही तर आमच्यासारखे मूर्ख आम्हीच. तुमच्या अंगावर कुत्रा आला, मग तो पोलिसांचा असो वा अन्य कोणाचा, चार पायांचा असो वा दोन, तुम्ही त्याला मारलेच पाहिजे.''

''प्रत्येक मानवाला मग तो कुठेही राहत असो, आपल्या जिवाचे आणि मालमत्तेचे रक्षण आवश्यक त्या सर्व आणि कोणत्याही मार्गाने करण्याचा पूर्ण हक्क आहे, खासकरून तेथे ज्या देशाच्या सरकारने हे दाखवून दिले आहे की ते त्या मानवाच्या जिवाचे आणि मालमत्तेचे संरक्षण करण्यास समर्थ नाही वा करू इच्छित नाही.''

''तुम्ही जर जागरूक राहिला नाही तर प्रचारमाध्यमे तुम्हाला ज्यांचे दमन होत आहे त्यांचा तिरस्कार करायला शिकवतील आणि जे दमन करताहेत त्यांच्याविषयी आत्मीयता निर्माण करतील.''

''माझा अहिंसेवर विश्वास नाही. जे हिंसाचारी आहेत त्यांच्याबाबत हिंसक होण्याचा मला हक्क आहे असे मी मानतो.''

''मी येथे सत्य काय आहे हे सांगायला आलो आहे. आणि हे सत्य देशविरोधी आहे असे वाटत असेल तर सत्याला दोष द्या, मला नाही.''

''कोणी तुम्हाला स्वातंत्र्य देऊ शकणार नाही. कोणी तुम्हाला समता किंवा न्याय वा अन्य काही देऊ शकणार नाही, जर तुमच्यात धमक असेल तर ते मिळवा. तुमचे मन तुमचे हत्यार असेल तेव्हा तुम्ही कधीच नि:शस्त्र असणार नाही.''

''आम्ही जाहीर करतो की आम्हाला हक्क आहे ह्या पृथ्वीतलावर मानव म्हणून जगण्याचा, ह्या समाजाचे घटक म्हणून आज ह्या घडीला समान हक्क मिळण्याचा आणि ते साध्य करण्यासाठी आम्ही कोणत्याही मार्गाचा अवलंब करण्यास तयार आहोत.''

''तुम्हाला ज्यांच्याविरुद्ध संघर्ष करायचा आहे त्यांनी घालून दिलेल्या नियमानुसार संघर्ष करू नका.''

''शांतीप्रिय राहा, नम्रतेने वागा, कायद्याचे पालन करा, प्रत्येकाचा आदर करा, पण कोणी तुमच्यावर हात उगारला तर त्याला स्मशानात पोहोचवा.''

''देशभक्तीने तुम्ही इतके आंधळे होता कामा नये की तुम्हाला वास्तव दिसणार नाही. जे चुकीचे आहे ते चूकच असते मग ते कोणीही बोलले असो.''

''वंशवाद हा कॅडिलॅक गाडीसारखा आहे, दरवर्षी ते नवनवीन मॉडेल आणतात.''

''ह्या देशात अहिंसेच्या मार्गाने जाण्याचा सल्ला कोणाला दिला जातो तर तो फक्त काळ्यांना.''

''गोऱ्या माणसाला सत्याची भीती वाटते... मीच असा एक काळा माणूस आहे ज्याच्या जवळपास ते आले आहेत आणि त्यांना हे माहीत आहे की तो सत्यकथन करत आहे. त्यांच्या मनातील अपराधी भावनेने ते भयभीत होतात, माझ्यामुळे नाही.''

''आम्हाला असे साथीदार नको, जे अहिंसक मार्गाने जाण्याचा सल्ला देतील. आम्हाला असे साथीदार हवेत जे आम्हाला जय मिळवून देतील. कोणी गोरा तुम्हाला मदत करायला आला तर त्याला विचारा की जॉन ब्राऊनविषयी त्याला काय वाटते. ब्राऊनला गोऱ्यांनी वेडपट ठरवला होता कारण काळ्यांना मुक्ती मिळावी ह्यासाठी तो स्वत:चे रक्त सांडायला तयार होता.''

''तुम्ही माझ्या पाठीत नऊ इंच सुरा खुपसला आणि तीन इंच बाहेर काढला तर ती प्रगती नाही. तुम्ही तो सुरा पूर्णपणे बाहेर काढला तरी ती प्रगती नाही. जखम भरून येणे हीच प्रगती असेल आणि अमेरिकेने सुरा तर बाहेर काढला नाहीच, पण सुरा पाठीत आहे हेसुद्धा मान्य केले नाही.''



नेशन ऑफ इस्लाममधील माल्कम एक्सची धूमकेतूच्या वेगाने होणारी वाटचाल, वाढती लोकप्रियता आणि इलायझा महमदपेक्षा जास्त मिळणारी प्रसिद्धी संघटनेतील अनेकांच्या डोळ्यांत खुपू लागली होती, खरे म्हणजे ते मत्सर करू लागले होते. काहींनी तर तो संघटनेतील पदाचा स्वत:ला फायदा करून घेण्यासाठी वापर करत असल्याचा आणि इलायझा महमदकडून संघटनेचा ताबा घेण्याच्या प्रयत्नात असल्याचा आरोपही केला. परंतु भारावून टाकणारे व्यक्तिमत्त्व, स्वतंत्र विचार करण्याची क्षमता, उपजत नेतृत्वाचे गुण असलेला माल्कम एक्स हे सर्व दुर्लक्षित करत राहिला.

**अमेरिकेतील काळ्या लोकांचा प्रश्न सोडवणे अमेरिकेच्या क्षमतेच्या बाहेरचे आहे, आणि हा प्रश्न काळ्यांचा नाही, तो अमेरिकेचाही नाही, हा नागरी हक्क नाकारण्याचा मुद्दा नाही तर हा मानवी हक्क नाकारण्याचा, मानवतेचा प्रश्न आहे म्हणून तो अमेरिकन सरकारच्या हातातून काढून घेतला पाहिजे आणि दक्षिण आफ्रिका, अंगोला येथील काळे आणि रशियातील ज्यू आपला प्रश्न संयुक्त राष्ट्र संघासमोर नेण्याचा प्रयत्न करत आहेत तसा आपण केला पाहिजे असे तो मांडू लागला.**

माल्कम एक्सच्या वाढत्या लोकप्रियतेने अमेरिकी शासनही चिंतित झाले होते. सगळीकडे होते तसे त्याच्यावर मध्यवर्ती आणि राज्य पोलिस चोवीस तास नजर ठेवू लागले होते. गुप्तहेर संघटना एफ.बी.आय. त्याच्यावर पाळत ठेवायला आणि त्याचे फोन चोरून ऐकायला लागली. त्या काळात एफ.बी.आय.मध्ये काळे कर्मचारी नसल्याने तिने नेशन ऑफ इस्लामच्या काही सदस्यांना आपले खबरे केले, ज्यांनी संघटनांतर्गत संघर्षाला खतपाणी घातले. नंतर जाहीर झालेल्या एडगर जे. हुवर ह्या एफ.बी. आय.च्या प्रमुखाने आपल्या न्यू यॉर्क ऑफिसला ६ जून १९६४ रोजी लिहिलेल्या पत्रात माल्कमचे काहीतरी करा असे लिहिल्याचे उघड झाले आहे.

सन १९६२मध्ये माल्कम एक्सच्या कानावर इलायझा महमदच्या अनैतिक वर्तनाच्या, त्याला संघटनेतील स्त्रियांपासून विवाहबाह्य अपत्ये झाली असल्याच्या बातम्या आल्या आणि तो हादरून गेला. माल्कम एक्ससाठी इलायझा महमद केवळ एक धार्मिक गुरूच नव्हता तर तो आध्यात्मिक मार्गदर्शकही होता. त्याच्या शिकवणीमुळेच त्याने कोकेनचे सेवन बंद केले होते, बारा वर्षे स्त्रीसंग टाळला होता.

अमेरिकेचे अध्यक्ष जॉन एफ. केनेडी ह्यांच्या नोव्हेंबर १९६३मध्ये झालेल्या खुनाबाबत आपल्या कोणाही सदस्याने काहीही वक्तव्य करू नये असा फतवा नेशन ऑफ इस्लामने काढला होता. परंतु एका पत्रकाराने ह्याबाबत विचारलेल्या प्रश्नाच्या प्रतिक्रियेत माल्कम एक्स 'करावे तसे भरावे' एवढेच बोलला. माध्यमांनी ह्याचा अर्थ तो केनेडींच्या हत्येचे समर्थन करत आहे असा लावला. माल्कम एक्सने त्याचा खुलासा असा केला की त्याला असे म्हणायचे होते की अमेरिकेत द्वेष इतक्या मोठ्या प्रमाणावर वाढला आहे की तो काळे आणि गोरे ह्यांच्यातील संघर्षाच्या बाहेर पसरला आणि त्यातून केनेडी ह्यांचा खून झाला. ह्या वक्तव्यामुळे नाराज झालेल्या इलायझा महमदने शिक्षा म्हणून माल्कम एक्सला आपला आवाज नव्वद दिवस बंद ठेवण्याचा आदेश दिला. त्याने हा आदेश मानला, पण त्याच्या लक्षात आले की संघटनेने त्याचा आवाज दाबायला सुरुवात केली आहे आणि इलायझा महमद त्याला संघटनेतून हुसकून काढण्याच्या प्रयत्नात आहे. माल्कम एक्सवर संघटनेअंतर्गत एवढे दडपण वाढले की जी संघटना मोठी होण्यास त्याने दिवसरात्र कार्य केले होते ती सोडण्याचा निर्णय त्याने घेतला आणि मार्च १९६४ मध्ये अनेक सदस्यांसह तो नेशन ऑफ इस्लाममधून बाहेर पडला.

माल्कम एक्सने नेशन ऑफ इस्लाम संघटना सोडण्यासाठी संघटनेच्या प्रमुखाचे अनैतिक वर्तन हे तर प्रमुख कारण होतेच, पण इलायझा महमदबरोबर मतभेद हेसुद्धा होते. त्यापैकी पहिले म्हणजे पोलिस दडपशाहीविरूद्ध आवाज न उठवणे हे होते, ज्याचा प्रत्यय त्याला दोन घटनांमधून आला. लॉस एंजेलिस पोलिसांनी टेंपलमध्ये घुसून गोळीबार केला ही पहिली, तर अलाबामा राज्याच्या बर्मिंगहॅम शहरात काळ्यांचा जमाव नियंत्रित करण्यासाठी पोलिसांनी कुत्र्यांचा वापर केला, ज्याच्यामुळे जमावातील स्त्रिया, तरुण मुलेमुली आणि छोटी छोटी बालके जखमी झाली. पण राष्ट्राध्यक्ष केनेडींनी पोलिसांवर काहीही कारवाई केली नाही आणि ह्यावर काळ्यांचा समाज अधिक संतप्त होऊन घराबाहेर पडला तेव्हा केनेडींनी त्यांच्याविरोधात सैनिकी कारवाई केली, ही दुसरी होती.

ह्याच काळात नागरी हक्क चळवळ मोठ्या प्रमाणात बळावत होती. डॉ. मार्टिन ल्युथर किंगसारख्या मवाळ नेत्यांना काळ्या लोकांबरोबरच गोऱ्यांचा पाठिंबा मिळू लागला होता आणि माल्कम

एक्सला असे वाटू लागले होते की नागरी हक्कांसाठी लढणाऱ्या अन्य संघटनांबरोबर, काळ्या नेत्यांबरोबर आणि धार्मिक संघटनांबरोबर एकत्रित काम करावे, जे इलायझा महमदला मंजूर नव्हते.

ह्याशिवाय माल्कमला एक्सला हे उमजायला लागले होते की काळ्या लोकांचे स्वतंत्र राष्ट्र असावे ही मागणी आग्रहाने करत असताना इलायझा महमदकडून त्या दृष्टीने कोणतीच पावले उचलली जात नाहीत. ह्यातूनच त्याला इलायझा महमद आपली आणि काळ्या लोकांची फसवणूक करत आहे असे वाटू लागले होते.

माल्कम एक्सने संघटनेतून बाहेर पडण्याचे परिणाम गंभीर झाले. संघटनेच्या अनेक सदस्यांना तो गद्दार झाला असे वाटू लागले. त्याला ठार मारण्याच्या धमक्या येऊ लागल्या. नेशन ऑफ इस्लामच्या प्रत्येक शाखेत 'फ्रुटस ऑफ नेशन' नावाचे सशस्त्र दल असे, स्थानिक गुंड ह्या सशस्त्र दलात समाविष्ट करून घेतले जात. त्यामार्फत माल्कम एक्सच्या दोन्ही घरांवर हातबाँब टाकले गेले. सुदैवाने घरातील कोणी जखमी झाले नाही वा मरण पावले नाही. नेशन ऑफ इस्लामने क्वीन्स, न्यू यॉर्क येथील माल्कम एक्स राहत असलेल्या घराचा ताबा मिळावा म्हणून न्यायालयात दावा ठोकला.

सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यावर इलायझा महमदवर टीका करत त्याने परखडपणे असे म्हटले, मी इलायझा महमदच्या वंशवादी विचारधारेचा धिक्कार करतो, ज्याला त्याने लोकांना फसवण्यासाठी आणि त्यांचा वापर करता यावा ह्यासाठी इस्लाम असे नाव दिले. त्याने मला फसवले आणि माझा वापर केला. मी जो मूर्खपणा केला आणि त्याच्या वतीने जे मी प्रचाराचे काम केले त्यासाठी मी अन्य कोणाला नाही तर मलाच जबाबदार समजतो.

माल्कम एक्सने त्याच्याबरोबर बाहेर पडलेल्या नेशन ऑफ इस्लामच्या सदस्यांसाठी मुस्लीम मॉस्क इनकॉर्पोरेटेड ही संघटना स्थापन केली. आपल्या विचारांच्या समर्थनार्थ तो पारंपरिक इस्लामच्या तत्त्वांचा वापर करू लागला. त्याचवर्षी म्हणजे १९६४साली त्याने हजची यात्रा केली. तेथील इस्लामच्या अनुयायांच्या वांशिक आणि कातडीच्या रंगांच्या विविधतेने तो आश्चर्यचकित झाला. ह्याच प्रभावाखाली त्याने आपले नाव बदलण्याचा निर्णय घेतला, आता तो माल्कम एक्सऐवजी अल हज मलिक अल शाबाज ह्या नावाने ओळखला जाणार होता.

आफ्रिका आणि मध्य पूर्वेच्या ह्या दौऱ्यात माल्कमच्या विचारांत खूपच बदल झाला. समाजात फूट पाडू शकणाऱ्या आपल्या विचारांबाबत तो पुनर्विचार करू लागला आणि त्याने कातडीच्या रंगावर नाही तर श्रद्धेवर जोर देण्याचे ठरवले. हजयात्रेत असताना माल्कम एक्सने एका पत्रात लिहिले होते की ह्या यात्रेने आपल्याला गोऱ्यांबाबतचा वंशवादी विचाराचा त्याग करायला प्रवृत्त केले. ह्यापूर्वी तो गोऱ्यांपासून दूर राहत असे तर आता तो काळ्यांवरील अत्याचाराविषयी बोलण्यासाठी गोऱ्यांना प्रोत्साहित करू लागला. हजची यात्रा केल्यानंतर अमेरिकन गोऱ्यांना उद्देशून लिहिलेल्या एका जाहीर पत्रात त्याने अमेरिकन लोकांना वर्णविद्वेषापासून मुक्ती पावण्यासाठी इस्लाम स्वीकारण्याचे आवाहन केले. ह्या पत्रावर त्याने नव्याने स्वीकारलेल्या अल हज मलिक अल शाबाज ह्या नावाने सही केली होती.

डॉ. मार्टिन ल्युथर किंग (ज्युनिअर) हे काळ्यांच्या चळवळीतील एक मोठे नाव होते. ते अहिंसक मार्गाने नागरी हक्क मिळवता येतील ह्या मताचे होते तर अल हज मलिक अल शाबाजला ते मान्य नव्हते. एवढेच नव्हे तर त्याने आपले मतभेद आपल्या नेहमीच्या तिखट भाषेत खुलेपणाने मांडले होते. १९६३साली मार्टिन ल्युथर किंगने वॉशिंग्टन येथे एका प्रचंड मोर्च्यासमोर नंतर जगप्रसिद्ध झालेले 'आय हॅव ए ड्रीम' हे भाषण केले. हेच डॉ. किंग तुरुंगात असताना टोकाचे राजकीय मतभेद बाजूला ठेवून तो त्यांच्या पत्नीला भेटायला गेला. ह्या पार्श्वभूमीवर एका पत्रकाराने त्याला ह्या भेटीचे कारण मुद्दाम खवचटपणे विचारले. त्यावर त्याने डॉ. किंगच्या पत्नीला असे सांगितल्याचे उघड केले की मी तुमच्या कार्यात अडचणी निर्माण करण्यासाठी आलो नाही, तर ते सोपे करण्यासाठी आलो आहे. गोऱ्या लोकांना डॉ. किंगला पर्याय कोण आहे हे समजले तर कदाचित ते त्यांचे विचार अधिक सहानुभूतीने ऐकतील.

अल हज मलिक अल शाबाजने १९६४ साली ऑर्गनायझेशन ऑफ ॲफ्रो अमेरिकन युनिटी ह्या नावाच्या अधार्मिक संघटनेची स्थापना केली तिच्यात कोणीही काळा माणूस, मग तो मुसलमान असो वा नसो, सदस्य बनू शकणार होता. जिच्या माध्यमातून तो अमेरिकेतील काळ्यांचे अनुभव तिसऱ्या जगातील लोकांपर्यंत पोहोचवणार होता आणि ज्यायोगे अमेरिकेतील काळ्या लोकांना नागरी हक्कच नाही तर मानवी हक्क प्राप्त करून देणार होता. ह्या संघटनेचा प्रमुख म्हणून त्याने जगातील प्रमुख नेत्यांच्या भेटी घेतल्या आणि ह्या सर्वाचा परिणाम असा झाला की त्या संघटनेच्या सदस्यांत नेशन ऑफ इस्लामपेक्षा वांशिक आणि धार्मिक विविधता अधिक आली.

अमेरिकेतील काळ्या लोकांचा प्रश्न सोडवणे अमेरिकेच्या क्षमतेच्या बाहेरचे आहे, आणि हा प्रश्न काळ्यांचा नाही, तो अमेरिकेचाही नाही, हा नागरी हक्क नाकारण्याचा मुद्दा नाही तर हा मानवी हक्क नाकारण्याचा, मानवतेचा प्रश्न आहे म्हणून तो अमेरिकन सरकारच्या हातातून काढून घेतला पाहिजे आणि दक्षिण आफ्रिका, अंगोला येथील काळे आणि रशियातील ज्यू आपला प्रश्न संयुक्त राष्ट्र संघासमोर नेण्याचा प्रयत्न करत आहेत तसा आपण केला पाहिजे असे तो मांडू लागला. आतापर्यंत तो अमेरिकेतील काळ्यांविषयी विचार करत असे, बोलत असे, आता त्यात वैश्विकता आली, तो जगभरातल्या काळ्यांविषयी बोलू लागला. ह्याच संदर्भात त्याने फ्रान्सला काळ्यांच्या वैश्विक परिषदेला जाण्याचे ठरवले पण फ्रान्स सरकारने त्याला, कोणतेही कारण न देता, फ्रान्समध्ये प्रवेश देण्याचे नाकारल्याने तो ते करू शकला नाही.

अल हज मलिक अल शाबाज राष्ट्रीय नागरी हक्क चळवळीच्या विचाराजवळची भूमिका घेऊ लागल्यामुळे नेशन ऑफ इस्लामच्या विचारातील एकांगीपणा उघड होऊ लागला होता तर इलायझा महमदच्या व्यभिचारी वर्तनाबाबत जाहीरपणे बोलू लागल्यामुळे त्याच्या संघटनेतील नैतिक स्थानाला धोका निर्माण होऊ लागला होता. त्याच्याइतका प्रभावी वक्ता संघटनेमध्ये नव्हता आणि काळ्यांच्या

प्रश्नावर सर्वांना समाविष्ट करून घेण्याच्या भूमिकेमुळे त्याला वाढता पाठिंबा मिळू लागला होता. मग ह्यात आश्चर्य काय की त्याला खुनाच्या वाढत्या धमक्या मिळू लागल्या. पण अशा घटनांमुळे तो विचलित होणारा नव्हता. स्थापन केलेल्या दोन्ही संघटनांचे कार्य करत राहणे त्याच्यासाठी खूपच जिकिरीचे होते, पण ते त्याच्या मूल्यांशी निगडित होते.

पूर्वी त्याच्या सभा नेशन ऑफ इस्लामतर्फे आयोजित केल्या जात, आता त्या ऑर्गनाझेशन ऑफ ॲफ्रो-अमेरिकन युनिटीतर्फे आयोजित होऊ लागल्या. अशीच एक सभा रविवार, २१ फेब्रुवारी १९६५ रोजी न्यू यॉर्कच्या मॅनहॅटन येथील ऑडोबान हॉलमध्ये आयोजित केली होती. वेळ होती दुपारची ३.१०ची. ऐनवेळी आमंत्रित प्रमुख पाहुण्याने आपण येत नाही असे कळवल्यामुळे अल हज मलिक अल शाबाज गुश्शातच होता. कोणाला तरी मंचावर बसवून सभा सुरू झाली. सभेला ४०० श्रोते उपस्थित होते. त्यात त्याची गर्भवती पत्नी आणि चार मुली होत्या. त्याच्यावर पोलिसांची २४ तास पाळत असे. त्याच्या सभांना नेहमीच पोलिसांचा खूप मोठा बंदोबस्त असे हे पाहता त्यादिवशी हॉलवर पोलिस बंदोबस्त अजिबात नव्हता हे जरा विलक्षणच होते. त्याने सभेला येणाऱ्या श्रोत्यांची हत्यारासाठी तपासणी करण्याची नेशन ऑफ इस्लामची प्रथा मोडीत काढली होती. अल हज मलिक अल शाबाजने भाषणाला सुरुवात केली नव्हतीच की प्रेक्षकांमध्ये काही बोलाचाली झाली. त्यांना शांत करण्याचा प्रयत्न होत असतानाच पुढील रांगेत बसलेला एक माणूस मंचावर धावत गेला आणि त्याने अल हज मलिक अल शाबाजवर गोळ्या झाडायला सुरुवात केली. सभेत गोंधळ माजला आणि हे होत असतानाच आणखी दोघे जण मंचावर गेले आणि त्यांनीसुद्धा त्याच्यावर गोळ्या झाडायला सुरुवात केली. त्याच्यावर एकूण १५ गोळ्या झाडल्या गेल्या. अल हज मलिक अल शाबाजचा खून झाला होता. त्यावेळी त्याचे वय ३९ होते. खुनाच्या आरोपावरून त्या तिघांना पुढे जन्मठेपेची शिक्षा झाली, पण अनेकांना असे वाटत होते की पोलिसांनी तपासात हलगर्जीपणा केला आणि खऱ्या खुन्यांना पकडलेच नाही. खुनाच्या जागेची तपासणी केली नाही. इतकेच नव्हे, तर ही घटना घडल्याच्या काही तासांनी तो हॉल साबणाने धुऊन त्यात नृत्याचा एक कार्यक्रम होऊ दिला. त्याच्या अंत्यदर्शनासाठी तीस हजार लोक आले होते, तर हार्लेममधील त्याच्या अंत्ययात्रेत पंधराशे लोक सामील झाले होते.

काळ्यांच्या चळवळीने त्याच्या भरकटलेल्या जीवनाला अर्थ दिला, पण तिनेच त्याच्या जीवनाचा हिंसक अंत केला.

**उपसंहार**

माल्कम एक्स, त्याचे विचार आणि त्याचे कार्य ह्याविषयी त्याच्या हयातीत आणि मरणोपरांत अनेकांनी विस्तृत आणि सखोल लिहिले आहे, अजूनही लिहिले जात आहे. खून झाला त्या सुमारास डबलडे अँड कं ही प्रकाशन कंपनी त्याचे ॲलेक्स हॅली नावाच्या प्रसिद्ध लेखकाने शब्दांकन केलेले चारपाचशे पानांचे आत्मचरित्र छापणार होती. पण गोऱ्यांच्या दहशतवादाला घाबरून तिने ते प्रकाशित करण्याचे नाकारले. काही कालावधीनंतर हे आत्मचरित्र ग्रोव्हर प्रेसने प्रकाशित केले. त्याच्या लाखो प्रती विकल्या गेल्या. ह्याशिवाय त्याच्या अन्य एका चरित्रग्रंथाची पृष्ठसंख्या चारशेहून अधिक आहे.

जे साध्य करण्यासाठी दीर्घ आयुष्याची तपस्या लागते ती वैचारिक आणि आध्यात्मिक प्रगल्भता माल्कमने आपल्या ३९ वर्षांच्या छोट्याशा आयुष्यात मिळवली. व्यसनाधीन आयुष्याच्या गर्तेतून बाहेर पडून एक संघटना उभी करणे, समाजातील असमानतेविषयी चर्चा करायला भाग पाडणे हे काही लहान यश नव्हे. स्वत:ची ओळख झाल्यावर एखादी व्यक्ती काय साध्य करू शकते ह्याचे ते एक जिवंत उदाहरण आहे.

त्याच्या चेहऱ्यासदृश चेहरा असलेले एक डाक तिकीट अमेरिकन सरकारने १९९९साली प्रसारित केले.

धनसंपत्तीचा लोभ नसलेला माल्कम एक्स एक धडाडीचा संघटक होता, काळ्यांच्या चळवळीतला एक बुलंद आवाज होता, ज्याने स्वतंत्र ओळख, स्वाभिमान आणि आत्मनिर्भरता ह्यावर जोर देऊन काळ्यांच्या समाजात चेतना आणली. त्यातूनच त्याच्या मृत्यूनंतर आपल्या वंशाचा अभिमान ह्यावर जोर देणारी 'ब्लॅक पँथर' (ब्लॅक पँथर पार्टी फॉर सेल्फ डिफेन्स) नावाची एक संघटना कॉलेजमध्ये जाणाऱ्या दोन तरुणांनी स्थापन केली. ह्याच चळवळीतील एका नेत्याने 'ब्लॅक पॉवर' हे शब्द वापरले. आणि त्यानंतर झालेल्या १९६८च्या ऑलिंपिक स्पर्धेत अमेरिकन काळ्या विजेत्या स्पर्धकांनी विजेतेपद स्वीकारल्यानंतर हात उंचावून बंद मूठ दाखवत साऱ्या जगाचे लक्ष 'ब्लॅक पॉवर' ह्या संकल्पनेकडे वेधून घेतले.

२०२०मध्ये एका गोऱ्या पोलिसाने २१ वर्षीय काळ्या नि:शस्त्र तरुणाला भररस्त्यात खाली पाडून निर्दयपणे गुडघ्याने गळा घोटून मारून टाकल्यावर 'ब्लॅक लाईव्हज् मॅटर' (काळ्यांच्या जिवाला मोल आहे) ही चळवळ सुरू झाली. ह्याचा परिणाम असा झाला की निवडणुकीत मतदान करता यावे ह्यासाठी कधी नव्हे एवढ्या मोठ्या प्रमाणावर गोरेतर लोकांनी, खासकरून तरुणांनी, मतदार म्हणून नोंदणी करून घेण्याची मोठी मोहीम राबवली आणि मतदान केले, जे अध्यक्ष ट्रम्पचा पराजय होण्याचे एक कारण झाले असे म्हटले जाते.

त्याच्याबाबत बोलताना कोणतरी बोलले होते, मी अहिंसेचे पालन करतो, पण त्याची मला शरम वाटते.

हे सर्व लिहिल्यावर (त्याच्या आयुष्याचा विचार करता) प्रश्न पडतो की ऑडोबान हॉलमध्ये कोणाचा खून झाला? माल्कम लिटिलचा, माल्कम एक्सचा, की अल हज मलिक अल शाबाज ह्याचा?

**– अरुण केळकर**
भ्रमणध्वनी : ९८३३०५३००७
arunkelkar@rediffmail.com

# कला... स्वप्न... आणि पंख...

**राज शिंगे**

**जन्म** घेणे विधात्याच्या हातात असले तरी आईच्या ओटीपोटात वाढणे हे सहज आपसूक होत असते. तसा माझा जन्म एक सामान्य कष्टकरी कुटुंबात झाला. बाबा वाहन चालक, वेगवेगळ्या शेटजींकडे गाडीचा ड्रायव्हर होऊन आपली चाकरी करायचे.

माझी आई सोशिक. पाच मुले आणि एक मुलगी अशा भावंडांत मी एक लहानाचा मोठा होत गेलो.

मोठी तीन भावंडे, मी चौथा आणि पाठी बहीण, एक छोटा भाऊ अशा गरीब पण मेहनती कुटुंबात मी जन्मलो... नाना चौक येथे माझे बालपण गेले.

माझा जन्म जे. जे. कॅम्पसच्या मागे कामा हॉस्पिटल या सरकारी दवाखान्यात झाला. हा पुन्हा कलेकडे, त्या वातावरणात वळण्याचा योगायोग म्हणावा लागेल.

माझे शिक्षण नाना चौकातील भाजी गल्लीत म्युनिसिपलच्या शाळेत झाले. शाळेत उशीर झाला तर मुख्याध्यापक वाटेत छडी घेऊन उभे असायचे, त्यांच्या छडीचा मार खाऊन संस्कार होत होते. पाचवीत असताना मला अभ्यासापेक्षा कलेची ओढ जास्त होती. गणित अधिक-वजाबाकीपर्यंत ठीक वाटे, पुढे ल.सा.वि.-म.सा.वि.च्या आकडेमोडीत मी भांबावलो.

चित्रकलेच्या वर्गात फळ्यावर काढलेले चित्र मी सहज काढायला लागलो. फळा रंगवताना खडू ओला करून घासल्यावर होणाऱ्या नक्षीकामात मी जास्त रमू लागलो. वर्गात बाई हस्तकला शिकवायच्या त्यात मी जास्त रमू लागलो.

सहावी-सातवीत असताना स्काऊट, गाईड या गणवेशात सजताना घरी पांढरे बूट धुऊन त्याच्या ओलेपणात पांढरा खडू घासून ते बूट पांढरे लखलखीत करण्यात मोठी गंमत वाटे. शाळेत दूध, बिस्किटे रोज मिळायचे. त्यामुळे वाढत्या वयात बालपण सुदृढ गेले.

मधल्या सुट्टीत पाच पैशांत आंबापोळी किंवा जिरागोळीचे पाकीट घेऊन तासन्तास चघळत मनाच्या श्रीमंतीत बालपण ओसंडून वाहत होते.

घरची परिस्थिती बेताची. सर्व भावंडांना दिवाळीत एका ताग्यातून कपडे शिवले जायचे. फटाके, लवंगीच्या माळा आम्हा लहानांत शिस्तीत वाटणी करून मिळत असत. घरच्या फराळाच्या ताटात, शेजारच्या येणाऱ्या ताटात वेगळं काही पदार्थ मटकवण्यात केवढा आनंद असायचा.

आमची चाळ म्हणजे अठरापगड जाती, भाषा यांचा सांस्कृतिक सोहळा असायचा. तळमजल्यावर कोकणातील भजन मंडळी, पहिल्या मजल्यावर घाटी लोकांचे भारुड व्हायचे. नमन, खेळे होत. बाजूला धोबीचा घाट असल्यामुळे रामलीला रात्रभर व्हायच्या. गणपती, नवरात्रात कच्छी बाजात नाचणारे चाळकरी, मिरवणूक पाहात, मी लहानाचा वाढत होतो.

नववीत असताना शाळेच्या देशपांडेबाईंच्या परीसस्पर्शात माझा कलेतला उद्धार झाला. वर्गात हस्तलिखित काढायचे ठरले आणि अंक सजावटीत मी रमलो. हस्तलिखित अंक सजावटीची चित्रे शाळेत सर्वांना आवडली आणि मला देशपांडेबाईंनी एक रंगपेटी आणि कुंचला बक्षीस दिला. त्या रंगाच्या बारा रंगच्छटांत मी कायमचा रमलो. शाळेचा आदर्श विद्यार्थी होत मी सगळ्यांचा आवडता झालो. जगायला आधार मिळाला. मित्र सोमनाथच्या सान्निध्यात मी अभ्यास करू लागलो.

घरात अभ्यासासाठी जागा नव्हती. त्यावेळी आम्ही दोघे मित्र मुंबई सेंट्रल येथे बाहेरगावी जाणाऱ्या ट्रेनच्या प्लॅटफॉर्मवर रात्र रात्र अभ्यास करायचो. दहावी-अकरावी दणक्यात अभ्यास करताना दोन विषय कलेचे होते. त्यात आर्ट प्रॅक्टिकल आणि थिअरीत मजबूत मार्क मिळवत मानाने पास झालो. दुसऱ्या दिवशी माझ्या मोठ्या दादा बरोबर सर ज.जी. कला महाविद्यालय गाठले आणि प्रवेशाचा फॉर्म भरला. ॲडमिशन घेत मी या कलेच्या पुण्यनगरीत दाखल झालो.

सर जे. जे. इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाइड आर्टच्या परिसरात पावसाळ्यातील कॉलेजचा पहिला दिवस मला अजूनही आठवतो. जे.जे.च्या वास्तूच्या सान्निध्यात मध्यभागी स्वागतासाठी सज्ज असलेल्या शिल्पाभोवती वळसा घेत मी कॉलेजचा लाकडी जिना चढलो होतो. प्रथमवर्ष फाऊंडेशन क्लास, भलेमोठे वर्ग आणि रोज सकाळ, दुपार, संध्याकाळ चित्रात रमत राहायचं... किती विलक्षण होते दिवस!

कॉलेज इलेक्शन, गेटटूगेदर, मान्सून पिकनिक आणि रोज मनसोक्त कलेतला सराव आणि बाहेर बहरणारा जे. जे. निसर्ग, रमेशचे कँटीन, चहा, मिसळ, आम्लेट, पाव, मित्रांचा गलका, दोस्ती, दुनियादारी करत एलिमेंटरी, इंटरमिजिएट वर्गात उपयोजित कलेत शिकताना, इंटर कॉलेज एकांकिका स्पर्धा, कॉलेजच्या तालमी, आणि सकाळपासून अगदी रात्री अपरात्री जे.जे. आमचं घर झालं.



मी आणि माणिक आमच्या सहजीवनात संसारात कलेला, कलाकृती, कलाप्रदर्शन करण्याला प्रथम स्थान देत जगत गेलो. १९८६पासून माझी आणि माणिकची मिळून जवळजवळ पन्नासच्या वर कलाप्रदर्शने झाली. मुंबई, दिल्ली, कोलकाता, राज्यात आणि परदेशात अनेक प्रदर्शने करत आम्ही कलेत जगत गेलो.

माझ्या कलाविश्वात मी विविध माध्यमांत काम करत गेलो. चित्रकला, रंगकला, मातीकला, सिरॅमिक, फोटोग्राफी, टेम्पेरा, डॉक्युमेंटरी, इन्स्टॉलेशन, मुलांसाठी राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय कलाकार्यशाळा घेत मी कलेच्या अनुभवातून घडत गेलो, शिकत गेलो.

सन २००५ साली इन्स्टॉलेशनची निवड झाल्याबद्दल चीन देशात आमंत्रण मिळाले. नंतर पुन्हा चीनमध्ये सन २००६ साली टेराकोटा शिकवायचे निमंत्रण मिळाले. एक महिना वास्तव्य झाले. येथून माझी परदेशवारी सुरू झाली. एक एक करत मी जागतिक कलेत वावरत-घडत गेलो.

डीनच्या केबिनसमोर वेताच्या कोचाच्या गाद्या उशाशी घेऊन आम्ही मित्रमंडळी जागरण करत पहाटे झोपायचो. सकाळी हातपाय तोंड धुऊन, मस्त कँटीनचा चहा-मिसळ हासडून आम्ही वर्गात जात असू.

प्रत्येक वर्षी आमची गोल्डन गँग वरच्या वर्गात सरकताना एक एक गुरू, मास्तर, सर, दोस्तांसारखे लाभत गेले.

मित्र यार झाले. मैत्रिणी असायच्या. एखादी खूप आवडायची, पण त्या तारुण्यात प्रेम व्यक्त करण्याचं धाडस झाले नाही.

जे.जे.त अभ्यास नाही; रोज तुम्ही आपसात जगणे शिकत असता.

शेवटच्या वर्षात शिकताना आईचा मृत्यू. त्यानंतर एका महिन्यात आर्ट प्रोजेक्ट, ॲनिमेशन फिल्म करूनही, शेवटच्या वर्षी मेडल न देता उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन आपसात परीक्षक मांडवली करत वागतानाच्या अनुभवाने समोरची माणसे ओळखायला शिकत गेलो.

जे.जे. परिसर भव्य आहे आणि त्यात फाइन आर्ट विभागात मी नंतर मेटल क्राफ्ट शिकायला प्रवेश घेतला. धातुकाम शिकताना त्या इमारतीत मी रमत गेलो आणि त्या जे.जे.च्या कोंदणात मला माणिक सापडली. माणिक प्रभुदेसाई डोंबिवलीहून सकाळी कॉलेजला येत असे स्टडी टूरला. माणिकला न्याहाळत मी शेवटी तिला मैत्रीचे विचारले आणि आम्ही दोघे १९८५ साली विवाहबद्ध झालो.





आर्टिस्ट रेसिडेन्सीच्या अनुभवातून जाताना दुबई, जॉर्डन, ग्रीस, श्रीलंका, अर्जेन्टिना, थायलंड, सर्बिया अशा अनेक देशांत फिरताना तेथील स्थानिक कला-कलाकार संस्कृतीच्या अवलोकनात माझी फोटोग्राफी आणि डॉक्युमेंटरी आपसूक घडत गेले.

आजच्या या बंदिस्त वातावरणात, अंतर राखून वावरताना मी सतत मराठीतून लिहीत गेलो. सध्याच्या परिस्थितीत माझे शब्द कवितेतून व्यक्त होत आहेत.

शेवटी जगणे म्हणजे काय? एक प्रवास आहे. या माझ्या सहप्रवासात माणिकबरोबर वावरताना असंख्य माणसे, मने सतत भेटत गेली. उंबऱ्याबाहेर स्वतःला लोटत समाज बघायला शिकलो. शाळा, कॉलेजने असंख्य मित्रमैत्रिणी दिले. देशात, परदेशात हुंदडताना कलासंस्कृती, नृत्य, संगीत, निसर्ग अनुभवला.

आजच्या घडीला या स्पर्धात्मक वातावरणात कलेच्या घोडेबाजारात न वावरता शांत-निवांत आपल्या कलेत आणि लेखनात आपल्या मर्जीत, मस्तीत स्वतःशी संवाद करत जगायचं आहे.

मी स्वतःला खूप भाग्यवान समजतो. जगताना मती शाबूत ठेवून जगत आलो, दोन डोळ्यांनी मला खूप खूप पाहायला, निरखायला शिकवले, माझ्या हातांनी मी कलेत रमत गेलो. माझ्या पायांच्या गतीत मी भटकलो.

आजच्या घडीला मी कलेत वावरताना स्वप्नात जगतोय.

स्वप्नांना विशाल पंख असतात. आजही माझे मन घेऊन मी आसमंतात वावरतोय.

जगणे क्षणभंगुर असले तरी मी मनाची उभारी घेऊन उडायचे काही थांबवणार नाही.

**– राज वसंत शिंगे**
भ्रमणध्वनी : ९९६७६७९११०/९९६७६७९११५
rajshinge@gmail. com

ग्रंथाली

**गणित अध्यापक आणि प्रसारक स. पां. देशपांडे**

**संपादन : अ.पां. दशपांडे**



**मूल्य ४०० रु. सवलतीत २५० रु.**

अभियांत्रिकी महाविद्यालयात गणिताचे प्राध्यापक असलेल्या स.पां. देशपांडे यांनी, अध्यापन करीत असताना, मुलांना गणिताची फारशी आवड नसल्याचे पाहिले असल्याने, ती सर्वसामान्य जनतेत निर्माण करण्यासाठी, वर्तमानपत्रे आणि मासिकांत, आपल्या ८२ वर्षांच्या आयुष्यात, २१८ लेख लिहिले. अर्थात, हे सगळे लेख गणितविषयकच आहेत असे नाही. त्यांच्या २१८ लेखांतील निवडक १०० लेखांचे हे पुस्तक असून, आजही ते वाचनीय आहे.



# वृषभ आणि वल्लभ

**डॉ. प्रकाश लोथे**

**मी** नुकताच भारतात जाऊन परत आलो. ही माझी अठरावी वेळ. दरवेळी परतताना मला कुठल्यातरी नवीन (तत्त्व)ज्ञानाचा आविष्कार होतो. कधी नातेवाईकांची मने न मोडता त्यांना सफाईने हुलकावणी कशी द्यावी, तर कधी लग्नात थोडीही ओळख नसताना ऐसपैस गप्पा कशा माराव्या, तर कधी अमेरिकेच्या दादागिरीवर प्रखर टीका चालू असताना मूग गिळून गप्प कसे बसावे, इ.इ... पण यावेळी मला जे ज्ञान झाले ते केवळ बिनतोड होते. समस्त वधुपित्यांच्या (आजी, माजी व भावी) लाभास्तव या तत्त्वज्ञानाचा सखोल ऊहापोह करत आहे.

नागपूरच्या बेस्ट हायकोर्ट रोडवर ऑटोरिक्षाची वाट पाहत मी उभा होतो. दुपारची वेळ, रणरणते ऊन. लगीनसराईमुळे काही केल्या रिक्षा मिळत नव्हती. इतक्यात करड्या रंगाची एक मारुती माझ्यासमोर मंदावली व जरासे पुढे जाऊन थांबली. त्यातून किंचितसे कुबड असलेला एक उतारवयीन माणूस उतरला. तो मजजवळ आला व म्हणाला, ''चल, चढ गाडीत माझ्या...'' मी निरखून पाहिले. विद्या ऊर्फ विद्याधर उमरेडकर गेल्या चार वर्षांत एकदम म्हातारा दिसू लागल्याचे माझ्या चटकन लक्षात आले.

''काय तब्येत तर ठीक आहे ना?''

''चल ठेल्यावर चल...'' त्याने विषय टाळला.

नागपूरला कुणी (पान)ठेल्यावर चल असे आमंत्रण दिले तर त्याला नाही म्हणायचे नसते. कारण त्यात गहन अर्थ असतो. मला

तुझ्याशी महत्त्वाचे बोलायचे आहे असे त्यात आवाहन असते. पानठेल्यावरच्या प्रीती झिंटाच्या उन्मादक कॅलेंडरकडे पाहण्याचे मोठ्या कष्टाने टाळत मी पानाचा तोबरा भरला. विद्यानेही प्रीतीकडे पाठ फिरवली व दूरच्या कुत्र्याच्या दिशेने लांब पिचकारी टाकली.

''तब्येत जरा उतरलीय?'' मी पुन्हा विषय काढला!

''साला भडवा!''

मी हबकलोच!

''अब्बे तू नहीं बे, आमचा जावई म्हणतोय मी...''

चार वर्षांपूर्वी मी विद्याची पोरगी अनिता हिच्या रिसेप्शनला गेल्याचे मला आठवले. पहिले गल्फ वॉर नुकतेच झाले होते व त्याबद्दल चार ओळखीच्या व चार अनोळखी लोकांनी मला भरपंगतीत फैलावर घेतले होते (अमेरिकेतून आलेला कोणीतरी म्हणून) तेही आठवले.

''काय झालं?'' मी क्षीणपणे खोलात शिरण्याचा प्रयत्न केला.

''साल्या xxxxला चाबकानं फोडून काढायला हवं. त्याच्या लठ्ठ xx वर लाथा मारून हाकलून द्यायला हवं..'' (जेथे जेथे फुल्या आहेत तेथे वाचकांनी योग्य शिव्या तथा अवयवांची नावे घालावी.)

''अरे पण काय झालं?''

पुढच्या दहा मिनिटांत विद्याच्या मुलीचा घटस्फोट होऊ घातल्याचे कळले. पुन्हा एकदा पान-तंबाखूचा राउंड झाला. जावईबापूंच्या मातेच्या प्रायव्हेट जीवनावर व प्रायव्हेट पार्ट्सबद्दल अस्सल वऱ्हाडी शिव्या देऊन झाल्यावर विद्या शांत झाला. कदाचित तंबाखूचा प्रभाव असेल.



''असे वाटते, अजूनही प्रकरण अतिरेकाला गेलं नाही. या सांडाला वेसण घातली तर कदाचित ताळ्यावर येईल.'' शेवटी आशावादाचा किरण चाचपडत विद्या म्हणाला, ''अजून तरुण आहे, मॅच्युअर व्हायला वेळ लागतोच नाही का?..'' पुन्हा एक पिचकारी... विद्याने त्याच्या जावयाला सांड म्हटले, पोळ म्हटले, त्याचा बैल व्हायला हवा अशी इच्छा व्यक्त केली. बैल व सांड यांत फरक असतो हे मला माहीत नव्हते. विद्याधरची मन:स्थिती बघून त्याला हा प्रश्न विचारायची माझी हिंमत झाली नाही. बिचारा विद्या पोरीचे वैवाहिक जीवन उद्ध्वस्त होऊ नये म्हणून जावईबापू बैल व्हावेत अशी देवाजवळ प्रार्थना, आर्जवे करत होता...

इंग्रजी भाषेतसुद्धा सांडाला बुल म्हणतात, आणि बैलाला ऑक्स म्हणतात. बुलचे ऑक्सिफिकेशन कसे होते. केव्हा होते याबद्दल माझ्या मनात जबर उत्सुकता निर्माण झाली. डिक्शनरी, एन्सायक्लोपिडिया इतकेच नव्हे तर गूगलवर ही त्याबद्दल काही माहिती नव्हती. येथे अमेरिकेत बुलचा उपयोग फक्त सिरलॉईन स्टेक व बुलशिट ही शिवी द्यायला होतो.

भारतात बुल / ऑक्स हा साऱ्या अर्थव्यवस्थेचा आधार आहे. बुलचा ऑक्स झाला नाही तर भारताची अर्थव्यवस्था कोलमडून पडेल. (except Banglore)! मुंबई ते न्यू यॉर्कच्या परतीच्या विमानप्रवासात शेजारच्या लठ्ठ बाईच्या खांद्यावर डोके ठेवून २०''x१८''x८'' स्पेसमध्ये अवघडून पेंगताना मी याचाच विचार करत होतो. कारण मलाही मुलगी आहे. माझाही जावई विद्याच्या जावयाप्रमाणे बुल निघेल काय या विचाराने मला भंडावून सोडले. अन्.. अन्.. मला अचानक, अचानक साक्षात्कार झाला! उमरेडकरच्या बोलण्याचा अर्थ कळला.. वृषभ म्हणजे लग्न न झालेला बैल व वल्लभ (OX) म्हणजे लग्न झालेला बैल! या दोघांच्या वर्तणुकीत, स्वभावात व शरीरयष्टीत फार फरक असतो. आपण भारतात गावोगावी गल्ल्याबोळांतून वृषभ तथा सांड फिरताना बघतो. सांडाला सगळे घाबरतात कारण तो केव्हाही शिंगे रोखून तुमच्या अंगावर धावून येऊ शकतो. त्याच्या चेहऱ्यावर एक मस्तवाल असा भाव असतो. बहुतेक सांड हे धष्टपुष्ट असतात. त्यांचा खरा मालक कोण आहे ते कोणालाच माहीत नसते. लालूप्रसाद यादवांप्रमाणे ते बेधडक कुणाच्याही कडब्याच्या ढिगांत तोंड खुपसतात आणि बिनदिक्कतपणे रस्त्याच्या मधे उभे राहून पूर्ण वाहतूक अडवून धरतात. कुणाच्या नुकत्याच सारवलेल्या ओटीवर जाऊन निवांतपणे मूत्रविसर्जन करतात व मूड येईल तेव्हा समोर येईल त्या धेनूवर काळवेळेचा फारसा विचार न करता स्वत:च्या पुरुषार्थाचा भार सोपवतात. बरेचसे नुकतेच लग्न झालेले तरुणही तसेच असतात. मानवी समाजाच्या बंधनामुळे ते वर वर्णन केलेल्या पोळांप्रमाणे संपूर्ण मुक्ततेचा उपभोग घेऊ शकत नाहीत पण बेसिक फंडामेंटल्स तेच असतात. त्यातच एकटा लाडावलेला श्रीमंताचा मुलगा असेल तर विचारूच नका.

याच्या उलट (धेनू) वल्लभ हा प्राणी. ह्याला इंग्रजी भाषेत ऑक्स म्हणतात. सांडाला बुल म्हणतात. (केवढा हुशार

हा इंग्रज साहेब!) तेव्हा बुल ऊर्फ सांडाचे oxyfication म्हणजे वल्लभीकरण कसे अन् केव्हा होते ते जाणून घेणे महत्त्वाचे आहे. वल्लभ हा प्राणी कष्टाळू, म्हणेल त्याला मान डोलावणारा (नंदीबैल हा वल्लभ आहे हे एव्हाना चतुर वाचकांच्या लक्षात आले असेलच.) व सोशिक असतो. बैलगाडीला जोडलेले, नांगराला जुंपलेले, उसाच्या गुऱ्हाळात न कंटाळता सतत गोलगोल फिरणारे हे सर्व बैल ऑक्स तथा वल्लभ (म्हणजे धेनू वल्लभ) असतात. संसार हा तेलाच्या घाण्यासारखा असतो. तेव्हा साहजिकच साऱ्या गृहिणींना वल्लभ फार प्रिय असतात, हे सांगणे न लगे! चतुर वाचकांनी लक्षात घ्यावे की द्व्यर्थी शब्दांनी खच्चून भरलेल्या संस्कृत या भाषेत वल्लभ या शब्दाचा अर्थ नवरासुद्धा होतो. काही अपवाद वगळता सारेच नवरे सुरुवातीस वृषभ असतात. गंमत म्हणजे, धेनूंना त्या वयात वृषभच आवडतात. वल्लभवृत्ती तरुणांना ऑईली, बोअरिंग, झेंडू इत्यादी पदव्या मिळतात. कॉलेजमध्ये प्राध्यापकांना छळणारे, मागच्या बेंचवर बसून कागदी बाण सोडणारे, शिट्ट्या वाजवणारे तरुण मुलींमध्ये जास्त पॉप्युलर असतात. सिनेमातसुद्धा भारतभूषणपेक्षा शम्मी कपूर जास्त लोकप्रिय ठरतात. अर्थात यातले बहुतेक वृषभ हजबंड मटेरियल नाहीत हे कळेपर्यंत फार उशीर झालेला असतो. अनेक वर्षे डेटिंग करूनही हे कळत नाही हे आजकालच्या युवतींनी लक्षात ठेवावे.

वृषभाचा वल्लभ व्हायला निदान ५ ते १० वर्षे तरी लागतात. मुळातच उच्छृंखल तथा सांड प्रवृत्ती पुरुषांना तर तब्बल २०-२० वर्षे लागतात. काही पुरुष तर कधीच वल्लभ होत नाहीत. (त्यांचे घटस्फोट होतात.) हा पहिला दहा वर्षांचा काळ मोठा कसोटीचा असतो. धेनूंना फार समजूतदार व सहनशील असावे लागते. (सदैव शिंगे रोखून हमरीतुमरीवर येणाऱ्या धेनूंपासून... म्हणजे Women's Lib वाल्यांपासून वृषभ पळून जातात.)

वरील विवेचन वाचून बहुतेक वधुपिते सुचवतील की या वृषभांचे वल्लभीकरण तरुण वयातच कृत्रिम प्रकारे का करू नये? याचे उत्तर देणे फार कठीण आहे. याबाबतीत त्यांनी स्वत:च्या आयुष्याचे मूल्यमापन करणे योग्य ठरेल. कारण एके काळी सर्व वधुपितेही वृषभ होते हे सांगणे न लगे! सांडाचा बैल करण्याची प्रक्रिया एका वऱ्हाडी पाटलांनी मला सविस्तर समजावून सांगितली होती. ती प्रक्रिया येथे वर्णन करणे, सभ्यतेच्या मर्यादा पाळून विषद करणे शक्य नाही. मानवी वृषभांना काळच वल्लभ बनवतो. (येथे काळ या शब्दाच्या जागी साहेब हा शब्दही वापरता येईल.) खाष्ट सासूला घरी आणून ठेवणे, महाराष्ट्र मंडळात स्त्री अध्यक्ष असलेल्या कमिटीवर काम करायला लावणे इ.इ. उपायांनी सुद्धा वृषभाचा वल्लभ करणे सुलभ होते. पण गॅरंटी कसलीच नाही. पाठदुखी, सांधेदुखीमुळे त्रस्त झालेले वृषभही लवकरच वल्लभ होतात. पण हे धेनूंच्या हातात नसते. म्हणूनच काळासारखे औषध नाही असे विधान आम्ही वर केले आहे.

दहा-वीस वर्षे वाट पाहणे हे सगळ्याच धेनूंना शक्य नसते. त्यांनी रेडिमेड वल्लभ शोधावा. त्यासाठी पुढील कसोट्या पाळून जीवनसाथी निवडावा :

१. त्यांच्या पत्रिकेत शक्यतो बुध किंवा चंद्र यांचे बळ असावे. मंगळवाले तथा शुक्रवाले टाळावे. राहू-केतू वगैरे पब्लिकच्या वाऱ्यालाही उभे राहू नये.

२. वृषभ मोठ्या संयुक्त कुटुंबातील मधला भाऊ असावा. कारण त्यांना कोणीच फार भाव देत नाहीत. त्यांची वृषभवृत्ती मुळातच चिरडली गेलेली असते.

३. वृषभ शक्यतो बाबू टाइप नोकरी असलेला, सामान्य रूपाचा, कसलाच व्यासंग नसलेला असा असावा. (यांना अगदी क्रिकेटचीसुद्धा आवड नसते!)

४. जमल्यास त्यांची हायस्कूलची किंवा कॉलेजची मार्कलिस्ट पाहावी. सदैव सेकंड क्लास मिळवणारा वृषभ झटपट वल्लभ होतो.

अशा प्रकारे निवड झाल्यावर असल्या वृषभास डेटिंगला न्यावे. त्यांना थोडेसे बॉसिंग करून पाहावे. प्रत्येक बाबतीत तुमचे म्हणणे ऐकणारा, मान डोलावणारा वृषभ चटकन वल्लभ होतो. कारण त्याची टेस्टोस्टिरॉन लेव्हल मुळातच कमी असते. देशकार्य, समाजकार्य वगैरेंच्या गप्पा सांगणाऱ्या तथाकथित तेजस्वी वृषभांच्या वाऱ्यालाही उभे राहू नये.

आपला वृषभ वल्लभ झाला की नाही हे ओळखणे फार सोपे असते. त्याकरता गोठ्यामध्ये निवांतपणे रवंथ करत असलेल्या बैलाचे निरीक्षण करावे. त्याच्या चेहऱ्यावर कसलेच भाव नसतात. पाठीवर बसलेल्या गोचिडांकडे, कावळ्यांकडे तो साफ दुर्लक्ष करतो. कोणी फारच डिवचले तर शांतपणे (व मोठ्या कष्टाने) उठून चालू लागतो. एखाद्या योग्याप्रमाणे त्याच्या चेहऱ्यावर (असलाच तर) कमालीचा निवृत्तभाव आढळून येतो. बाहेर चंद्रप्रकाश असो वा रखरखीत ऊन असो, तो निवांतपणे डोळे मिटून डुलक्या घेतो. त्याला कसलेच सोयरसुतक नसते. श्रीशिवशंकराच्या देवळात समोर बसलेला नंदीबैल हा असल्याच नम्रतेचे, भक्तिभावाचे व अलिप्ततेचे प्रतीक आहे हे सुज्ञ वाचकांच्या लक्षात आले असेलच. जगाच्या धकाधकीत हे वल्लभ फारसे कुठेच जात नाहीत हे मात्र सर्व धेनूंनी लक्षात ठेवावे. लढायला, शर्यती जिंकायला वल्लभ कामाचे नाहीत. त्याला बेदरकार, धडाडीच्या, आक्रमक (किंवा काहीशा बिनडोक) वृषभांचीच आवश्यकता असते. जीवन ही एक तडजोड आहे. तुम्हाला कितपत वृषभ हवा व कितपत वल्लभ हवा ते धेनूंचीच ठरवावे व धेनूपित्यांनी ते मूग गिळून स्वीकारावे हेच उत्तम.

**- डॉ. प्रकाश लोथे**
prakashlothe@aol.com

*तमालाच्या नीलवर्णाप्रमाणेच त्याचा मादक सुगंध हाही संस्कृत कवींच्या आकर्षणाचा विषय आहे. संस्कृत साहित्यातील या तमालतरूला आयुर्वेदात महत्त्वाचे स्थान आहे. लोकव्यवहारातही तमालपत्रांचा व सालीचा वापर केला जातो. पुलाव, बिर्याणी यांसारख्या अन्नपदार्थांना स्वाद व गंध येण्यासाठी तमालपत्र वापरतात. काश्मीरमध्ये तमालाची कोवळी पाने नागवेलीच्या पानांप्रमाणेच खातात. तमालाच्या खोडाच्या सालीपासून मिळणारे सुगंधी तेल साबणात वापरतात. आयुर्वेदिक आसवांना सुगंधित करण्यासाठी तमालपत्रे वापरली जातात. कापड छपाईसाठी हरड्यांबरोबर तमालपत्र वापरतात. तमालाची साल आणि पाने कातडी कमवण्यासाठी उपयुक्त असतात. अशा या बहुगुणी संस्कृत साहित्यात मानाचे स्थान प्राप्त झालेल्या तमालतरूची मराठी साहित्यात मात्र उपेक्षाच झाली आहे.*



# नीलतरू तमाल

**नीला कोर्डे**



वर्षाऋतूत नीलवर्ण म्हणजे काळ्या रंगाच्या मेघांनी आच्छादलेले आकाश पाहून आठवण होते ती नील 'तमाल' वृक्षाची! तमाल.. ज्याच्या नावातही 'तम' आहे असा हा 'घन'दाट वृक्ष! वर्षाऋतूत नील मेघांनी गगन व्यापून टाकावे त्याप्रमाणे या नील तमालाने संस्कृत साहित्याचे गगन व्यापले आहे.

आज आपण संस्कृत साहित्यात फुललेल्या सुगंधित आम्रमञ्जरीला महत्त्व न देता, मधुर रसाने भरलेल्या आम्रफलालाच महत्त्व देतो. तमालवृक्षाच्या बाबतीतही तसेच झाले आहे. आपल्या खाद्यसंस्कृतीत मसाल्याच्या पदार्थांमध्ये 'तमालपत्रा'ला विशेष म

हत्त्व आहे. यामुळेच की काय, ही तमालपत्रे आपल्या अंगावर धारण करणाऱ्या तमालतरूची मात्र आपण उपेक्षाच केली आहे.

वनस्पतिशास्त्रात हा वृक्ष लॉरेसी कुलातील एक सदापर्णी सुगंधी वृक्ष आहे. त्याचे शास्त्रीय नाव 'सिनॅमोमम तमाला' आहे. हा मूळचा भारतीय वृक्ष असून तो हिमालयाच्या पायथ्याशी, मेघालयातील खासी टेकड्या, जैतिया टेकड्या इत्यादी भागांत तसेच दक्षिण भारतात आढळतो. भारताप्रमाणेच श्रीलंकेतही तमालवृक्ष आहेत. तमालवृक्ष सुमारे ८-९ मीटर उंच वाढतो. याच्या खोडावरील साल पातळ व तपकिरी रंगाची असून दालचिनीच्या सालीप्रमाणेच असते. पाने समोरासमोर, लहान देठाची, पाच-सात सें.मी. लांब, निमुळत्या टोकाची व जाड असतात. त्यामध्ये देठापासून टोकाकडे गेलेल्या तीन शिरा असतात. तमालपत्र म्हणून या पानांनाच मसाल्यात वापर करतात. याची फुले पांढरी, लहान व असंख्य असतात. तमालाची फळे अंडाकृती, मांसल व काळी असून त्यांच्या आत अठळी असते.

शब्दसमृद्ध संस्कृत भाषेत तमालवृक्षाला अन्य नावेही आहेत. अमरकोषात याला तमालाव्यतिरिक्त 'कालस्कन्ध:' आणि 'तापिच्छ:' अशी दोन नावे दिलेली आहेत. याशिवाय तापिञ्ज:, नीलताल:, तमालक:, नीलध्वज:, कालताल:, महाबल: अशी अन्य संस्कृत नावेही आहेत.

**विवाहासारख्या पवित्र बंधनाच्या वेळीसुद्धा अनेकदा, स्वयंवराच्या वेळी राजांची समृद्धी त्यांच्याकडील वृक्षवेलींच्या विपुलतेवरून विचारात घेतली जात असे; तमालाच्या कोवळ्या, मृदू पानांच्या शय्येसाठी आस्तरण म्हणून वापर करण्याचा उल्लेख आला आहे. प्राचीन काळी राजांचा आपल्या राण्यांबरोबरचा शृंगार निसर्गाच्या पार्श्वभूमीवर मोकळ्या वातावरणात होत असल्याचे उल्लेख संस्कृत साहित्यात पाहावयास मिळतात.**

वैदिक वाङ्मयात तमालाचा उल्लेख नसला तरी अभिजात संस्कृत साहित्यात मात्र तमालाला महत्त्वाचे स्थान आहे. रामायण आणि महाभारत या आर्ष म्हणजे ऋषिप्रणित महाकाव्यांमध्ये हा वृक्ष प्रथम आला आहे.

रामायणात भरद्वाजमुनींच्या आश्रमाचे वर्णन आहे. हा आश्रम रमणीय वृक्षांनी सुशोभित होता. हे वृक्ष पार्थिव असूनही, भरद्वा मुनींच्या तेजाच्या प्रभावाने अलौकिक झाले होते. रामाने, सीता व लक्ष्मण यांच्यासह चित्रकूट पर्वतावर वास्तव्य केले असता, रामाच्या भेटीसाठी जाणाऱ्या भरताने मार्गात भरद्वाजमुनींच्या आश्रमात निवास केला. तेव्हा आश्रमातील या अलौकिक वृक्षांनीही भरताची कशी सेवा केली, हे सांगताना वाल्मीकी म्हणतात-

*तत: सरलतालाश्च तिलका: सतमालका:।*
*प्रहृष्टास्तत्र सम्पेतु: कुब्जा भूत्वाथ वामना:।।*

- अयोध्याकाण्ड सर्ग ९१ श्लोक क्र. ५०

अर्थ - देवदार, तिलक आणि तमाल हे वृक्ष कुबडे आणि वामन यांची रूपे घेऊन, भरताची सेवा करण्यास आनंदाने सिद्ध झाले होते.

येथे तमालांनी कुबडे व वामन यांचे रूप धारण केल्याचा जो उल्लेख आहे, त्यामध्ये तमालवृक्षांना कमी लेखलेले नाही. प्राचीन काळी राजांच्या सेवकांमध्ये कुबडे आणि वामन यांचा समावेश होता. भरताची सेवा करण्यासाठी तमालवृक्षांनीही तीच भूमिका घेतली होती; एवढेच वाल्मीकींना येथे सूचित करायचे आहे.

महाभारतातील वनपर्वात, पांडव द्वैतवनात गेले असता ते वन ज्या वृक्षांनी भरून गेले होते त्यांची नावे पुढील श्लोकात आढळतात-

*तमालतालाम्रमधूकनीप-*
*कदम्बसर्जार्जुनकर्णिकारै:।*
*तपात्येय पुष्पधरैरूपेतं*
*महावनं राष्ट्रपतिर्ददर्श।।*

- वनपर्व, अध्याय २४, श्लोक क्र. १७

अर्थ - तमाल, ताल, आम्र, मोह, नीप, कदम्ब, अर्जुन व बहावा यांचे उन्हाळ्याच्या अखेरीस फुलांनी बहरलेल्या वृक्षांनी भरून गेलेले ते महावन राष्ट्रपती युधिष्ठिराने पाहिले.

महाभारतातील या तमालवृक्षाला खास असा संदर्भ मात्र नाही.

रामायण व महाभारत यांच्यानंतर भागवत पुराणात विष्णूच्या वराहअवताराच्या कथेत तमालवृक्ष आला आहे. हिरण्यकश्यूपचा भाऊ हिरण्याक्ष याला ब्रह्मदेवाकडून वर प्राप्त झाल्यावर तो उन्मत्त झाला. त्याने पृथ्वीलाच समुद्रात ओढून नेले. तेव्हा विष्णूने महावराहाचा अवतार घेऊन हिरण्याक्षाला ठार मारले आणि पृथ्वीला आपल्या वक्राकार शुभ्र सुळ्यांवर धारण करून तिला समुद्रातून बाहेर काढले. या प्रसंगाचे वर्णन करणाऱ्या पुढील श्लोकात तमाल आला आहे-

*तमालनीलं सितदन्तकोट्या*
*क्ष्मामुत्क्षिपन्तं गजलीलयाङ्ग।*
*प्रज्ञाय बद्धञ्जलयोऽनुवाकैं-*
*र्विरिञ्चिमुख्या उपतस्थुरीशम्।।*

- भागवतपुराण स्कंध ३, अध्याय-१३, श्लोक क्र. ३३

अर्थ- नंतर भगवंतांनी एखाद्या हत्तीप्रमाणे क्रीडा करत आपल्या शुभ्र सुळ्यांच्या वक्राकार कडेवर पृथ्वी धारण केली. तमालवृक्षाप्रमाणे ते नीलवर्णाने युक्त होते. अशा प्रकारे ब्रह्मदेव प्रमुखादी ऋषींनी त्यांना परमपुरुष म्हणून जाऊन त्यांना सादर प्रणाम केला.

येथे विष्णूच्या नील म्हणजे सावळ्या वर्णाला तमाल-वृक्षाची उपमा दिली आहे.

रामायण आणि महाभारत यांच्यानंतरच्या अभिजात संस्कृत साहित्यात तर ही तमाल तरुराजी अधिकच गर्द झाली आहे. नाटक, विदग्ध महाकाव्य, लघुकाव्य, ऐतिहासिक महाकाव्य आणि गद्यकाव्य अशा विविध प्रकारच्या संस्कृत साहित्यात तमालवृक्षाला 'मानाचे पान' मिळाले आहे.

या साहित्यकृतींतील तमालवृक्षाचा कालानुक्रमे परामर्श घेणे उचित ठरेल.

इसवी सनपूर्व दुसरे ते पहिले शतक या कालखंडात होऊन

## आई वडील व ज्येष्ठ नागरिक यांचा चरितार्थ व कल्याणासाठी अधिनियम, २००७ मधील ठळक तरतुदी

- वय वर्ष ६० पेक्षा अधिक वयाच्या नागरिकांना ज्येष्ठ नागरिक संबोधण्यात येते.
- आई वडील मग ते यथास्थिती जन्मदाते असोत, दत्तक असोत किंवा सावत्र वडील किंवा सावत्र आई असोत, तसेच ते ज्येष्ठ नागरिक असोत किंवा नसोत, त्यांना सदर अधिनियमाचे संरक्षण प्राप्त होते.
- 'मुले' या संज्ञेत मुलगा, मुलगी, नातू व नात यांचा समावेश होतो. परंतु यात अज्ञान व्यक्तीचा समावेश होत नाही.
- 'नातेवाईक' याचा अर्थ अपत्यहीन ज्येष्ठ नागरिकाचा अज्ञान वय नसलेला व ज्याच्याकडे त्या ज्येष्ठ नागरिकाच्या मालमत्तेचा कब्जा आहे किंवा त्या ज्येष्ठ नागरिकांच्या मृत्यूनंतर ज्याच्याकडे त्याच्या मालमत्तेचा वारसा जाणार आहे, असा कोणताही वैध वारस, असा आहे.
- स्वतःच्या कमाईमधून किंवा आपल्या मालकीच्या मालमत्तेमधून स्वतःचा निर्वाह करण्यास असमर्थ असलेला ज्येष्ठ नागरिक तसेच माता किंवा पिता अधिनियमाच्या कलम ५ अन्वये निर्वाह खर्च मिळण्यासाठी अर्ज सादर करू शकतात.
- ज्येष्ठ नागरिक व आई वडील यांचा निर्वाह करण्याचे यथास्थिती मुलांचे किंवा नातेवाईकांचे दायित्व आहे. संबंधित ज्येष्ठ नागरिकांना तसेच आई-वडीलांना सामान्य जीवन व्यतीत करता यावे, या दृष्टीने त्यांच्या गरजा पूर्ण करणे, ही मुलांची यथास्थिती नातेवाईकांची जबाबदारी आहे.
- ज्येष्ठ नागरिक जेथे राहतात किंवा शेवटी राहत होते किंवा त्यांची मुले / नातेवाईक जेथे राहतात, त्या जिल्ह्याच्या संबंधित ज्येष्ठ नागरिक निर्वाह न्यायाधिकरणाकडे आई वडील व ज्येष्ठ नागरिकांना अर्ज सादर करता येईल.
- मुले किंवा नातेवाईक भारताबाहेर राहत असतील, तरीदेखील ज्येष्ठ नागरिक राहतात, त्या जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिक निर्वाह न्यायाधिकरणाकडे अर्ज सादर करता येईल.
- स्वतःचा निर्वाह करण्यास असमर्थ असलेल्या ज्येष्ठ नागरिकाचा निर्वाह करण्यात मुले किंवा यथास्थिती नातेवाईक हयगय करीत असतील किंवा त्यास नकार देत असतील, तर अशा ज्येष्ठ नागरिकांच्या निर्वाहासाठी न्यायाधिकरणास योग्य वाटेल अशा मासिक दराने मासिक भत्ता देण्याबाबतचा आदेश न्यायाधिकरणामार्फत देण्यात येतात.
- न्यायाधिकरणाच्या आदेशानंतर ३० दिवसांच्या आत आदेशात नमूद केलेली संपूर्ण रक्कम जमा करणे, यथास्थिती ज्येष्ठ नागरिकांची मुले किंवा नातेवाईक यांना बंधनकारक आहे.
- न्यायाधिकरणाच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही ज्येष्ठ नागरिकाला किंवा यथास्थिती मातापित्याला आदेशाच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे अपील दाखल करता येईल.
- न्यायाधिकरणासमोरील किंवा अपिल न्यायाधिकरणाच्या समोरील कार्यवाही मधील कोणत्याही पक्षाचे प्रतिनिधित्व विधी व्यवसायी मार्फत अर्थात वकिलामार्फत करता येणार नाही.
- सदर अधिनियमानुसार राज्य शासनाने वृद्धाश्रमाची स्थापना करणे, ज्येष्ठ नागरिकांना वैद्यकीय सहाय्य उपलब्ध करणे, ज्येष्ठ नागरिकांची जीवित व मालमत्ता यांचे संरक्षण करणे, इत्यादी बाबी करणे आवश्यक आहे.
- सदर अधिनियमाच्या प्रारंभानंतर कोणत्याही ज्येष्ठ नागरिकाने त्याच्या मालमत्तेचे मुलांकडे अथवा नातेवाईकांकडे कोणत्याही प्रकारे हस्तांतरण केले असल्यास आणि संबंधित मुले अथवा नातेवाईक ज्येष्ठ नागरिकाच्या गरजांकडे दुर्लक्ष करीत असल्यास, असे हस्तांतरण शून्यवत करण्याचे अधिकार न्यायाधिकरणास आहेत.
- अधिक माहितीसाठी आपण राहात असलेल्या ठिकाणाशी संबंधित ज्येष्ठ नागरिक निर्वाह न्यायाधिकरण कार्यालयात संपर्क साधावा, ही विनंती.

**उपविभागीय अधिकारी,**
**मुंबई पश्चिम उपनगर**

## ग्रंथालीच्या ग्रंथदिंडीची लॉकडाऊनमध्येही वाटचाल!
## गेल्या दीड वर्षातील नवी ८० पुस्तके







१. **आषाढी - संतकाव्याचा अनोखा रंग** । योजना शिवानंद । मूल्य ८० रुपये
२. **आनंदयात्री - पोलीस अधिकाऱ्याची डायरी** । जयंत नाईकनवरे, आय.पी.एस. । मूल्य २०० रुपये
३. **तसबीर** (गजलकाव्य) । सदानंद डबीर । मूल्य १५० रुपये
४. **यशप्राप्तीचं रहस्य** । डॉ. प्रेमानंद रामाणी । मूल्य २०० रुपये
५. **जगावेगळी माणसं** । रमेश वाघमारे । मूल्य ३५० रुपये
६. **शिकणारी शाळा 'अभि'रंग** । संपादन : वैशाली रोडे । मूल्य ३५० रुपये
७. **शिकणारी शाळा बालरंग** । संपादन : वैशाली रोडे । मूल्य ३०० रुपये
८. **प्रेमसेतू** । संदीप रामराव काळे । मूल्य २५० रुपये
९. **यशपुष्प** । डॉ. आशुतोष रारावीकर । मूल्य २०० रुपये
१०. **छपाई ते लेखणी** । यशवंत मराठे । मूल्य २०० रुपये
११. **कार्पोरेट कविता** । प्रथमेश किशोर पाठक । मूल्य १५० रुपये
१२. **स्वरमंजूषा** । योजना शिवानंद । मूल्य २०० रुपये
१३. **आस** । अपर्णा महाजन । मूल्य २०० रुपये
१४. **माध्यमयात्रेतील माणसं** । रविराज गंधे । मूल्य २०० रुपये
१५. **नाटक एक मुक्त चिंतन** । रवीन्द्र दामोदर लाखे । मूल्य १५० रुपये
१६. **नोबेलनगरी २०२० - NOBELNAGARI** । सुधीर थत्ते, नंदिनी थत्ते । मूल्य १०० रुपये
१७. **टपालकी** । सॅबी परेरा । मूल्य २५० रुपये
१८. **ठोंब्या, टकलू अंकल आणि इतर कथा** । आबा गोविंदा महाजन । मूल्य ३० रुपये
१९. **व्यासंग आणि विचार** । संकलन धनंजय गांगल, अरुण जोशी । मूल्य १५० रुपये
२०. **वर्तमानाच्या लिपीत** (कवितासंग्रह) । प्रशांत भरवीरकर । मूल्य १२५ रुपये
२१. **माझ्या दृष्टांताची दृश्ये** (गझलसंग्रह) । चंद्रशेखर सानेकर । मूल्य १५० रुपये
२२. **गझलच्या उजेडात गझल** । चंद्रशेखर सानेकर । मूल्य २५० रुपये
२३. **चंबुखडी ड्रीम्स** । डॉ. जगन्नाथ पाटील । मूल्य ३५० रुपये
२४. **काव्याञ्जलि** । उमाशंकर श्रीवास्तव । मूल्य १०० रुपये
२५. **उच्छ्वास** । उमाशंकर श्रीवास्तव, माया श्रीवास्तव । मूल्य २०० रुपये
२६. **शरदाचे चांदणे** - श्रेष्ठ गायक पं. शरद साठे यांच्याविषयी... । स्मिता महाजन । मूल्य ४०० रुपये
२७. **वादळवाट** । एम.डी. देशमुख । मूल्य ४०० रुपये
२८. **अभ्युदय** । प्र.के. वकारे । मूल्य २०० रुपये
२९. **कबीराच्या कविता - रवींद्रनाथ टागोर** । अनुवाद शर्मिला प्रभुणे । मूल्य १५० रुपये
३०. **प्रभु अजि गमला** । डॉ. स्मिता निखिल दातार । मूल्य ४०० रुपये
३१. **आत्मभान** । गो.श्री. पंतबाळेकुंद्री । मूल्य २०० रुपये
३२. **सोलो** । सोनाली लोहार । मूल्य १५० रुपये
३३. **सहा दशकांची पत्रकारिता** । वसंत वासुदेव देशपांडे । मूल्य २५० रुपये
३४. **एकला चलो रे!** । बी.जी. वाघ । मूल्य ३५० रुपये
३५. **व्हिस्कीत बर्फ वितळावा** । सदानंद डबीर । मूल्य १२५ रुपये
३६. **हस्तसंवाद** । देवेंद्र पाटील । मूल्य ३५० रुपये
३७. **नाट्यविचार** । डॉ. अनंत देशमुख । मूल्य १५० रुपये
३८. **नाट्यसमीक्षा** । डॉ. अनंत देशमुख । मूल्य ५०० रुपये
३९. **ओंजळभर शिंपले** । शशिकांत जागीरदार । मूल्य ३०० रुपये
४०. **जाना कुमारी** । रेमंड मच्याडो । मूल्य ३०० रुपये
४१. **करोनांगुली** । विवेक मोहन गद्रे । मूल्य १५० रुपये
















४२. पेव्हरब्लॉक । मिलिंद बल्लाळ । मूल्य १५० रुपये
४३. शब्द जायबंदी होण्याचे दिवस । योगिनी सातारकर-पांडे । मूल्य १५० रुपये
४४. प्राजक्तप्रभा । प्राजक्ता माळी । मूल्य १०० रुपये
४५. Shoots & Roots । Dr. Hema Purandarey । मूल्य ४०० रुपये
४६. चुटकीभर गंमत । डॉ. मृण्मयी भजक । मूल्य २०० रुपये
४७. लाजवाब । ज्योती दाते । मूल्य ४०० रुपये
४८. गणित अध्यापक आणि प्रसारक स.पां. देशपांडे । संपादक-अ.पां. देशपांडे । मूल्य ४०० रुपये
४९. मनाशी संवाद । अनिरुद्ध जाधव । मूल्य ३५० रुपये
५०. राजा कालस्य कारणम् । बा.ग. केसकर । मूल्य २५० रुपये
५१. भारतीय अध्यात्मशास्त्र गीता आणि विपश्यना । जनार्दन शां. संखे । मूल्य २५० रुपये
५२. अशक्य ते शक्य... कारगिल संघर्ष । अनुराधा विष्णू गोरे । मूल्य ४५० रुपये
५३. आम्ही अशा वेगळ्या । अनुराधा विष्णू गोरे । मूल्य १५० रुपये
५४. आठवणी दाटतात । अनुराधा विष्णू गोरे । मूल्य १५० रुपये
५५. नाटक : काही निरीक्षणे, काही परीक्षणे । प्र.ना. परांजपे । मूल्य ३५० रुपये
५६. अक्षरयात्रा । डॉ. प्रियदर्शन मनोहर । मूल्य २५० रुपये
५७. राहा फिट । डॉ. अविनाश सुपे । मूल्य ३०० रुपये
५८. 'सर्जन'शील । डॉ. अविनाश सुपे । मूल्य ३५० रुपये
५९. तरंग भवतालचे । विनता कुलकर्णी । मूल्य २०० रुपये
६०. चिंतन । शरद काळे । मूल्य ६०० रुपये
६१. विज्ञान-तंत्रज्ञानात हीरकमहोत्सवी महाराष्ट्र । संपादक : विवेक पाटकर, हेमचंद्र प्रधान । मूल्य ७५० रुपये
६२. कोरोनाचा कहर - सामाजिक भान आणि प्रतिक्रिया । डॉ. पी.एस. रामाणी । मूल्य १५० रुपये
६३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे दलितेतर सहकारी (भाग-२) । योगीराज बागूल । मूल्य ४०० रुपये
६४. टेल्को ते टेक्सास । चंद्रकांत राणे । मूल्य ३५० रुपये
६५. आकाशवीणा । वीणा आशुतोष रारावीकर । मूल्य १०० रुपये
६६. परक्या मातीत रुजताना (कथासंग्रह) । उषा तांबे । मूल्य २०० रुपये
६७. नाही गिरवता येत कुठलीच लिपी । डॉ. स्मिता पाटील । मूल्य १५० रुपये
६८. वाळूत उमटलेले ठसे । अर्चना जगदीश । मूल्य २०० रुपये
६९. प्रिय प्रतिमास, रेणूकडून । रेणू दांडेकर । मूल्य ३०० रुपये
७०. सृजनाच्या नव्या वाटा । रेणू दांडेकर । मूल्य २०० रुपये
७१. वय झाल्यावर... (वृद्धत्वाकडे बघण्याचा वेगळा दृष्टिकोन) । रेणू दांडेकर । मूल्य १५० रुपये
७२. माझ्या मराठीचा बोल । अरुण साधू । मूल्य १२५ रुपये
७३. मोइ कुन? आमी कुन? - एनआरसी आणि आसामी जगण्याचा अस्वस्थ शोध । मेघना ढोके । मूल्य २०० रुपये
७४. प्रौर'पॉर्न'खेळ - पोर्नोग्राफी आणि गेमिंगचा चक्रव्यूह । मुक्ता चैतन्य । मूल्य २०० रुपये
७५. ऐसे नको गोरक्षण... - गोवंश हत्याबंदी कायद्याचा शेतकऱ्यांवरील परिणाम । दत्ता जाधव । मूल्य २०० रुपये
७६. हमारी याद आएगी । कुमार सोहोनी । मूल्य २५० रुपये
७७. रोजीरोटी । विलास कसबे । मूल्य ५० रुपये
७८. मंत्रमुग्ध । डॉ. शुभा चिटणीस, अशोक चिटणीस । मूल्य २५० रुपये
७९. मदतनीसनामा । ॲड. राजेश बेहेरे । मूल्य १०० रुपये
८०. साडी गं साडी । ज्योती रत्नपारखी-वालझाडे । मूल्य ४०० रुपये













जागतिक अभिजात इंग्रजी पुस्तकाची ओळख करून देणारे 'ग्लोबल साहित्यसफर'

लेखकांशी संवाद साधणारे 'साहित्याच्या पारावर'

देशी-विदेशी लेखिकांच्या अभिजात साहित्याची ओळख करून देणारे 'ग्लोकल लेखिका'

'ग्रंथाली'चा इतिहास आणि योजना यांची माहिती ● प्रकाशने ● सांस्कृतिक कार्यक्रम

या साऱ्यासाठी सबस्क्राइब करा आणि पाहा : Granthali Watch या वेब पेजवर


आज़ादी का अमृत महोत्सव
लोन उत्सव
मर्यादित कालावधीची ऑफर
आश्चर्यकारक कमी
6.40%*
7.15%*
यूनियन होम
• कमाल मुदत 75 वर्ष वय किंवा 30 वर्ष, जे कमी असेल ते
• ₹ 30 लाखांपर्यंत लोनसाठी 90% फायनान्स उपलब्ध
• परतफेडीचे लवचिक पर्याय
यूनियन माइल्स
• परतफेडीची कमाल मुदत 84 महिने
• वाहनाच्या ऑन-रोड किंमतीवर 90% फायनान्स उपलब्ध
• नवीन 4 व्हीलरवर कोणतीही कमाल मर्यादा नाही
प्रोसेसिंग शुल्कावर 100% सूट*
इतर प्रॉडक्ट्सवर आकर्षक ऑफर्स
*अटी लागू
यूनियन एमएसएमई
यूनियन नारी शक्ति
यूनियन पर्सनल
यूनियन एज्यूकेशन
यूनियन बैंक ऑफ इंडिया
Union Bank of India
भारत सरकार का उपक्रम
A Government of India Undertaking
आन्ध्रा Andhra
कार्पोरेशन Corporation
www.unionbankofindia.co.in
• हेल्पलाइन - 1800 208 2244 / 1800 222244 • +91 80618 17110 (शुल्क लागू) • 9619333333 वर मिस्ड कॉल द्या किंवा 56161 वर <ULOAN> एसएमएस पाठवा
संपर्क करा : @unionbankofindia @UnionBankTweets @unionbankofindia UnionBankInsta YouTube UnionBankofIndiaUtube
If anyone asks 'OTP' - do not respond

# भाषेच्या नजरेतून दिसणारा सहिष्णू भारत हीच आपल्या देशाची खरी ओळख - डॉ. गणेश देवी

**ज्ये**ष्ठ लेखक, पत्रकार अरुण साधू यांच्या चौथ्या स्मृतिदिनानिमित्त ग्रंथाली आणि सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाचा संज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या विभाग व साधू कुटुंबीय ह्यांच्या संयुक्त विद्यमाने पाठ्यवृत्ती प्रदान आणि व्याख्यान हा ऑनलाइन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या प्रारंभी सुवर्णा साधू ह्यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या विभागाच्या वतीने विभागप्रमुख डॉ. उज्ज्वला बर्वे ह्यांनी अरुण साधू पाठ्यवृत्तीबाबत माहिती देताना गेल्या दोन वर्षी ज्यांना पाठ्यवृत्ती जाहीर झाली होती त्या मेघना ढोके, मुक्ता चैतन्य आणि दत्ता जाधव ह्यांचा थोडक्यात परिचय करून दिला. तसेच, त्यांच्या संशोधन विषयांबाबत सविस्तर माहिती दिली.


त्यानंतर ज्येष्ठ संपादक, खासदार कुमार केतकर ह्यांनी साधूंच्या आठवणी जागवल्या. 'मित्र म्हणून त्यांचा-माझा सातत्याने संवाद-भेट होत असे. आज ते जाऊन इतकी वर्षे झाली तरीही ते आपल्यात नाहीत असे वाटत नाही. कारण त्यांच्या पुस्तकांतून नव्हे तर त्यांच्या सहवासातून ते मानसिक, बौद्धिक व वैचारिक पातळीवर सतत आपल्याबरोबर आहेत असे वाटते. त्यांच्या नावे दिल्या जाणाऱ्या पाठ्यवृत्तीसाठी पत्रकारांनी निवडलेले विषय पाहिले तर असे जाणवते की हे विषय खुद्द अरुण साधूंना ज्या ज्या विषयांबद्दल जिज्ञासा होती तेच विषय आहेत. साधूंनीही हेच विषय निवडले असते. मराठी भाषा, अस्मिता हे साधूंच्या आवडीचे विषय होते.' त्यानंतर केतकर अध्यक्ष डॉ. गणेश देवी ह्यांचा परिचय करून देताना म्हणाले- 'डॉ. गणेश देवी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे भाषातज्ज्ञ आहेत. ते नुसते अभ्यासक नाहीत, त्यांनी नवीन भाषा शोधून जगासमोर आणलेल्या आहेत. शिवाय भाषेपूर्वीच्या इतिहासविषयक मोलाचे संशोधन केलेले आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू आहेत. ते ऋषितुल्य आहेत. आजच्या कार्यक्रमानिमित्ताने त्यांनी आपले भाषाविषयक विचार मांडावेत अशी मी त्यांना विनंती करतो.'



डॉ. गणेश देवी



कुमार केतकर



डॉ. उज्ज्वला बर्वे

यावेळी बोलताना डॉ. गणेश देवी म्हणाले, 'अरुण साधूंच्या स्मृतींना उजागर करण्यासाठी मला बोलावलेत, त्याबद्दल नितांत आनंद वाटतो. मराठी साहित्य, पत्रकारिता, इंग्रजी भाषेतील त्यांचा अभ्यास ह्याबाबत त्यांचे मोठे योगदान आहे. त्यांचा-माझा परिचय नव्हता, पण त्यांच्या लेखनातून मला स्फूर्ती मिळत राहिली आहे. या समारंभाचे मला निमंत्रण मिळाले तेव्हा साधूंचे ऋण फेडण्याची संधी म्हणून मी ते तत्काळ स्वीकारले. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिल्या जाणाऱ्या पाठ्यवृत्तीसाठी निवडलेले विषय वेगळे आहेत

अतुल देऊळगावकर





पराग करंदीकर

गेलेल्या शूद्रकाचे 'मृच्छकटिकम्' हे नाटक 'एकमेव' असूनही केवळ वाच्यार्थानेच नव्हे, तर लक्ष्यार्थानेसुद्धा 'अद्वितीय' झाले आहे. या नाटकाचा पाचवा अंक हा या नाटकाचा उत्कर्षबिंदू आहे. या अंकात चारूदत्त आणि वसंतसेना यांचा प्रणय वर्षाऋतूतील निसर्गाच्या पार्श्वभूमीवर रंगवला आहे. यातील वर्षावर्णनात मेघांनी आक्रमिलेल्या नभातून कोसळणाऱ्या जलधारांचे वर्णन आले आहे. शूद्रकाने या काळ्या मेघांना उपमा दिली आहे ती आर्द्र तमालपत्रांची! विटासहित (सेवकासह) चारुदत्ताच्या भेटीला जाणारी वसंतसेना विटाला म्हणते–

*भाव! प्रेक्षस्व प्रेक्षस्व!*

*एतैरार्द्र-तमालपत्र-मलिनैरापोतसूर्यं नभो।*

– मृच्छकटिकम्, अंक ५, श्लोक क्र. २०

अर्थ– तमालवृक्षाच्या ओल्या पानांप्रमाणे मलिन दोघांनी जणू नभातील सूर्यालाच प्राशन करून टाकले आहे.

येथे, वर्षाकालीन मेघांचा तमालनीलवर्ण आपले लक्ष वेधून घेतो. हे मेघ जलाने भरलेले असल्यामुळे शूद्रकाने त्यांना आर्द्र तमालपत्रांची सार्थ उपमा दिली आहे.

याच पाचव्या अंकात पुढे चारुदत्ताने मेघांना ठेचलेल्या तमालपत्रांच्या काळ्या रंगांची उपमा देऊन, त्यांचा काळा रंग अधिकच गडद झाल्याचे दाखवले आहे. इतकेच नव्हे तर मेघांत चमकणाऱ्या विजेकडे, वसंतसेनेचे लक्ष वेधून चारुदत्त तिला, मेघाला अलिंगन देणाऱ्या विद्युल्लतेप्रमाणे आपल्याला आलिंगन देण्यास सुचवतो. तो म्हणतो–

*एतैः पिष्टतमालवर्णकनिभैरालिप्तमम्भोधरैः*
*संसक्तैरूपजीवितं सुरभिभिः शीतैः प्रदोषानिलैः।*
*एषाऽम्भोदसमागमप्रणयिनी स्वच्छन्दमभ्यागता*
*रक्ता कान्तमिवाम्बरं प्रियतमा विद्युत्समालिङ्गति।।*

– मृच्छकटिकम्, अंक ५, श्लोक क्र. ४६

'मृच्छकटिकम्'नंतरच्या संस्कृत साहित्यातसुद्धा आपल्याला अनेकदा उपमेय आणि उपमान म्हणून मेघ आणि तमाल यांचे साहचर्य दिसून येते.

इसवी सनाच्या पहिल्या शतकात होऊन गेलेल्या कवी अश्वघोषाच्या 'सौन्दरनन्दम्' या महाकाव्यात एक वेगळाच सुंदर उल्लेख पाहावयास मिळतो. गौतम बुद्धाचं विमातृज (सावत्र) भाऊ नन्द हा या महाकाव्याचा नायक असून त्याची पत्नी सुन्दरी ही नायिका आहे. चक्रवाक पक्ष्यांच्या जोड्यांप्रमाणे ती दोघे परस्परांवर आसक्त आहेत. सुन्दरी पतीच्या हातात दर्पण देऊन, त्याच्या मुखाकडे वारंवार पाहातच आपल्या कपोलावरील विशेषक म्हणजे वेलबुट्टी पूर्ण करते. या विशेषकामध्ये ती तमालपत्रांची आकृती रेखाटते. अश्वघोष म्हणतो–

*पत्युस्ततो दर्पणसक्तपाणेर्मुहुर्मुहुर्वक्त्रमवेक्षमाणा।*
*तमालपत्रार्द्रतले कपोले समापयामास विशेषकं तत्।।*

सौन्दरनन्दम्, सर्ग ४ श्लोक क्र. २०

येथे विशेषकामध्ये तमालपत्राला विशेष स्थान का होते, ही एक विचार करण्यासारखी गोष्ट आहे. प्राचीन काळी विशेषक म्हणजे मुखावरील वेलबुट्टी ही चंदन, केशर आणि कस्तुरी यांसारख्या सुगंधी द्रव्यांनी केली जात असे. काळसर रंगाचे, तरवारीच्या पात्यासारखे दिसणारे तमालपत्र अन्य पानांप्रमाणे आकर्षक नसले तरी काळ्या कस्तुरीने विशेषक (याला 'पत्रभंग' असेही दुसरे संस्कृत नाव आहे.) रेखाटताना तमालपत्राच्या नील वर्णामुळे त्याला पत्रभंगात स्थान मिळाले असावे. शिवाय तमालपत्राच्या काळ्या रसानेही विशेषक रेखाटले जात असल्याने त्यामध्ये तमालपत्राच्या आकृतीला स्थान मिळणेही स्वाभाविक आहे.

कपोलांवरील या तमालपत्राच्या विशेषकामुळे सुंदर दिसणाऱ्या सुन्दरीच्या मुखाला अश्वघोषाने सुंदर उपमा दिली आहे. तो म्हणतो–

*तस्या मुखं तत्सतमालपत्रं ताम्राधरौष्ठं चिकुरायताक्षम्।*
*रक्ताधिकाग्रं पतितद्विरेफं सशैवलं पद्ममिवाबभासे।।२।।*

– सौन्दरनन्दम्, सर्ग ४ श्लोक क्र. २१

अर्थ – सुन्दरीचे तमालपत्राने आर्द्र झालेले, रक्तवर्ण अधर आणि चंचल व विशाल नेत्र यांनी युक्त मुख शैवालाने (शेवाळाने) युक्त, रक्तवर्ण अग्रभाग असलेल्या व भ्रमरांनी युक्त अशा कमलाप्रमाणे शोभिवंत दिसू लागले.

येथे कवीने तमालपत्राच्या आर्द्र विशेषकाला जलावरील आर्द्र शैवालाची उपमा दिली आहे. प्राचीन काळी केवळ जिव्हालौल्यासाठी नव्हे, तर प्रसाधन म्हणूनही तमालपत्रांचा वापर केला जात होता. सौन्दरनन्दमधील तमालपत्राचा हा उल्लेख संस्कृत कवींची सौंदर्यग्राही दृष्टी दर्शवणारा आहे.

अश्वघोषानंतर म्हणजे इसवी सनाच्या पाचव्या शतकात कविकुलगुरू कालिदासाच्या 'रघुवंशम्' या विदग्ध महाकाव्यात तमाल विविध प्रकारे आला आहे. रघुवंशाच्या सहाव्या सर्गात इन्दुमती स्वयंवराचे वर्णन आहे. विदर्भ देशाची राजकन्या इन्दुमती हिच्या स्वयंवरासाठी, विविध राज्यांतून राजे आले आहेत. इन्दुमतीची सखी सुनन्दा, तिला या राजांचा परिचय करून देते. दक्षिण भारतातील पाण्डय राजाचा परिचय करून देताना सुनन्दा इन्दुमतीला म्हणते–

*ताम्बूलवल्लीपरिणद्धपूगास्वेलालतालिङ्गितचन्दनासु।*
*तमालपत्रास्तरणासु रन्तुं प्रसीद शश्वन्मलयस्थलीषु।।*

– रघुवंशम्, सर्ग ६ श्लोक ६४

अर्थ – तू, मलय पर्वतावरील, नागवेलींनी वेढलेली सुपारीची झाडे असलेल्या, वेलचीच्या वेलींनी आलिंगन दिलेले चंदनवृक्ष असलेल्या आणि तमालपत्रांचे आस्तरण (शय्या) असलेल्या वनभूमीत रममाण होण्यासाठी प्रसन्न हो. (म्हणजेच तू पाण्डय राजाशी विवाह कर.)

रघुवंशातील हा श्लोक अनेक दृष्टींनी महत्त्वाचा वाटतो. विवाहासारख्या पवित्र बंधनाच्या वेळीसुद्धा अनेकदा, स्वयंवराच्या वेळी राजांची समृद्धी त्यांच्याकडील वृक्षवेलींच्या विपुलतेवरून विचारात घेतली जात असे; हे या श्लोकावरून दिसून येते. या श्लोकातील तमालाच्या उल्लेखावरून दक्षिण भारतात तमालवृक्ष असल्याचे स्पष्ट होते. येथे तमालाच्या कोवळ्या, मृदू पानांच्या शय्येसाठी आस्तरण म्हणून वापर करण्याचा उल्लेख आला आहे. 'तमालपत्रास्तरणास' बरोबर जोडून घेतलेल्या 'रन्तुंप्रसीद' या शब्दांना







एक सूचक शृंगारिक अर्थही आहे. संस्कृतमध्ये 'रम्' या धातूचा अर्थ 'संभोग करणे' असाही होतो. प्राचीन काळी राजांचा आपल्या राण्यांबरोबरचा शृंगार निसर्गाच्या पार्श्वभूमीवर मोकळ्या वातावरणात होत असल्याचे उल्लेख संस्कृत साहित्यात पाहावयास मिळतात.

रघुवंशाच्या तेराव्या सर्गातही दोन श्लोकांमध्ये तमाल आला आहे. या सर्गात, राम रावणावर विजय मिळवून, सीता आणि लक्ष्मण यांच्यासह पुष्पक विमानातून अयोध्येकडे येत असल्याचे वर्णन आहे. लंका ते अयोध्या या विमानप्रवासात रामाने केलेले विहंगमावलोकन या वर्णनात आले आहे. विमानातून दिसणाऱ्या समुद्रकिनाऱ्याकडे पाहून राम सीतेला म्हणतो–

*दूरादयश्चक्रनिभस्य तन्वी तमालतालीवनराजिनीला।*
*आभाति वेला लवणाम्बुराशेर्धारानिबद्धेव कलङ्करेखा।।*

– रघुवंशम्, सर्ग १३ श्लोक क्र. १५

अर्थ – हे नाजूक सीते! दुरून लोखंडी चाकाच्या धावेप्रमाणे दिसणारा हा समुद्रकिनारा, त्याच्यावरील ताल, तमाल इत्यादी वृक्षांच्या नीलवर्णामुळे चाकाच्या धावेवर गंज चढल्याप्रमाणे भासतो.

या श्लोकात नील तमालराजीला गंज चढलेल्या चाकाच्या धावेची अगदी आगळीवेगळी उपमा कालिदासाने दिली आहे.

पुढे चित्रकूट पर्वताच्या जवळ आल्यावर त्याच्या तटावरील तमाल पाहून रामाच्या मनात एक मधुर स्मृती जागृत होते. तो सीतेला म्हणतो–

*अयं सुजातोऽनुगिरं तमालः प्रवालमादाय सुगन्धि यस्य।*
*यवाङ्कुरोपाण्डुकपोलशोभी मयावतंसः*
*परिकल्पितस्ते।।४९।।*

– रघुवंशम, सर्ग १३ श्लोक क्र. ४९

अर्थ – चित्रकूटाच्या तटावर जो सुंदर तमालवृक्ष दिसत आहे, तो तोच तमाल आहे; ज्याच्या सुगंधी पालवीचा मी बनवलेला कर्णालंकार तुझ्या यवांकुरासारख्या किंचित फिकट गौरवर्णी गालाला शोभा देत होता.

रघुवंशातील या श्लोकावरून प्राचीन काळी स्त्रिया तमालाची सुगंधी पालवी कर्णालंकार म्हणून धारण करत असल्याचे दिसून येते.

कालिदासानंतर, इसवी सनाच्या सातव्या शतकात होऊन गेलेल्या माघ कवीने आपल्या 'शिशुपालवधम्' या विदग्ध महाकाव्यात वर्षाऋतूतील नीलवर्ण मेघांनी व्यापलेल्या आकाशावर तरूचे रूपक केले आहे. या तरूला त्याने तमाल तरूची उपमा दिली आहे. तो म्हणतो–

*द्रुतसमीरचलैः क्षणलक्षितव्यवहिता विटपैरिव मञ्जरी।*
*नततमालनिभस्य नभस्तरोरचिररोचिररोचत वारिदैः।।*

– शिशुपालवधम्, सर्ग ६ श्लोक २८

अर्थ – नवीन तमाल तरूप्रमाणे असलेल्या आकाशरूपी वृक्षाच्या, वेगवान वायूमुळे हालणाऱ्या शाखांप्रमाणे असणाऱ्या मेघांमधून क्षणभर दिसून लपणारी विद्युत् (अचिररोचिः) मञ्जरीप्रमाणे शोभत होती.

येथे कवीने आकाशाला मञ्जरी आलेल्या तमालतरूच्या रूपात पाहिले आहे.

माघाच्याच कालखंडात होऊन गेलेल्या 'भवभूति' या नाटककारानेही आपल्या 'मालतीमाधवम्' आणि 'महावीरचरितम्' या दोन नाटकांमध्ये तमालवृक्षांना मेघाची उपमा दिली आहे.

**नीलतरू तमाल आणि बालकवींचा औदुंबर या दोघांमध्येही असलेला 'काळिमा' गोड आहे. परंतु नील तमालाचा काळिमा इहलोकातील आसक्तीशी जोडलेला आहे; तर औदुंबराचा काळिमा मोक्षाचे द्वार असणाऱ्या विरक्तीशी जोडला गेला आहे. आसक्ती आणि विरक्ती या भारतीय संस्कृतीरूपी एकाच खणखणीत नाण्याच्या दोन बाजू ओत. रतीकडून विरतीकडे आणि कामाकडून मोक्षाकडे जाणाऱ्या भारतीय संस्कृतीत 'पाय टाकुनी जळात' बसलेल्या औदुंबराप्रमाणेच संस्कृत साहित्यातील या 'आभाळात झेपावणाऱ्या' नीलतळ तमालालाही तितकेच महत्त्व आहे.**

'मालतीमाधवम्' या नाटकात पद्मावती नगरीच्या राजाचा अमात्य भूरिवसु याची कन्या मालती आणि विदर्भ देशाच्या राजाचा अमात्य देवरात याचा पुत्र माधव यांची प्रेमकथा आली आहे. या नाटकात शृंगाररसाबरोबरच अद्भुतरसही आला आहे. शाक्तपंथाचा उपासक कापालिक 'अघोर'घण्ट, सिद्धीप्राप्तीसाठी स्मशानात कुमारिका मालतीला चामुण्डा देवीसमोर बळी देण्यासाठी उभी करतो; तेव्हा माधव त्याचा वध करतो. परंतु अघोरघण्टाची शिष्या कपालकुण्डला आपल्या गुरूच्या वधाचा सूड घेण्यासाठी, मालतीला आपल्या मंत्रसामर्थ्याने आकाशमार्गाने श्रीपर्वतावर नेते. मालतीच्या अपहरणामुळे शोकाकुल झालेला माधव आपला मित्र मकरंद याच्यासह पद्मावती नगरीच्या जवळच असलेल्या घनदाट अरण्यात भटकत राहतो. त्यावेळी वर्षाऋतूचे आगमन झाल्यामुळे गिरिशिखरांवर जलाने भरलेले मेघ माधवाच्या दृष्टीस पडतात. ते पाहताना आपल्या प्रियेला– मालतीला





उद्देशून म्हणतो-

*तरुणतमालनीलबहुलोन्नमदम्बुधरा:*

– मालतीमाधवम्, अंक ९, श्लोक क्र. १८

अर्थ – नव्या तमालवृक्षांप्रमाणे, या वर्षाऋतूमध्ये (दिशा) नीलवर्ण आणि उन्नत मेघांनी युक्त झाल्या आहेत.

याच नवव्या अंकातील आणखी एका श्लोकात पर्वतशिखराचा आश्रय घेणाऱ्या मोठ्या मेघाला 'प्रौढतापिच्छनील:' म्हटले आहे-

*उपचित-घनमाल-प्रौढता पिच्छनील:।*
*श्रयति शिखरभद्रेर्नततस्तोयवाह:।।*

– मालतीमाधवम्, अंक ९, श्लोक क्र. २४

भवभूतीच्या 'महावीरचरितम्' या रामाच्या जीवनावर आधारित नाटकातील वर्षावर्णनातही मेघाला 'प्रौढतापिच्छनील:' म्हटले आहे. 'मालतीमाधवम्'मधील श्लोकच थोड्या फरकाने येथे आला आहे-

*उपरिविघटमान प्रौढतापिच्छनील:।*
*श्रयति शिखरमद्रेर्नूतनस्तोयवाह:।।*

– महावीरचरितम्, अंक ५, श्लोक क्र. ४२

अर्थ – फुललेल्या प्रौढ तमालवृक्षाप्रमाणे नीलवर्ण मेघ पर्वताच्या शिखराचा आश्रय घेत आहे.

मेघ आणि तमाल यांच्यातील साम्य दाखवणाऱ्या या उपमा पाहिल्यावर आठवतो तो मेघश्याम, घनश्याम घननीळ कृष्ण! नील मेघांना तमालाचे रूप देणाऱ्या कविप्रतिभेने कृष्णाच्या श्याम म्हणजे नील वर्णामध्ये मेघाला पाहिले. कृष्ण, मेघ आणि तमाल हे तिन्ही जणू 'नील'वर्णाच्या समान सूत्राने बांधले गेले आहेत. म्हणूनच नील जल असणाऱ्या यमुनेच्या काठी कदंबाबरोबरच नील तमालही मन:चक्षूंसमोर येतो.

या तमालाची विविध रूपे आपल्याला पाहावयास मिळतात ती बाणभट्टाच्या 'कादम्बरी' आणि 'हर्षचरितम्' या गद्य काव्यांमध्ये! सम्राट हर्षवर्धनाच्या राजसभेत कवी असणाऱ्या बाणभट्टाचे पूर्वायुष्य भ्रमंतीत गेले होते. विंधारण्यात त्याने केवळ अरण्यभ्रमण नव्हे तर अरण्यवाचनही केले होते. यामुळेच त्याची वृक्षवर्णने बहारदार झाली आहेत. बाणाच्या गद्यकाव्यांमध्ये तमाल इतका विपुलतेने आणि विविधतेने आला आहे की, तो एका स्वतंत्र लेखाचाच विषय होईल. तरीसुद्धा येथे काही संदर्भ देण्याचा मोह आवरत नाही.

'कादम्बरी'च्या प्रास्ताविक श्लोकांमध्ये बाणभट्टाने आपला पिता चित्रभानू याची स्तुती करताना त्याने केलेल्या यज्ञातील धुराच्या लोटाला वेदत्रयीरूपी वधूच्या कानांवरील तमालपल्लवाची उपमा दिली आहे. बाण म्हणतो-

*दिशामलीकालकभङ्गतां गतस्त्रयीवधकर्णतमालपल्लव:*
*चकार यस्याध्वरधूमसंचयो मलीमस: शुक्लतरं निजं यश:।।*

(कादम्बरी - प्रास्ताविक)

अर्थ – दिशारूपी वधूच्या ललाट रेषेवरच्या भांगात काळ्या चूर्णाप्रमाणे शिरलेला व वेदत्रयीरूपी वधूच्या कानांवरचा जणू तमालपल्लव असा (चित्रभानूच्या) यज्ञातील धुराचा लोट स्वत: काळा असला तरी त्याने चित्रभानूचे यश मात्र अधिकच शुभ्र केले.

हा श्लोक विषम अलंकाराचे उत्तम उदाहरण आहे. यज्ञीय धूम (धूर) काळा असूनही त्याने चित्रभानूला धवल यश प्राप्त करून दिले.

कादम्बरीतील विन्ध्याटवीच्या वर्णनातील तमालवृक्ष बाणाच्या विविधस्पर्शी सौंदर्यग्राही दृष्टीची साक्ष पटवतो. विन्ध्याटवीच्या वर्णनात, तमालवृक्षांमुळे ती नारायणाच्या मूर्तीप्रमाणे काळसर झाल्याचे बाणाने म्हटले आहे- 'क्वचित नारायणमूर्तिरिव तमालनीला.' तमालवृक्ष हत्तींना प्रिय आहे. विन्ध्याटवीतील तमालाची पालवी हत्तीच्या छाव्यांनी सोंडेने रगडल्यामुळे ती तमालाच्या गंधाने दरवळलेली आहे-

*'करि-कलभ-कर-तमाल-किसलय-आमोदिनी'*

या विन्ध्याटवीत आलेल्या शबर सैन्याच्या सेनापतीने हत्तीच्या मदाची उटी अंगाला लावल्यामुळे त्याच्याभोवती रुंजी घालणाऱ्या भ्रमरांनी त्याच्या मस्तकावर जणू छत्रच धरले आहे. या छत्रावर, उन्हाचे निवारण करण्यासाठी तमालाची काळसर पाने धारण केल्याची, बाणाने जी उत्प्रेक्षा केली आहे, ती विन्ध्याटवीतील तमालवृक्षांशी सुसंगतच आहे.

विन्ध्याटवीचे हे वर्णन ज्या शुकशावकाच्या (पोपटाच्या पिल्लाच्या) मुखातून आले आहे, त्या पिल्लाने तर तमालवृक्षाला आपल्या पित्याच्या रूपात पाहिले आहे. एका म्हाताऱ्या शबराने या पिल्लाच्या पित्याला ठार मारल्यानंतर, त्याच्या तावडीतून सुटलेले हे पोपटाचे पिल्लू, जवळच्याच एका तमालवृक्षाच्या बुंध्याशी येऊन त्याच्या मुळात घुसते. या प्रसंगाचे वर्णन करताना ते पिल्लू म्हणते-

*'पितरुत्सङ्गमतिमहतस्तमालविटपिनो मूलदंशम्विशत्।'*

त्या अतिविशाल तमाल वृक्षाच्या मुळात जणू पित्याच्या मांडीत घुसावं, त्याप्रमाणे मी घुसलो.

वात्सल्यरसाने इतके ओथंबलेले तमावृक्षाचे रूप अन्यत्र पाहावयास मिळणार नाही.

विन्ध्याटवीतील या तमालवृक्षाचे, विशेषत: त्याच्यातील तम ाचे आणि त्याचबरोबर हत्तीच्या मदाप्रमाणे असणाऱ्या त्याच्या मादक गंधाचे, बाणाने केलेले आलंकारिक वर्णन मुळातूनच वाचण्यासारखे आहे. दुर्गा भागवत यांनी या वर्णनाचा केलेला अनुवादही तितकाच उठावदार आहे. त्या लिहितात-

''सूर्याचे किरण आत पोहोचत नव्हते, अशा त्या तमालाच्या झाडाचे पल्लव शबरांच्या सुंदरींनी कानांत घालायला योग्य असे होते. बलरामाच्या निळ्या वस्त्राची छाया कृष्णाच्या निळ्या कांतीला हसायची तशीच याची छायादेखील जणू कृष्णकांतीला हसत होती. जणू यमुनेच्या डोहाच्या काळ्या पाण्यानेच त्या वृक्षाच्या पानांचा डेरा बनवला होता. त्याची कोवळी पालवी वनातल्या हत्तींच्या मदानेच शिंपली गेली होती. विन्ध्याटवीच्या केशपाशाची सारी शोभा तो मिरवत होता. दिवस असूनही त्याच्या फांद्याफांद्यांतून दाट काळोख भरलेला होता. त्याच्या घनदाट छायेमुळे सूर्याचे किरणदेखील त्याच्यात प्रवेश करू शकत नव्हते.''

'तमा'मुळे आपले 'तमाल' हे नाव सार्थ करणाऱ्या या वृक्षाचे इतके चित्रदर्शी वर्णन अन्यत्र पाहावयास मिळणार नाही. कदंबानंतर

**मानवाच्या व्यक्तिमत्त्वाप्रमाणेच प्रत्येक वृक्षालाही स्वत:चे असे 'वृक्षत्व' असते. औदुंबराचे नाते दत्तात्रेयाशी आहे, तर तमालाचे नाते दत्तात्रेयातील देवत्रयीमधील विष्णूचाच अवतार असलेल्या कृष्णाशी आहे. हा नीलतरू तमाल आणि बालकवींचा औदुंबर या दोघांमध्येही असलेला 'कालिमा' गोड आहे. परंतु नील तमालाचा कालिमा इहलोकातील आसक्तीशी जोडलेला आहे; तर औदुंबराचा कालिमा मोक्षाचे द्वार असणाऱ्या विरक्तीशी जोडला गेला आहे.**

ज्याचा अनुबंध कृष्णाशी आणि बलरामाशीही जोडला गेला आहे, असा तमालवृक्ष आहे.

यानंतर जाबाली मुनींच्या आश्रमातही तमालवृक्ष असल्याचा उल्लेख आला आहे. या आश्रमातील रात्रीचे वर्णन करताना बाणाने, क्षितिजावरील अंधाररेखेला आश्रमाभोवती असलेल्या तमालवृक्षांच्या काळ्या वनराईची उपमा दिली आहे-

*पर्यन्तस्थित-तनु-तिमिर-तमालवनलेखम्*

या उपमेमध्ये बाणाने जणू विरल अंधारालाच घनरूप दिले आहे.

यानंतर उज्जयिनीच्या तारापीड राजाची गर्भवती राणी विलासवती हिच्या अग्रे काळवंडलेल्या स्तनांना तमाल पल्लवांनी मुख झाकलेल्या सुवर्णकलशांची उपमा दिली आहे-

*'तमालपल्लवलाञ्छित मुखयोरिव कनककलशयो:'*

मंगल कलशांवर आम्रपल्लवांसारखे पवित्र पल्लव ठेवण्याची



प्रथा प्राचीन आहे. परंतु स्तनाग्रांच्या काळसर रंगामुळे बाणाने त्यांना दिलेली ही तमाल पल्लवांची उपमा जितकी अभिनव तितकीच समर्पकही आहे.

'कादम्बरी'तील शिवमंदिराभोवती असलेल्या तरुराजीतील तमालवृक्षांच्या समूहाचे वर्णन करताना, बाणाने 'भ्रान्तिमान' अलंकार उपयोजला आहे. तो म्हणतो-

*जलधर-जललुब्ध-विप्रलब्ध-मुग्धचातकध्वान-मुखरित-तमालखण्डै:*

अर्थ - भोळेभाबडे चातक पक्षी मेघातले पाणी प्यायला मिळेल या लालसेने तेथल्या तमालांच्या रायांनाच, काळेपणामुळे ते ढग आहेत असे समजले.

येथे मेघांना तमालांची उपमा न देता, तमालांनाच मेघांची उपमा दिली आहे.

'कादम्बरी'ची नायिका कादम्बरी हिच्या काळ्याभोर केसांच्या बटांना बाणाने दिलेली तमालांच्या वनाची उपमाही वेगळेपणाने उठून दिसते.

बाणाने तमालाच्या नीलवर्णाला दिलेल्या उपमांमध्ये वैविध्य आहे.

प्राचीन काळी तमालरसाचा उपयोग विशेष कामासाठी केला जात होता. परंतु कादम्बरीत बाणाने या तमालरसाला एक वेगळेच भावस्पर्शी स्थान दिले आहे.

महाश्वेतेच्या प्रेमात पडलेला पुण्डरीक, जवळच असलेल्या तमालवृक्षाची पाने एका शिळेवर रगडून त्यांचा रस काढतो. आपल्या उत्तरीयाची एक पट्टी फाडून तो, त्या पट्टीवर हत्तीच्या मदाप्रमाणे सुगंधित असलेल्या त्या रसाने, आपल्या करंगळीच्या नखाग्राने महाश्वेतेला प्रेमपत्र लिहितो. वनात लेखनसामग्री उपलब्ध नसताना तमालपत्राच्या रसाचा केलेला हा उपयोग अभिनव तर आहेच, शिवाय काव्यमयही आहे.

बाणभट्टाच्या 'हर्षचरितम्' या गद्यकाव्यात मालतीच्या तिलकाला 'तमालश्यामल' म्हटले आहे. सम्राट हर्षवर्धनाचा हत्ती दर्पशात याने भक्षण केलेल्या, त्याच्या मुखातून वाहणाऱ्या

तमालपत्रांच्या रसावर बाणाने हत्तीच्या मदाचीच उत्प्रेक्षा केली आहे. 'कादम्बरी'त रात्रीच्या अंधाराला दिलेली तमालाची उपमा हर्षचरितातही आली आहे. हर्षचरितातील एक उपमा मात्र वेगळेपणाने उठून दिसते. हर्षवर्धनाला विन्ध्याटवीतील शबर सेनापती त्याच्याकडे एका शबर युवकाला घेऊन येताना दिसतो. या युवकाचे वर्णन करताना बाण म्हणतो–

''जङ्गममिव गिरितटतमालपादपम्'' – तो युवक म्हणजे जणू गिरितटावरील चालता तमालवृक्षच होता. तमालाचा काळा रंग बाणाच्या मनात इतका भिनला आहे, की काळ्याकभिन्न आणि उंच अशा शबर युवकासही त्याने तमालवृक्षाची उपमा दिली आहे. हर्षचरिताच्या सातव्या उच्छ्वासात विन्ध्याटवीतील वनग्रामाचे वर्णन आले आहे. त्यामध्ये वनग्रामातील कुटिरांमध्ये वनवासींनी तमालाच्या बिया साठवून ठेवल्याचा उल्लेख आहे– 'सङ्गृहीत तमालबीजैः'

बाणाच्या दोन्ही गद्यकाव्यांत, तमालविषयक असे विविध संदर्भ आपल्याला पाहावयास मिळतात.

बाणभट्टानंतर इसवी सनाच्या दहाव्या शतकात होऊन गेलेल्या पद्मगुप्त याच्या 'नवसाहसाङ्कचरित' या ऐतिहासिक महाकाव्यात तमाल आला आहे. धारा नगरीतील नृप सिन्धुराज याच्या राजसभेत कवी असणाऱ्या पद्मगुप्ताने आपला 'नवसाहसाङ्कचरित' या काव्यात; 'नवसाहसाङ्क' हे बिरुद धारण करणाऱ्या सिन्धुराजाच्या पराक्रमाचे वर्णन केले आहे. या वर्णनातील एका श्लोकात पद्मगुप्त म्हणतो–

सद्यः करस्पर्शमवाप्य चित्रं रणे रणे यस्य कृपाणलेखा।
तमालनीला शरदिन्दुपाण्डु यशस्त्रिलोकाभरणं प्रसूते।।

अर्थ – तमालतरूप्रमाणे नीलवर्ण असलेली तलवार, राजाच्या हाताचा स्पर्श होताच त्रिलोकाला अलंकाराप्रमाणे असलेले, शरदातील चंद्राप्रमाणे उज्ज्वल यश निर्माण करते.

येथे कवीने काळसर रंगाच्या धारदार तलवारीला 'तमालनीला' म्हटले आहे. तिच्यामुळे मिळणारे यश मात्र कविसंकेतानुसार धवल आहे. काळी वस्तू शुभ्र वस्तूची उत्पादक होते; याप्रमाणे कार्यकारणाचे परस्परविरुद्ध गुण दाखवल्यामुळे येथे 'विषम' अलंकार झाला आहे.

इसवी सनाच्या बाराव्या शतकात बंगाल येथे होऊन गेलेल्या जयदेव कवीचे 'गीत्गोविन्दम्' हे आजही अत्यंत लोकप्रिय असलेले संगीत–नृत्यप्रधान काव्य आहे. राधा–कृष्णाच्या प्रेमावर आधारित बाह्यतः शृंगारिक, परंतु अंतरंग भक्तिरसाने ओथंबलेल्या या काव्यात वृंदावनातील वृक्षराजीमध्ये तमाल आला आहे.

*मृगमदसौरभ–रभस– वंशवदन–नवतमालमाले*

तमालाच्या मादक सुगंधाला संस्कृत साहित्यात, हत्तीच्या मदाची उपमा दिली गेली असता, येथे मात्र जयदेवाने तमालाच्या कोवळ्या पालवीला मृगमदाची म्हणजे कस्तुरीची उपमा दिली आहे.

तमालाच्या नीलवर्णाप्रमाणेच त्याचा मादक सुगंध हाही संस्कृत कवींच्या आकर्षणाचा विषय आहे.

येथे आणखी एक विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे, संस्कृत साहित्यात तमालासाठी 'नील' हे विशेषण वारंवार आले असले तरी ही पुनरावृत्ती एकसुरी होत नाही. ज्याप्रमाणे वल्लभाचार्यांच्या 'कृष्णाष्टकात' कृष्णवर्णनातील 'मधुर' या विशेषणाची पुनरावृत्ती कर्णमधुरच झाली आहे, त्याचप्रमाणे तमालाच्या 'नील' वर्णाची पुनरावृत्तीही संदर्भाच्या वैविध्यांमुळे नेत्रसुखद झाली आहे.

संस्कृत साहित्यातील या तमालतरूला आयुर्वेदात महत्त्वाचे स्थान आहे. 'राजनिर्घण्टः' या आयुर्वेदविषयक ग्रंथात याचे पुढील गुणधर्म सांगितले आहेत–

*मधुरत्वम्। बल्यत्वम्। वृष्यत्वम्। शिशिरत्वम्। गुरुत्वम्।*
*कफपित्ततृषादाहश्रमशान्तिकरत्वं च। – इति राजनिर्घण्टः*

तमालपत्रे मज्जाविकार व हृदयविकार यांवर उपयुक्त असून कृमिनाशक आहेत. तसेच, ती संधिवात, शूल, अतिसार आणि वृश्चिकदंशावरही उपयुक्त आहेत. तमालाच्या सालीची पूड जठराच्या दुर्बलतेवर व प्लीहावृद्धीवर उपयुक्त असते.

लोकव्यवहारातही तमालपत्रांचा व सालीचा वापर केला जातो. पुलाव, बिर्याणी यांसारख्या अन्नपदार्थांना स्वाद व गंध येण्यासाठी तमालपत्र वापरतात. काश्मीरमध्ये तमालाची कोवळी पाने नागवेलीच्या पानांप्रमाणेच खातात. तमालाच्या खोडाच्या सालीपासून मिळणारे सुगंधी तेल साबणात वापरतात. आयुर्वेदिक आसवांना सुगंधित करण्यासाठी तमालपत्रे वापरली जातात. कापड छपाईसाठी हरड्यांबरोबर तमालपत्र वापरतात. तमालाची साल आणि पाने कातडी कमवण्यासाठी उपयुक्त असतात.


अशा या बहुगुणी संस्कृत साहित्यात मानाचे स्थान प्राप्त झालेल्या तमालतरूची मराठी साहित्यात मात्र उपेक्षाच झाली आहे.

असे असूनही माझे मन मात्र नकळत या तमालाचे नाते जोडते ते बालकवींच्या 'औदुंबर' कवितेशी! विशेष म्हणजे संस्कृतमध्ये तम ालाप्रमाणेच उंबरालाही 'कालस्कन्ध' हे समान नाव आहे. कालस्कन्ध याचा अर्थ, ज्याचे खोड आणि फांद्या काळसर आहेत, असा वृक्ष!

मानवाच्या व्यक्तिमत्त्वाप्रमाणेच प्रत्येक वृक्षालाही स्वतःचे असे 'वृक्षत्व' असते. औदुंबराचे नाते दत्तात्रेयाशी आहे, तर तमालाचे नाते दत्तात्रेयातील देवत्रयीमधील विष्णूचाच अवतार असलेल्या कृष्णाशी आहे. हा नीलतरू तमाल आणि बालकवींचा औदुंबर या दोघांमध्येही असलेला 'काळिमा' गोड आहे. परंतु नील तमालाचा काळिमा इहलोकातील आसक्तीशी जोडलेला आहे; तर औदुंबराचा काळिमा मोक्षाचे द्वार असणाऱ्या विरक्तीशी जोडला गेला आहे. आसक्ती आणि विरक्ती या भारतीय संस्कृतीरूपी एकाच खणखणीत नाण्याच्या दोन बाजू ओत. रतीकडून विरतीकडे आणि कामाकडून मोक्षाकडे जाणाऱ्या भारतीय संस्कृतीत 'पाय टाकुनी जळात' बसलेल्या औदुंबराप्रमाणेच संस्कृत साहित्यातील या 'आभाळात झेपावणाऱ्या' नीलतळ तमालालाही तितकेच महत्त्व आहे. म्हणूनच हा तमाल 'पाय रोवुनी मनात' उभा आहे.

**– प्रा. नीला कोर्डे**
भ्रमणध्वनी : ९३२४८९१८८०
दूरध्वनी : ०२२–२५३९७९१२


मेघना ढोके


दत्ता जाधव


मुक्ता चैतन्य

आणि अशा फेलोशिपच्या निमित्ताने आजचे पत्रकार संशोधन करत आहेत ही मोलाची बाब आहे.' 'भाषांच्या नजरेतून भारत' या विषयावर व्याख्यानात ते म्हणाले– 'आपला भारत देश हा बहुभाषांचा देश आहे. मुळात भाषा ही एक सोशल सिस्टीम आहे, सिम्बॉल आहे, जी निर्जीव आहे. भाषांचा उगम व इतिहास हा खूप प्राचीन आहे. मनुष्यप्राणी शेती करायला लागला, तेव्हा त्याला शब्दांची–भाषेची गरज भासू लागली. आपल्याकडे संस्कृती ही हिंसक नव्हती, आपल्या समाजात सहिष्णुता होती. बहुभाषक सिव्हिलायझेशन इथे होते. एकापेक्षा वेगळा समाज असू शकतो अशी धारणा होती. म्हणूनच आपल्या देशाकडे धर्माच्या नजरेतून न पाहता विविध भाषांच्या नजरेतून बघितले गेले पाहिजे. सहिष्णू भारत हीच खरी आपली ओळख आहे.'

कार्यक्रमात गेल्या वर्षी ज्या तीन पत्रकारांना पाठ्यवृत्ती देण्यात आली होती, त्यांच्या पुस्तकांचे प्रकाशन झाले. मेघना डोके यांचे 'मोई कुन? आम्ही कुन?', मुक्ता चैतन्य यांचे 'प्रोर 'पॉर्न' खेळ', दत्ता जाधव यांचे 'ऐसे नको गोरक्षण', तसेच, अरुण साधूंचे 'माझ्या मराठीचा बोल' हे महानगरमधील भाषा, साहित्य व साहित्यिकविषयक निवडक लेखांचे संकलन या पुस्तकांचे मान्यवरांच्या हस्ते ऑनलाइन प्रकाशन करण्यात आले.

यंदाच्या पाठ्यवृत्तीसाठी मागवलेल्या प्रस्तावांचे परीक्षण करण्यासाठी महाराष्ट्र टाइम्सचे संपादक पराग करंदीकर व लेखक अतुल देऊळगावकर ह्यांची समिती नेमली होती. करंदीकर ह्यांनी प्रस्तावांबाबतचे आपले निरीक्षण नोंदवले. त्यानंतर डॉ. उज्ज्वला बर्वे ह्यांनी २०२० व २०२१ या वर्षांसाठी अविनाश पोईनकर, नीलेश बुधावले व शर्मिष्ठा भोसले या तीन नावांची घोषणा केली. या पाठ्यवृत्तीबाबत निवडीपासूनचे सर्व काम डॉ. उज्ज्वला बर्वे व सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या संज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या विभागामार्फत करण्यात आले. सदर कार्यक्रमाला सुवर्णा व शेफाली या साधूंच्या कन्या व पत्नी अरुणा आवर्जून उपस्थित होत्या. ग्रंथालीच्या वतीने धनंजय गांगल, सुदेश हिंगलासपूरकर, अरुण जोशी व धनश्री धारप उपस्थित होते.


**– राजीव जोशी**


नीलेश बुधावले


शर्मिष्ठा भोसले


अविनाश पोईनकर

**पुस्तकांचे प्रकाशन – अरुणा साधू, शेफाली साधू–बॅनर्जी, सुवर्णा साधू–बॅनर्जी**





**धनंजय गांगल, सुदेश हिंगलासपूरकर आणि अरुण जोशी**

# ‘सर्जन’शील आणि ‘राहा फिट’ या पुस्तकांचे प्रकाशन



‘सर्जन’शील पुस्तकाचे प्रकाशन

डॉ. अविनाश सुपे लिखित पुस्तकप्रकाशनसमयी धनंजय गांगल, धनश्री धारप, प्रवीण शिंदे, सुदेश हिंगलासपूरकर, अरुण जोशी, डॉ. अविनाश सुपे, डॉ. स्वाती सुपे, वैशाली रोडे, राधिका कुंटे आणि सुमेधा कुवळेकर



डॉ. अविनाश सुपे



‘राहा फिट’ पुस्तकाचे प्रकाशन

चेंबूरच्या डॉ. ब्रिजेश अगरवाल यांच्या हार्ट क्लिनिकमध्ये ३ ऑक्टोबरच्या दुपारी अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात दोन पुस्तकांच्या प्रकाशनाचा आटोपशीर साहेळा रंगला होता. डॉ. अविनाश सुपे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांच्या ‘सर्जनशील’ या आत्मकथनपर आणि ‘राहा फिट’ या आरोग्यविषयक सदराचे संकलन, अशा ग्रंथाली प्रकाशित दोन पुस्तकांचे प्रकाशन एका अनौपचारिक कार्यक्रमात करण्यात आले. ग्रंथालीच्या फेसबुक पेजवरून त्याचे लाइव्ह प्रसारण करण्यात आले होते. ‘सर्जनशील’ या पुस्तकाला डॉ. व्ही.एन. श्रीखंडे यांची आणि ‘राहा फिट’ या पुस्तकाला डॉ. स्नेहलता देशमुख यांची प्रस्तावना लाभली आहे.

ग्रंथालीचे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी प्रास्ताविक करत ग्रंथालीच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. ‘व्हिजन महाराष्ट्र’चे प्रवीण शिंदे यांनी या दोन्ही पुस्तकांतील महत्त्वांच्या पैलूंवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, की रुग्णसेवेचा वसा घेतलेल्या डॉक्टर सुपे यांचे व्यक्तिचित्र ‘सर्जनशील’ या पुस्तकामुळे वाचकांसमोर उभे राहते. डॉ. सुपे यांच्या घरातली वारकरी वृत्ती आणि त्यांचे भटकंती, संगीत, छायाचित्रण, लेखन आदी विविध छंद या लिखाणातून कळतात. पुस्तकात वैद्यकीय क्षेत्राविषयी भरभरून बोलणारे डॉक्टर स्वतःविषयी आणि कुटुंबाविषयी मोजकेच बोलतात. तर ‘राहा फिट’ या पुस्तकामुळे विविध आजार, त्यांवरचे उपचार यांची माहिती साध्या, सोप्या आणि नेमक्या शब्दांत कळते.

ज्येष्ठ पत्रकार आणि ‘सर्जनशील’ या पुस्तकाचे शब्दांकन-संपादन करणाऱ्या वैशाली रोडे यांनी या पुस्तकाच्या शब्दरूपाचा प्रवास कथन केला. हे लेखन सहज, सोपे आणि सुलभ होण्यासाठी वेळोवेळी डॉक्टरांना दूरध्वनी करून, झूम मीटिंगच्या साहाय्याने वैद्यकीय क्षेत्रातील अगदी बारीकसारीक तपशील जाणून घेत ते मांडायचा प्रयत्न केला आहे असे त्या म्हणाल्या. या कामी त्यांना राधिका कुंटे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

डॉ. अविनाश सुपे यांनी त्यांच्या मनोगतात सांगितले, की सार्वजनिक वैद्यकीय सेवेमध्ये चाळीस वर्षे काम केल्यानंतर असंख्य रुग्णांशी संवाद साधता आला. अनेकांना व्याधीमुक्त करता आले. या रुग्णसेवेच्या आणि डॉक्टर विद्यार्थी घडवताना मिळणाऱ्या समाधानाची तुलना इतर कोणत्याही बाबीशी होऊ शकत नाही. या प्रदीर्घ अनुभवाचा लाभ आरोग्यव्यवस्थेमध्ये कार्यरत असलेल्यांना व्हावा, यासाठी ‘सर्जनशील’ हे पुस्तक लिहिले. तर ‘राहा फिट’मध्ये याच अनुभवावर आधारित रुग्णांचे विविध प्रश्न, सध्याच्या जीवनशैलीशी निगडित अनेक आजार यांवर लोकसत्ता, लोकप्रभा आणि कालनिर्णयमध्ये वेळोवेळी लिहिलेल्या लेखांसह कोरोनासारख्या विषयांवरचे आणखीही काही लेख समाविष्ट केले आहेत. त्याचा सुजाण वाचकांना उपयोग होईल.

या प्रसंगी ग्रंथालीचे अरुण जोशी, धनश्री धारप, सुमेधा कुवळेकर, संजय व स्मिता कुलकर्णी आणि सुपे परिवारातील सदस्य उपस्थित होते. ग्रंथालीचे विश्वस्त धनंजय गांगल यांनी कार्यक्रमाचा समारोप करत उपस्थितांचे आभार मानले.

**– प्रतिनिधी**

# योगीराज बागूल यांच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन





**योगीराज बागूल यांच्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे दलितेतर सहकारी (भाग २)' आणि 'प्रिय रामू...' या दोन पुस्तकांच्या प्रकाशनसमयी उमेश रेगे (शां. शं. रेगेंचे चिरंजीव), शकुंतला चित्रे-गुप्ते (कमलाकांत चित्रेंच्या कन्या), प्रतिमा जोशी, लेखक योगीराज बागूल, डॉ. भालचंद्र मुणगेकर, खा. कुमार केतकर, सुदेश हिंगलासपूरकर (विशस्त, ग्रंथाली), डॉ. विजय कदम आणि निवेदिका डॉ. मृण्मयी भजक**



**योगीराज बागूल**

'सध्या चळवळीची दिशा आणि स्वरूप बदलत चालले आहे. सर्वसमावेशकतेचा अभाव प्रकर्षाने जाणवतो. या काळामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दलितेतर सहकाऱ्यांनी केलेल्या मदतीबद्दल जाणून घेणे महत्त्वाचे ठरते,' असे प्रतिपादन राज्यसभेचे खासदार कुमार केतकर यांनी केले. योगीराज बागूल यांच्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे दलितेतर सहकारी (भाग २)' या ग्रंथाचे प्रकाशन नुकतेच दादर येथील वनमाळी सभागृहात केतकर यांच्या हस्ते पार पडले त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी योगीराज बागूल लिखित रमाबाई आंबेडकर यांच्या चरित्राच्या दुसऱ्या सुधारित आवृत्तीचेही प्रकाशन ज्येष्ठ पत्रकार प्रतिमा जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. 'प्रिय रामू...' या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या निमित्ताने, आजच्या काळातील सर्वच स्त्रियांनी हे पुस्तक वाचण्यासारखे असल्याचे प्रतिपादन जोशी यांनी केले. ग्रंथाली प्रकाशित या पुस्तकांच्या प्रकाशन कार्यक्रमासाठी डॉ. भालचंद्र मुणगेकर उपस्थित होते. 'बागूल यांनी आंबेडकरी साहित्य आणि चळवळीतला अक्षम्य दुर्लक्षित मात्र महत्त्वाचा विषय संशोधन आणि लेखनासाठी निवडणे नावीन्यपूर्ण आहे,' असे कौतुकोद्गार डॉ. मुणगेकर यांनी काढले. डॉ. आंबेडकर यांचे कार्य हे त्यांच्या दलितेतर सहकाऱ्यांनी केलेल्या कार्याची दखल घेतल्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही, असेही ते म्हणाले. ते पुढे म्हणाले, हे पुस्तक लिहून लेखकाने साहित्याच्या क्षेत्रात एक मोठे काम केले आहे. या पुस्तकाची भाषा अधिक समृद्ध असून बाबासाहेबांचे चरित्र यामधून प्रतिबिंबित होते. लेखकाने यातून एक मोठा ऐतिहासिक दस्तऐवज निर्माण केलेला आहे.

या ग्रंथामध्ये डॉ. आंबेडकर यांच्या ज्या सहकाऱ्यांचा उल्लेख आहे त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांचा सत्कार प्रकाशन सोहळ्यामध्ये करण्यात आला. लेखक योगीराज बागूल यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. मृण्मयी भजक यांनी सूत्रसंचालन केले.

**– प्रतिनिधी**

# 'परक्या मातीत रुजताना' या पुस्तकाचे प्रकाशन




**प्रकाशन करताना– मृण्मयी भजक, सुदेश हिंगलासपूरकर, दिनकर गांगल, लेखिका उषा तांबे, उज्ज्वला मेहेंदळे, प्रतिभा बिस्वास आणि प्रमोद पवार**



**प्रा. उषा तांबे**

नुसते बीज चांगले असून चालत नाही; ज्या मातीत ते रुजायला हवे त्या मातीनेही त्याला स्वीकारावे लागते. मग ती माती परकी असो वा देशी. बी रुजवण्यासाठी मशागत करावी लागते. कष्ट करावे लागतात. त्याचप्रमाणे प्रत्येक मनुष्याला देशात किंवा परदेशात वास्तव्य करताना संघर्ष व तडजोडी कराव्या लागतात. त्यातून परदेशात तर अधिक कराव्या लागतात. भारतीयांची परदेशी जाण्याची ओढ अनादी काळापासून आहे. बऱ्याचदा हे भारतीय लोक काही काळासाठी जातात, पण नंतर मात्र परदेशात स्थायिक होतात त्याला अनेक कारणे आहेत.

परंतु आपले भारतीयत्व परदेशात किती आणि कसे जपायचे? अमेरिकेसारख्या संपन्न देशात जाण्याचे बहुतांश सर्वांचेच स्वप्न असते, पण तेथे गेल्यावर कसे मिसळून जायचे? तेथली माणसे आपल्याला सामावून घेतील का? आपली संस्कृती तिकडे जपता येईल का? बाहेरून लखलखीत वाटणाऱ्या बाबी खरोखर लखलखीत आहेत की निव्वळ वरवरच्या आहेत? या प्रश्नांसह देखण्या दरवाजामागे दुभंगलेली मने, तुटलेली नाती, नात्यातील ताणतणाव या सर्व बाबींचा विचार 'परक्या मातीत रुजताना' या प्रा. उषा तांबे लिखित कथासंग्रहात केलेला आहे. अवघ्या १२६ पानांत १३ कथांमधून तरुण पिढीतील भावानुबंध अतिशय सहजसुंदर शब्दांत मांडलेला हा कथासंग्रह वाचकाच्या मनात रुजत जातो. अमेरिकन जीवनशैली उषा तांबे यांनी जवळून अनुभवलेली असल्याने सर्व कथांमधून अमेरिकेतील वास्तव जीवन त्या रेखाटतात.

ग्रंथालीने ११ ऑक्टोबर २०२१ रोजी 'परक्या मातीत रुजताना' हा प्रा. उषा तांबे यांचा कथासंग्रह प्रकाशित केला. दिनकर गांगल यांनी 'यातील प्रत्येक कथा विचार करायला लावते. अंतर्मुख करते' असे गौरवोद्गार पुस्तकाचे प्रकाशन करताना काढले. अमेरिकेत गेलेल्या पहिल्या पिढीतील लेखकांपासूनचा पट यानिमित्ताने नजरेसमोर आला. उषा तांबे यांचा हा संग्रह त्याच मोलाचा आहे; हे पुस्तक वाचकांच्या मनात रुजावे याबद्दल शुभेच्छा दिल्या. कोरोनाचे सर्व नियम पाळून विशेष आमंत्रितांच्या उपस्थितीत प्रकाशनसोहळा संपन्न झाला. प्रास्ताविक 'ग्रंथाली'चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी केले. त्यांनी गेल्या दोन वर्षांत ऑनलाइन प्रकाशित करण्यात आलेल्या व येऊ घातलेल्या पुस्तकांची माहिती दिली.

प्रा. उषा तांबे यांनी लेखिका मनोगत व्यक्त केले. अमेरिकेत राहणाऱ्या तरुण पिढीची होणारी घालमेल आणि त्यांना कराव्या लागणाऱ्या तडजोडी यातून जगणे कसे सुसह्य व असह्य होते अनुषंगाने कथासंग्रहाचा परामर्श घेतला. प्रसिद्ध अभिनेते प्रमोद पवार यांनी 'चूक कोणाची?' या कथेचे अतिशय प्रभावी शैलीत अभिवाचन केले. मुंबई मराठी साहित्य संघाच्या साहित्य शाखेच्या कार्यवाह, कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या उज्ज्वला मेहेंदळे यांनी कथासंग्रहातील कथांचा थोडक्यात गोषवारा घेऊन लघुकथा प्रकाराबद्दल माहिती दिली.

प्रा. प्रतिभा बिस्वास यांनीदेखील 'निर्णय' या कथेचे वेधक शैलीत अभिवाचन केले. या कार्यक्रमास प्रसिद्ध कवयित्री उषा मेहता, अचलाताई जोशी, संजीवनी खेर, कोमसापच्या व साहित्य संघाच्या लेखिका रेखा नार्वेकर, कवयित्री प्रा. प्रतिभा सराफ व साहित्यक्षेत्रातील इतर अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे उत्तम सूत्रसंचालन डॉ. मृण्मयी भजक यांनी केले.

**– प्रा. प्रतिभा बिस्वास**

## ‘हमारी याद आएगी’ या पुस्तकाचे प्रकाशन



**प्रकाशन करताना – मृण्मयी भजक, सुदेश हिंगलासपूरकर, महेंद्र तेंरेदेसाई, लेखक कुमार सोहोनी, न्या. मृदुला भाटकर, विद्या करंजीकर, पुरुषोत्तम बेर्डे, दीपक करंजीकर आणि चंद्रशेखर कुलकर्णी**



**कुमार सोहोनी**

‘कुमार सोहोनींच्या आयुष्यात ही पाच माणसं कारणपरत्वे आली होती. एक दिग्दर्शक म्हणून त्यांचा या पाच जणांबरोबरचा सहवास होता. त्या सहवासात त्यांचे सूर जुळले आणि तो प्रवास अर्धवट टाकून ही पाच माणसं निघून गेली. या माणसांच्या सहवासात असतानाचा जो कलाप्रवास होता, तो करताना आरशात त्या व्यक्तींच्या ज्या काही प्रतिमा उमटल्या त्याचं चित्रण या पुस्तकात केलेलं आहे. ते प्रामाणिक असल्यानं खरं आहे.’ ‘हमारी याद आएगी’ या कुमार सोहोनी लिखित पुस्तकाच्या प्रकाशनसमयी माजी न्यायमूर्ती मृदुला भाटकर बोलत होत्या.

‘महाराष्ट्र सेवा संघा’च्या सहकार्याने त्यांच्याच वास्तूत ‘ग्रंथाली’ प्रकाशित ‘हमारी याद आएगी’ पुस्तकाचा प्रकाशन सोहळा १६ ऑक्टोबर २०२१ रोजी पार पडला. यावेळी लेखक-दिग्दर्शक पुरुषोत्तम बेर्डे, लेखक-कलावंत दीपक करंजीकर अन्य वक्ते म्हणून उपस्थित होते. प्र.ल. मयेकर, डॉ. श्रीराम लागू, भक्ती बर्वे-इनामदार, लक्ष्मीकांत बेर्डे आणि रमेश भाटकर या पाच लेखक-कलावंतांच्या आठवणी जागवणारे हे पुस्तक.

‘कुमार सोहोनीची ४१ वर्षांची कारकीर्द, १०० कलाकृती, २७६ कलाकारांबरोबर काम पाहता, त्यानं आत्मचरित्र लिहावं, ज्यातून रंगभूमीचा एक काळ जिवंत होईल.’ असे प्रतिपादन दीपक करंजीकर यांनी केले.


‘महाराष्ट्र सेवा संघ’ आणि ‘ग्रंथाली’ यांच्या कार्याबद्दल गौरवोद्‌गार काढत पुरुषोत्तम बेर्डे नर्मविनोदी शैलीत, प्रकाशित पुस्तकाबद्दल बोलताना म्हणाले, ‘या पुस्तकाची प्रस्तावना लिहिण्याची संधी कुमारनं मला दिली, हा मला मिळालेला एक ब्रेक आहे. आता बघू किती लोक माझ्याकडे प्रस्तावना मागतात. पुढेही प्रस्तावना लिहायला सांगितली तर पुस्तकाचं मुखपृष्ठही करून देईन.’ ते पुढे म्हणाले, ‘या पुस्तकात त्यानं जी पाच व्यक्तिमत्त्वं घेतली आहेत, ती मला पाच पिंपळपानं वाटतात, पुस्तकात जपून ठेवलेली. मात्र त्यांचा एकमेकांशी संबंध वाटत नाही. थोड्या पानांनंतर एकेक ठेवावं अशी ती आहेत. डॉ. लागू चिंतनशील, तत्त्वचिंतक; लक्ष्मीकांत बेर्डे लोकाभिमुख हे आगळं कॉम्बिनेशन आहे. लक्ष्मीकांत उत्स्फूर्त ॲडिशन करणारा तर डॉ.लागू लेखकाची कंसातील वाक्यंही प्रमाण मानणारे. भक्ती बर्वे मिश्कील आणि कायम तजेलदार अभिनेत्री, तर रमेश भाटकरांसारखा कविमनाचा, संवेदनशील आणि हीरो म्हटल्यावर जगाकडे टॉप ॲंगलनं बघणारा असा, आणि त्यानंतर एकदम अग्निकुंड म्हणजे प्र.ल. मयेकर. जळजळीत व्यक्तिमत्त्व. असे हे कलावंत. प्रलंशी ट्युनिंग होणं हे एखाद्या गवयाचं तानपुऱ्याशी जसं ट्युनिंग होतं तसं व्हायला हवं. कुमार-मयेकरांचं ट्युनिंग गायक-तानपुऱ्याइतक्या ताकदीचं झालं होतं म्हणून त्यांची अकरा नाटकं कुमार करू शकला. मयेकरांच्या वैविध्यपूर्ण नाटकांना त्यानं छान सांभाळलं. तो मला शैलीदार लेखकाचा शैलीदार दिग्दर्शक वाटला.’

कार्यक्रमाची सांगता लेखक कुमार सोहोनी यांच्या मनोगताने झाली. ते म्हणाले, ‘मयेकर म्हटल्यावर ज्यांनी मला दिग्दर्शक म्हणून पाठबळ दिलं, नाव दिलं ते डॉ. लागू आणि भक्ती बर्वे आले. लक्ष्मीकांतमुळे ‘बजरंगाची कमाल’ चित्रपटातून मला व्यावसायिक दिग्दर्शक म्हणून मान्यता मिळाली. तर रमेश भाटकरशी माझी दोस्ती खूप काळ राहिली. या पाच जणांच्या अनेक गोष्टी लोकांना माहीत नाहीत. त्या लिहाव्या असं ठरवलं. त्यातून हे पुस्तक मांडलं आहे.’

लेखक-दिग्दर्शक कलावंत महेंद्र तेंरेदेसाई आणि अभिनेत्री विद्या करंजीकर यांनी अनुक्रमे डॉ.श्रीराम लागू आणि रमेश भाटकर यांच्यावर लिहिलेल्या लेखांतील भाग उत्कृष्ट सादर केला. त्यानं कार्यक्रमाला हृद्य आणि भावनिक परिमाण दिले.

महाराष्ट्र सेवा संघाचे अध्यक्ष चंद्रशेखर कुलकर्णी यांनी संस्थेच्या कार्याबद्दल आणि या कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल प्रास्ताविक केले. प्रकाशक या नात्याने ‘ग्रंथाली’चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी मनोगत मांडले. महाराष्ट्र सेवा संघाच्या विनोद सौदागर यांनी ऋणनिर्देश व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मृण्मयी भजक यांनी उत्तम केलं.

**– प्रतिनिधी**





## विज्ञान-तंत्रज्ञानात हीरकमहोत्सवी महाराष्ट्र

संपादक

**विवेक पाटकर, हेमचंद्र प्रधान**

**मूल्य ७५० रु. सवलतीत ५०० रु.**



## चिंतन

**शरद काळे**

**मूल्य ६०० रुपये सवलतीत ३५० रुपये**


## अरुण साधू पाठ्यवृत्ती पुस्तके




माझ्या मराठीचा बोल

**अरुण साधू**


**मूल्य १२५ रु.**
**सवलतीत ७५ रु.**




मोइ कुन? आमी कुन?

**मेघना ढोके**


**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**




ऐसे नको गोरक्षण...

**दत्ता जाधव**

**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**



प्रौर'पॉर्न'खेळ

**मुक्ता चैतन्य**

**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

## ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

## विश्वासाला गवसणी घालणारा आश्वासक कवितासंग्रह

योगिनी सातारकर-पांडे यांचा 'शब्द जायबंदी होण्याचे दिवस' हा भारदस्त, कसदार कवितासंग्रह ग्रंथालीने नुकताच प्रकाशित केला. संपूर्ण कवितासंग्रह वाचत असताना सतत भासत राहते, की एका प्रगल्भ अनुभवाच्या विशाल गुहेत आपण नव्याने वावरत आहोत. या गुहेच्या दणकट भिंती, टोकदार कडेकपारी, मिट्ट काळोख, असह्य होणारा दर्प, अंगावर येणारी आर्द्रता पहिल्यांदाच अनुभवतो आहोत. तीच गुहा कधीही अनोळखी नव्हती ती नवा अनुभव देते, हा अनुभव त्याच गुहेत खिळवून ठेवते, हा विलक्षण अनुभव सांभाळताना तिच्यातून बाहेर पडण्याऐवजी पुन्हा पुन्हा आत प्रवेश करण्यासाठी मन ओढ घेत राहते.

असे का व्हावे? आपल्या आजुबाजूचे वास्तव आपणास अपरिचित आहे, असे नक्कीच नाही. घर, घरातील नाती, आपसातले नातेसंबंध नवीन नाहीत. या नात्याच्या केंद्रस्थानी असलेली 'बाई' तर खिजगणतीत नसलेली एक व्यक्ती. हाडामांसाची सजीव व्यक्ती, तीही परिचयाचीच म्हणाली. हेच विषय कवितेत आलेले आहेत. त्यांनी इतके भारावून जाण्याचे कारण काय? यातले भारावून जाणे महत्त्वाचे. दगडाला दगडपण देण्यात नवे काहीच नसते, नवे असते त्यातून साकारलेले शिल्प. रेखीव, नवे परिमाण असलेले शिल्प. त्याच्यावर उधळलेली नाजूक, अलवार कलाकुसरीची भावफुले. खिळवून ठेवणारी त्याची स्वतःची अनोखी प्रतिमा. ते नवेपण म्हणजे हा कवितासंग्रह.

खिडकी उघडी करून बाहेर डोकावले तर काहीच दिसत नाही, आरसा समोर ठेवला तरी प्रतिबिंब त्यात उमटत नाही. हे वास्तव समोर ठाकते तेव्हा काय जाणवते? आपली मने इतकी निष्ठुर झाली आहेत की कुठलाच आघात त्यावर होत नाही. संपूर्ण कोलाहलाशी आपला संबंध कुठेही उरलेला नाही. ही बधीर झालेली संवेदना कवयित्री अनुभवाच्या पातळीवर व्यक्त करतात- 'वजा होत चाललेय बहुतेक' या चार शब्दांत.

जगणे आता कातळासारखे झाले आहे, त्यावर पडणारा एकेक थेंब काहीतरी सांगू पाहतो आहे. परंतु पानाच्या टोकावर खाली पडण्याऐवजी गोठून लोंबकळत असलेल्या थेंबासारखी अवस्था झालेल्या जगण्याला ते सांगणे आकळणार कधी?


उन्हाच्या पाकळ्या गर्द सावलीत कवडशाची फुले होऊन नाचतात तशा या मुली कधी प्रौढ होतात ते कळतच नाही. चिमण्यांसारखी उडणारी चिवचिव झाली आणि स्वप्ने कधी मौनात जातात पंखांच्या होरपळ्याने हे तिलाही कळत नाही. ती पीत राहते अख्खा काळोख उतरवत राहते तापलेला तवा थरथरत्या हाताने पेलवत नसतानाही, पुन्हा पुन्हा ती मृत्यूला सामोरे जाते विस्थापितांच्या सगळ्या जखमांच्या साक्षीने. कोण असते ही? काळोखतून उजेडाच्या पावलांनी चालत आलेली बाई! आदिम काळापासून चिवटपणाचे सत्त्व लाभलेली पुन्हा फिनिक्ससारखी जन्म घेणारी बाई! पणजी, आजी, आई अशी उतरंड असलेली एकाच धाग्यात गुंफलेली बाई! सर्व ऋतूंचे सगळे रंग ज्या कॅनव्हासवर एकत्रितपणे दिसू शकतील असा एकच कॅनव्हास आहे तो आहे बाई नावाचा. तिच्या हाती कधीच नसतो लंबक स्वीकाराचा वा नकाराचा. तरीही कवितेतून तिच्या या जगण्याचे रडगाणे नाही, आहे ते विश्वासाने, धैर्याने, सत्त्वाने, चिवटपणे जगण्याचे, काळोख दूर करून उजेडाच्या दिशेने टाकणाऱ्या निश्चयी पावलाचे विश्व.

खूप मोठा आवाका असलेल्या या संग्रहातील सगळ्याच कविता एक समग्र असा अनुभव देणाऱ्या आहेत. एकच अनुभव वेगवेगळ्या स्वरूपात कसा व्यक्त होतो, याचे उदाहरण म्हणून 'मौन : काही संदर्भ', 'शहर', 'दु:ख काही संदर्भ' या कवितांची आवर्जून नोंद घ्यायला हवी. 'कोणताच सूर्य उगवणार नसल्याच्या पार्श्वभूमीवर', 'भरउन्हाळ्यातल्या रेंगाळलेल्या दुपारी', 'आपण आहोत चिंतेत' यासारख्या अनेक कविता चित्ररूपाने सादर झालेल्या आहेत. मुक्तछंदात असलेल्या या कवितांना स्वत:ची लय आहे. प्रवाही आवेग आहे. स्वत:शी साधलेला संवाद हा कधी थेट स्वरूपात तर कधी त्रयस्थपणे आलेला आहे. यातली उत्कटता संयमितपणे व्यक्त होताना समग्र आशयाला गवसणी घालताना दिसते. आलेली प्रतीके आणि प्रतिमा यांची कुठेही द्विरूक्ती नाही. प्रत्येक कविता स्वत:चे स्वतंत्र रूप घेऊन आलेली आहे. त्यांची शीर्षके कवितेचा आतला आवाज घेऊन आलेली आहेत. सायीसारखी. आश्वासक विश्वास देणाऱ्या या कविता कवयित्रीच्या अंतर्मुख करणाऱ्या प्रतिभेचा तरल आविष्कार आहे. कवयित्री नीरजा यांनी ब्लर्बवर लिहिल्याप्रमाणे या कवयित्रीच्या कवितेचा प्रवास खूपच आश्वासक आहे, याची ग्वाही हा कवितासंग्रह देतो.

डॉ. योगिनी सातारकर-पांडे यांचा 'जाणिवांचे हिरवे कोंभ' हा कवितासंग्रह आणि 'इंडियन रायटर्स इन इंग्लिश : अ ट्रीटाईज' हे इंग्रजी पुस्तक प्रकाशित आहे. मराठी विश्वकोशासाठी नोंदीचे लेखन, नियतकालिके, वृत्तपत्रे यातून सातत्याने लेखन प्रसिद्ध आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे त्या इंग्रजी विषयाच्या प्राध्यापिका म्हणून कार्यरत आहेत.

या संग्रहाचे आशयघन मुखपृष्ठ आणि आतील उचित अशी रेखाटने चारूदत्त पांडे यांची आहेत. डॉ. सुरेश सावंत यांच्या मुद्रितशोधनाची नोंद आवर्जून घ्यायला हवी.

**शब्द जायबंदी होण्याचे दिवस**
**योगिनी सातारकर-पांडे**



**मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

# ग्रंथपान

**गणित अध्यापक आणि प्रसारक : स.पां. देशपांडे**
**संपादक : अ.पां. देशपांडे**



## अभ्यासक, संशोधक यांच्यासाठी गुरूकिल्ली

गणित हा विषय साधारणपणे नावडता या सदरात मोडणारा विषय. अशावेळी कुणी अपवाद म्हणून ‘गणित हा माझा आवडता विषय आहे’ असे म्हटले तर आपल्या भुवया आश्चर्याने उंचावतात. परंतु अलीकडच्या काळात पैकीच्या पैकी गुण देणारा विषय म्हणून गणिताकडे आदराने पाहणारा वर्ग आहे, आणि ते सिद्ध करून दाखवतात यात त्यांच्या बुद्धिमत्तेची झेप किती आहे, ती दिसून येते आणि आपला आश्चर्याचा चंबू आणखी मोठा होतो. क्लिष्टता आणि गुंतागुंतीपासून दूर पळणाऱ्याची अवस्था अशी होणे, यात नवल नाही. नवल हे आहे की गणित या विषयावर प्रभुत्व असणे. असे प्रभुत्व असलेल्या प्रज्ञावंतांची संख्या जगात मोठी आहे, आपल्याला त्यांची माहिती नाही, हे आपले अज्ञान. हे अज्ञान दूर करणारा दस्तऐवज आता आपल्यासमोर आला आहे, त्याचे शीर्षक आहे ‘गणित अध्यापक आणि प्रसारक’.

हा ग्रंथ लिहिला आहे, प्रा. स.पां. देशपांडे यांनी. स.पां. देशपांडे हे गणित या विषयाचे प्राध्यापक होते. गणित या विषयात रुची आणि गती होती तशी साहित्य, संगीत, नाटक, व्याख्याने, वाचन यातही त्यांची गती वाखाणण्याइतकी चौफेर होती. विविध निवडक लेखांचा संपादित संग्रह म्हणजे ‘गणित अध्यापक आणि प्रसारक’ होय. प्रा. स.पां.च्या वैचारिक प्रगल्भतेची साक्ष देणारी पंधरा पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. भलाथोरला असलेला हा ग्रंथ केवळ गणितासाठी वाहिलेला असला तरी त्यातले काही लेख वेगळ्या विषयांवरील आहेत. ज्यात इतर पुस्तकांवरील परीक्षणे, इतर गणित बाह्य व्यक्ती, इतर विषय यांचा समावेश आहे. गणित हा केंद्रस्थानी आहे, त्यातही विभागणी केलेली आहे, गणितावरील लेख, गणितविषयक इतर लेख, गणितींवर लेख, गणितविषयक पुस्तकांची परीक्षणे. या विभागणीमुळे विषयाचा सुटसुटीतपणा आणि नेमकेपणा लक्षात येतो.

गणित या विषयाची आंतरराष्ट्रीय स्तरावर खास स्पर्धा घेण्यात येते, तिला ‘ऑलिंपियाड’ म्हटले जाते. तिच्या विषयाची माहिती वाचल्यानंतर लक्षात येते, ही स्पर्धा खूप कस पाहणारी आहे आणि तिचे स्वरूपही तितकेच उच्च पातळीचे आहे. तिच्या संपूर्ण प्रक्रियेविषयी हा लेख तपशिलाने माहिती देतो. तीच गोष्ट ‘रँग्लर’ पदवीची. आयसीएस, बॅरिस्टर, डॉक्टर या पदवीच्या समकक्ष असलेली ‘रँग्लर’ ही पदवी गणिताची पंढरी समजल्या जाणाऱ्या ‘केंब्रिज’ विद्यापीठातून गणित या विषयात ज्यांनी सन्मानपूर्वक प्रथम श्रेणीत मिळविलेली आहे आणि ज्यांच्यामुळे महाराष्ट्राला या पदवीचा परिचय झाला, त्यांचे नाव आहे रँग्लर र.पु. परांजपे. अर्थातच या विद्यापीठाची ट्रायपॉस ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर ही पदवी लावता येते. १८९२ पासून ज्या तैलबुद्धीच्या भारतीय गणिततज्ज्ञांनी हा सन्मान प्राप्त केलेला आहे. त्यांची यादी या लेखात दिलेली आहे.

भारतीय लोकांना जुन्या काळापासून गणितात गती आहे याची जुनी उदाहरणे म्हणजे वराहमिहिर, आर्यभट, भास्कराचार्य, रामानुजन. भास्कराचार्य यांनी इ.स. ११५० साली गणित व खगोलशास्त्र यावर ‘सिद्धांत शिरोमणी’ हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ चार भागात असून त्यावर प्रा. मोहन आपटे आणि नारायण हरी फडके यांनी वेगवेगळे ग्रंथ लिहून त्याची सोप्या पद्धतीने अभ्यासकांना ओळख करून दिलेली आहे, त्या पुस्तकांचा परिचय येथे परीक्षणाद्वारे करून दिलेला आहे. इतर विषयाच्या विभागात लोकमान्य टिळक मंडालेच्या तुरुंगात असताना त्यांनी पाठवलेल्या पत्रांचा परामर्ष घेतलेला आहे. त्यातून रामभाऊ आणि श्रीधर या त्यांच्या मुलांच्या शिक्षणाविषयीची तळमळ त्यातून कशी व्यक्त झाली आहे, शिक्षण देण्याची विषयवार पद्धत कशी असावी याचे मर्मग्राही चित्रण करण्यात आलेले आहे.

अ.पां. देशपांडे यांनी हा ग्रंथ सिद्धीस जावा म्हणून केलेले प्रयत्न स्तुत्य म्हणावे लागतील. विपुल लेखनातून विषयानुसार लेख निवडणे, त्यांचा क्रम लावणे ही अवघड जबाबदारी त्यांनी कुशलतेने पार पाडलेली आहे. १९५६ ते २०१२ असा ५६ वर्षांतील हा मौल्यवान ऐवज सुविहित पद्धतीने वाचकांच्या आणि अभ्यासकांच्या हाती देताना त्यांच्यातील तळमळ, बंधूप्रेम आणि साहित्यिक जाण यांचे दर्शन होते. हा ऐवज काळाच्या ओघात सोडून न देता येणाऱ्या पिढीला त्याचा उपयोग व्हावा, हा दृष्टिकोन फार महत्त्वाचा आहे. गणित या विषयाची गोडी लागली तर गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी त्याच्यासारखा दुसरा विषय नाही. प्रकांड बुद्धिवंतांचा परिचय आणि गणिताचा विविध ज्ञानशाखांमध्ये होणारा सदुपयोग ज्ञात होण्यास हा ग्रंथ मोलाची भूमिका बजावतो. एक नवे दालन त्यांनी खुले केले आहे, असेच वाटत राहते. नवे अभ्यासक, संशोधक यांना प्रेरणा देण्यास समर्थ असलेला हा ग्रंथ अ.पां. देशपांडे यांच्यामुळे हाती आला यासाठी त्यांना धन्यवाद द्यायला हवेत. भारतीयांना या विषयाची असलेली गती पाहता ऑलिंपियाड व रँग्लर इथेच न थांबता त्याहीपलीकडे तेज पोहोचवण्यास कुणी पुढे आले तर त्यांच्या मुळाशी हा ग्रंथ असेल असे आताच म्हणावेसे वाटते. या ग्रंथात असलेले शंभर लेख हे शंभर नंबरी सोने आहे. त्याचा उपयोग कुणी कसा करावा हा ज्याचा त्याचा वकुब ठरवील. मोल मात्र कायम राहील. डॉ. विवेक पाटकर यांची सुंदर प्रस्तावना या ग्रंथाला लाभलेली आहे. संजय मिस्त्री यांचे मुखपृष्ठ आकर्षक आहे.


**मूल्य ४०० रु. सवलतीत २४० रु.**



# ग्रंथपान

**मनासी संवाद**

**अनिरुद्ध जाधव**



## स्वत:ला तपासून पाहणारे निर्मळ आत्मचरित्र

संस्था स्थापन करणे सहजसाध्य असते, अवघड असते तिच्या उद्दिष्टास साध्य करणे. लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयाची स्थापना १९७० साली झाली. त्यावेळची परिस्थिती आणि २०१२–१३ साली असलेले 'स्वायत्त' नामांकन हा कालखंड चाळीस–बेचाळीस वर्षांचा. यात जी क्रांती घडलेली आहे ती जिद्द, चिकाटी, ध्यास आणि समर्पित वृत्ती यांची कसून परीक्षा घेतली, तिचे फळ आहे, 'लातूर पॅटर्न'. हा १९८० पासून उदयास आलेला परवलीचा शब्दांलकार. महाराष्ट्रभर त्याचे आश्चर्य आणि कौतुकमिश्रित स्वागत झालेच, शेजारील राज्येही त्याच्याकडे आकर्षित झाली. दहावी आणि बारावीच्या परीक्षांना जे प्रचंड वलय निर्माण झाले, विद्यार्थ्यांच्या भवितव्याचे आणि पालकांच्या अपेक्षांचे, त्या राजमार्गाची गुरुकिल्ली हाती होती ती या महाविद्यालयाच्या. ज्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावा म्हणून प्राध्यापक गावोगाव जाऊन विद्यार्थी–पालक यांची मनधरणी करीत. त्याच महाविद्यालयात प्रवेश मिळावा म्हणून राज्यभरातून स्पर्धा निर्माण झाली. शेवटी स्थानिकांना सत्तर आणि राज्यातील इतरांना तीस अशी टक्केवारी प्रवेशासाठी निश्चित करावी लागली, इतका टोकाचा निर्णय शासनाला घ्यावा लागला, त्याला कारण या विद्यालयाच्या गुणवत्तेची महती आणि हमखास यशाची हमी. विद्यापीठाच्या गुणवत्तायादीत एकतर्फी वर्चस्व राहिले ते याच विद्यालयाचे. यादीतील पन्नास ते साठ टक्के विद्यार्थी याच विद्यालयाचे असणे, ही जादू नव्हती. हे जादुमय वाटावे असे उज्ज्वल यश होते, प्रचंड मेहनतीचे फळ होते. यात जो प्राध्यापकवर्ग सहभागी होता, त्यापैकी एक आहेत प्रा. अनिरुद्ध जाधव!

'मनासी संवाद – आपुल चि वाद आपणासी' हे अनिरुद्ध जाधव आत्मचरित्र. साधारणतः स्वत:तील उणिवा, दुर्गुण, अपयश याविषयी आत्मचरित्रात लिहिण्याचे टाळले जाते किंवा सबबींचे आवरण चढवून स्वत:ची सुटका करण्याचा प्रयत्न केला जातो. प्रा. जाधव मात्र याला अपवाद म्हणावे लागतील. स्वत:च्या सर्व गुणदोषांचे ते तटस्थपणे वर्णन करतात. आपल्यातील उणिवांमुळे किंवा स्वभावच तसा असल्याने अनेकदा समस्यांना सामोरे जाण्याचे प्रसंग त्यांच्यावर ओढवले. परंतु त्यासाठी त्यांनी इतरांना दोष देत स्वत:ची सुटका करण्याचा प्रयत्न केलेला नाही.

वडिलांचा शिक्षणासाठी असलेला आग्रह. वकील व्हावे ही त्यांची इच्छा. परंतु जाधव यांनी एलएलबी करूनही वकिली केली नाही. औरंगाबाद विद्यापीठात स्टोअरकीपर म्हणून काही काळ काम केले. परंतु उदगीरला उदयगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ना.य. डोळे यांची भेट झाली आणि आयुष्याला वेगळेच पण योग्य वळण मिळाले. थेट प्राध्यापकपदाची नेमणूक हाती मिळाली, कुठलीही मुलाखत न होता. त्यानंतर लातूरच्या राजर्षी शाहू महाविद्यालयात रूजू झाले ते त्या संस्थेच्या आग्रहावरून. त्यानंतर सगळे आयुष्य वाहून घेतले ते त्या संस्थेच्या प्रगतीसाठीच.

मुळात शेतीची आवड असलेल्या जाधवसरांना शेतीतील सर्व बारकावे ठाऊक आहेत. त्यांची वर्णने वाचताना कसलेला शेतकरीदेखील अवाक् होईल, इतकी ती सखोल आणि अभिनव आहेत. माणसाला छंद असतात परंतु काही छंद हे त्याच्या स्वभावाशी आणि मेंदूतील प्रक्रियेश निगडित असतात. ते यांची विज्ञाननिष्ठ सांगड घालून स्वत:च्या संगीत, सिनेमा, खेळाच्या छंदाविषयीचे मनमोकळेपणाने आणि तितकेच आत्मीयतेने वर्णन करतात. शिक्षणाची पद्धत आणि शिस्त याविषयी काटेकोर असलेले जाधवसर कुणी त्यांच्यातल्या त्रुटी दाखवून देतात तेव्हा कुठलाही अहंकार न दाखवता त्या कबूल करतात. तसेच, ज्या त्रुटी स्वत:ला जाणवल्या आणि त्या कबूल करता आलेल्या नाहीत, त्याची खंत उराशी बाळगल्याची कबुली देतात.

कुटुंबातील प्रत्येकाच्या स्वभावाचे, त्याच्या वागण्यातील सातत्याचे वर्णन करताना त्यांच्यासोबत मानसशास्त्राचे सूत्र असते. विज्ञानशाखेचे प्राध्यापक असूनही विद्यार्थी, पालक, राजकारणी, संस्थाचालक यांच्याशी असलेल्या निकटच्या संबंधातही हे म ानसशास्त्रीय विश्लेषण आपल्याला प्रत्यय देत राहते.


ग्रामीण भाग, त्यातला मराठवाड्यातील, जो सतत दुष्काळाशी झुंज देत आहे तो, सगळा परिसर या आत्मचरित्रात आलेला आहे. मराठवाडा विद्यापीठ, हैदराबाद मुक्तिसंग्राम याचेही तपशील यात आलेले आहेत. ते पूरक माहिती म्हणून नाही तर आत्मचरित्राचा एक अविभाज्य भाग म्हणून. त्यांच्या लेखनातला प्रामाणिकपणा जसा मनमोकळा आहे तसा त्यांचा वैचारिकपणातही तो आहे. प्रकरणनिहाय अशी स्वतंत्र मांडणी केलेली असल्याने प्रत्येक प्रकरण स्वायत्ततेचा अनुभव देते. सुटसुटीतपणा आणि सुस्पष्टता यामुळे व्यक्तिचित्रणे जशी हुबेहूब साकारलेली आहेत तशीच प्रत्येक प्रसंगाची मांडणी व त्यातली उत्कटता व्यक्त झालेली आहे.

एक साधेपण अंगी असलेली तपस्वी कर्तव्यदक्ष व्यक्ती या आत्मचरित्रात आपणास भेटतेच, त्याचवेळी एखादी शैक्षणिक संस्था नावारूपाला आणायची असेल, विद्यार्थी घडवायचे असतील तर उपक्रमशील शिक्षक कसा असावा याचा आदर्श म्हणून ज्यांच्याकडे पाहायचे, ते जाधवसर आणि डॉ. जनार्दन वाघमारेसर यांच्याकडेच निर्देश करावा लागेल. एक उत्तम आत्मचरित्र वाचल्याचा आनंद मिळतो, तो वेगळाच! सदानंद मोरे यांची उत्तम प्रस्तावना आणि सरदार जाधव यांचे सुंदर मुखपृष्ठ या गाथेस लाभलेले आहे.

**मूल्य ३५० रु.   सवलतीत २१० रु.**

# ग्रंथपान

**आम्ही अशा वेगळ्या...**
**अनुराधा गोरे**



**तिच्यातले रंग भरलेले पाहताना...**

''मातीत हात घातल्याशिवाय मातीचं प्रेम लागायचं नाही. रोप स्वत: लावल्याशिवाय त्याच्याबद्दल आत्मीयता वाटणार नाही. रोपाला स्वत: पाणी पाजल्याशिवाय नवी येणारी पानं, फुलणारी पाकळी काय आनंद देते ते अनुभवता येणार नाही. एकदा ज्याला या हिरव्या रंगाचं वेड लागलं त्याला पुन्हा शहाणं होता येणार नाही.''

शाळेत शिक्षण घ्यायला येणाऱ्या मुलांची खरी ओळख होण्यासाठी अंतर्मनपर्यंत आपला ज्ञानरस पाजण्याची क्षमता ज्याच्याकडे आहे त्या शिक्षकालाच ती होऊ शकते. निव्वळ पुस्तकातील अक्षरे वाचून दाखविण्याऐवजी ज्यांना जिवंत मनातील भाषा वाचता येते, त्यांनाच खरे शिक्षक म्हणता येते. त्याचप्रमाणे आपल्या भोवतीचा महिलावर्ग त्यांच्यातली एक झाल्याशिवाय त्याच्याविषयीचे खरे आकलन होणे शक्य नाही. ज्यांना ही एकरूपता साधलेली आहे. ज्ञानामृताचे घडे ज्यांचे सदोदित भरलेले आहेत काठोकाठ, त्यापैकी एक आहेत लेखिका अनुराधा गोरे. आपल्यासमोर असलेल्या विद्यार्थ्यांचे अंतरंग उलगडून पाहण्याची दृष्टी त्यांच्याकडेच आहेच, तशी आपल्याभोवती असणाऱ्या समस्त महिलावर्गाच्या जगण्याशी एकरूप होण्याची सिद्धी त्यांना लाभलेली आहे. त्यामुळे त्यांच्यातली शिक्षिका, समुपदेशक, स्नेहशील आधारवड, वत्सल आत्मीय ममत्वाची ओल सदैव प्रत्ययाला येत राहते. त्यांच्या या प्रत्ययाचा अनुभव 'आम्ही अशा वेगळ्या' या संग्रहातून पुन्हा पुन्हा येत राहतो. लहान मुलगी ते वयोवृद्ध आजी असा एक प्रवास म्हणजे एक आयुष्य. या आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर येणारी सुखदु:खे, टक्केटोणपे, आशानिराशा, इच्छा आणि अपेक्षाभंग, भरलेले कुटुंब आणि एकाकीपण, असे खूप काही प्रत्येकीच्या वाट्याला येते. साकार झालेल्या स्वप्नांनाही दु:स्वप्नांची किनार असते. खूप काही सहन करूनही स्वत:च्या पायावर उभी केलेली इमारत दिसते. या सगळ्यात केंद्रस्थानी असते ती स्त्री. एक महिला या संग्रहात आलेल्या अनेक महिलांची बहुपदरी वर्णने वाचताना केंद्रस्थानी सापडते ते तिचे मन. नव्या घरात सर्व सोयी आहेत परंतु वृद्ध मातापित्यांसाठी जागा नाही, त्यावेळी मनाला होणारे क्लेश, समृद्धीने भरलेल्या घरात नवऱ्याने केलेला छळ मुकाट्याने सहन करायचा, मुलांच्या समोर तमाशा नको म्हणून; त्यावेळी होणारा कोंडमारा, नवऱ्याच्या सोबत सासूसासऱ्यानेही बेदखल करीत घराबाहेर काढल्यामुळे आलेले एकाकीपण, सवतीशी जुळवून घेण्याची येणारी नामुष्की, स्वत:च्या इच्छेप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य मिळाल्याने येणारा बिनधास्तपणा, खूप हरल्यानंतर अचानक सापडलेला आनंद, ठरवून जगण्याला वेगळी दिशा देण्याचा केलेला धाडसीपणा या सगळ्या विविध रंगांचा पिंगा आहे तो मनाभोवती. त्याचे प्रतिनिधित्व करीत आहेत राणी, राधा, अनामिका, नकोशी अपराजिता, मुक्ता, संध्या, सुगंधा, सरस्वती, ताई, आजी, गुलाब यांसारख्या अनेक जणी त्यांच्या वागण्या-बोलण्यात जसे परिस्थितीचे वर्णन येते तसे मनाचे विविध कंगोरे व्यक्त होत जातात. यातील प्रत्येकीचे जगणे स्वतंत्र आहे, तसे तिच्या वाट्याला आलेले रंगही स्वतंत्र आहेत आणि त्यातून व्यक्त झालेल्या मनाची अवस्थाही. त्यातून दिसणारी स्त्री कशी आहे याविषयी लेखिकाच 'डोंबारीण' या कथेत स्पष्ट करतात. दोन काठ्यांना बांधलेल्या दोरावरून स्वत:चा तोल सावरीत जाणारी, सगळी ताकद पणाला लावणारी डोंबरीण मनाची शक्ती आणि एकाग्रता पणाला लावते, चेहऱ्यावरचे हसरे भाव टिकवून ठेवते, तेही कौतुकाचा एकही शब्द अपेक्षित न धरता, स्त्री ही तशी आहे.

हा संग्रह व्यक्तिचित्रणाचा आहे, आपल्याला आलेल्या अनुभवाचा प्रत्यय देणारा. यात प्रत्येकीची कथा आहे, तिचा जीवनप्रवास आहे, तो तिच्याठायी असलेल्या वेगळेपणाविषयीचे दर्शन घडवतो. अगदी मोजकेपपणाने त्यांची मांडणी केलेली आहे. लहान लहान लघुनिबंध असावेत किंवा लघुकथा असाव्यात अशी. प्रत्येकीच्या मांडणीला एक शैली आहे फ्लॅशबॅकची, निवेदनाची, जी थेट गाभ्याशी घेऊन जाते.

'वेड्या बापाचा शहाणा गणू आपल्या अशिक्षित पण व्यवहारी, प्रेमळ आईकडे कौतुकानं-आदरानं पाहत होता. त्याचा चेहरा सांगत होता, तो गुलाबचं स्वप्न पुरं करेल.' 'एखादी जिकायचंच ह्या इराद्यानं लढलेली लढाईच असते ती. कधी यश येतं तर कधी अपयश.' 'राधा मला पुन्हा भेटेल की नाही हे माहीत नव्हतं. पण तिची सर्वांवर आईसमान प्रेम करण्याची वृत्ती मला माझ्या कायम लक्षात राहणारी होती.' यासारखी वाक्ये संपूर्ण व्यक्तिमत्त्वच मनावर कायमचे ठसवून जाते.

अनुराधा गोरे यांची एकूण साहित्यसंपदा एक समर्पित भावनेने केलेली साहित्यसेवा म्हणावी लागेल. शिक्षिका असल्याने कोवळ्या मनाच्या उमलण्याकडे त्या ममत्वाने आणि तितक्याच आदर्श वृत्तीने पाहतात. तितक्याच देश आणि संरक्षणाच्या विषयाकडे वीरमातेच्या नजरेतून पाहतात. त्यांचा सुरू असलेले कार्य त्याच तळमळीतून आहे.


शिरीष घाटे यांचे मुखपृष्ठ शीर्षकाला संपन्न करणारे आहे.

**मूल्य १५० रु.   सवलतीत १०० रु.**


@abpmajhatv
abp
माझा
दिलखुलास
व्यक्तिमत्वांसोबत
दिलखुलास गप्पा
पाहायला विसरू नका
दर शनि. रात्री ९ वा.
पुनःप्रक्षेपण - रवि. सकाळी ९ वा.
माझा
कट्टा
एपिसोड्स
पाहण्यासाठी
स्कॅन करा.
facebook.com/abpmajha
instagram.com/abpmajhatv
twitter.com/abpmajhatv
www.kooapp.com/profile/abpmajha
youtube.com/abpmajhatv
www.abplive.com
For queries, please contact: adsales@abpnetwork.com | Download the ABP Live app

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/2022-2024
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.